विषय
सं. क्र.

ाम समर्थ ॥

# समर्थसंजीवनी

म्हणजेच

## समर्थांच्या शिकवणी उर्फ रामदासी वेचे

अखंड सावधान रे । प्रयोग प्रेत्न मान रे ॥
प्रसंग हा तुफान रे । नकोचि वेवधान रे ॥ १ ॥
विवेक पाहणें बरा । बरा विचार तो करा ॥
उपासकांसि सूचना । 'उपासना, उपासना' ॥ २ ॥

( सर्व प्रकरणांच्या सारांशासह )

हा ग्रंथ लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.
संपादक 'मुमुक्षु' पुणें,
यार केला.

REFBK-0008340

द्वितीयावृत्ति, शके १८७६, श्रीदासनवमी

मूल्य सहा रुपये

अनुक्रम....३३५७०..... दि: ........
........श्रीराम........ दि. १५१०........

# समर्थसंजीवनी

म्हणजेच

## समर्थांच्या शिकवणी उर्फ रामदासी वेचे

अखंड सावधान रे । प्रयोग प्रेत्न मान रे ।।
प्रसंग हा तुफान रे । नकोचि वेवधान रे ।। १ ।।
विवेक पाहणें बरा । बरा विचार तो करा ।।
उपासकांसि सूचना । ' उपासना उपासना ' ।। २ ।।

वाचनालय ठाणे
दा. क्र. 3580

( सर्व प्रकरणांच्या सारांशासह )

हा ग्रंथ लक्ष्मण रामचंद्र पांगारकर, बी. ए.
संपादक 'मुमुक्षु' पुणें
यांनीं तयार केला.

REFBK-0008340

द्वितीयावृत्ति, शके १८७६, श्रीदासनवमी

मूल्य सहा रुपये

प्रकाशक : गजानन त्र्यंबक वगदे (कुलकर्णी)
कार्यवाह, श्रीपांगारकर स्मारक मंडळ,
२०६० दिल्ली दरवाजा,
नाशिक शहर.

( सर्व हक्क श्री. मोरेश्वर लक्ष्मण पांगारकर यांचे स्वाधीन )
प्रथमावृत्ति – आश्विन शके १८४६, ऑक्टोबर १९२४
द्वितीयावृत्ति – श्रीदासनवमी, शके १८७६, फेब्रुवारी १९५५

मुद्रक : मधुकर बाळकृष्ण जोशी, बी. ए.
ज्ञानविलास प्रेस, बुधवार पेठ,
पुणें २.

॥ श्रीराम समर्थ ॥

# प्रकाशकाचे दोन शब्द

' आदिनारायणं विष्णुं ब्रह्माणं च वसिष्ठकम् ।
श्रीराममारुतिं वंदे रामदासं जगद्गुरुम् ॥ '

(१) श्रीवाग्देवतेच्या कृपाप्रसादानें व श्री. पांगारकर स्मारक-मंडळाच्या वतीनें समर्थसंजीवनी हा ग्रंथ मराठी वाचकांच्या हातीं देण्यास आम्हांस परमानंद होत आहे. वास्तविक पाहतां श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या जुन्या व नव्या दासबोधांतील हे निवडक वेंचे म्हणजे अमृतसंजीवनी म्हटल्यास वावगें होणार नाहीं. समर्थांचें कोणतेंही वाङ्मय घ्या, ग्रंथराज दासबोध, आत्माराम, मनोबोध ऊर्फ मनाचे श्लोक व त्यांचा स्वतंत्र अभंग-गाथा यांपैकीं कोणतेंही वाङ्मय वाचलें अगर अभ्यासिलें, तर त्यांत असें दिसून येतें कीं, धर्म, तत्त्वज्ञान, संस्कृति व आपली मायभूमि याविषयींचे तळमळीचे, हृदयस्पर्शी, कार्यप्रेरक असे सहजोद्गार दिसून येतात. समर्थांचें हें वाङ्मय म्हणजे श्रीरामचंद्र प्रभूच्या कृपाप्रसादानें भारतीयांना मिळालेला हा बहुमोल विचारांचा ठेवाच म्हटला पाहिजे.

( २ ) मृतवत् झालेल्या भारतवर्षाला पूर्ववत् क्रियाशील व चैतन्ययुक्त बनविण्याचें सामर्थ्य समर्थांच्या बहुगुणी विचार-प्रणालींत आहे. समर्थांची ही विचारप्रणाली गुरुवर्य पांगारकरांनीं संकलित करून रसिक वाचकांच्या हातीं देण्याचें कार्य प्रथम १९२४ सालीं केलें. आज एक पिढीहूनही अधिक काळ लोटला . या प्रभावी विचारसरणीचा परिचय या चालू पिढींतील लोकांना असण्याचा संभव कमीच. म्हणून आम्ही श्री. पांगारकरांचा हा समर्थसंजीवनी ग्रंथ पुनर्मुद्रित करून वाचकांच्या हातीं देत आहोंत. या ग्रंथाचें पुनर्मुद्रण व्हावें अशा महाराष्ट्रांतील अनेक विद्वान व समर्थसांप्रदायिक लोकांकडून अनेक वेळां सूचना आलेल्या आहेत. परंतु हें कार्य प्रतिकूल परिस्थितीमुळें तत्परतेनें हातीं

घेतां आलें नाहीं, याबद्दल अत्यंत खेद होतो. केसरीचे माजी विद्वान संपादक समर्थभक्त श्री. ज. स. ऊर्फ तात्यासाहेब करंदीकर यांनीं, " समर्थ-संजीवनी ग्रंथ हजारों कामें बाजूस ठेवून, अगोदर छापून समर्थभक्तांच्या हातीं द्या " अशीं ३–४ पत्रें पाठवून या कार्यास जोराची चालना दिली. केसरीच्या दि. ६।११।१९५१ च्या अंकांत रामदासी बुवावर आपला सुंदर व विस्तृत अभिप्राय देतांनाही समर्थसंजीवनी लवकर छापून मराठी वाचकांच्या हातीं द्या, अशी पुन्हा कळकळीची सूचना केलेली आहे. तसेंच आमच्या या प्रकाशनकार्याकडे अत्यंत आस्थेनें पाहणारे मध्यभारतांतील गिरड मठाचे महंत समर्थभक्त श्री अनंतदास रामदासी हे एक होत, यांनी नाशिक मुक्कामीं समक्ष भेट देऊन मोठ्या कळकळीनें विचारपूस करून या कार्यास चालना दिली.

( ३ ) समर्थांचें हें जगदुद्धाराचें कार्य उपासनेच्या बळावर चाले. आधीं उपासना आणि नंतर राष्ट्रकार्य हा त्यांचा जीवनक्रम होय. आपल्या उपास्यदेवतेवर समर्थांची फार मोठी निष्ठा होती. ही निष्ठा राष्ट्रांत निर्माण व्हावी असा त्यांचा यत्न होता. समर्थ एके ठिकाणीं म्हणतात कीं, ' साह्य आम्हां हनुमंत । दैवत श्रीरघुनाथ । आराध्य गुरु श्रीराम समर्थ ।। उणें काय दासासी ।। ' यावरून आपलें कुलदैवत, कुलगुरु व हनुमंत देव-देवतांवर समर्थांची किती जाज्वल्य निष्ठा होती हें दिसून येतें.

(४) श्रीसमर्थांची यत्नदेवाची उपासना फार कडक होती. ' यत्न तो देव जाणावा ' असें, ' आधीं केलें मग सांगितलें ' या वचनाप्रमाणें समर्थ आधी आचरून नंतर राष्ट्राला मोठ्या कळकळीनें सांगत असत. १७ व्या शतकांतील राष्ट्राच्या परिस्थितीप्रमाणें आजही भारताची अत्यंत शोचनीय स्थिति आहे. भारताची ही स्थिति दूर करण्यास जगद्गुरु समर्थांनीं पुन्हा निर्गुण–निराकार स्थिति सोडून, सगुण–साकार रूप धारण करून, आमच्यांत यावें आणि राष्ट्राची झालेली दुःस्थिति पुन्हा दूर करून भारताला चढतें वाढतें वैभव प्राप्त करून द्यावें अशी श्रीसमर्थांचे चरणीं नम्र प्रार्थना आहे.

(५) श्रीसमर्थांच्या वाङ्मय–वाटिकेंतून सुवासिक फुलांचा हार तयार करून कै. गुरुवर्य पांगारकरांनीं आपल्या हातांनीं तो महाराष्ट्र-

शारदादेवीच्या कंठांत घालून तिचें वैभव वाढविल्याचें दिसून येतें. ही विचाररत्नमाला देव–दानवांच्या युद्धांतील अमृतसंजीवनीप्रमाणें उपयोगी पडते. मृत राष्ट्राच्या मुखांत जीवन ओतण्याचें श्रीसमर्थांनीं सतराव्या शतकांत जसें प्रभावी कार्य केलें, त्याचप्रमाणें या विसाव्या शतकांतही मृतवत् झालेल्या राष्ट्राला समर्थसंजीवनी देऊन, कै. पांगारकरांनीं बहुमोल कार्य करून भारतास उपकृत करण्याचें महत् यश संपादन केलें आहे.

श्री. पांगारकरांनीं ह्या समर्थसंजीवनीला रसाळ, उद्बोधक व हृदयस्पर्शी अशी ८० पृष्ठांची प्रस्तावना लिहिली आहे. सदर प्रस्तावनेचा वाचकांना ग्रंथ समजण्यास फारच उपयोग होतो. किंबहुना ही प्रस्तावना म्हणजे समर्थसंजीवनीची रहस्यदीपिकाच म्हटल्यास वावगें होणार नाहीं. समर्थसंप्रदायांतील विद्वान अभ्यासू जनांनीं व श्री. ज. स. करंदीकर ह्यांच्या–सारख्या मार्मिक समर्थ–वाङ्मयभक्तांनीं या प्रस्तावनेचा अनेक वेळां गौरवपूर्वक उल्लेख केल्याचें आढळतें.

## थोरांचें साहाय्य

ह्या वाङमयप्रकाशनकार्याला अनेकांनीं यथाशक्ति साहाय्य देऊन आम्हांस उपकृत केलें आहे. कांहीं साहाय्यकांचा नामोल्लेख करणें अत्यंत आवश्यक आहे. त्यांचा थोडक्यांत उल्लेख करतों. आमच्या श्रीमंत भगिनी श्री. पार्वतीबाई तिवारी, रा. नाशिक, यांनीं या कार्यास १६२ रु., हैद्राबाद येथील सुप्रसिद्ध बॅरिस्टर श्रीधर वामन नाईक, बार अॅट लॉ ( Bar at Law ) १०० रु., मुंबई येथील देशस्थ ऋग्वेदी संस्था मध्यवर्ति मंडळाचे अध्यक्ष श्रीमंत नानासाहेब काळे १०१ रु., नाशिक येथील सुप्रसिद्ध आर्टिस्ट कै. गजाननराव गर्गे ५० रु., कै. श्रीमंत गोपाळराव सिताराम ठाकूर नाशिक ५० रु., यावल येथील सुप्रसिद्ध समाजसेविका व आमच्या प्रेमळ भगिनी श्रीमंत श्रीरमाबाईसाहेब ५० रु., हैद्राबाद येथील सुप्रसिद्ध सरदार श्रीमंत शामराव राजे रॉय रायन् ५० रु., इत्यादि थोर गृहस्थांनीं ह्या वाङमय-प्रकाशनकार्याला आत्मीयतेनें साहाय्य देऊन आम्हांस उपकृत केलें, याबद्दल यांचें आणि इतरांनींहि द्रव्य देऊन जें साहाय्य केलें त्याबद्दल त्यांचेंहि मी मनःपूर्वक अभिनंदन करितों.

ह्या ग्रंथांत श्रीसमर्थ-कल्याणांचें तीन रंगी चित्र देण्यांत आलें आहे. सदर चित्राचा ब्लॉक, मागणी करतांच सज्जनगड येथील श्रीसमर्थसेवा-मंडळाचे उपाध्यक्ष श्री. बाबूराव वैद्य व खजिनदार श्री. माधवराव भीमराव हिरळीकर यांनीं मोठ्या आस्थेवाईकपणानें दिला, ह्याबद्दल ह्या उभय समर्थभक्तांचा मी अत्यंत ऋणी आहें.

ह्या ग्रंथांत श्रीसमर्थांच्या छायाचित्राजवळ श्रीसमर्थांची भूपाळी तयार करून छापली आहे. श्रीसमर्थ व श्रीसमर्थ सांप्रदायिक वाङमय-महोदधींत श्रीसमर्थ सद्गुरूवर एकही भूपाळी आढळत नाहीं असें आम्हांस वाटतें. हें शल्य हृदयास बरेच दिवसांपासून तापदायक झालें होतें, परंतु श्रीसमर्थांच्याच कृपाप्रसादानें ह्या भूपाळीची रचना झाली आहे. महाराष्ट्र संत-साहित्यिकांनी ती गोड करून घ्यावी अशी प्रार्थना आहे.

समर्थसंजीवनी ग्रंथ प्रसिद्ध करण्यास आमचे परम स्नेही संतवाङमय-भक्त श्री. मोरेश्वर लक्ष्मण पांगारकर वैद्य यांनी अनुमति दिल्यामुळेंच ह्या ग्रंथाचें प्रकाशन होऊन मराठी वाचकांच्या हातीं हा ग्रंथ देतां येत आहे. ह्या त्यांच्या औदार्याबद्दल मराठी वाचकांच्यातर्फे हार्दिक आभार मानतों. ह्यापुढेंहि ते ग्रंथप्रकाशनास मोठ्या उदारतेनें अनुमति देऊन आपलें संतवाङ्मयप्रेम प्रकट करतील अशी आशा आहे.

ह्या ग्रंथप्रकाशनकार्यामुळें परिचित झालेले संतवाङ्मयाभ्यासी व कै. गु. पांगारकरांचे चहाते श्री. बाळकृष्ण भाऊ जोशी ज्ञानविलास प्रेसचे मालक आणि त्यांचे सुविद्य पुत्र मधुकरपंत बी. ए. यांनीं मागील ग्रंथाप्रमाणेंच ह्या समर्थसंजीवनीचें अंतर्बाह्य छपाईचें कार्य उत्कृष्ट करून दिलें ह्याबद्दल आम्ही त्यांचे अत्यंत आभारी आहोंत.

१९३२ सालीं कै. ह. भ. प. पांगारकर हे, सोनगीरचे ह.भ.प. केशव दत्तमहाराज व प्रस्तुत ग्रंथप्रकाशक ह्यांच्यासमवेत टाकळीस (नाशिक) गेले होते. समर्थमठाची दुःस्थिति पाहून त्यांना अत्यंत दुःख झालें. तेथें श्री मारुतीरायाच्या समोर बसून मठाचा जीर्णोद्धार व टाकळी-ग्रामसुधारणा करण्यासाठीं एक २४ कलमी योजना आंखून तत्कालीन मठपती यांच्याजवळ दिली होती. सदर योजना ५ ते ७ लाख रुपयांच्या खर्चाची आहे. ही योजना मुंबई राज्य सरकार आपल्या पंचवार्षिक योजनेंत समाविष्ट करून त्याची

अंमलबजावणी सत्वर करील अशी आशा आहे. सदरची २४ कलमी योजना ग्रंथाचे शेवटीं दिली आहे.

शेवटीं निर्गुण निराकार चिद्घनस्वरूप सर्वव्यापी अशा परमेश्वराच्या कृपाप्रसादानें हें समर्थसंजीवनी–ग्रंथप्रकाशनाचें कार्य तडीस गेलें आहे, याबद्दल आम्हांस परमानंद होत आहे. त्या दयाधन परमेश्वरानें हें कार्य हातावेगळें करण्यास आम्हांस ज्या विविध शक्तींचा लाभ दिला त्याबद्दल त्या सर्वव्यापी परमेश्वराचे आम्ही अत्यंत ऋणी आहोंत हें नमूद करण्यास आम्हांस अतिशय समाधान होत आहे. अखेरीस भगवान् श्रीज्ञानेश्वर महाराजांच्या वचनानें मराठी वाचकांची प्रार्थना करून हें लांबलेलें निवेदन पुरें करितों.

जऱ्ही पुरोहितपणें । मी बोलिलों पुरें उणें ।
तरी तुम्ही माउलीपणें । उपसाहिजो जी ॥

ॐ तत् सत् ।

श्री दासनवमी शके १८७६
दिनांक १६।२।१९५५
नाशिक

श्रीसमर्थचरणरज
ग. त्र्यं. वगदे (कुलकर्णी).
प्रकाशक

॥ श्रीराम समर्थ ॥

# प्रस्तावना.

सामर्थ्य आहे चळवळींचें । जो जो करील तयाचें ।
परंतु येथें भगवंताचें । अधिष्ठान पाहिजे ॥ २६ ॥

—दासबोध, द. २०, स. ४.

(१) श्रीसमर्थ रामदासस्वामींच्या चरणयुगुलाला भक्तिनम्र चित्तानें वंदन करून दोन प्रास्ताविक शब्द सांगतों. तीन शतकांमागें राष्ट्रावर कोणता तुफान प्रसंग आला होता व त्यांतून स्वधर्मसूर्याचा महाराष्ट्रक्षितिजावर उदय होऊन तो कसा टळला हा रम्य इतिहास सर्वांस विदित आहेच. परधर्म व परदास्य यांच्या मान्याखालीं हिंदुसमाज चिरडलेला, स्वधर्मकर्माचा प्राय: लोप झालेला, दैन्यदारिद्र्यउद्वेगानें लोक त्रस्त झालेले, अमर्याद फितवे-खोरांचें फावलेलें, नाना बंडपाखांडें माजलेलीं, चारित्र्य हीनावस्थेला पोंचलेलें —असल्या बिकट परिस्थितींतून देवी भवानीनें समर्थांच्या वाणींत व शिवबांच्या तलवारींत संचार करून महाराष्ट्राचा माथा जगाच्या इतिहासांत उजळ केला. महाराष्ट्रधर्म, महाराष्ट्रीय लोक व मराठी भाषा यांचा डंका सर्वत्र गाजूं लागला. सह्याद्रीच्या गिरिकंदरांतून वीरश्रीचा व कर्तृत्वाचा वारा सोसाटयानें वाहूं लागला. भिमथडीचे व गंगथडीचे घोडे हिंदुस्थानभर नाचूं लागले. पराक्रमी वीर, बुद्धिवंत मुत्सद्दी, स्वानुभवी संत व प्रासादिक कवि महाराष्ट्रांत चमकूं लागले. महाराष्ट्राचें हृदय वीररसानें उचंबळलें. ब्रह्मतेज व क्षात्रतेज एकवटलें. हात, पाय, डोकें, हृदय—सर्व देहांत वीरश्रीचा संचार होऊन महाराष्ट्ररूपी विराट पुरुष कुंभकर्णी महानिद्रेंतून जागा झाला. महाराष्ट्राची निद्रा कोणी घालविली ? तप:प्रभावानें अमोघ झालेल्या आपल्या संजीवनी वाणीनें महाराष्ट्र ज्यानें हालवून जागा केला, तो महा-मांत्रिक श्रीसमर्थ रामदास स्वामी हे होत. समर्थांची वाणी व शिवरायांची तलवार यांनीं अद्भुत कार्य करून महाराष्ट्राचें 'आनंदवनभुवन' बनविलें.

समर्थांची ती ओजस्वी वाणी आजच्या •महाराष्ट्राच्या कानावर पडायला पाहिजे आहे. ही वाणी आजचा फाटलेला महाराष्ट्र सांधील व ' सकल लोक एक करावे ' या मंत्राचा ध्यास घेईल तर महाराष्ट्र पुन्हा खरोखरीचा ' महाराष्ट्र ' होईल. समर्थांच्या वाणींत लोकोत्तर तेजस्विता आहे. समर्थांवर सकल लोकांची श्रद्धा आहे. समर्थांची ही वाणी लोक अंतरांत ऐकतील तर प्रपंच भाग्याचा होईल, राजकारण यशस्वी होईल, परमार्थबुद्धि विस्तार पावेल. ही वाणी सर्वांच्या कानीं घालण्याचा प्रस्तुत ग्रंथ हा एक प्रयत्न आहे.

(२) प्रस्तुत ग्रंथांत समर्थांच्या सर्व महत्त्वाच्या शिकवणींचा समावेश केला आहे. समर्थांचे उपलब्ध ग्रंथ पाहून त्यांतून निवडक वेंचे विषयवारीनें लावले आहेत. प्रत्येक विषय त्या त्या ठिकाणीं पूर्ण व्हावा यासाठीं ठिकठिकाणचे उतारे घेतले आहेत जुना दासबोध, वीस दशकी दासबोध, मनोबोध, स्फुट प्रकरणें, करुणाष्टकें, पदें, अभंग, विविध वृत्तांतली त्यांची सर्व कविता पाहून प्रस्तुत वेंचे तयार केले आहेत. धुळ्याचे रा. शंकरराव देव यांनीं प्रसिद्ध केलेले ग्रंथ व त्यांच्या मासिकांतील लेख यांचा चांगला उपयोग झाला. याबद्दल त्यांचा मी फार आभारी आहें. रामदासी वाङमय मोठ्या परिश्रमानें शोधून प्रसिद्ध केल्याबद्दल देवांचे महाराष्ट्रावर थोर उपकार झाले आहेत. श्रीसमर्थांच्या वाङमयाचा माझा परिचय आजकालचा नाहीं, चांगला तीस वर्षांचा आहे. या ग्रंथांतील उतारे विषयवारीनें घेतले असून विषयाचा क्रम साधण्याचाही प्रयत्न केला आहे. अवतरणाखालीं विस्तृत टीपा दिल्या असून कोठें कोठें मथळ्याखालीं प्रकरणाचें महत्त्व दर्शविलें आहे. सांप्रत लोकांत गद्य वाचण्याचा प्रघात अधिक पडला आहे, म्हणून व प्रकरणांतील विषयांचा सुलभ रीत्या पूर्ण बोध व्हावा म्हणून सर्व प्रकरणांचा ' सारांश ' प्रथम ८० पानांत दिला आहे. तो वाचकांनीं अगोदर वाचावा व मग प्रकरणें वाचावींत. नुस्ता ' सारांश ' वाचल्यानें सर्व ग्रंथाचें तात्पर्य लक्ष्यांत येईल. तथापि सारांश वाचल्यानंतर समर्थांच्या वाणीशीं वाचकांनीं परिचय करून घ्यावाच. राजकारणविषयक प्रकरणांचा सारांश सुखबोधार्थ अधिक सविस्तर दिला आहे. सर्वांनीं, विशेषतः तरुणांनीं, सदर ग्रंथ निरंतर श्रवण-मननांत ठेवून कार्यतत्पर व्हावें अशी माझी इच्छा आहे. ती पूर्ण करणार

श्रीराम समर्थ आहेत.

(३) प्रकरणांचे सारांश पुढें दिलेच आहेत. तथापि येथें प्रस्तावनेंत प्रकरणांचा क्रम, परस्परसंबंध व महत्त्वाचे मुद्दे यांचा थोडक्यांत विचार सुचविणें इष्ट वाटतें. १ प्रपंचविचार, २ राजकारणविचार, ३ परमार्थविचार व ४ विविधविषयक प्रकरणें. सर्व मिळून जवळ जवळ १५० प्रकरणें झालीं आहेत.

(४) प्रपंचविषयक सर्व प्रकरणांचा सारांश असा आहे कीं, ज्याला परमार्थ पुरा साधायचा आहे त्यानें विवेकवैराग्यपूर्वक प्रपंचाचा सर्वस्वी त्याग करावा—'उठोनि वाटेचि लागावें, दिगंताप्रती.' पण ज्याला हें होत नसेल त्यानें प्रपंच करून परमार्थ करावा,प्रपंचाची मिठी हळुहळु सोडवीत परमार्थी भरावे व देहाचें सार्थक करावें, प्रपंचांत आणि परमार्थांत सावधानता ठेवावी. 'इहलोक परत्र साधावें। दोहींकडे,' प्रपंच करायचा असें ठरल्यावर मग तो खबरदारीनें, दक्षतेनें, नेटका करावा. कामधंदा, उद्योग, न्यायनीतीनें चोख करून भाग्य मिळवावें व भोगावें. दरिद्री, करंटा, रडका संसार करूं नये. इहपर साधायला प्रयत्न, कष्ट केले पाहिजेत. दीर्घसूचनेनें व दक्षतेनें वागलें पाहिजे. आतां प्रयत्न करावा तो कोणता हें प्र. ३ व ४ मध्यें पहावें.—'ज्याचा जो व्यापार। तेथें असावें खबरदार' 'सदेवपणाचें लक्षण। रिकामा जाऊं नेदी क्षण' 'लहानथोर काम कांहीं। केल्यावीण होत नाहीं' इ० सूत्रें लक्षांत ठेवून प्रयत्न करावा. चुके, ठके, विसरी, सांडी हें आळशी व दुश्चित मूर्खाचें लक्षण आहे. तो 'लोक खाती आपण पाहतो। दैन्यवाणा!' यास्तव आळस झाडून कष्ट करावे, कठिण प्रसंगासाठीं संचय करावा, भोगावें व परोपकार करावा. 'सुशब्दें राजी राखावा। सकळ लोक' हें लोकांशीं वागतांना ध्यानांत ठेवावें. 'कांहीं मेळवी मग जेवी,' यांत अन्नाला गोडी आहे. आयदोबा होऊन बसूं नये. आतां ब्राह्मणाचें कर्म कोणतें, संसार कशानें धन्य होतो, गृहस्थाश्रम कसा करावा, हें प्र. ५–७ मध्यें पहावें. स्नान–संध्यादि नित्यनैमित्तिक कर्में यथाशास्त्र करून आचारविचार पाळावे. चारही आश्रमांत गृहस्थाश्रम उत्तमोत्तम आहे. 'परंतु पाहिजे स्वधर्म, आणि भूतदया!' स्वधर्मकर्म आचरावेत. उपासनामूर्तिध्यानीं, अथवा आत्मानुसंधानीं, अथवा श्रवणमननीं रत असावें. द्रव्य मेळवावें; पण लोलंगता (आसक्ति) नसावी.

अनुक्रम ....33400.... दि: ....3/5....
क्रमांक .....9.5..... नों. दि: 29/8/5



परोपकारांत रमावें, भूतदया अंतरीं ठेवून वागावें. प्रपंच नेटका म्ह. परमार्थरूप करावा. त्यासाठीं विवेकवैराग्य अंगीं बाणावें. प्रपंचांतही विवेकवैराग्याचें वर्म (प्र. ८।९) जाणून वागावें. नुस्तें वैराग्य हेकाडपिसें व नुस्ता शब्दविवेक पांचट म्हणून विवेक आणि वैराग्य दोन्ही पाहिजेत. निषिद्ध विषयांचा त्याग करावा व शुद्ध विषय कार्याकारण घ्यावे, विधीनें विषय घ्यावेत, म्हणजे प्रपंचांत राहूनही विषयत्यागाचें फळ मिळतें. नित्यानित्यविवेक जागृत ठेवून संसारांत वागलें असतां इहपर दोन्ही साधतात व पुरुष सत्कीर्तीला पात्र होतो. ( प्र. १० ). आतां प्र. ११ ते १४ हीं अत्यंत महत्त्वाचीं आहेत. यांतील प्रयत्नाचा उपदेश बहुमोल आहे. धड परमार्थ नाहीं व धड प्रपंचही नाहीं अशा तमोगुणी, आळशी करंट्याच्या डोळ्यांत समर्थांनीं प्रयत्नाचें झणझणीत दिव्यांजन घातलें आहे. करंट्याचीं कुलक्षणें त्यागार्थ सांगितलीं असून पुरुष शरीरकष्ट, दीर्घोद्योग व अचूक यत्न करून कसे भाग्यवंत होतात हें सांगितलें आहे. हीं प्रयत्नाचीं सुंदर सूत्रें प्रपंच, राजकारण व परमार्थ उत्कृष्ट साधूं जाणाऱ्या सर्व पुरुषांनीं चित्तांत कोरून ठेवावींत.

व्याप आटोप करिती । धके चपेटे सोसिती ।
तेणें प्राणी सदेव होती । देखतदेखतां ।। १ ।।

साक्षेप करितां कष्टती । परंतु पुढें सुरवाडती ।
खाती जेवती सुखी होती । यत्नें करुनी ।। २ ।।

म्हणोनी आळस नसावा । तरीच पाविजे वैभवा ।
अरत्रीं परत्रीं जीवा । समाधान ।। ३ ।।

देहें जैसें केलें तैसें होतें । यत्न केल्या कार्य साधतें ।
तरी मग कष्टावें तें । काय निमित्त ? ।। ४ ।।

कष्टेंवीण फळ नाहीं । कष्टेंवीण राज्य नाहीं ।
केल्यावीण होत नाहीं । साध्य जनीं ।। ५ ।।

जेहीं उदंड कष्ट केले । ते भाग्य भोगून गेले ।
येर ते बोलतचि राहिले । करंटे जन ! ।। ६ ।।

याशिवाय प्रयत्नोत्तेजक 'केल्यानें होत आहे रे' 'अचूक यत्न तो देवो' 'वन्ही तो चेतवावा रे' इ. अनेक वचनें आहेत. समर्थांच्या ओजस्वी वाणीनें प्रगट झालेलीं हीं दिव्य सूत्रें प्रत्यक्ष आळसालाही प्रयत्नवादी बनवितील! रडक्यांच्या प्रपंचाचें चित्र (प्र. १५) व सभाग्याच्या संसाराचें चित्र (प्र. १६) हीं दोन्हीं रेखीव आहेत. प्रपंचांत प्रियाप्रिय प्रसंग कधीं कधीं येतात. म्हणून 'बरें ओखटें सर्व साहोनी जावें' (प्र. १७) हें ध्यानीं ठेवून न डगमगतां वागावें. प्रपंचांत चातुर्यानें व शहाणपणानें वागून व परोपकारार्थ देह कष्टवून लोकीं भलें म्हणवून घ्यावें व हें साधत नसलें तर शाहण्यांची संगत धरावी म्हणजे कळतें (प्र. १८–२०).

(५) राजकारणविषयक प्रकरणें ३७ असून दोन विभागांत दिलीं आहेत. पहिल्यांत राजकारणाचे सिद्धांत व दुसऱ्यांत राजकारणी पुरुषांचीं लक्षणें, पहिल्यांत प्रसंगोपात्त सुचलेले शास्त्रविचार व दुसऱ्यांत कर्त्याचा विचार. 'राजकारण' हा शब्द सध्यां आपण वापरतों त्यापेक्षां अधिक व्यापक अर्थानें समर्थांनीं योजिला आहे. राजा आणि प्रजा यांचे संबंध, लोकसमाजाची स्थिति सुधारण्यासाठीं कराव्या लागणाऱ्या चळवळी, लोकांचे पुढारी व त्यांच्या कर्तव्याचें नियमन; चातुर्वर्ण्यव्यवस्था व तिच्या रक्षणाचे उपाय, लोक राजी राखून कार्यभाग करणें म्ह. लोकसंग्रह ह्या सर्व गोष्टींचा समावेश समर्थांच्या 'राजकारणांत' होतो. कुटुंबाच्या हिताचे सर्व विचार जसे 'प्रपंचांत,' तसे राष्ट्रहिताचे सर्व विचार 'राजकारणांत' अंतर्भूत होतात. व्यक्तीचा प्रपंच, समुदायाचें राजकारण. प्रपंचांत एका व्यक्तीच्या हितसंबंधाचे विचार येतात, राजकारणांत अनेक व्यक्तींच्या किंवा समुदायाच्या हितसंबंधाचे विचार येतात. समुदायाचा, राष्ट्राचा व्यापक प्रपंच म्हणजे राजकारण. समर्थांनीं स्वतःचा प्रपंच सोडून राष्ट्राचा प्रपंच केला. प्रपंचाला तसा राजकारणाला परमार्थाचा पाया अवश्य. व्यक्तीचा प्रपंच किंवा राष्ट्राचें राजकारण या दोहींलाही न्यायनीतीची जरूर आहे, परमार्थाचा पाठिंबा अवश्य आहे, किंबहुना परमार्थासाठीं प्रपंच व राजकारण या दोहींकडे लक्ष दिलें पाहिजे.

मुख्य हरिकथानिरूपण। दुसरें तें राजकारण, 'प्रपंचीं जाणे राजकारण'

परमार्थी साकल्यविवरण' 'सामर्थ्य आहे चळवळीचें। जो जो करील तयाचें।। परंतु आधीं भगवंताचें। अधिष्ठान पाहिजे।' इ० प्रकारें धर्ममूलक राजकारणाचा समर्थांनीं पुरस्कार केला आहे. राजकारण धर्माला सोडून उपयोगाचें नाहीं. 'अवघा स्वधर्म बुडाला। देह प्रपंचीं लाविला' म्हणून ही दुःस्थिति प्राप्त झाली आहे, असें त्यांचें पहिलें रोगनिदान आहे. म्हणून 'धर्मस्थापनेची कीर्ति, सांभाळली पाहिजे' 'महाराष्ट्रधर्म राहिला कांहीं। तुम्हांकरितां' 'मराठा तितुका मेळवावा। आपला महाराष्ट्रधर्म वाढवावा' असाच उपदेश त्यांनीं तत्कालीन कार्यकर्त्यांस केला आहे.

देवब्राह्मण आचारविचार। कितेक जनांसी आधार।
सदा घडे परोपकार। देणें ईश्वराचें ॥ १४ ॥
देवाचा कैपक्ष घेणें। ब्राह्मणांची चिंता वाहणें।
बहुत जनांसी पाळणें। देणें ईश्वराचें ॥ १६ ॥ (पृ. ५७)

देव-धर्म-गोब्राह्मणासाठीं राजकारण असा समर्थांचा दंडक होता. वर्णाश्रम-धर्मरक्षण झालें पाहिजे हा धर्माचा मुख्य भाग आहे. लोकसंग्रहाचा मोठा सिद्धांत त्यांनीं परोपरीनें सांगितला आहे. ( पृ. ९० ते १०० ). तरी 'एकंकार नको, तारतम्य पाहिजे' ( पृ. १०१ ते १०५ ) यावर त्यांचा कटाक्ष आहे. 'एकंकार भ्रष्टाकार करूं नये.' खुद्द शिवाजी महाराजांस 'तुमचा मुख्य धर्म राज्यसाधन करून धर्मस्थापना, देवब्राह्मणांची सेवा, प्रजेची पीडा दूर करून पाळणरक्षण करावें हें व्रत संपादून त्यांत परमार्थ करावा' ( पृ. ६६ ) असा त्यांचा उपदेश आहे. तात्पर्य, धर्मस्थापनेला राज्यसाधन अत्यंत अवश्य झालें म्हणून समर्थांनीं राजकारणाचा धर्मसंस्थापनकार्यांत प्रमुखत्वानें अंगिकार केला. एकनाथ–तुकारामादि पूर्वींच्या सत्पुरुषांनीं धर्मसंरक्षणाच्या कार्यांत आपलें तनमन खर्च केलें; पण राज्यसाधनाशिवाय धर्मसंरक्षण होणें दुर्घट असा तुफान प्रसंग प्राप्त झाला तेव्हां ईश्वरी प्रेरणेनें समर्थांना राजकारणाची उभारणी करण्याची बुद्धि झाली व समर्थांच्या कार्याचा ओघ व शिवाजीमहाराजांच्या कार्याचा ओघ हे दोन्ही ओघ गंगायमुनांच्या ओघांप्रमाणें ( ब्रह्मतेज व क्षात्रतेज ) एकत्रित झाले व महाराष्ट्रांत अभूतपूर्व अशा स्वराज्याची उभारणी झाली. भगवत्स्फूर्तीनें ही जी राज्यघटना

झाली तिची कथा जगाच्या इतिहासांत अत्यंत मनोहर व पुण्यपावन आहे. असो. समर्थांनीं ह्या बाबतींत जें कार्य केलें त्याचें दिग्दर्शन राजकारण-विषयक ३७ प्रकरणांत केलेलें आपणांस आढळेल. हा विषय अत्यंत महत्वाचा असून सर्वांस नीट कळावा म्हणून 'सारांशांत' ह्या प्रकरणांचा गोषवारा सविस्तर दिला आहे तो पाहावा. सांप्रतच्या राजकारणावर त्यानें चांगला प्रकाश पडेल, आपल्या चुका कोठें होत आहेत हें समजेल, तरुण पिढीला त्यापासून अतिशय बोध होईल. येथें ह्या प्रकरणांचा संक्षेपांत अन्वय सांगतों. समर्थांच्या काळीं लोकस्थिति कशी अत्यंत निकृष्ट स्थितीस पोंचली होती हें पहिल्या २ प्रकरणांवरून समजतें. परधर्मीय परराज्याचे स्वाभाविक होणारे दुष्परिणाम सर्व त्यांत वर्णिले आहेत. या दुःस्थितीला आपणच कसे कारण आहोंत, दोष सारा आपलाच आहे, पुढारी ब्राह्मणवर्गाची व बहुजन समाजाची कशी दैना उडाली आहे व ती पाहून समर्थांना जनचिंता कशी लागली आहे हें प्र. ३ ते ६ मध्यें सांगितलें आहे. प्रसंग तुफान आहे. पण धीर धरा व व्यापक यत्न करा, राज्याच्या घडामोडी निरंतर होत असतात, चढेल तो पडेल व पडेल तो चढेल असा पूर्वेतिहास आहे हें समर्थांनीं अत्यंत ओजस्वी वाणीनें प्र. ७ मध्यें सांगितलें आहे. कलह, पक्षभेद व वितंडवाद टाकून दांडगा प्रयत्न करा. 'धरून पक्ष काय रे । उपाय तो अपाय रे' हें जाणून अभेदभक्तीचें वर्म ओळखून एक व्हा, हें प्र. ८ मध्यें पाहावें. सुराज्याचा ( रामराज्याचा ) कित्ता यानंतर त्यांनीं जनतेपुढें ठेवला आहे (प्र. ९) यापुढें (प्र. १० ते १४) वेळोवेळीं शिवरायास उद्देशून प्रोत्साहनपर व गौरवपर काढलेले उद्गार व शिवमंडळाला सांगितलेले राजधर्म, क्षात्रधर्म व सेवकधर्म दिले आहेत. ही वीरश्रीची व मुत्सद्दिगिरीची ओजस्वी वाणी साक्षात् ज्यांच्या कानावर पडली ते धन्य होत. १५ वें प्रकरण समर्थांची व शिवरायाची कुलस्वामिनी तुळजा-भवानी हिला दिलें आहे. भवानीचीं हीं स्तोत्रें बहारीचीं आहेत. देवीचें आध्यात्मिक स्वरूप यांत वर्णिलें आहेच; पण शक्तीचें केलेलें वर्णन ( पृ. ५९–६० ) अद्‌भुत आहे. 'शक्तीनें पावती सुखें' 'सार संसार शक्तीनें' 'शक्तीनें मिळती राज्यें । युक्तीनें यत्न होतसे' 'उदंड खस्तिचीं कामें । मर्द मारूनि जातसे' 'फितव्यानें बुडती राज्यें' इ. सिद्धांत निराबाध आहेत. 'लोकांसी राखणें राजी । तें राज्य

प्रबळे बळे ' हें लोकशाहीचें तत्त्व सर्वमान्य होणारेंच आहे. उपासनेनें प्राप्त झालेलें स्वतःचें सामर्थ्य व धन्यत्व वर्णितांना शिवरायाबद्दल देवीपाशीं ' एकचि मागणें ' मागितलें आहे व तें ' तुझाचि वाढवी राजा । शीघ्र आम्हांचि देखतां ' ( पृ. ६३ ) हें होय. ' गयाळ राजा व खबरदार राजा ' ( प्र. १६ ) यांची तुलना बोधप्रद आहे. शिवरायांनीं समर्थास लिहिलेलें पत्र ( प्र. १७ ) गुरुशिष्यांचा अन्योन्य-संबंध दाखविणारें आहे. शिवराज्याभिषेकानंतर महाराष्ट्राचें स्वातंत्र्य व स्वराज्य स्थापित झालें. त्यानंतरचें आनंदवनभुवन ( प्र. १८ ) हें राष्ट्रगीत व संभाजीस पाठविलेलें पत्र ( प्र. १९ ) हीं दोन्ही अत्यंत महत्वाचीं व उद्दीपक प्रकरणें प्रत्येक तरुणानें नित्यपाठांतच ठेवावींत. राजकारणाच्या उत्तर विभागांतल्या १८ ही प्रकरणांत समर्थांनीं आपला संप्रदाय कोणत्या लोककल्याणकर तत्वांवर उभारला, समुदाय उठविण्यासाठीं कोणता मंत्र सांगितला, अनुयायांची संघटना लोकसंग्रहाच्या कोणत्या महामंत्रावर केली व त्यांना लोकांत वागण्याचे कोणते निर्बंध घालून दिले या दृष्टीनें अत्यंत महत्वाचीं आहेत. त्यांच्या निस्पृह, विरक्त महंतांनीं कोणते नियम पाळले हें आजच्या देशभक्तांनीं अवश्य पाहिलें पाहिजे. ' सारांशांत ' या प्रकरणाचें तात्पर्य सविस्तर दिलें आहे तें पाहून मग प्रकरणें क्रमशः वाचावींत. महंती सुळावरील पोळी ( प्र. ३ ), बोलघेवडे व कार्यकर्ते ( प्र. ४ ), उत्तम गुणांचा कार्यकर्ता पुरुष ( प्र. ५ ), अंतरपरीक्षा व सोशिकता ( प्र. ६ ), लोकसंग्रही ( प्र. ७ ), लोकसंग्रहाचा महामंत्र ( प्र. ८ ते ११ ), एकंकार नको तर तारतम्य पाहिजे ( प्र. १२ ) हीं सर्वच प्रकरणें कार्यकर्त्यांच्या दृष्टीनें अत्यंत महत्वाचीं आहेत. राजकारणाची उपाधि ( प्र. १३ ) व सभा ( प्र. १४ ) कशी सांभाळावी, चतुराईचें राजकारण कोणतें ( प्र. १५ ) व निस्पृह महंताचा व्याप व शिकवणी यावरील दोन प्रकरणें लोकनायक होऊं पाहणाऱ्या कर्तबगारीच्या पुरुषाला उद्बोधक वाटतील यांत शंका नाहीं. कार्यकर्त्यांच्या वतीनें समर्थांनीं केलेली रामप्रार्थना ही ( प्र. १८ ) चित्तवेधक आहे.

(६) परमार्थ प्रकरणांचेही दोन विभाग केले आहेत, उपासना ऊर्फ भक्ति-

भाव आणि ज्ञानविज्ञान, भक्ति आणि ज्ञान. प्रत्येकीं २१ प्रकरणें आहेत. उपासनेचीं प्रकरणें सुलभ असून सर्वांस कळण्यासारखीं आहेत. नरदेहाचें महत्त्व व सार्थक, नवविधा भक्ति, समर्थांचें तें प्रेमळ पत्र (प्र. १२), करुणाष्टकांतील रामप्रार्थनेचे ६० गोड श्लोक, भीमरूपी स्तोत्रें, अंजनीगीत, अभंग, पदें, आरत्या, धन्यतेचे उद्‌गार सर्वच भाग भक्तिरसानें ओथंबलेला आहे. समर्थांच्या मनाची उपासनाबळानें झालेली कोमलता येथें प्रकट दिसते. हीं प्रकरणें बुद्धीनें समजायचीं नसून अंतःकरणानें भोगायचीं आहेत. भक्तिप्रेमसुख हा हृदयाचा धर्म आहे. आतां भक्तीला ज्ञानाची जोड पाहिजे. म्हणून पुढील २१ प्रकरणांत ज्ञानविचार पूर्णत्वें सांगितला आहे. सद्‌गुरु, सच्छिष्य व सच्छास्त्र (प्र. २) आणि बद्ध, मुमुक्षु, साधक व सिद्ध (प्र.३) हीं दोन प्रकरणें नीट समजून घेऊन मग अध्यात्मविचाराकडे वळावें. समर्थांनीं परमार्थविचारांचा सरळ सोपान उभा केला आहे. त्यांची मांडणी स्पष्ट, निर्भीड व प्रत्ययाची आहे. ते निस्सीम रामभक्त, तसेच पराकोटीचे ब्रह्मनिष्ठ होते. उत्कट भक्ति व विमल ज्ञान एकरूप आहे व ज्ञानोत्तर भक्तीचा आनंद अपार आहे, हें इतर संतांप्रमाणेंच त्यांनींही स्वानुभवपूर्वक दाखवून दिलें आहे. गीता, भागवत, योगवासिष्ठ, रामायण, उपनिषदें या सर्वांचा निष्कर्ष समर्थांनीं स्वतंत्र भाषेनें व पद्धतीनें सांगितला आहे. अध्यात्मज्ञानाची थोरवी (प्र. ५), सत्संगीं अध्यात्मश्रवण (प्र. ६), मुख्य देवाचा शोध व निश्चय (प्र. ७), देव कोण, मी कोण (प्र. ८), चतुर्विध उपासना (प्र.९), सृष्टीची कहाणी (प्र ११), सृष्टि मिथ्या, मग सगुणभक्ति कशाला? (प्र. १३), नाना देवांची उपासना एका अंतरात्म्याला पावते (प्र. १४), अंतरात्मा देव कसा ओळखावा (प्र. १५), निर्गुण निर्विकल्प ब्रह्म (प्र. १६) हीं प्रकरणें अशींच क्रमानें घेतलीं आहेत कीं या क्रमानेंच त्यांचा विचार करीत जावें, म्हणजे ब्रह्मज्ञान समर्थांच्या पद्धतीनें बरोबर आकळतें. शब्दतः कळणें (परोक्ष) हेंही अवश्य आहे. आत्मबोध ठसवणें हें सद्‌गुरुकृपेशिवाय होत नाहीं, हा सिद्धांत सकलसंमतच आहे. ब्रह्मज्ञानाचा विचार पुन्हा 'किती दिवसा होतो मोक्ष' 'मोक्षाचें स्वरूप' व 'मुक्तांचीं लक्षणें' अशा तीन प्रकरणांत (प्र. १७–१९) सांगितला आहे. 'जुनाट पुरुषाच्या

कन्येचा खेळ ' ( प्र. १२ ) व पांगुळ ( प्र. २१ ) यांतील बहार अध्यात्म-विचार पुरा कळल्यावर अनुभवायचा आहे. परमार्थही आबाळ सुबोध सांगण्याची समर्थांची हातवटी कांहीं अपूर्व आहे. प्रपंचराजकारणाचा विचार तर त्यांच्यापूर्वी इतका स्पष्ट कोणींच सांगितलेला नाहीं. अध्यात्म आणि व्यवहार यांची समर्थांसारखी उत्कृष्ट सांगड तर कोणीही साधूनें किंवा तत्ववेत्त्यानें घातलेली आपणांस कोणत्याही भाषेंत सांपडावयाची नाहीं.

(७) विविधविषयक प्रकरणें एकंदर ४६ आहेत. अनुक्रमणिकेवरून त्यांचा बोध होणार असल्यामुळें येथें विस्तार नको. कवि आणि कवित्व ( प्र. १ ), मराठी भाषा ( प्र. २ ), समर्थांचें गद्यपत्र ( प्र. ६ ), प्रारब्ध थोर का प्रयत्न थोर ( प्र. ९ ), उत्तम, मध्यम व अधम ( प्र. १० ), मैत्रीचें रहस्य ( प्र. १२ ), वक्ता आणि श्रोता ( प्र. १६ ), निंदा, निंदक व निंदेचे उपकार ( प्र. १७ ते १९ ), देहदेवालयांतला देव ( प्र. २४ ), मूर्ख आणि पढतमूर्ख ( प्र. २७ ) इ. प्रकरणें तर वाचकांस आवडतील यांत संशय नाहीं. समर्थांच्या वाणींत कोठें कोठें विनोदही आहे. शांतरस आणि वीररस हे दोन मुख्य त्यांच्या कवितेंत सांपडतात. ही लोककार्यकर्त्या महापुरुषाची कार्योद्बोधक वाणी असल्यामुळें प्रायः उपदेशप्रधान आहे.

आश्विन शु॥ १५<br>शके १८४६. }

लक्ष्मण रामचंद्र पांगारकर.

—०OO०—

॥ श्री ॥

# टाकळी येथील श्रीसमर्थांचा मठ
# व
# श्री. पांगारकरमहाराजांची योजना

नाशिक क्षेत्राच्या पूर्वेकडील सुमारें ३ मैलांवर टाकळी हा एक लहानसा गांव आहे. हा गांव गोदावरी व नासरडी उर्फ नंदिनी या दोन नद्यांच्या संगमाजवळच आहे. श्रीसमर्थांनीं आपल्या वयाच्या १२ व्या वर्षी या गांवीं येऊन घनघोर तपश्चर्या केली. त्या वेळीं येथें समर्थांनीं पर्णकुटी बांधून, गोमय मारुतीची स्थापना केली. याच ठिकाणीं व याच कुटींत श्रीसमर्थांनीं श्रीरामचंद्र प्रभू, श्री बलशाली हनुमान यांची उपासना करून कृपाप्रसाद मिळविला. त्यामुळें या स्थानास आध्यात्मिक व ऐतिहासिक असें दुहेरी महत्त्व प्राप्त झालें आहे. परंतु या पुण्यभूमीवर विराजित असलेल्या मठाची स्थिति फारच शोचनीय झालेली दिसते. मठाची ही दुःस्थिति पाहून कै. ह. भ. प. श्री. लक्ष्मण रामचंद्र पांगारकर यांना फारच हळहळ वाटे. इ. स. १९३२ सालीं श्रीदासनवमीच्या दिवशीं श्री. पांगारकरमहाराज यांनीं मठाच्या जीर्णोद्धारासंबंधीं योजना आखून तत्कालीन मठपतीजवळ दिली होती. ती योजना खालीलप्रमाणें आहे.

(१) नाशिकपासून नासर्डीपर्यंत डांबरी अगर सिमिंट कॉंक्रिट रस्ता तयार करून घेण्याकरितां म्यु. कमेटी नाशिक डि. लो. बोर्ड व मुंबई सरकार यांच्याकडे पत्रव्यवहार करणें.

(२) नासर्डी नदीवर २२ फूट रुंद व १४ फूट उंच असा दगडी पूल बांधणें.

(३) मठाचें छप्पर दुरुस्त करणें, कौलें घालणें अगर पत्रे ठोकणें.

(४) आजूबाजूच्या ओवऱ्या चांगल्या बांधून काढून त्या ठिकाणीं मुमुक्षू जनांची दासबोधपारायणासाठीं सोय करून देणें.

(५) समर्थांची एक चार फूट उंचीची संगमरवरी, दगडी सुंदर मूर्ति बसविणें.

(६) समर्थांच्या गुहेची डागडुजी मजबूत करवून घेणें व गुहेंतील जमिनीवर शहाबादी अगर संगमरवरी फरशी करून घेणें.

(७) मठांत सर्वत्र शहाबादी अगर संगमरवरी फरशी करणें.

(८) मठाच्या पूर्व दरवाजावरील जागेंत एक मोठें सभागृह बांधणें.

(९) मठाच्या मागील बखळींत उद्धवस्वामीमहाराजांच्या पादुका बसविणें व त्यावर दगडी छत्री बांधणें.

(१०) त्याच बखळ जागेंत समर्थभक्तांना अनुष्ठानाकरितां व संतवाङ्मयाच्या अभ्यासासाठीं खोल्या बांधून देणें.

(११) मठाच्या पूर्व भागाकडील श्रीमंत सरदार अण्णासाहेब देशपांडे यांची बखळ जागा घेऊन, तेथें दुमजली धर्मशाळा बांधणें.

(१२) मठाच्या जवळच एक पुष्पवाटिका तयार करणें.

(१३) मठांत मुमुक्षू जनांसाठीं संपूर्ण संतवाङ्मयाचा संग्रह करणें.

(१४) टाकळी गांवांतील लोकांस वैद्यकीय मदत करून देण्याची सोय करून देणें.

(१५) बालवर्ग ते ५ वी पर्यंत मुलांच्या शिक्षणाची सोय करून देणें.

(१६) गोदावरी व नासर्डी यांच्या संगमावर श्रीसमर्थांच्या तपश्चर्येच्या जागेवर २५ किंवा ३० फूट उंचीच्या दगडी बैठकीवर समर्थांचा संगमरवरी अगर ब्रांझ धातू यापैकीं एक पुतळा तयार करून तेथें बसविण्यांत यावा. श्रीसमर्थ उगवत्या सूर्यास वंदन अगर अर्घ्यप्रदान करीत आहेत असें दृश्य असावें.

(१७) तेथें भजनी मंडळ स्थापन करून धर्मप्रचार करण्यांत यावा.

(१८) गांवाची लोकवस्ती वाढविण्याकरितां सर्व जिल्हाभर प्रचार करण्यांत यावा.

(१९) या तपोभूमीचें महत्त्व वाढविण्यासाठीं वृत्तपत्रांतून प्रचार-कार्य करण्यांत यावें.

(२०) महाराष्ट्रांतील कीर्तनकार, प्रवचनकार व व्याख्याते यांना या तपोभूमीचें महत्त्व पटवून देऊन, त्यांच्या द्वारें प्रचारकार्य करण्यांत यावें.

(२१) नाशिकपासून टाकळी गांवापर्यंत व खुद्द गांवांतही विजेच्या प्रकाशाची सोय करून देणें.

(२२) टाकळी गांवांतील रहिवाशांकरितां नळाच्या पाण्याची सोय करून देणें.

(२३) टाकळी गांवांत वृत्तपत्रें व नियतकालिकांची सोय करून देणें.

(२४) गांवाच्या सुधारणा टिकाऊ होण्यासाठीं व आणखी करण्या-साठीं ग्रामपंचायत स्थापन करणें.

मूळ योजनेची नक्कल<br>
दासनवमी शके १८७६<br>
दिनांक १६।२।५५

ग्रंथप्रकाशक.

# विषयानुक्रमणिका.

## १ प्रपंचविचार.


| विषय | | पृष्ठ |
|---|---|---|
| १ प्रपंचीं परमार्थ साधतो काय ? | .... | १ |
| २ प्रपंच व परमार्थ | .... | २ |
| ३ यत्नेंकरून प्रपंच सावरावा | .... | ४ |
| ४ दैव कसें काढावें ? | .... | ५ |
| ५ ब्राह्मणाचें कर्म | .... | ७ |
| ६ कशानें संसार धन्य होतो ? | .... | ८ |
| ७ गृहस्थाश्रमी | .... | ८ |
| ८ विवेक आणि वैराग्य | .... | १० |
| ९ विषयत्यागाचें वर्म | .... | ११ |
| १० सत्कीर्तीचे पुरुष | .... | १३ |
| ११ करंटा आणि सदेव | .... | १४ |
| १२ आळस व प्रयत्न | .... | १६ |
| १३ अचूक यत्न तो देव | .... | १९ |
| १४ कष्टावीण फळ नाहीं | .... | २० |
| १५ वृथा शीण संसार करती रडाया | .... | २१ |
| १६ योग हा सुकृताचा | .... | २१ |
| १७ बरें वोखटें सर्व साहोनी जावें | .... | २२ |
| १८ चातुर्यलक्षणें | .... | २२ |
| १९ जाणीव म्ह. शहाणपण हेंच थोरपणाचें बीज | .... | २५ |
| २० शाहण्याची संगति | .... | २६ |

## २ राजकारणविचार.

### ( १ ) राजकारण-प्रसंग व कांहीं सिद्धांत.


| | | |
|---|---|---|
| १ समर्थकालीन अस्मानीसुलतानी | ... | २९ |
| २ परचक्रनिरूपण | ... | ३२ |
| ३ दोष लोकांचाच ! | ... | ३३ |
| ४ पुढारी ब्राह्मणवर्गाची दैना | ... | ३४ |
| ५ बहुजनसमाजाची दैना | ... | ३७ |
| ६ लोककल्याणाची चिंता | ... | ३९ |
| ७ धीर धरा व व्यापक यत्न करा | .... | ३९ |
| ८ कलह, पक्षभेद व वितंडवाद टाळा | ... | ४२ |
| ९ सुराज्याचा कित्ता—रामराज्य | ... | ४४ |
| १० शिवरायाचें गौरव व प्रोत्साहन | ... | ४६ |
| ११ धूर्तपणाचें राजकारण | ... | ४७ |
| १२ राजधर्म, क्षात्रधर्म व सेवकधर्म | ... | ५० |
| १३ सावधपण | ... | ५४ |
| १४ शिवरायाचा गौरव | ... | ५५ |
| १५ कुळदेवी तुळजाभवानी | ... | ५७ |
| १६ गयाळराजा व खबरदार राजा | ... | ६४ |
| १७ श्रीसमर्थांस श्रीशिवाजीमहाराजांचें पत्र ( गद्य ) | ... | ६६ |
| १८ आनंदवनभुवन | ... | ६८ |
| १९ संभाजीस उपदेश | ... | ७१ |


### ( २ ) राजकारण-लोकसंग्रही कार्यकर्ते.


| | | |
|---|---|---|
| १ समर्थसंप्रदायाचीं लक्षणें व नियम | .... | ७४ |

२ महंती म्हणजे सुळावरील पोळी .... ७७
३ भिक्षा कशी व कशासाठीं मागावी ? .... ७८
४ बोलघेवडे व कार्यकर्ते .... ८०
५ उत्तम गुणांचा कार्यकर्ता पुरुष .... ८३
६ अंतरपरीक्षा व सोशिकता .... ८९
७ लोकसंग्रही .... ९१
८ लोक राजी राखावे .... ९३
९ मना-मनासि मीळणी .... ९६
१० जग तिकडे जगन्नायक .... ९७
११ लोकवशीकरणाचा मंत्र .... ९८
१२ एकंकार नको, तारतम्य हवें .... १०१
१३ राजकारणाची उपाधि कशी सांभाळावी ? .... १०५
१४ सभा कशी सांभाळावी ? .... १०७
१५ चतुराईचें राजकारण .... ११०
१६ निस्पृह महंताचा व्याप .... ११२
१७ निस्पृहाची व विरक्ताची शिकवण .... ११७
१८ कार्यकर्त्यांच्या वतीनें रामाची प्रार्थना .... १२२

## ३ परमार्थविचार.

### ( १ ) परमार्थ–उपासना ऊर्फ भक्तिभाव.

१ मंगलाचरण. .... १२३
२ नरदेहाचें महत्त्व व सार्थक .... १२६
३ नवविधा भक्ति ( श्रवण, कीर्तन, नामस्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य, व आत्मनिवेदन. ) .... १३३

४ ज्ञानोत्तर भक्ति .... १४५
५ श्रीरामसमर्थांचें अवतारकार्य .... १४६
६ श्रीकृष्णाची वेधशक्ति .... १५१
७ देवभक्तांचें सख्य. .... १५४
८ देवाची प्रार्थना व प्रसाद .... १५५
९ निग्रहनेमावांचून सगुणसाक्षात्कार नाहीं. .... १५७
१० साक्षात्कार सांगू नये. .... १५८
११ वैराग्य व एकांतवास. .... १५८
१२ श्रीरामोपासकांस समर्थांचें पत्र. .... १६०
१३ चाफळीं श्रीरामाचें शुभागमन. .... १६१
१४ करुणाष्टकांतील रामप्रार्थना. .... १६२
१५ बुद्धि दे रघुनायका. .... १६८
१६ दोन भीमरूपी स्तोत्रें. .... १६९
१७ अंजनीगीत. .... १७३
१८ अभंग. .... १७४
१९ पदें. .... १७९
२० उपसंहार, आरत्या, वरयाचना वगैरे
( आरत्या, वरयाचना, रामदास्य,
संप्रदायपरंपरा, उपसंहार. ) .... १८१
२१ धन्यतेचे उद्गार. .... १८५


## ( २ ) परमार्थ–ज्ञानविज्ञान


१ परमार्थ म्ह. अध्यात्मयोग .... १८९
२ सद्‌गुरु, सच्छिष्य व सच्छास्त्र ( सद्‌गुरूवीण मोक्ष नाहीं, सामान्य गुरूहून सद्गुरु वेगळा, सद्‌गुरुलक्षण, हे गुरुच नव्हत, सद्‌गुरु, सच्छिष्य, सच्छास्त्र व साधन हीं

चौकडी पाहिजे, सच्छिष्यलक्षण, विषयी तो शिष्य नव्हे, हें ज्ञान नव्हे, शुद्ध ज्ञानाचें लक्षण, साधन पाहिजे) .... १९०
३ बद्ध, मुमुक्षु, साधक व सिद्ध .... २००
४ ज्ञानोत्तरही साधन सोडतां नये .... २०४
५ आत्मज्ञानाची थोरवी .... २०९
६ सत्संगीं अध्यात्मश्रवण .... २१२
७ मुख्य देवाचा शोध व निश्चय .... २१४
८ देव कोण, मी कोण ? .... २१७
९ नाना पंथ, नाना देव—चतुर्विध उपासना .... २१८
१० पंचभूतातीत देव .... २२२
११ सृष्टीची कहाणी .... २२५
१२ जुनाट पुरुषाच्या कन्येचा खेळ .... २२८
१३ सृष्टि मिथ्या, मग सगुणभक्ति कशाला ? .... २३२
१४ नाना देवांची उपासना एका अंतरात्म्यासच पावते २३४
१५ अंतरात्मा देव कसा ओळखावा ? .... २३८
१६ निर्गुण निर्विकल्प ब्रह्म .... २४४
१७ किती दिवसां होतो मोक्ष ? .... २५०
१८ मोक्षाचें स्वरूप .... २५१
१९ मुक्तांचीं लक्षणें .... २५४
२० सुलभ आत्मज्ञान .... २५७
२१ पांगुळ .... २५९

## ४ विविधविषयक प्रकरणें.

१ कवि आणि कवित्व [ कवित्वाचे तीन प्रकार, कवित्व-लक्षण, कवींस सूचना व कवीश्वरवंदन ] .... २६१

२ मराठी ग्रंथ .... २६४
३ 'आणि' या उभयान्वयी अव्ययाची मौज .... २६५
४ भला कोण ? .... २६७
५ मुलांची आवड .... २६७
६ श्रीसमर्थांचें पत्र ( गद्य ) .... २६७
७ श्रीरामराम हें म्हणा .... २७०
८ हरे राम हा मंत्र सोपा जपा रे .... २७१
९ प्रारब्ध थोर का प्रयत्न थोर ? .... २७२
१० उत्तम, मध्यम व अधम .... २७४
११ संगतीनें सभाग्य किंवा करंटा .... २७५
१२ मैत्रीचें रहस्य .... २७७
१३ सत्संग व त्यापासून सद्गति .... २७८
१४ ग्रंथिंचा अर्थ काढा .... २७९
१५ मुलांस शिकवण .... २७९
१६ वक्ता आणि श्रोता .... २८०
१७ आपणच दोषी म्हणून निंदा होतें .... २८३
१८ परमार्थबुद्धीला निंदा उपकारकच आहे .... २८३
१९ निंदा आणि निंदक .... २८४
२० आहे आणि नाहीं .... २८५
२१ अपूर्व भाऊबंदकी ! .... २८५
२२ मोहानिद्रेंची झांपड .... २८६
२३ त्रिगुणांचे धर्म .... २८७
२४ देहदेवालयांतला देव .... २८९
२५ जाणता .... २९०
२६ अर्थ समजून गावें .... २९०

२७ मूर्ख आणि पढतमूर्ख .... २९१
२८ नटव्यांस उद्देशून .... २९४
२९ घरोघर कवि .... २९४
३० भाविक आणि विवेकी .... २९५
३१ व्यवहारनीतिबोध .... २९५
३२ स्त्रियाही पराधीन व पुरुषही पराधीन ! .... २९७
३३ मीतूंपण सोडावें .... २९७
३४ अद्वैतचर्चा ... २९७
३५ षड्रिपुवर्णन [ काम, क्रोध, मद, मत्सर, दंभ व प्रपंच ] २९८
३६ हरिकीर्तन .... ३०१
३७ अज्ञानापेक्षां पाखांड वाईट .... ३०२
३८ सांगणें नको, वागणें हवें ... ३०२
३९ गुरुगम्य .... ३०३
४० इतिश्री .... ३०३
४१ स्फुट श्लोक .... ३०३
४२ वरें सर्व माझें .... ३०४
४३ सुखसागर .... ३०४
४४ सीताशोध व लंकादहन .... ३०५
४५ एक घोर अरण्य .... ३०८
४६ मनोबोधाचे निवडक श्लोक .... ३०८

भागवत धर्माचा उदंड प्रचार करून

समष्टीला अध्यात्मिक लाभ करून देणारे महान भगवत्भक्त

# लक्ष्मण रामचंद्र पांगारकर

मुमुक्षुकर्ते



| जन्म | प्रयाण |
|---|---|
| ३१।७।१८७२ | १०।११।१९४१ |

# प्रकरणांचा सारांश.

## १ प्रपंचविचार.

प्रपंचांत राहून परमार्थ साधतो काय ? साधत असेल तर कसा साधतो ? संसार धन्य कशानें होतो ? प्रपंच नेटका करावा म्हणजे काय ? विवेक-वैराग्याचीं लक्षणें कोणतीं ? इ. प्रश्नांचीं समर्थांनीं जीं उत्तरें दिलीं आहेत तीं आपणास येथें पाहण्यास मिळतील.

( १ ) प्रपंचीं परमार्थ साधतो काय ? या प्रश्नास उत्तर ह्या पहिल्या उताऱ्यांत दिलें आहे. 'जयासी परमार्थ व्हावा । तेणें प्रपंच त्यजावा ।' असें प्रथमच म्हटलें आहे. अर्थात् प्रपंचांत परमार्थ साधत नाहीं असें पहिलें उत्तर आहे. संसारांत अनेक धक्के बसतात, दु:खशोकानें चित्तास भ्रांति पडते. ( संसार मुळींच फाटका आहे, संसारदु:खाएवढें दु:ख नाहीं, असें समर्थांनीं अनेकवार म्हटलें आहे. संसार मिथ्या आहे, लटका आहे, नाशिवंत आहे, दु:खरूप आहे, हें वेदशास्त्रांनीं सांगितलें असून सर्वांचा अनुभव हाच आहे. मग समर्थ तरी यावेगळें कोठून सांगतील ? ) प्रपंचांत सर्व जीव गुरफटले आहेत. ईश्वरकृपा होईल 'तरीच हा प्रपंच सुटे.' वैराग्य सोपें नाहीं. ज्याला खरें वैराग्य झालें आहे त्यानें 'उठोनि वाटेचि लागावें । दिगंताप्रती !' प्रपंचत्यागानें मोहजाळ उडून वैराग्य सुदृढ होतें व वैराग्यानें ज्ञान प्राप्त होऊन नरदेहाचें सार्थक होतें. उपजत वैराग्यशील असे थोडे. ( वैराग्य प्रपंचाचा वैरी. राग, अनुराग, आसक्ति, लोलंगता, लोभ, काम, मोहममता, मी-माझें, अहंकार—हे प्रपंचाचें मूळ आहे; याचा त्याग म्हणजे वैराग्य. जीव मुळीं लोभाचाच असल्यामुळें तीव्र वैराग्य एखाद्याच्याच वांट्याला येतें. संसाराचे धक्के खाऊन स्मशानवैराग्य, प्रसूतिवैराग्य या जातीचें वरवर वैराग्य बहुतांना मधून मधून आठवतें; पण तें फारसें टिकत नाहीं. तें अविवेकमूलक वैराग्य शाश्वतचें नाहीं. विवेकवैराग्यच खरें वैराग्य

होय. लोकांस वैराग्याच्या क्षणिक लहरी कशा येतात व मोहममतेपुढें त्या कशा वितळतात याचीं उदाहरणें समर्थांनीं पुढें दिलीं आहेत, ती मौजेचीं आहेत. ) एक स्त्रीलोलुप मनुष्य म्हणतो, "वायकोचा मी त्याग केला असता; पण 'जन म्हणे त्यजूं नये' म्हणून राहिलों." एवढ्या आधारानेंच विचारा प्रपंचांत गुंतून पडला. दुसरा म्हणतो, "मी ससार सोडून गेलों असतों हो! पण वेदाची आज्ञा कशी उल्लंघावी ? धर्मे चार्थे च कामे च ही शपथ घेतली आहे म्हणून गुंतलों आहें. एक पुत्र झाला कीं मग संसार मी सोडणारच आहे!" तिसरा म्हणतो, "आपल्याला बुवा संसाराची आशा कांहीं सुटत नाहीं." चवथा म्हणतो, "अहो! मी संसार सोडायला एका पायावर तयार आहे; पण आमचें घराणें केवढें मोठें–पूर्वजांचा लौकिक केवढा! मी सोडून गेलों तर हें वतन,ही शेतवाडी,हीं गुरेंढोरें! छत्! कुलाच्या प्रतिष्ठेसाठीं आपल्याला नाहीं संसार सोडतां येत! वडिलांचें नांव आतां मलाच राखलें पाहिजे!!" पांचवा म्हणतो, "जनकादिकांनीं राज्य करून नाहीं का परमार्थ साधला? 'कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः' असें भगवानच गीतेंत बोलले आहेत." सहावा म्हणतो, "रानावनांत जाऊन काय परमार्थ साधायचा आहे? गृहींच वैराग्य करावें म्हणजे झालें. आल्या अतिथीस अन्न द्यावें, गृहाश्रम नीट पाळावा म्हणजे झालें" सातवा म्हणतो, "वैराग्याचे दिवस यायला अजून अवकाश आहे. म्हातारपणीं वैराग्य करावें. अंगांत धमक आहे तोंवर प्रपंच यथेच्छ भोगून घ्यावा. वैराग्याचें पुढें पाहूं." संसारिकांचीं हीं सात मतें समर्थांनीं ह्या उताऱ्यांत दिलीं आहेत (संसाराच्या प्रतिनिधींचीं हीं भाषणें ऐकून समर्थांनीं शेवटीं आपला निश्चय सांगितला आहे.) ते म्हणतात कीं, "हा प्रपंच शाश्वत आहे, संसाराचा चित्रपट असाच कायम राहणार आहे, असें जर खास असतें तर 'आम्ही यासीच धरितों' म्ह. आम्हीही प्रपंचालाच चिकटून राहतों; पण हा अशाश्वत आहे हें प्रत्यक्ष दिसतें, म्हणून याचा त्याग करून आम्ही शाश्वताच्या शोधांत व प्राप्तींतच नरदेहसाफल्य मानतों. आतां तुम्हांला प्रपंच सोडायचा नाहीं किंवा सुटत नाहीं तर तुम्ही तो खुशाल करा; पण तुमच्या कल्याणार्थ तुम्हांस एवढेंच सांगतों कीं कांहीं परमार्थाकडेही लक्ष द्या, परमार्थी बोंब मारा, कांहीं सोडवणूक करून घ्या, 'हळु हळु सोडवावी । मिठी प्रपंचाची' एवढें तरी ध्यानांत धरा. हें विसरू नका." (समर्थांचें उपजतवैराग्य उंच कोटीचें म्हणून त्यांनीं व इतर संतांनींही लोकांपुढें ठेवलेलें शुद्ध परमार्थाचें ध्येय सांसारिकांस झेपणें कठिण हें जाणून त्यांनीं मग लोकांस पचेल व झेपेल अशा पद्धतीनेंच उपदेश करायचा क्रम ठेवला. )

(२) बरें बुवा ! तुमच्या मताप्रमाणेंच होऊं द्या. 'प्रपंच करावा नेटका, मग घ्यावें परमार्थविवेका ' याचा तरी आळस करूं नका. ' प्रपंच सांडून परमार्थ कराल, तेणें तुम्ही कष्टी व्हाल ' म्हणून दोन्ही चालवाल तरी तुम्ही विवेकीच आहांत असें आम्ही म्हणूं. प्रपंच सांडून परमार्थ कराल तर खायला अन्न कोठून मिळेल ? अन्नाच्या चिंतेंतच जो राहील त्या करंट्याला परमार्थ कोठून साधेल ? आतां परमार्थाला पुरा फांटा देऊन नुसत्या प्रपंचांतच तो अहोरात्र मग्न राहील तर शेवटच्या यमयातना चुकणार नाहीत. प्रपंचांतलाच दृष्टांत घेऊन सांगतों. तूं एखाद्या धन्याची नौकरी पत्करलीस तर तुला त्याचें काम केलेंच पाहिजे. साहेबाच्या (मालकाच्या) कामाला न जातां घरींच सुस्त होऊन लोळत पडलास तर तुझा साहेब तुला चांगला ठोकील, तुझें महत्त्व जाऊन दुर्जन तुला हंसतील व तुला स्वत:ला अतिशय दु:ख भोगावें लागेल. असाच प्रकार परमार्थांत आहे. साहेब (ईश्वर, स्वामी) यानें सांगितलेलें काम जर तू नीट करणार नाहींस व आळसानें आयुष्य व्यर्थ दवडशील तर त्याचे अधिकारी जे यमदूत त्यांच्या हातचा तुला मार खावा लागेल. दोहींकडे तत्व एकच. परमात्मा विश्वाचा मालक आहे, त्याचा संतोष जोडला पाहिजे. संसारांत राहून मुक्तता भोगशील तर तूंच मोठा योगी होशील. अंतरानें देवाशी संलग्न असून त्याचें काम उठवणें हाच खरा योग आहे. 'प्रपंची जो सावधान । तोचि परमार्थ करील जाण.' प्रपंच जागृतपणानें, दक्षतेनें करणारा मनुष्यच परमार्थ करील; ज्याला प्रपंच धड करितां येत नाहीं त्याला परमार्थही साधत नाहीं; तात्पर्य प्रपंच आणि परमार्थ दोन्ही सावधपणानें करावें, नाहींतर फार दु:खें भोगावीं लागतात. पानावरची आळी पुढल्या पायांनीं चाचपून जमीन सुरक्षित आहे असें कळल्यावरच मागचा पाय उचलते. सामान्य जीवजंतुही याप्रमाणें विवेकानें चालतात, आणि तुम्ही तर मनुष्यें असून भ्रमतां म्हणजे पुढचा विचार न करितां वर्तमान प्रसंगांतच गुंतून राहतां, याला काय म्हणावें ? म्हणून दीर्घसूचना असावी, निरंतर चाळणा म्ह. सारासारविचार करावा. जो खबरदार म्ह. सावध आहे तो सुखी असतो, व गैरसावध पुरुषाला दु:ख भोगावें लागतें, हें तर लौकिक व्यवहारांतही दिसतें; म्हणून जो प्रपंचांत व परमार्थांत दोहींकडे सावध आहे, त्याचा मोठेपणा कांहीं और आहे. दीर्घसूचनेचे लोक कसे वागतात हें पाहत असावें. एकाचें पाहून दुसरा शाहणा होतो. मनुष्य पारखल्याशिवाय राहत नाहीं व कोणाचेंही मन तोडीत नाहीं, सर्वांचें मनोगत जाणतो तोच सावध पुरुष होय. ( प्रपंच तुम्हाला सुटत नाहीं तर प्रपंच आणि परमार्थ दोन्ही चालवा असा या प्रकरणांत मुख्य उपदेश आहे. यांतील 'प्रपंच करावा नेटका ' एवढेंच वचन

घेऊन पहा! समर्थांनीं प्रपंच करायला सांगितला आहे कीं नाहीं तो!' समर्थ कांहीं इतर संतांसारखे प्रपंच मिथ्या म्हणून तो सोडून जायला सांगणारे नाहींत, त्यांनीं चांगला प्रपंच नेटका करायला सांगितला आहे' अशा तऱ्हेचें व्याख्यान करणारे कित्येक लोक नवीनांत सांपडतात! प्रपंच सत्य आहे असें समर्थांचें एकही वचन सांपडायचें नाहीं. प्रपंच मिथ्या व दुःखरूप आहे असें त्यांनीं हजारों वेळां म्हटलें आहे. प्रपंच सुटत नाहीं म्हणूनच प्रपंच करीत असतांना परमार्थ साधण्यास ते सांगतात, परमार्थसाधक प्रपंच करा असें सांगतात. **परमार्थ हें परम साध्य व प्रपंच सुटत नसेल तर हरिसेवेच्या अटीवर प्रपंच व परमार्थ दोन्ही साधण्याची परवानगी** हा त्यांच्या उपदेशाचा इत्यर्थ आहे. प्रपंचच करा असें ते म्हणत नाहींत. 'प्रपच नेटका करा' असें तें वरील प्रकरणांत सांगतात; पण 'नेटका' म्हणजे कसा? हे प्रस्तुत प्रकरण लक्ष्यपूर्वक वाचलें असतां समजतें. प्रपंच नेटका करावा म्हणजे सावधपणानें करावा. सावधानपणा कोणचा? कामचुकार नोकराला मालक ठोकून फजीत करितो हा दृष्टांत देऊन 'तैसेंच होणार अंतीं। म्हणोनि भजावें भगवंतीं' असें त्यांनीं सांगितलें आहे. यालाच ते दीर्घसूचना म्हणतात. पानावरच्या आळीचा दृष्टांत देऊन 'पुढील होणार आधीं अनुमाना आणून सोडा' असें ते सांगतात. पुढील होणार काय? 'अंतीं परम कष्टी होसी। यमयातना भोगितां.' भगवंताला भजून 'संसारीं असतांच मुक्त'-पणाचा सोहळा भोगला नाहीं तर संसार फाटका, व भगवद्भजनानें संसारीं असतांच मुक्तपणाचा सोहळा भोगला तरच संसार नेटका. सावधानता, दीर्घसूचना, खबरदारी हे शब्द प्रपंच नेटका करण्यास सांगतांना याच अर्थानें वापरले आहेत. सर्व प्रकरणांचें तात्पर्य प्रपंच परमार्थसाधक कराल तरच तो नेटका होतो हें होय. आतां प्रपच सुटत नाहीं म्हणून तो करायचा व तो नेटका करायचा हें ठरल्यावर त्याला धनादि ज्या ज्या बाह्य साधनांची गरज आहे तीं तीं साधनें श्रमसाहस करून मिळवणें अवश्य आहे हें उघड आहे. नीतिन्यायानें वागून धनदौलत प्रयत्नपूर्वक अवश्य मिळवावी, भाग्य जोडावें, भोगावें, परोपकारीं तिचा वेंच करावा, असा उपदेश समर्थांनीं केला आहे व तुकोबांनींही 'जोडोनिया धन उत्तम वेव्हारें' ह्या अभंगांत हेंच सांगितलें आहे.)

(३) ह्या तिसऱ्या प्रकरणांत समर्थ काय सांगतात तें आपण पाहूं. नरदेह मिळाला आहे तर येथें नीतिन्यायानें चोखट वागावें, प्रपंच नेमक करावा आणि परमार्थविवेकही पहावा, म्हणजे उभयलोक संतुष्ट होतील. राजकीय परिस्थितीमुळें म्हणा किंवा दैवबलानें म्हणा, नानाप्रकारच्या उद्वेगचिंता,

अन्नवस्त्राची काळजी, देहाहंता इ० विविध प्रसंगांत हजारों लोकांचे जन्म जात आहेत. आपला जन्म असा व्यर्थ न दवडितां विवेक जोडीदार करून इहपर-लोक साधावेत. आळस सोडून साक्षेप करावे तरच वैभव प्राप्त होईल व उभय-लोकीं समधान मिळेल. कष्ट केले तरच पुढें सौख्य मिळेल. लोक ' खाती जेवती सुखी होती । यत्नें करुनी ! ' आनां यत्न कोणता करावा ! सांगतों, सावधपणें ऐका ! प्रात:काळीं उठावें; कांहीं पाठांतर करावें; यथाशक्ति (करितां येईल तसें) त्याचें ध्यान करावें; प्रातर्विधि आटोपून (संध्यातर्पण, देवार्चन, वैश्वदेव यथासांग करावें; ) कांहीं फळाहार घ्यावा व ' मग संसार-धंदा करावा ' व तो करितांना ' सुशब्दें राजी राखावा । सकळ लोक:' हें विसरूं नये. ' ज्याचा ज्याचा जो व्यापार । तेथें असावें खबर्दार ' म्ह० प्रत्ये-कानें आपला धंदा दक्षतेनें करावा. कां कीं गाफिलपणानें वागल्यास एखादें पोरही ठकवून जाईल. आळस झाडून काम करावें. ' चुके ठके विसरे सांडी ' हें सर्व आळशी माणसाचें लक्षण होय. भोजन झाल्यावर कांहीं वाचावें, चर्चा करावी, एकांतीं जाऊन ग्रंथ विवरावे. मनुष्य असा वागेल तरच शाहणा होईल, नाहीं तर ' लोक खाती आपण पाहतो । दैन्यवाणा ' असा मूर्ख होईल. (भाग्यवंताचें मुख्य लक्षण हें आहे कीं तो एक क्षणही रिकामा जाऊं न देतां प्रपंचव्यवसाय दक्षतेनें करतो.) ' कांहीं मेळवी मग जेवी ' आयतोबा नव्हे. (तो स्वत: भाग्य काढून इतरांस वर डोकें काढण्यास मदत करितो.) धंद्यां-तच गुंतत नाहीं, तर पुराणकीर्तननिरूपणांतहि वेळ घालवितो. प्रत्येक क्षण प्रपंचव्यवसायांत, नाहीं तर श्रवणमननांत घालवितो. सावधपणामुळें ' आहे तितुकें देवाचें । ऐसें वर्तणें निश्चयाचें । ' असल्यामुळें प्रपंचांत राहून त्याची देहबुद्धिच उरत नाहीं. मग त्याला उद्वेगचिंतादिकांची बाधा कोठून होणार ? ' प्रपंचीं पाहिजे सुवर्ण । परमार्थीं पंचीकरण ' तेव्हां त्याच्यापाशीं दोन्ही असल्यामुळें महाबोधामुळें तो मुक्तच असतो. तो संसारांत असतो, पण संसार त्याच्यांत नसतो !

(४) एका सर्वस्वी निराधार तरुणानें समर्थांना प्रश्न केला कीं, ' महाराज, खाया नाहीं, प्याया नाहीं, ल्याया नाहीं, पांघराया नाहीं, असा मी दरिद्री आहें. इष्टमित्र, सोयरेधायरे मला कोणीच नाहीं, माझी कोणाची ओळख नाहीं, असा मी निराश्रित आहें. मी काय करावें ? जगावें कीं मरावें हाच प्रश्न मजपुढें आहे. त्याला समर्थ सांगतात कीं, ' बाबा रे ! असें जर आहे तर मी सांगतों तसें वाग. ' लहानथोर काम कांहीं । केल्यावीण होत नाहीं. ' (अगदीं हलक्या कामापासून कष्ट करायची तुझी तयारी आहे

काय ? जर असेल तर तूं भाग्याला चढशील.) आळस सोड, साक्षेप जोड, रडकेपणा टाकून दे. बाष्कळपणाची वटवट करायचे सोडून दे नित्यनियमानें अभ्यास करीत जा. 'मागील उजळणी पुढें पाठ' अशा तऱ्हेनें अभ्यास सुरू दे. लिहिणें, वाचणें, अर्थांतर पाहणें, हें नित्य करीत जा. (प्रातःकाळीं उठल्यापासून, मागील प्रकरणांत सांगितल्याप्रमाणें, नियमानें वागत जा.) तुला इष्टमित्र कोणीच नाहीं म्हणतोस, तर 'लोक आपला परावा। म्हणत जावें' म्ह० जे परके लोक वाटतात ते आपलेच आहेत असें समज, (परक्यांना आपलेसे करून घे.) नीतिमर्यादा राखावी, सावधानता असावी व 'जनांस माने ऐसी करावी! क्रियासिद्धि' प्रसंग पाहून वागावें, बहुतांचें समाधान राखावें, (जो जो येईल त्याचें समाधान करावें) उदासवृत्तीनें हरिगुण गावे, 'हरिकथा ब्रह्मांड भेदून। पैलाड न्यावी' तात्पर्य 'घालून अकलेचा पवाड। व्हावें ब्रह्मांडाहून वाड। तेथें कैचें आणिलें द्वाड। करंटपण!' अकलेचा विस्तार एवढा मोठा करावा कीं तिच्या पोटांत सारें ब्रह्मांड घ्यावें. मग हें द्वाड करंटेपण कोठें राहील ?

(५) ब्राह्मणानें ब्राह्मणाचें कर्म करावें त्यांतच त्याचा बोज आहे. स्नान-संध्यादि स्वधर्माचें आचरण त्यानें चोख ठेवावें. 'अनाचारें कदा ज्ञान निवळेना। इहलोक कळेना परलोक' बंडपाखांडाचे मार्ग सोडून उपासना वाढवावी. 'भक्तियोगें ज्ञानवैराग्य पाविजे,' म्हणून भक्तिपंथेंचि जावें, काव्यें अभ्यासावीं, पुराणें सांगावीं, वेदशास्त्रांचें आलोडन करावें, दयादानधर्म जागरूक ठेवावा, स्वधर्मकर्मानें संसार पावन करावा व 'चुकवावें वर्म संसाराचें' विवेकाचा मार्ग संतसंगें कळे म्हणून सत्संग ठेवावा. ब्रह्मवेत्ता हाच खरा ब्राह्मण होय. सोवळें ओवळें पाळावें; पण उन्मनीच्या सुखांत देवाशीं ऐक्य पावणें हें खरें सोवळें होय!

(६) संसार धन्य कशानें होतो म्ह० संसार नेटका कशानें होतो तें ह्यांत संक्षेपानें सांगितलें आहे. अंतर्निष्ठ उपासना, नित्यानित्यविवेक, न्यायनीतीचें वागणें 'अन्याय न घडें कदा' असें चोख सन्मार्गानें चालणें, उदासवृत्तीनें (अलिप्तपणानें, रडकेपणानें नव्हे) राहणें, अन्नोदकवस्त्रदान व ब्राह्मणपूजन करणें, 'पराचे जीवीचें जाणें। अस्तिनास्ति विचारणा-' दुसऱ्याचें मनोगत जाणणें व होय नाहीं विचारून लागेल तें पुरवणें, भूतदयेनें वागणें, हरिकथानिरूपणें, यात्राप्रसंग, नवविधाभक्ति या मार्गानें जाऊन अध्यात्मज्ञानानें सकल बंधांपासून मुक्तता करून घेणें ह्या मार्गानें गेल्यानें 'धन्य संसार होतसे.' अशा गृहस्थाश्रमाची महती पुढील प्रकरणी गायिली आहे.

( ७ ) चारी आश्रमांचें मूळ गृहस्थाश्रम आहे. तेथें सर्व विश्रांति पावतात. ब्रह्मचारी संन्यासी झाले तरी सर्वांना गृहस्थाश्रमींच जन्म मिळतो व गृहस्थागृहींच कीर्तिरूपानें त्यांना फिरावें लागतें. चारी आश्रमांत गृहस्थाश्रम उत्तमोत्तम आहे, 'परंतु पाहिजे स्वधर्म आणि भूतदया.' जेथें ब्राह्मण स्वधर्मानें म्ह. षट्कर्मे करून शास्त्रमार्गानें चालतात, मधुर वाणीनें सर्व प्राण्यांशीं बोलतात, कायावाचामनानें देवासाठीं कष्ट करितात, संसार करून अंतरीं सावधान राहतात ( 'अखंड जयाचें चित्त परमेश्वरीं' आहे तो सावचित्त किंवा सावधान होय ), तो त्यांचा गृहस्थाश्रम धन्य होय. गृहस्थधर्मांतील स्त्रीपुरुषांचें स्वहिताचरण कसें असावें ?

उपासनामूर्तिध्यानीं । अथवा आत्मानुसंधानीं ।
नाहीं तरी श्रवणमननीं । निरंतर ॥ ७ ॥

जो दुसऱ्याचें अंतर जाणे । देशकाळप्रसंग जाणे ।
तया पुरुषा काय उणें । भूमंडळीं ? ॥ ८ ॥

तो सगुणध्यानांत किंवा आत्मचिंतनांत किंवा निदान श्रवणमननादि साधनाभ्यासांत रत असतो; तो देशकालसमयज्ञ असतो; सर्वांच्या मनाशीं मिळून त्याचें वागणें असतें. तो अंतरीं सावध असल्यामुळें त्याचें वैराग्य जिव्हाळ्याचें असतें. वैराग्यासारखें महद्भाग्य नाहीं व लोभिष्टपणासारखें करंटेंपण नाहीं, म्हणून तो अंतरीं निःसंग, निरिच्छ व उदासीन असतो. अशा गृहस्थाश्रमी पुरुषाच्या दर्शनानेंही लोक पावन होतात. त्याचा गृहस्थाश्रम हा परमार्थच होय. प्रपंचपरमार्थ त्याचे ठिकाणीं एकरूप होतात. तो संसारी असून मुक्त आहे. त्याचा संसार नेटका आहे. परमार्थलाभासाठीं कित्येक वेडे घरदार सोडून जातात; पण अंतरीं वैराग्य नसल्यामुळें कष्टांतच त्यांचा जन्म जातो. त्यांना लाभ कांहींच होत नाहीं. ( कायक्लेशभयानें संसार सोडण्यांत फायदा नाहीं ) संसार मिथ्या कळून ज्ञानवैराग्यसंपन्नतेनें एकादा संसार सोडून गेला तर तो मात्र आपणासारखा लोकांस परमार्थलाभ करून देऊं शकतो.

( ८ ) विषयत्याग उर्फ वैराग्य म्हणजे काय तें पुढील प्रकरणांत पाहूं. वैराग्याला एका गोष्टीची जोड मिळाली म्हणजे वैराग्याची उपयुक्तता सिद्ध झाली. वैराग्याला विवेकाची जोड पाहिजे. विवेक म्ह. आत्मानात्म-

विवेक, आत्मज्ञान, स्वस्वरूपबोध. वैराग्य हें महद्भाग्य आहे; पण त्याचा उपयोग परमार्थलाभासाठी करून घेतां आला तरच उपयोग. नुस्तें वैराग्य काय कामाचें? कजाग बायकोची आदळआपट पाहिली, धंद्यांत ठोकर बसली, मित्रांनीं विश्वासघात केला, अशीं नाना संकटें उद्भवलीं किंवा प्रपंचाच्या ओढीनें मनुष्य वैतागला म्हणजे प्रपंचाला विटून देशत्याग करितो. संसाराच्या चिंतेपासून सुटला, पराधीनतेपासून मोकळा झाला, एखादा रोगी रोगमुक्त झाल्यावर समाधान पावतो तसा जंजाळांपासून सुटल्यामुळें सहर्ष झाला; हें सारें झालें; तथापि तो जर मोकाट म्ह. अनर्गळ, स्वच्छंदी, नष्ट म्ह. पापी, भ्रष्ट म्ह. आचारशून्य व चाट म्ह. चहाटळ, वात्रट बनून मोकाट सुटलेल्या पशूसारखा वागूं लागला तर त्याला उत्पन्न झालेल्या वैराग्याचा कांहींहीं उपयोग न होतां त्याच्या वैराग्यानें त्याला अनर्थांत घातलें व तें प्रपंचपरमार्थांचें दोहींचेंही वाटोळें करण्यास कारण झालें असें म्हणावें लागेल! (असे नामधारी बैरागी जगांत काय थोडे आहेत? हिंदुस्थानांत त्यांची संख्या कित्येत लाखांवर असेल). आतां उलटपक्षीं विवेक म्ह. ज्ञान पुष्कळ आहे, नानाशास्त्रें व उपनिषदादि ग्रंथ पाहून वेदांतादि शास्त्रांवर रग्गड बोलतां येतें; पण त्या ज्ञानाचा वैराग्याशीं योग घडला नसेल तर तें ज्ञानही फुकट होय. कारागृहांत अडकलेल्या माणसानें पुरुषार्थाच्या गप्पा माराव्यात त्याप्रमाणें असल्या विषयकिंकरानें ज्ञानाच्या गोष्टी सांगणें हास्यास्पद होय! वैराग्य रोमरोमांत भिनलें नसेल तर ज्ञानाच्या गोष्टी बडबडण्यानें अभिमान, दंभ, लोभ, स्वार्थ, परोत्कर्षा-सहिष्णुता इ. दुर्गुण अंगांत वाढून असलें वैराग्यशून्य ज्ञान म्ह. शब्दज्ञान मनुष्याच्या पतनास कारण होईल. म्हणून वैराग्य आणि विवेक एकावांचून एक व्यर्थ होत. आतां उभयतांचा योग झाला म्हणजे कशी बहार होते तें पहा. विवेकानें म्ह. ज्ञानबोधानें अंतरीं सुटतो, वैराग्यानें प्रपंचपाश तुटतो व याप्रमाणें निःसंग महापुरुष अंतर्बाह्य मोकळा होतो. असा विवेकवैराग्य-संपन्न पुरुष मुखानें जें ज्ञान बोलतो त्याला अनुरूप अशीच त्याची वागणूक असते. त्याची पवित्र मूर्ति व त्याची दीक्षा पाहूनच लोक आश्चर्यभरित होतात. त्रैलोक्याची आस्था नाहीं असें त्याचें कडकडीत वैराग्य असतें. असा तो अत्यंत निस्पृह असून यत्न, विवेक व धारणा या गुणांचा त्याचे ठायीं उत्कर्ष होतो. प्रखर वैराग्यामुळें अंतरीं उदासीन (निःसंग) असून त्याच्यापाशीं अनुभविक ब्रह्मज्ञान असतें, व स्नानसंध्या, भगवद्भजन इ. पुण्यमार्गात तो तत्पर असतो. याला म्हणतात विवेकवैराग्य! नुस्तें वैराग्य म्ह. हेकटपणा व नस्ता विवेक म्ह. ज्ञानाच्या शिळ्या व पांचट (येळील)

गोष्टी ! महाभागाच्या ठिकाणींच तीव्र वैराग्य व शुद्ध विवेक यांचें साहचर्य असतें.

(९) **प्रश्न**–वेदशास्त्रांत व कथापुराणांत सर्वत्र विषयांची निंदा केलेली ऐकण्यांत येते. मोठमोठे उपदेशकही मोठ्या आवेशानें विषयांची निंदा करितांना दिसतात. पण पहावें तर तेही विषयांचें सेवन करीत आहेत असेंच दिसतें ! बोलणें एक व चालणें एक हें विवेकशून्यतेचें लक्षण आहे ! त्यामुळें जनांतही हांसें होतें. विषयत्यागावांचून परमार्थ-लाभ होणें नाहीं असें सर्वत्र सांगण्यांत येतें; पण विषयत्याग केला तर देहच चालणें शक्य नाहीं. प्रपंची लोक खातात, पितात, विषयांचीं सुखें भोगतात आणि परमार्थी काय उपवास करितात ? देह चालत असतांना विषयांचा त्याग करणारा पुरुष आढळणें अशक्य आहे. विषयत्याग पूर्णत्वें करावा तरच परमार्थ घडतो असें म्हणणें युक्तीस व अनुमानास धरून नाहीं. म्हणून याचा नीट विचार करून आमचें समाधान केलें पाहिजे."

**उत्तर**– "वैराग्यपूर्वक म्ह० विषयांचा वीट येऊन त्यांचा त्याग करावा तरच परमार्थलाभ शक्य आहे असें आमचेंही म्हणणें आहे. 'प्रपंच-त्यागें सर्व सांग । परमार्थ घडे.' मागें जे जे वंदनीय पुरुष होऊन गेले त्यांनीं त्यांनीं विषयांपासून इंद्रियें आवरण्याच्या कामीं अत्यंत कष्ट केले व म्हणूनच ते भूमंडळीं मान्य झाले. वैराग्य म्ह० संपूर्ण विषयत्याग हेंच परमभाग्य होय. वैराग्य नसणें हें अभाग्य. 'वैराग्य नस्ता योग्य । परमार्थ नव्हे.' जो स्वानुभवी विरक्त पुरुष विवेकें 'सकळ त्यागी' तो ईश्वरी पुरुष होय. हा वेदशास्त्रांचा व आमचा सिद्धांत सांगितला. (तथापि सर्व विषय सर्वांना सुटणें अशक्य आहे हें म्हणणें कबूल करून विषय-त्यागाची व्याख्या तुम्हां संसारिकांनाही पटली पाहिजे अशी सांगतों.) 'सबळ विषय त्यागणें । शुद्ध कार्याकारण घेणें । विषयत्यागाचीं लक्षणें । वोळखा ऐसीं ॥' म्ह० अशुद्ध व शास्त्रनिषिद्ध म्ह. सबळ अशा विषयांचा सर्वस्वी त्याग करणें व शुद्ध (विधिपूर्वक ग्रहण केलेल्या) विषयांचें कार्याकारण (मर्यादित, नियमबद्ध) सेवन करणें यालाच विषयत्याग म्हणतात. (परमार्थाचा लाभ व्हावा अशी तळमळ ज्याला असते त्यांत कित्येक सर्वसंगपरित्याग केलेले, सर्व विषयांचा पूर्ण त्याग केलेले कांहीं असतात व कांहीं प्रारब्धवशात् संसाराच्या प्रवाहांत पडलेले पण तितकीच परमार्थाची तळमळ असलेले असे असतात. पहिल्या वर्गाच्या

लोकांना समर्थांनीं विरक्त, निस्पृह, महंत, ज्ञानी, योगी, साधु इ. नांवांनीं उल्लेखिलें आहे. दुसऱ्या वर्गाचे संसारिक जन. पहिले अत्यंत विरळ आहेत, दुसरे तुरळक आहेत. सर्वसामान्य समाज बद्धांचाच असतो. विषयत्यागावांचून परमार्थलाभ नाहीं हा सिद्धांत सांगून शुद्धविषय कार्याकारण सेवणारे संसारिकही विषयत्यागानेंच फळ मिळवितात असें समर्थांनीं वर सांगितलें आहे. आतां दासबोधांतच दुसऱ्या एका ठिकाणीं बद्ध, मुमुक्षु, साधक व सिद्ध सांगतांना या विषयाचा आणखी उलगडा प्रश्नोत्तररूपानें केला आहे तो पाहूं.)

**प्रश्न**–"आपण विषयत्याग हा साधकदशेला अवश्य आहे म्हणून सांगितलें. आतां विषयत्याग निस्पृहाला साधेल व तो साधक कोटीला पोंचेल; पण संसारिकाला तसा त्याग होणें अशक्य असल्यामुळें तो साधककोटींत येणारच नाहीं कीं काय ?"

**उत्तर**–"संसारिकाला सन्मार्ग धरितांना असन्मार्गाचा त्याग करावा लागतो; शास्त्र व सदाचार याला सोडून जे विषयभोग त्यांचा त्याला त्याग करावा लागतो; यांतच अर्धे काम झालें. सद्बुद्धि धरितांना कुबुद्धीचा त्याग होतो. त्यागाचें वर्म असें आहे कीं, मन प्रपंचाला विटून मनानें विषयत्याग झाला पाहिजे. अतस्त्याग हा मुख्य आहे. 'ध्यायतो विषयान्पुंसः' इ. गीताश्लोकांत सांगितल्याप्रमाणें विषयांचें चिंतन अधोगतीला कारण होतें. विषयांचा निदिध्यास जर पतनाला कारण, तर मनानें विषयचिंतन सुटलें म्हणजे अधोगतीचा मार्ग खुंटला. मनाला कांही तरी विषय लागत असतो. चिंतनांतून विषय जर काढतां आले तर मन निश्चल होऊन परमार्थलाभाला पात्र होतें. सांगायचें तात्पर्य इतकेंच कीं, अंतस्त्याग हा मुख्य आहे व बहिस्त्याग परमार्थलोलुप अशा संसारिकाला कांहीं तरी घडत असतोच. आतां अंतस्त्याग कसा घडतो तें पाहूं. अभावाचा, संशयाचा, अज्ञानाचा त्याग अभ्यसतांना हळु हळु घडतो. भावाचा, निश्चयाचा ज्ञानाचा, काहीं त्याग घडत नाहीं. आत्मा भावरूप आहे व माया किंवा देहबुद्धियादि बंध अभावरूप आहेत; आत्मा नित्य शाश्वत अशी भावरूप वस्तु आहे व माया अभावरूप आहे. मायेचा त्याग होतो, तिच्या विषयींचे संशय उच्छिन्न होतात, अज्ञानाचें निरसन होतें. मायेचा त्याग होतो, आत्म्याचा होत नाहीं. ढग वितळून जातात, सूर्याचा त्याग होत नाहीं. आत्मा सूर्यासारखा

भावरूप व स्वयंभु आहे, तर मायेचा, संशयाचा, अज्ञानाचा त्याग हा मुख्य त्याग आहे. यालाच अंतस्त्याग म्हणतात. आंतून मनःकल्पित विषयांचा त्याग झाला पाहिजे. निस्पृहाप्रमाणें संसारिकालाही अंतस्त्याग घडला तर तोही साधकच आहे. निस्पृहाला अंतस्त्यागही केला पाहिजे व बाह्यत्यागही केला पाहिजे. संसारिकाला अंतस्त्याग केला पाहिजे व कांहीं बाह्यत्यागही केला पाहिजे. त्याला सर्वच बाह्य विषय सोडतां येणार नाहींत; पण बाह्यत्याग हा अमुख्य भाग आहे. ( श्रीरामही संसारिक म्हणून त्यांना वशिष्ठांनीं 'अंतस्त्यागी बहिःसंगी लोके विहर राघव' असा बोध केला आहे. दोन्ही प्रश्नांचें उत्तर एकच आहे. निस्पृह अंतर्बहिस्त्यागवान् होतो, संसारिकाला बहिस्त्यागी पूर्णपणें होतां न आलें व शुद्ध विषय 'नियमितपणें' सेवन करण्याचें निश्चित ठरवून अंतस्त्याग पूर्णपणें घडला तरी विषयत्यागाचें फळ त्याच्या पदरांत पडल्याशिवाय राहत नाहीं. अशाच पुरुषाचा संसार नेटका होतो. आंतून विषयवैराग्य व बाह्यतः कार्याकारण शुद्धविषयसेवन हें ज्या संसारिकाला साधलें, तोच 'प्रपंच नेटका' करूं शकतो. निस्पृह व संसारिक या दोघांनाही याप्रमाणें विषयत्यागफळ मिळत असल्यामुळें 'विषयत्यागावांचून परमार्थलाभ नाहीं' ह्या सिद्धांतानें कोणालाही बिचकण्याचें कारण नाहीं.)

(१०) विवेकवैराग्यसंपन्न अशा 'मननशील लोकांपाशीं । अखंड देव अहर्निशीं' असतो. महावाक्यविचार व पंचीकरणाचें विवरण त्यांजपाशीं सज्ज असल्यामुळें त्याच्या संगतीनें जन सन्मार्गास लागतात. असे 'सत्कीर्तीचे पुरुष । ते ईश्वराचे अंश' होत. धर्मस्थापनेचा म्हणजे जनोद्धारकार्याचा त्यांना हव्यास असतो.

(११) ह्या संसारांत कित्येक जीव करंटे जन्मास येतात व कित्येक सदेव म्ह. भाग्यवंत भाग्य भोगून जातात. करंटेच फार, सदेव विरळ. दोघांचीं लक्षणें पुढें सांगितलीं आहेत. त्यापैकीं करंटलक्षणें त्यागार्थ व सदेवलक्षणें ग्रहणार्थ दिलीं आहेत. आळसाची आवड व यत्नाची, उद्योगाची अनावड हें करंटपणाचें पहिलें लक्षण. करंट्याची बुद्धि अधर्माकडे धांवायची. लिहिणेंवाचणें नको, बाजारहाट किंवा हिशेबठिशेब राखणें नको, धारणाबुद्धि नाहीं, भल्याची संगति रुचायची नाहीं, 'हारवी सांडी पाडी फोडी । विसरे चुके नाना खोडी' हें अंगवळणीं पडलेलें, न्यायनीतीची आवड नाहीं, दीर्घसूचना कधीं सुचायची नाहीं, दुसऱ्याच्या वस्तु

फुकट मिळाव्यात ही वासना, कोणावर विश्वास नाहीं, कोणाशीं सख्य नाहीं, शब्द संभाळून बोलतां येत नाहीं, विद्या किंवा वैभव यांपैकीं कांहींही नसून उगाच ताठा, स्वतः कळत नाहीं व शिकविलेलें ऐकायचें नाहीं–करंट्याचीं किती लक्षणें सांगावींत ? साऱ्या अवलक्षणांचा पुतळा म्हणजे करंटा ! त्याच्या अगदीं उलट गुण सभाग्याचे. परोपकाराचा उपजत गुण व त्यामुळें सर्वांस हवाहवासा वाटणें, लिहिणें, वाचणें, सांगणें सर्व मोहक, सकळांचें मनोगत राखून चालणें, नेमस्तपणा म्ह. शिस्त व टापटीप नमुनेदार, जाणतेपणा विशेष व म्हणून कोणाशीं कलह नाहीं, स्वतःच्या कार्याप्रमाणेंच परकार्यीं झटणें, कर्म अुपासना ज्ञान यांत निपुण, परदुःखानें हळहळणें व परसुखानें आनंद पावणें हा स्वभाव, अुत्तम गुणांचा ग्राहक, अनेक विद्या व कला यांत निष्णात, आत्मविद्येचा जिव्हाळा, सर्वकाळ मोठा साक्षेप इत्यादि गुण ज्याच्या अंगांत आहेत त्याला भूमंडळांत उणें काय पडायचें ? तोच भाग्यवंत पुरुष होय.

(१२) करंट्याचा मुख्य गुण आळस व सदेवाचा साक्षेप, प्रयत्न. ( आळस व प्रयत्न यांबद्दल समर्थांनीं जागोजाग जें विवरण केलें आहे तें येथें एकत्र केलें आहे. समर्थ प्रयत्नाचे मोठे पुरस्कर्ते. आळसाची निंदा व प्रयत्नाचा गौरव या प्रकरणांत एकत्र पाहण्यास मिळेल. समर्थांचें सारें चरित्र म्हणजे प्रयत्नांचें अत्युत्कृष्ट उदाहरण. संसारांत, राजकारणांत किंवा परमार्थांत आळस हा परमशत्रु व अुद्योग हा परममित्र, असा त्यांचा बोध निरंतर आहे. आळसानें सर्वस्वनाश व प्रयत्नानें भाग्योदय यावद्दल हीं सुभाषितें फार सुंदर आहेत.) 'व्याप आटोप करिती । धके चपेटे सोसिती । तेणें प्राणी सदेव होती । देखत देखतां ॥' भाग्यवंत तोच कीं 'जयास यत्नचि आवडे । नाना प्रसंगीं पवाडे । धीटपणें प्रगटे, दडे । ऐसा नव्हे ॥' असें मोठ्या वीरश्रीचें समर्थांचें सांगणें आहे. यत्नानें 'दुल्लभ तें सुल्लभ । होत आहे अशी ते ग्वाही देतात. तात्पर्यः–

देहें जैसें केलें तैसें होतें । यत्न केल्या कार्य साधतें ॥
तरी मग कष्टावें तें । काय निमित्त ? ॥'

नेपोलियनप्रमाणेंच अशक्य हा शब्द समर्थांच्या कोशांत नाहीं !

(१३) नुसत्या प्रयत्नानेंच कार्य साधतें का त्याला दैवबळाची मदत पाहिजे ? समर्थांनीं दैववाद कोठेंच सांगितला नाहीं. यत्नच मुख्य.

मग यत्न करूनही कधीं कधीं अपेश कां येतें ? समर्थ म्हणतात कीं, 'अचूक यत्न' होत नाहीं म्हणून अपेश येतें. यत्नांत कोठें तरी चुकतें, तेव्हांच अपेश येतें. साक्षेपी लोकांचा संग करावा म्हणजे साक्षेप करण्याची स्फूर्ति होते, व 'साक्षपें साक्षपु वाढे । पुरती मनकामना.' उद्योगानें उद्योग वाढतो असा अनुभव कोणा उद्योगी माणसाचा नाहीं ? 'कष्टतां सौख्य मानावें' 'यत्न तो देव जाणावा' 'अचूक यत्न तो देवो' 'यत्नाचा लोक भाग्याचा । यत्नेंवीण दरिद्रता' 'भाग्यासी काय उणें रे । यत्नावांचूनि राहिलें' 'वन्ही तो चेतवावा रे । चेतवीतांचि चेततो' इ० वचनें अत्यंत बहारीचीं आहेत. (समर्थांच्या वाणीची तेजस्विता प्रयत्नाचा पुरस्कार करितांना व आळसाचा धिक्कार करितांना कोणाच्याही प्रतीतीला येणारी आहे. तिच्यांत विलक्षण जादु आहे. प्रयत्नांचा गौरव ऐकून प्रत्यक्ष आळसाचेंही अंत:करण थरारलें पाहिजे अशी दिव्य स्फूर्ति त्यांच्या वाणींत आहे )

(१४) 'कष्टावीण फळ नाहीं' या उताऱ्यांत हाच प्रयत्नवाद पुन्हा सांगितला आहे. 'कष्टावीण राज्य नाहीं.' प्रपंचांत वा परमार्थांत कष्टावांचून कांहीं साध्य होत नाहीं, हाच सिद्धांत आहे. 'जेंहीं उदंड कष्ट केले । ते भाग्य भोगून गेले । येर ते बोलतचि राहिले । करंटे जन !'

(१५) संसार करायचा हें ठरल्यावर तो रडका करणें समर्थांच्या प्रयत्नवादाला धरून नाहीं. प्रस्तुत तीन श्लोकांत त्यांनीं 'वृथा शीण संसार करती रडाया !' ह्याप्रमाणें रडक्या संसारिकांचा कान पिरगळला आहे. 'नसे आंथराया नसे पांघराया । नसे धाम ना दृढ छाया निजाया–' अन्नवस्त्र नाहीं, घरदार नाहीं, मनासारखा मित्र नाहीं, कामक्रोधांनीं देहांत ठाण मांडलें आहे, सर्व लोक असंतुष्ट आहेत, मरेमरेतों नोकरी करीत आहे– 'पराधीनता–वेळ नाहीं मराया' नुस्तें चार पैसे मिळवून बायकापोरांचें धड संगोपनही करवत नाहीं–काय लाजिरवाणें जिणें हें !

(१६) प्रपंच सावरायचा यत्न करूनही मनासारखा संसार थाटणें प्राय: दुरापास्त होतें, म्हणून ज्यांना संसारांत सर्व गोष्टींची अनुकूलता आहे त्यांच्या सुकृताचा तो योग आहे असें म्हटलें पाहिजे. मनासारखी व अनन्य भार्या आहे, मनासारिखे पुत्रजामातकन्या आहेत, घरांत रम्य व मंजुळवाणीनें सर्व बोलत आहेत आईबाप भले आहेत, स्नेहभाव राखणारे सोयरे व मित्र आहेत, 'मुलें लेंकुरें एक मेळा सुखाचा' जमला आहे, घरेंदारें, वस्त्र-प्रावरणें सर्व यथास्थित आहेत, देहीं आरोग्य नांदत आहे, मनमिळाऊ ग्रामा-

धिकारी व ग्रामस्थ मिळाले. आहेत, जें चिंतावें तें देव पुरवीत आहे, भक्त-भाविकांचा समागम घडत आहे. 'धन्यो गृहस्थाश्रम :'

(१७) ह्या संसारांत मनाच्या उलट गोष्टीही घडनात. कधीं कधीं जाणें, खाणें, वोलणें, भेटणें मनांत नसून तेंच करावें लागतें. अशा प्रसंगीं देवाला स्मरावें व 'बरें वोखटें सर्व साहोनि जावें!'

(१८) प्रपंच असो, राजकारण असो–चातुर्यावीण त्यांत नेटकेपणा येत नाहीं, म्हणून येथें चातुर्यलक्षणें अभ्यासार्थ सांगितलीं आहेत. रूपलावण्य व प्रकृतिसिद्ध सहजगुण यांत पालट करितां येत नाहीं. काळेपण, देवीचे व्रण हे कांहीं जात नाहींत, मुक्याचा वाचाळ होत नाहीं–तथापि अभ्यासाने आगंतुक गुण अंगी आणतां येतात. कुविद्येचे गुण टाकून उत्तम गुण घेतल्यानें मनुष्य शहाणा होतो शहाणपण शिकतां येतें, कारभार करूं लागलें कीं सर्व कांही उमजतें. लोकांत मान्यता पाहिजे तर चातुर्य शिकावें. 'अतर्कळा शृंगारावी' म्हणजे अंतरंग चातुर्यानें भरावें, प्रयत्न करावा, शरीर कष्टवावें, उत्तम गुण घ्यावे, न्यायानें वर्तावें व 'संपदा मिळवून भोगावी। सावकाश' लोक वश होतील असें वर्तावें म्हणजे समाधान मिळतें. 'मैत्रीनें मैत्री जोडे' अरे तर कारे, अहो तर कांहो, असा व्यवहार आहे; म्हणून लोकाची प्रसन्नता जोडावी. 'चातुर्ये शृंगारे अंतर। वस्त्रें शृंगारे शरीर' यांत श्रेष्ठ कोण आहे तें पहावें. समस्तीं बरें म्हणावें असें वाटतें तर समस्तांसाठीं तनमनें झिजलें पाहिजे लोकाचा कार्यभाग जेथें अडतो तेथें पुढें होऊन तो करावा व लोकांस सुखी करावें कीं लोक सहजच ओढले जातात. समजून वागलें पाहिजे. 'समजले आणि वर्तले। तेचि भाग्यपुरुष जाले। यावेगळे उरले। ते करंटे पुरुष!' सृष्टींत सगळ्यांशीं भांडून एकल्याला यश कोठून मिळेल? म्हणून 'बहुतांचे अंतरी भरावें। बहुतांचे मुखी उरावें।' तात्पर्य 'शाहणे करावे जन। पतित करावे पावन। सृष्टीमध्यें भगवत्भजन। वाढवावें' हें चातुर्याचें मुख्य लक्षण होय उदंडांचें उदंड ऐकावें, अंतर्यामीं खरें खोटें निवडावें; पण आपल्या प्रत्ययाने चालावें, वादांग वाढवणें हें मूर्खपण 'वेडे करावे शाहणे। तरीच जिणें श्लाघ्यवाणें' होय. दुसऱ्यांचे चालणीं चालावें, दुसऱ्यांच्या मनोगतीं मिळावें, याप्रमाणें 'आधीं अंतर हातीं घ्यावें। मग हळुहळु उकलावें.' आधीं विश्वास व प्रेम संपादावें व मग उपदेश केला तर तो ठसतो. दोन हेकाड मिळाले कीं कलह ठरलेलाच! यास्तव 'धके चपेटे सोसावे। नीच शब्द साहीत जावे' म्हणजे पुढें तेच पश्चात्ताप पावून आपले होतात. लहान-

थोरांची परीक्षा करावी, ज्याला जें पाहिजे तें त्यास द्यावें, फिरावें, विवरावें, ज्यांत जे गुण दिसतील ते घ्यावे, याप्रमाणें चातुर्यानें दिग्विजय करावा, म्हणजे पुरुष लोकमान्य होतो. 'भूमंडळीं सकळांसी मान्य । तो म्हणों नये सामान्य.'

(१९) हें चातुर्य, ही जाणीव जेथं आहे तेथेच भाग्य आहे. 'लहान थोर वुद्धीपाशीं' म्ह. वुद्धि लहान किंवा थोर त्या मानानें लहानपण किंवा थोरपण मिळतें. विवेकानें पैसावले म्ह. व्यापक झाले तेच शाहणे. मनुचक्रवर्ती, अवतारी पुरुष या जाणिवेमुळेंच थोर पद पावले. 'व्याप आटोप करिती। धके चपेटे सोसिती । तेणें प्राणी सदेव होती । देखतदेखतां' सर्वांत व्यापक व श्रेष्ठ अंतरात्मा, त्याशीं तन्मय होतात ते शाहणे. वयाचें थोरपण काय कामाचें ? बहुतांस मानला तो शाहणा. शाहण्यांची संगती करुन शहाणपण शिकावें.

(२०) अभ्यास करावा, आपला आपला व्यापार दक्षतेनें पहावा. व्याप वाढवितां वाढवितां वाढत जातो, शिकतां शिकतां शाहणपण येतें. प्रत्ययानें बोलतो व अचूक यत्न करितो तो जाणता. जाणता पुरुष अंगावर वाजू येऊं देत नाहीं, व सर्वांचीं मनें राखतो. त्याची संगती करून शाहणपण शिकावें, म्हणजे प्रपंच परमार्थांत सौख्य मिळतें.

---

## ( २ ) राजकारणविचार–प्रसंग व कांहीं सिद्धांत.

(१) **समर्थकालीन अस्मानीसुलतानी** ह्या पहिल्या प्रकरणांत समर्थांच्या काळीं परधर्मीय परराज्यामुळें हिंदुसमाजाची कशी दैना झाली होती याचें वर्णन आहे. महर्गता, त्यामुळें ग्रामत्याग व देशत्याग, प्रसंगीं मृत्यु, गांवेंचीं गांवें ओस पडणें, परसैन्यांच्या धाडी येणें, लढणाऱ्या उभयपक्षीय सैन्यामुळें प्रजेच्या धनधान्याचा संहार होणें, अतिवृष्टि व अनावृष्टि यांमुळें लोक अन्नाला महाग होणें. इ. प्रकारचीं अरिष्टें प्रजेवर कोसळत होतीं. एकीकडे यवन व दुसरीकडे शिरक्यांसारखे कित्येक स्वतंत्र बाण्याचे राजे व पुंड-पाळेगार यांच्या तंट्यामुळें कित्येक 'ताम्रबदींत' म्हणजे पोर्तुगीज वगैरे परधर्मी लोकांच्या कारागृहांत व कित्येक 'महाराष्ट्रबंदीं' म्ह. मराठ्यांच्या

किल्ल्यांत कैद भोगीत पडले होते. 'छंद ना बंद' अशी बेबंदशाही जागो-जाग माजली होती. कित्येक अन्नाची वाण पडल्यामुळें परधर्मांत जाऊन भ्रष्ट झाले होते व कित्येक कुलवंतांनीं धर्मासाठीं प्राण दिले होते. कित्येकांचे नाककान कापले जात होते, किती कुलवंत स्त्रिया भ्रष्ट केल्या जात होत्या, कित्येकांची मोट बांधून त्यांना बुडविण्यांत येत होते, व कित्येकांना पाठीवर बांधून घोड्यावरून पळविण्यांत येत होतें. अशी ती दुरवस्था कोठवर वर्णावी ? घरीं खायला नाहीं, बाहेर जावें तर जायला ठिकाण नाहीं. बाहेर भीक घालतो कोण ? त्या आपत्तीचें वर्णन करायची हौस तरी कवीला कशी वाटावी ? शेतें पिकत नाहीं, कष्ट करूनही फजितवाडा होतो, सारें थोतांड माजलें आहे. दुनिया पाहावी तर सारी लंड (धर्म व सदाचार याला विन्मुख) झाली आहे. इतकी बेबंदशाही माजली आहे कीं ज्यानें उठावें त्यानें गरीब प्रजेला लुटीत सुटावें ! पिकें कणसाला येतात न येतात तों तीं लुटण्यांत येतात. काळ (धान्याची महर्गता) जिवलगांत ताटातूट करितो व एकत्र नांदणारीं कुटुंबें विस्कळित होऊन जाताहेत ! संरक्षणाचा आधार नसल्यामुळें व्यापारी धीर धरीत नाहींत व म्हणून व्यापारधंदा चालत नाहीं. सारे सारखेच कंगाल व धर्मभ्रष्ट झाले आहेत. असा हा कठिण काळ आला असून यांतून प्रजा उत्तीर्ण कशी होईल ती होवो ! जगांत अब्रू, प्रतिष्ठा कोठें राहिली नाहीं. दुनिया अळाची जाली, म्ह. 'बळी तो कान पिळी' अशी स्थिति आहे ! पुढें काय होणार असेल तें टळणार नाहींच. लोकांचे पदरीं पुण्यसंपत्ति नाहीं. मग ती फळणार तरी कोठून ? अंगावर घ्यायला सुडकें नाहीं, कोंपट म्ह. झोपडी बांधायला अंगांत त्राण नाहीं, पोट भरायला परदेशाकडे धांव घ्यावी तर वाट फुटत नाहीं, याप्रमाणें सगळेजण मरणाच्या दारीं बसलों आहोंत ! या दैन्याला कंटाळून कित्येक भरल्या नदींत उड्या टाकतात, कित्येक विषभक्षण करून संसार-दुःखाची कड लावतात व कित्येक अग्नींत जाळून घेतात ! कोण फजीतीची वेळ ही ! कित्येक पैसा मिळवायला दूर देशांत पळून गेले, कष्ट करकरून त्यांनीं पैसे मिळविले व शेवटीं ते तिकडेच नागवले गेले ! कित्येक मिळवून परत आले तों घरचीं अन्नावांचून मरून घरच ओस पडलेलें! कासावीस झाले; पण उपाय काय? मरमर चाकरी करूनही पोटभर भाकरी मिळत नाहीं, नीतिभ्रष्ट तरुण पोरीस फूस लावून पळवून नेतात, नीतिन्याय कोठें राहिला नाहीं, सर्वत्र शिरजोरपणा बोकाळला आहे, कोणाजवळ चार पैसे दिसले कीं मारामारीला सुरुवात ! ('अतिथिदेवो भव' अशी धर्माज्ञा असून परिस्थितिच अशी बिकट आली आहे कीं, कोणाला घरीं पाहुणे यायला नकोत व पाहुणे

येतात तेही भुकेबंगाल व लोंचट ! ) पाहुणा आला तर लौकर जात नाहीं, जेवतो तोही बेतानें जेवत नाहीं, उदंड वाढलें तरी त्याची तृप्ती होत नाहीं, उलट तोच गर्वानें फुगून यजमानाच्या अंगावर गुरकावतो ! वस्तीला राहून वस्ता चोरून नेतो. त्याचे खोटे प्रकार त्याच्या मोठेपणाला बट्टा लावतात; पण त्याला त्याची कोठें लाज आहे ? हे लोक भले दिसतात, पण खेटरापर्यंत वस्ता चोरून नेण्यास लाजत नाहींत, वस्त्रेंपात्रें खुशाल गांठोडयांत बांधून घेऊन जातात ! श्रीरामदास म्हणतात, " भगवंता, आमचें सत्त्व तूं आणखी किती पाहणार तरी किती ? असल्या ह्या जगण्यांत काय अर्थ आहे ? त्यापेक्षां आम्हां सर्वांना एकदम मारून तरी टाक ! ! आतां आम्ही सत्त्व तरी किती संभाळावें ? आमचीं शरीरेंही यापुढें–टिकाव धरण्यास असमर्थ–निःसत्व झालीं आहेत ! " (२) **दुसऱ्या 'परचक्रनिरूपण' प्रकरणांत** हाच विषय अधिक सोप्या भाषेंत पुन्हा आला आहे. देशांतल्या मोलवान् चीजवस्ता व उंची जवाहीर बाहेर गेलें असून 'नुस्ता देशच उरल्याचें' समर्थ सांगतात. अद्याप देशाचे दुष्ट ग्रह प्रबळ असून पुढील दुश्चिन्हें दिसत आहेत व कित्येक भविष्यवादी तर 'पुढेंही वाईट काळ आहे' असेंच सांगत आहेत; पण समर्थांचा त्यावर विश्वास दिसत नाहीं. ( थोर कर्ते पुरुष नैराश्यजनक काळांतही आशावादीच असतात. दुःस्थितींतून समाज सुस्थितीवर आणण्याचें त्यांचें चिंतन व उपायही चालू असतात. ढगांमागील सूर्य त्यांना दिसत असतो. )

( ३ ) वर सांगितलेल्या दुःस्थितीचा दोष कोणाकडे ? दोष परक्यांकडे नाहीं, दोष आपलाच आहे, असें समर्थ **तिसऱ्या प्रकरणांत** सांगतात. ब्राह्मणांनीं आपला आचार सोडला, क्षत्रियांनीं देशस्थितीचा विचार करण्याचें सोडलें, सर्व लोक पुण्यमार्ग सोडून पापाकडे वळले, न्यायनीति सोडली, स्वधर्म सोडला, म्हणून ही दुःस्थिति प्राप्त झाली आहे. पुण्यक्षेत्रें मोडत आहेत, ब्राह्मण्यें पीडा पावत आहेत. लोकांतील धर्मप्रवृत्ति बुडाली, लोक शास्त्रमर्यादा सोडून वागूं लागले, लोक 'मिणधे' झाले–स्पष्ट निर्भीड विचार निर्भीडपणानें व निर्भयपणानें सांगण्याचें विसरले, म्हणून ही आपत्ति आली ! शुद्धज्ञानाचा विचार मंदावला, 'मना आलें तें बोलती । चालो नये तें चालती–' स्वेच्छाचार व स्वैरपणा बोकाळला, अवघा स्वधर्म बुडाला, राजकारण किंवा परमार्थ यांकडे न पाहतां 'देह केवळ प्रपंचाकडे' लावून लोक पिंडपोषक झाले. नाना पंथ नाना मतें यांनीं आणखी गोंधळ घातला म्हणून ऐक्य होईनासें झालें. तात्पर्य 'लोक दोष आचरती । तेणें दोषें भस्म होती' येथें दोष लोकांचाच आहे. (दोष लोकांचा खरा; पण

मुख्य दोष पुढारी लोकांकडे येतो. '**वर्णानां ब्राह्मणो गुरु:**' या न्यायानें नेते सुधारले कीं जनता सुधारते ) आतां नेते ब्राह्मण कसे आहेत हें **चौथ्या** व जनता कशी आहे हें **पांचव्या** प्रकरणांत सांगतात. (४–५) नीच प्राण्यांकडे गुरुत्व गेलें असतांना त्याला आचारधर्माचें वळण नसल्यामुळें वेदशास्त्राची महती उरत नाहीं. बुद्धी व आचार यांत ब्राह्मणाला परंपरेचें श्रेष्ठ वळण होतें; पण 'ब्राह्मण बुद्धीपासून चेवले। आचारापासून भ्रष्टले' आपल्या धर्माच्या देवता सोडून ते परधर्मीय देवतांना भजूं लागले. बुद्धी, आचार, कर्ममार्ग सोडल्यामुळें ब्राह्मण गुरुत्वाला अपात्र झाले असून नुस्ते आम्ही ब्राह्मण एवढाच मूर्खपणाचा अभिमान घेऊन वसले आहेत व शूद्र ब्राह्मणांचा आचार बुडवीत आहेत! 'राज्य नेलें म्लेंच्छक्षेत्रीं। गुरुत्व नेलें कुपात्रीं।' यामुळें अत्रीं किंवा परत्रीं म्ह. इहलोकींच्या व्यवहारांत किंवा परमार्थांत ब्राह्मणांनीं आपलें वजन कोठेंच राखलें नाहीं. ब्राह्मण ग्रामणीनें बुडाले आहेत. आचारविचारांतलें आपलें पुढारीपण गमावून ब्राह्मण ग्रामणींत नस्त्या उठाठेवींत, गांवकुटाळपणांत गुंतले आहेत! आतां 'अन्न मिळेना ऐसें झालें आहे कीं नाहीं' याचा त्यांनींच विचार करावा. असो; मागें झालें तें झालें, 'आतां तरी ब्राह्मणीं आपणाला शहाणें करावें' एवढाच त्यांना इषारा देऊन ठेवतों! आत्मबोधामुळें–ब्रह्म जानाति ब्राह्मणः–ब्राह्मणांचें महत्व. आत्मबोध तर त्यांनीं 'करमणुकीचा' किंवा 'मनोरंजनाचा' विषय करून टाकला आहे. विवेकवैराग्याची परंपरा सोडली आहे, भावार्थाचा दुष्काळ पडला आहे, त्यांनीं स्वधर्म, आचार-विचार सोडल्यामुळें सर्वच वर्णांत व जातींत स्वधर्माचा लोप होऊन 'जन अधर्मी प्रवर्तला' आहे. सर्वत्र भक्तिभावाचा लोप होऊन घरोघर कवित्व आणि शब्दज्ञान वोकाळलें आहे. आचारविचारांपासून जें समाधान (शांतिसुख) मिळायचें तें कोठेंच राहिलें नाहीं. 'हरिदास्य सांडून कळावंत झाले।' हरिभक्तींत स्वतः रमायचें व जनतेला रमवायचें सोडून कीर्तनाच्या कांहीं उपांगांकडे म्ह. गायन, वादन, नर्तन या कलेंतच हरिदास रमून गेले व जनमनरंजन व द्रव्यार्जन यांतच दंग होऊन 'देव सांडून फिरों लागले मनुष्यांभोवतें!' सप्रेम भक्तिसुख सोडून ज्ञानी वादविवादांत दंग झाले, संस्कृत शिकून गर्वाखालीं मेले! काय करावें? ईश्वरही कसा डोळे झांकून बसला आहे! यामुळें ब्राह्मण व इतर जन या सर्वांचीच अवनति होऊन समाज विस्कळित झाला आहे. स्त्रिया भर्तृसेवा हा स्वधर्म सोडून पुरुषांशीं (हक्कासाठीं कीं काय?) भांडत आहेत. पुत्र मायबापांची मर्यादा सोडून स्वेच्छ वागत आहेत. 'पुढें याहून होईल! जालें नाहींच अद्यापी!' बहुजनसमाज तर जडमूढच, त्यांची गोष्ट काय सांगावी! परस्परभेद,

दुर्बलता, अर्धवट ज्ञान, कलागति, तंटेबखेडे, निंदा, आपस्वार्थीपणा, मारामाऱ्या, 'दिवाणांत' फिर्यादी, कैद–कारागृह यांना नुस्ता ऊत आला असून 'महीमंडळीं काय होणार' तें कळेनासें झालें आहे. वाईट-चांगलें दोन्ही आहे, नाहीं असें नाहीं. समाज म्हणजे विराट पुरुषच तो. कांहीं मंदबोधे म्ह. जड आहेत, तर कांहीं कळाकुसरीचेही लोक आहेत. कांहीं लबाड, पापी, तोंडाळ, तामसी आहेत, तर कांहीं नाना गुणांचे व उत्तम लक्षणांचेही आहेत. अशी ही जनता पाहून गुणवंतांचा उत्कर्ष कसा होईल व अवगुणी लोक गुणी होण्याच्या मार्गास कसे लागतील या विचारांत (समर्थ सांगतात) आम्ही गर्क आहोंत !

फिरे दास ऊदास लोकांस पाहे।
मनामाजि थक्कीत होऊनि राहे।

आम्ही उदासपणें देश व नाना लोक यांचें निरीक्षण करीत आहोंत; पण लोकस्थिति पाहून आम्हांस अचंबा वाटतो ही गोष्ट खरी ! देशाची परिस्थिति काय आहे याचा विचार सुज्ञ–अज्ञ कोणी न करितां आंधळ्यासारखें वागून कसेतरी जगत आहेत यांचें नवल वाटतें! (६) **सहाव्या प्रकरणाच्या** दोनच श्लोकांवरून समर्थांना 'जनचिंता' कशी लागली होती तें दिसतें. वर वर्णन केलेली देशस्थिति कशी सुधरेल ? विषमकालानें दाटणी (आपत्तींची गर्दी) केली असून व आशा बाळगायला तिळभरही जागा दिसत नसून 'अंतरीं नाना कोंड' झाल्यामुळें आतां यापुढें 'दम निघत' नाहीं अशी समर्थांच्या मनाची या वेळीं स्थिति झाली होती. (शिवरायाची भेट होण्यापूर्वीचे हे उद्गार उघडच दिसतात.) 'सकल जन सुखावे तो कसा काळ फावे' म्ह. सर्व लोक सुखी झाले आहेत असा सुदिन कधीं उगवेल या जनचिंतेंत समर्थ होते ! त्यांची उपाययोजना सुरू झाली; व

(७) **सातव्या प्रकरणांत** लोकांना धीर धरा, धीर धरा, सावधान रहा, प्रसंग तुफान आहे पण प्रयत्न करा, मोठा व्याप करा म्हणजे मोठा भाग्योदय होईल, आपसांत भांडत असूं नका, रावणासारख्यांचीं राज्यें बुडालीं, तेव्हां सांप्रतची दुर्धर स्थिति बदलणार नाहीं असें समजूं नका, भरतें तें रितें होतें व रितें होतें तें पुन्हा भरतें असें रहाटगाडगें नेहमींच चाललें आहे म्हणून तुमचा उर्जितकाळ खात्रीनें येईल असा विश्वास ठेवा, नदी भरून ओहटते व तळें भरून फुटतें याच न्यायाने शत्रूच्या ऐश्वर्याचा कळस झाला असून तो आतां खाली पडल्याशिवाय राहत नाहीं, धीरानें व विचारानें पाऊल पुढें टाका, पाणी तसेंच ऐश्वर्य 'भरोचि लागतां भरे। सर्वेचि

वोसरे सरे' हें विसरूं नका. प्रयत्नाला वरी वेळ लागली कीं 'न मागतां घडून येतें' व काळ विषम म्ह. प्रतिकूळ लागला कीं 'पराक्रमच श्रम' होतो, वरा काळ न मागतां घरा येतो. तात्पर्य, धीर धरा व सावधानपणें मोठा प्रयत्न करा, चांगले दिवस येतील, अशी श्रीसमर्थांची धीराची वाणी येथें आपल्या कानावर येते.

(८) **आठव्या** प्रकरणांत देशोद्धारार्थ मोठा व्याप करींत असतांना कलह, पक्षभेद व वितंडवाद टाळा असें सांगितलें आहे. कलह हा अनादि आहे. देवदैत्यांत, माणसामाणसांत, स्वजातीविजातींत, महंतामहंतांत, पंडितापंडितांत, ज्ञात्यांत, योग्यांत, तापसांत कलह हा चालत असतो! त्यांच्यांत सख्य असणें कठिण असतें. शास्त्रमतानें सगळेच बोलतात व आपलें पांडित्य दाखवितात; फार काय, पण शीघ्रकोपाच्या भरांत येऊन एकमेकांवर काठ्याही चालवितात; पण शाहण्या कर्तृत्ववान् माणसाचें हें काम नाहीं. विचारानें कलह मिटतो. अहंकारामुळें कलह उद्‌भवतात; 'अहंमति विरेचिना। तरी कळ्हो सरेचिना!' विकारलेश चित्तांत असेल तर मनुष्य अहंकाराच्या भरीं भरतो, म्हणून निर्विकार मनानें लोककार्यास लागा. सर्व जिवांत एक परमात्मा नांदत आहे हें जाणून त्याला अनन्य रहा, अभेदभक्तीनें भजा, म्हणजे त्या निर्विकाराच्या निदिध्यासानें निर्विकारपणानें तुम्हांस लोककार्य करितां येईल. 'अहंपणें झकों नका' लोकांत पक्षभेद उत्पन्न करून कलह पिकविणारे पुष्कळ पाहिले; पण 'धरून पक्ष काय रे। उपाय तो अपाय रे' हें ध्यानीं धरा. अनेक शब्दभावना दाखवून वितंडवाद घालून आपल्या पक्षाची सरशी झाली अशा अहंभावांत पडूं नका. अहंभाव व पक्षभेद यांचा आश्रय करून कोणी चढेलपणानें वागेल तर 'उडेल तो पडेल रे। पडेल तो रडेल रे' हें लक्षांत ठेवा. कलह शब्दांत आहे. अनंत निःशब्द आहे.; तुम्ही 'अनंताशीं साधर्म्य' पावा म्हणजे कलह मिटेल; सारांश–

कळ्हो करील शब्द रे। अनंत तो निशब्द रे।
तुम्ही अनंत कां न व्हा। वेवादितां अव्हासव्हा ॥ ६ ॥

देशाची दुर्धर स्थिति पालटून सुस्थिति यायची तर लोकांनीं मोठा व्याप (कलह न करितां) केला पाहिजे. लोकांना अर्थात् नियंता चांगला पाहिजे.

(९) चांगल्या राज्याचा नमुना 'रामराज्य.' त्या 'रामराज्याचें, म्ह. उदात्त सुराज्याचें वर्णन (९) **नवव्या** प्रकरणांत आलें आहे. रामराज्यांत अतिवृष्टि अनावृष्टि नाहीं; लोकांना उद्वेगचिंता नाहीं.; अकालमरण

नाहीं; आधिव्याधि नाहीं; बंदनिर्वंद म्ह. वंदिवासादिकांचें व स्वातंत्र्यहानीचें दुःख नाहीं; दंडदोष नाहीं, कां कीं लोकांची नीतिमत्ताच अत्युज्ज्वल झाल्यामुळें कोणी दोषच आचरीत नाहींत; दारिद्र्यक्लेश नाहींत; लोक आरोग्यानुभव घेत सुखांत नांदत आहेत; परस्पर सख्यप्रीति वसत आहे; न्याय, सत्य, परोपकार या सद्गुणांनीं सकल जन मंडित आहेत; जमीनी उत्तम पिकें देताहेत; वृक्षवाटिका फलपुष्पभारानें नम्र झाल्या आहेत; धेनु अखंड दुभत्या आहेत; वेदशास्त्रचर्चेत पंडित गर्क आहेत, सर्वत्र कीर्तनाचा रागरंग भरून सुखानंद उचंबळून राहिला आहे; नाना विद्या व कला यांचा उत्कर्ष होत आहे; अशा प्रकारें रामराज्याचें अपार सुख आहे! स्वतः रामराजा एकवचनी, एकबाणी व एकपत्नी असा सच्चरित्र प्रजानुरंजनतत्पर आहे. (उत्तम राज्याचा हा कित्ता जगापुढें ठेवण्यांत समर्थांचा हेतु काय होता हें कांहीं सांगायला नको आहे. लोक अनुभवीत असलेली दुर्धर स्थिति पालटून रामराज्याच्या पद्धतीचें सुराज्य लोकांना मिळावें हीच 'जनचिंता' त्यांना लागली होती. त्यांच्या पवित्र संकल्पाप्रमाणें त्याच वेळीं असा उत्तम राजा महाराष्ट्रास लाभला असून 'गोब्राह्मणप्रतिपालनाचें' विरुद्र (ब्रीद) मिळवीत होता. तपस्वी महापुरुषांचे संकल्प वांझ होत नाहींत. शिवबांचा प्रतापरवि 'तोरणा' किल्ल्यावर उदय पावून 'पुरंदर' तुल्य पराक्रम गाजवीत 'सिंहगड' काबीज करीत 'प्रतापगडा'वर पूर्णप्रतापानें तळपण्यासाठीं मार्गस्थ झाला होता.) शिवबाचा गौरव करून त्याला प्रोत्साहन देण्यासाठीं समर्थांनीं जें पत्र लिहिलें तें **दहाव्या प्रकरणांत** दिलें आहे. (१०) 'निश्चयाचा महामेरु। बहुत जनांसी आधारु' असा समर्थांचा शिवबा यशवंत, सामर्थ्यवंत, पुण्यवंत, नीतिवंत, आचारशीळ विचारशीळ, धर्मशीळ होता ही गोष्ट जगविख्यात आहे. 'धीर उदार गंभीर। शूर क्रियेसी तत्पर' असें शिवरायाचें समर्थांनीं प्रेमळ वाणीनें वर्णन केलें आहे. ते प्रोत्साहक वाणीनें सांगतातः—

तीर्थक्षेत्रें मोडिलीं। ब्राह्मणस्थानें भ्रष्ट झालीं।
सकळ पृथ्वी आंदोळली। धर्म गेला॥ ६॥
देव धर्म गोब्राह्मण। यांचें करावया संरक्षण।
हृदयस्थ जाला नारायण। प्रेरणा केली॥ ७॥
या भूमंडळाचे ठायीं। धर्म रक्षी ऐसा नाहीं।
महाराष्ट्रधर्म राहिला कांहीं। तुम्हांकरितां॥ ९॥
कित्येक दुष्ट संहारिले। कित्येकास धाक सुटले।
कित्येकांस आश्रय जाले। शिवकल्याण राजा॥१०॥

यात समर्थांनीं शिवरायाचें सप्रेम गौरव करून त्यांना महाराष्ट्रधर्म-रक्षणाचें प्रोत्साहन दिलें आहे. (११) अकराव्या प्रकरणांत 'धूर्तपणाचें राजकारण सांगितलें आहे. हें बहुधा चद्रराव मोऱ्याच्या कारवाईप्रसंगीं शिवदास सांगितलें असावें. समुदायाचा हव्यास करायचा तर एकांतांत पुष्कळ असावें. कां कीं 'तेथें तजविजा कळती। अखंड चाळणा निघती।' प्राणिमात्रांची स्थितिगति कळून येते, चाळणेनें सर्व कांहीं उमगलें, हिशेव-झाडा पाहतां येतो. हे सर्व लाभ एकांतांत होतात म्हणून कार्यकर्त्यानें बहुत काळ एकांतांत असावें. समुदायांत नाना स्वभावाचे लोक असतात, त्यांशीं वागतांना 'चोर भांडारी करावा। घसरतांचि सांभाळावा' हें तत्त्व ध्यानीं ठेवावें. कोणाला कष्टी करूं नये. 'राजकारणें मंडळ वेष्टीं। चहूंकडे' असा व्याप करावा. 'कांटीनें कांटी झाडावी। परी कळों नेदावी' पण कळकटे-पणाची पदवी म्ह. कलह लावणारा असा ठपका आपणावर येऊं देऊं नये. ढिलेपणा कामाचा नाहीं. 'जो दुसऱ्यावरी विश्वासला। त्याचा कार्यभाग बुडाला' म्हणून स्वतः कर्तृत्व गाजवावें. 'मुख्य सूत्र हातीं घ्यावें' व इतरा-कडून कामें करवावीत. गुप्त विचार सर्वांस सांगूं नये 'अवघ्यांस अवघें कळलें। तेव्हां तें रितें पडलें.' प्रतिपक्षांत वलिष्ठ असतील त्यांशींच झगडा करावा, दुर्जनांच्या मसलतीनें राजकारण अडून बसेल असें करूं नये. बलाढ्य शत्रूचें वर्म शोधावें व तेथेंच त्याला ठोकावें, रगडून पीठ करावें; पण त्याला बुडवूं नये, तर मागुती सांवरावें म्ह. पुन्हा मिळवून घ्यावें. यामुळें दरारा बसतो व कार्यभागही अडत नाहीं. खळदुर्जनांना भिऊं नये, राजकारण अवश्य सांभाळावें. समुदाय मोठा पाहिजे तर तणावा वळकट असावा. दुर्जनाना ओळखावें, पण त्यांना प्रगट न करितां 'सज्जनांपरीस आळवावें। महत्त्व देऊनी!' दुर्जन उघड केल्यानें कटकटी फार पडतात गनिमांच्या फौजा पाहतांच वीरश्रीनें ज्याचे वाहु स्फुरण पावतील असा लोक कैवारी व परमार्थी राजा पाहिजे. त्याच्या दराऱ्यानें शत्रूंना धाक सुटावा. वाग्विलासानें लोक असे वेधावेत कीं, 'हा तर कोठेंच पडेना दृष्टी' पण 'ठाईं ठाईं त्याच्याच गोष्टी' लोक बोलून राहिले आहेत! हुंब्यास हुंबा लावावा, टोणप्यास टोणपा, खटास खट, धटास धट, उद्धटास उद्धट लावून द्यावा. उघडच आहे कीं, 'जैशास तैसा भेटे। तेव्हां मजालसी थाटे' असा आहे प्रकार. हें सारें करवावें, पण करणारा धणी मात्र कोठेंच दिसूं नये! धूर्तपणाचें राजकारण हें असें आहे.

(१२) **बाराव्या प्रकरणांत** राजधर्म, क्षात्रधर्म व सेवकधर्म दिले आहेत. ते अर्थात् शिवराय व त्यांचे अधिकारी व इतर सेवकजन यांस

उद्देशून सांगितलेले आहेत. राजाला मुख्यत: मनुष्यपरीक्षा उत्तम पाहिजे. योग्यता पाहून त्यानें काम घ्यावें. एकादा मनुष्य कार्यकर्ता आहे, मोठा यत्न म्ह. व्याप करणारा आहे, आणि स्वभावानें हेकाड आहे तर त्याला संभाळून घेतलें पाहिजे. फितवेखोरांचा संहार करावा, निकामी मनुष्य एकीकडे ठेवावें. ‘मनुष्य राजी राखणें’ हें भाग्याचें लक्षण आहे. ज्याला भाग्य पाहिजे त्यानें उपाधीला कंटाळूं नये, संकटाला डगूं नये, नाना उपायांनीं संकटें दूर करावींत. धुरेनें म्ह. मुख्यानें युद्धास जाणें हें राजकारण नव्हे, तर आपल्यासारख्या अनेक धुरा (मुख्य) करून सोडणें हें राजकारण आहे. मोहऱ्यानें अनेक मोहरे तयार करावे. स्वामी सेवकांनीं एका मनोगतानें चालावें. मेढवाड्यांत वाघ शिरतो तसें शत्रुसैन्यांत शिरून सर्वांनीं शत्रुसंहार करावा, हे राजधर्म झाले. आतां क्षात्रधर्म ऐका. ‘जयास जिवाचें वाटे भय । तेणें क्षात्रधर्म करूं नये । कांहीं तरी करूनि उपाये । पोट भरावें ।’ क्षत्रिय तोच कीं जो निर्भय आहे. रणांगणांतून पळून येणें हें नरकद्वार आहे, लौकिकालाही लाजिरवाणें आहे. ‘मारितां मारितां मरावें’ म्हणजे क्षत्रियाला सद्‌गति मिळते. बरें. तो यशस्वी होऊन आला तर ‘भोगावें महद्‌भाग्य !’ भांड्याचा गलोला (तोफेचा गोळा) गवताच्या गंजींत जसा निर्भयपणें शिरतो तसें क्षत्रियानें परसैन्यांत शिरावें. ‘अवघेंचि उठतां’ शत्रूची काय विशाद आहे ? मर्दानें तकवा सोडूं नये कीं तो विजयी होतो. ‘देवमात्र उच्छेदिला । आपला स्वधर्म बुडविला’ ही ईर्षा बाळगून खणखणाटें युद्ध करावें.

·

मराठा तितुका मेळवावा । आपुला महाराष्ट्रधर्म वाढवावा ।
येविषयीं न करितां तकवा । पूर्वज हांसती ॥ १० ॥
मरणहाक तों चुकेना । देह वांचवितां वांचेना ।

म्हणून धर्मस्थापनेसाठीं अवघा हलकल्होळ करून शत्रूंस नामोहरम करावें ‘देवद्रोही’ मारून परतवावेत व ‘देवदास पावती फत्ते । यदर्थी संशय नाहीं ।’ ही दृढनिष्ठा ठेवावी. ‘विवेक विचार सावधपणें । दीर्घ प्रेत्न केलाचि करणें’ हें सर्व क्षत्रियांस सांगणें आहे. सेवकधर्मांत सेवकांनीं स्वार्थबुद्धी सोडून श्रेष्ठांच्या मनोगतें चालावें हें मुख्यत: सांगितलें आहे. जे सेवक विश्वास दाखवून वैऱ्याला मिळतात त्या चांडाळांना कोणतीच गति नाहीं (१३) तेराव्या छोट्या प्रकरणांत ‘सावधपणाचा’ इशारा दिला आहे. धुरेनें मुख्य प्रसंग चुकूं नये, अरिमित्रांची चाळणा करावी, निष्कपट कोण व कपटी कोण हे शोधावे, कोणाचा विश्वास धरूं नये, उपाधीस कंटाळूं नये, आपलें

मन रोधावें व परांतर शोधावें आणि अत्यंत सावध असावें. ‘ईशारतीचें बोलतां नये। बोलायाचें लिहो नयें। लिहायाचें सांगों नये। जवावीनें’ हें लक्ष्यांत ठेवावें.

अफझुलखानासारखें धेंड प्रतापगडाच्या पायथ्याशीं उलथून पाडून यशस्वी झाल्यावर शिवराय समर्थांच्या दर्शनास आलेल्या वेळीं त्यांनीं शिवप्रशस्तीपर जे उद्गार काढले ते (१४) **चौदाव्या प्रकरणांत** दिले आहेत. विवेकविचारें व राजकारणें अंतर शृंगारावें हें पुरुषास उचित असून तोंडाळ,हेकट, कटुभाषी, वृथाडौली, नीतिबाह्य वागणारे बेइमानी लोक राक्षस होत. त्यांचा प्रतिकार करणें अवश्य. अशा दुष्ट संहारकर्मांत गुंतल्यावेळीं नित्यनेम चालणें शक्य नसतें व कर्त्या पुरुषानें हट-निग्रहांत पडून कार्यहानी करणें योग्यही नव्हे. ईश्वरानें, विशेषत: तुळजा-भवानीनें, तुमचा अभिमान धरिला आहे, तथापि विचारानेंच चालावें हें उत्तम होय. तुम्ही अखंड सावधानच आहांत, तुम्हांला काय सांगायचें आहे म्हणा ? पण दूरदर्शीपणानें वागलें पाहिजे. आपल्या लोकांचा अभिमान ठेवावा म्हणजे ते निश्चळ मनानें चिकटून राहतात.

म्लेंच्छ दुर्जन उदंड। बहुतां दिवसांचें माजलें बंड।
याकारणें अखंड। सावधान असावें ॥ ९ ॥

(स्वजनांच्या अभ्युदयार्थ व धर्मसंरक्षणार्थ शिवाजी महाराज स्वराज्याचा उद्योग करीत होते; त्याबद्दल समर्थांचा पाठराखेपणा पूर्ण असून परकीय यवनी सत्तेलाच त्यांनीं ‘बंड’ म्हटलें आहे हें लक्ष्यांत ठेवलें पाहिजे.) येथून पुढील ९।१० ओव्यांत समर्थांनीं शिवरायाच्या अंगच्या गुणाचें गौरव केलें असून हे गुण ‘देणें ईश्वराचें’ आहे, त्याबद्दल आपल्या ‘राजसाला अहंकाराचा वारा’ लागूं नये अशी समर्थांची प्रेमळता येथें दिसत आहे. शिवरायांचें गुणगौरव स्वकीय व परकीय अशा अनेक शहाण्यांनीं केलें आहे; पण समर्थांच्या गौरववाणीची योग्यता कांहीं अलौकिक आहे ! ते म्हणतात, ईश्वरानें ज्याचा अंगिकार केला त्या पुरुषाची थोरवी कोणास कळणार आहे ? न्यायनीति-विवेकविचार पाहणें, नानाप्रसगानुसार वागणें, परांतरपरीक्षा करणें, सावधपणें महायत्न करणें, समयीं धारिष्ट धरून अद्भुत कार्य करणें, यशकीर्तिप्रतापमहिमा लोकोत्तर असणें, अनेक लोको-त्तर उत्तम गुण अंगीं असणें, देव ब्राह्मणांचा अभिमान बाळगणें, विचारांचा मान राखणें, अनेकांस आधार होणें, सदा परोपकाररत असणें, इहलोक परलोकीचा विचार अखंड सावधपणें पाहणें, बहुतांचें सोसणें,

देवाचा कैपक्ष घेणें । ब्राह्मणाची चिंता वाहणें ।
बहुत जनांसी पाळणें ।

इत्यादि अनेक दिव्य गुणाचा पुतळा अशा या शिवरायाला हे गुण म्हणजे ' देवाचें देणें ' आहे. कोणालाहि हे अभ्यासानें व प्रयत्नानें अंगीं आणतां येण्यासारखे नसून धर्मस्थापना करणाऱ्या अवतारी पुरुषाच्याच अंगीं आढळणारे हे थोर गुण आहेत.

धर्मस्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार ।
जाले, आहेत, पुढें होणार । देणें ईश्वराचें ।। १० ।।

' उत्तम गुणांचा ग्राहक, तीक्ष्ण तर्क, सूक्ष्म विवेक, धर्मवासना, पुण्यश्लोक ' असा माझा शिवराय आहे असा समर्थांनीं आपल्या सच्छिष्याचा गौरव १८ व्या ओवींत केला आहे.

(१५) समर्थांनीं तुळजाभवानीचीं जीं ५।६ स्तोत्रें केलीं आहेत त्यांचा परामर्ष **पंधराव्या प्रकरणांत** घेतला आहे. श्रीसमर्थांची तशीच श्रीशिवरायाची कुलस्वामिनी तुळजापूरची भवानी ही होय. पहिल्या स्तोत्रांत हिलाच ' रामवरदायिनी ' कां म्हटलें आहे याबद्दलची कथा दिली आहे. रामलक्ष्मण हे सीतेचा शोध शोध करीत वनांत फिरत असतां त्यांनीं रूपलावण्यसंपन्न एक कुमारी पाहिली. न्यायनीतिप्रवर्तक व धर्मसंस्थापक ते सूर्यवंशीचे पुण्यश्लोक राजे ! त्यांनीं ' कोण तूं काई ? ' म्हणून तिला प्रश्न विचारला व तिनें ' मीच तूं काई ! ' असा त्यांना जाब दिला, व ' मनाच्या कामना होती । सीताशुद्धी करा तुम्ही ' असा वर दिला. तिच्या वरामुळें शक्तिसंपन्न होऊन रामानें सीताशोध केला, रावणास मारिलें व देवांना बंदीपासून सोडविलें. अशी ही रामवरदायिनी माता हीच तुळजापूरची भवानी होय. (सप्तशतीग्रंथांत राज्यभ्रष्ट व आपद्ग्रस्त राजांना शक्ति देऊन पुन्हा त्यांना राज्यप्राप्ती करून देणाऱ्या भवानीच्या अशा आणखी कथा दिल्या आहेत.) तुळजापूर मानेना म्हणून ती प्रतापगडावर जाऊन राहिली. (प्रतापगडचा किल्ला मोरोपंत पिंगळे—शिवरायांचे पेशवे यांनीं शके १५७८ मध्यें घेतला व किल्ल्यावर श्रीसमर्थांच्या आज्ञेवरून शके १५८३ मध्यें देवीची स्थापना झाली.) तुळजापुरची भवानी किंवा प्रतापगडची देवी ही मूळमाया., आदिशक्ति होय. दुसऱ्या स्तोत्रांत शक्तीचें सुंदर व यथार्थ वर्णन केलें आहे. ' शक्तीनें पावती सुखें ' ' सार संसार शक्तीनें, ' ' शक्त तो सर्वही भोगी, ' ' शक्तीनें युक्ति होतसे, ' ' शक्तीनें मिळती राज्यें ' ' कोण पुसे अशक्ताला ' इ. तेजस्वी सिद्धांत कोण अमान्य करूं शकेल ? ' शक्ति युक्ति जये ठायीं ।

तेथें श्रीमंत धावती ' याचाच अर्थ धनुर्धर पार्थ व योगेश्वर कृष्ण जेथें एकत्र झाले आहेत तेथें ' श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिः ' हे सर्व नांदतात हा होय. हें दुसरें स्तोत्र फार व्यापक व रम्य आहे. ही भवानी देवी भक्तांस पाळिती व दुष्टकाळ अशी आहे. ही विश्वमाता आदिशक्ति होय. समर्थ म्हणतात–हिनें आमच्या कामना परोपरीनें पूर्ण केल्या आहेत, हिच्या कृपेनें मोठें घवाड साधलें आहे. पांचवें स्तोत्रही दुसऱ्या स्तोत्रासारखेंच बहारीचें आहे. श्रेष्ठांनीं समर्थांच्या बाळपणीं नवस केला होता, तो फेडण्यासाठीं समर्थ भवानीच्या दर्शनास गेले त्या वेळीं हें स्तोत्र केलें आहे. यांत मला वैराग्य दिलें, महंत म्हणून नवाजिलों, संसारीं मोकळे केलें, आनंदीं ठाव दीधला, सर्व इच्छा परोपरीनें पूर्ण केल्या, पराधीनता जाऊन ' सत्ता उदंड चालली, ' हें सर्व जगदंबेच्या कृपेनें झालें असें म्हणून समर्थांनीं तिजजवळ ' एकचि मागणें ' मागितलें आहे. तें हें कीं ' तुझाचि वाढवी राजा । शीघ्र आम्हांचि देखतां ! ' म्ह० आमच्या डोळ्यांदेखत 'तुझाचि राजा ' म्ह० तूं कृपेनें पदरांत घेतलेला आमचा हा शिवराजा वाढीव–याचें ऐश्वर्य, भाग्य व सत्ता सर्वत्र पसरूं दे ! ( धन्य हे गुरु व धन्य हे शिष्य ! भवानीदेवीच्या प्रसादानें मिळालेल्या तलवारीला ' भवानी तलवार ' हें नामाभिधान मिळालें हें योग्यच आहे, उपासनेचें प्रेम व यश अतुल आहे )

(१६) **सोळाव्या प्रकरणांत** ' गयाळ राजा व खबरदार राजा ' यांचें तारतम्यानें वर्णन करून लोकाना उभयतांची ओळख करून दिली आहे. बहुतेक अर्वाचीन राजाना पहिलें वर्णन लागू पडणारें आहे. लोकांच्या म्ह० भोंवतालच्या लोकांच्या, आवडत्या अधिकाऱ्यांच्या, सांगणीनें चालतो; स्वतःची बुद्धि चालवीत नाहीं; हिशेबीपणा नाहीं, न्यायनीति नाहीं, लांच-चोरी बहुत आहे, असा ' म्हैसमंगळ ' राजा असला म्हणजे ' कारभारीच नासती ' व मग ' भाग्य जातें निघोनियां ' हा परिणाम ठेवलेलाच. खबर-दार राजाची गोष्ट याहून वेगळी आहे. तो विवेकी, साक्षेपी, सौख्यकारी असतो, तो सर्वांची चिंता वाहतो. आणखी एक––

पोराला माय जाणेना । तें पोरें वांचती कशीं ? ।
गुराखा राखतो गुरें । धनी दोहींस पाळितो ॥ १५ ॥

आई जर पोरांचे मनोभाव जाणून वागत नसली तर तीं पोरें कशीं वांचावींत ? तसेंच राजाला जर प्रजेशीं मिसळून त्यांच्यांत ऐक्यप्रेमानें वागतां येत नसेल तर प्रजेचा उत्कर्ष कसा होईल ? गुराखी गुरांना राखतो

पण धणी गुरें व गुराखी दोन्ही राखतो, तसें राजाचे अधिकारी प्रजेला पाळतात व राजा दोघांसही संभाळतो. धण्याचें गुरांवर तसेंच गुराख्यांवर पूर्ण लक्ष पाहिजे. तसें नसेल तर गुरें गुराख्यांना जुमानणार नाहींत किंवा गुराखी गुरांना करड्या नजरेनें व क्रूरपणानें वागवील! तात्पर्य, प्रजा, अधिकारीवर्ग व राजा या तिघांचें पूर्ण ऐक्य पाहिजे, तरच सुराज्याचा म्ह. रामराज्याचा आनंद सर्वत्र पिकणार आहे.

(१७) समर्थांचा व शिवाजीमहाराजांचा गुरुशिष्यसंबंध किती जिव्हाळ्याचा होता व राज्यसाधनाच्या जवळजवळ कसा प्रारंभापासून होता हें महाराजांच्या प्रस्तुत पत्रावरून स्पष्ट होतें. 'श्रीसद्गुरुवर्य श्रीसकलतीर्थरूप श्रीकैवल्यधाम' समर्थस्वामींना 'चरणरज शिवाजी राजे' यांनीं हें पत्र लिहिलें आहे. समर्थांनीं शिवरायाला सनाथ करून (अनुग्रह देऊन) आज्ञा केली कीं 'तुमचा म्ह. क्षत्रियांचा मुख्य धर्म राज्यसाधन करून धर्मस्थापना, देवब्राह्मणसेवा व प्रजापालन ह्या तीन गोष्टी करणें हा होय. हें व्रत करून तुम्ही त्यांत परमार्थ करावा' व असा उपदेश करून 'तुम्ही जें मनीं धराल तें श्री सिद्धीस पाववील' असा समर्थांनीं शिवबांस आशिर्वाद दिला त्याजवरून (शिवबा म्हणतात) कीं 'मी जो जो उद्योग केला म्ह. दुष्टांचा नाश करून विपुल द्रव्य मिळविलें व राज्यपरंपरा अक्षयी चालेल अशीं दुर्घट स्थळें (कोट, किल्ले वगैरे) बांधलीं तें सर्व स्वामींच्या आशीर्वादप्रतापें साधून मनोरथ पूर्ण झाले!' (म्हणजे राज्यसाधनाच्या पूर्वीं किंवा प्रारंभीं समर्थांचा शिवबावर अनुग्रह झाला होता हें उघड आहे.) आतां याउपरी संपादिलेलें सर्व राज्य श्रीगुरुचरणी अर्पण करून सर्व काळ गुरुसेवेंत घालवावा असा विचार मनांत आणला; परंतु समर्थांनीं शिवबांस आज्ञा केली कीं 'तुम्हांस पूर्वीं धर्म सांगितले तेच करावे. तीच सेवा होय!' यावरून कोठें तरी समर्थांचा निकट वास घडावा म्हणजे निदान वारंवार गुरुदर्शन तरी होईल व यासाठीं समर्थांनीं जवळपास श्रीरामस्थापना करून सांप्रदाय दिगंत वाढवावा अशी महाराजांनीं समर्थांची प्रार्थना केली. ती ऐकून (तेंही) समर्थांनीं स्वतः गिरिकंदरी वास करून चाफळीं श्रीरामाची स्थापना केली व सांप्रदाय दिगंत वाढविला. त्यास चाफळीं श्रीची पूजाअर्चामहोत्सव यथासांग चालावा व मारुतीची जेथें जेथें स्थापना झाली होती तेथें तेथें पूजाउत्सवासाठीं ग्रामभूमि वगैरे उत्पन्न करून द्यावें अशी महाराजांनीं समर्थांजवळ गोष्ट काढली, तेव्हां समर्थांनीं सांगितलें कीं विशेष उपाधीचें कारण नाहीं; पण श्रीची सेवा करण्याचा तुमचा निश्चयच आहे तर सांप्रदायाचा, राज्याचा व वंशाचा विस्तार होईल

तसतशा नेमणुका वगैरे करीत जा. **यावरून** श्रीच्या पूजामहोत्सवासाठीं ग्रामभूमीचीं पत्रें महाराजांनीं पाठविलीं व चाफळच्या श्रीरामासाठीं १२१ गांव सर्वमान्य व १२१ गांवीं ११ बिघेप्रमाणें भूमि व ११ गांवीं श्रीमारुतीकडे ११ बिघेप्रमाणें भूमि नेमण्याचा आपला संकल्प समर्थांस कळवून समर्थांनीं आज्ञा घेतली. त्यावरून शके १६०० मध्यें पत्रलेखनसमयीं **सांप्रत** (तूर्त) ३३ गांव ४१९ बिघे भूमि, एक कुरण व १२१ खंडी धान्य नेमण्यांत आलें व उत्सवप्रसंगीं नक्त व धान्य समयाचे समयास पाठवीत जाईन असें अभिवचन देऊन उत्सवादि अक्षयीं चालविण्याविषयीं समर्थांची आज्ञा मागितली. असें हें बहुमोल पत्र आहे. (शके १५७० स चाफळास श्रीची स्थापना झाल्याचें हनुमंतस्वामी लिहितात. शके १५८० च्या पूर्वीं ती झाली याबद्दल प्रमाणें आहेत. तेव्हां समर्थांचा महाराजांवर अनुग्रह तत्पूर्वीं झाला हें सिद्ध आहे.)

**अठरावें प्रकरण** आनंदभुवन ' हें आहे. ( यांत शिवरायाच्या राज्याभिषेकानंतर महाराष्ट्र सुखसंपन्न झाला, त्याचें गोड वर्णन आहे. हें महाराष्ट्राचें राष्ट्रीय गीत आहे. महाराष्ट्र महोदयाचें महत्कार्य घडवून आणणाऱ्या महापुरुषाच्या मुखांतून तें निघालें आहे. पहिल्या प्रकरणांत महाराष्ट्राच्या दुःस्थितीचें चित्र जसें दिसतें तसें या अठराव्या प्रकरणांत ती दुःस्थिति संपून सुखाचे दिवस आल्यानंतरचा पूर्ण संतोष व्यक्त होत आहे. ' आनंदवनभुवन ' हें नांव समर्थांनीं शिवरायाच्या महाराष्ट्राला दिलें आहे. शिवरायाच्या अंमलाखालीं आलेल्या महाराष्ट्राच्या सीमेबाहेरच्या लोकांस उद्देशून ते प्रथमच सांगतात कीं ) ' एकवार आमच्या आनंदभुवनांत जाऊन तर पहा. जन्मापासून मरेपर्यंत संसारदुःखें मागें लागलींच आहेत. प्रपंचाचे कष्ट ज्याचे त्यालाच माहीत असतात, पण आपल्या सर्व अडचणी दूर सारून एकवार आनंदभुवनांत जाऊन तर पहा ! तेथें कसा आनंद दुमदुमून राहिला आहे ! प्रेमानें जा अगर उदासीनपणानें जा, पण तेथें एकदां जा. संसारकष्ट भोगून त्रासले असाल तर ' आम्हांस येथेंच पुन्हा जन्मास घाल ' असें तुम्हीच देवाला विनवाल ! अहो ! या आनंदवनभुवनांत काय काय मौजा माजून राहिल्या आहेत पहा ! रामरायाचा वेध लागून लोकाचें चित्त रामरूपीं लीन झालें आहे, रामराज्याचा सुखानुभव लोक घेत आहेत ! येथें लोकांस बहुत अपाय आजवर होत होते; पण ' उपाय धाडिले देवें ' म्हणून आज सारा आनंद येथें पिकून राहिला आहे. पंचवटीच्या तपोवनांत तीस वर्षांमागें (शके १५६६) मी स्वप्नांत जें जें पाहिलें होतें तें तें आज

( शके १५९६ ) तसेंच घडत आहे. आमचें मागचें सुखस्वप्न आज खरें झालें आहे! मी हिंडत हिंडत पुणें साताऱ्याकडे गेलों तों स्वप्न खरें होणार अशी साक्ष तिकडे पटली. किती चळवळी (कल्लोळ) तिकडे सुरू झाल्या. समाधान वाटून या चळवळी सर्व यशस्वी होवोत अशी मी विघ्ननाशक देवाची प्रार्थना केली. स्वधर्माआड जीं जीं विघ्नें येत होतीं तीं तीं सारीं दूर पळालीं (उठिलीं), 'लाटिलीं कुटिलीं देवें। दापिलीं कापिलीं बहु' सर्व विघ्नांचा रामरायानें निःपात केला. विघ्नें एकदोन नव्हतीं, तर विघ्नांच्या फौजा उठल्या होत्या; पण आमच्या बलभीमानें त्यांचा पार धुव्वा उडवून दिला–'घर्डिलीं चिर्डिलीं रागें। रडविलीं वडविलीं बळें.' प्रथम हाक बोंब फार झाली, पुढें खत्तल मांडिलें–संहारास प्रारंभ झाला. देवाचे लोक खवळले, मुख्य देवच शस्त्रास्त्रें घेऊन उठला, काय होत आहे हें न कळून लोक आश्चर्यचकित झाले. स्वर्गंगाच कैलासाहून लोटली व रामगंगा प्रगट झाली व अनंतानंत तीर्थें उत्पन्न झालीं (रामप्रेरणा अनेकांस होऊन ते मूर्तिमंत तीर्थरूप झाले, तीर्थतुल्य पुण्यशील आत्मे प्रगट झाले.) त्रैलोक्यभर देवाच्या फौजा सुटल्या, पटापट परतंत्रतेचे बंद सुटून लोक सुखस्वरूप झाले. फार मोठी मोहीम सुरू झाली. अनेक देव प्रगट झाले, देवांची गर्दी उसळली, देवदासांची फत्ते झाली. ज्यानें मागें रासभें (गाढवें) राखिलीं तो विघ्नहर्ता गणेश आपले गण घेऊन लोकसाह्यार्थ आला (रामावतारापूर्वी देवांना बंदींत घालून रावणानें देवांचा छळ मांडला होता त्या वेळीं 'गणेश गाढवें वळी' गणेशावर गाढवें वळण्याचा प्रसंग आला होता आणि बुद्धिदाता गणेश जडमूढ. जीवांना बुद्धि देऊन स्वरूपाची ओळख करून देत असतो हें यथार्थच आहे!) अनेक सुस्वर वाद्यें वाजूं लागलीं, नाना ध्वनीचे कल्लोळ उठले, छबिने ढाला चालू लागल्या. विजयादशमीच्या सुमुहूर्तानें मराठ्यांच्या सर्व फौजा सशस्त्र बाहेर पडतात तेव्हां शत्रूंवर अनेक अनर्थ कोसळतात. कल्पांतासारखा समय प्राप्त झाला, म्लेंच्छदैत्य ( रावण ) बुडविण्यासाठीं देवांनीं महाराष्ट्रीय लोकांचा कैवार घेतला.

बुडाले सर्वही पापी। हिंदुस्थान बळावलें।
अभक्तांचा क्षयो जाला। आनंदवनभुवनीं ॥ १९ ॥
बुडाला औरंग्या पापी। म्लेंछसंहार जाहला।
मोडिलीं मांडिलीं क्षेत्रें। आनंदवनभुवनीं ॥ २१ ॥

रामरायांनीं मारुतीच जनसाह्यार्थ धाडले तेव्हां त्यांच्या पुच्छाप्रमाणें 'वैभवें धांव घेतली,' महाराष्ट्रराज्य जिकडे तिकडे पसरूं लागलें 'येथून

वाढला धर्मु । रमाधर्म समागमें ’-येथून धर्मसंस्थापनेचें कार्य सुरू झालें–रमा व धर्म म्ह. लक्ष्मी व धर्म–अभ्युदय व निःश्रेयस–ऐहिक संपत्ति व पारलौकिक ऐश्वर्य (यतोऽभ्युदयनिःश्रेयससिद्धिः स धर्मः’ या आचार्यांनीं केलेल्या धर्म शब्दाच्या व्याख्येप्रमाणें) दोहींचा उत्कर्ष झाला, स्वराज्य व स्वधर्म दोनही एकत्र नांदू लागले व लोकांस फार मोठा सुखसंतोष वाटू लागला. ‘बुडाले भेदवाही ते । नष्ट चांडाळ पातकी.’ चंद्रराव मोऱ्यांसारखे आत्मघातकी फितुर लोकही सारे नाहींसे झाले आहेत, किंवा द्वैतभाव (आपलेतुपलेपणाचा दुजाभाव) वाढविणारे दैत्य सारे नामोहरम झाले आहेत. तात्पर्य, हे सारे देवद्रोही लोक–

गळाले पळाले मेले । झाले देशधडी पुढें ।
निर्मळ जाहली पृथ्वी । आनंदवनभुवनीं ॥ २ ॥

याप्रमाणें स्वधर्माविरुद्ध सर्व विघ्नें दूर झाल्यामुळें आम्हांसारख्या ब्राह्मणांना

उदंड जाहलें पाणी । स्नानसंध्या करावया ।
जपतप अनुष्ठानें । आनंदवनभुवनीं ॥२५॥

आतां तपें, पुरश्चरणें, अनुष्ठानें, स्नानसंध्यादि धर्मकर्म करायला मोकळीक झाली, ब्राह्मणांचा धर्ममार्ग मोकळा झाला, ब्राह्मण्य रक्षिलें गेलें.

लिहिला प्रत्ययो आला । मोठा आनंद जाहला ।
चढता वाढता प्रेमा । आनंदवनभुवनीं ॥ २० ॥

‘ धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे । ’ असें जें भगवंतांनीं गीतेंत वचन दिलें आहे त्याचा प्रत्यय आल्यामुळें मोठें समाधान वाटत आहे.

रामवरदायिनी माता । गर्द घेऊनि उठिली ।
मर्दिले पूर्वीचे पापी । आनंदवनभुवनीं ॥ २९ ॥

प्रत्यक्ष चालिली राया । मूळमाया समागमें ।
नष्ट चांडाळ ते खाया । आनंदवनभुवनीं ॥ ३० ॥

भक्तांसी रक्षिलें मार्गें । आतांही रक्षिते पहा ।
भक्तांसी दिधलें सर्वं । आनंदवभुवनीं ॥ ३१ ॥

रामवरदायिनी भवानी माताच गर्द घेऊन उठली आहे, तेथें काय कमी आहे? ही मूळमाया जगदंबा प्रत्यक्ष रायासमागमें (शिवरायाबरोबर)

चालली आहे, त्याच्या देहांत ती नांदत आहे, त्याच्या द्वारें ती नष्टचांडाळ-संहाराचें व भक्तरक्षणाचें कार्य प्रत्यक्ष करीत आहे. तिनें आपल्या भक्तांना सर्व कांहीं दिलें आहे. आतां महाराष्ट्रांत ' आरोग्य जाहली काया । वैभवें सांडिलीं सीमा ' हा अनुभव येत आहे. देव, भक्त व जीव सर्व एक झाले आहेत. वेदशास्त्राध्ययन, पुराणें, धर्मचर्चा, जुन्या कवितेचा जीर्णोद्धार व नूतनकवित्व, संगीतवादनकला, सर्वांचा आनंदवनांत उत्कर्ष होत असून सर्व कला व विद्या उर्जितावस्थेस येत आहेत. याप्रमाणें ' रामराज्य भूमंडळीं ' पुन्हा झालें आहे.

शेवटच्या म्हणजे (१९) **एकोणिसाव्या प्रकरणांत** शिवकैलासवासानंतर संभाजीराजांना समर्थांनीं जें उपदेशपर पत्र पाठविलें तें दिलें आहे. त्यांत संभाजीच्या दुष्कृत्यांची प्रत्यक्ष निंदा न करितां शिवरायाचा उत्कृष्ट कित्ता गिरवण्यास ' त्याहून विशेष ' करण्यास त्यांनी संभाजीस सांगितलें आहे. पत्र अत्यंत मुत्सद्दीपणाचें पण सरळभावाचें असून संभाजीच्या निमित्तानें त्यांत समर्थांनीं महाराष्ट्रीयांस निरंतर प्रोत्साहन मिळेल असाच सुंदर बोध केला आहे :– दुश्चितपणा टाकून एकांतीं तजविजा करीत बसावें, कार्याकार्य-विचारणा करावी, कांहीं उग्रता सोडावी व कांहीं सौम्यता धरावी, स्वजनांची चिंता करावी, त्यांच्या कल्याणाच्या मार्गाचें चिंतन करावें, कारभाऱ्यांचे अपराध क्षमा करावे व त्यांना सुखी करून कामाकडे लावावें. पाणवठ्यावरचे तुंब जर मोकळे केले नाहींत तर पाणी चालत नाहीं, पाट फोडल्याशिवाय प्रवाह चालू होत नाहींत. त्याप्रमाणें मुत्सद्दी व कर्ते पुरुष जर ठिकठिकाणीं डांबून राहिले तर राज्याला हितकर नाहीं, ते कामांतच गुंतवले पाहिजेत. लोक राजी करून राज्य करावें आपापसांत भांडूं नये. आपलें हंसें व तिसऱ्याचा लाभ !

श्रेष्ठीं जें जे मेळविलें । त्यासाठी भांडत बैसले ।
मग जाणावें फावलें । गलिमांसी ॥ ६ ॥

सकळ लोक एक करावें । गलीम निवटून काढावे ।
ऐसें करितां कीर्ति धांवे । दिगंतरीं ॥ ७ ॥

आधीं गाजवावे तडाखे । मग भूमंडळ धाके ।
ऐसें न करितां धक्के । राज्यास होती ॥ १० ॥

बहुत लोक मिळवावे । एक विचारें भरावें ।
कष्ट करोन घसरावें । म्लेंच्छांवरी ॥ १३ ॥

आहे तितुकें जतन करावें। पुढें आणीक मिळवावें।
महाराष्ट्रराज्य करावें। जिकडे तिकडे ॥ १४ ॥

हा सुंदर तेजस्वी वाणीचा उपदेश संभाजीस पचला नाहीं, हा भाग निराळा.

शिवराजास आठवावें। जीवित्व तृणवत् मानावें।
इहपरलोकीं रहावें। कीर्तिरूपें ॥ १६ ॥

शिवराजाचें आठवावें रूप। शिवराजाचा आठवावा प्रताप।
शिवराजाचा आठवावा साक्षेप। भूमंडळीं ॥ १७ ॥

सकळ सुखांचा त्याग करून राज्यसाधनाचा योग साधावा, शिवराजाचें चरित्र आठवावें व 'त्याहूनि करावें विशेष। तरीच म्हणावें पुरुष' पण हा सदुपदेश संभाजीनें मनावर ठसवून घेतला नाहीं.

---

## (२) राजकारणविचार—लोकसंग्रही कार्यकर्ते

(१) **समर्थसंप्रदायाचीं लक्षणें व नियम** :—(१) लिहिणें (२) वाचणें (३) अर्थांतर सांगणें (४) आशंकानिवृत्ति म्ह० शंकासमाधान करणें (५) प्रचीति (६) गाणें (७) नाचणें (८) टाळी वाजविणें (९) अर्थभेद (१०) प्रबंध (११) प्रबोध (१२) वैराग्य (१३) विवेक (१४) लोकराजी राखणें (१५) राजकारण (१६) अव्यग्रता (१७) प्रसंग म्ह० देशकालवर्तमान जाणणें (१८) उदासीनता म्ह० अलिप्तता (१९) समानता म्ह० ज्याचें त्यापरी समाधान राखणें व (२०) रामउपासना म्ह० रामभक्तिरंगानें लोकास वेध लावणें; भक्तिसहीत अध्यात्म साधणें. श्रीसमर्थांनीं हीं २० लक्षणें आपल्या सांप्रदायिकांच्या ठिकाणीं अवश्य पाहिजेत म्हणून येथें सांगितलें आहे. (यांतील लेखनवाचनअर्थांतर याच्या स्पष्टीकरणार्थ १९ व्या दशकाचे पहिले दोन समास पहा. प्रचीति म्ह० स्वानुभव. याचें स्पष्टीकरण द. १० स. ८ व द. १३ स. ७ मध्यें पहा.) प्रबंध म्ह० काव्यरचना, लोकानुग्रहार्थ वा भगवत्प्रसादार्थं केलेली काव्यादि रचना. धीट, पाठ, प्रासादिक असे कवितेचे तीन प्रकार (द. १४ स. ३) आहेत. त्यापैकीं प्रासादिक कविताच प्रशस्त होय. कवित्वरचना व प्रबोधशक्ति म्ह० दुसऱ्याच्या हृदयांत बोध उतरविण्याची शक्ति हे मुख्य गण उपदेशकाच्या अंगी पाहिजेत. त्याच्या

अनुक्रम ......१५७....... विः ........ क्रमांक ................ नों दि: ..........


साधनार्थच पहिलीं अकरा लक्षणें सांगितलीं आहेत. उत्तम लिहितां वाचतां येणें, अर्थांतर व अर्थभेद म्ह० वेगवेगळे अर्थ सांगतां येणें, गायनवादननर्तन, प्रबंध म्ह० कवित्वशक्ति व प्रबोध म्ह० परिणामकारक व्याख्यान करण्याची शक्ति हे गुण प्रथम अंगीं आणल्याशिवाय समर्थसंप्रदायांत उपदेशक होण्याचा अधिकार कोणासच नसे. पण हें केवळ बहिरंगशिक्षण झालें. एवढयानेंच कार्यभाग होत नाहीं. विवेकवैराग्याचा अंतरंगअभ्यासही पाहिजे. त्यावांचून वरील गुण केवळ पोटविद्येच्याही उपयोगी पडतील. ( विवेकवैराग्याचें विवरण द. १२ स. ४ मध्यें पाहावें. विवेकही पाहिजे आणि वैराग्यही पाहिजे. 'विवेकें अतरीं सुटला । वैराग्यें प्रपंच तुटला । अंतर्बाह्य मोकळा जाला । निःसंग योगी ।। ' या ओवींत विवेकवैराग्य व उदासीनता यांचें थोडक्यांत दिग्दर्शन केलें आहे. ) हे बहिरंग व अंतरंगगुण अंगीं बाणले म्हणजे उपदेशकाचा अधिकार प्राप्त झाला. अशा पुरुषाला मग ' राजकारण ' करायला हरकत नाहीं. देशकालप्रसंग जाणणें, अव्यग्रता, समानता व लोक राजी राखणें म्ह० लोकसंग्रह हे चार थोर गुण मात्र त्याच्या अंगीं पाहिजेत. या सर्व गुणांचा कळस म्हणजे उत्कट रामोपासना. 'वेध लावी जना भक्तिरंगें' अशी त्याची निष्काम रामभक्ति उत्कट पाहिजे. प्रचीति म्ह० स्वानुभव. त्यावांचून त्याचा लोकांवर परिणामच व्हायचा नाहीं. सांप्रदायिकानें ' आचार राखणें आधीं । स्नानसंध्या पवित्रता ' हें सांभाळलेंच पाहिजे. ( २१ ) आचार. (२२) न्यायनीति राखणें (२३) नित्य भिक्षामिषानें प्रेमळ भक्त धुंडीत फिरणें ( २४ ) सावधपण व ( २५ ) साक्षेप म्ह० निरलसपणें सततोद्योग करणें. ह्या पंचवीसही लक्षणांचा समावेश **प्रचीति, प्रबोध व प्रयत्न** ह्या तीन शब्दांत होतो व या लक्षणांचा उपयोग जनतेस करून देणें म्ह० हरिकथानिरूपण व राजकारण हीं दोन्हीं कार्यें अचूक करणें हा समर्थसंप्रदायाचा उद्देश आहे. ह्या गुणांचा समाजांत प्रसार व्हावा व राष्ट्राचा प्रपंच उत्तम प्रकारें सावरावा अशा हेतूनें समर्थांनीं आपला संप्रदाय उभा केला.

याच गुणांचें अधिक स्पष्टीकरण पुढील वेच्यांतून होणार आहे. हे गुण ज्याच्या अंगीं आहेत तो महंत. महंती सोपी नाहीं. (२) **महंती सुळावरील पोळी** आहे. लोक नानाविकारी आहेत, अन्यायानें वागतात, दुःख भोगतात, हितबोध केला तरी ऐकत नाहींत, उद्धटपणानें वागतात, त्यांच्या संगतीनें शीण होतो. ' लोक मोठा अनावरू ' आहे; तथापि त्यांच्या कल्याणार्थ महंतानें हें सर्व सोसलें पाहिजे. समर्थांचा हा अनुभवच आहे.

समर्थांनीं संप्रदायिक उभे केले; पण त्यांच्या पोटापाण्याचा प्रश्न कसा सोडविला ? फंड उभारावेत तर पैशाच्या लोभानें ' फंडगुंड ' निर्माण

होऊन संप्रदाय नासायचा ! ह्या नसत्या व्यापांत न पडतां त्यांनीं (३) **भिक्षा** ही कामधेनू शिष्यांच्या हातीं दिली ! लोकोद्धाराचें कार्य निर्लोभ पुरुषांच्या हातूनच होतें, तें रामकार्य अशा अशा बुद्धीनें करणारेच लोक पाहिजेत, 'पगारी व्हालंटिअरांचें' तें काम नव्हे ! भिक्षेनें स्वतंत्रता राहाते, लहानथोर परीक्षितां येतात, देशाटन होतें, निर्भयता वाढते, सत्पात्र शोधून काढतां येतात, ईश्वरप्राप्ती होते. आणखी काय पाहिजे ? निर्वाहासाठीं भिक्षा मागणें हें या संप्रदायाचें एक अंग आहे. भिक्षेचें ओझें लोकांवर पडूं नये, 'बहुत आणितां घ्यावें । मुष्टि येक' म्हणजे लोकही आवडीनें भिक्षा वाढतात.

यापुढें (४) **बोलघेवडे** आणि **कार्यकर्ते** अशीं दोन चित्रें या प्रकरणांत दाखविलीं आहेत. पहिला यशस्वी व दुसरा अपेशी होतो. 'यत्नाचा लोक भाग्याचा' 'हिंडतां शाहणें होतें' 'प्रसंगें वर्तता आलें' 'मनुष्य राखिलें राजी' 'मैत्रिकीं ही विटों नेदी' इ. कार्यकर्त्यांचीं लक्षणें आहेत.' कार्यकर्ता तो झांकेना । वेध लावी विश्वजना'–हें अगदीं खरें आहे. शाहणे उदंड कष्टतात, मनोगतसूत्रें जाणतात, माणूस तोडीत नाहींत, बहुत साहतात व कीर्तिरूपें उरतात. कार्य वेषानें साधत नाहीं, विवेकानें साधतें. आतां करंटे बोलतच राहतात, क्रिया करीत नाहींत. 'सांगोच जाणती सर्वें । कर्ता कोणी दिसेचिना' जाणतेनेणते बळेंच सांगत सुटतात, त्यांचे निश्चयही अनेकांचे अनेक असतात, त्या मता-मतांच्या गलबल्यानें लोकांचा बुद्धिभ्रंश होतो' 'करंटे मिळाले सर्वें । जो तो बुद्धीच सांगतो' पण आधीं आपणाला स्वतःला सांगावें, स्वतः बोलण्याप्रमाणें चालावें, तें कोणीच करीत नाहीं ! प्रत्ययानें बोलल्याशिवाय लोकांस पटत नाहीं व या करंट्यापाशीं शब्दज्ञान अमूप असतें; पण प्रत्यय तेवढाच नसतो ! असे करंटे मिळाले म्हणजे भांडणें होतात व श्रोतेवक्ते तमोगुणी होतात. बोलतां बोलतां कलहास पेटतात, आरडाओरडा करितात व मारामारीस उठतात. वक्ता नेणता असला म्हणजे सभा उधळतात; आग्रहनिग्रहविग्रह सर्व प्रगट होतात. हें सर्व जाणतेपणाच्या व प्रत्ययज्ञानाच्या अभावीं होतें. जेथें प्रत्ययज्ञान नाहीं तें करंटेपण.

(५) **कार्यकर्त्यांचीं उत्तम लक्षणें** सांगितलीं आहेत. तीं सर्व कार्यकर्त्यांनीं अवश्य ध्यानांत ठेवावींत. आपण जेऊन दुसऱ्यांस जेववितों तसें आपण ज्ञानानें संतृप्त होऊन तेंच ज्ञान इतरांस सांगावें. तरणाऱ्यानें बुडणाऱ्यास बुडूं देऊं नये. तात्पर्य 'शरीर परोपकारीं लावावें । बहुताच्या कार्यास यावें.' अडले-गांजले जाणावें. दुसऱ्याच्या दुःखानें दुःखी व सुखानें सुखी व्हावें. सौम्य भाषणानें प्राणिमात्रास मिळवून घ्यावें. क्षमारूपानें सर्वांचें सर्व सोसावें. कोणी

धिक्कारून बोललें तरी शांति अचळ असावी. 'दुर्जनांसी मिळोन जाती। धन्य ते साधु' अशा उत्तम गुणांनीं युक्त तोच पुरुष भूमंडळीं धन्य होय. "आपण स्वयें कष्टावें। बहुतांचें सोशीत जावें। झिजोन कीर्तीस उरवावें। नाना प्रकारें.' आपलें असो, पराचें असो, काम पुढें आलें कीं करीत जावें. कोणी बरें बोललें तर आपणांस सुख वाटतें, चिमटा घेतला तर जीव कासावीस होतो. म्हणून आत्मवत् इतर जीव मानावे. आपणावरून दुसऱ्याला राखीत जावें. दुसऱ्याला दुःख देणारी वैखरी अपवित्र होय.ती कधीं तरी आपला घात केल्याशिवाय राहणार नाहीं. पेरावें तें उगवतें, बोलावें तसें प्रत्युत्तर येतें, म्हणून मृदु बोलावें, कर्कश बोलूं नये. आपल्या पुरुषार्थवैभवानें बहुतांस सुखी करावें, कष्टी करणें ही राक्षसी क्रिया होय. दंभ, दर्प, अभिमान, क्रोध, पारुष्य (कठोरपणा) हें गीतेंत आसुरीसंपत्तीचें लक्षण म्हणून सांगितलें आहे. म्हणून या दुर्गुणांना शिवो नये. उत्तम गुणांच्या पुरुषाला लोक शोधीत येतात. क्रियेवीण शब्दज्ञानाला तुच्छ लेखतात. अंतरापासून भक्ति व उत्तम गुणांचें वर्तन (भक्ति व सदाचार) हें ज्यापाशीं आहे त्या महापुरुषाला लोक धुंडीत येतात. त्यानें समुदाय करावे व भक्तियोगानें देवाधिदेव प्रसन्न करावा. आपल्यामागें भक्तिमार्ग चालू रहावा, यासाठीं समुदाय करावा. 'हातोपातीं देव वोळे' अशा उत्कटभक्तीनें देवाचे उत्सव करावे. ज्याला समुदाय करायचा आहे म्हणजे शिष्यसंप्रदाय वाढवायचा आहे, त्यानें दोन गोष्टी लक्ष्यांत ठेवल्या पाहिजेत. एक उत्तम प्रबोधशक्तीनें लोकांचें मनोगत त्यानें हातीं घ्यावें व दुसरें,त्यानें बोलल्याप्रमाणें चाललें पाहिजे ! याप्रमाणें विवेकानें मानून मानत मानत शिकवावें. कोणास कांहींच न मागावें आणि भगवद्भजन वाढवावें; ब्राह्मणमंडळ्या मेळवाव्या, भक्तमंडळ्या मानाव्या व संतमंडळ्या शोधाव्या; मळमळित अवघेंच टाकून उत्कट भव्य घ्यावें, निस्पृहपणें व अलिप्तपणें आपणास राखावें; सज्जनांस निववावें व दुर्जनांस राखावें; समुदाय साधनाभ्यासाला लावावा, कोठेंही लालचींत न पडतां जनांस आपला वेध लावावा; भक्ति, ज्ञान, अनुष्ठान, चातुर्य सर्व कांहीं उत्कट असावें; विवेकांत सांपडत नाहीं असें कांहींच नाहीं म्हणून एकांतीं विवेक करावा; आत्मारामाला ओळखून सर्व कार्य करावें. एकांतीं अखंड तजविजा, चाळणा करावी; म्हणजे राजकारण सुचतें; नाना चर्चा व शंकासमाधानें शास्त्राधारें करावींत म्हणजे अनुमानें मोडून तळवट म्हणजे सुविचारांचा हमरस्ता पडून जातो, देशोदेशीचे लोक येतात व 'जाणती परी आढळेना। काय करितो तें कळेना' म्ह. याचा जाणतेपणाचा प्रकार (पल्ला) कोठवर आहे व हा काय करितो हें कोणास कळून येत नाहीं; फड म्हणजे भेद पडले असतील

ते मोडून हा ऐक्य करितो, समजूत काढतो, परांतर राखून सर्व कांहीं करितो; आपण करितो व करवितो, विवरतो व विवरवितो, भक्तिमार्गानें चालतो व चालवितो व याप्रमाणें आपलें ज्ञान दुसऱ्यास देऊन आपणांसारखे अनेक लोक शहाणे करून सोडतो; जुन्या पिढीच्या लोकांचा कंटाळा आला तर नवीन पिढी हातीं धरतो; पण होईल तितक्यांना शाहणे करितो; धकाधकीचा मामला दुर्बळांना साधत नाहीं म्हणून तो बलिष्ठांना शिकवून तयार करितो हा जर आधींच धैर्य व तणावा सोडून निराश बनेल व लोकांच्या हातून कांहीं होत नाहीं म्हणून रडत बसेल तर प्रपंचाचा शेवट गोड कसा होईल म्हणून हा हिंमतीनें कार्यें अंगावर घेऊन लोक तयार करितो. कार्यकर्त्यांचीं हीं आणखीं कांहीं लक्षणें सांगितलीं आहेत. आतां कोणत्या गुणांनीं लोकप्रिय होतो तें पाहूं.

(६) **अंतरपरीक्षा व सोशिकता** :-संसारी जनांना व निस्पृह व विरक्त महंतांना अशा उभयकोटीच्या लोकांना ह्या दोन्ही गुणांची आवश्यकता आहे. एक सुखी व एक दुःखी असे दोन प्रकारचे लोक जगांत दिसतात व हा भेद प्रारब्ध भिन्न म्हणून झाला असें समजतात. यांना अचूक यत्न करितां येत नाहीं, आपलें चुकतें कोठें व आपल्या कोणत्या अवगुणांमुळें अपेश आलें याचा विचार न करितां हे प्रारब्धावर ढकलतात! अपेशाचें मुख्य कारण प्रयत्नांत कोठें तरी चुकतें, लोकांना वश करितां येत नाहीं हें होय! जो स्वतःला ओळखीत नाहीं तो दुसऱ्याचें काय जाणणार? न्याय सोडल्यामुळेंच लोक दीन होतात. 'लोकांचें मनोगत कळेना। लोकांसारिखें वर्तवेना' म्हणून कलह उठतात, कलह वाढून उभयपक्ष कष्टी होतात, मुख्य प्रयत्न बाजूला राहून श्रम मात्र होतात. ही वागणूक चुकीची आहे. नाना लोकांची परीक्षा करावी व ज्याचे त्यापरी वागावें म्हणजे अपेश, कष्ट व श्रम टळतात. 'दुसऱ्यास शब्द ठेवणें। आपला कैपक्ष (कैवार, बाजू) घेणें' हा लौकिक प्रकार सर्वत्र दिसतो. वस्तुतः आपलें चुकतें कोठें हें पाहिलें पाहिजे! भलेपण मिळवायचें तर सोसलें पाहिजे. 'बोलतो खरें चालतो खरें। त्यास मानिती लहानथोरें.' शिवाय न्यायान्याय लोकांना कळत असतो. लोक सहसा चुकत नाहींत, आपलेंच चुकतें व म्हणून आपणच अधिक सोशिकता व क्षमा धारण केली पाहिजे. लोकांना कळत नाहीं म्हणून (जाणत्यानें) क्षमा केली पाहिजे, न केली तर बरोबरी होते. चंदन झिजत नाहीं तोंवर त्याचा सुगंध कळत नाहीं व तो कळला नाही तोंवर चंदन व इतर वृक्ष सारखेच वाटतात. जनांचें अंतर निवळत गेलें म्हणजे सख्य होतें व जगदंतरीं सख्य झालें कीं लोक वळले असें समजावें. जनी—

जनार्दन वळल्यावर त्रैलोक्यांत अशक्य काय आहे? सर्वांना राजी राखणें कठिण आहे (हें विरळ पुरुषालाच साधतें). 'पेरिलें तें उगवतें। उसणें द्यावें घ्यावें लागतें' म्हणून दुसऱ्याचें वर्म कधीं काढूं नये. 'हें अवघें आपणापासीं। येथें बोल नाहीं जनांसी। शिकवावें आपल्या मनासी। क्षणक्षणा' क्वचित् दुर्जनाशीं प्रसंग होऊन क्षमेचा धीर सुटला तर मौनेंचि स्थळत्याग करावा. लोक अनेक प्रकारच्या परीक्षा करितात; पण अंतर्परीक्षा करीत नाहींत म्हणूनच करंटे होतात! एकदां मरायचें आहे हें जाणून भलेपण राखावें. लहानथोर, आपलेपारखे, या सर्वांसी वाढत्या स्नेहानें वागतां आलें पाहिजे. हरिकथा, अध्यात्मनिरूपण, भलेपणाचें राजकारण हें सर्व योग्य प्रसंग व स्थलकाल पाहिल्यावांचून करणें व्यर्थ आहे. पुष्कळ विद्या शिकला; पण प्रसंगमान चुकत गेला तर त्या विद्येचा काय उपयोग?

(७) **लोकसंग्रही पुरुष कसा असतो?** जो दुसऱ्याचें दुःख जाणतो, ऐकून वांटून घेतो, शारीरिक दुःखें औषधें देऊन व मानसिक दुःखें सद्विचारांचें बळ देऊन दूर करितो, न्यायान्याय सोसतो, कोणाचेंही न्यूनपैशून्य प्रगट न करितां झांकतो, त्यामुळें दुसरा मनुष्य पश्चात्तापानें शुद्ध होऊन सुधारतो, तो 'क्षमून' हितकर्ता आहे असें सर्वांच्या अनुभवास आल्यावर त्याच्याविषयीं पूज्यबुद्धि वाढते व लोक वश होतात. त्यालाच लोकसंग्रही म्हणतात. तो मनानें लोक पारखतो; पण बोलत नाहीं. आधीं प्रपंच शोधावा. 'अत्र मानतां लोकां परत्र सहजीं घडे' म्ह. व्यवहारांतली वागणूक लोकांना पटली कीं परमार्थाचा बोध ऐकायला ते तयार होतात. तो ज्याचें त्यापरी वागून अंतर प्रसन्न राखतो. माणसांना ज्याच्या संगतींत सुख वाटतें त्याच्याकडे तीं धांवतात. बहुजनसमाज हा देवरूपच आहे म्हणून मनुष्यांना तो राजी राखतो. आशारहित, तापसी व ज्ञानी असा जो पुरुष जगदंतरीं मिळून जातो तो देवाचाच अंश होय व म्हणूनच तो जाणत्यनेणत्या सर्वांस हवाहवासा वाटतो. त्याचें कर्मउपासनाज्ञान प्रत्ययाचें असतें. तो आपल्या प्रबोधशक्तीनें बद्धांस सोडवितो. समर्थ म्हणतात कीं खरा लोकसंग्रहकारी माझा त्रैलोक्यनायक राम असून मीं त्याचा केवळ अनन्यसेवक आहें.

पुढील ३।४ प्रकरणें एकाच प्रकारचीं आहेत. कार्यकर्त्यांना लोक आपलेसे करितां आले पाहिजेत. ही वशीकरणविद्या राजकारणाचा प्राण आहे, लोकसंग्रहाचा आत्मा आहे. (८) **लोक राजी राखावे** असा बोध समर्थांनीं वारंवार याचसाठीं केला आहे. जेथें जन वळले तेथें अंतरात्मा म्ह. परमे-

ईश्वरच प्रसन्न झाला असें समजावें. 'अरे कां रे, अहो कां हो' असा जगाचा नियम आहे. म्हणून अमृत्तोत्तरें बोलावीं 'स्तवावें बहुतां लोकां मानावें बहुतांपरी । विध्युक्त विश्व वंदावें निंदा हे आत्मघातकी ॥' अनेकांत अनेक गुण असतात, त्या गुणांकडे लक्ष देऊन त्यांचें गौरव करावें, विश्व वंदावें ही शास्त्राज्ञाच आहे; पण शास्त्राज्ञेपेक्षां मनाच्या कळकळीनेंच वंदावें. जिव्हाळा पाहिजे. 'शिकले शब्द ते थोडे जिव्हाळा पाहिजे वरा.' विद्या कमी असली तरी चालेल; पण वागणें जिव्हाळ्याचें पाहिजे. मतामतांच्या गलबल्यांत–वादांत पडूं नये, त्यानें बुद्धि बिघडते, अहंभाव वाढतो. आपण तर 'नेणते व्हावें जाणत्यानेणत्यांमध्यें.' मोठेपणाचें बीज दुसरीकडे आहे. 'महत्व जाणती कळा' म्ह. जाणतेपणाला महत्व आहे, जाणतेपणा असेल तर महत्व न मागतां प्राप्त होईल. नेणत्यांस मिळवून घेऊन सांगावें, जाणतेपणाची छाप अपाप पडेल. 'नेणत्याला मिळों जाणे पुढें सांगे हळू हळू'–संसार हा बहुचक (बोहोचक, अनावर) आहे. अनेक स्थळीं अनेक माणसांशीं प्रसंग येतात. दारचीं व घरचीं माणसें राजी राखावीं. 'भगलें चित्त जाणावें रक्षावें बहुतापरी' कोणाचें चित्त कां, कशानें भंग पावलें–खिन्न झालें हें जाणून भंगाचें कारण काढून टाकावें, मन तुटूं देऊं नये, प्रीति जोडावी, फुटूं देऊं नये. वागतां आलें पाहिजे. 'सकळां राखणें राजी । हे मुख्य भक्ति जाणिजे' अभ्यास करावा, अभ्यासानें सर्व कांही साधतें. 'जीव जीवांत घालावा, चालावा भक्तिमार्ग[१] हा.' सर्वांतर्यामीं रामाला प्रसन्न ठेवणें हा भक्तिमार्ग[१] चालवावा. निरूपणाच्या योजानें ही विद्या सर्वत्र पेरावी व नेणते असतील ते जाणते करावे. निश्चय बिंबवावे, प्रत्यय दावावे, उकलून सांगावें, सांगतां सांगतां प्रसन्नतेनें हंसावें, कंटाळा किंवा त्रास मानूं नये. लोक चुकले तरी त्यांना झिडकारूं नये. सर्वांस मनापासून वोढावें, वेधावें, लोकांचीं मनें सुविचारांनीं भरून टाकावींत, मृदु शब्दांनीं सर्वांसीं बोलावें. 'मैत्रिकी सर्व लोकांसी मनापासून जाहली' म्हणजे भक्तिमार्ग चालला. अंतरें मिळालीं, लोक वेधले म्हणजे त्यांना वियोग सहन होत नाहीं–लोक सोडून जात नाहींत. सर्वांचा एकजीव होतो, सर्व सुखी होतात. इष्टमित्र मिळतात, फार काय पण 'राजकी भोंवती येती । तेही त्यासीच वोढती!' असा हा भक्तीचा

---

१ जें जें भेटे भूत । तें तें मानिजे भगवंत । हा भक्तियोग निश्चित । जाण माझा ॥ (ज्ञानेश्वर). 'सर्वभूतीं भगवद्भाव' ठेवण्यास नाथ सांगतात. 'विष्णुमय जग वैष्णवाचा धर्म' अशी तुकोक्ति आहे.

जिव्हाळा आहे. (९) **मना मनासि मिळणी** झाली पाहिजे. ' खुणावितां खुणावला । मनें खुणेसि पावला ' तोच विचक्षण होय. मनानें प्रसंग विवरतो व तनानें (शरीरानें) वागतो, चुकत नाहीं तोच चतुर होय. ' तनास भेटलीं तनें । मनासि चूकलीं मनें ' म्ह. शरीरें एके ठिकाणीं आहेत; पण मना-मनाची गांठ कधींही पडत नाहीं तर उपयोग कांहीं नाहीं ! दोघांकडे गैरसमजुती पसरत जातात ' व परस्परें चूकामुकी ' होते. एका बैठकींत, एका मंडळांत, शेजारीं-शेजारीं माणसें वर्षानुवर्षें बसत राहिलीं आणि त्यांच्या मनाचें ऐक्य झालें नाहीं तर तें सहकारित्व फुकट आहे ! ' मढ्यास भेटलें मढें । करील काय बापुडें ' म्हणून मनानें मनाच्या खुणा जाणाव्यात म्हणजे ' दुणा लोभ ' वाढत जातो. समर्थ जरा कोपानें विचारतात, ' उगेंचि वेचलें वयें । मनासि भेटतां नये ! ' एवढे मोठे झालांत पण अजून मनास भेटायचें तुम्हांला साधत नाहीं ? ' मनें मनास राखणें । सुखें सुखास चाखणें ' हें शिकलें पाहिजे. ' न सांगतांच जाणणें । खुणेसि खूण बाणणें ' असो. भरीं भरलें नाहीं (हट्टास पेटलें नाहीं) म्हणजे महत्व कधींच ओसरायचें नाहीं. प्रसंगमान राखावें, परांतरास जाणावें, विचारपूर्वक प्रेत्न करावा व ' मनें मनासि मिळणी ' करून कर्म साधावें.

(१०) **जग तिकडे जगन्नायक** याचा विचार केला पाहिजे. कोण राजी राखिले, कोण मनीं भंगिले हें क्षणक्षणा पहावें. थोडें बोलून समाधान करावें, कोणावर रागवायचा प्रसंग आला तरी त्याचें मन धरावें, तोडूं नये. लोक राजी राखून सर्व कांहीं करावें, विवेकानें लोक संभाळावे. सर्वत्र कीर्ति माजून भेटीचा हव्यास उपजेल तें करावें. जो जो भेटेल तो तो नष्ट. मग ' अवघे नष्ट येकला भला । कशावरूनी ? ' असेंच कोणीही म्हणेल. ओस मुलखांत जाऊन काय पहायचें आहे ? लोकांवेगळें कोठें रहायचें ? म्हणून ' तऱ्हा खोटी, सांडतें घ्यावें. ' ज्याला लौकिकांत वर्ततां येत नाहीं तो महंत-कार्यकर्ता नव्हे. त्यानें आपला परमार्थ श्रवण करीत काळ कंठावा. अभ्यासें प्रगट व्हावें नाहींतर झांकून असावें, पण ' प्रगट होऊन नासावें । हें बरें नव्हे ' शेत पेरून तें वाहायचें नाहीं, जवाहिराचा धंदा पत्करून गांवोंगांव फिरायचें नाहीं, लोकसमुदाय मिळवायचा पण संभाळायचा नाहीं, याला काय म्हणावें ? प्रेम चढतें वाढतें राहील तरच परमार्थ पसरेल. सुरळीत ( संगीत ) चालला तर तो व्याप, नाहीं तर संताप. मूर्ख मूर्खपणानें भांडतात व शहाणेही तसेच कलह करूं लागले तर फजीतीला पारावार राहणार नाहीं. असो. ज्याचा त्यानें विचार करावा व अनुकूल पडेल तसें वर्तावें.

(११) **लोकवशीकरणाचा मंत्र** ज्याला उमगला त्याला काय उणें

आहे ? तें चातुर्य कसें मिळवावें ? ‘जीव जीवांत घालावा । आत्मा आत्म्यांत मिसळावा.’ वारंवार परांतराचा शोध घ्यावा दुसऱ्याच्या जीवीचें कळत नाहीं, परांतर जाणवत नाहीं. मग लोक कसे वश होतील ? ‘जगदीश आहे जगदंतरीं’ त्याला अकलेनें वळवावा. वशीकरण म्हणजे चेटके करणें नव्हे. जो जगदंतरीं मिळाला तो जगदंतरचि झाला, हेंच वशीकरण. श्रेष्ठ कार्य करील तो श्रेष्ठ, कनिष्ठ करील तो कनिष्ठ. जगदंतरीं मिळून जाण्यापरतें श्रेष्ठ कार्य कोणतेंच नाहीं. याला भगवंतानें श्रेष्ठ बुद्धी दिली पाहिजे. ‘अवघेंची म्हणती आम्ही थोर’ लोक अभिमानानें चालतात, पण विवेकी विवेकानें पाहतात. पोकळ अभिमान काय कामाचा ? ‘सत्याचा जो साभिमान । तो जाणावा निरभिमान’ म्हणून सत्याचा, न्यायाचा पक्ष धरावा. न्याय शाश्वत असतो, अन्याय अशाश्वत असतो. न्यायअन्याय समान नव्हे. बाष्कळ आणि नेमस्त, तस्कर आणि भाग्यवंत एक कसे होतील ? सत्याचा व न्यायाचा अभिमान वाहणाऱ्यांची महंती प्रगट असते, खोट्याची महंती कानकोंडी होते. महंताला—कार्यकर्त्या पुरुषाला न्यायाचाच पक्ष घेतला पाहिजे. आतां त्यानें लोकसंग्रह कसा करावा तें सांगतो. आचारविचारावांचून जें जें करावें तें तें शीण देण्यास कारण होतें. म्हणून त्यानें आचारविचारशील, धूर्त व विचक्षण असे लोक शोधावे. धूर्त पाहिजेत. बाजारी नकोत. धूर्तापुढें बाजाऱ्यांचें कांहीं चालत नाहीं. मुख्याशीं सख्य केलें कीं बाजारी सहजच त्याच्या मागें आले. दोन धूर्तांनीं एकमेकांस ओळखलें कीं त्यांचें मन चटकन् एक होतें; पण हें सारें गुपचिप् केलें पाहिजे. म्होरक्याचें मन वश केलें कीं अनुयायी मागें आलेच, याप्रमाणें सामान्य जन व सज्जन आर्जव करीत येतात. ओळखीनें ओळखी साधावी, आपल्या बुद्धीनें बुद्धी बोधावी, नीतिन्यायाचा प्रशस्त मार्ग पुरस्करून पाखांडांच्या वाटा मोडून टाकाव्यात. ‘वेष असावा बावळा । अंतरीं असाव्या नाना कळा’ लोकांचा जिव्हाळा मोडूं नये. निस्पृह परिभ्रमण करणारा, प्रत्ययाचें ब्रह्मज्ञान सांगणारा, असा जाणता सज्जन दुर्लभ आहे. त्याचें पाठांतर अपार असावें, त्यामुळें सर्वांचीं अंतःकरणें प्रसन्न होऊन लोक वेधले जातात. तो सदासर्वत्र संचार करणारा पाहिजे. तो एके ठिकाणीं बसून राहील तर सारा कार्यभाग खुंटेल; म्हणून सावधपणें ज्याला त्याला भेटी देत त्यानें हिंडलें पाहिजे. हा वारंवार भेटावा ही इच्छा लोकांत प्रदीप्त झाली पाहिजे. अशा चतुर व गुणी सज्जनांच्या योगानें लोकांना समाधान मिळतें.

(१२) लोकांना राजी राखावें, लोकांच्या मनोगतें चालावें, जनांचें अंतर वेधावें, जगदंतरीं जगदीश वोळखावा इ. प्रकारचा उपदेश समर्थांनीं

जागोजाग जरी केला आहे तरी व्यवहारांत त्यांनीं एकंकार न करितां वर्णाश्रमधर्मानुरोधानें व युक्तायुक्ततेच्या तारतम्यानें वागावें असेंच सांगितलें आहे. कित्येक धर्मसंप्रदाय आणि देशभक्तिसंप्रदाय 'एकंकार' करणें म्हणजेच सर्वांचें ऐक्य घडवून आणणें असें समजून एकंकाराला उत्तेजन देत असतात. पण समर्थांना हा वर्णाश्रमधर्माची वडी मोडणारा **एकंकारपंथ नको** होता. त्यांनीं एकंकारावर करडे अभिप्राय दिले आहेत व म्हणून 'एककारगजावरी पंचानन' अशा प्रकारची त्यांची स्तुतीही करण्यांत येत असते. आतां समर्थांच्याच वाणीनें आपण त्यांचा उपदेश ऐकूं. (१) राजापासून रंकापर्यंत मनुष्यांच्या अनेक हारी आहेत. त्या सर्वांची काय वरोवरी होऊं शकते? देव, दानव, मानव (सात्त्विक, तामस, राजस किंवा जाणते, नेणते व मिश्र) असे तीन प्रकारचे लोक आहेत. कांहीं योनी उंच व कांहीं नीच, कांही जीव श्रेष्ठ कोटीचे व कांहीं कनिष्ठ कोटीचे, कांहीं पापी व कांहीं पुण्यवंत. असे भेद व्यवहारांत आढळतातच कीं नाहीं? 'एकांशें' जग चाले हें देवाचें म्हणणें खरेंच आहे. पण सामर्थ्यांत कमजास्तपणा असतो. एकाच्या (संताच्या) संगतीनें जीव मुक्त होतात व एकाच्या (पतिताच्या) संगतीनें रौरवनरकाचें दुःख भोगतात. साखर आणि माती दोन्ही पृथ्वीच; पण म्हणून कांहीं माती खातां येत नाहीं! गरळ व आप दोन्ही प्रवाही पदार्थच; पण पाण्याच्या ऐवजीं विष पितां येत नाहीं! पुण्यात्मा व पापात्मा दोघांतही एकच आत्मा नांदतो. साधु आणि भोंदु, मनुष्य आणि गधडे, राजहंस आणि कोंबडे, राजे आणि माकडें (दोघे उंचावर बसतात म्हणून) यांची समानता कशी होईल? ब्राह्मण व महार दोघांत एकच आत्मा; पण त्यांची एक संगत होऊं शकत नाहीं. पंडित व चाट पोरें काय एक होतील? शूराहून भ्याडांचा अधिक सत्कार केला (म्ह वरिष्ठ जागेवर नेमलें) तर युद्धप्रसंगीं फजीतवाडा (नरकाडी) ठेवलेलाच. श्रीमंत सोडून निर्धनाचा आश्रय केल्यास फळ काय? गंगेचेंही जळ आणि गटारमोऱ्यांतून वाहणारें जळच; पण मोऱ्यांतील पाण्याचें आचमन करवेल काय? त्याप्रमाणें निंद्य सोडून द्यावें व वंद्य तें हृदयीं धरावें आणि सत्कीर्तीनें भूमंडळ भरावें. म्हणून आधीं आचारशुद्ध राहावें व मग विचारशुद्ध व्हावें; आधीं वैराग्यशील व सुबुद्ध व्हावें. उत्तमाला उत्तम आवडतें, कनिष्ठाला उत्तम आवडत नाहीं; म्हणून देवानें ह्या जगांत करंटे करून ठेवले आहेत! न्यायनीति, कथापुराण, विवेकानें वागणें, लोक राजी राखून त्यांना पुण्यवंत करणें हे उत्तम गुण घ्यावे. मुलांच्या चालीनें चालावें लागतें तेव्हां त्यांचें मनोगत हातीं येतें, तसें जनांस हळु हळु शिकवीत शाहाणें करावें (एकदम क्रांतिकारक कल्पना मनीं धरून समाज बिथरवूं नये). वेड्यांस वेडें म्हणूं नये, कोणाचें वर्म काढूं नये

तरच निस्पृहाला दिग्विजय घडतो. अनेक स्थळीं अनेक प्रसंग पडतात तें जाणून सर्वजनप्रिय होऊन जावें. लोकांचें मनोगत ज्याला राखतां येईल त्यालाच महंती पचते व लोक वश होतात. (२) जें आपल्याला कळत नाहीं तें जाणत्याला पुसावें. देहासकट मनोवेगानें तर फिरतां येत नाहीं. चर्मदृष्टीला (डोळ्याला) दिसत नाहीं तें ज्ञानदृष्टीनें ( विवेकानें ) पहावें व बसल्याजागीं ब्रह्मांड ध्यानीं आणून समाधानानें रहावें. ( हें सूक्ष्मदृष्टीचे विवेकी सज्जनच करूं शकतात. ) मूर्ख टोणप्यास हें विवेकाचें वर्म कोठून कळणार ? तो विवेक व अविवेक सारें एकच समजतो ! ईश्वरानें नाना भेद केले आहेत, भेदांमुळें सृष्टी चालली आहे; पण आंधळे परीक्षक मिळाले तर खरी परीक्षा (सारासारविवेक) कसची होते ? करंटयाला उत्तम वस्तूची परीक्षा कशी व्हावी ? स्वत: जो दीक्षाहीन आहे त्यापासून दुसऱ्याला दीक्षा ( संप्रदायपरंपरेचें ज्ञान ) कशी मिळावी ? आधीं शुद्ध आचार पाळावे, त्यानें चित्त शुद्ध झाल्यावर विचार पहावा (आचारशुद्ध पुरुषाला शुद्ध विचार स्फुरतात). आचार व विचार दोन्ही असतील तरच परतीर गाठतां येतें. जें नेमकास (नित्यनेमाच्या आचारमार्गानें चालणाऱ्यास) कळणें कठीण तें (ज्ञान) बाष्कळास (आचाररहीत स्वच्छंदी मनुष्यास) कसें कळावें ? डोळस अडखळतात, तेथें आंधळे काय कामाचे ? पुण्यपाप, स्वर्ग-नरक, विधिनिषेध, विवेकअविवेक एक कसे मानावे ? म्हणून सत्संग धरावा (आचारविचारशून्य टोणप्यांचा संग धरूं नये), सच्छास्त्र ऐकावें (हातीं पडतील ते ग्रंथ भरमसाट पाहून उच्छृंखळ मतें बनवूं नयेत) व नाना यत्नें करून उत्तम गुणांचा अभ्यास करावा (३) स्वत:च नाना मतांनीं गोंधळ-लेला मनुष्य दुसऱ्यांस निश्चयाचा मार्ग कसा दाखविणार ? ' सर्व ब्रह्म ' म्हणून एकंकार करणाऱ्या अविवेकी लोकांच्या मतास काय म्हणावें ? सर्व ब्रह्मवाद्यांना पुण्यपाप, स्वर्गनरक, सारअसार, विवेकअविवेक, पतनपावन, निश्चयसंशय, सारें ब्रह्मरूपच ! सर्वसंगपरित्याग आणि स्वेच्छाचाराचा विपयभोग, वंद्य आणि निंद्य, दोन्ही एकच मानल्यावर मग काय उरलें ? भेद ईश्वरानेंच केला आहे. तो याच्या बापाला मोडतां येणार नाहीं. तोंडांत घालायचा घास अपानांत घातला तर काय चालेल ? ज्या इंद्रियास जो भोग उचित तोच त्यास दिला पाहिजे. देवाचे नियम मोडतां येत नाहींत. वेडें-वांकडें जाणावें, चालीवरून आंधळें ओळखावें, तसें बाष्कळ बोलणें वमना-सारखें त्यागावें. (४) स्मरण आणि विस्मरण, नेमस्तपण आणि बाष्कळ-पण, प्रचीत आणि अनुमान, होय आणि न होय (आहे आणि नाहीं) यांचें तारतम्य विवेकावांचून काय उमजेल ? कार्यकर्ता आणि निकामी, शूर आणि विपर्याकिकर, धर्मिष्ठ आणि धर्मलंड, धनाढ्य आणि दिवाळखोर, सभ्य

आणि चोर, सत्य आणि असत्य, वरिष्ठ आणि कनिष्ठ, अंतर्निष्ठ आणि नष्ट यांतील तरतमभाव स्पष्ट कळला पाहिजे. (५) जनींजनार्दन म्हणून सर्वांच्या अंतरास संतोष द्यावा; पण सरसकट सर्वांचीच पूजा करूं म्हटलें तर मूर्खत्व अंगीं लागतें. गाढवाची पूजा केली तर ती त्याला कशी कळावी? पूज्य विभूतींचीच पूजा करावी व इतरांस संतोषवावें, कोणाचें अंतर दुखवू नये म्हणजे बरें. ज्या सत्पुरुषापासून लोकास सुविचार कळतात व पटतात व याप्रमाणें धर्मस्थापनेचें महत्कार्य ज्यांच्याकडून घडतें अशा पुण्यशील महात्म्यांनाच पूजेचा खरा अधिकार आहे. (६) कांहीं तरी भरमसाट विचार तो अविचारच होय. कित्येक एकंकार प्रतिपादितात; पण एकंकार म्हणजे भ्रष्टाचारच होय; तो करूं नये. सर्व खोटें टाकून–खरें निश्चळ-परब्रह्म–सारासारविचारानें घ्यावें.

(१३) **राजकारणाची उपाधी कशी सांभाळावी** हें शिकलें पाहिजे. परिभ्रमणांत अनेक प्रकारचे लोक आढळतात आणि त्यांत कांहीं विवेकीही सांपडतात. सर्वांना अखंड राजी ठेवणारा पण उदासीनवृत्तीचा एखादा गाजी प्रापंचिक लोकांतही भेटतो. आपल्याला कल्पनाही नसते असे पुष्कळ प्रकार जगांत आढळतात. सामान्यांतही एखादा उंच कोटीचा मनुष्य भेटतो व त्याची रहाणी पाहिली तर महंताचीं लक्षणें त्याच्या ठिकाणीं दिसतात! त्याचा प्रभावच (ढाळ) असा असतो कीं दुसऱ्याला जपून न साधणारें काम तो सहज करून टाकतो. त्याला वांकड्यातिकड्या मार्गानें जायचें कारणच पडत नाहीं. एखाद्याला झटूनही साधत नाहीं तें दुसऱ्याला सहज साधतें. भगवंताचा महिमा अतर्क्य आहे. जगांत सगळे प्रकार आहेत. शहाणे शहाणे लोक राजकारणांत चुकतात, डाव अंगावर घेतात व त्यामुळें त्यांची फजिती होते; म्हणून बिनचूक राजकारण करावें म्हणजे उदंड उपाय होतात. चुकीमुळें उपाय तोच अपाय होतो, फड मोडतात, लोकांचा मनोभंग होतो व अशा गोंधळामुळें कोठें चुकतें तेंच कळेनासें होतें! एखादें मनुष्यच शिळें असतें. त्याच्या कृतींत पदोपदीं बावळेपणा दिसतो, तो नाना विकल्पांचा गोंधळ करितो अंगांत धमक नसतां कार्याचा पसारा वाढविला म्हणजे तो पसरायचाच. दूरदृष्टीनें अकलेचा बंद घातला नाहीं म्हणजे असेंच व्हायचें! अकलेच्या बाहेर मोठी हांव धरून उपाधी वाढविल्या म्हणजे स्वतःला व लोकांना कष्ट मात्र होतात. अशा गोष्टी करूं नयेत. उपाधी आवरितां येत नाहीं तर करूंच नये, चित्त स्वस्थ ठेवून आपले समाधानांत रहावें! निर्गुणाच्या ठिकाणीं हें कांहीच नाहीं. निर्गुण मुळींच निरुपाधिक आहे.साऱ्या उपाधि–दगेफटके–चंचळ अंतरात्म्याकडे (जीवाकडे)

आहेत. निर्गुणाच्या वोधावर जावें म्हणजे आपण निरुपाधिकच आहोंत. ऋणानुवंधानें लोकांचा संवंध येतो तेवढ्यापुरती उपाधी संभाळावी; पण अंतर्यामीं सावधान असावें. कांहीं गल्वला कांहीं निवळ असा काळ कंठावा म्हणजे आपल्याला विश्रांतीची वेळ मिळते. उपाधि राहत नाहीं म्ह. उपाधि केलीच पाहिजे. पण आत्मसमाधान हें मुख्य आहे. नरदेहाचें सार्थक त्यांत आहे हें विसरूं नये! ( हा समास अत्यंत महत्वाचा असून राजकारणी पुरुषांनीं मनन करण्यासारखा आहे. राजकारणी पुरुषांनाही सामान्य प्रपंची लोकांत एकादा गुरु भेटतो हें सांगण्यासाठीं पहिल्या ५।७ ओव्या आहेत. या प्रकरणांत मुख्यत: विनचूक राजकारण कसें करावें व उपाधी वाढवून आपलें असंगपण कसें संभाळावें हें सांगितलें आहे.)

आतां (१४) **सभा कशी सांभाळावी** तें सांगतात. (१) संसारांत कांहीं काळ अनुकूल व कांहीं प्रतिकूल होतो. कांहीं दुःख, कांहीं सुख! सर्व काळ सर्वच गोष्टींची अनुकळता सर्वांना होती तर सर्वच राजे झाले असते! म्हणून 'कांहीं सजे कांहीं न सजे। ऐसें आहे'— कांहीं गोष्टींची अनुकूळता व कांहीं गोष्टींची प्रतिकूळता असा हा संसार आहे! सर्व प्रसंगीं शहाणपण शिकत असावें. ऐकल्यावांचून कळलें व शिकल्यावांचून शहाणपण आलें हें 'देखिलें ना ऐकिलें। भूमंडळीं' ऐकतां ऐकतां कळतें व कळतांकळतां वृत्ति निवळते म्ह. सारासार विचार होतो. जें जें ऐकलें तें तें समजोन विवरलें म्हणजे शहाणपण येतें. मन दिसतें तर धरिलें असतें; पण दिसत नाहीं म्हणून अर्थांतरीं भरून अर्थरूप होऊन ज्याचें त्यानेंच आवरलें पाहिजे. मनोजय हेंच शाहणपण. पण शहाण्यांच्या सभांतून त्याचाच तर अभाव दिसतो! चार शहाणे सभेंत एकापुढें एक बोलत सुटतात आणि लोकांना पाहिजे तें राहतें एकीकडेच! 'माझें होय, तुझें नव्हे' अशा अहंकारामुळें न्यायनीति सांडून ते अन्यायाकडे भरंगळतात व क्रोधानें पेटतात. अहंकारी श्रोत्या-वक्त्यांत खरेंखोटें कोणी निवडावें? म्हणून जाणते व चतुर (विचक्षण) असतात ते आधींच आपल्याकडे नेणतेपणा घेतात व 'टोणपा मूर्ख मीच' असें म्हणतात. आपणाहून देव थोर आहे हें ज्याला कळलें त्यानें जगदंतर म्ह. लोकांचे मनोभाव राखून बोलावें. सभेंत कलह झाला तर जाणत्याला शब्द येतो ( त्याला जबाबदार धरितात ). उघडच आहे कीं तो लोकांचें अंतर राखूं शकला नाहीं, मग त्याला शाहणा कोण म्हणेल? म्हणून थोरांना क्षमाशांति अवश्य पाहिजे. थोर लोक निरंतर आपल्याला संभाळतात (आपला वोज राखून घेतात) व क्षुल्लकपण येऊं देत नाहींत. ते अनेक

उपाय, पर्याय, नाना यत्न करितात. त्यांचा महिमा तेच जाणोत. हें मूर्खाला कळत नाहीं. त्याच्यामुळें सभा विस्कटतात व मग शाहण्याला तें सर्व सावरून ध्यावें लागतें. थोरच 'स्वयें साहोन साहविती.' अशा सज्जनामुळें लोकांचें समाधान कायम राहतें.

तो मनोगतांचीं अंगें जाणे। मानप्रसंगसमयो जाणे।
संतप्तांलागीं निवऊं जाणे। नाना प्रकारें ॥ १८ ॥

वहुत जनांस चालवी। नाना मंडळी हालवी।
ऐसी हे '**समर्थ**' पदवी। विवेकें होते ॥ १९ ॥

विवेक एकांतांत करावा. एकांतांत विवेक स्फुरतो, यत्न सांपडतो, तर्कानें सारें ब्रह्मांड कवळतां येतें.ज्याला एकांत रुचला त्याला सर्वांच्या आधीं कळतें. त्यावांचून ( दूरदर्शीपणावांचून ) श्रेष्ठपणाला ( वडिलपणाला ) जागाच नाहीं. (२) असो. चातुर्यावीण विद्या फुकट आहे. सभेंत कलह झाला कीं, समाधान कोठचें ? बोलके फार मिळाले कीं तेथें मौन धरावें. अल्पचिन्हें जगदंतर ओळखावें. वाष्कळांत वसूं नये, उद्धटासीं तंडूं नये आणि आपल्यासाठीं लोकांचें समाधान मोडूं नये, नेणपण सोडूं नये व जाणपणें फुगूं नये, तर 'नाना जनांचें हृदय। मृदुशव्दें उकलावें.' प्रसंग जाणून वागावें. वहुत लोक एका मताचे असले तर तेथें वाद करूं नये, आपलें म्हणणें खरें असलें तरी सभेचा विचका होतो (म्हणून मौन धरावें किंवा निघून जावें.)

(१५) **चतुराईचें राजकारण** कसें असतें तें आणखी एकवार पाहूं. 'अनन्य राहे समुदाव। इतर जनांस उपजे भाव' असा उपाय पहावा. समुदाय म्ह. आपली मंडळी, संप्रदायिक लोक, आपल्या पक्षाचे लोक. हे अनन्य म्ह. अविचलित चिकटून राहतील व इतर जनांस म्ह. बाहेरच्या लोकांस भाव उपजेल म्ह. आपल्या समुदायांत येऊन मिळण्याची इच्छा होईल असा उपाय पहावा. या उपायांत म्ह. लोकोद्धारकार्यांत चार प्रकार येतात–(१) मुख्य हरिकथानिरूपण (२) राजकारण (३) सर्व विषयीं सावधपण व (४) अत्यंत साक्षेप म्ह. सततोद्योग. हरिकथानिरूपण हें मुख्य पाहिजे. जाणते–नेणते, लहान–थोर, स्त्री–पुरुष सर्वांसच परमार्थ सांगावा, सकललोक कीर्तनपुराणादिकांनीं वश करावेत. दुसरें राजकारण हें सर्वांस सांगतां येत नाहीं, अधिकार पाहून काम सांगावें. सर्वत्र सावधानता व उद्योगपरता हे गुण राजकारणांत व परमार्थांत सारखेच अवश्य आहेत. लोकांचे आक्षेप फेडून त्यांना निःसंदेह करावें. लहानथोर अपरा-

धांची क्षमा करावी, नीतिन्यायाचा बंद अगदीं ढिला करूं नये, संकेतानें लोकांस वेध लावावा, समयप्रसंग ओळखावा. अतिपरिचयाचा संबंध पडूं देऊं नये. उपाधीचें कार्य करून उपाधींत सांपडूं नये, महत्व न मांडतां नीचत्व घ्यावें, दोष देखोन झांकावे, अवगुण अखंड न बोलावे, दुर्जनावरही परोपकार करून सोडावे, तऱ्हे भरों नये, न होणारेंही कार्य दीर्घप्रयत्नानें करून दाखवावें, अतिवाद करूं नये, समुदायाचें बरेंवाईट सोसावें, पाठांतर अपार असावें व विचार सन्निध असावा, अपाय करणें असेल तर बोलून न दाखवितां परभारेंच प्रत्यय आणावा, इ. इ. प्रकारें सावधानतेनें वागावें. बहुतांचें सोसलें नाहीं तर समुदाय वाढत नाहीं. बरें अवघेंच सोसलें तर आपलें महत्व उरत नाहीं, म्हणून तारतम्य ठेवावें! राजकारण उदंड करावें; पण कळों देऊं नये, लोकपरीक्षा चांगली ठेवावी. उन्मत्तांचे अभिमान राजकारणानें जिरवावे; पण त्यांना पुन्हा परभारें मिळवून घ्यावें, तोडूं नये. हिरवट ( लवकर वरदळीवर येणारा ) असेल त्याला दूर ठेवावें म्ह सलगी करूं देऊं नये. कचरट (क्षुद्र) असेल त्याशीं बोलूंच नये; त्याचा सबंध पडलाच तर झटकून दूर सरावें. असो; राजकारण हें असें आहे. चित्त सुचित असलें म्हणजे राजकारण सुचतें. वर चढत असतील त्यांना टेका देऊन चढवावें, कलह किंवा विरोध करितील त्यांना खालीं पाडावें. कारभाराचें काय काय म्हणून सांगावें ? असा पुरुष चतुर असावा. त्याला पाहूं जावें तों सांपडत नाहीं. कीर्ति पसरूं लागतांच तो निघून जातो व ऐश्वर्य चालून घरीं आलें तरी त्याकडे ढुंकून पाहत नाहीं.

(१६) **निस्पृह महंताचा** व्याप फार मोठा. (१) मूर्ति तितक्या प्रकृति असा प्रकार असल्यामुळें नानाविकारांचे लोक जगांत भरले आहेत. (भरतखंडाची सांप्रतची स्थिति पहा ! ) कित्येक मुसलमानी धर्म स्वीकारून व कित्येक ख्रिस्ती धर्माची दीक्षा घेऊन समाजाच्या बाहेर गेले आहेत आणि कित्येक भिन्नभिन्न देशभाषांनीं रोधले आहेत. महाराष्ट्रदेश थोडा उरला असून येथें राजकारणांत कार्यकर्ते गुंतले आहेत. ' अवकाश नाहीं जेवायला। उदंड कामें ' अशी स्थिति आहे. कित्येक युद्धप्रसंगांत गुंतले असून युद्धवार्ताशिवाय त्यांना दुसरें कांहीं सुचत नाहीं. उदमी व्यापारांतच दंग आहेत. ते आपल्या पोटाच्याच मागें आहेत. षड्दर्शनें, नानाविध मतें, यांशिवाय कित्येक पाखांडेंही वाढलीं असून जे ते आपलालीं मतें उपदेशीत आहेत. उरलीं मुरलीं स्मार्त व वैष्णव मतांत गुरफटलीं असून मतामतांचा गोंधळ माजला आहे. कित्येक सकाम व्रतें आचरीत आहेत. वैदिक लोक आपल्याच नादांत आहेत. कित्येक कथाकीर्तनांतच दंग आहेत. प्रत्ययाचें ब्रह्मज्ञान कोण पाहतो ? शुद्ध

ज्ञान अत्यंत दुर्लभ आहे, पुण्यवंतावांचून त्याकडे पाहतो कोण? ज्ञानविचार सर्वांना सांगतां येत नाहीं. अधिकारावांचून सांगून उपयोग काय? उपाय करितां अपाय होतो. आतां प्रत्ययाचें ब्रह्मज्ञान ज्यापाशी आहे असा विचारवंत निस्पृह पुरुष लोककल्याणार्थ कसा वागतो तेंच सांगतों.तो तीक्ष्णबुद्धीचा पुरुष एकही क्षण व्यर्थ दवडीत नाहीं. धूर्त तर्कशुद्ध चालणारा, विचक्षण म्ह. चतुर, सर्वमान्य, असा तो पुरुष वरच्या साऱ्या आडवाटा बंद करून आपल्या प्रबोधशक्तीच्या अनंतद्वारांनीं जनांस सरळ रस्त्यावर आणून सोडतो. तो वक्तृत्वानें सर्वांचीं अंतःकरणें वेधून घेतो, सर्वांना भेटीचा व निरुपणाचा चटका लावतो. स्वानुभवाचे बोल बोलून मतमतांतरें जागच्या जागीं पार जिरवितो. त्याचे स्वानुभवाचे चार शब्द ऐकून तो पुन्हा कधीं भेटेल अशी सर्वांना चटक लागते. हा तर निस्पृहपणाच्या बाण्यानें केव्हांच वेध लावून निघून जातो लोक त्याला धुंडतात; पण तो एके स्थळीं सांपडत नाहीं. त्याचा वेष तोही धड नाहीं. तो गुप्तपणें मोठालीं कामें करून जातो; पण कोठेंच सांपडत नाहीं. यशकीर्तिप्रताप त्याच्यामागें धांवत जातात. जागोजाग तो लोकांना भजनमार्गाला लावून आपण त्यांच्या उपाधींत अडकून पडत नाहीं व त्यामुळें कोणाचा मत्सर (हेवादावा) त्याला बाधत नाहीं. दुर्घट अशा दऱ्याखोऱ्यांत (खनाळ) कोठें तरी राहतो व तेथें सर्वांची सर्व काळ चिंता करितो, त्यांच्या सोडवणुकीचे उपाय योजतो. त्याच्यापुढें कोणाचें चालत नाहीं. मात्र त्यावांचून आपल्याला दुसरा कोणी उद्धरायला समर्थ नाहीं असा लोकांना चटका लाग-ल्यामुळें लोक त्याला धुंडीत असतात! तो सर्वांचें ऐक्य करून (कट्ट घालून) लोकांना राजकारणाला लावतो. महंत उभे करून शिष्यप्रशिष्य असा मोठा संप्रदाय वाढवितो व त्याची सत्ता गुप्तपणें सर्वत्र चालते. जागोजाग त्याचीं मंडळें दूरवर पसरलेलीं असतात. सारे लोक त्याच्याच मार्गाला लागतात. चहूंकडे परमार्थबुद्धि वाढवून उपासनेचा तो जयजयकार करवितो. प्रत्ययाच्या ज्ञानावर तो सर्वांना सोडवितो. त्याचा कित्ता पाहून लोक शहाणे होतात. निस्पृह महंताचीं लक्षणें अधिक सोप्या भाषेंत आणखी दोन उताऱ्यांत सांगतात. (२) हरिकथानिरूपण, नेमस्तपणाचें राजकारण व वर्तायाचें लक्षण हे तीन गुण त्याचे अंगीं असतात. 'पुसों जाणे सांगों जाणें, अर्थांतर करूं जाणे' यामुळें त्याला सकळांचें समाधान करितां येतें. दीर्घसूचना सर्वांआधीं त्याला कळते. ( दीर्घसूचनेची व्याख्या समर्थांनीं 'पुढील होणार अनुमाना आणून सोडी' अशी एके ठिकाणीं केली आहे ). सावधपणामुळें त्याचा तर्क बरोबर असतो. त्याला एकांत प्रिय असतो. तो एकांतांत पाठांतर करितो, ग्रंथांतर शोधितो. आधीं शिकून मग तो शिकवायला येतो. यामुळें लोकांत तो मान्यता

पावतो व त्याला लोकांना विवेकवळें सोडवितां येतें. त्याला प्रयत्न आवडतो. तो नाना प्रसंगांत धैर्यानें शिरतो व धीटपणानें प्रगट होतो; आळसानें किंवा *भीतीनें दडून राहणारा तो नव्हे. तो संकटांत ( सांकडींत ) वाग जाणतो,* प्राप्त होईल त्या उपाधींत मिळून जाऊं शकतो व अलिप्तपणानें स्वत:चें अंतरंग कसें राखावें हेंही तो जाणतो. त्याच्यावांचून कोणतेंच काम होत नाहीं; पण तो कशांत आढळायचा नाहीं ! प्रगट नसून (गुप्तपणें) तो सर्वांना वर्तवितो. त्याच्यापासून जे शाहणे होतात ते सहजच त्याला धरून राहतात. म्हणजे त्याचा संघ फुटत नाहीं. असा धारणेचा महंत बहुतांचा आधार असतो. हे गुण उत्कृष्टपणें श्रीरामचरित्रापासून शिकावे. (३) महंतें कैसें असावें ? सारग्राही असावें. महंत कीर्तिरूपानें लहानथोरांना विदित असतो; पण हुकमी कोठें सांपडायचा नाहीं. त्याचा वेष एक कधीं नसायचा. कीर्ति-भूषण हेंच खरें भूषण आहे. वेषभूषण हें काय आहे ? चाळणेवांचून तो एक क्षण व्यर्थ दवडीत नाहीं. ओळखीचे लोक सोडून तो नित्य नवीन नवीन स्थळीं फिरतो, लोक मागें लागतात; पण हा निरिच्छ असतो. 'पुर्ते कोणाकडे पाहेना। पुर्ते कोणासी बोलेना। जातो स्थळ तें सांगेना। आपुली स्थिति अनुमाना। येऊंचि नेदी।' हा याचा थाट ! लोकांनीं याच्या विरहित जें करावें, जें भावावें, जें तर्कावें तें सर्व हा निर्फळ करून दाखवितो ! लोकास याला पहायचा आदर–याचा तेथें अनादर ! लोक सेवेस उत्सुक–हा निरिच्छ ! याची वागणूक पाहून लोक मनांत लज्जित होतात. हीं योगे-श्वराचीं लक्षणें सांगितलीं. सर्व उत्तम गुण स्वत: घेऊन हा लोकांस शिक-वितो, उदंड समुदाय करितो; पण गुप्तरूपें (बकवा करीत नाहीं). कामाची याच्या मागें गर्दी. हा लोकांस उपासनामार्गीस लावण्यांत गर्क–मग लोक आशा इच्छित असतात. कष्ट आणि साक्षेप करण्यांत सदा तत्पर. लोकांचे अधिकार जाणून त्यांना जवळ दूर करितो, साक्षेप पाहून विश्वास धरितो; पण सर्वांवर याची छाप. हें प्रचीतीनें बोलिलें आहे. ' आधीं केलें मग सागि-तलें ' आहे ! मानेल त्यानें घ्यावें. ' महंतें महंत करावें। युक्तिबुद्धीनें भरावें। जाणतें करूनि विखरावें। नाना देशीं ' हा आमचा घेतील त्यांना उपदेश आहे. ( ह्या तीनही उताऱ्यांत समर्थांचें सक्षिप्त चरित्रच त्यांच्या मुखानें आपण ऐकत आहोंत ! )

(१७) **निस्पृह विरक्तांची शिकवण** पुढील दोन उताऱ्यांत दिली आहे. महंती अंगी बाणण्यास साधकानें कसें वागावें हेंच यांत सांगितलें आहे. (१) ही शिकवण ऐकून युक्ति, बुद्धि, शहाणपण वाढेल व समाधान राहील व अंगीं बाणल्यानंतर महंती अपाप अंगीं जडेल. निस्पृहानें कांता दृष्टि

राखों नये, विषयाची गोडी मनास चाखवूं नये व कदाचित घसरलाच तर लोकांस तोंड दाखवूं नये ! वैराग्य, ज्ञान, धारिष्ट, जळजळीत ठेवावें. 'करुणाकीर्तन सोडूं नये। अंतर्ध्यान मोडूं नये। प्रेमतंतु तोडूं नये। सगुणमूर्तीचा ॥' सगुणप्रेम राखावें. 'अपमानिता सिणों नये, निखंदिता कष्टों नये, धिःकारिता झुरों नये। कांहीं केल्या ॥' धारिष्ट व शांति ठेवावी, एकदेशी होऊं नये, परिभ्रमण करावें. 'परतंत्र होऊं नये। कांहीं केल्या !' स्वरूपस्थितीचा एकांत मोडूं नये, सदा स्वस्वरूपानुसंधान ठेवावें. अनीति, क्रोध, अतिवाद टाकावेत. उपाधी करूं नये व धरिली तर तींत सांपडूं नये. असंगपण सांभाळावें. थोरपण, मान, ममत्व यांची यत्किंचित इच्छा करूं नये. अधिकारावांचून सांगणें, दाटून उपदेश देणें, उद्धटपणें बोलणें, इंद्रियस्मरण करणें, हें सर्व वर्जावें. शिष्यास बहुसाल मागों नये. शाक्तमार्गे जाऊं नये, मी मुक्त अशा डौलांत जाऊन साधन सोडूं नये, प्रसंगावीण बोलूं नये, संशयात्मक बोलूं नये. 'निर्वाहेंवीण धरूं नये। ग्रंथ हातीं' म्ह. ग्रंथ स्वच्छ उलगडला असल्याशिवाय तो सांगूं नये. राजद्वारीं कारभारांत पडूं नये. पोटासाठीं मोलानें कीर्तन करूं नये. 'निस्पृहें अवघेंचि करावें। परी आपण तेथें न संपडावें। परस्परें उभारावें। भक्तिमार्गासीं।' कोणत्याच टोंकाला जाऊन एकांडेपण घेऊं नये. फार उपाधि नसावी, उपाधीवीण नसावें; बहुसाधनी नसावें; साधनरहित नसावें; भेद वाढवूं नयेत, वर्णसंकर करूं नये; स्वधर्म उडवूं नये, स्वधर्माचा अतिरिक्त अभिमानही धरूं नये ! अतिशय नसावा. निस्पृहानें वक्तृत्व सांडूं नये; शंका काढल्यास यथाशक्ति समाधान करावें; पण वादकलह करूं नयें व श्रोत्यांचा वीट मानूं नये. ही शिकवण चित्तीं धरल्यास सकळ सुखें वोळंगती व अकस्मात अंगीं महंती बाणते. (२) निस्पृह, महंत, योगी, विरक्त हीं नांवें एकाचींच आहेत. विरक्तानें विवेकानें रहावें, अध्यात्म वाढवावें, इंद्रियजय करावा, साधनमार्ग रक्षावा, भक्तिमार्ग चालवावा.' विरक्तें धर्मस्थापना करावी। विरक्तें नीति अवलंबावी' विरक्तें परमार्थ उजळावा, अभ्यास सोडूं नये, साक्षेपी असावे. 'विरक्तें वक्तृत्वें उभारावा। मोडला परमार्थ' हरिकीर्तनें करावीं, निरूपणें माजवावीं, भक्तिमार्गे निंदकदुर्जनें लाजवावीं. परोपकार व भलेपणाचा जीर्णोद्धार करावा. स्नानसंध्यादि पुण्यमार्ग सांभाळावा. 'दृढ निश्चयो धरावा। संसार सुखाचा करावा। विश्वजन उद्धरावा। संसर्गमात्रें' अंतरनिष्ठ असावें पण क्रियाभ्रष्ट नसावें. पराधीनपणें कनिष्ठ न व्हावें. 'विरक्तें शास्त्रें धांडोळावीं। विरक्तें मतें विभांडावीं। विरक्तें मुमुक्षें लावावीं। शुद्धमार्गे.' विरक्त व महंत या दोघांनीं मिळून मोडला परमार्थ उभारण्याचें काम करायचें आहे. (१८)) कार्यकर्त्यांच्या वतीनें समर्थांनीं रामाची **प्रार्थना**

केली आहे. तींत कार्यकर्त्यां रामोपासकांचें कल्याण व्हावें, त्यांचे शत्रु नष्ट व्हावेत, त्यांना सुखसोहळे प्राप्त व्हावेत, त्यांच्यांत परस्पर कलह नसावेत, त्यांची वुद्धि कापटचकर्मांत सहसा रत होऊं नये, त्यांचा पराजय कोठें होऊं नये, तर ते सर्वत्र विजयी व्हावेत, त्यांच्यावरील संकटें दूर होऊन ते आनंदरूप व्हावेत असें रामापाशीं वरदान मागितलें आहे !

---

## ( ४ ) परमार्थविचार–उपासना उर्फ भक्तिभाव.

(१) **मंगलाचरण:–**गणेश, शारदा, सद्गुरु व संतसज्जन यांना वंदन केलें आहे. यावर अर्थबोधक टीपा दिल्या असून गणेशशारदासद्गुरुंचें स्वरूप काय अभिप्रेत आहे याचा त्यांवरून बोध होणार आहे. येथें त्याचा प्रपंच करीत नाहीं.

( २ ) **नरदेहाचें महत्व व सार्थक :–** यावर पांच अवतरणें दिलीं असून विषय पुरा केला आहे. जो जो परमार्थाचा छंद घ्यावा तो तो नरदेहीं पूर्ण होतो. अनेक संतमुनी अनेक प्रकारें नरदेहाश्रयानेंच कृतार्थ झाले आहेत. नरदेह सहसा पराधीन नाहीं; ' परंतु हा परोपकारीं झिजवून कीर्तिरूपें उरवावा ! ' नरदेहांत कांहींही व्यंग नसून जे त्याचें सार्थक करीत नाहींत त्यांना काय म्हणावें ? सार्थक कोणतें ? 'देह परमार्थी लाविलें । तरीच याचें सार्थक जालें ! ' देह मुळीं ओल्या मातीचा आणि घर कोणाचें ? मूषक, मार्जार, श्वान, मुंगसें, पशु, सेवक, घरचीं माणसें, पाहुणे, तस्कर, राजकी ( राजसत्तेचे नोकर ), सर्वच घरावर आपली सत्ता सांगतात आणि 'हा मूर्खही म्हणे घर माझें ! ' तात्पर्य, देहगेहावर सत्ता नसून मोहानें जीव यांना कवटाळतो; पण परमार्थांत व परोपकारांत झिजवूनच नरदेहाचें सार्थक करावें. इहलोक आणि परलोक दोन्ही साध्य करण्याचें मुख्य साधन नरदेह. या देहांत पुरुषोत्तम राहतो म्हणून याचें महत्त्व. त्या ' सर्वोत्तमाला ' ओळखावें. पूर्वपुण्यानेंच नरदेह प्राप्त होतो. मनुष्यत्व, त्यांत सत्कुलीं जन्म, त्यांत पुन्हा ब्राह्मणदेह, त्यावर संध्यास्नानादिकांनीं तो पवित्र राखण्याची सद्वासना व वर सत्संग आणि सर्वांवर कळस म्ह. भगवद्भक्ति; हें सर्व प्राप्त होणें केवढें थोर सुकृत आहे ! विध्युक्त ब्रह्मकर्म, दया–दानधर्म, भक्ति, ज्ञान कांहीं तरी सन्मार्ग धरून याचें सार्थक करावें, आत्महित साधावें. असो. पांचवा उतारा (द. ३, स. १०) अत्युत्कृष्ट आहे. संसार हा

महासागर असून त्यांत भगवद्भक्ति हेंच परम सार आहे असें अति गोड व भेदकवाणीनें येथें सांगितलें आहे. ' भगवंत भावाचा भुकेला ' ' धन्य तेचि दैवाचे । भाविक जन ' ' जैसा भाव जयापाशीं । तैसा देव तयासी ' ' आयुष्य हेंचि रत्नपेटी ' ' हरिभक्त वैभवें कनिष्ठ । परी तों ब्रह्मादिकां वरिष्ठ ' इ. अनेक मधुर वचनें यांत आहेत. हा नित्यपाठांत ठेवावा. अंतःकरणाचा कठोरपणा मोडून त्यांत कोमल भक्तिभाव उत्पन्न करण्याचें सामर्थ्य समर्थांच्या वाणींत कसें आहे हें येथें पहावें.

( ३ ) **नवविधा भक्ति :**—देवाची भक्ति करणें हें आयुष्याचें सार्थक; पण ती भक्ति कशी करावी हें यांत संक्षेपानें सांगितलें आहे. श्रवण, कीर्तन, स्मरण, पादसेवन, अर्चन, वंदन, दास्य, सख्य व आत्मनिवेदन ह्या नवविधा प्रकारानें भगवंतास भजावें. वैकुंठास पावायचा नऊ पायऱ्यांचा हा सोपान. ह्या नवविधाभक्तींत काय सांगितलें आहे? **श्रवणभक्ति** ही तळची पायरी व आत्मनिवेदन ही वरची पायरी. परमार्थबुद्धिपोषक असे नाना ग्रंथ ऐकावे, नानाशास्त्रें धांडोळावीं, चौदा विद्या चौसष्ट कळा सर्व कांहीं ऐकावें; परंतु त्यांतून सार शोधून घ्यावें. देव सगुणनिर्गुण उभयरूप आहे. म्हणून 'सगुणाचीं चरित्रें ऐकावीं, कां ते निर्गुण अध्यात्में शोधावीं' म्हणजे उपासना आणि ज्ञान दोन्ही प्रकारानें देवाची ओळख होते. 'ऐसें श्रवण सगुणाचें । अध्यात्मनिरूपण निर्गुणाचें । विभक्ति सांडून भक्तीचें । मूळ शोधावें' ही सारभूत ओवी आहे. विभक्ति म्ह. वेगळेपण, भिन्नपण, तें सांडून भक्तीचें म्ह. अनन्यतेचें, समरसतेचें मूळ शोधावें. हें श्रवणभक्तीचें तात्पर्य आहे. [ सन्मुखानें श्रवण घडल्याशिवाय परमार्थाची प्रवृत्तिच होत नाहीं. म्हणून श्रवणभक्तीवर समर्थांचा फार भर आहे. ) 'परी तें श्रवणअभ्यासें । पाविजे ब्रह्म ' (दा. ७–२–७), श्रवणनिरूपण (द. ७ स. ८।९ व द. १७ स. ३), श्रोते स्तवन ( द. १ स. ६ ) श्रोता (द. ७ स. १), श्रोते अवलक्षण ( द. १८ स. १० ) इत्यादि प्रसंगानें दासबोधांत श्रवणभक्तीसंबंधानें समर्थांनीं पुष्कळ विवेचन केलें आहे तें मुळांत पाहावें. ] **कीर्तनभक्तीला** प्रथम पाठांतर चांगलें पाहिजे. ' बहुत करावें पाठांतर । कंठीं धरावें ग्रंथांतर ' 'आपुलिया सुखस्वार्था । केलीच करावी हरिकथा ' म्ह. अत्यंत आवडीनें आपल्या स्वानंदसुखासाठीं दंभलोभमान सोडून हरिकीर्तन करावें. 'नित्य नवा हव्यास धरावा । साक्षेप अत्यंतचि करावा । हरिकीर्तनें भरावा । ब्रह्मगोळ अवघा !' कीर्तनांत अव्यवस्थित किंवा संशयाचें बोलूं नये; पूर्वपक्ष मोडून सिद्धांत बोलावा; भक्तिज्ञानवैराग्याचीं लक्षणें सांगावीत; नीतिन्यायाला व स्वधर्माचरणाला प्रोत्साहन द्यावें; साधनमार्ग

सांगावे; सगुणकथा व अध्यात्मनिरूपण करावें. 'सगुण रक्षून निर्गुण। बोलत जावें.' साधनमार्ग व सगुणभक्ति वाढवावी अथवा हें साधण्याइतका अधिकार प्राप्त झाला नसेल तर साधें प्रेमभरित गुणानुवादकीर्तन करावें. तिसरी **नामस्मरणभक्ति**. 'स्मरण देवाचें करावें। अखंड नाम जपत जावें.' अंतरीं हरीचें ध्यान व मुखीं नाम ही स्मरणभक्ति. वाचेला नामाचा छंद लावावा. नित्याचीं सर्व कर्मे करीत असतांना, संपत्काळीं व विपत्काळीं, कसल्याही प्रसंगीं, नामस्मरण सोडूं नये. बाल्य, तारुण्य, वार्धक्य सर्व अवस्थांत नाम स्मरावें. अनेक भक्त नामानें तरले आहेत. 'चहूंवर्णां नामाधिकार। नामीं नाहीं लहानथोर.' (समर्थांनीं मनाच्या श्लोकांत श्लोक ७०-१०३ नामस्मरण भक्तीचें फार गोड वर्णन केलें आहे.) चवथी भक्ति **पादसेवन**. 'सद्गुरुपदीं अनन्यपण ही पादसेवनभक्ति. सद्गुरुकृपेवांचून भवतरणोपाय नाहीं म्हणून गुरुचरण सेवावेत. म्हणजे अनुभवाचीं सर्व अंगें कळून येतात व ब्रह्मस्थिति प्राप्त होते, सर्व गुह्य कळून येतें. पांचवी **अर्चनभक्ति**. अर्चन म्हणजे देवतार्चन व देवतांचें 'शास्त्रोक्त पूजाविधान। केलें पाहिजे.' धातूच्या, पाषाणाच्या, मृत्तिकेच्या वगैरे देवतांच्या मूर्तींचें विधिपूर्वक पूजन करावें, कुळधर्म पाळावेत, तीर्थ-क्षेत्रीं तेथील देवतांची पूजा करावी; देव, ब्राम्हण, अग्नि, संत, अतिथि, गायत्री इत्यादिकांची पूजा करावी. वस्त्रालंकारनैवेद्यादि देवतांस समर्पण करावे, यथाशक्त्या नाना उपकरणसामग्री देवालयीं समर्पावी, यथाधिकार मानसपूजा करावी—ही सारी अर्चनभक्ति होय. तात्पर्य, 'काया वाचा आणि मनें। चित्तें वित्तें जीवें प्राणें। सद्भावें भगवंत अर्चणें। या नांव अर्चन-भक्ति.' साहवी **वंदनभक्ति**. देवासी वंदन करावें, संतसज्जन नमस्कारावे, देवाच्या प्रतिमा व गुरु आणि संत यांना साष्टांग नमस्कार घालावे व इतरांस अधिकारपरत्वें नमावें ही वंदनभक्ति. भक्त, ज्ञानी, विरक्त, योगी, तापसी, वेदज्ञ, शास्त्रज्ञ, पंडित, पुराणिक, याज्ञिक—'जेथें दिसती विशेष गुण। तें सद्गुरूचें अधिष्ठान' म्हणून त्यांस वंदावें. नमस्कारानें मनोमल जातात, लीनता येते, अन्यायांची क्षमा होते. तात्पर्य 'अखंड देवभक्त वंदावें.' वंदन अनन्यरूपें म्ह. निष्कपटपणें करावें. साधूला लीन-तेनें शरण गेलें असतां तो 'सुगमपंथें नेऊन घाली। जेथील तेथें.' असो. आतां सातवें **दास्यभक्तीचें** रूप पाहूं. देवाचें दास्य म्हणजे 'पडिलें कार्य तितुकें करावें' व यासाठीं 'सदा सन्निधचि असावें देवद्वारीं.' 'देवाचें वैभव सांभाळावें। न्यूनपूर्ण पडोंचि नेदावें। चढतें वाढतें वाढवावें। भजन देवाचें.' जयंत्या, पर्वें, महोत्सव हे सर्व आवडीनें पाळावेत. आठवी **सख्यभक्ति**. 'देवासीं परमसख्य करावें। प्रेमप्रीतीनें बांधावें' व 'देवास

जयाची अत्यंत प्रीती । आपण वर्तावें तेणें रीती । ' हें सख्यभक्तीचें लक्षण. देवाच्या सख्यत्वासाठीं सर्वस्वाची सांडी करावी. ' निरूपणकीर्तन कथावार्ता। देवाच्याचि सांगाव्या ।। ' ' देवाचें जें मनोगत । तेंचि आपुलें उचित ' म्हणून देवाच्या इच्छेवेगळी आपली इच्छा ठेवूं नये. आतां नववी भक्ति **आत्मनिवेदन.** आठही भक्ति बहुतांशीं सगुणाच्या असून ही नववी निर्गुणभक्ति होय. जन्ममरण हिच्यावांचून टळणेंच नाहीं. आत्मा निवेदावा. निवेदन म्हणजे काय ? ' देवासि वाहावें आपण ' तें वाहणें कसें ? ' करावें तत्वविवरण । म्हणजे कळे. ' देव कोण तो ओळखावा व आपण कोण तें अंतर्यामीं शोधावें. ज्या तत्वांचा आपला पिंड आहे तीं तत्वें शोधून त्यांचा झाडा करावा. ( पिंडब्रम्हांडांतील तत्वांचा हिशेब कळण्यासाठीं दासबोध द. १७ स. ८।९ पहा ). मी कोणतेंच तत्व नाहीं, तत्वें नाशवंत असून **मी** तत्वांहून वेगळा आहें हें जाणणें म्हणजेच तत्वझाडा करणें होय. ' तत्वें तत्व जेव्हां सरे । तेव्हां आपण कैंचा उरे ?' याप्रमाणें प्रकृतिनिरास झाला कीं एक आत्माच आहे, आपण किंवा मी कोणी नाहींच हें कळलें म्हणजे आत्मनिवेदन झालें. एक मुख्य परमात्मा व दुसरी पिंडब्रम्हांडाची धडामोड जिच्यांत होते ती अष्टधाप्रकृति (त्रिगुण व पंचभूतें यांची वळलेली).याहून ' मी ' असा कोणी नाहींच. हें उघड असून देहाहंकार वृथा लागतो तो विवेकानें नष्ट झाला कीं आत्मनिवेदन सहजच झालें. पिंडब्रम्हांडरचना पाहतां ती तत्वांचीच घडली आहे, नाना व्यक्ति तत्वांच्याच झाल्या आहेत, हें साक्षित्वानें पाहावें व साक्षित्ववृत्ति हेंही तत्व ओसरलें कीं आत्मनिवेदन झालें. आत्मा आहे स्वानंदघन आणि ' अहमात्मा ' आणि ' तत्वमसि ' हीं आहेत श्रुतीचीं वचनें. यांचें विवरण करावें म्हणजे ' आपण कैंचा तेथें ! ' निर्गुण, निरंजन, अद्वैत, परिपूर्ण, एकजिनसी आत्म्याशीं अनन्य झालें कीं तीच सायुज्यभक्ती. याप्रमाणें आत्मनिवेदन करावें व मुक्तीचा सुखसोहळा अखंड भोगावा. ' एकपणाचाही अंत ' जेथें होतो तो देवाचा एकांत पावावा, मग सर्वत्र रामच आहे.

(४) **ज्ञानोत्तरभक्ति:**— आत्मज्ञान प्राप्त झाल्यावरही भक्ति उरतेच. कर्माची परिसमाप्ति ज्ञानांत व ज्ञानाचा परिपाक म्हणजे भक्ति. या भक्तीला पराभक्ति, अद्वैतभक्ति, अभेदभक्ति, ज्ञानोत्तर भक्ति. इ. नांवें सत्पुरुषांनीं दिलीं आहेत. ज्ञान व भक्ति येथें एकरूप आहेत. एकपणाचाही अंत होऊन आत्मसमाधान पूर्ण झालें तरी साधन केलेंच पाहिजे. श्रवणाभ्यास हें मुख्य साधन होय. अभिन्नपणें ज्ञानाचें विज्ञान झालें कीं, तेंच आत्मनिवेदन. याप्रमाणें मुक्ति झाल्यावरही ज्या सगुणोपासनेच्या

आधारें हें ज्ञानविज्ञान झालें त्या सगुणाचें कृतज्ञतेनें दास्य केलें पाहिजे. भावार्थ किंवा जिव्हाळाच परब्रह्म साधून देतो म्हणून ज्ञानोत्तरही सगुण-भक्ति सोडतां नये. ज्ञानीभक्त हा प्रारब्धयोगें जगांत वर्तत असून रामाचें अनुसंधान सोडीत नाहीं. ज्या साधनमार्गानें येथवर आलों त्या साधनांतही रामच भरला आहे, या भावनेनें साधनही साध्यरूप म्ह. रामरूप होऊन जातें. मग आंतबाहेर, मागेंपुढें त्रिपुटीरहित सर्वत्र रामरूपच कोंदाटलेलें आहे या बोधसुखानें धन्यता येते.

(५) **श्रीरामसमर्थांचें अवतारकार्य** :– श्रीसमर्थांची उपासना रामाची, त्यांचें चित्त रामचरित्रीं रमलेलें, तेव्हां रामाच्या लीला त्यांनीं आवडीनें गाव्या हें साहजिक आहे. रामचरित्रांतील सुंदरकांड व युद्धकांड त्यांना विशेष प्रिय. त्यांनीं याच दोन कांडांवर श्लोकरचना केली आहे. याचीं कारणें दोन. एक तर रामानें रावणादि राक्षसांचा संहार करून देवांना बंध-मुक्त केलें व जगाला रामराज्याचें सुख दिलें. या चरित्रकथेंतच त्याचें चित्त पूर्ण रंगलें होतें व दुसरें या दोन कांडांतच मारुतिरायांचे पराक्रम वर्णिले आहेत ! प्रस्तुत उताऱ्यांत रावणवधाचाच मुख्य भाग आहे. समर्थांची वाणी त्यांच्या दोन कांडांत व भीमरूपी स्तोत्रांत जशी ओजस्वी व वीर्यवती दिसते तशीच ती प्रस्तुत प्रकरणांतही आहे. रावणानें शंकरापासून वर मिळ-विला व 'तया वरेंचि मातला । अधर्मकर्मी रातला.' लोकांना अत्यंत पीडा झाली, देव बंद पावले, नवग्रहांना दडपणारा रावण हा नवा ग्रह उत्पन्न झाला ! 'उदासली वसुंधरा.' त्रैलोक्यांतले राजे व देव त्याला भिऊं लागले. त्यानें देवांकडून नाहीं नाहीं तीं कामें करून घेतलीं. 'समीर लोटितो खडे । अरुण घालितो सडे । बहु कठीण काळ हो । समस्त पावले मोहो.' हीन-दीनासारखे देवही अंतरीं गळित होऊन बसले. 'म्हणोनि राम पावला । बहु बळें उठावला.' सीताहरणाचें निमित्त पण उन्मत्त व नीतिभ्रष्ट असुरांचा निःपात करण्यासाठीं 'प्रचंड राम कोपला !' त्यानें अचाट वानरदळें मिळ-विलीं आणि त्यांसह तो रावणावर कोसळला. वानर व दैत्य यांचें कडाक्याचें युद्ध झालें. त्याचें वीरश्रीचें वर्णन फार सुंदर आहे. ते उताऱ्यांतच पहावें. रामें रावण मारिला तेव्हां 'समस्त देव हर्षले । कुसूमभार वर्षले !' या विजयामुळें रामानें 'अनेक बंद तोडिले । समस्त देव सोडिले' अशा रामाची उपासनाही समर्थ आहे. 'रघुत्तमा उपासिती । सखेचि तेचि वाटती' समर्थ म्हणतात कीं देवांना रावणाच्या बंदांतून सोडवून पृथ्वीला सुख देणाऱ्या रामाची जे उपासना करितात ते माझे आवडते सखे होत ! 'दुष्टांचा संहार, धर्माची स्थापना' करण्यासाठीं रामाचा अवतार झाला. राम नंतर विश्रांती-

२५८३

साठीं वैकुंठास गेले व ' जनासी उपाय हनूमंत ' मागें ठेवला. एकवचनी, एकबाणी व एकपत्नी राम–रामासारखा दुसरा आहे कोण ? समर्थ म्हणतात, मी रामाची उपासना करून धन्य झालों. ' समर्थें अंगिकार केला । नानासंकटीं रक्षिला. ' ' रामानें मज दीनास वाढविलें । मर्यादेवेगळे ! ' फार काय सांगूं ? ' जें जें मनें अभिलाषिलें । तें तें समर्थें पुरविलें ! ' माझा परम समर्थ राम आपल्यासारखेंच आपल्या दीनदासालाही समर्थ करितो. उघडच आहे, ' समर्थानें समर्थ करावें । तरीच समर्थ म्हणवावें ! ' तात्पर्य, माझ्या रामानें –

देवांचे बंद सोडविले । देव स्वस्थानीं स्थापिले ।
प्राणिमात्र आनंदविले । रामराजें ॥ ५० ॥

(६) **श्रीकृष्णाची वेधशक्ति** :– समर्थ रामकृष्णांत भेद पाहणारे नव्हते. भागवतशास्त्र व कृष्णावतारही त्यांना रामावतारासारखाच प्रिय होता असें त्यांच्या अनेक स्फुटांवरून व पदांवरून स्पष्ट होतें. दुष्टदंडण व बंदमोचन कृष्णावतारांतही झालें आहे. ' कितेक मल्ल मारिले । बहु रिपू विदारिले ' कृष्णावतारांत जी अद्‌भुत मोहनी, वेधशक्ति व प्रेमळपणा आहे तो प्रस्तुत प्रकरणांत वर्णिला आहे यमुनेचा डोह, त्याकांठची सुंदर वृक्षवनराजी, पक्ष्यांचा मनोहर किलकिलाट, तेथील गाईगोपाळ-गोपींचा कृष्णप्रेमा व श्रीकृष्णाचें दिव्य रूप, याचें समर्थांनीं मनोहर वर्णन केलें आहे. ' श्रीरंगरूप सावळें । कटीं दुकूल पीवळें । सुरंग रंगली तनू । विगुंतलें मनु मनु '

(७) **देवभक्तांचें सख्य** :— मालक आणि सेवक यांच्यांतला भाडोत्री संबंध जगांत खोटा असतो, तसा प्रकार भक्तींत नाहीं. देवभक्तांचा संबंध अत्यंत जिव्हाळ्याचा व निष्कपट असतो. ' भक्तांचा देव लोभाळू । भक्तांचें मनिचें करी. ' देव दयाळू, क्षमावंत, बुद्धिदाता व भक्तांचा साभिमानी आहे. भक्त मात्र निष्कपट व अनन्य पाहिजे. जसा भाव तसा देव, ' भक्त होईल देवाचा । सर्व संसार सांडुनी ॥ त्यास वोढेल हे सृष्टी । यदर्थीं संशयो नसे. ' हरीचें सख्य ज्यानें जोडलें त्याला सारी सृष्टी अनुकूल होते, हें ' प्रत्ययाचें वाक्य ' आहे. तो दयाळु देव आपला सखा करून घ्यावा, मग वैभव पाठीस लागेल. देवाचें त्रैलोक्य भरलें आहे. भक्त घेईल किती ? अनंत भुजांचा दाता नारायण देऊं लागला तर पुरें पुरें म्हणतां थकशील. पण मौज ही आहे कीं ' भक्त तों घेईना कांहीं । देवें त्रैलोक्य दीधलें ! ' भवाच्या अंतरीं देवावांचून कसलीच कामना नसते व देवही भक्ताला

विसंवत नाहीं. देवाची दया थोर आहे. पण मूढाचा भरंवसाच बसत नाहीं, त्याला कोण काय करील ?

(८) **देवाची प्रार्थना व प्रसाद :**—संसारांत कष्टलेल्या जीवानें देवाची प्रार्थना जशी करावी व देवाचा प्रसाद पावावा तसाच गोड प्रकार येथें आहे. प्रकरण भाविकांना नित्य पाठांत ठेवावेसें वाटेल.

(९) **निग्रहनेमावांचून सगुणसाक्षात्कार नाहीं:**— 'एका भावार्थासाठीं। देव लागे भक्तापाठीं' हें समर्थांचें वचन आणि 'भक्त्याहमेकया ग्राह्यः' हें भागवतांतलें वचन, दोन्ही एकच असून 'भाव तेथें देव' हाच सर्व भाविकांचा अनुभव आहे. निग्रहनेमाचें बळ पाहिजे. देव पाहिजे तर देवाचें नित्यनेमानें पूजाध्यान केलें पाहिजे आणि हें उत्कट भक्तिभावानें केलें पाहिजे. 'सगुण मूर्तींचीं चरित्रें। श्रवण करावीं पवित्रें। ध्यानें विविधें विचित्रें। अंतरीं धरावीं.' देह पडे का देव जोडे अशी निग्रहनेमाची हांव धरून देहाचा विसर पडेतों मानसपूजाध्यानादिकांत व अखंडनामचिंतनांत निमग्न राहिल्यानें 'सगुण मूर्ति प्रगटे व शोकमोह निःशेष आटे.' यदर्थीं ( समर्थ अनुभवानें सांगतात ) संशय नाहीं.

(१०) **साक्षात्कार सांगूं नये**—'श्रीराम जयराम जयजयराम' ह्या त्रयोदशाक्षरी मंत्राचा किंवा अशाच दुसऱ्या मंत्राचा जप करावा; पण 'कोणासी कळों नेदावा। जप अंतरींच करावा.' निर्धन ठेव्याला जपतो तसें जपावें. 'जयास उपासना जैसी। तेणें स्मरावें आपुल्या देवासीं। निदिध्यास जालिया नेमेसी। साक्षात्कार होय॥' तथापि कांहीं साक्षात्कार झाला तरी तो कोणाला सांगूं नये. कां तर 'आळकेपणें सांगितला। तरी पुन्हा होणार नाहीं!' समर्थ स्पष्टपणें 'हा मी आपुले जीवींचा अनुभव सांगतों।' असें शेवटीं बजावून ठेवतात.

(११) '**वैराग्य व एकांतवास** ह्याशिवाय परमार्थ कोणाला साधला आहे ?' समर्थ बाळपणींच रामप्राप्तीसाठीं घराबाहेर पडले व एकांतांत गिरिकंदरीं रमले; त्या वेळची त्यांची स्थिति ह्या सहा श्लोकांत उत्कृष्ट व्यक्त झाली आहे. भवागारदारादिकांचा व सर्व आशाकामनाचा त्याग केल्यानेंच निष्काम राम जोडतो.

(१२) पुढील **बारा ओव्यांचें अत्यंत प्रेमळ पत्र** समर्थांनीं आपल्या पंचवटीच्या मित्रास लिहिलें आहे. समर्थ पंचवटीनजीक टाकळी येथें बारा

वर्षें (शके १५४२–५४) पुरश्चरणास राहिले होते. तेव्हां साहजिकच तेथील रामोपासकांचें त्यांचें सख्य जमलें होतें. ते तीर्थाटण करून कृष्णातीरीं शके १५६६ मध्यें गेले. त्यानंतर २।३ वर्षांत केव्हां तरी त्यांनीं हें पत्र आपल्या बरोबरीच्या रामसेवकांना (बंधुवर्गाला) लिहिलें आहे. पंचवटीच्या श्रीरामाचें सप्रेम स्मरण होऊन त्यांनीं आपल्या वतीनें रामाची प्रार्थना करण्यास तेथील प्रेमीजनांस विनविलें आहे. 'जेथें पडिली कृपादृष्टी। रघुत्तमारायाची' अशी 'परमपावन पंचवटी' समर्थांना अतिशय प्रिय वाटावी हें सहज आहे. ह्या पत्रांत समर्थांच्या मनाची पराकाष्ठेची कोमलता व्यक्त झाली आहे. त्यांची निस्सीम रामभक्ति, त्यांचा मधुर विनय, बंधुवर्गावरील त्यांचा विश्वास, 'बाळवृद्धनरनारीचें' त्यांचें अन्योन्य प्रेम, त्यांनीं पुढें उभारलेल्या संप्रदायाची–शुद्ध उपासना, विमलज्ञान, वैराग्य, ब्राम्हण्यरक्षण व गुरुपरंपरारक्षण ही–पंचसूत्री हें सर्व ह्या गोड पत्रांत व्यक्त झालें आहे.

(१३) शके १५७० मध्यें **श्रीरामाची चाफळास स्थापना** झाली. राममूर्ति येण्याची श्रीसमर्थ वाट पहात असतांना हे तीन श्लोक त्यांच्या तोंडून निघाले आहेत. 'लवे नेत्रपातें स्फुरे आजि बाहे। दिनानाथ हा राम येणार आहे!' या दोन चरणांतच जो मधुर भक्तिरस आहे त्याचा अनुभव भाविक घेवोत!

(१४–१५) समर्थांच्या करुणाष्टकांपैकीं ह्या दोन प्रकरणांत मिळून ६० उत्कृष्ट श्लोक निवडून घेतले आहेत. हे **भक्तिभावाचे उद्गार** रामरूपीं रंगून मनाशीं खेळत वारंवार गुणगुणावेत तरच त्यांतील भक्तिरस हृदयांत उतरून आनंद होईल. त्यांचा सारांश काय द्यावा? 'मजवरि करुणेचा राघवा पूर लोटीं' 'उदासीनता काळ कोठें न कंठे' 'तुजविण रामा मज कंठवेना' 'सर्वोत्तमा कैं मज भेटि देशी' 'समर्था! तुझें काय उत्तीर्ण व्हावें' 'रघुविरभजनाची वृत्ति हे राहिली हो' 'रघुविरगुण गातां वाणि हे नित्य रंगो' इ. सुधामधुर चरणांचा भक्तिसुस्वाद कोमळ मनानेंच चाखायचा आहे–'बुद्धि दे रघुनायका' ह्या स्तोत्रांत रामापाशीं काय मागायचें तें मागितलें आहे. वाचकांनीं तेंच मागावें, देवापाशीं हृदय मोकळें करावें व हा प्रेमसुखाचा मेवा मागून घ्यावा.

(१६) मारुतिरायांच्या प्रसिद्ध **भीमरूपी स्तोत्रांपैकीं** दोन उत्कृष्ट घेतलीं आहेत. पहिल्यांत वीरमारुतीचें वर्णन आहे तें ध्यानयोग्य आहे,

दुसरें करुणरसपूर्ण आहे. समर्थांची हनुमंतावरील भक्ति ह्या दोन्ही स्तोत्रांत व्यक्त झाली आहे.

(१७) **अंजनीगीत**– वीरमाता अंजना हिचें हें गीत स्त्रियांच्या तोंडीं जुन्या काळीं होतें, नवीन कुलवतींच्या पाठांत असावें ! हें वीररसपूर्ण आहे. 'माझ्या दुग्धाची हे प्रौढी । कळिकाळांची नरडी मुरडी । रावणादिक हीं बापुडीं । घुंगुरटीं जेथें.' ही वीरोक्ति वीरमारुतीच्या आईच्या तोंडींच शोभते. वीरसू मातांच्या कर्तबगारीचें बीज यांत आहे.

(१८–१९) ह्या दोन प्रकरणांत समर्थांचे कांहीं **निवडक अभंग व पदें** आहेत. तीं जरूर वाचावींत व पाठांत ठेवावींत.

(२०) **उपसंहार** प्रकरणांत समर्थांच्या राममारुतीच्या आरत्या, वरयाचना, रामदास्य, संप्रदायपरंपरा व उपसंहार इतके प्रकार आहेत.

(२१) ह्यांतील रामोपासनेनें आपलें चरित्र धन्य झालें असे समर्थांचे धन्योद्गार आहेत.

प्र० ५ ते प्र० २१ पर्यंत सर्वत्र भक्तिभावाचा अपूर्व रंग उधळला आहे. ह्या 'सारांशांत' त्यावर ब्रह्मांड लिहावेसें वाटत असून कांहींच लिहवत नाहीं. भक्तीचा आनंद ज्याचा त्यानेंच भोगावा व उपासनेचें सुख अंतरीं अनुभवावें. 'रामदास' सर्वत्र आहेतच; पण येथें (पृ.१४६ ते १८८) त्याचें अंतरंगांत दर्शन होतें. त्यांच्या हृदयांतली भक्तिमधुर कोमलता ह्या ४२ पृष्ठांत अपूर्व रीतीनें सुव्यक्त झालेली वाचकांनीं पाहावी, अनुभवावी. दासबोधादि ग्रंथांत अनेक स्थळीं त्यांचें न्यायनिष्ठुर बोलणें, त्यांची राजकारणी समाजहित बुद्धि, शंकाआशंकाप्रत्युत्तरप्रसंगीं प्रगट होणारी त्यांची न्यायनिपुण कुशाग्रता, अध्यात्मनिरूपण प्रकरणांतला त्यांचा सडेतोड स्पष्टवक्तेपणा, त्यांची जाज्वल्य असिधारातुल्य विवेकवैराग्योद्दीपक वाणी–ह्या सर्वांवर कळस त्यांची अतीव मधुर रामभक्ति होय ! आणि म्हणूनच ते 'रामदास' होत. 'मृदूनि कुसुमादपि' अशा त्यांच्या अंतरंग भक्ति-प्रेमाच्या अमृतलहरींत हें चित्त चिरकाळ रंगलेलें राहो अशी त्यांच्या चरणीं नम्र प्रार्थना आहे.

# ( ५ ) परमार्थविचार– ज्ञानविज्ञान.

(१) **परमार्थ म्ह० अध्यात्मयोग:**–परमार्थाचें स्वरूप ह्या प्रकरणांत दर्शविलें आहे. धर्म, अर्थ, काम व मोक्ष हे चार अर्थ (पुरुषार्थ) त्यांतला परम (अतिश्रेष्ठ) अर्थ जो मोक्ष, अध्यात्म, परब्रह्मवस्तु, त्याला परमार्थ म्हटलें आहे. सर्व साधकांचा हा निजस्वार्थ म्ह० स्वहित, ध्येय आहे. कर्म, ज्ञान, योग, भक्ति इ० सर्व योगांत हा समर्थ आहे. हा सत्संगांत मिळणारा असून उधारीचा नाहीं, तर तात्काळ ब्रह्मप्राप्ती करून देणारा आहे. [ 'आकाशमार्गी गुप्तपंथ' म्ह० हा परमार्थ. 'अंतरिक्षमार्ग' (दा. १–४–१३) 'पाताळलिंग ( दा. १७-१०-१) इ० निरनिराळीं नांवेंही त्याला समर्थांनीं दिलीं आहेत. 'अंतरिक्ष' म्ह० अंत: (आंत) पाहतां पाहतां (ईक्ष्=पाहणें) दिसत जाणारा मार्ग. स्थूळाच्या आंत सूक्ष्म, सूक्ष्मांत कारण, कारणापलीकडे ज्ञान, त्याच्या पलीकडे द्रष्टा, द्रष्टयापलीकडे परब्रह्म वस्तु-असा विवेकदृष्टीनें आंत आंत पाहतां सांपडणारा हा मार्ग म्हणून याला अंतरिक्ष मार्ग किंवा आकाशमार्ग ( आकाश = अंतरिक्ष ) किंवा गुप्तपंथ ( स्थूलदृष्टीनें किंवा चर्मचक्षूनें न दिसणारा पंथ ) अशी नांवें समर्थांनीं दिलीं आहेत. यालाच 'गुप्तवित्त' 'गुज' असे शब्द मनाच्या श्लोकांत योजिले असून 'लपावें अती आदरें रामरूपीं' असें म्हटलें आहे. ] हें परब्रह्म अक्षय आहे, अपार आहे. याला तस्कराचें, राजाचें, अग्नीचें, श्वापदाचें कोणाचेंही भय नाहीं. हें कोणीही नेऊं शकत नाहीं. हें चळत नाहीं, ढळत नाहीं, पालटत नाहीं, अधिकउणें होत नाहीं. याला जन्ममरण नाहीं. हें ब्रह्मांडाहून मोठें आहे (ब्रह्म – बृहत् = मोठें). नाशवंत पंचभूतें यापुढें तुच्छ आहेत. ब्रह्मादिकांना विश्राम येथेंच आहे. असा हा परमार्थ आहे. "परमार्थी तो राज्यधारी। परमार्थ नाहीं तो भिकारी। या परमार्थाची सरी। कोणास द्यावी?" परमार्थी भरावें हेंच नरदेहाचें सार्थक आहे.

(२) **सद्गुरु,सच्छिष्य व सच्छास्त्र:**–(१) परमार्थलाभ सद्गुरुकृपेवांचून होत नाहीं. हजारों ग्रंथ पाहिले, ऋद्धिसिद्धि मिळाल्या तरी नेत्रांत ज्ञानांजन घालणारे सद्गुरुच सयर्थ आहेत. रामकृष्णांनींही गुरुदास्य केलें आहे. 'सद्गुरुवीण मोक्ष पावावा। हें कल्पांतीं न घडे.' (२) नाना विद्या व नाना कला शिकविणारे अनेक गुरु असले तरी सद्गुरु वेगळा आहे. आईबाप गुरु, गायत्री मंत्रोपदेश करणारा गुरु, मंत्रतंत्रगुरु, राजगुरु, वस्तादगुरु, जगद्गुरु इ० सर्व गुरुच आहेत. 'परी जो मोक्षदाता सद्गुरु तो वेगळाचि असे.'

( ३ ) ब्रह्मज्ञानाचा उपदेश करून जीवशिवैक्य करणारा तो सद्गुरु. महावाक्याचें रहस्य प्रतीतीला आणून देईल तो सद्गुरु. विमलज्ञान, शुद्ध स्वधर्माचार, वैराग्य, निश्चयाचें समाधान, ' अंतरीं शुद्ध ब्रह्मज्ञान । बाह्य निष्ठेचें भजन ' हें सर्व सद्गुरुपाशीं असतेंच. ( ४ ) स्वेच्छाचारी, इंद्रियदमन न करविणारा, शिष्याच्या मनधरणीनें राहणारा, भीडसारू, लोभी–तो सद्गुरु नव्हे. ' नाहीं उपासनेंचा आधार, तो परमार्थ निराधार '; म्हणून ' आचार उपासना सांडिती ' अशांनीं महंती मांडली तरी ते सद्गुरु नव्हत. ( ५ ) उत्तम भूमि, उत्तम बीज, पर्जन्यवृष्टि व निगा राखणें ह्या ४ गोष्टी एकत्र मिळाल्या तरच उत्तम पीक येतें, त्याचप्रमाणें सच्छिष्य, सद्गुरु, तत्कृत शुद्धज्ञानबोध व साधनाभ्यास या चार गोष्टी एकत्र झाल्या तरच शुद्ध परमार्थाचें पीक येतें. ( ६ ) ' सद्गुरुवचनीं विश्वास पूर्ण ' हे सच्छिष्याचें मुख्य लक्षण होय. शिष्य निर्मळ, आचारशीळ, अनुतापी, विरक्त, साक्षेपी, कष्टाळू, दक्ष, प्रज्ञावंत या गुणांनीं युक्त असावा. ' जो संसारदुःखें दुखवला । जो त्रिविधतापें पोळला । तोचि अधिकारी जाला । परमार्थासी. ' ज्याला ' सद्गुरुहून देव मोठा ' वाटतो, ' ब्रह्मानंदं परमसुखदं ' ह्या श्लोकांत वर्णिलेलें सद्गुरुस्वरूप ज्याला पटलें नाहीं तो करंटा शिष्य होय. सारे देव मायेंतले, त्यांचें सामर्थ्य परिच्छिन्न, कल्पांतीं देवांना लय आहे आणि सद्गुरुस्वरूप शाश्वत आहे. सद्गुरुकृपेनें झालेल्या अपरोक्षानुभवापुढें दृश्य मावळून जातें असा ज्याचा दृढ विश्वास आहे तो सच्छिष्य होय. (७) अंतरीं विषयवासना दृढ असून लौकिकार्थ देखोदेखी उपदेश घेणारा सच्छिष्य नव्हे. ' विषयासक्तासी ज्ञान जिरेल कैचें ?' (८) गुरुशिष्यलक्षणें सांगितलीं, आतां उपदेशलक्षणें सांगतों. तत्पूर्वी ब्रह्मोपदेशाव्यतिरिक्त सर्व मंत्रतंत्र, सर्व उपदेश, सर्व लौकिक विद्यांचें व कलांचें ज्ञान हें कांहीं मोक्षदायक ज्ञान नव्हे, हें लक्षांत ठेवलें पाहिजे. (९) आतां विमळज्ञान कोणतें तें सांगतों. ' ज्ञान म्हणिजे आत्मज्ञान ' म्हणजे ' पाहावें आपणासि आपण । या नांव ज्ञान. ' देवांचा देव, मुख्यदेव, शाश्वत परब्रह्म कोणतें हें नित्यानित्यविवेकानें ओळखणें याचें नांव तें ज्ञान. जेथें अवघें दृश्य, ही पंचभौतिक सृष्टि व तिचा द्रष्टाही मावळतो तों ज्ञान. तुर्या सर्वसाक्षिणी खरी; पण साक्षित्व हीही एक वृत्ति असल्यामुळें तुर्या हें ज्ञान नव्हे. शुद्धस्वरूप आपणच आहोंत, आपण स्वयंभू व स्वयंप्रकाश आहोंत, आकाशीं मेघ तसें दृश्यजात आपल्या ठिकाणीं होतें जातें; पण आपण त्याहून वेगळे आहोंत हें जाणणें व अनुभवणें याला आत्मज्ञान म्हणतात. मी कोण याचा शोध घेत मूळ उगमापर्यंत जाऊन आपली देहातीतता ओळखणें हें खरें ज्ञान. पदार्थज्ञान हें ज्ञान नव्हे. याच ज्ञानानें आजवर थोर संतमहंत मुक्तता पावले आहेत. ज्ञानवन्हि प्रज्ज्वलित

झाला कीं दृश्याचा केर भस्मसात होऊन जातो व ज्ञानस्वरूप झाल्यानें सकल भेदभाव नष्ट होतात. दृश्य मिथ्या हा पुरा बोध झाला कीं, दृश्यावरून वृत्ति उडते आणि मग दृश्य चर्मचक्षूला दिसत असून दग्ध पटवत् होऊन जातें. याप्रमाणें आत्मनिवेदन होतें. हेंच दृढ होण्यासाठीं सद्गुरुभजन करावें व अखंड समाधान पावावें. याचें नांव आत्मज्ञान. एकांतीं स्वरूपचिंतन करावें व श्रवणमननाचा साधनाभ्यास सोडूं नये. मी मुक्त झालों. आतां इंद्रियांचीं कर्मं इंद्रियें करीत असलीं तरी माझा मुक्तपणा हलत नाहीं अशा भ्रमानें इंद्रियें स्वैर सोडशील तर आत्मसमाधान राहणार नाहीं; म्हणून साध्य होऊनही साधन करावें ! अविद्येच्या डुकल्या येऊन पुन्हा पतनाची भीति असते म्हणून श्रवणमननानें नित्य सावधानता जागृत ठेवावी. वृत्तिरहित जें ज्ञान तेथेंच पूर्ण समाधान आहे. तेथें मायेचें अनुसंधान राहत नाहीं व स्वयें ब्रह्मरूप झाल्यानें ब्रह्माचेंही अनुसंधान उरत नाहीं. परमार्थ किंवा शुद्ध आत्मज्ञान याला म्हणतात.

(३) **बद्ध, मुमुक्षु, साधक व सिद्ध** असे जीवाचे चार प्रकार आहेत किंवा जीवाच्या या चार चढत्या अवस्था आहेत. त्यांचें रूप काय आहे तें आतां सांगतों. (१) बद्ध म्ह. अंधारांतला अंध ( आंतबाहेर तम. ) कर्म कोणतें व अकर्म कोणतें, विधी काय व निषेध काय, हें कांहींच ज्याला कळत नाहीं तो बद्ध. ‘ जयास नाहीं आत्मज्ञान । हें मुख्य बद्धाचें लक्षण. ’ कोणत्याच सात्त्विक भावना बद्धाला ठाऊक नसतात, दयाधर्मपरोपकार कांहीं नाहीं. ‘ हातीं द्रव्याची जपमाळ । कांताध्यान सर्व काळ ’ यावीण बद्धाला तिसरें ठाऊक नाहीं. त्याचे ठायीं अर्थातच ‘ परमार्थाचा अनादर । प्रपंचाचा अत्यादर ’ असतो. तात्पर्य, देहबुद्धीनें बांधलेला तो बद्ध. (२) संसाराचे धक्के बसून बद्धाला कांहीं काळानें खेद झाला. ‘ जाला प्रपंचीं उदास । मनें घेतला विषयत्रास ’ दैवयोगानें कांहीं परमार्थकथा कानावर पडल्या, अनुताप झाला, स्वतःचे दोष आठवले, अंतर्यामीं पस्तावला, ‘ देवा, यांतून सोडीव ’ अशी देवाची करुणा भाकूं लागला. बंधांतून सुटावें अशी इच्छा झाली कीं त्यालाच मुमुक्षु म्हणतात. ( ३ ) अवगुणांचा त्याग करून संतास शरण गेला, संतजनीं आश्वासिला, संतांनीं आत्मज्ञानाचा बोध केला, संसारबंधांतून मोकळा होऊन दृढतेसाठीं साधन करूं लागला कीं त्याला साधक म्हणतात. अद्वैतश्रवणाची गोडी, मननाचा अभ्यास, स्वरूपानुसंधान ठेवण्याचा क्रम, मीपण त्यागून आत्मबुद्धि राहावी असा सतत प्रयत्न, हीं साधकाचीं लक्षणें समजावीं. ‘ सावध, साक्षेपी आणि दक्ष ’ तो साधक. साधकदशा पूर्णतेस आली कीं ‘ विवेकबळें गुप्त जाला । आपोआप मावळला

दिसतो, परी देखिला। नाहींच कोणी' हें वर्णन त्याला लागू पडतें. आत्मानात्मविवेकानें अनात्म (जड) टाकून आत्मरूपीं रंगला. त्याचा देह जनांस दिसतो व तो जनांत वावरतो; पण त्याचें अंतरंग कोणास कळत नाहीं. असा अंतरिक्षमार्गें चालूं लागला. तो साधक. (४) आत्मनिश्चयाच्या प्रयत्नांत असलेला साधक निश्चयरूप, नि:संदेह, निश्चळ झाला कीं त्यालाच साधु, सिद्ध, ज्ञानी, योगी, इ नांवानीं ओळखतात. 'संदेहरहित ज्ञान। निश्चयाचें समाधान' हेंच सिद्धाचें लक्षण होय. आत्मवस्तु नि:संदेह, निर्भय, निर्गुण तसाच सिद्धही समजावा. स्वरूपीं निश्चळ व नि:संदेह तो सिद्ध.

(४) **ज्ञानोत्तरही साधनाची सिद्धी:–** अनंतजन्मींचे संस्कार पुसतां पुसतां पुसले जातात, मळिण वस्त्र धुतां धुतां शुद्ध होतें, तसा साधनमार्गें जातां जातां जीव सिद्धपणास पावतो. ब्रह्मज्ञान शब्दानें कळलें तरी एकदम जीव सिद्धपदाला प्राप्त होत नाहीं, म्हणोनी 'जाणते पुरुषीं। सोडूं नये साधनांसी। नाडूं नये आपणासी। सिद्धपणें सर्वथा.' मी सिद्ध झालों असें समजून कोणी श्रवणादि किंवा ध्यानधारणादि साधन सोडील तर तो इतका वर चढून पुन्हा गडगडेल, मुक्तपणें बंधन पावेल! सिद्धांचा सिद्ध व ज्ञानवैराग्यसंपन्न असे शंकरही रामनाम चिंतन करीत असतात. शंकराहून तर वरचढ कोणी नाही! म्हणून सिद्धपणाच्या संभ्रमानें साधन सोडूं नये. भक्तीवीण ज्ञान फोल होय. म्हणून भक्तीची ओल ठेवावी. 'भक्तीवीण देव जोडे। ऐसें कल्पांतीं न घडे.' सत्संग आणि भक्तिसहित ज्ञान जो संभाळील तोच मोक्षभुवनीं प्राप्त होईल. सिद्ध होऊन बसला आणि साधन सोडून दिलें तर गोत्यांत पडेल. अशनशयनादि सोडीत नाहीं आणि नित्यनेमाचें साधन मात्र सोडलें तर जीव सिद्धपणापासून सहजच भरंगळेल. म्हणून साधनांसह सिद्ध तोच ज्ञानी! शुद्ध कर्माचरण, स्वधर्मानुष्ठान, अद्वैतश्रवण, नित्यनेम–हें ब्रह्मज्ञान झालें तरी तें वाणण्यासाठीं–केलें पाहिजे. एकवार पोटभर जेवलें तरी सामुग्री पाहिजे, तसें आत्मज्ञान झालें तरी तें मुरण्यासाठीं साधन केलें पाहिजे. 'नाहीं उपासनेचा आधार। तो परमार्थ निराधार' उपासना व स्वधर्माचार हे संभाळलेच पाहिजेत. आचार व विचार दोन्ही पाहिजेत.

(५) **निर्गुण, अचिंत्य व निरंजन ब्रह्म** याची भेटी अध्यात्मानेंच होते. गुरुगीता, योगवासिष्ठ, पार्थगीता, भागवत ह्या ग्रंथांतून अद्वैतज्ञानाचा म्ह० अध्यात्माचाच उपदेश केला आहे. कल्पनेनें चालायचें, सर्व पंथ सोडून निर्विकल्प व्हावें. 'ब्रम्ह होऊन अनुभवावें। नि:संग होऊन स्वपद गांठावें.' 'पदींहून चळों नये। करावे साधनउपाय.' सर्व साधनांहून 'कोटिगुणें

महिमा आत्मज्ञानाचा.' अंतरीचे दोष बाह्यवेषानें जात नाहीत, त्याला आत्मज्ञानच पाहिजे. सत्यस्वरूप आत्मा आहे. दृश्यपाप सोडून पुण्यपरब्रम्ह घ्यावें व त्याशीं अनन्य व्हावें. आपण स्वयंभू परब्रम्ह, देहाशीं आपला संबंध नाहीं–या बोधाशिवाय ( ब्रम्हज्ञाना–शिवाय ) इतर साधनें शीण मात्र देतील. श्रवण, मनन, निदिध्यास व साक्षात्कार याप्रमाणें ब्रम्हज्ञान उधारीचें नसून क्रमानें जातां जातां येथल्या येथेंच मोक्ष आहे. नानारत्नांच्या परीक्षा किंवा नाजुक कारभाराच्या गोष्टी करितांना सूक्ष्म बुद्धि लागते. पण ' त्यांच्या कोटिगुणें विचार । अध्यात्मग्रंथीं ' पाहिजे. कहाण्या, कथा, गोष्टी, पवाडे, अवतार-चरित्रें हीं पहावींत; पण या सर्वांपेक्षां अध्यात्मविद्येचें महत्व कांहीं और आहे ! पदार्थज्ञानाचा विचार सोडून अध्यात्मविचार पहावा, निरंजन ब्रह्मास धुंडावें. अष्टांगयोग, पिंडज्ञान ' त्याहून थोर आत्मज्ञान । तें पाहिलें पाहिजे ! ' पंचमहाभूतापलीकडे आत्मा आहे; पण विवेकानें तो जवळीच सांपडतो. मायेच्या गोंधळापलीकडे सूक्ष्मदृष्टि घालून मूळ मायेच्याही पार जावें म्हणजे शाश्वताची गांठ पडते. गुंतलेलें सूत सूक्ष्मदृष्टीनें उगवतें तसा सूक्ष्म विचार करून मग ' मानत मानत घालावें मुळाकडे. '

( ६ ) हें साध्य होण्यास **अध्यात्मश्रवण** पाहिजे व तें सत्संगीं करावें. सत्संगीं श्रवण केलें असतां निरूपण कळतें व बिंवतें. श्रवणकाळीं आपणही तदाकार व्हावें म्हणजे स्फूर्ति प्रकाशते व स्वरूपनिश्चय होतो.शरीराला रोज अन्नपाणी लागतें तसें प्रत्यहीं अध्यात्मश्रवण करावें. अद्वैतापरता ग्रंथ नाहीं; ज्या ग्रंथानें उपरति होऊन अवगुण जातात, धारिष्ट, परोपकार हे गुण अंगीं येतात, विषयवासना मोडून सारासारविचार स्फुरतो, तो ग्रंथ सत्संगीं स्वरूपानुसंधानाचा अभ्यास करील तोच मरणास मारून उरेल. जनांत असून जनावेगळा, कर्मांत असून सुटलेला, असा तोच पुरुष आत्मसमाधान पावेल व इतरांच्या उद्धारास साह्य होईल.

( ७ ) मुख्य **देवाचा शोध व निश्चय** कसा करायचा तें यांत बाळबोध रीतीनें सांगितलें आहे. गांवचा पाटील, त्याहून मोठा राजा, त्याहून मोठा महाराजा, त्याहून वरिष्ठ चक्रवर्ती, त्यापलीकडे ब्रह्मदेव, याप्रमाणें वरवर पाहतां सर्वांत श्रेष्ठ परमेश्वर ( हरिहरांचाही नियंता ) तो सत्संगीं ओळखावा. निर्गुण देव जाणणें याचें नांव ज्ञान. यावेगळी पोट भरायची विद्या ती अज्ञानांत येते. ज्ञात्याचा अनुग्रह घ्यावा व नाना देवांच्या गोंधळांत

न पडतां मुख्यदेव नाना यत्नें ओळखावा. भूतांचा अन्वयव्यतिरेक पहावा व निर्गुण देव पहावा.

( ८ ) आधीं **मुख्य देव कोण** तो पहावा व मग आपला शोध घ्यावा. पंचीकरणाचा विचार करावा. दृश्य सारें नाशवंत आहे हें जाणून अविनाशी देव पहावा. रक्तरेतापासून प्राणी, अन्नापासून रक्तरेत, औषधीपासून अन्न, पृथ्वीपासून औषधी, आपापासून पृथ्वी, तेजापासून आप, वायूपासून तेज, आकाश ( अंतरात्म्या ) पासून वायु–याप्रमाणें निर्गुण, निर्विकार, शाश्वत देवापर्यंत विवेकानें जावें. देव कळला; आतां आपण कोण तें पहावें. देह हें तत्वांचें गांठोडें. तत्वविवरण होतां त्यांत मीपण मावळतें.

( ९ ) **नाना शरीरें, नाना भाषा**, नाना पंथ, नाना दंडक, नाना देव असें हें विविध जग आहे. ' नाना मतें निर्माण जालीं । नाना पाषांडें वाढलीं.' प्रवाहासारखे लोक चालतात, कोणी कोणाला आवरायचें ? शास्त्रांचा बाजार भरला, मतामतांचा गल्बला जाला, मग 'जो जे मतीं सांपडला । तयास तेंचि थोर ' जालें. नाना पंथांचा विचार केला तर त्या सर्वांचा समावेश चतुर्विध उपासनेंत होतो. एक प्रतिमापूजा, अवतारपूजा, अंतरात्मापूजा व निर्गुणनिर्विकार. सृष्टिस्वभावानुसार या चार देवांचे उपासक जगांत आहेत. नाशवंत देव काय देणार ? चंचळ अंतरात्माही शेवटीं विनाशीच आहे. निश्चळास भजेल तो मात्र निश्चळपद पावेल. हें यथार्थ ज्ञान लक्षांत घेऊनही जाणत्यानें लोकांसारखेंच वागावें, शाश्वत ओळखून लोकां ऐसे वर्तावें ! नाना पंथ, नाना मतें भगवंताच्या प्राप्तीसाठींच प्रवृत्त झालीं आहेत. तरी चंद्रसूर्यादि व नानाविध जीव ज्यानें जन्मास घातले, हरिहरब्रह्मा ज्याचे अवतार, तो सर्वकर्ता देव ओळखावा. देवानें सृष्टि केली, सृष्टीचे पोटीं पाषाण झाले, त्या पाषाणासच अविवेकी देव म्हणतात ! आधीं कुंभार, मग मडकीं, त्याचप्रमाणें आधीं सृष्टिकर्ता देव, मग सृष्टि. पदार्थ नाशवंत व देव अविनाशी आहे. याकारणें ' भगवंत पदार्थाविगळा ' हें निश्चित. अंतःकरण, पंचप्राण यांनाही चळण आहे म्हणून हे देव नव्हत. जगदीश सर्वी असून निराळा आहे.

( १० ) दृश्य **पंचभूतात्मक** व शाश्वत देव त्याहून वेगळा. प्रगट तें असार व गुप्त तें सार ( गुरुमुखानें सार पहावें. त्रिगुणपंचभूतांहून परब्रह्म वेगळें आहे. देहबुद्धि सोडून त्याला शोधावें. ) 'स्वस्वरूपानुसंधानें तरे ।

प्राणिमात्र.' वेदशास्त्रपुराणांत भिन्नभिन्न वचनें सांपडल्यामुळें मनुष्य गोंधळतो. यासाठीं सद्गुरुसेवन ब्रह्मानुभव घ्यावा. तेथें सर्व विरुद्ध वचनांचा समन्वय लागतो. 'सृष्टि पूर्वी, सृष्टि चालतां। सृष्टी अवघी संहारतां। शाश्वत देव तत्वता। आदि अंतीं.' त्याचें वर्म संत जाणतात. म्हणून सत्संगीं देव ओळखावा. संत सांगतात, 'सगुणाचेनि आधारें। निर्गुण पाविजे निर्धारें.' म्हणून 'सगुणीं भजावें निश्चित। निश्चयालागीं.' निर्गुणनिश्चय ठरण्यासाठीं सगुणास भजावें. ही अनुभवाची खूण आहे.

(११) आतां **देव व सृष्टि** यांचा विचार करूं. ब्रह्म निर्गुण व शाश्वत. त्याच्या ठिकाणीं मी एक आहें. तें बहु व्हावें असा संकल्प उठला. या आदि-संकल्पालाच षड्गुणेश्वर, अर्धनारीनटेश्वर म्हणतात. (कां कीं, तो प्रकृतिपुरुष, शिवशक्ति, गणेशशारदा असा एकपण न मोडतां उभयरूप आहे). सर्वज्ञ, परमेश्वर, द्रष्टा, मूळपुरुष, मूळमाया हीं त्याचींच नांवें आहेत (वेदांतांत त्यालाच शबलब्रह्म किंवा सगुण म्हणतात. सर्व उपास्यांचें उपास्य तो आहे. तो सर्वांचा उगम व कार्यकर्ता आहे. कर्तृत्व तेथून प्रगटलें). त्या मूळपुरुषापासून म्ह. मूळमायेपासून गुणमाया झाली. तिच्यापासून त्रिगुण व त्रिगुणांचे देव (सत्त्वगुणी विष्णु, रजोगुणी ब्रह्मा व तमोगुणी रुद्र) निर्माण झाले. सत्त्व, जाणीव, विष्णु; रज, अर्धजाणीव व अर्धनेणीव ब्रह्मा; तम, पूर्णनेणीव, रुद्र. रज (उत्पत्ति), सत्त्व (पोषणस्थिति), तम (संहार). तमोगुणापासून पंचभूतें. त्रिगुणपंचभूतें मिळून अष्टधा प्रकृति. ही सूक्ष्मरूपानें मूळमायेंत आहे. अष्टधेपासून अनंत ब्रह्मांडें व असंख्य जीव निर्माण झाले. ही सृष्टीची कहाणी समजुतीसाठीं सांगितली. तत्वतां सृष्टि मिथ्या-'अरे जें जालेंचि नाहीं। तयाची वार्ता पुससी काई।' हा आहे सिद्धांत. 'महाद्वार वोलांडावें। मग देवदर्शन घ्यावें.' मूळ माया हें महाद्वार (विवेकानें तेथें नामदेव व सर्व संत समाधि घेतात). तें ओलांडावें म्हणजे पलीकडे शाश्वत ब्रह्म आहे. देव तो, मुख्य देव किंवा थोरला देव तो. त्याच्या प्राप्तीसाठीं सारा खटाटोप. तो निश्चळ, मूळमाया किंवा अंतरात्मादेव चंचळ व बाकी सर्व जड. जडचंचळ सोडून निश्चळ ओळखावें व त्याशीं समरस व्हावें हा मोक्ष. सृष्टीची ही कथा कहाणीच्याच रूपानें यापुढें सांगितली आहे. ती वरील विवेचन व कहाणीच्या खालच्या टीपा पाहून समजून घ्यावी. (१२) **हीच सृष्टीची कथा** जुनाट पुरुषाच्या कन्येचा

खेळ या रूपकानें मौजेनें सांगितली आहे. तीवर विस्तृत टीप दिलीच आहे. म्हणून येथें विस्तार नको.

( १३ ) **ब्रह्मज्ञान झाल्यावर सगुणभक्ति कशाला हवी ?** या शंकेचें येथें निवारण केलें आहे. मी ब्रह्म आहें एवढें ज्ञान झालें तरी इतर व्यवहार सुटलेले नाहींत, स्वपरभाव गेला नाहीं, लोकांच्या मनाप्रमाणें वागणें गेलें नाहीं–' साहेबास लोटांगणीं जावें । नीचासारिखें व्हावें । आणि देवास न मानावें । हें कोण ज्ञान ? ' बाकीचीं कामें टाकलीं नाहींत आणि भजन मात्र सोडलें तर कोणाचें काय गेलें ? देव ऋषी संत परमात्म्यास भजतात आणि ' तूं येक मानवी रंक । भजसी ना तरी काय गेलें ? ' तिसरें असें कीं ( समर्थ सांगतात ) आम्हांला उपासनेच्या योगानेंच ब्रह्मज्ञान जालें आहे. चौथें, मी सर्व करीन; पण देवाला भजणार नाहीं अशा हट्टानें तुझा देहाभिमान वाढीस लागून तूं पतनास जाशील. तात्पर्य, ज्ञानवळें जो उपासना मानणार नाहीं तो पतन पावेल; संतांची रीत अशी नाहीं. ते ज्ञानबळानें चित्तीं निरहंकार होतात व उपासना देहास लावतात. ' देहास लागली उपासना.। आपण विवेकें उरेना । ऐसी स्थिति सज्जना–। अंतरींची. ' ज्ञाता असून सगुणभजन सोडील तर तो अपेशीच होईल. ' एक गुरु एक देव । कोठें तरी असावा सद्भाव.' ब्रह्मज्ञान निर्मळ असून निष्काम भजनही जिव्हाळयाचें आहे, तर त्याची थोरवी अपार आहे.

(१४) **जनांत अनेक देवांचे उपासक** असून जे ते आपलें उपास्य निर्गुणब्रह्म आहे असें म्हणतात. याचा मेळ कसा बसतो ? असा कोणी प्रश्न केला. त्यास समर्थ उत्तर देतात; ' अरे, हा स्तुतीचा प्रकार असाच असायचा ! निर्गुण म्ह० बहुगुण व बहुगुणी आहे अंतरात्मा, आणि सर्व देव अंतरात्म्याचेच अंश आहेत. तेव्हां सर्व देवांची पूजा अंतरात्म्यासच पावते. ' पुन्हा शंका: ' मुळीं उदक घातलें तर तें सर्व पानांस पोंचतें, त्याप्रमाणें अंतरात्म्याची पूजा केली तर त्याचे अंशभूत सर्व देव संतुष्ट होतात हें म्हणणें आम्हांस पटेल; पण अन्य देवांची पूजा अंतरात्म्यास पोंचते हें म्हणणें पटत नाहीं. ' यास उत्तर: ' तुळशीच्या पानावर किंवा शेंड्यावर पाणी घातलें तरी तें क्षणही न थारतां मुळाकडेच जातें, त्याप्रमाणें देव देवतांची पूजा मूळ अंतरात्मा जो परमेश्वर त्यासच पावते. ' यावरही पुन्हा प्रश्न–' तुळस एक लहान आहे; पण वटवृक्षासारख्या मोठ्या झाडास पाणी कसें घालतां येईल ?

त्याच्या शेंड्यापर्यंत कांहीं पात्र नेतां येत नाहीं.' पुन्हा प्रत्युत्तर: 'अरे! पावसाचें पाणी वरून पडतें तर तें मुळाकडेच जातें ना? मूळ सांपडण्याइतकें पुण्य सर्वांच्याच पदरीं नसतें. तथापि वृक्षाच्या दृष्टांतावरून हें स्पष्ट झालें कीं भक्तिपूर्वक नाना देवतांची उपासना केली तरी ती परमेश्वरासच पोचते. तो परमेश्वर, अंतरात्मा, मूळमाया हा मूळ देव असून सर्व देवता त्याचेच अंश आहेत. देवदेवता यांच्या ठायीं जें सामर्थ्य दिसतें तें मूळमायेचेंच आहे. यासाठीं 'अधिकारें नाना दैवतें। भजत जावीं' सर्व देवांचा सन्मान ठेवावा, भजनपूजन करावें. तथापि हें खरें कीं मागें सांगितल्याप्रमाणें उपासना चतुर्विध मान्य केली तरी 'गुणातीत तो जगदीश पाहिला पाहिजे,' निर्गुणाला ओळखलें पाहिजे. 'कर्तृत्व वेगळें करावें। मग त्या देवास पाहावें.' कर्तृत्वाला आरंभ मूळापासून आहे. मूळमायेच्या पलीकडे निर्विकल्प, शाश्वत-अनंत परब्रह्म आहे, तें ज्ञानदृष्टीनें पाहावें व तेथेंच रहावें. श्रीमंताच्या तळघरांतलें धन सेवकांस माहीत नसतें, तसें ज्ञात्यापाशीं जें गुप्त परमात्मधन असतें तें सामान्यास कळणें शक्य नाही. सार ज्ञात्यास अवगत असतें, सामान्यजन बाह्याकारावरच संतुष्ट राहून तेवढ्याच्याच अभिमानांत गर्क असतात. पुरलेलें धन दिसण्यासाठीं डोळ्यांत अंजन घालावें लागतें, त्याप्रमाणें गुप्तपरमात्मा सत्संगतींत त्यांनीं ज्ञानांजन घातल्यावर सांपडतो. राजसंगतींत अप्रयास धनलाभ होतो 'तैसा हा सत्संग धरितां। सद्वस्तु लाभे.' दृश्याहून भिन्न पण दृश्यात ओतप्रोत भरलेला परमात्मा 'संसारत्याग न करितां, प्रपंचउपाधि न सांडितां' ही सत्संगांत प्राप्त होतो. 'याचि जन्मीं येणेंचि काळें' स्वस्वरूपानुसंधानें त्याचा लाभ होतो.

(१५) प्रकरणें १५ व १६ हीं दोन्ही मुख्य देवांच्या ओळखीसंबंधानें अत्यंत महत्वाचीं आहेत. (समर्थांनीं अध्यात्माचें पूर्ण रहस्य गुह्यागुह्य ह्यांत सांगितलें आहे. पंधराव्यांत अंतरात्मा देवाची ओळख करून दिली असून १६ व्यांत शुद्ध परब्रह्माची ओळखण केली आहे. उपासनेची कड म्ह. अंतरात्मा, मूळमाया, परमेश्वर, मूळपुरुष ही होय. पलीकडे शुद्ध ब्रह्म व अलीकडे सृष्टि. अंतरात्मा हा मधला दुवा. ज्ञान, भक्ति, योग, उपासना या सर्वांच्या साह्यानें ह्या महाद्वारापर्यंत पोंचायचें आहे. शबलब्रह्म हें, सगुण हें, उपास्याचें उपास्य हें. हरिहरब्रह्मांचें विश्रांतिस्थान हें, सर्वभूतनिवास, सर्वभूतांतरात्मा, कर्माध्यक्ष, साक्षी, निर्गुण सर्व कांहीं हे. देवोदेवींचें मूल-

स्वरूप ह्या अंतरात्मा. याच्या पलीकडे शुद्धब्रह्म. 'यतो वाचो निवर्तन्ते' 'नेति नेति' हे त्याच्या उद्देशानें निघालेले उद्‌गार आहेत. तेथें भाषा नाहीं. ब्रह्म होऊन जायचें आहे. साध्यसाधनांचा तेथें पोच नाहीं. ) असो. अंतरात्मा देव प्रथम पाहूं. रामकृष्णादि अवतारांच्या उपासना जगांत चालू आहेत. तथापि 'सकळ देवांचें मूळ । तो हा अंतरात्माचि केवळ.' नाना देव, नाना शक्ति, नाना भोग, नाना कर्तृत्व यांचें बीज हा अंतरात्माच. (परमेश्वराचीं अनंत नांवें व वर्णनें व स्तुतिस्तोत्रें सारीं या अंतरात्म्याचीं). सर्वांची, देवदेवांची व जीवमात्रांची भोगप्राप्ती या अंतरात्म्यालाच घडते. नाना देहांत तो नाना रंग खेळतो. भोगी, त्यागी, वीतरागी तो. माणसें देहाकडेच पाहातात व या अंतरात्म्यास चुकतात हें नवल आहे. त्याचें अनुसंधान पुण्यवंताशिवाय राहणें कठिण आहे. 'अंतर्निष्ठ तितुके तरले । अंतर्भ्रष्ट तितुके बुडाले.' आतां अंतरात्म्याला ओळखायची खूण सांगतों. अणुरेणूपेक्षांही सूक्ष्म जीव विश्वांत आहेत. त्यांच्या मानानें त्यांचे आकार, युक्तिबुद्धि, ज्ञान, इंद्रियें, विपयभोग सूक्ष्मच आहेत. सर्व जीवांत जीवेश्वराची वस्ती आहे. लहान किडेही ज्यांना पर्वताएवढे भासतात असे सूक्ष्म जंतु आहेत. पक्षी, सर्प, मत्य, सर्वांची एकच तऱ्हा. 'पक्ष्याएवढें थोर नाहीं। पक्ष्याएवढें लहान नाहीं.' म्ह. सूक्ष्म जीवांच्या मानानें कावळा मोठा आहे व हत्तीसारख्या जीवांच्या मानानें लहान आहे. नाना वर्ण, नाना रंग—अशीं चढतीं वाढतीं शरीरें अनंतानंत आहेत. कांहीं सुंदर, कांहीं बेढब, कांहीं कोमल, कांहीं कर्कश, कांहीं बोंगळ, कांहीं दैदीप्यमान, कांहीं भेकड, कांहीं उग्र, असे सृष्टीत अनंत प्राणी आहेत. जलांतून लहान—थोर मत्स्यादि अनेक जातीचे जीव आहेत. तसेंच अंतरिक्ष प्राणी—कांहीं असे कीं, पक्ष फुटल्यावर जे उडतात ते पुन्हा पृथ्वीला स्पर्शत नाहींत. खेचर, भूचर, जळचर, वनचर वगैरे ८४ लक्ष योनींचे अनंत जीव कोणी सांगावेत ? कित्येक इच्छादेह किंवा शापदेह आहेत. भगवंताची लीला अगाध आहे. 'शरीरभेदें आहारभेदें । वाचाभेदें गुणभेदें । अंतरीं वसिजे अभेदें । येकरूपें.' पोटापुरती अल्पस्वल्प विद्या शिकून माणसें गर्वानें ताठ होतात; पण ह्या सर्वांतर्यामीं ज्ञानस्वरूप परमेश्वराची थोरवी कोण पहातो ? त्याचा महिमा अतर्क्य आहे. आपल्या देहांतील आपल्याला कळत नाहीं. मग पिंडब्रह्मांडांतील

अमित जीवांचें काय कळणार आहे ? तथापि अल्पज्ञानानें जीव उतावळे व अहंकारी होतात हें नवल आहे. अणुप्राय जीवांच्या दृष्टीनें आम्ही विराट आहोंत, त्यांच्या हिशेबें आम्ही मार्कंडेयासारखे चिरंजीव आहोंत ! त्यांचे जीवनक्रम पाहणारे कोण आहेत ? परमेश्वराची करणी धन्य आहे. अहंकाराला जागा कोठें आहे ? 'विवेकें देवास धुंडावें। हें उत्तमोत्तम.' असो. त्या अंतरात्म्याचा–परमेश्वराचा आणखी थोडा विचार करूं. सर्व शरीरांत अंतरात्मा आहे. ईश्वर सर्व भूतांच्या हृदयांत आहे. देह अनेक; पण सर्वांतर्यामीं देव एक. रक्तरेतापासून देह होतात; पण त्यांचा अंतरात्मा एकच आहे. मोडे आणि वाढे हें देहाकडे. बीजफळन्यायानें घडामोड चालली आहे. बीज (पृथ्वी) व उदक मिळालें कीं, अंकुर येतात. बीजापासून मुळचा पृथ्वींत खोल जातात व अग्रें वर आकाशांत हेलावतात, मुळ्या पाताळीं व अग्रें अंतराळीं धांवतात. 'नानापत्रीं पुष्पीं फळीं। लिगडलीं झाडें.' मागें पहात चला. फळांवडील सुमनें (पुष्पें), सुमनावडील पानें, पानावडील काष्ठें, काष्ठांवडील मुळ्या, मुळ्यांवडील उदक, (उदक आळून पृथ्वी होते). या सकळांवडील पृथ्वी, पृथ्वीवडील आप, आपावडील तेज, तेजावडील वायु, वायुवडील आकाश :(स्वभाव अंतरात्म्याचा). तात्पर्य, सकळांवडील अंतरात्मा. त्याचा प्रत्यय घेत नाहीं म्हणून तो जवळ असून दूर वाटतो. तात्पर्य, सकळांवडील अंतरात्मा देव. अनुसंधान ठेवून त्या देवाशीं अनन्य झालें कीं प्रकृतीचे स्वभाव पालटूं लागतात. अंतरात्मा जेथें चेतला तो भाग्यवंत, तो जाणता. अंतरात्मा कळला कीं सारें कळलें. 'तया नारायणाला मनीं। अखंड आठवावें ध्यानीं। मग ते लक्ष्मी तयापासुनी। जाईल कोठें ?' पुरुषाला जपलें कीं प्रकृति अनुकूल झाली. नारायणाची सेवा केली कीं आई लक्ष्मीचें लक्ष लागलेंच. तो अंतरात्मा देव–नारायण–विश्वीं भरला आहे. त्या विश्वांतर्गत भूतपती भूतात्म्याची पूजा करीत जावी. ही खरी उपासना आहे. कोणत्याही देहांत नारायण आहे म्हणून देहाला संतोष देणें ही देहाची पूजाच होते. उपासना अशी विश्वपाळिती आहे. भूतमात्रीं अंतरात्मा हरि पहावा, भूतमात्रास सुखवावें. उपासना सर्वां ठायीं आहे. अंतरात्मा राम असा विश्वव्यापी आहे. माझी उपासना अशी आहे. ही 'नेऊन घाली निरंजना। पैलीकडे' पलीकडचा जो निरंजन शुद्धब्रह्म तेथें नेऊन सोडते, उपासना ज्ञानांत लीन होते, हें अंतरात्मा

देवाचें आवाहन झालें. आतां तो चंचळ असल्यामुळें त्याचें विसर्जन निश्चळांत होतें. सर्वावडील अंतरात्मा शोधून पाहिला व चंचळाचें निश्चल झालें. अर्थात् उपासनेंतलें देवभक्तपण तेथेंच विलीन झालें. ज्ञानाचें विज्ञान झालें, उन्मनीचा अनुभव झाला, पूर्व पक्ष संपून सिद्धांत आला. 'एकमेवाद्वितीयम्' उरलें, ह्या निवृत्तिपदीं लक्ष बैसलें, अंतरात्मा मावळला, शाश्वताचा लाभ झाला म्ह. शाश्वतच झाला, निर्विकारी मिळाला. सायुज्यमुक्ति लाभली हेंही बोलणें खुंटलें.

( १६ ) **सविकार चंचल आत्मा व निर्विकार निश्चळ शाश्वत अनंत ब्रह्म.** चतुर्विध उपासनेचा प्रकार पूर्वीं सांगितला आहेच. प्रतिमा, अवतार, अंतरात्मा व निश्चळ अशा उपासनेच्या चार परी आहेत. तथापि मुख्य देव एकच आहे; तथापि अंतरात्म्याचीच उपासना करायची आहे. कर्ता भोक्ता प्रत्यक्ष देव तोच आहे. तो 'येकचि चालवी अनेक.' त्या अंतर्देवाला ओळखावें. तीर्थयात्रा पूजादि करितां करितां त्याच्यापाशींच आलें पाहिजे. म्हणजे तत्वनिरसनाउपरी निरंजनपदलाभ होतो. अष्टधेच्या गल्बल्यापलीकडे जावें व 'चंचळ देव निश्चळ ब्रह्म' या बोधानें भ्रमरहित व्हावें. प्रचीतीवीण व्यर्थ आहे; प्रचीतीनें कर्मबंधांपासून सुटका होते. 'कर्माविगळें न व्हावें। तरी देवास कासया भजावें ?' सगुण पाहतां मूळ निर्गुणास जावें, ज्ञानानें विज्ञान पावावें. सकल भ्रमरूप आहे. 'निर्गुण ब्रह्मावेगळें अवघें। ब्रह्मरूप' म्हणून निर्गुणप्राप्तीनें निर्भ्रम व्हावें. निर्गुणब्रह्म अति निकट असून संगामुळें सर्वांस चोरलें आहे. त्यांत असून त्याला न ओळखणें, दृश्य भास उमगायचा; पण परब्रह्म उमगायचें नाहीं हें नवल आहे. दृश्यभास मिथ्या आहे व तें सत्य आहे, तें स्वानुभवें जाणावें. 'जेथें अज्ञान सरे, ज्ञान तेंही नुरे। विज्ञानवृत्ति मुरे। परब्रह्मीं.' तें अपार, असंग, अच्युत मनोवाचातीत आहे. 'संग सोडावा आपुला। मग पाहावें तयाला' आपण म्ह. मीपण म्ह. जीवपण म्ह. अज्ञान– त्याचा संग सोडावा व मग ब्रह्म पाहावें व अंगें तेंच व्हावें. देहबुद्धि आहे तोंवर ब्रह्मप्राप्ति नाहीं. देहबुद्धीच्या अंतीं सर्व ज्ञात्यांचें विश्रांतिस्थान तेंच आहे. त्याच्या लाभासाठीं सत्संगीं श्रवणाभ्यास ठेवून देहबुद्धि त्यागावी. ब्रह्माचा आनंद हीही वृत्ति जिरवली पाहिजे. निरुपाधि वस्तु होणें ही सहजसमाधि आहे. तेथें कल्पना चालत नाहीं. स्वानुभवानें कल्पना मोडावी व निर्विकल्प होऊन निर्विकल्पब्रह्म पावावें.

कल्पना चालते तोंवर ती स्वरूपीं घालावी, कीं ती कल्पनाच उरत नाहीं. अशुद्धकल्पना द्वैत उभें करिते व शुद्धकल्पना अद्वैतीं भरते. शुद्धकल्पनेनें अशुद्धकल्पना मोडावी व निर्विकल्पीं भरावें. त्या सर्वोत्तमाचें अखंडानुसंधान ठेवावें, ध्यान त्रिपुटीरहित करावें.

( १७ ) **मोक्ष किती दिवसां होतो** या प्रश्नास सावध, साक्षेपी व दक्ष अशा पुरुषास ' मुक्ति लाभे तत्क्षणीं । विश्वासतां निरूपणीं ' असें उत्तर दिलें आहे. ग्रंथांतलें अर्थप्रमेय अभ्यंतरीं घ्यावें, चित्तविक्षेप झाला तरी पुन्हा श्रवणमनन करावें व अखंड अनुसंधान ठेवावें. लोह परिसास लागतांच त्याचें सोनें होतें. गंगा सागरास मिळतांच सागररूप होते, तद्वत् निःसंग होऊन ब्रह्मीं लिगटतांच मोक्ष होतो. प्रज्ञावंत आणि अनन्य आहे त्यास तत्क्षणीं मोक्ष आहे. ' प्रज्ञेवीण अर्थ न कळे । विश्वासेवीण वस्तु ना कळे । प्रज्ञाविश्वासें गळे । देहाभिमान । ' व ' देहाभिमानाचे अंतीं । सहजचि वस्तु प्राप्ती । '

( १८ ) **सलोकता, समीपता, सरूपता व सायुज्यता** असे मुक्तीचे चार प्रकार आहेत. त्यांत पहिल्या तीन मुक्ति चळ आहेत व चौथी मात्र अचळ आहे. निर्गुणीं अनन्य होणें ही सायुज्यता, ही मुक्ति खरी. मी जीव या संकल्पानें देहबुद्धि जडते, नाना मतामतांच्या गोंधळांत जीव पडतो; पण निर्गुण आत्मा त्याहून वेगळा असून त्याशीं ' तत्वमसि ' या महाबोधानें, अनन्य होणें याचें नांव मोक्ष. ' ज्ञानविवेकें प्राणियाला । मोक्षप्राप्ति. देवाभक्तांचें मूळ शोधावें व आत्मनिवेदनभक्तीनें सायुज्यता पावावी. देहांत झाल्यावर मी मुक्त होईन हें म्हणणें खोटें आहे, हें मानूं नये. सैन्य असतांच राजा राज्य करितो, त्याप्रमाणें देह असतां व विदेहीपण भोगणें याचें नांव मोक्ष. स्वस्वरूपाच्या निदिध्यासानें मुक्तिपद मिळतें.

( १९ ) **मुक्तांचीं लक्षणें** काय सांगावींत ? मुक्तांची आत्मबुद्धि दृढ असून मी आत्माराम हें संदेहरहित समाधान त्यापाशीं असतें. वस्तु निर्गुण, तेव्हां मुक्तही वस्तुरूप झाल्यामुळें निर्गुणच होऊन राहतो. ब्रह्म अनिर्वाच्य लक्षणातीत तेंच साधूचें स्वरूप. त्याचा विवेकानें देहसंबंध सुटल्यामुळें काम, क्रोध, लोभ, मदमत्सर, शोक, हर्ष, मोह, भय, स्वार्थ इ. देहबुद्धीच्या सर्व विकारांपासून तो सुटलेला असतो, हें न सांगतांच कळणारें आहे. मुक्त किंवा साधु होऊनच मुक्ताचें स्वरूप जाणावें. पामर साधूचा देहच पाहतात. पण साधु असतो देहातीत, निर्विकार. साधु आत्मज्ञानानें पूर्ण समाधानी

असतो. ‘ साधूस ओळखतो कोण ? साधु वेगळा ? ’ ‘ विवेकें अंतरीं सुटला । वैराग्यें प्रपंच तुटला ’ याप्रमाणें साधु अंतर्बाह्य मोकळा होतो. बोलाप्रमाणें त्याची क्रिया दिसते.

( २० ) सुलभ आत्मज्ञानाचे हे चरण वाचतां वाचतां कळणारे आहेत.

( २१ ) **समर्थांचा हा पांगुळ** फार बहारीचा आहे. त्यावर सविस्तर विवरण जागचे जागींच केलेलें पाहावें. येथें पुनरुक्ति करीत नाहीं. उपासना आणि ब्रह्मज्ञान या दोहींचा अपूर्व रंग या पांगुळांत भरलेला आहे. भिंतीवर फडकें पसरून बसलेला व थंडीवाऱ्यासाठीं कांबळी घेतलेला पांगळा–याचें शब्दचित्रही मोहक आहे. सत्पुरुष जें जें भेटेल त्याशीं तादात्म्य कसे पावतात व आपला स्वरूपानंद त्यांत कसा भोगतात हें दिसेल त्यानें पाहावें, सभाग्यांनीं अनुभवावें !

—o—

## ( ६ ) विविधाविषयक प्रकरणें

( १ ) ह्यांत कवित्वाचे तीन प्रकार, कवित्वलक्षण, कवींस सूचना व कवीश्वर-वंदन यासंबंधानें समर्थांचे विचार एकत्रित केले आहेत. मनास येईल तें धीटपणें गाणारे ते धीट कवि, ग्रंथ पाहून त्याप्रमाणें रचना करणारे ते पाठकवि व दृष्टी पडेल तें तात्काळ कवितेंत रचणारे ते धीटपाठ कवि. धीटपाठ कवींच्या काव्यांत शृंगारवीरादि नवरस असतात; एक भक्तिरस मात्र नसतो. या तिघांहून प्रासादिक कवि अर्थात् वेगळे. अंतरीं सर्वोत्तमाचें ध्यान लागलेलें, वैभव, कांता, कांचन वमनप्राय झालेलें, अंतःकरण भक्ति-रंगानें रंगलेलें–अशा स्थितींत भगवत्प्रसादानें जी वाणी मुखांतून सहज स्रवते ती प्रासादिक कविता व ज्याची वाणी हरिप्रसादानें प्रसर पावते तो प्रासादिक कवि. समर्थांनीं कवींचे व काव्यांचे असे ३१४ प्रकार सांगितले आहेत. आतां कवित्व कसें असावें तें सांगतात. उत्तम काव्यसुमनमाळेवर संतभ्रमर लुब्ध असतात. कवित्व निर्मळ, सरळ, सहज कळणारें, विशाळ, कल्पनान्वित असावें. तें वाचून अनुताप, वैराग्य, ज्ञान, भक्ति यांचें उद्बोधन व्हावें, वाचकांची देहबुद्धि तुटून भगवंत प्रगटावा, द्वैत मोडून अद्वैतामृत लाभावें, संसारबंध तुटून आत्मसमाधान प्राप्त व्हावें. ज्या कवित्वपरि-

शीलनानें हे लाभ होतात ती प्रासादिक कविता, भगवंताच्या प्रसादानें स्फुरलेली ती प्रासादिक कविता, वाकी हास्यविनोद–नवरसप्लुत असलेली ती धीटपाठ कविता. कवींस सूचना समर्थांनीं हीच केली आहे कीं दृश्य-भासात्मक जग नाशवंत आहे, भूतें विनाशी आहेत, म्हणून त्यांकडे लक्ष न देतां 'अनंत संत वोळखा । मूळाकडे चुकों नका' म्ह. अनंत व शाश्वत ( संत ) परब्रह्माकडे पहा, मूळ सोडून वर्णू नका. प्रासादिक कवि ( व्यास-वाल्मीकादि ) यांचें पुढें रसभरित वर्णन केलें आहे. कवीश्वर हे शब्द-सृष्टीचे ईश्वर, सरस्वतीचें निजस्थान, साधकांचें साधन, मुमुक्षूंचें अंजन व सिद्धांचें समाधान आहेत. 'कार्यसिद्धि केवळ कवींचेनि प्रसादें' होते हें इतिहासप्रसिद्ध आहे. कवि हे जगदुद्धाराचा आधार आहेत. कवींना मी का अमृताचे मेघ म्हणू, का नवरसाचे ओघ म्हणूं, का सुखाचीं तारवें म्हणूं, का विवेकनिधीचीं भांडारें म्हणूं, का म्हणूं तरी काय ? साष्टांग भावें नमस्कार करितों व मौन धरितों.

(२) मराठी ग्रंथ व मराठी भाषा यांच्या संबंधानें समर्थ म्हणतात :— 'मराठींत आहे काय ? शहाण्यांनीं मराठी ग्रंथ पाहूं नयेत' असें म्हणणारे जे कोणी शास्त्रीपंडित आहेत त्यांचें म्हणणें मनावर घेऊं नये. अहो ! भाषे-कडे पाहायचें का अर्थाकडे पाहायचें ? बहुमोल रत्नें लोखंडाच्या पेटींत सांठविलीं आहेत म्हणून पेटीकडे पाहून शाहणा मनुष्य रत्नें टाकील काय ? पूर्ण अर्थ मराठींतून लाभतो. मग मंदबुद्धीशिवाय मराठीची हेळणा कोण करील ? द्रव्य घ्यावें, सांठवणाकडे पाहूं नये. प्राकृत ग्रंथांत सुगम आणि सप्रचीत अध्यात्मज्ञान मिळतें, व्युत्पत्तीचे श्रम न करितां सकल शास्त्रार्थ सुगम होतो व संतांच्या मुखानें हा महल्लाभ होतो. म्हणून मराठी ग्रंथाचा आदर अवश्य करावा. व्युत्पत्तीनें न कळणारें ज्ञान सन्मुखानें अनायासें कळतें. भाषेंत पालट झाला, भाषा भिन्न झाली, म्हणून कांहीं अर्थ वायां जात नाहीं. कार्यसिद्धी तर सारी अर्थापाशीच आहे. 'अर्थ सार, भाषा पोंचट' म्हणजे अर्थ हा दाणा आहे, भाषा हें बाहेरचें टरफल आहे. वाह्यांगाच्या अभि-मानानें मोक्षाची वाट मात्र वंद होते ! संस्कृतांत जो गुप्तार्थ आहे तो प्राकृतांत आल्यामुळें लोकांच्या उपयोगीं पडतो, नाहीं तर तो कळायचा आहे कोणाला ? ज्या अध्यात्मांत अनुभवाचा जिव्हाळा आहे तें मराठींत आल्यानें संस्कृतापरीसही मोलवान ठरतें. ज्ञानांत भोजनाची चाड असेल तर

शब्दांत गुंतूं नका. 'आज्य' म्हटलें काय नि 'तूप' म्हटलें काय कांहीं फरक का होतो ? अर्थाकडे दृष्टी ठेवून ब्रह्मानुभव घ्या एवढेंच सांगणें आहे. (३) 'आणि' या उभयान्वयी अव्ययाच्या योगानें गुणदोषांच्या जोड्या कशा फुटतात व सांधतात हें टीपेंत दाखवून दोन अवतरणें जेथल्या तेथें दिलीं असल्यानें येथें या विषयाचा प्रपंच करीत नाहीं. (४) भला कोण याची ही एकश्लोकी व्याख्या आहे. गुरु, देव, लौकिक व वेद यांची मर्यादा पाळून सदाचारानें चालतो तो भला. (५) समर्थांना मुलांची आवड फार असे. ते मुलांत खेळत. मुलांची मला आवड कां हें समर्थांनीं ह्या सुंदर श्लोकांत सांगितलें आहे. वयें थोर ते चोर-आंत एक, बाहेर एक असें असतात व मुलें आंतबाहेर एक असतात; शिवाय ते अहंभावामुळें विकल्पाच्या डोहांत बुडलेले असतात व लेंकरें निरहंकार असतात. 'म्हणोनी बहु आवडी रामदासी !' (६) श्रीसमर्थांचें हें खास स्वहस्तें लिहिलेलें गद्यपत्र बहुमोल आहे. त्या पत्राचा प्रसंग, त्यांतली बहार याचें विवरण पत्राच्या वरच केलें आहे. (७) श्रीराम राम हे म्हणा हा ह्या दशकाचा चतुर्थ चरण असून श्लोक सुंदर आहेत. राममंत्राचें महात्म्य स्वानुभवानें शंकर पार्वतीस सांगत आहेत. हलाहल विषभक्षणानें अंग पोळल्यावर रामनामानेंच अंगाचा दाह शमला. रामनामस्मरणापूर्वी बहुत यत्न केले; पण रामनामस्मरणाचें अद्‌भुत सामर्थ्य माझ्या प्रतीतीस आलें असें समर्थ सांगतात; 'बहुत प्रेत्न पाहिले, परंतु सर्व राहिले। विबूधपक्षरक्षणा। श्रीराम राम हें म्हणा.' व्यक्ति किंवा राष्ट्र बहुत प्रयत्न करून थकल्यावरच रामनामाकडे म्ह० भक्तीकडे वळते व मग त्याचे मनोरथ राम पूर्ण करितात हें तात्पर्य. (८) यांतही राममंत्राचा महिमा सांगितला आहे. (९) प्रारब्ध थोर का प्रयत्न थोर, ह्या पुरातन वादाचा समर्थांनीं येथें निर्णय केला आहे. दोन्ही पक्षांचें म्हणणें सरळ पुढें मांडून मग 'आधीं जें निर्माण तेंचि थोर' ह्या न्यायान्वयें प्रयत्न मूळ व म्हणून श्रेष्ठ असें ठरविलें आहे. समर्थ हे प्रयत्नाचे पुरस्कर्ते होते हें प्रपंच विचारांतील मूळ भागांत (पृ. १६ ते २१) त्यांच्या नाना उद्‌गारावरून स्पष्टच दाखविलें आहे.

(१०) उत्तम, मध्यम व अधम असे तीन प्रकार सर्वांत आहेत. मूर्ति, अंतरात्मा व निर्गुण ब्रह्म; क्षर, अक्षर व पुरुषोत्तम; लोकधाटीनें चालणारा, शास्त्राप्रमाणें चालणारा व स्वानुभवी; नेणता व गर्विष्ठ, जाणता व

शब्दबोलका आणि निर्विकल्प; कर्मनिष्ठ, उपासक व ज्ञानी याप्रमाणें चढत्या पायऱ्या येथें दर्शविल्या आहेत. यापुढें एक सुंदर पद सटीप दिलें आहे.

(११) मनुष्य संगतीनें सभाग्य किंवा करंटा होतो. म्हणून जाणत्याची व सभाग्याची संगती करावी हें यांत सांगितलें आहे. आपला मित्रही आपण व शत्रूही आपण. 'उत्तम संगतीचें फळ सुख, अधम संगतीचें फळ दुःख' म्हणून उद्योगी, सच्छील, सुबुद्धि व भाग्यवंत पुरुषाची संगत करावी व स्वकल्याण करून घ्यावें. (१२) जगांत बहुधा 'माझें माझें तुझें माझें' म्हणणारे स्वार्थी मित्रच फार. 'माझें तुझें तुझें तुझें' असें म्हणणारे निरपेक्ष, विकल्पशून्य, पूर्ण विश्वासुक मित्र विरळ! मित्र शोधून करावेत. मित्र विवेकी जाणता असावा. 'उगाच वेळ घालाया। नासके मित्र पाहिले.' पण अशा मैत्रीचा परिणाम हाच होणार कीं त्यांच्या कुबुद्धीचें व कुकर्माचें फळ मात्र भोगायचा प्रसंग यायचा! नीचसंग करूं नये, श्रेष्ठांचा संग करावा. न्यायवंत गुणग्राही व यत्नकर्ता अशाची मैत्री करावी, कीं भाग्योदय होतो. जाणत्या मित्रांचा संग 'सतां सद्भिः संगः' घडला कीं 'तेथें आनंद होतसे.' (१३) साधुजनांचीं लक्षणें व त्यांच्या संगतींत होणारा महल्लाभ याचें येथें सहज धावत्या वाणीनें गोड निरूपण केलें आहे. वाचतां वाचतां कोणासही कळणारें आहे. (१४) 'ग्रंथिचा अर्थ काढा' हे तीन शब्द, प्रत्येक चरणांत अर्थ मात्र भिन्न आहे. हें छोटेसें कूट उलगडून दाखविलें आहे. (१५) लहान मुलांस सुलभ बोधाचे हे सहा श्लोक आवडतील. ते त्यांनीं पाठ करावेत. 'तोंड धुवून स्वच्छ असावें, वयें श्रेष्ठ त्यांचा मान राखावा, आळस सोडावा, भांडण करूं नये,' 'भला रे भला बोलती तें करावें,' प्रतीतीवीण बोलूं नये, विवेक करावा. इ. (१६) वक्ता आणि श्रोता या उभयतांनाही हें प्रकरण बोधप्रद वाटेल. ज्याच्या वक्तृत्वानें श्रोत्यांची क्रिया पालटेल तो वक्ता. 'जया हृदयीं आस तो वक्ता नको' बोलासारखी क्रिया करणारा, आशारहित व निरभिमानी, समबुद्धीचा वक्ता असावा; तापट, क्रोधी नसावा. 'वक्ता पाहिजे अनुभवाचा। वक्ता नसावा पुस्तकीचा!' श्रोता सादर, मननशील असावा; वाष्कळ बहुभाष नसावा. 'एकापुढें एक बोले। अवघेचि वक्ते जाले। जैसे ते जंबुक मिळाले। कोल्हाळ करिती।' असा प्रसंग श्रोते वक्ते मूढ असले कीं होतो. श्रोता झोपाळू व जडात्मा नसावा. श्रोता अर्थांतरी सादर असल्यावर निद्रा बिचारी काय करील?

श्रोता स्वहितोद्यत असेल तरच वक्त्याच्या मुखानें येणारा ज्ञानाचा बोध प्राशन करील व परमगुह्य लाधेल. पुढील तीनही सुंदर प्रकरणें निंदा व निंदक यांजविषयींचीं आहेत. ( १७ ) जन जनार्दनस्वरूप आहेत. म्हणन जनांच्या तोंडून येणारे दोष आपल्या अंगीं आहेत असें समजून साधकानें स्वदोष काढून टाकावेत. जन सत्यच बोलतात. बरें, मिथ्या बोलत असतील तर तीं मिथ्यावचनें आपण तरी मनीं कां धरावीं ? निंदेला प्रत्युत्तर द्यायला उद्युत झालास तर तुझी देहबुद्धि अजून झडली नाहीं हेंच सिद्ध होतें आणि तुझी देहबुद्धि झडावी व तूं आत्मरूपीं स्थिर व्हावेंस हाच जनाचा तरी निंदा करण्यांत हेतु असतो ! निंदा ही शांततेनें सोसावी. ती आपल्या परमार्थबुद्धीला पोषक असते. ( १८ ) आपला मान व्हावा, लोकांनीं आपल्या पायां पडावें असें मनांत असतें. म्हणूनच निंदेमुळें तूं गांगरतोस कीं नाहीं ? मी देहातीत निर्गुणब्रम्ह आहें असें तोंडानें म्हणायचें आणि देहाची निंदा ऐकून डोकें फिरवायचें, याला काय म्हणावें ? कोणी देहाची निंदा केली तर काय परमार्थ बुडाला व विवेक देशोधडीला गेला ? निंदा ऐकून ‘ मुखश्रीचें चिन्ह पालटलें ’ तर तें काय ‘ देहबुद्धि नव्हे ? कां उगाच परमार्थाच्या गप्पा मारतां ? मायाब्रम्हाचा कूट कां करितां ? अहंकाररूप कालकूट विष पोटांत भरलेलें आम्हांस दिसत आहे ! स्तुतीनें गोड वाटणें व निंदेनें खेद होणें हें पोटांत अहंकार भरला आहे हेंच दाखवितो ! ‘ स्तुति होतां आनंदला । तो निंदा होतां रडला । या दोहींमध्यें न सांपडला । तोचि धन्य. ’ स्थूळाचें अंकित नसावें म्हणजे स्तुतिनिंदा समसमान वाटतात. आपण परनिंदा करूं नये व दुसऱ्यानें आपली निंदा केली तर देहबुद्धि उडवायला साह्य करणारा तो आपला मित्रच आहे असा विवेक करावा. ( १९ ) आतां मत्सरी नर वाग्जल्प करून ‘ सदा सर्वदा भुंकती श्वान जैसें ’ याला चांगलें कोण म्हणेल ? निंदकाला ‘ वंद्य मी व निंद्य बाकी सर्व ’ असें वाटत असतें. भले आहेत त्यांना निंदाच करावीशी वाटली तर ते स्वतःचीच निंदा करितात, ‘ स्वयें निंद्य तूं निंदिसी कोण कोणा ? ’ असें ते मनालाच विचारतात. देहच मुळीं निंद्य आहे, ‘ देहे वंदितां निंदितां निंद्य आहे ’ हें दिसतच आहे. आणखी एक विचार मनांत आणावा कीं ‘ जनीं निंदितां सूटला कोण आहे ? ‘ जन सर्वदा सर्व निंदून राहे ! । जया वर्णितां शीणली वेदवाणी । जनें निंदिला राम कोदंडपाणी ।’

निंदा हा मनुष्यस्वभावच आहे. परमात्मा राम लोकनिंदेपासून सुटले नाहींत; मग इतर ते मानव बापुडे किती? (२०) 'आहे आणि नाहीं' ही एक मौज आहे. गुणसंपन्न पुरुषाचे अंगीं कोणते दोष नाहींत व कोणते गुण आहेत हें या श्लोकांत मौजेनें सांगितलें आहे.


(२१) भाऊ भाऊ वडिलार्जित इस्टेटीसाठीं भांडतात, तसें रामभक्तिरूप वडिलार्जितासाठीं मी व दादा (श्रेष्ठ) भांडलों असें समर्थांनीं ह्या अभंगांत गमतीनें सांगितलें आहे! (२२) मोहनिद्रेची झांपड जनावर पडिली आहे; जन्मचे जन्म निद्रेंत जात आहेत व त्यामुळें प्राणी कष्ट भोगित आहेत, यावर आत्मज्ञान हा एकच उपाय आहे. 'प्रपंचपडदा पडली झांपड। राम दिसेना डोळा रे।' (२३) रजोगुण, तमोगुण व सत्त्वगुण ह्या त्रिगुणांचें वर्णन केलें आहे हें पाहून पहिले दोन टाळून सत्त्वगुण वाढवावा असा हेतु या त्रिगुणवर्णनांत आहे व म्हणून सत्वगुणाचें स्वरूप अधिक स्पष्ट दाखविलें आहे. (२४) देहदेवालयांतला देव पहावा. लोक व शाहणे लोकही देवालयांकडेच लक्ष पुरवितात; पण सर्व देवालयांत (देहांत, पिंडांत) नांदणारा एकमेवाद्वितीय प्रभु पाहणें हें ज्ञात्याचें लक्षण आहे. तो डोळ्याला दिसत नाहीं, 'त्यानें त्यासीच पाहणें' म्ह. तो स्वतः अंगें होऊनच पाहिला पाहिजे. देवालयें अनंत कोटी आहेत; पण देव एकच आहे. मूळमाया हें सर्वांत मोठें, भव्य व विशाळ असें देवालय आहे. त्याच्यापेक्षां लहान देवालयें म्ह. ब्रह्मा, विष्णु, महेश. सर्व लहान थोर देवालयांत देव एकच आहे. देवालयें जड, देव (अंतरात्मा) चंचल व 'निश्चळु निर्विकारु तो मुख्य देव निरंजनु.' ह्या छोटचा पण अतिसुंदर अष्टकांत सर्व अध्यात्मसार आलें आहे. (२५) जाणतेपणाचें व जाणत्यांचें कौतुक ह्या दोन श्लोकांत पाहण्यासारखें आहे. (२६) उगाच आरडाओरडीच्या गाण्यांत तात्पर्य नाहीं. अर्थ जाणून व अर्थरूप होऊनच गावें तर त्याची बहार आहे. शब्द शिकोन अर्थ न समजतां गाणें म्ह. तें मापटयांतल्या दाण्यासारखें, महार वाहतात त्या खजिन्याच्या पोत्यांतील द्रव्यासारखें किंवा हमालाच्या डोकी-वरील पाटींतल्या आंब्यांसारखें आहे. त्याला त्याचा उपयोग नाहीं. हें भारवाहकाचें काम करण्यापेक्षां अर्थाशीं रंगून गावें, समजून गावें हें उत्तम. (२७) मूर्खाचीं व पढतमूर्खाचीं हीं लक्षणें बहुतेकांच्या पाहण्यांत असतात. हीं वाचतांना ह्यांपैकीं शेंकडा पाऊणशेंवर लक्षणें आपल्याजवळ आहेत

किंबहुना ह्या मिषानें समर्थांनीं आमच्यासारख्यांचें चरित्रच गायिलें आहे असें बहुधा प्रत्येक वाचकास वाटल्यावांचून राहत नाहीं! ह्या लक्षणांचा पाल्हाळ येथें करीत नाहीं. तीं वाचकांनीं जेथल्या तेथेंच पहावीत. ( २८ ) नटव्यांस उद्देशून समर्थ म्हणतात कीं हे लोक शरीर व त्याचे वेष परोपरीनें नटवितात, पण यांत काय लाभ कोणास होतो ? गृहें पाहतां, पण अंतरीं कोण आहे, सर्वांला शोभा देणारा लावण्यसागर सर्वांनियामीं कसा शोभत आहे तें विचारानें पहा. देहाचें मढें नटविण्यांतच काय दंग झालांत ? जागे व्हा, अंतर्यामी देव पहा. ( २९ ) सर्व काळींच ‘ कविता गवताऐसी उदंड वाढली असे ’ असा प्रकार असतो असें दिसतें! अर्थशून्य व स्वार्थहीन कविता गवाळे लोक लिहितातच कशाला ? ( ३० ) विवेकी जाणते पुरुष नित्यानित्य विचारानें सारभूत ब्रह्म तेवढें घेतात व भाविक लोक आपल्या चित्तशुद्धीसाठीं, भक्तिप्रेमासाठीं, नामस्मरण, तीर्थव्रतपदानादि कर्मे, प्रतिमापूजा, पुराणश्रवण, मंत्रजपध्यान, नेमनिष्ठ क्रिया यांत मग्न असतात. विवेक आणि भाव दोन्ही पाहिजेत. ज्ञानाला पंचीकरण, तत्त्वविवरण व महावाक्यविचार अवश्य आहेत.

( ३१ ) ‘ वाट पुसल्यावीण जाऊं नये। फळ वोळखिल्यावीण खाऊं नये ’ इ. प्रकारचा हा व्यवहारनीतीचा बोध अवतरणांतच पहावा. ‘ प्रपंचांत सावधपण ’ ठेवून कसें वागावें हें त्यावरून चांगलें समजेल. ( ३२ ) स्त्रियाही पराधीन व पुरुषही पराधीन. स्त्रिया पुरुषाधीन व ‘ पुरुषें पोटा-कारणें विकिलें आपणांसी ’ म्हणून पुरुषही पराधीन ! ( ३३ ) मीतूंपण सोडून सुखी व्हावें. ‘ मी थोर तूं थोर ’ यांत न पडतां ‘ पहा थोरपण ईश्वराचें !’ शाश्वत निरावयव देवाचें थोरपण मनीं आणून अभिमानरहित व्हावें. ( ३४ ) अद्वैत चर्चा करावी आणि करूं नये ! चर्चेसारखी अद्वैत-भावाची क्रिया असेल तर उपयोग, नाहीं तर नुस्तें शब्दलाघव काय कामाचें ? अद्वैतशास्त्रीं प्रभूचा ठेवा आहे; पण हा सर्वांस लभ्य नाहीं. ‘अद्वैतचर्चा गुरुगम्य आहे। कंळे म्हणे तो सहसा न साहे.’ यासाठीं ‘अद्वैतचर्चा (शब्दलाघव) सांडून सगुण रामाचें भजन करावें. ( ३५ ) काम, क्रोध, मद, मत्सर, दंभ व प्रपंच ह्या रिपूंचें यांत वर्णन आहे. कामाचे दास होऊन किती तरी लोक व्याधिग्रस्त होतात. रूप, शक्ति द्रव्य, कुळ, याति यांची हानी करून घेतात. विधिपूर्वक विषयसेवनांत दोष नाहीं.

'विधीनें विषया घ्यावें । अविधी नसतां वरें । आश्रमी न्यायनीतीनें प्रपंच करणें सुखें.' क्रोधानें अविवेक संचरून लोक करंटे होतात च अधोगतीला जातात; म्हणून 'भल्यानें कोप सांडावा' देहाचा, द्रव्याचा, विद्येचा, शक्तीचा, भाग्याचा असे मद बहुत प्रकारचे आहेत. मदाला स्वतःपुढें सर्व तुच्छ वाटतें. मत्सर खऱ्याचें खोटें व खोटयाचें खरें करितो. मज नाहीं तुज साजेना हें मत्सराचें थोडक्यांत रूप आहे. स्वतः टोणपा असून ज्ञात्यास मानीत नाहीं, स्वतः भ्रष्ट असून भल्यास भ्रष्ट मानतो, लंडी रणशूराला हांसतो, इ. मत्सराचे अनेक प्रकार आहेत. मत्सर अंध करितो. ज्याला त्याला दोष दिसत नाहींत. दंभ असाच वाईट आहे. विवेक च वैराग्य जागृत ठेवून दंभादि दुर्वृत्ति उठूं देऊं नयेत. 'भक्तीचा वोळला सिंधु । दंभ तेथें दिसेचिना.' सहावा वैरी प्रपंच. प्रपंचरूप–विषयरूप चित्त झाल्यानें देव दुरावतो. प्रपंचही शेवटीं हातचा जातो व देवही नाहीं. स्त्रीपुत्रमित्रादिकांच्या मोहांत पडून निर्वाणीचा देव चुकूं नये. 'षड्रिपु जिंकिले जेणें । तोचि ज्ञानी महा भला । दीक्षेनें उद्धरी लोकां । वैरागी तो उदासीनु.' ( ३६ ) हरिकीर्तन परमप्रीतीनें करावें. सगुणमूर्तीपुढें करुणा-कीर्तन करावें व ज्ञाते समोर असले तर निर्गुणबोध सांगावा. 'लाज सांडून जनाची । आस्था सांडून धनाची' सर्वांतरीं प्रेमसुख हेलावें अशी रसाळ कथा करावी. कथेंत प्रसंगोपात्त नवरस आणले तरी 'स्त्रियादिकांचें कौतुक । वर्णूच नये.' निःशंक निर्लज्ज कीर्तन करावें. व्युत्पत्तीचा दंभ न करतां भक्तिमार्ग प्रतिष्ठावा. देव सांडून नादांत मग्न होऊं नये. याप्रमाणें आपल्या स्वानंदासाठीं हरिगुण गावे. ( ३७ ) अज्ञान वरें 'परी नायकावीं पाखांड उत्तरें.' ( ३८ ) सांगण्यापेक्षां वागणें पाहिजे. स्वतः करून दाखवावें तरच दुसऱ्यास सांगण्याची शोभा. आपल्या हातून घडत नसेल तर गप्प बसावें. आपल्याला झांकावें आणि दुसऱ्याला शिकवावें हा सामान्य जनांचा दंडकच पडून गेला आहे ! आपण वागावें, मग दुसऱ्याला सांगण्याचीच गरज नाहीं. न सांगतां ते आपली क्रिया पाहूनच मार्गाला लागतील. तूं सुखी व समा-धानी झालास कीं पुरें. लोकांकडे पहायलाच नको. ( ३९ ) गुरुगम्य ज्ञानाचा अनुभव चार श्लोकांत सांगितला आहे. ( ४० ) हे दहाही श्लोक मननांत ठेवावेत. (४१) सर्वगुणसंपन्न मी आहें असें पुरुषांस व स्त्रियांसही वाटतें. पहिल्या दोन श्लोकांत पुरुषांचा व त्यापुढील दोन श्लोकांत

स्त्रियांचा अहंकार दाखविला असून पांचव्यांत तो अहंकार उडविला आहे. (४२) स्वानंदानुभवाचे हे चार उद्‌गार अति मधुर आहेत. मी आपल्यास 'मी मम' म्ह. अहंता व ममता यांच्या योगानें विसरलों असतां अकस्मात सुखसागर श्रीराम भेटला. त्यांचें स्वरूप 'दशदिशा भरलें दुरिच्या दुरी' तथापि 'दुरि म्हणों तरि तें मज अंतरीं' आहे. असें स्फुरलें. सगुण निर्गुण रामच माझा प्रीतिविषय जाला. 'न कळतें–कळलें मनि भाविलें। न दिसतें नयनेविण दाविलें' हा चमत्कार कसा सांगावा? तोच तो चपळ (चंचल) व अचपळ (निश्चळ) उभयरूप: मीच आहें; मीच सर्व नटलों आहें या वोधांत आत्मारामाचें गुणगान करीत फिरत असतों! (४३–४४) हे दोन्ही उतारे समर्थांच्या रामायणांतील आहेत. समर्थांची वर्णनशैली किती सहज–मनोहर व ओजस्वी आहे! गिरिकपाटें व वनोपवनें यांचें वर्णन किती सरळ प्रसादयुक्त आहे हें यावरून कळणार आहे. (४५) दासबोधाच्या बरोबरीचें महत्त्व ज्या मनोबोधाच्या श्लोकांना आहे त्यांपैकीं निवडक ४० श्लोक येथें घेतले असून त्यांत सर्व विषय आणले आहेत. विवेक वैराग्याचा वोध, देव अनन्य भक्ताला उपेक्षीत नाहीं, अनन्य भक्त म्ह. सर्वोत्तमाचा दास असतो कसा व वागतो कसा, परमार्थ्यांनीं वादविवाद व अहंता सोडावी, नामस्मरणाचें महत्व व गोडी व ज्ञानबोधास निरहंकारता हवी, ह्या सहा मथळ्यांखालीं ४० वेचक श्लोक घेतले आहेत. ह्यांतील रहस्य व एकंदर मनोबोधांतील रहस्य ज्यास समजावून घेणें असेल त्यानें आमचा 'सार्थ व सभाष्य मनोबोध ऊर्फ मनाचे श्लोक' हा ग्रंथ आमूलाग्र वाचून पहावा.



# श्रीसमर्थ व कल्याणस्वामी यांचें चित्र




आत्माराम दासबोध । माझें स्वरूप स्वतःसिद्ध ॥ –श्रीसमर्थ

क्रमांक ........ नों. दि. २५/..........

# श्रीसमर्थांची भूपाळी

उठा चला हो बंधूभगिनी, टाकळीस जाऊं । प्रभातीं ।
हनुमंताचें दर्शन घेऊं, रामनाम गाऊं ।। धृ. ।।

प्रभातकालीं नत होऊं या, राष्ट्रगुरुचरणीं । बंधुहो ।
अखंड जपुं या अजपाजप हा ठेवुं नित स्मरणीं ।। १ ।।

तपोभूमि ही संतजनाची, समर्थ सद्गुरुची । पावन ।
द्वादशवर्षें राहुनि केली उदंड कार्यांची ।। २ ।।

राष्ट्रकार्य हें ध्येय ठेवुनी, साधियल्या सिद्धी । कठिणतर ।
तामस अवघें काढुनि केली विमल राष्ट्रबुद्धी ।। ३ ।।

प्रज्ञा सारी दिधली तुम्ही, राष्ट्रोद्धारक ती । जनांना ।
भारतमाता मुक्त कराया सारे जन वदती ।। ४ ।।

देवधर्म-गोब्राह्मणपालन, बोधियलें जनमना । तुम्हींहो ।
सात्विक सगळें देउनि विभुचें शोभविलें जनगणां ।। ५ ।।

संतमहंतजन ठायीं ठायीं, स्थापियले मारुती । विपुल ते ।
उपासनेचा मंत्र दिव्यतम घोषविला भारतीं ।। ६ ।।

सती माउली वेणूअक्का, रामदास भक्त । प्रभावी ।
इहपरलोकीं साधियलें तें देवकार्य दत्त ।। ७ ।।

उद्धवकल्याणादि भक्तजन, स्मरूं या नित्यजनीं । सदोदित ।
उद्धरुं आपण नाम तयांचें घेउनि शांत मनीं ।। ८

समर्थ, संदेश देउं जगाला, भगवा ध्वज उभवूं । अंबरीं ।
सत्स्वरूप शिव ओंकाराची दिव्य प्रभा पाहूं ॥ ९ ॥

भजनानंदीं रंगुनि जाऊं, भक्तिरसा सेवूं । निरंतर ।
तन्मय होउनि त्यासम आपण निजानंदिं राहूं ॥ १० ॥

रामदास गुरु मेघ कृपेचा, चातक मी दीन । सद्गुरु ।
करुणेचा तूं सागर घन मी चकोर विधुकिरण ॥ ११ ॥

रामदासपदकमल प्रफुल्ल, सुमनगंध मधुर । मनोहर ।
गुंजारव मी करित पातलों रस सेवित भ्रमर ॥ १२ ॥

रामदास प्रभुदर्शन तव पद, अखंड मज द्यावें । नित्य तें ।
मम शिरिं ठेवुनि वरद हस्त तव समाधिसुख द्यावें ॥ १३ ॥

गजाननाची आर्त हांक ही, ऐकुनि तुम्ही यावें । झडकरी ।
वत्स क्षुधेनें व्याकुळ होत बहु धेनुपरिस यावें ॥ १४ ॥

ॐतत्सत

कार्यालय
श्रीपांगारकरस्मारक मंडळ,
नासिक, दिनांक १-६-५१

कवि ग. त्र्यं. बगदे
(कुलकर्णी)

# १ प्रपंचविचार

## (१) प्रपंचीं परमार्थ साधतो काय ?

(१) अरे ! जयासी परमार्थ व्हावा[1] । तेणें प्रपंच त्यजावा ।
प्रपंचीं परमार्थ करावा । तो ठाकेना[2] सर्वथा ॥ १ ॥
कारितां प्रपंचाची वृत्ति । संसारींचे झोके[3] आदळती ।
दुःखशोक पडे भ्रांति । मग परमार्थ कैंचा ? ॥ २ ॥
परमार्थ नव्हे सोपा । ज्ञानगोष्टी व्यर्थाचि बापा ।
जरी होय ईश्वरकृपा । तरीच हा प्रपंच सुटे ॥ ३ ॥
जयास वाटे वैराग्य करावें । तेणें कांहींच न विचारावें ।
उठोनि वाटेचि लागावें । दिगंताप्रती ॥ ४ ॥
परमार्थ सदृढ जडे । मोहजाळ समूळ उडे ।
हें प्रपंचीं सहसा न घडे । वैराग्यावांचुनी[4] ॥ ५ ॥
उपजतांचि वैराग्य जोडे । ऐसे परमार्थी थोडे ।
असो मग अंतरही[5] पडे । किंनिमित्त तें ऐका ॥ ६ ॥
एकासी पत्नी सांपडली । वृत्ति तियेपासी गुंतली ।
तेथून मोकळीक केली । तरी जन म्हणे 'त्यजूं नये' ॥ ७ ॥
तितुकाचि आधार पाहिला । प्राणी प्रपंचीं गुंतोनि राहिला ।
वैराग्याचा नाश केला । होय कीं प्रपंचें ? ॥ ८ ॥
जरी म्हणे 'वेद गोष्टी । तरी त्याची आज्ञा ऐकावी ॥
पुत्र जाहल्यानंतर त्यजावी । प्रपंचेसी भार्या !' ॥ ९ ॥
एकीं प्रपंचाची लालुच[6] केली । एका कुलाभिमानें लाज लाविली ।

---

१ पाहिजे, हवासा वाटतो. २ साधत नाहीं. ३ धक्के, आंदोलनें. ४ प्रपंचांत असून खरें वैराग्य बाणलें असेल तर मात्र प्रपंचीं परमार्थ साधतो. ५ अडथळे, प्रत्यवाय. ६ लालची, लोभ, आशा.

म्हणती ' वृत्तिभूमि[१] बुडाली । तरी नांव जाईल वडिलांचें !' १०
एक ते लौकिक राखती । बा रे बा ! निघोनि गेला म्हणती ।
एक ते आधार घेती । जनकादिकांचा ! ॥ ११ ॥
एक म्हणती कासयासि जावें । वैराग्य गृहींच करावें ।
आल्या अतितासी अन्न द्यावें । सेवटीं तेंही ठाकेना ! ॥१२॥
एक म्हणती वैराग्याचे दिवस । येती मग व्हावें उदास ।
तोंवरी हावें[२] सावकास । प्रपंच भोगावा॥१३॥(जु.दास.स.१८)

(२) आतां परमार्थीं बोंब मारावी । कांहीं काढाकाढी[३] करावी ।
हळु हळु सोडवावी । मिठी प्रपंचाची ॥ १४ ॥
जरी हा प्रपंच शाश्वत जाणतों । तरी आम्ही यासीच धरितों ।
हा अशाश्वत म्हणोनि रडतों । तुम्हांभोंवते ॥१५॥ (स. ११)

## (२) प्रपंच व परमार्थ

आधीं प्रपंच करावा नेटकां[४] । मग घ्यावें परमार्थविवेका ।
येथें आळस करूं नका । विवेकी हो ॥ १ ॥
प्रपंच सांडून परमार्थ कराल । तेणें तुम्ही कष्टी व्हाल ।
प्रपंच परमार्थ चालवाल । तरी तुम्ही विवेकी ॥ २ ॥
प्रपंच सांडून परमार्थ केला । तरी अन्न मिळेना खायाला ।
मग तया करंट्याला । परमार्थ कैंचा ? ॥ ३ ॥
परमार्थ सांडून प्रपंच करिसी । तरी तूं यमयातना भोगिसी ।
अंतीं परम कष्टी होसी । यमयातना भोगितां ॥ ४ ॥
साहेबकामासि[५] नाहीं गेला । गृहींच सुखावून[६] बैसला ।
तरी साहेब[७] कुटिती तयाला । पाहती लोक ॥ ५ ॥
तेव्हां महत्वाचि गेलें । दुर्जनांचें हांसें जालें ।

१ वतनदारी, इनामी जमीन वगैरे. २ उत्साहपूर्वक. ३ सुटका. ४ धड, व्यवस्थेशीर. ५ मालकाच्या, वरिष्ठाच्या. ६ सुखावून, आळसानें सुस्त होऊन. ७ धनी· ८ चोपतो.

दुःख उदंड भोगिलें। आपुल्या जीवें ॥६॥
तैसेंचि होणार अंतीं। म्हणोनी भजावें भगवंतीं।
परमार्थाची प्रचीती। रोकडी घ्यावी ॥७॥
संसारीं असतांच मुक्त। तोचि जाणावा संयुक्त[१]।
अखंड करी युक्तायुक्त-। विचारणा हे ॥८॥
प्रपंचीं जो सावधान[२]। तोचि परमार्थ करील जाण।
प्रपंचीं जो अप्रमाण। तो परमार्थीं खोटा ॥९॥
म्हणोनी सावधपणें। प्रपंचपरमार्थ साधणें।
ऐसें न करितां भोगणें। नाना दुःखें ॥१०॥
पेर्णाळी[३] पाहोन उचले। जीवसृष्टि विवेकें चाले।
आणि पुरुष होऊन भ्रमले। यासी काय म्हणावें? ॥११॥
म्हणोनी असावी दीर्घसूचना[४]। अखंड करावी चाळणा[५]।
पुढील होणार अनुमाना। आणून सोडावें ॥१२॥
सुखी असतो खबरदार[६]। दुःखी होतो बेखबर[७]।
ऐसा हा लौकिक विचार। दिसताचि आहे ॥१३॥
म्हणोनी सर्वसावधान[८]। धन्य तयाचें महिमान।
जनीं राखे समाधान। तोचि येक ॥१४॥
दीर्घसूचनेचे लोक। त्यांचा पाहावा विवेक।
लोकां करितां लोक। शहाणे होती ॥१५॥
मनुष्य पारखूं राहेना। आणि कोणाचें मन तोडीना।
मनुष्यमात्र अनुमाना। आणून सोडी ॥१६॥ (द.१२, स.१)

---

१ उत्तम योगी. २ दक्ष, जागृत. ३ पानावरची आळी, तृणजलूका—पुढील पायांनीं चांचपून, सुरक्षित जागा आहे असें पाहून, मग मागील पाय उचलते. सामान्य जीवजंतुही पुढचा विचार करून चालतात. ४ पुढील होणार तें आधींच जाणणें, दूरदर्शित्व. ५ सारासारविचार. ६ सावध ७ बेसावध. ८ प्रपंच व परमार्थ दोहींकडे सावध.

## ( ३ ) यत्नें करून प्रपंच सावरावा.

बहुतां जन्मांचा सेवट । नरदेह सांपडे अवचट[1] ।
येथें वर्तावें चोखट[2] । नीतिन्यायें ॥ १ ॥
प्रपंच करावा नेमकें[3] । पाहावा परमार्थविवेक ।
जेणेंकरितां उभय लोक । संतुष्ट होती ॥ २ ॥
राजिक[4] दैविक उद्वेग चिंता । अन्नवस्त्र देहममता ।
नाना प्रसंगें अवचिता । जन्म गेला ॥ ३ ॥
आतां ऐसें न करावें । बहुत विवेकें वर्तावें ।
इहलोक परत्र साधावें । दोहींकडे ॥ ४ ॥
सांक्षेप[5] करितां कष्टती । परंतु पुढें सुखाडती[6] ।
खाती जेवती सुखी होती । यत्नेंकरुनी ॥ ५ ॥
म्हणोनी आळस नसावा । तरीच पाविजे वैभवा ।
अत्रीं परत्रीं जीवा । समाधान ॥ ६ ॥
प्रेत्न करावा तो कोण । हेंचि ऐका निरूपण ।
सावध करूनि अंतःकरण । निमिष[7] एक ॥ ७ ॥
प्रातःकाळीं उठावें । कांहीं पाठांतर करावें ।
यथानुशक्ति आठवावें । सर्वोत्तमासी ॥ ८ ॥
मुखमार्जन प्रातःस्नान । संध्यातर्पण देवार्चन ।
पुढें वैश्वदेवउपासन । यथासांग ॥ ९ ॥
कांहीं फळाहार घ्यावा । मग संसारधंदा करावा ।
सुशब्दें राजी राखावा । सकळ लोक ॥ १० ॥

---

१ अकस्मात्. २ चोख, निर्मळ. ३ नियमपूर्वक, शिस्तीचा. ४ राजकीय परिस्थितीमुळें किंवा दैवबळानें नाना चिंताक्लेश भोगावे लागतात. अन्नवस्त्र मिळविण्याच्या यातायाती व देहवुद्धीचे विकार इ. प्रसंगांत आयुष्य सरतें. ५ उद्योग. ६ सुख भोगतात. ७ क्षणभर.

ज्याचा ज्याचा जो व्यापार । तेथें असावें खबे[१]दार ।
दुश्चि[२]तपणें तरी पोर । वेढा लावी ॥ ११ ॥
चुके ठके विसरे सांडी । आठवण जालिया चर्फडी ।
दुश्चित आळसाची रोकडी । प्रचीत पाहा ॥ १२ ॥
भोजन जालियावरी । कांहीं वाची चर्चा करी ।
येकांतीं जाऊनि विवरी । नाना ग्रंथ ॥ १३ ॥
तरीच प्राणी शाहणा होतो । नाहीं तरी मूर्खांचि राहतो ।
लोक खाती आपण पाहातो । दैन्यवाणा ॥ १४ ॥
ऐक सदेवपणाचें लक्षण । रिकामा जाऊं नेदी क्षण ।
प्रपंचव्यवसायाचें ज्ञान । बरें पाहे ॥ १५ ॥
कांहीं मेळवी मग जेवी । गुंतल्या लोकांस उगवी[३] ।
शरीर कारणीं लावी । कांहीं तरी ॥ १६ ॥
कांहीं धर्मचर्चा पुराण । हरिकथा-निरूपण ।
वायां जाऊं नेदी क्षण । दोहींकडे ॥ १७ ॥
ऐसा जो सर्वसावध । त्यास कैचा असेल खेद ।
विवेकें तुटला संबंध । देहबुद्धीचा ॥ १८ ॥
आहे तितुकें देवाचें । ऐसें वर्तणें निश्चयाचें ।
मूळ तुटे उद्वेगाचें । येणें रीती ॥ १९ ॥
प्रपंचीं पाहिजे सुवर्ण । परमार्थीं पंचीकरण ।
महावाक्याचें विवरण । करितां सुटे ॥२०॥ (द. ११, स. ३)

## ४ देव कसें काढावें ?

**प्रश्नः**—खाया नाहीं जेवाया नाहीं । ल्याया नाहीं नेसाया नाहीं ।
आंथराया नाहीं पांघराया नाहीं । कोंपटें[४] नाहीं अभागी ॥१॥

१ दक्ष, सावध. २ गैरसावधपणानें वागल्यास एखादें पोरही ठकवून जातें.
३ बध्दांना मोकळें करितो, अडचणींतून सोडवितो. ४ झोंपडी.

सोयरे नाहीं धायरे नाहीं । इष्ट नाहीं मित्र नाहीं ।
पाहतां कोठें ओळखी नाहीं । आश्रयेंवीण परदेसी ॥ २ ॥
तेणें कैसें करावें ? काय जीवेंसी धरावें ? ।
घांचावें कीं मरावें । कोण्या प्रकारें ? ॥ ३ ॥

**उत्तरः**—लहानेथोर काम नाहीं । केल्यावेगळें होत नाहीं ।
करंट्या ! सावध पाहीं । सदैवे हासी ॥ ४ ॥
म्हणोन आळस सोडावा । यत्न साक्षेपें जोडावा ।
दुश्चितपणाचा मोडावा । थारा बळें ॥ ५ ॥
मागील उजळणी पुढें पाठ । नेम धरावा निकट ।
बाष्कळपणाची वटवट । करूं नये ॥ ६ ॥
धूतवस्त्रें घालावीं पिळून । करावें चरणक्षाळण ।
देवदर्शन देवार्चन । यथासांग ॥ ७ ॥
कांहीं फळाहार घ्यावा । पुढें व्यवसाय करावा ।
लोक आपला परावा । म्हणत जावें ॥ ८ ॥
सुंदर अक्षर ल्याहावें । स्पष्ट नेमस्त वाचावें ।
विवराविवरों जाणावें । अर्थांतर ॥ ९ ॥
सावधानता असावी । नीतिमर्यादा राखावी ।
जनांस माने ऐसी करावी । क्रियासिद्धि ॥ १० ॥
आलियाचें समाधान । हरिकथा-निरूपण ।
सर्वदा प्रसंग पाहोन । वर्तत जावें ॥ ११ ॥
बहुतांचें समाधान राखावें । बहुतांस मानेल तें बोलावें ।
विरंग पडों नेदावें । कथेमध्यें ॥ १२ ॥
उदासवृत्तीस मानवे जन । विशेष कथानिरूपण ।
रामकथा ब्रह्मांड भेदून । पैलाड न्यावी ॥ १३ ॥

---

१ हेंच प्रश्नास उत्तर आहे. २ भाग्यवंत. ३ रडकेपणा सोडावा.

घालून अकलेचा पवाडे[1] । व्हावें ब्रम्हांडाहून वाडें[2] ।
तेथें कैचें आणिलें द्वाड । करंटपण ! ॥१४॥ (द.१२,स.९)

## (५) ब्राह्मणाचें कर्म.

(अभंग)

स्नान संध्या प्रदक्षिणा नमस्कार । श्राद्धपक्ष थोर सांडूं नये ॥ १
ब्राह्मणांसी वैश्वदेव-उपासना । करावें तर्पण आदरेंसीं ॥ २ ॥
करावें आलोडयें[3] वेद आणि शास्त्रें । मंत्र स्तुतिस्तोत्रें नानापरी ॥ ३ ॥
तपें पुरश्चरणें ध्यानस्थ बैसावें । सांग संपादावें देवार्चन ॥ ४ ॥
धरणीपारणीं नित्य उपोषणें । तेणें होती क्षीणें महादोष ॥ ५ ॥
काव्यें अभ्यासावीं पुराणें सांगावीं । कवित्वें करावीं सावकाश ॥ ६ ॥
दयादानधर्म करावा स्वधर्म । चुकवावें वर्म संसाराचें ॥ ७ ॥
विवेकाचा मार्ग संतसंगें कळे । उदंड निवेळे विवेकानें ॥ ८ ॥
अनाचारें ज्ञान कदा निवळेना । इहलोक कळेना परलोक ॥ ९ ॥
सांडा मागें बंड पाषांडथोतांड । चिंतावा अखंड गुणातीत ॥ १० ॥
उपासनाकर्म हें आधीं पाळावें । मग सांभाळावें ब्रह्मज्ञान ॥ ११ ॥
भक्तियोगें ज्ञान वैराग्य पाविजे । परत्रें[6] लाहिजे दास म्हणे ॥ १२ ॥

### खरा ब्राम्हण

(१) ब्राह्मणु ब्रह्मवेत्ता तो । ब्राह्मणु ब्रह्मनिश्चयी ।
ब्राह्मणु ब्रह्मस्थितीचा । ब्राह्मणु म्हणिजे गती ॥ १ ॥

(२) सोवळें कोण रे ब्राह्मणा । वोवळें कोण तें रे ॥ ध्रु० ॥
विटाळें उपजला विटाळें वाढला । विटाळेंचि मेला सावकाश ॥१॥
हाडामासाच्या सगट मोळ्या । पाणियें[7] सोवळ्या होती कैशा ॥२॥

---

१ प्रसर, विस्तार. २ मोठें, व्यापक. ३ आलोडन करावें, पारंगत व्हावें. ४ घोर पातकेंही मंद होतात, नष्ट होतात. ५ स्पष्ट होतें, आकळतें. ६ परलोक लाभतो, प्राप्त होतो. ७ पाण्याच्या योगानें.

देवाकडे मन लागतां उन्मन। सोवळा ब्राह्मण तोचि येक ॥ ३ ॥

## ( ६ ) कशानें संसार धन्य होतो ?

स्नान संध्या टिळेमाळा। अंतर्निष्ठ उपासना।
नित्यानित्यविवेकानें। धन्य संसार होतसे ॥ १ ॥
मर्यादा न्यायनीतीची। अन्याय न घडे कदा।
सन्मार्ग योग देवाचा। धन्य संसार होतसे ॥ २ ॥
अन्नोदकवस्त्रदानें। धन्य धन्य ब्राह्मणीं भजे ॥
उदासवृत्तिनें लोकीं। धन्य संसार होतसे ॥ ३ ॥
पराचे जीविंचें जाणे। अस्तिनास्ति–विचारणा[1]।
अत्यंत सर्व भूतांसी। धन्य संसार होतसे ॥ ४ ॥
होमयागपुरश्चरणें। निरूपणें हरिकथा।
ब्रह्मसंतर्पणें यात्रा। धन्य संसार होतसे ॥ ५ ॥
नवविधा भक्ति देवाची। मुख्य[2] कोण विचारणें।
अध्यात्म शोधितां सर्वे। धन्य संसार होतसे ॥ ६ ॥
पंचीकरण महावाक्य–। श्रवणें मननें सदा।
सत्संगें निःसंग होतां। धन्य संसार होतसे ॥ ७ ॥
शब्दोंचि लाभती रत्नें। शब्दरत्नें अमूल्य कीं।
कोंदणामाजि तें सोनें। तैसा अर्थ प्रचीतिचा ॥ ८ ॥

## ( ७ ) गृहस्थाश्रमी.

नाना वेष नाना आश्रम। सर्वांचें मूळ गृहस्थाश्रम।
जेथें पावती विश्राम। त्रैलोक्यवासी ॥ १ ॥
गृहस्थाश्रमीं निर्माण जाले। आपला आश्रम टाकून गेले।
परंतु गृहस्थागृहीं हिंडों लागले। कीर्तिरूपें ॥ २ ॥

---

१ होय नाहीं विचारणें, पूसतपास करून हरेक प्रकारचें साहय करणें.
२ मुख्य देवाचा शोध करणें.

याकारणें गृहस्थाश्रम । सकळांमध्यें उत्तमोत्तम ।
परंतु पाहिजे स्वधर्म[1] । आणि भूतदया ॥ ३ ॥
जेथें षट्कर्में[2] चालती । विध्युक्त क्रिया आचरती ।
वाङ्माधुर्यें बोलती । प्राणिमात्रांसी ॥ ४ ॥
कायावाचाजीवप्राणें । कष्टे भगवंताकारणें ।
मनें घेतलें धरणें । भजनमार्गीं ॥ ५ ॥
जनांस दिसे हा दृश्चित । परी तो आहे सावचित्त ।
अखंड जयाचें चित्त । परमेश्वरीं ॥ ६ ॥
उपासनामूर्तिध्यानीं । अथवा आत्मानुसंधानीं ।
नाहीं तरी श्रवणमननीं । निरंतर ॥ ७ ॥
जो दुसऱ्याचें अंतर जाणे । देशकाळप्रसंग जाणे ।
तया पुरुषा काय उणे । भूमंडळीं ? ॥ ८ ॥
बहुतांसी करी उपाय । तो जनांच्या वांट्या न ये ।
अखंड जयाचें हृदय । भगवद्रूप ॥ ९ ॥
अंतरापासून वैराग्य । तेंचि जाणावें महद्भाग्य ।
लोलंगतेयेवढें[3] अभाग्य । आणीक नाहीं ॥ १० ॥
ऐसी वृत्ति उदासीन । त्याहीवरी आत्मज्ञान ।
दर्शनमात्रें समाधान । पावती लोक ॥ ११ ॥
वेडें संसार सांडून गेलें । तरी तें कष्टकष्टींच मेलें ।
दोहींकडे अंतरलें । इहलोकपरत्रीं ॥ १२ ॥
संसार मिथ्या ऐसा कळला । ज्ञान समजोन निघोन गेला ।
तेणें जन पावन केला । आपणाऐसा ॥ १३ ॥ (द.१४,स.७)

---

१ स्वधर्माचरण व भूतदया हे दोन असले कीं गृहस्थाश्रम सर्व आश्रमांत श्रेष्ठ आहे. २ यजन, याजन, अध्ययन, अध्यापन, दान व प्रतिग्रह हीं ब्राह्मणांचीं षट्कर्में आहेत. ३ वैराग्याचे उलट लोलंगता, आसक्ति.

## (८) विवेक आणि वैराग्य.

महद्भाग्य हातासी आलें । परंतु भोगूं नाहीं जाणितलें[1] ।
तैसें वैराग्य उत्पन्न जालें । परी विवेक नाहीं ॥ १ ॥
नाना प्रपंचाच्या घोढी । नाना संकटें सांकडीं ।
संसार सांडून देशधडी । होय तेणें ॥ २ ॥
चिंतेपासूनी सुटला । पराधीनतेपासुनी पळाला ।
दुःखत्यागें मोकळा जाला । रोगी जैसा ॥ ३ ॥
परी तो होऊं नये मोकाट । नष्ट भ्रष्ट आणि चोंट[2] ।
सीमाच नाहीं सैराटें[3] । गुरूं जैसा ॥ ४ ॥
विवेकेंवीण वैराग्य केलें । तरी अविवेकें अनर्थीं घातलें ।
अवघें व्यर्थचि गेलें । दोहींकडे ॥ ५ ॥
कां व्यर्थचि ज्ञान बडबडिला । परी वैराग्ययोग नाहीं घडला ।
जैसा कारागृहीं अडकला । पुरुषार्थ सांगे ॥ ६ ॥
वैराग्येंवीण ज्ञान । तो व्यर्थचि साभिमान ।
लोभदंभें घोळसून । कासावीस केला ॥ ७ ॥
श्वान बांधलें तरी भुंके । तैसा स्वार्थमुळें थिंके[4] ।
परोधिक[5] देखों न सके । साभिमानें ॥ ८ ॥
हें येकेंवीण येक । तेणें उगाच वाढे शोक ।
आतां वैराग्य आणि विवेक-। योगें[6] ऐका ॥ ९ ॥
विवेकें अंतरीं सुटला । वैराग्यें प्रपंच तुटला ।
अंतर्बाह्य मोकळा जाला । निःसंग योगी ॥ १० ॥
जैसें मुखें ज्ञान बोले । तैसीच सवें[7] क्रिया चाले ।
दीक्षा देखोनि चकित जाले । शुचिष्मंत ॥ ११ ॥

---

१ जाणलें. २ बाष्कळ, चावट. ३ मोकळें. ४ बडबडतो. ५ दुसऱ्याचा अधिकपणा, मोठेपणा. ६ विवेकही पाहिजे व वैराग्यही पाहिजे. ७ बरोबर.

आस्था नाहीं त्रैलोक्याची । स्थिति बाणली वैराग्याची ।
यत्नविवेकधारणेची । सीमा नाहीं ॥ १२ ॥
प्रखर वैराग्य उदासीन । प्रत्ययाचें ब्रह्मज्ञान ।
स्नानसंध्या भगवद्भजन । पुण्यमार्ग ॥ १३ ॥
विवेकवैराग्य तें ऐसें । नुस्तें वैराग्य हेकाडेपिसें[1] ।
शब्दज्ञान येळिलसें[2] । आपणाचि वाटे ॥ १४ ॥ (द.१२,स.

## ( ९ ) विषयत्यागाचें वर्म.

( १ )

**प्रश्नः**—बहुतीं विषय निंदिले । आणि तेचि सेवित गेले ।
विषयत्यागें देह चाले । हें तों घडेना ॥ १ ॥
बोलणें एक चालणें एक । याचें नांव हीनविवेक ।
येणकरितां सकळ लोक । हांसों लागती ॥ २ ॥
विषयत्यागेंवीण तों कांहीं । परलोक प्राप्त नाहीं ।
ऐसें बोलणें ठाईं ठाईं । बरें पाहा ॥ ३ ॥
प्रपंचीं खाती जेविती । परमार्थीं काय उपवास करिती ? ।
उभयतां सारिखे दिसती । विषयांविषयीं ॥ ४ ॥
देह चालतां विषय त्यागी । ऐसा कोण आहे जगीं ? ।
याचा निर्वाह[3] मजलागीं । देवें निरोपावा ॥ ५ ॥
विषय अवघाचि त्यागावा । तरीच परमार्थ करावा ।
ऐसें पाहतां गोवा[4] । दिसतो कीं ! ॥ ६ ॥
**उत्तरः**—वैराग्यें करावा त्याग । तरीच परमार्थयोग[5] ।
प्रपंचत्यागें सर्व सांग । परमार्थ घडे ॥ ७ ॥
मागें ज्ञानी होऊन गेले । तेंहीं बहुत कष्ट केले ।

---

१ तऱ्हेवाईकपणा, विक्षिप्तपणा. २ शिळें, पांचट. ३ विचार, निवाडा ४ संकट, संशय. ५ गुंता, परमार्थाची प्राप्ति.

तरी मग विख्यात जाले । भूमंडळीं ॥ ८ ॥
वैराग्यापरतें नाहीं भाग्य । वैराग्य नाहीं तें अभाग्य ।
वैराग्य नसतां योग्य । परमार्थ नव्हे ॥ ९ ॥
प्रत्ययेज्ञानी वीतरागी । विवेकबळें सकळत्यागी ।
तो जाणिजे महायोगी । ईश्वरी पुरुष ॥ १० ॥
सबळें विषय त्यागणें । शुद्धे कार्याकारण घेणें ।
विषयत्यागाचीं लक्षणें । वोळखा ऐसीं ॥ ११ ॥ (द. १२, स. ७)

( २ )

**प्रश्नः**—येथें संशय उठिला । निस्पृह तोचि साधक जाला ।
त्याग न घडे संसारिकाला । तरी तो साधक नव्हे कीं ॥ १२ ॥
**उत्तरः**—सन्मार्ग तो जीवीं धरणें । अनमार्गाचा त्याग करणें ।
संसारिकां त्याग येणें । प्रकारें ऐसा ॥ १३ ॥
कुबुद्धित्यागेंवीण कांहीं । सुबुद्धि लागणार नाहीं ।
संसारिकां त्याग पाहीं । ऐसा असे ॥ १४ ॥
प्रपंचीं वीट मानिला । मनें विषयत्याग केला ।
तरीच पुढें अवलंबिला । परमार्थमार्ग ॥ १५ ॥

---

१ स्वानुभवी. २ मिश्रित, अशुध्द, निषिध्द. ३ शुध्दविषय म्ह. धर्मशास्त्रानें परवानगी दिलेला विषय. 'लोके व्यवायामिषमद्यसेवा' (भाग ११५-११) यावरील नाथांचें भाष्य पहा. परस्त्रीसेवन हा सबळविषय, याचा त्यागच केला पाहिजे; पण शुध्द विषय म्ह. स्वस्त्रीसेवन हेंही 'कार्याकारण' करणें. भलती स्त्री भलता वर असल्या प्रकारानें वर्णसंकर होईल म्हणून 'कन्या सवेद सवर्ण। जिसीं नाहीं रजोदर्शन। तेही पित्यापाशीं याचून । ऋतुकाळीं गमन । नेमस्त' हें विषय 'कार्याकारण घेणें' होय. विषयसेवनाची वेदाज्ञा नाहीं. तथापि विषय सर्वस्वीं सुटत नाहींत तोंवर शुद्धविषयसेवनाची वेदानें परवानगी दिली आहे. विषयांची शनैःशनैः निवृत्ति व्हावी हा हेतु. ४ वाईट मार्गाचा

त्यागें घडे अभावाचा । त्याग घडे संशयाचा ।
त्याग घडे अज्ञानाचा । शनैःशनैः ॥ १६ ॥
ऐसा सूक्ष्म अंतस्त्याग । उभयांस घडे सांग ।
निस्पृहास बाह्यत्याग । विशेष आहे ॥ १७ ॥
संसारिकां ठाईं ठाईं । बाह्यत्याग घडे कांहीं ।
नित्यनेम श्रवण नाहीं । त्यागेंवीण ॥१८॥ (द. ५, स. १०)

## ( १० ) सत्कीर्तीचे पुरुष.

संसारा आलियाचें सार्थक । जेथें नित्यानित्यविवेक ।
इहलोक आणि परलोक । दोन्ही साधिले ॥ १ ॥
मननशीळ लोकांपाशीं । अखंड देव अहर्निशीं ।
पाहतां त्यांच्या पूर्वसंचिताशीं । जोडा नाहीं ॥ २ ॥
भल्यांची महिमा ऐसी । जे सन्मार्ग दावी लोकांसी ।
पोहणार असतां बुडतयासी । बुडों नेदावें ॥ ३ ॥
स्थूळ सूक्ष्म तत्वझाडा । पिंडब्रह्मांडाचा निवाडा ।
प्रचीत पाहे ऐसा थोडा । भूमंडळीं ॥ ४ ॥
वेदांतींचें पंचीकरण । अखंड तयाचें विवरण ।
महावाक्यें अंतःकरण । रहस्यें पाहे ॥ ५ ॥
पृथ्वीमध्यें विवेकी असती । धन्य तयांची संगती ।
श्रवणमात्रें पावती गती । प्राणिमात्र ॥ ६ ॥
जे सत्कीर्तीचे पुरुष । ते परमेश्वराचे अंश ।
धर्मस्थापनेचा हव्यास । तेथेंचि वसे ॥ ७ ॥

---

१ या ओवीचें विवरण मागें 'सारांशां'त केलें आहे. २ प्रपंच आणि परमार्थ. ३ तुलना. ४ स्थूळांतलीं तत्त्वें व सूक्ष्मांतलीं तत्त्वें याहून आपण वेगळे आहोंत असा तत्त्वांच्या निरासानें झालेला निश्चय.

विशेष सारासारविचार । तेणें होय जगदुद्धार ।
संगत्यागें निरंतरें[1] । होऊन गेले ॥ ८ ॥ (द. १७, स. १)

## (११) करंटा आणि सदेव.

### १ करंटा.

सुचित करुनी अंत:करण । ऐका करंटलक्षण ।
हें त्यागितां सदेवलक्षणें[2] । अंगीं बाणे ॥ १ ॥
करंट्यास आळस आवडे । यत्न कदापि नावडे ।
त्याची वासना[3] वावडे । अधर्मीं सदा ॥ २ ॥
लिहों नेणे वाचों नेणे । सवदा[4]सुत घेऊं नेणें ।
हिशेबकितेब राखों नेणे । धारणा नाहीं ॥ ३ ॥
हारवी सांडी पाडी फोडी । विसरे चुके नाना खोडी ।
भल्याचे संगतीची आवडी । कदापि नाहीं ॥ ४ ॥
दीर्घसूचना सुचेचिना । न्यायनीति हे रुचेचिना ।
परअभिलाषीं[5] वासना । निरंतर ॥ ५ ॥
शब्द सांभाळून बोलेना । आवरितां आवरेना ।
कोणीयेका[6]सी मानेना । बोलणें त्याचें ॥ ६ ॥
कोणीयेकासी विश्वास नाहीं । कोणीयेकासी सख्य नाहीं ।
विद्या वैभव कांहींच नाहीं । उगाचि ताठा ॥ ७ ॥
स्वयें आपणास कळेना । सिकविलें तें ऐकेना ।
तयासी उपाय नाना । काय करिती ? ॥ ८ ॥
झिजल्यावांचूनि कीर्ति कैंची ? । मान्यता नव्हे कीं फुकाची ।
जिकडे तिकडे होते चींचीं[7] । अवलक्षणें ॥ ९ ॥ (द. १९, स. ३)

---

१ निरंतर म्ह. अंतररहित, एकरूप. २ सदैवाचें, भाग्यवंताचें लक्षण ३ धांवे, शिरे. ४ बाजारहाट करितां येत नाहीं. ५ दुसऱ्याच्या वस्तूंच्या अभिलाषाची इच्छा. ६ कोणासही. ७ छी थू.

## २ सदेव

मागां बोलिलें करंटलक्षण । तें विवेकें सांडावें संपूर्ण ।
आतां ऐका सदेवलक्षण । परमसौख्यदायक ॥ १० ॥
उपजतगुण[1] शरीरीं । परोपकारी नानापरी ।
आवडे सर्वांचे अंतरीं । सर्व काळ ॥ ११ ॥
अक्षर सुंदर लिहों जाणे । चपळ शुद्ध वाचूं जाणे ।
अर्थांतर सांगों जाणे । सकळ कांहीं ॥ १२ ॥
राखे सकळांचें अंतर । उदंड करी पाठांतर ।
नेमस्तपणाचा[2] विसर । पडणार नाहीं ॥ १३ ॥
जो मानला बहुतांसी । कोणी बोलों न सके त्यासी ।
धगधगीत पुण्यराशी । महापुरुष ! ॥ १४ ॥
तो परोपकार करितचि गेला । पाहिजे तो ज्याला त्याला ।
मग काय उणें तयाला । भूमंडळीं ? ॥ १५ ॥
सकळांसी नम्र बोलणें । मनोगत राखोन चालणें ।
अखंड कोणीयेकाचें उणें । पडोंचि नेदी ॥ १६ ॥
उत्तम गुणीं शृंगारला । तो बहुतांमध्यें शोभला ।
प्रगट प्रतापें उगवला । मार्तंड[3] जैसा ॥ १७ ॥
जाणता पुरुष असेल जेथें । कळहो[4] कैंचा उठेल तेथें ।
उत्तम गुणाविषीं रिते[5] । ते प्राणी करटे ॥ १८ ॥
कर्मविधि उपासनाविधि । ज्ञानविधि वैराग्यविधि ।
विशाळ ज्ञातृत्वाची बुद्धि । चळेल कैसी ? ॥ १९ ॥
चौदा विद्या चौसष्टी कळा । जाणे संगीत गायनकळा ।
आत्मविद्येचा जिव्हाळा[6] । उदंड तेथें ॥ २० ॥

---

१ परोपकाराचा उपजत गुण म्ह. जन्मस्वभाव. २ नियमितपणानें, शिस्तीनें वागण्याचा. ३ सूर्य. ४ कलह. ५ रिकामें, शून्य. ६ परमप्रीति.

आपल्या कार्यास तत्पर । लोक असती लहानथोरे ।
तैसाचि करी परोपकार । मनापासुनी ॥ २१ ॥
दुसऱ्याच्या दुःखें दुखवे । दुसऱ्याच्या सुखें सुखावे ।
अवघेचि सुखी असावे । ऐसी वासना ॥ २२ ॥
उदंड मुलें नानापरी । वडिलांचें मन अवघ्यांवरी ।
तैसी अवघ्यांची चिंता करी । महापुरुष ॥ २३ ॥
प्रपंचीं जाणे राजकारण । परमार्थीं साकल्य[1]विवरण ।
सर्वां[2]मध्यें उत्तम गुण । त्याचा भोक्ता ॥ २४ ॥
बहुतांसी वाटे मी थोर । सर्वमान्य पाहिजे विचार ।
धीर उदार गंभीर । महापुरुष ॥ २५ ॥
जितुके कांहीं उत्तम गुण । तें स[2]मर्थांचें लक्षण ।
अवगुण तें करंटलक्षण । सहजाचि जालें ॥२६॥(द.१९,स.४)

## १२ आळस आणि प्रयत्न

(१) मुमुक्षु साधक अथवा सिद्ध । श्रवणेंवीण तो अबद्ध[3] ।
श्रवणमननें शुद्ध । चित्तवृत्ति होय ॥ १ ॥
श्रवणाचा अनादर । आळसें करी जो नर ।
त्याचा होय अपहा[4]र । स्वहितविषईं ॥ २ ॥
आळसाचें संरक्षण । परमा[5]र्थाचा बुडवण ।
याकारणें नित्य श्रवण । केलेंचि पाहिजे ॥ ३ ॥
सेविलेंचि सेवावें अन्न । घेतलेंचि घ्यावें जीवन ।
तैसें हें श्रवणमनन । केलेंचि करावें ॥ ४ ॥ (द.७, स.८)
(२) असा जो दुश्चित आळसी । परलोक कैंचा त्यासी ? ।
जयाचे जीवीं अहर्निसी । आळस वसे ॥ ५ ॥

---

१ संपूर्ण विवरण. २ थोरांचें. ३ बंधनरहित, बाष्कळ. ४ नुकसान,अनहित ५ आळस जतन करणें म्हणजेच परमार्थाची हानी.

आळसें राहिला विचार । आळसें बुडाला आचार ।
आळसें नव्हे पाठांतर । कांहीं केल्या ॥ ६ ॥
आळसें नित्यनेम राहिला । आळसें अभ्यास बुडाला ।
आळसें आळस वाढला । असंभाव्य[1] ॥ ७ ॥
आळसें गेली धारणा धृति[2] । आळसें मळिण जाली वृत्ति ।
आळसें विवेकाची गति । मंद जाली ॥ ८ ॥
निद्रा आळस दुश्चितपण[3] । हेंचि मूर्खाचें लक्षण ।
येणेंकरितां निरूपण । उमजेचिना ॥ ९ ॥ (द.८, स.६)

( ३ ) आळसाचें फळ रोकडें[4] । जांभया देऊन निद्रा पडे ।
सुखें[5] म्हणोन आवडे । आळस लोकां ॥ १० ॥
साक्षेप करितां कष्टती । परंतु पुढें सुखावती ।
खाती जेवती सुखी होती । यत्नेंकरुनी ॥ ११ ॥
आळस उदास नागवणा । आळस प्रेत्नबुडवणा ।
आळसें करंटपणाच्या खुणा । प्रगट होती ॥ १२ ॥
म्हणोनी आळस नसावा । तरीच पाविजे वैभवा ।
अत्रीं परत्रीं जोवा । समाधान ॥ १३ ॥ (द.११, स.३)

( ४ ) व्याप आटोप[6] करिती । धके चपेटे सोसिती ।
तेणें प्राणी सदेव होती । देखतदेखतां ॥ १४ ॥ (द.१५, स.३)

( ५ ) अंतरीं नाहीं सावधानता । यत्न ठाकेना पुरता ।
सुखसंतोषाची वार्ता । तेथें कैंची ? ॥ १५ ॥
म्हणोन आळस सोडावा । यत्न साक्षेपें जोडावा ।
दुश्चितपणाचा मोडावा । थारा[7] बळें ॥ १६ ॥ (द.१२, स.१)

---

१ अतोनात. २ मन. ३ निद्रा, आळस व प्रमाद ( दुश्चितपण ) हे तमोगुणाचे धर्म होत असें गीता सांगते. ४ तात्काळ, प्रत्यक्ष. ५ आळस हेंच सुख वाटतें. ६ मोठाले उद्योग, थोर व्यवसाय. ७ सांठा.

(६) आधींच शिकोन जो शिकवी । तोचि पावे श्रेष्ठ पदवी ।
गुंतल्या लोकांस उगवी । विवेकबळें ॥ १७ ॥
जयास यत्नाचि आवडे । नाना प्रसंगीं पवाडे ।
धीटपणें प्रगट, दडे । ऐसा नव्हे ॥ १८ ॥
सांकडीमध्यें वर्तो जाणे । उपाधीमध्यें मिळों जाणे ।
अलिप्तपणें राखों जाणे । आपणासी ॥ १९ ॥
राखों जाणें नीतिन्याय । न करी न करवी अन्याय ।
कठिण प्रसंगीं उपाय । करूं जाणे ॥ २० ॥ (द.११,स.६)

(७) अखंड कामाची लगबग । उपासनेस लावावें जग ।
लोक समजोन मग । आज्ञा इच्छिती ॥ २१ ॥
आधीं कष्ट मग फळ । कष्टाचि नाहीं तें निर्फळ ।
साक्षेपेंवीण केवळ । वृथा पुष्ट ॥२२॥ (द. ११, स. १०)

(८) शाहाणा यत्न त्याच्या गुणें । पाहों जातां काय उणें ? ।
सुखसंतोष भोगणें । नाना श्लाघ्यता ॥ २३ ॥
देहें जैसें केलें तैसें होतें । यत्न केल्या कार्य साधतें ।
तरी मग कष्टावें तें । काय निमित्त ? ॥२४॥ (द. १७,स.७)

(९) नरदेह परमदुर्लभ । येथें घडे अलभ्य लाभ ।
दुर्लभ तें सुलभ । होत आहे ॥ २५ ॥
येथें जेणें आळस केला । तो सर्वस्वें बुडाला ! ।
देव नाहीं वोळखिला । विवेकेंबळें ॥ २६ ॥ (द.२०,स.५)

(१०) यत्नाचा लोक भाग्याचा । यत्नेंवीण दरिद्रता ।
उमजला लोक तो भाला । उमजेना तो हपापलो ॥ २७ ॥

१ संकटांत. २ विवेकानें देव ओळखणें हा मुख्य यत्न व न ओळखणें हा मुख्य आळस. ३ यत्नाचें महत्व समजून जो यत्न करितो, तो भाग्यास चढतो व समाधानी राहतो; व जो न समजतां व यत्न न करितां सुस्त पडतो, तो दरिद्री राहून मनांत मात्र सदा हपापलेला राहतो.

हिंडतां शाहणें होतें । बोलतां बोल सीकतें ।
वाचितां लिहितां येतें । तेणें तें मान्य होतसे ॥ २८ ॥
घरींच बैसता खोटे । ब्राह्मणु हिंडतां बरा ।
आळसी घांतघेणा तो । कष्टला म्हणिजे बरा ॥ २९ ॥
प्रसंगें बोलतां आलें । यथातथ्याचे सूचलें ।
मनुष्य राखिले राजी । तो प्राणी शाहणा बरा ॥ ३० ॥
समयीं धीर सांडीना । यत्नीं यत्न बरा करी ।
हिंडतां पारखी लोकां । कार्यकर्ता जिवीं धरी ॥ ३१ ॥
(११) भाग्यासी काय उणें रे । यत्नावांचूनि राहिलें ।
यत्न तो करावा कैसा । हेंचि आधीं कळेचिना ॥ ३२ ॥
मुख्य यत्न विचाराचा । त्यावरी बोलणें बरें ।
चालणें सत्य नेमाचें । नीतिन्याय चुकों नये ॥ ३३ ॥
(१२) जाणणें नीतिन्यायाचें । सत्य नेमस्त बोलणें ।
यत्नाचा साक्षपी प्राणी । तो येक भाग्य मेळवी ॥ ३४ ॥
बुद्धीनें सर्वही होतें । बुद्धिदाता नारायणु ।
आधीं तो आपुला कीज । लक्ष्मी चरणीं वसे ॥ ३५ ॥
(१३) जाणता लोक भाग्याचा । नेणता दरिद्री सदा ।
दरिद्री आळसी मोठा । भाग्याचा यत्न वाढवी ॥ ३६ ॥

## (१३) अचूक यत्न तो देव.

मनहि तो चेतवावा रे । चेतवीतांचि चेततो ।
विवेक जाणिजे तैसा । वाढवीतांचि वाढतो ॥ १ ॥

१ आत्मनाश करणारा. २ परीक्षा करितो. ३ आधीं नारायण आपलासा करून घ्यावा, म्हणजे त्याच्या चरणापाशीं बसलेली लक्ष्मी कृपा करीलच करील. समर्थांनीं दुसऱ्या ठिकाणीं म्हटलें आहे कीं, 'तया नारायणाला मनीं । अखंड आठवावें ध्यानीं । मग लक्ष्मी तयापासोनी । जाईल कोठें ?' आधीं हरिभजन, मग राजकारण; आधीं भगवताचें अधिष्ठान, मग राजकारण अशी समर्थांची शिकवण आहे.

संग तो साक्षपीयांचो[1] । धरितां साक्षपु घडे ।
साक्षपें साक्षपु वाढे । पुरती मनकामना ॥ २ ॥
कष्टतां सौख्य मानावें । कष्टीं फळचि पाविजे ।
आळसें सुख वाटे तें । दुःख ब्रह्मांड भोगवी ॥ ३ ॥
केल्यानें होत आहे रे । आधीं केलेचि पाहिजे ।
यत्न तो देव जाणावा । अंतरीं धरितां बरें ॥ ४ ॥
अचूक[2] यत्न तो देवो । चुकणें दैत्य जाणिजे ।
न्याय तो देव जाणावा । अन्याय राक्षसी क्रिया ॥ ५ ॥
सावधु देव जाणावा । उन्मत्त दैत्य बोलिजे ।
साक्षपी वंश देवाचे । आळसी वंश दानवी ॥ ६ ॥
देव सर्वांस सांभाळी । तदंश जाणिजे तसा ।
दैत्य ते पीडिती लोकां । तदंश त्याचिसारिखे ॥ ७ ॥
तो देव जाणिजे ज्ञानें । ज्ञानी त्यासीच बोलिजे ।
विज्ञानी ब्रह्मयोगी तो । वृत्तिशून्य पुरातनु ॥ ८ ॥

## ( १४ ) कष्टावीण फळ नाहीं.

कष्टेंवीण फळ नाहीं । कष्टेंवीण राज्य नाहीं ।
केल्यावीण होत नाहीं । साध्य नाहीं ॥ १ ॥
आळसें काम नासतें । हें तों प्रत्ययास येतें ।
कष्टाकडे चुकावितें[3] । हीन जन ॥ २ ॥
आधीं कष्टाचें दुःख सोसिती । ते पुढें सुखाचें फळ भोगिती ।
आधीं आळसें सुखावती । तयां पुढें दुःख ॥ ३ ॥
इहलोक अथवा परलोक । दोहींकडे सारिखाचि विवेक ।

---

१ साक्षेपी म्ह० उद्योगी लोकांचा. २ अचूक यत्न तो देव, न्याय तो देव, सावधपणा तो देव व याच्या उलट आळस, अन्याय व गैरसावधपणा तो दैत्य. ३ हीनजनांना कष्ट करायला नकोत.

दीर्घसूचनेचें कौतुक । कळलें पाहिजे ॥ ४ ॥
मेळविती तितुकें भक्षिती । ते कठीणकाळीं मरोनि जाती ।
दीर्घसूचनेनें वर्तती । तेचि भले ॥ ५ ॥
इहलोकींचा संचितार्थ । परलोकींचा परमार्थ ।
संचितेंवीण व्यर्थ । जितचि मेले ॥ ६ ॥
जेहीं उदंड कष्ट केले । ते भाग्य भोगून ठेले ।
येर ते बोलतचि राहिले । करंटे जन ॥ ७ ॥
विचारें इहलोक परलोक । विचारें होतसे सार्थक ।
विचारें नित्यानित्यविवेक । पाहिला पाहिजे ॥८॥(द.१८,स.७)

## ( १५ ) वृथा शीण संसार करती रडाया !

नसे आंथराया, नसे पांघराया । नसे धाम, ना दृढ छाया निजाया ।
नसे अन्न खाया नसे रम्य जाया । वृथा शीण संसार कर्ती रडाया ॥१॥
नसे द्रव्य कांहीं, घरीं धान्य नाहीं । बहू वेष्टिला कामक्रोधांहि देहीं ।
पराधीनता, वेळ नाहीं मराया ! । वृथा शीण संसार कर्ती रडाया ॥२॥
मनासारिखा मित्र तोही मिळेना । परत्रीक तें ज्ञान पोटीं वसेना ।
उणें बोलती सर्व कांहीं छळाया । वृथा शीण संसार कर्ती रडाया ॥३॥

## ( १६ ) योग हा सुकृताचा.

मनासारिखी सुंदरा ते अनन्या । मनासारिखे पुत्र जामात कन्या ।
सदासर्वदा बोलती रम्य वाचा । जनीं जाणिजे योग हा सुकृताचा ॥१॥
भलीं मायबापें भले मित्रबंधु । भले सोइरे राखती स्नेहवादु ।
मुलें लेकुरें येक मेळा सुखाचा । जनीं जाणिजे योग हा सुकृताचा ॥२॥
धन धान्य पात्रें अळंकार चीरें । विसोरें घरें सुंदरें रम्य सारें ।

१ सांचविलेलें द्रव्य. २ बहुतेक नोकर लोकांना हा अनुभव आहेच ! ३ पूर्व पुण्याचा. ४ गृहस्थाश्रमाच्या सुखाचें हें किती सुंदर वर्णन आहे !

देह चालतो सर्व आरोग्य ज्याचा । जनीं जाणिजे योग हा सुकृताचा॥३॥
मनासारिखें ग्राम ग्रामाधिकारी । मनासारिखे लोक शोकापहारी ।
मनासारिखा संग साधूजनाचा । जनीं जाणिजे योग हा सुकृताचा ॥४॥
मनासारिखें चिंतितां देव पावे । मनासारिखे भक्त भावें मिळावें ।
सदा बोलती बोल सारांश याचा । जनीं जाणिजे योग हा सुकृताचा ॥५॥

## (१७) बरें वोखटें सर्व साहोनि जावें !

न जावेंचि तेथेंचि लागेल जावें । न खावेंचि जें तेंचि लागेल खावें ।
वदावेंचि ना तेंचि लागे वदावें । विवेकेंचि ज्ञानेंचि सूखें रहावें ॥१॥
प्रसंगें घडे तेंचि मानून घ्यावें । अहंतागुणें दुःखशोका न यावें ।
म्हणे दास उदास कांहीं न व्हावें । बरें वोखटें[१] सर्व साहोनि जावें ॥२॥
जनीं संचितें पिंड निर्माण जाला । मनीं तेंचि भोगावया जीव आला ।
शुभाशूभ होणार कांहीं कळेना । पुढें प्राप्त ब्रह्मादिकांही टळेना ॥३॥
म्हणे दास विश्वास नामीं धरावा । मनीं शोक अत्यंत तोही नसावा ।
स्वभावेंचि होणार तें होइना का । अकस्मात जाणार तें जाइना का ॥४॥

## (१८) चातुर्यलक्षणें.

### (१)

रूप लावण्य अभ्यासितां न ये । सहजें[२]गुणास न चले उपाय ।
कांहीं तरी धरावी सोय । आगंतुकें[३] गुणाची ॥ १ ॥
काळें माणूस गोरें होईना । वनाळास[४] यत्न चालेना ।
मुक्यास वाचा फुटेना । हा सहजगुण ॥ २ ॥
अवगुण सोडितां जाती । उत्तम गुण अभ्यासितां येती ।
कुविद्या सांडून सिकती । शाहणे विद्या ॥ ३ ॥

---

१ बरे वाईट सर्व प्रसंग. २ सहजप्राप्त गुण. ३ संपादितां येतात ते आगंतुक गुण. ४ देवीचे वण वगैरे असल्यास यत्न चालत नाहीं.

मूर्खपण सांडितां जातें । शाहाणपण सिकतां येतें ।
कारभार करितां उमजतें । सकळ कांहीं ॥ ४ ॥
मान्यता आवडे जीवीं । तरी कां उपेक्षा[1] करावी ।
चातुर्येवीण उंच पैदवी[2] । कदापि नाहीं ॥ ५ ॥
अंर्तकळा[3] शृंगारावी । नानापरी उमजावी ।
संपदा मेळऊन भोगावी । सावकास ॥ ६ ॥
प्रेत्न करीना सिकेना । शरीर तेंही कष्टवीना ।
उत्तम गुण घेईना । सदा कोपी ॥ ७ ॥
न्यायें वर्तेल तो शाहणा । अन्यायी तो दैन्यवाणा ।
नाना चातुर्याच्या खुणा । चतुर जाणे ॥ ८ ॥
लोक आपणास वोळावे[4] । किंवा अवघेच कोसळावे[5] ? ।
आपणास समाधान फावे[6] । ऐसें करावें ॥ ९ ॥
समाधानें समाधान वाढे । मैत्रीनें मैत्री जोडे ।
मोडितां क्षणमात्रें मोडे । बरेंपण ॥ १० ॥
अहो कांहो अरे कां रे । जनीं ऐकिजेते कीं रे ।
कळत असतांच का रे । निकामीपण ? ॥ ११ ॥
चातुर्यें शृंगारे अंतर । वस्त्रें शृंगारे शरीर ।
दोहींमध्यें कोण थोर । बरें पाहा ॥ १२ ॥
बाह्याकार शृंगारिले । तेणें लोकांच्या हातासि काय आलें ? ।
चातुर्यें बहुतांसी रक्षिलें । नाना प्रकारें ॥ १३ ॥
बरें खावें बरें जेवावें । बरें ल्यावें बरें नेसावें ।
समस्तीं बरें म्हणावें । ऐसी वासना ॥ १४ ॥
तनें मनें झिजावें । तेणें भले म्हणोन घ्यावें ।
उगोंचि कल्पितां सिणावें । लागेल पुढें ॥ १५ ॥

---

१ गुणसंपादनाची हयगय. २ श्रेष्ठत्व. ३ अंतरंग चातुर्यानें भरावें. ४ वश व्हावेत. ५ उलटावेत. ६ मिळावें, प्राप्त व्हावें.

लोकीं कार्यभाग अडे । तो कार्यभाग जेथें घडे ।
लोक सहजचि घोंढे । कामासाठीं ॥ १६ ॥
म्हणोन दुसऱ्यास सुखी करावें । तणें आपण सुखी व्हावें ।
दुसऱ्यास कष्टवितां कष्टावें । लागेल स्वयें ॥ १७ ॥
समजले[1] आणि वर्तले । तेचि भाग्यपुरुष जाले ।
यावेगळे उरले । ते करंटे पुरुष ॥ १८ ॥
आपण येकायेकीं येकला । सृष्टींत भांडत चालला ।
बहुतांमध्यें येकल्याला । यश कैंचें ॥ १९ ॥
बहुतांचे मुखीं उरावें । बहुतांचे अंतरीं भरावें ।
उत्तम गुणीं विवरावें । प्राणिमात्रांसी ॥ २० ॥
शाहणे करावे जन । पतित करावे पावन ।
सृष्टीमध्यें भगवद्भजन । वाढवावें ॥२१॥ (द. १४, स. ६)

( २ )

बहुतांचे बोलीं लागले । ते प्राणी अनुमानीं बुडाले ।
मुख्य निश्चय चुकले । प्रत्ययाचा ॥ १२ ॥
उदंडाचें उदंड ऐकावें । परी तें प्रत्यय पहावें ।
खरें खोटें निवडावें । अंतर्यामीं ॥ १३ ॥
वेडे करावे शाहणे । तरीच जिणें श्लाघ्यवाणें ।
उगेच वादांग वाढवणें । हें मूर्खपण ॥ १४ ॥
दुसऱ्याचे चालणीं चालावें । दुसऱ्याचें बोलणीं बोलावें ।
दुसऱ्याचे मनोगतीं जावें । मिळोनियां ॥ १५ ॥
आधीं अंतर हातीं घ्यावें । मग हळुहळु उकलावें ।
नाना उपायें न्यावें । परलोकासीं ॥ १६ ॥
हेकाडास हेकाड मिळाला । तेथें गल्बलाचि जाला ।

१ समजतात व त्याप्रमाणें वागतात.

कळहो उठतां चातुर्याला । ठाव कैचा ॥ १७ ॥
धकेचपेटे सोसावे । नीच शब्द साहात जावें ।
परस्तावोन परावे । आपले होती ॥ १८ ॥
कुग्रामें अथवा नगरें। पहावीं घराचीं घरें ।
भिक्षामिसें लहानथोरें । परीक्षून सोडावीं ॥ १९ ॥
वहुतीं कांहींतरी सांपडे । विचक्षण लोकीं मैत्री घडे ।
उगेंच बोलतां कांहींच न घडे । फिरणें विवरणें ॥ २० ॥
जैसें जयास पाहिजे । तें तें तत्काळचि दीजे ।
तरी मग श्रेष्ठचि होइजे । सकळां मान्य ॥ २१ ॥
भूमंडळीं सकळांसी मान्य । तो म्हणों नये सामान्य ।
कित्येक लोक अनन्य । तया पुरुषासी ॥ २२ ॥
ऐसीं चातुर्याचीं लक्षणें । चातुर्यें दिग्विजय करणें ।
मग तयास काय उणें । जेथें तेथें ? ॥ २३ ॥ (द.१५, स.६)

## (१९) जाणीव हेंच थोरपणाचें बीज आहे.

जेथें उदंड जाणीव । ते तितुके सदेव ।
थोडे जाणीवेनें निर्दैव । होती लोक ॥ १ ॥
दुरस्ता दाटल्या फौजा । उंच सिंहासनीं राजा ।
याचा विचार समजा । अंतर्यामीं ॥ २ ॥
विवेकें बहुत पैसावले । म्हणोनी अवतारी बोलिले ।
मनुचक्रवर्ती जाले । येणेंचि न्यायें ॥ ३ ॥
व्याप आटोप करितां । धकेचपेटे सोसिती ।
तेणें प्राणी सदेव होती । देखतदेखतां ॥ ४ ॥
थोर लहान बुद्धीपोसीं । सगट कळेना लोकांसी ।

१ पुष्कळ शहाणपण. २ मोठेपणाला चढले. ३ श्रम,साहस. ४ जाणीव किंवा बुद्धि थोर लहान त्याप्रमाणें माणसें थोर किंवा लहान होतात. ५ सारखें.

आधीं उपजले तयांसी । थोर म्हणती ! ॥ ५ ॥
धाकुटा भाग्यास चढला । तरी तुच्छ करिती तयाला ।
याकारणें सलगीच्या लोकांला । दुरी धरावें ॥ ६ ॥
नेमस्त कळेना वचन । नेमस्त न ये राजकारण ।
उगेंचि धरिती थोरपण । मूर्खपणं ॥ ७ ॥
सर्वां वडिल अंतरात्मा । जेथें चेतली तेथें महिमा ।
हें तों प्रगटाचि; आम्हां । शब्द नाहीं ॥ ८ ॥
तथापि वडिलांस मानावें । वडिलें वडिलपण जाणावें ।
नेणतां पुढें कष्टावें । थोरपणीं ! ॥ ९ ॥
याकारणें कोणीयेकें । शहाणपण सिकावें विवेकें ।
विवेक न सिकतां तुकें । तुटोन जाती ॥ १० ॥
अहो या शहाणपणाकारणें । बहुतांचे कष्ट करणें ।
परंतु शहाणपण सिकणें । हें उत्तमोत्तम ॥ ११ ॥
जो बहुतांसी मानला । तो जाणावा शाहणा जाला ।
जनीं शाहण्या मनुष्याला । काय उणें ? ॥ १२ ॥ (द. १५, स. ३)

## ( २० ) शहाण्याची संगति

कार्यभाग करूं जाणे । लोक राजी समस्तही ।
सर्वांसी पाहिजे ऐसा । अभ्यासे होतसे नरु ॥ १ ॥
ज्याचा जो अभ्यास जैसा । तैसा व्यापार पाहणें ।
पाहतां पाहतां जाणे । जाणतां जाणतां कळे ॥ २ ॥
कळतां कळतां सिके । सिकतां सिकतां करी ।
करितां करितां वाढ । वाढतां वाढतां भला ॥ ३ ॥
ल्याहावें शुद्ध वाचावें । जाणावें तदनंतरें ।

१ अंतरात्मा सर्वांत वडील आहे. तो जेथें आपल्या वैभवसामर्थ्यानें प्रगट झाला तो वडिल किंवा श्रेष्ठ ! २ वजनदारी.

जाणतां कळतां बिंबे । बिंबतां स्फूर्ति होतसे ! ॥ ४ ॥
प्रत्ययें बोलतां आलें । अचूक न चुके जनीं ।
सत्य मिथ्या कळों आलें । जाणता त्यास बोलिजे ॥ ५ ॥
उणीव येउं दे ना तो । कळहो न करी कदा ।
जनाचें मन तो राखे । युक्तीनें काम चालवी ॥ ६ ॥
सूचना चाळणा जाणे । बोलका नित्यनूतनू ।
मानतां मानतां माने । सत्यवादीच नेमकु ॥ ७ ॥
ऐसा तो शहाणा लोकीं । तयाची संगती बरी ।
धरितां सौख्य होताहे । प्रवृत्तिनिवृत्तीकडे ॥ ८ ॥

# २ राजकारण-प्रसंग व कांहीं सिद्धांत.

## ( १ ) समर्थकालीन अस्मानी सुलतानी.

( १ )

बहू[१]साल कल्पांत लोकांसि आला। महर्गें[२] बहू धाडि[३] केली जनांला।
कितीयेक मृत्यूसि ते योग्य जाले। कितीयेक ते देश त्यागूनि गेले ॥ १ ॥
कितीयेक ग्रामेंचि ते घोर्स[४] जालीं। पिकें सर्व धान्येंचि नाना बुडालीं।
कितीयेक धांडी[५]वरी धाडि येती। द्वया सैन्यकाचेनि संहार होती ॥ २ ॥
कितीयेक ते मेघही मंद जाले। अनावृष्टि स्थळोस्थळीं लोक मेले।
कितीयेक अन्ना[६]विसीं भ्रष्ट जाले। कितीयेक लोकीं जनीं प्राण दिल्हे ॥ ३ ॥
कितीयेक ते तांब्र[७]बंदीच गेले। कितीयेक मार्‍हाष्ट्र[८]बंदी निमाले।
कितीयेक ते छंद ना बंद कांहीं। कितीयेक बेबंद ते ठाइंठाईं[१०] ॥ ४ ॥
कितीयेक ते घ्राणकर्णेचि घेती। किती उत्तमा त्या स्त्रिया भ्रष्टवीती।
किती मोट बांधूनि ते बूडवीती। पिछोडेचि[९] बांधोनि हीरोनि नेती ॥ ५ ॥

( २ )

कांहीं मिळेना मिळेना मिळेना खायाला
ठावं नाहीं रे नाहीं रे नाहीं रे जायाला।
हौस कैची रे कैची रे कैची रे गायाला
कोठें जावें रे जावें रे जावें रे मागायाला ॥ १ ॥

---

१ वारंवार, फार मोठा. २ महर्गतेनें. ३ देशांतर. ४ ओस, निर्मनुष्य. ५ फौजांच्या टोळ्या. ६ पोटासाठीं धर्मांतर केलें. ७ पोर्तुगीज, मुसलमान यांच्या कैदेंत. ८ शिरक्यांसारखे जे स्वतंत्र राजे, पुंडपाळेगार वगैरे होते त्यांच्या तुरुंगांत. ९ घोड्यावर पाठीमागें बांधून. १० ठिकाण, स्थान.

शेत पीकेना पीकेना पीकेना उदंड
कष्ट करूनी करूनी होत आहे भंड।
अवघे जाहालें जाहालें जाहालें थोतांड
दुनिया पाहतां पाहतां उदंड जाली लंडे ॥ २ ॥
देश नासला नासला उठे तोचि कुटी
पिकें होतांचि होतांचि होते लुटालूटी।
काळाकारितां जिवलगां जाली तुटातुटी
अवघ्या कुटुंबा कुटुंबा होते फुटाफुटी ॥ ३ ॥
कैंचा आधार आधार नाहीं सौदागार
कांहीं चालेना चालेना उदीमव्यापार।
सर्व सारिखे सारिखे जाला एकंकार
काळ कठीण कठीण कैसा पावे पार ? ॥ ४ ॥
जनीं ईर्जती हुरमती पाहों जातां कैंची
दुनिया जाली रे जाली रे जाली रे बैळाची।
काय होणार होणार होणार टळेना
पुण्य गेलें रे गेलें रे कांहींच फळेना ॥ ५ ॥
सुडकें पटकर पटकर न मिळे पांघराया
शक्ती नाहीं रे नाहीं रे कोपट कराया।
वाट फुटेना फुटेना विदेशीं भराया
आवघीं बैसलों बैसलों बैसलों मराया ? ॥ ६ ॥
नदीं भरतां भरतां धैल्लनीयां घेती

१ फजीतवाडा. २ देवधर्मनीतिशून्य. ३ ठोकतो. ४ व्यापारधंदा करणारे. ५ सारखेच दरिद्री. ६ प्रतिष्ठा, वजनदारी कोठची सांपडणार ? ७ ' वळी तो कान पिळी ' अशी दुनिया झाली आहे. देवधर्मनीतिन्याय पार बुडाला असून जबरदस्तांचा काळ आला आहे ! ८ साधीं, फाटकीतुटकीं वस्त्रेंही पांघरायला मिळत नाहींत. ९ छोटी झोपडी. १० उड्या टाकतात.

वीख[1] घेऊनी घेऊनी उदंड मरती ।
अग्नि लाऊनी लाऊनी जळोनीयां जाती
मोठी फजीती फजीती सागावे तें किती ? ॥ ७ ॥
येक पळाले पळाले दूरी देशा गेले
बहू कष्टले कष्टले तेथें नागवले[2] ।
फिरोनि आले रे आले रे घरींचे लोक मेले
कोठें उपाय दिसेना कासावीस जाले ॥ ८ ॥
उदंड चाकरी चाकरी मिळेना भाकरी
लोक नीलंड नीलंड काढुनि नेती पोरी ।
न्याय बुडाला बुडाला जाहाली शिरोजी[3]
पैक्याकारणें कारणें होते मारामारी ॥ ९ ॥
येतो पाहुणा पाहुणा लौकरी जाईना
अन्न खातो रे खातो र थोडेही खाईना ।
उदंड वाढिलें वाढिलें तऱ्ही तो धाइना[4]
गर्वे बोलतो बोलतो कोठेंचि भोईना[5] ॥ १० ॥
राहे वस्तीस वस्तीस चोरितो वस्तांस
खोटा अभ्यास अभ्यासें[6] हाणी महत्वास ।
लोक भलेसे दिसती खटरें चोरिती
वस्त्रें धोतरेंपातरें लपऊनी पळती ॥ ११ ॥
दास म्हणे रे भगवंता ! किती पहासी सत्वें[7] !
काय वांचोनी वांचोनी ? ने परतें जीवित्वें[8] ! ।
कीती धरावें धरावें धरावें तें सत्व
जालीं शरीरें शरीरें शरीरें निःसत्व ॥ १२ ॥

१ विष. २ भामटयांनीं लुटून घेतलें. ३ शिरजोरपणा. ४ तृप्त होत नाहीं. ५ कोठें मात नाहीं असें म्ह अमर्याद बोलतो ६ हाच चोरीचा अभ्यास त्याच्या महत्त्वाची हानि करतो. ७ परीक्षा पाहणें, कसाला लावणें. ८ कडेलोटाचें बोलणें!

## ( २ ) परचक्रनिरूपण

पदार्थमात्र तितुका गेला । नुस्ता देशचि उरला ।
येणें करितां बहुतांला ! संकट जालें ॥ १ ॥
माणसा खावया अन्न नाहीं । आंथरूण पांघरूण तेंही नाहीं ।
घर कराया सामग्री नाहीं । काय करिती ! ॥ २ ॥
पुढें आला प्रजन्यकाळ । धान्य महर्घ दुष्काळ ।
शाकार नाहीं भळभळ । रिचेवे पाणी ॥ ३ ॥
कितेक अनाचारीं पडिलीं । कितेक यातिभ्रष्ट जालीं ।
कितेक ते आक्रंदलीं । मुलेंबाळें ॥ ४ ॥
अद्यापि दुच्हिन्हें दिसती । दुष्टग्रह आडळती ।
पुढेंही वाईट सांगती । कितीयेकें ! ॥ ५ ॥
कांहींच पाहतां धड नाहीं । विचार सुचेना कांहीं ।
अखंड चिंतेच्या प्रवाहीं । पडले लोक ॥ ६ ॥
येक म्हणती कोठें जावें । येक म्हणती काय करावें ।
विदेशा जाऊनि काय खावें । वेंचं नाहीं ॥ ७ ॥
तथापि मार्गचि चालेना । भिक्षा मागतां मिळेना ।
अवघे भिकारीच, जना ! काय म्हणावें ॥ ८ ॥
प्राणिमात्र जाले दुःखी । पाहतां कोण्ही नाहीं सुखी !
कठिण काळें वोळखी । धरीनात कोण्ही ॥ ९ ॥
लोक वहुत प्रस्तावले । कितीयेक जाजावले ।
कितीयेक ते कावले । उद्वेगरूपी ॥ १० ॥

---

१ घराला शाकारणी नसल्यामुळें पाणी घरांत बदबदां गळतें. २ पोरटीं होऊन रडलीं. ३ पुढील काळ अधिकच वाईट येणार असें ज्योतिषी वगैरे सांगत आहेत. ४ शिलकी पैसा.

## ( ३ ) दोष लोकांचाच

ग्रंथ संग्रहालय, ठाणे.
अनुक्रम ३३५४० वि: ३/७
क्रमांक ९५५६५ नों: दि: ७८/८/५

### अभंग

#### ( १ )

विप्रीं सांडिला आचार । क्षेत्रीं सांडिला विचार ॥ १ ॥
नीतिमर्यादा उडाली । भक्ति देवाची बुडाली ॥ २ ॥
मेघवृष्टि मंदावली । पिकें भूमीनें सांडिलीं ॥ ३ ॥
बहुवृष्टि अनावृष्टी । दास म्हणे केली सृष्टी ॥ ४ ॥

#### ( २ )

पुण्यक्षेत्रें तीं मोडावीं । आणि ब्राह्मण्यें पीडावीं ॥ १ ॥
पुण्यवंत ते मरावे । पापी चिरंजीव व्हावे ॥ २ ॥
रामदास म्हणे वाड । विघ्नें येती धर्माआड ॥ ३ ॥

#### ( ३ )

लोक दोष आचरती । तेणें दोषें भस्म होती ॥ १ ॥
नाहीं पापाचा कंटाळा । येतो हव्यास आगळा ॥ २ ॥
जनां सुबुद्धी नावडे । मन धांवे पापाकडे ॥ ३ ॥
रामीरामदास म्हणे । पुण्य उणें पाप दुणें[1] ॥ ४ ॥

#### ( ४ )

लोक मिणेंधेंचि चालती । त्यांसी होताती विपत्ती ॥ १ ॥
धर्मप्रवृत्ति बुडावी । शास्त्रमर्यादा उडावी ॥ २ ॥
रामदास म्हणें देवें । बौद्ध[3] होऊनी बैसावें ॥ ३ ॥

#### ( ५ )

नाहीं ज्ञानाचा विचार । केला अज्ञानें संचार ॥ १ ॥
मना आलें तें बोलती । चालों नये तें चालती ॥ २ ॥

---

१ पुण्य कमी व पाप दुप्पट. २ ओशाळपणानें, लालचीनें. ३ मौनी.

अवघा स्वधर्म बुडाला । देह प्रपंची लाविला ॥ ३ ॥
रामीरामदास म्हणे । अविद्येचीं हीं लक्षणें ॥ ४ ॥

( ६ )

सेवकासी भाग्य चढे । त्याचे आधीन होणें पडे ॥ १ ॥
देव करील तें साहावें । काय होईल तें पाहावें ॥ २ ॥
वर्तमान घडे जैसें । उगेंचि व्हावें लागे तैसें ॥ ३ ॥
दास म्हणे वेळ कैसी । राज्य जाहलें कलीसी ॥ ४ ॥

( ७ )

आतां कोणा शरण जावें । सत्य कोणाचें मानावें ? ॥ १ ॥
नाना पंथ नाना मतें । भूमंडळीं असंख्यातें ॥ २ ॥
शरण जावें संतजनां । सत्य मानावें निर्गुणा ॥ ३ ॥
नाना मतीं काय चाड । करणें सत्याचा निवाड ॥ ४ ॥
रामदास सांगे खूण । भक्तीविणें सर्व शीण ॥ ५ ॥

## ( ४ ) पुढारी ब्राह्मणवर्णाची दैना.

( १ )

नीच प्राणी गुरुत्व पावला । तेथें आचाराचि बुडाला ।
वेदशास्त्रब्राह्मणांला । कोण पुसे ? ॥ १ ॥
ब्रह्मज्ञानाचा विचारु । त्याचा ब्राह्मणांसीच अधिकारु ।
' वर्णानां ब्राह्मणो गुरुः ' । ऐसें हें वचन ॥ २ ॥
ब्राह्मण बुद्धीपासून चेवले । आचारापासून भ्रष्टले ।
गुरुत्व सांडून जाले । शिष्य शिष्यांचे ॥ ३ ॥
कित्येक दावलमलकास जाती । कित्येक पीरास भजती ।
कित्येक तुरुक होती । आपुले ईच्छेनें ॥ ४ ॥

---

१ जबरीनें परधर्मांत जे ओढले जातात त्याशिवाय कित्येक स्वतःच्या हौसेनें परधर्मांत जातात, परधर्मीय देवतांना भजतात, याला काय म्हणावें ?

गुरुत्व आलें नीचयातीं । कांहींयेक वाढली महंती ।
शूद्र आचार बुडविती । ब्राह्मणांचा ॥ ५ ॥
हें ब्राह्मणास कळेना । त्याची वृत्तिच वळेना ।
मिथ्या अभिमान गळेना । मूर्खपणाचा ॥ ६ ॥
राज्य नेलें म्लेंच्छक्षेत्रीं । गुरुत्व नेलें कुपात्रीं ।
आपण अत्रीं ना परत्रीं । कांहींच नाहीं ॥ ७ ॥
ब्राह्मणींस ग्रामणीनें बुडविलें । विष्णूनें श्रीवत्स मिरविलें ।
त्याच विष्णूनें शापिलें । परशुरामें ॥ ८ ॥
आम्हीही तेचि ब्राह्मण । दुःखें बोलिलों हें वचन ।
वडिल गेले ग्रामणी करून । आम्हांभोवतीं ॥ ९ ॥
आतांचे ब्राह्मणीं काय केलें । अन्न मिळेना ऐसें जालें ।
तुम्हां बहुतांचे प्रचीतीस आलें । किंवा नाहीं ? ॥ १० ॥
बरें ऐसा प्रसंग जाला । जाला तो होऊन गेला ।
आतां तरी ब्राह्मणीं आपणांला । शाहणे करावें ॥ ११ ॥

(द. १४, स. ७-८)

( २ )

ये कलियुगीं आत्मबोध । तयाचा मांडिला विनोद[3] ।

---

१ ब्राह्मण जर सर्व वर्णांचे गुरु, तर सर्व वर्णांना त्यांनीं समप्रेमानें वागविलें पाहिजे. पण सांप्रत ब्राह्मण मिथ्या अभिमानी झाले असून ग्रामणीनें म्ह० गांवगुंडपणानें, पक्षांधतेनें त्यांना घेरलें आहे व म्हणून त्यांची अवनति झाली आहे ! ज्या विष्णूनें ब्राह्मणभक्तीमुळें श्रीवत्स (भृगुलतेचें चिन्ह) भूषण मानलें त्याच विष्णूनें परशुरामावतारीं ब्राह्मणांस शाप दिला ! २ मागच्या ब्राह्मणांनीं जे गोंधळ करून ठेवले आहेत ते आम्हांला निस्तरावे लागत असून, खरे ब्राह्मण कसे आचारविचारसंपन्न असावेत हा स्वतः कित्ता घालून देण्याचें व ब्राह्मणांत ब्राह्मणपण जागविण्याचें काम आम्हांस केलें पाहिजे. ३ ब्राह्मणांनीं आत्मबोध हा मोक्षोपाय म्हणून सांगायचा तें सोडून त्यांनीं वेदांत करमणुकीचा विषय करून टाकला आहे.

चवढ जाली उदंड खेद । वर्णसंकर आरंभिला ॥ १२ ॥
दुष्काळ पडला भावार्थीचा । विश्वास दृढ कैंचा ।
विवेक आणि वैराग्याचा । फड मोडोनि गेला ॥ १३ ॥
स्वधर्माचा लोप जाला । अधर्मी जन प्रवर्तला ।
स्वइच्छा गोंधळ घातला । कलीनें सावकास ॥ १४ ॥
सत्य सांगतां अविश्वास । असत्याचा वाटे विश्वास ।
जैसे राजहंस सांडूनि वायस । आचारशील म्हणती ॥ १५ ॥
भक्ति अवघी बुडाली । आणि अभक्ती ठाकली ।
आणि ती येतां निघोनि गेली । नीतिमर्यादा ॥ १६ ॥
शब्दज्ञान उदंड जालें । कवित्व घरोघरीं केलें ।
समाधान निःशेष गेलें । हारपोनियां ॥ १७ ॥
हरिदासीं साहित्य वाढविलें । हरिदास्य सांडोनि कळावंत[3] जाले ।
देव सांडोनि फिरों लागले । मनुष्यांभोवतें ॥ १८ ॥
ज्ञानियासी जाली वादशक्ती । राहिली सप्रेम भक्ती ।
भक्तिच नाहीं मा मुक्ती । कैंची असेल तेथें ? ॥ १९ ॥
करूनि नाना उपाव । केला संस्कृतीं रिघाव ।
तेथें जडला अहंभाव । जाणिवेचा[4] ॥ २० ॥
भक्त भाविकें[5] तितुके निमाले । सत्वाचे सज्जन विश्रांती पावले ।
ईश्वरेंही डोळे झांकिले । बौद्ध होवोनि बैसला ॥ २१ ॥

---

१ भावार्थच नष्ट झाल्यामुळें विवेकवैराग्यस्वधर्माचार या सर्वांचाच लोप होऊन जनतेंत अधर्माचार पसरला आहे. २ शब्दज्ञानी कवींचा सुकाळ झाला असून आत्मसमाधान पावून कृतार्थ झालेले प्रासादिक कवि विरळ आहेत. ३ हरिदासांनीं भक्तिज्ञानवैराग्य जनतेला शिकवायचें, पण तेच साहित्य व कला यांच्या जोरावर जनमनोरंजन करणारे पोटार्थी झाले आहेत. ४ संस्कृतज्ञ पंडित वादविवादांतच गर्क ! ५ एकनाथ तुकारामादि.

स्त्रिया भ्रतारासी सदा । सेवा न करिती, पेटती द्वंद्वा ।
पुत्रीं टाकिली मर्यादा । मायबापांची ॥ २२ ॥
ऐसें अवघेंचि पालटलें । पूर्ववर्तमानें तितुकें राहिलें ।
पुढें याहूनि होईल, जालें । नाहींच अद्यापी ॥२३॥(जु.दा.११)

## (५) बहुजनसमाजाची दैना.

### (१)

कितीयेक ते अस्कटें विस्कटेसीं । कितीयेक ते फस्कटे फरकटेसी ।
कितीयेक ते अच्कलें वच्कलेसीं । कितीयेक ते माणसें कच्कलेसीं ॥१॥
किती कर्करीती किती कुर्कुरीती । किती खर्खरीती किती खुर्खुरीती ।
किती गर्गरीती किती गुर्गुरीती । किती घर्घरीती किती घुर्घुरीती ॥२॥
कितीयेक ते वागवादें चणाणा । कितीयेक ते ऊडताती टणाणा ।
किती चर्चरीती किती चुर्चुरीती । किती फर्फरीती किती फुर्फुरीती ॥३॥
कितीयेक ते कारटीं पोरटीसीं । कितीयेक ते होरटीं चोरटीसीं ।
कितीयेक ते वादकें बाधकेसीं । कितीयेक ते निंदकें भेदकेसीं ॥ ४ ॥
किती घातकी पातकी दैन्यवाणें । कितीयेक ते मूढ खोटे पुराणे ।
कितीयेक ते आपस्वार्थी अनर्थी । क्रिया पाहतां सर्वही व्यर्थ व्यर्थी ॥५॥
कितीयेक ते नाटकी चेटकीसे । कितीयेक ते साबरी मंत्रपीसे ।
किती झोलती झूलती मस्तमस्ती । सदा सर्वदा येकमेकांसि कुस्ती ॥६॥
बहूतामसी वृत्ति अत्यंत कर्डी । बहु झोंबती येकमेकांसि नर्डी ।
गचांड्या बुक्या चप्रका आणि लाता । तयाभोंवत्या बोंवलीताति माता ॥

१. पूर्वपरंपरा मोडली. २ तें आतांच आपल्या अनुभवास येत आहे ! ३ अव्यवस्थित. ४ फूट पाडणारे, भेदवादी. ५ दुर्बळ. ६ अर्धवट. ७ करकराट दांतओठ खातात. ८ कुरकुर करितात, सदा असंतुष्ट असतात. ९ कर्कश बोलतात.

उभे पाहती लोक मोठे तमासे । महाकाळ चौताळसे दोनि हैसे ।
सळें पीटिती येकमेकां दणाणा । बळें आगळे बोलताती ठणाणा ॥८॥

जनांमाजि ते बोंब उदंड जाली । स्वभावें दिवाणीत ते हांक गेली
कितीयेक ते सांगतां घीतबंदी । पुढें राजकीं फोडिले जेरबंदी ॥ ९ ॥

बळाचे पुढें घातले चालवीले । पुढें काष्ठयंत्रांत ते घालवीले ।
घरें लूटिलीं सर्वही नागवीले । पुढें सोडितां थंड जाले निवाले ! ॥१०॥

महीमंडळीं काय कैसें कळेना । म्हणोनी भ्रमें लागला देश नाना ।
कितीयेक ते मोहजाळीं बुडाले । कितीयेक ते संगत्यागें उडाले ॥११॥

## ( २ )

महीमंडळीं लोक नाना गुणांचे । असंभाव्य लीळा कळाकूसरीचे ।
कितीयेक साधे कितीयेक बोधे । कितीयेक ते देखिले मंदबोधे ॥१२॥

कितीयेक लाताड लाबाडवाणे । कितीयेक प्राणी पुराणे पुराणे ।
कितीयेक कापट्य तोंडाळ ऊणे । कुशब्दीं कितीयेक वाचाळ सूणे ॥१३॥

करंटे कुरूपी विकारी भिकारी । कितीयेक ते तामसी दुःखकारी ।
कितीयेक ते पातकी पापरूपी । कितीयेक ते दक्ष पुण्यस्वरूपी ॥१४॥

कितीयेक ते लोक नाना गुणांचे । कितीयेक ते उत्तमा लक्षणांचे ।
फिरे दास उदास लोकांस पाहे । मनामाजी थैकीत होऊनि राहे ! ॥१५॥

---

१ येथून पुढचें वर्णन आजकालही सर्वांना सहज कळणारें आहे. मारामारीचे वगैरे खटले दिवाणांत जातात, मग राजकीय (पोलीस) कित्येकांना जेरबंदानें फोडतात, बळाचे म्ह० म्होरके पुढारी पुढें घालतात, खोडे घालतात, घरें लुटून पुरे नागवितात, कैदेंतून सुटून आल्यावर हे लोक 'थंड' होतात म्ह० त्यांचे पुंडावे मोडतात व शेवटीं मरतात ! २ चातुर्याचे. ३ ज्यांचा बोध मंद आहे असे, मठ्ठ. ४ जुने. ५ समर्थ म्हणतात की, मी उदासपणानें सर्वत्र संचार करीत असतांना लोक समाजाची ही विलक्षण स्थिति पाहून मनांत चकित होऊन गेलों आहें !

## ( ६ ) लोककल्याणाची चिंता

हुजूर ! दम निघेना, अंतरीं कोंड नाना
तिळभरि स्थळ कोठें पाहतांही दिसेना ।
बहुत विषम काळें दाटणी थोर जाली
म्हणउनि चरणाब्जीं वृत्ति गुंतोनि ठेली ॥ १ ॥
बहुताचि सुकुमारा ! स्वस्थ नाहीं शरीरा
निशिदिनीं जनाचिंता लागलीसे उदारा ।
सकळ जन सुखावे तो कसा काळ फावे
भजन जन उकावे सर्व आनंद पावे ॥ २ ॥

## ( ७ ) धीर धरा व व्यापक यत्न करा.

( १ )

धीरधरा धीरधरा तकवा । हडबडूं गडबडूं नका ।
काळ देखोनि वर्तावें । सांडावें भय पोटिंचें ॥ १ ॥
धरावा धीर तो मोठा । विचारें पाहतां बरें ।
अधीर माणसें खोटीं । काम कांहीं कळेचिना ॥ २ ॥
धांकेंचि चळचळां कांपे । भेणेंचि फळफळां मुते ।
बोबडी पाडिली तोंडीं । घाबरें चांचरें पडे ॥ ३ ॥
खादाड आळसी मंदु । सूचना ते कळेचिना ।
प्रसंगीं चळचळां कांपे । तो प्राणी आत्मघातकी ॥ ४ ॥

( २ )

" मजें गांजिलें तें साहे । परी भक्तांचें न साहे ॥ १ ॥
माझ्या भक्तां शीण व्हावा । मग मजसी त्यासी दावा ॥ २ ॥
मज अवतार घेणें । माझे भक्तांचे कारणें ॥ ३ ॥

---

१ कठीण काळामुळें आपत्तींची गर्दी झाली आहे. २ हें देवाचें बोलणें.

निजदासांसी पाळावें । दुर्जनांसी निर्दाळावें ॥ ४ ॥
तुम्हां संकटाचे वेळे । काय झांकितों मी डोळे" ॥ ५ ॥
देव म्हणे दासजनीं । चिंता न धरावी मनीं ॥ ६ ॥

( ३ )

अखंड सावधान रे । प्रयोग प्रेत्न मान रे ।
प्रसंग हा तुफान[१] रे । नकोचि वेवधान[२] रे ॥ १ ॥
मनीं धरूनि धारणा । करा बरी विचारणा ।
प्रेत्न मूळ कारणा । अतर्क्य ते विचारणा ॥ २ ॥
म्हणे उदास दास हा । बरें पहा बरें पहा ।
करील प्रेत्न जीतुका । तयास लाभ तीतुका[३] ॥ ३ ॥

*　　　　*　　　　*

करील व्याप तो भला । बहुत भाग्य लाधला ।
नसेल व्याप तो हळू । पडेल रे पळेंपळू[४] ॥ ४ ॥
अरत्र हो परत्र हो । विचित्र काळसूत्र हो ।
अखंड सावधानता । सभाग्य तो नव्हे रितां[५] ॥ ५ ॥
कवी म्हणे बहू बरें । करील देव तें खरें ।
बरी धरूनि वासना । धरा मनीं उपासना ॥ ६ ॥

*　　　　*　　　　*

देशकाळवर्तमान । सर्वही अवेवधान ।
कोणतें विधीविधान । सावधान सावधान ॥ ७ ॥
शरीरवेर्ष[६] पालटे । परोपरी नटे नटे ।
परंतु काय साधिलें ? । अगम्य कोण शोधिलें ? ॥ ८ ॥

---

१ भयंकर. २ गैरसावधपणा. ३ जितका नेटाचा प्रयत्न होईल तितका लाभ मोठा होईल. ४ हळू पडेल म्ह. हीनावस्थेस जाईल, नामशेष होईल. ५ भाग्यवंत कधीं रिकामा बसायचा नाहीं. ६ येथून २-३ श्लोकांत नटवेगिरीची कुत्सा केली आहे. शरीर नटविलें म्हणजे कोणता लाभ होतो ?

शरीरमात्र तें भलें । तयांत कोण शोभलें ?[1] ।
बहु तनूंत येकला । परोपरी विभागला ॥ ९ ॥
कितेक ते भले भले । तयामधेंच गुंतले ।
विचारसार जागवा । तुम्ही तुम्हांस ऊगवा ॥ १० ॥

× × ×

प्रसंग हा कठीण हो । बहूत पावले मोहो ।
परंतु यत्न पाहती । सुखोंचि तेचि राहती ॥ ११ ॥
विवेक पाहणें बरा । बरा विचार तो करा !
उपासकांसि सूचना । ' उपासना उपासना ! ' ॥१२॥

( ४ )

बहू मिळोनि भांडतां । उगेंचि व्यर्थ तंडतां ।
तनुगुणेंचि वोळखा । उगें भरीं भरों नका ॥ १३ ॥
अगाध हा रघूत्तम । न बोलवे पराक्रमु ।
कठीण काळ वीषमु । भ्रमूचि पावयी भ्रमू ॥ १४ ॥
भुपाळही[2] भले भले । जनीं उदंड जाहले ।
ऱ्हासकाळ शेवटीं । विसंचितां लुटालुटी[3] ॥ १५ ॥
सभाग्य रावणादिकां । बहू कठीण काळ कां ?
महीवरी परोपरी । उदंड हे भरोवैरी ॥ १६ ॥
भरे सर्वोचि मागुतें । उगेंचि होतसे रितें ।
म्हणे कवी नका नका । समस्त पावले धका ॥ १७ ॥
नदी[4] भरोन वोहटे । तळें भरोन तें फुटे ।

१ शरीर नटविण्यापेक्षां शरीरमात्राला ज्या आत्मारामामुळें शोभा येते त्याचा शोध घ्या. २ रावणासारखे कित्येक राजे आले आणि गेले. उन्मत्तपणाच्या पाठोपाठ ऱ्हासकाळ ठरलेलाच. ३ उलथापालथ. ४ नदीला महापूर येऊन ती भरून वाहूं लागली की ओहटी ही लागायचीच, तळें भरलें कीं फुटायचेंच, त्याप्रमाणेंच संपत्ति व सत्ता अफाट माजली कीं ऱ्हासकाळ पाठोपाठ यायचाच.

तयापरीच संपदा । जनीं न निश्चळे कदा ॥ १८ ॥
ऋणानुबंध तों घडे । पुढें समस्त वीघडे ।
पशू[1] मनुष्य संपदा । घडोनि वीघडे सदा ॥ १९ ॥
[2]भरोंच लागतां भरे । भरे कदापि नावरे ।
सर्वोचि वोसरे सरे । सरेचि तें कदा नुरे ॥ २० ॥
[3]बरीच वेळ लागतां । घडोन ये न मागतां ।
उगाच काळ वीषमु । पराक्रमुच तो श्रमु ॥ २१ ॥
[4]बराच काळ तो बरा । न मागतांचि ये घरा ।
बरेचि लोक बोलती । सुखें सुखीं कल्लोळती ॥ २२ ॥

## ( ८ ) कलह, पक्षभेद व वितंडवाद टाळा

### ( १ )

कदा देवदैत्यांमधें सख्य नाहीं । जिवां मानवांही मधें सख्य नाहीं ।
स्वजातीविजातीमधें सख्य नाहीं । महंतामहंतामधें सख्य नाहीं ॥१॥
कळहो लागला पंडितापंडितांला । कळहो लागला ज्ञानियाज्ञानियाला ।
कळहो लागला योगियायोगियाला । कळहो लागला तापसातापसाला॥२
बहू जाणते बोलती शास्त्रमत्तें । जनीं दाविती आपुले व्युत्पतीतें ।
उणें बोलती शीघ्रकोपें बहूतें । बळें मारिती येकमेकांसि हातें ॥३ ॥

---

१ पशु, मनुष्यें, संपत्ति यांना 'घडे विघडे,' म्ह. योगवियोग, येणें-जाणें, उदयास्त, आहेच आहे. २ ऐश्वर्य वाढूं लागलें कीं अनिवारपणें वाढतच जातें व तसेंच ओसरूं लागलें कीं मग तें आटपत नाहीं—पार नाहींसें होतें. ३ काळाची अनुकुलता आली कीं न भागतां म्ह. अल्पायासानें मनासारखें घडून येतें. बरें, विषम म्ह. प्रतिकूल काळ असला कीं पराक्रमही श्रमाला कारण होतो. ४ अनुकूल काळ न मागतांच घरीं येतो व मग लोकही अनुकूलच बोलूं लागतात व सर्वच सुखें प्राप्त होतात.

( २ )

कळ्हो अनादि हा असे । विवंचितांचि नीरसे ।
अहंमती[2] विरोचिना । तरी कळहो[1] सरेचिना ॥ १ ॥
विकारलेश जो उरे । अहंपणें भरीं भरे ।
तयासि पाहतां बरें । विरोन राहतां खरें ॥ २ ॥
अभेदभक्तिचा[3] ठसा । अनन्यभाव तो कसा ।
निवेदनेंचि वोळखा । अहंपणें झकों नका ॥ ३ ॥
धरून पक्ष[4] काय रे । उपाय तो अपाय रे ।
तुम्हीं तुम्हांस बांधरा । स्वहीत तें मनीं धरा ॥४॥
जनीं उदड पाहिले । कळ्हो करीत राहिले ।
अनन्यदेव भेटला । कळ्हो तयासि तूटला ॥ ५ ॥
कळ्हो करील शब्द रे । अनंत तो निशब्द रे ।
तुम्ही अनंत का नव्हां । विवादितां अव्हासेवा ॥ ६ ॥
वितंडवाद घालणें । वितंड शब्द बोलणें ।
वितंड बंडही नुरे । उरेल तेंचि तें नुरे ॥ ७ ॥
अनेक शब्दभावना । किती करूं विवंचना ।
जनीं म्हणेल जें जसें । तयासि मानिजे तसें ॥ ८ ॥
उडेल तो पडेल रे । पडेल तो रडेल रे ।
हितार्थ सांगणें घडे । विवंचितां तिढा पडे ॥ ९ ॥
नसोचि न्याय पाहतां । तयांत शीण राहतां ।
न येचि आणि नायके । अहंपणें वृथा झंके[6] ॥ १० ॥

१ कलह हा अनादिच आहे. कौरवपांडवांच्यापूर्वीपासून चाललाच आहे पण विवेक जागता ठेवला तर मिटतो. २अहंकार मोडला तरच कलह मिटतो. ३ कलह मिटविण्याचें बीज अनन्यभक्ति म्ह० सर्व भूतांच्या अंतरीं जो हरी आहे त्याला प्रसन्न ठेवणें म्ह० लोक राजी राखणें हें होय. ४ भेद ५ वेडेंवांकडें. ६ फसे.

असत्य तेंचि सत्य रे । प्रचीत तें असत्य रे ।
स्वधर्म तो अधर्म रे । अधर्म युगधर्म रे ! ॥ ११ ॥
उगाचि पक्ष[1] घेतला । बळेंचि वाद घातला ।
यथार्थ अर्थ व्यर्थ रे । अनर्थ रे अनर्थ रे ॥१२॥
प्रचीत न्याय वलिसे । दुराभिमान त्या नसे ।
विचारसार वीवरी । जनांसि तो सुखी करी ॥ १३ ॥
विचित्र भास भासतो । विवंचितां उदास तो ।
मनास बुद्धि सांगणें । जनांस काय सांगणें ? ॥ १४ ॥

× × ×

विचारणा बरी करी । बहुत धारणा धरी ।
विशेष मानिजे तया । परीक्षवंत श्रोतया ॥ १५ ॥
न दीसतेंचि पाहणें । नसोनि सर्व राहणें ।
घडेचि तो घडीघडी । असार-सार नीवडी ॥ १६ ॥
नसोनें[2] जाणती कळा । कळा समस्त वीकळा ।
परांतरास नेणवे । तयास काय जाणवे ? ॥ १७ ॥
परांतरासि जाणता । नसेल तो मुळीं रिता ।
सिकोन काय सीकलें ? । विकोन काय वीकलें ? ॥ १८ ॥

## ( ९ ) सुराज्याचा कित्ता—रामराज्य.

राम विश्राम देवांचा । राम भक्तांसि आश्रयो ।
राम योगीमुनिध्यानीं । राम रक्षी ऋषिकुळा ॥ १ ॥
कीर्ति या रघुनाथाची । पाहतां तुळणा नसे ।

---

१ पक्ष घेतला कीं वरील सर्व विपरीत दोष त्यामुळें उत्पन्न होतात; पक्षाभिमानी लोक असत्य तें सत्य म्हणून प्रतिष्ठितात व सत्य प्रचीतीचें असेल पण तें विरुद्धपक्षाचें मत म्हणून असत्य ठरवितात ! पक्षांधतेनें असाच प्रकार सर्व बाबतींत होऊन राजकारण नासतें. २ जाणतेपण नसेल तर.

येकवाणी येकवचनी । येकपत्नीच धार्मिकु ॥ २ ॥
राज्य या रघुनाथाचें । कळिकाळासि नातुडे ।
बहुवृष्टि अनावृष्टी । हें कदा न घडे जनीं ॥ ३ ॥
उद्वेग पाहतां नाहीं । चिंतामात्र नसे जनीं ।
व्याधि नाहीं, रोग नाहीं । लोक आरोग्य नांदती ॥ ४ ॥
युध्यें नाहींच अयोध्या । राग ना मत्सरू नसे ।
बंदानिबंदेही नाहीं । दंडदोष कदा नसे ॥ ५ ॥
कुरूपी पाहतां नाहीं । जरामृत्यु असेचिना ।
आदरु सकळै लोकां । सख्यप्रीति परस्परें ॥ ६ ॥
बोलणें सत्य न्यायाचें । अन्याय सहसा नसे ।
अनेक वर्तती काया । येकजीव परस्परें ॥ ७ ॥
दरिद्री धुंडितां नाहीं । मूर्ख हा तो असेचिना ।
परोपकार तो मोठा । सर्वत्र लोकसंग्रहो ॥ ८ ॥
अद्भूत पिकती भूमी । वृक्ष देती सदा फळें ।
अखंड दुभती धेनु । आरोग्यें वाहती जळें ॥ ९ ॥
नद्या सरोवरें वापी । डोलती नूतनें बनें ।
फळती फुलती झाडें । सुगंध वनवाटिका ॥ १० ॥
उदंड वसती ग्रामें । नगरें पुरेंचि पट्टणें ।
तीर्थें क्षेत्रें नाना स्थानें । शिवालयें गोपुरें बरीं ॥ ११ ॥
मठ माड्या पर्णशाळा । ऋषिआश्रम साजिरे ।
वेदशास्त्रधर्मचर्चा । स्नानसंध्या तपोनिधि ॥ १२ ॥
चढता वाढता प्रेमा । सुखानंद उचंबळें ।

---

१ अयोध्येंत युद्धप्रसंगच नाहीं, द्वेषमत्सर इ. दुर्विकार नाहींत, म्हणून तिचें नांव अयोध्या. जेथें योध्य नाहीं म्ह. युद्ध करण्यास योग्य, विरोधीभावाचें कोणी नाहीं ती अयोध्या. २ भलभलते प्रतिबंध. ३ दंड करण्यास योग्य असे दोष (गुन्हे) कोणी करीत नाहीं. ४ देह अनेक, चित्त एक.

संतोष समस्त लोकां । रामराज्य भूमंडळीं ॥ १३ ॥
हरिदास नाचती रंगीं । गायनें कीर्तनें बरीं ।
रागरंग तानमानें । टाळबंधें विराजती ॥ १४ ॥
नाना युक्ति नाना बुद्धि । नाना विद्या नाना कळा ।
नाना संगीतसामर्थ्यें । नाना वाद्यें परोपरी ॥ १५ ॥
सर्वही तोषले तोषें । नामघोषेंचि गर्जती ।
रामराजा दयासिंधु । वोळैला सेवकांवरी ॥ १६ ॥
रामदासीं ब्रह्मज्ञान । सारासारविचारणा ।
धर्मस्थापनेसाठीं । कर्मकांड उपासना ॥ १७ ॥ (मानपंचक)

## (१०) शिवरायाचें गौरव व प्रोत्साहन.

निश्चयाचा महामेरु[२] । बहुत जनांसी आधारु ।
अखंडस्थितीचा निर्धारु । श्रीमंत योगी ॥ १ ॥
परोपकाराचिया राशी । उदंड घडती जयासी ।
तयाचे गुणमहत्वासी । तुळणा कैची ? ॥ २ ॥
यशवंत कीर्तिवंत । सामर्थ्यवंत वरदवंत ।
पुण्यवंत नीतिवंत । जाणता राजा ॥ ३ ॥
आचारशीळ विचारशीळ । दानशीळ धर्मशीळ ।
सर्वज्ञपणें सुशीळ । सकळां ठाईं ॥ ४ ॥
धीर उदार गंभीर । शूर क्रियेसी तत्पर ।
सावधपणें[३] नृपवर । तुच्छ केले ॥ ५ ॥
तीर्थक्षेत्रें मोडिलीं । ब्राह्मणस्थानें भ्रष्ट झालीं ।
सकळ पृथ्वी आंदोळली[४] । धर्म गेला ॥ ६ ॥
देवधर्म गोब्राह्मण । यांचें करावया संरक्षण ।

१ प्रसन्न झाला. २ ह्या प्रोत्साहक विशेषणांनीं शिवरायाचें गौरव केलें आहे. ३ स्वतःच्या हुषारीनें इतर राजांस व पादशहांस पराजित केलें. ४ हादरून गेली.

हृदयस्थ जाला नारायण । प्रेरणा[1] केली ॥ ७ ॥
उदंड पंडित पुराणिक । कवीश्वर याज्ञिक वैदिक ।
धूर्त तार्किक सभानायक । तुमचे ठायीं ॥ ८ ॥
या भूमंडळाचे ठायीं । धर्म रक्षी ऐसा नाहीं ।
महाराष्ट्र[2]धर्म राहिला कांहीं । तुम्हांकरितां ॥ ९ ॥
आणिकही धर्मकृत्यें चालती । आश्रित होऊनि कित्येक राहती ।
धन्य धन्य तुमची कीर्ति । विश्वीं विस्तारली ॥ १० ॥
कित्येक दुष्ट संहारिले । कित्येकांस धाक सुटले ।
कित्येकांस आश्रय जाले । शिव कल्याणराजा ॥ ११ ॥
तुमचे देशीं वास्तव्य केलें । परंतु वर्तमान नाहीं घेतलें ।
ऋणानुबंधें विस्मरण जालें । काय नेणूं ॥ १२ ॥
सर्वज्ञ मंडळी धर्ममूर्ती । सांगणे काय तुम्हांप्रती ।
धर्मस्था[3]पनेची कीर्ति । सांभाळली पाहिजे ॥ १३ ॥
उदंड राजकारण तुटलें । तेणें चित्त विभागलें ।
प्रसंग नसतां लिहिलें[4] । क्षमा केली पाहिजे ॥ १४ ॥

## ( ११ ) धूर्तपणाचें राजकारण.

( हा महत्त्वाचा समास कोणास कोणत्या प्रसंगीं सांगितला हें नक्की नाहीं. तथापि यांत जावळीच्या चंद्रराव मोऱ्यास शिवरायाच्या मंडळींनीं नामोहरम केला तें प्रकरण दिसतें. त्या प्रसंगापूर्वींच ही मसलत समर्थांनीं दिली असावी).

ज्ञानी आणि उदास । समुदायाचा हव्यास ।
तेणें अखंड सावकास । एकांत सेवावा ॥ १ ॥

---

१ नारायणाच्या प्रेरणेनेंच तुमची स्वधर्मसंरक्षक स्वराज्यस्थापना चालली आहे. देवधर्मगोब्राह्मणांचें संरक्षण हा तुमच्या स्वराज्यप्राप्तीचा हेतु सर्वमान्य आहे. २ महाराष्ट्रांतील लोकांचा धर्म तुमच्या चळवळीमुळें कांहीं राहिला आहे, इतर प्रांतांत धर्मग्लानि अधिक झाली आहे. ३ समर्थांचा मुख्य उपदेश धर्मस्थापनेचा म्ह० देवधर्मगोब्राह्मणपालनाचा, अर्थात् तद्द्वारां सर्व जनकल्याणाचा आहे. ४ हें पत्र कोणत्या प्रसंगीं लिहिलें असावें हें नीट समजत नाहीं.

तेथें तजविजा कळती । अखंड चाळणा निघती ।
प्राणिमात्रांची स्थितिगती । कळों येते ॥ २ ॥
जरी हा चाळणाच करीना । तरी कांहींच उमजेना ।
हिसेबझाडाच पाहीना । दिवाळखोर ॥ ३ ॥
येक मिरासी साधिती । एक सीध्यों गमाविती ।
व्यापकपणाची स्थिति । ऐसी आहे ॥ ४ ॥
जेणें जें जें मनीं धरिलें । तें तें आधींच समजलें ।
कृत्रिमें[2] अवघेंचि खुंटलें । सहजाचि येणें ॥ ५ ॥
चोर[3] भांडारी करावा । घसरतांच सांभाळावा ।
गोवा[4] मूर्खपणाचा काढावा । हळुहळु ॥ ६ ॥
या अवद्या पहिल्याचें[5] गोष्टी । प्राणी[6] कोणी नव्हतां कष्टी ।
राजकारणानें मंडळ वेष्टी । चहूंकडे ॥ ७ ॥
कांटीनें कांटा झाडावी । झाडावी परी ते कळों नेदावी ।
कळकटे[7]पणाची पदवी । असों न द्यावी ॥ ८ ॥
कोणीयेक काम करितां होतें । न करितां तें मागें पडतें ।
या कारणें ढिलेपण तें । असोंच नये ॥ ९ ॥
जो दुसऱ्यावरी विश्वासला । त्याचा कार्यभाग बुडाला ।
जो आपणचि कष्टत गेला । तोचि भला ॥ १० ॥
अवघ्यांसि[9] अवघें कळलें । तेव्हां तें रितें[10] पडिलें ।

१ असलेली (सिद्ध) मिरास पाहतां पाहतां घालवितात. २ ढोंग, खोटे प्रकार. ३ चोर भांडारी करणारा मालक त्याहून फारच हुषार (शिवरायासारखाच) पाहिजे. ४ मूर्खपणानें त्यानें केलेले गोंधळ. ५ अशी ही शहाण्यांची परंपरा वागत आली आहे. ६ कोणासही नाखुष न करितां राजकारणांत लोक गोंवावेत. ७ कलह करणारा असें म्हणवून घेऊं नये. ८ हें सूत्र सर्व कार्यकर्त्यांनीं लक्षांत ठेवावें. ९ अवघ्यांस अवघें कळेल तर तें राजकारण कसलें ? १० अयशस्वी होईल.

याकारणें ऐसें घडलें । न पाहिजे कीं ॥ ११ ॥
मुख्य सूत्र हातीं घ्यावें । करणें तें लोकाकरवीं करवावें ।
कित्येक खळ्[1]ळक उगवावे[2]ं । राजकारणामध्यें ॥ १२ ॥
बोलके पहिल[3]वान कळकटे । तयासीच [4]द्यावे झटे ।
दुर्जनें राजकारण दाटे । ऐसें न करावें ॥ १३ ॥
ग्रामण्य[6] वर्मी सांपडावें । रगडून पीठाचि करावें
करूनि मागुती सां[7]वरावें । बुडऊं नये ॥ १४ ॥
खळ दुर्जनासी भ्यालें । राजकारण नाहीं राखिलें
तेणें अवघें प्रगट जालें । बरें वाईट ॥ १५ ॥
समुदाव पाहिजे मोठा । तरी तणावा असाव्या बळकटा ।
मठ करून ताठा । धरूं नये ॥ १६ ॥
दुर्जन प्राणी समजावे । परी ते प्रगट न करावे ।
सज्जनांपरीस आळवावे । महत्त्व देऊनी ॥ १७ ॥
जनांमध्यें दुर्जन प्रगट । तरी मग अखंड खटखट ।
याकारणें ते वाट । बुझून टाकावी ॥ १८ ॥
गनीमाच्या देखतां फौजा । रणशूरांच्या फुर्फुरती भुजा ।
ऐसा पाहिजे कीं रा[9]जा । कैपक्षी परमार्थी ॥ १९ ॥
तयास देखतां दुर्जन धाके । बैसवी प्रचीतीचे तडाखे ।
बंडपाखांडाचे धां[10]बे । सहजचि होती ॥ २० ॥
हे धूर्तपणाचीं कामें । राजकारण करावें नेमें ।
ढिलेपणाच्या सं[11]भ्रमें । जाऊं नये ॥ २१ ॥

१ धूर्त लोक. २ गुंतवावेत. ३ भांडखोर पुढारी. ४ त्याशींच प्रथम झगडावें. ५ अडून पडेल. ६ कुटाळांना वर्मी ठोकावें. ७ पुन्हा सावरावें. ८ आवर, आक्रमशक्ति. ९ राजा असा लोककैवारी व परमार्थी म्ह. धर्मस्थापक असावा. १० मोडून जातात. ११ गोंधळानें.

कोठेंच पडेना दृष्टी । ठाईं ठाईं त्याच्या गोष्टी ।
वाग्विळासें सकळ सृष्टी । वेधिली तेणें ॥ २२ ॥
हुंब्यास हुंबा लाऊन द्यावा । टोणप्यास टोणपा आणावा ।
लौंदास पुढें उभा करावा । दुसरा लौंदें ॥ २३ ॥
धटासी आणावा धट । उद्धटासी पाहिजे उद्धट ।
खटनटासी खटनट । अगत्य करी ॥ २४ ॥
जैशास तैसा जेव्हां भेटे । तेव्हां मज्यालसी थाटे ।
इतुकें होतें परी धनी कोठें । दृष्टीस नें पडे॥२५॥(द.१९,स.९)

## (१२) राजधर्म, क्षात्रधर्म व सेवकधर्म.

### १ राजधर्म.

आधीं मनुष्य वोळखावें । योग्य पाहूनि काम सांगावें ।
निकामी तरी ठेवावें । येकीकडे ॥ १ ॥
पाहोन समजोन कार्य करणें । तेणें कदापी न ये उणें ।
कार्यकर्त्याचे गुणे । कार्यभाग होतो ॥ २ ॥
कार्यकर्ता प्रयत्नीं जाड । कांहींयेक असला हेकाड ।
तरी समर्थपणें पाठवाड । केली पाहिजे ॥ ३ ॥

---

१ हुंबा म्ह. रडका. २ लबाड. ३ धटिंगण. ४ जशास तसा भेटला कीं सभेला, कार्यभागाला, राजकारणाला रंग चढतो. ५ पुन्हा आपण नामानिराळें रहावें. भवभूतीनें मालतीमाधवांत याच प्रकारचा एक श्लोक घातला आहे :--

' बहिः सर्वाकारप्रगुणरमणीयं व्यवहरन्
पराभ्यूहस्थानान्यपि तनुतराणि स्थगयति ।
जनं विद्वानेकः सकलमभिसंधाय कपटै--
स्तटस्थः स्वानर्थान्घटयति च मौनं च भजते ॥ '

समर्थांनीं कणिकनीतीचा असा उपदेश कोणत्या प्रसंगविशेषानें केला असेल तो असो ! ६ कुचर, कामाला न येणारे. ७ कार्यकर्ता मोठा प्रयत्न करणारा असून जरा हेकट असला तरी त्याला पाठीराखेपणानें संभाळून घेतलें पाहिजे.

अमर्याद फितव्रेखोर । यांचा करावा संव्हार ।
शोधिला पाहिजे विचार । यथातथ्य ॥ ४ ॥
मनुष्य राजी राखणें । हेंच भाग्याचीं लक्षणें ।
कठिणपणें दूरी धरणें । कांहींयेक ॥ ५ ॥
उपाधीस जो कंटाळला । तो भाग्यापासूनि चेवला ।
समयीं धीर सांडिला । तोही खोटा ॥ ६ ॥
संकटीं कंटाळों नये । करावे अत्यंत उपाय ।
तरी मग पाहतां काय । उणें आहे ? ॥ ७ ॥
धुरेनें युद्धासी जाणें । ऐसीं नव्हेत कीं राजकारणें ।
धुराचे[3] करून सोडणें । कितीयेक ॥ ८ ॥
उदंड मुंडें[4] असावीं । सर्वही येक न करावीं ।
वेगळालीं कामें घ्यावीं । सावधपणें ॥ ९ ॥
मोहरा पेटला अभिमाना । मग तो जिवास पाहेना ।
मोहरे मेळवूनि नाना । वरी चपेटे करी ॥ १० ॥
देखोन व्याघ्राचा चपेटा । मेंढरें पळती नाना वाटा ।
मस्त जो तो रेडा मोठा । काय करावा ? ॥ ११ ॥
रायांनीं करावे राजधर्म । क्षत्रीं करावे क्षात्रधर्म ।
ब्राह्मणीं करावे स्वधर्म । नानाप्रकारें ॥ १२ ॥
तुरंग शस्त्रें आणि स्वार । पाहिला पाहावा विचार ।
निवटूं जातां थोर थोर । शत्रु पळती ॥ १३ ॥
ऐसा प्रपंचाचा विवेक । स्वल्प बोलिलों कांहींयेक ।
येका मनोगतें स्वामी-सेवक । असतां बरें ॥ १४ ॥

---

१ फितूर मात्र चालायचा नाहीं. २ खुद्द मालकानें. ३ आपल्यासारखेच पुढारी त्यानें तयार केले पाहिजेत. ४ डोकीं, माणसें.

## २ क्षात्रधर्म

अल्पस्वल्प संसारधर्म । मागां बोलिले राजधर्म ।
आतां ऐका क्षात्रधर्म । परम दुर्लभ जो ॥ १ ॥
जयास[1] जिवाचें वाटे भयें । तेणें क्षात्रकर्म करूं नये ।
कांहीं तरी करून उपायें । पोट भरावें ॥ २ ॥
विन्मुखमरणीं[2] नरक होती । वांचून येतां मोठी फजीती ।
इहलोक परलोक जाती । पहाना का ॥ ३ ॥
मारितां मारितां मरावें । तेणें गतीस पावावें ।
फिरोन येतां भोगावें । महद्भाग्य ॥ ४ ॥
जैसा भांड्याचा गलोला[3] । निर्भय भारामध्यें शिरला ।
तैसा क्षत्री रिचवला[4] । परसैन्यामध्यें ॥ ५ ॥
ऐसे अवघेच उठतां । परदळांची[5] कोण चिंता ? ।
हरणें लोळवी चित्ता । देखत जैसा ॥ ६ ॥
मर्दे तकवा सोडूं नये । म्हणिजे प्राप्त होतो जय ।
कार्यप्रसंग समय । वोळखावा ॥ ७ ॥
दोनीं दळें येकवटें । मिसळतां लखलखाटें ।
युद्ध करावें खणखणाटें । सीमा सांडूनी ॥ ८ ॥
देवमात्र उच्छेदिला । जित्यापरीस मृत्यु भला ।
आपुला स्वधर्म बुडविला । ऐसें समजावें ॥ ९ ॥
मराठा तितुका मेळवावा । आपुला महाराष्ट्रधर्म वाढवावा ।
येविषयीं न करितां तकवा[6] । पूर्वज हांसती ॥ १० ॥
मरणहांक तो चुकेना । देह वांचवितां वांचेना ।
विवेकी होऊन समजाना । काय करावें ? ॥ ११ ॥

---

१ क्षत्रियाची हीच व्याख्या. २ पळून येतांना मरण आलें तर. ३ भांडचाचा (तोफेचा) गलोला (गोळा). ४ मुसंडी मारून घुसला. ५ शत्रु-सैन्याची. ६ लाज न बाळगतां.

देवद्रोही तितुके कुत्ते[1] । मारूनि घालावे परते ।
देवदास पावती फत्ते । यदर्थी संशय नाहीं ॥ १२ ॥
देव मस्तकीं धरावा । अवघा हलकल्लोळ करावा ।
मुलुख बडवा कां बुडवावा । धर्मस्थापनेसाठीं ॥ १३ ॥
विवेक विचार सावधपणें । दीर्घ प्रेत्न केलाचि करणें ।
तुळजावराचेन गुणें । रामें रावण मारिला ॥ १४ ॥
अहो हे तुळजाभवानी । प्रसिद्ध रामवरदायिनी ।
रामदास ध्यातो मनीं । यन्निमित्त ॥ १५ ॥

## ३ सेवकधर्म

जो आपुलें हित न करी । तो आपुला आपण वैरी ।
येथें कांहीं कोणावरी । शब्द नाहीं ॥ १ ॥
श्रेष्ठांचें मनोगत राखेना । बळेंच करी वल्गना ।
युक्तिप्रयुक्ति[2] नाना । प्रकारें करी ॥ २ ॥
श्रेष्ठाचें केलें मोडावें । आपुलेंचि पुढें प्रतिष्ठावें ।
तरी मग लागे भ्रष्टावें । वैभवापासूनी ॥ ३ ॥
कार्य करितां कांहीं न मागे । तयाची चिंता प्रभूस लागे ।
ऐसें जाणोन विवेक जागे । म्हणिजे बरें ॥ ४ ॥
ज्याचे अंतरीं स्वार्थबुद्धी । तेथें कैची असेल शुद्धी ।
बुद्धि सांडितां अवधि[3] । दुःखासि होय ॥ ५ ॥
स्वामींनीं जें जें बोलावें । तेंचि सेवकीं प्रतिष्ठावें ।
वेळ[4] चुकवूनि बोलावें । विनीत होऊनी ॥ ६ ॥
मी शाहाणा ऐसें कळलें । तरी स्वतंत्र पाहिजे केलें ।

---

१ कुतरे २ धन्याचें मनोगत न राखतां आपलेंच शहाणपण चालविणारा व अनेक युक्त्या परभारें करणारा सेवक निरुपयोगी होय. ३ शेवट कडेलोट. ४ उलट बोलायचें असल्यास.

स्वतंत्र होतां मिरवलें । शहाणपण ॥ ७ ॥
ज्याकरित प्राणी वाढले[1] । त्यासीच अडवूं लागले ।
ते कैसे म्हणावे भले । नीतिवंत ? ॥ ८ ॥
सेवक तोचि जो अडेना । शब्द भुईस पडेना[2] ।
काम चुकलें हें घडेना । कदाकाळीं ॥ ९ ॥
आपस्वार्थ उदंड करणें । आणि स्वामीकार्य बुडवणें ।
ऐसीं नव्हेत कीं लक्षणें । सेवकांचीं ॥ १० ॥
सेवक विश्वास दाविती । आणि वैरियांकडे मिळोन जाती ॥
तया चांडाळांसी गति । कोठेंचि नाहीं ॥ ११ ॥
मागील दिवस विसरती । उगेंचि तालेदौरी[3] आणिती ।
अखंड चुकती लालुची करिती । परम अन्यायी ॥ १२ ॥
पोटासाठीं सेवा करणें । उगाच फुगती रिकामेपणें ।
थोरपण दिधलें कोणें । सेवकांसी ? ॥ १३ ॥
कामाकारणें ठेविलें । काम पाहोन वाढविले ।
तेही उगेच फुगले । कोण्या हिशेबें ? ॥ १४ ॥
काम नासलें तरी नासावें । परी सेवकाधीन न व्हावें ।
दास म्हणे स्वभावें । बोलिला न्याय ॥ १५ ॥

## ( १३ ) सावधपण.

कोणाचा भर्वसा न धरावा । आपुला आपण विचार करावा ।
तर्क[4] उदंड धरावा । कोणीएकविषयीं ॥ १ ॥
देहेदुःखें कोंदरों[5] नये । उदंडाचि करावे उपाय ।
मग सर्व सुखांसी काय । उणें आहे ? ॥ २ ॥

१ योग्यतेस चढले. २ मालकाचा शब्द तोंडून निघायचा अवकाश कीं धांवलाच कामाला. ३ मोठेपणाचा डौल. ४ धीर, पीळ, आक्रमशक्ति. ५ कच खाऊं नये.

एकांतीं चाळणा करावी । धारणा उदंड धरावी ।
नाना विचारणा करावी । अरिमित्रांची ॥ ३ ॥
प्रयत्नीं चुकों नये । सुखवासी कामा नये ।
सुचावे नाना उपाय । अनेकविषयीं ॥ ४ ॥
धुरेनें धीर सोडूं नये । मुख्य प्रसंग चुकों नये ।
उद्योगरहित कामा नये । पशु जैसे ! ॥ ५ ॥
उपाधीस कंटाळला । विचाराचा आळस आला ।
म्हणिजे जाणावा चेवला[1] । बुद्धीपासूनी ॥ ६ ॥
कार्यकर्ते दुरी करावे । प्रसंगीं सर्वांचि हातीं धरावे ।
परंतु शोधोनि पाहावे । कपटा[2]विषयीं ॥ ७ ॥
आपल्या मनासी रोधावें[3] । परांतर शोधावे ।
क्षणक्षणां सांभाळावे । बदलेल म्हणोनी ॥ ८ ॥
पाहिलेंचि पाहावें । केलेंचि करावें ।
शोधिलेंचि शोधावें । राजकारण ॥ ९ ॥
ईशारतीचें[4] बोलतां नये । बोलावयाचें लिहों नये ।
लिहावयाचें सांगों नये । जबाबीने ॥ १० ॥

## ( १४ ) शिवरायाचा गौरव

(अफझुलखानासारखें धेंड उलथून पाडून यशस्वी झाल्यावर शिवाजी महाराज समर्थांचे दर्शनास आले, त्या वेळीं प्रत्यक्ष स्तुति न करितां समर्थांनीं त्यांचें गुणगौरव केलें, सावधानतेचा बोध केला व त्यांच्या गुणांबद्दल हें 'देणें ईश्वराचें' आहे असें समजून 'अहंकाराचा वारा' लागूं देऊं नका असा गर्भित इशारा दिला. तो सर्व भाग मोठा रम्य आहे. त्या प्रसंगीचा पुढील समास आहे.)

नानावस्त्रें नाना भूषणें । येणें शरीर शृंगारणें ।

---

१ च्युत झाला. २ कपटी आहेत का एकनिष्ठ आहेत हें पहावें. ३ आवरावें ४ यांत फार मोठें राजकारण आहे. बोलण्यानें किंवा लिहिण्यानें पुष्कळदां राजकारण फसतें; लिहायचें तें विचार करून लिहावें. तें तोंडातोंडीं कळवूं नये.

विवेकें विचारें राजकारणें । अंतरें[1] शृंगारिजे ।। १ ।।
तुंडें[2] हेकाडें[3] कठोरवचनी । [4]अखंड तोले साभिमानी ।
न्यायनीति अंतःकरणीं । घेणार नाहीं ।। २ ।।
ऐसे लौंदे[5] बेइमानी । कदापि सत्य नाहीं वचनीं ।
( ते ) पापी अपस्मारें[6] जनीं । राक्षस जाणावे[7] ।। ३ ।।
(असो) समयासारिखा समय येना । नेम सहसा चालेना ।
नेम धरितां राजकारणा । अंतर[8] पडे ।। ४ ।।
अति सर्वत्र वर्जावें । प्रसंग पाहोन चालावें ।
हठनिग्रहीं न पडावें । विवेकी पुरुषें ।। ५ ।।
बरें ईश्वर आहे साभिमानी । विशेष तुळजा भवानी !
परंतु विचार पाहोनी । कार्य करणें ।। ६ ।।
अखंडचि सावधाना । बहुत काय करावी सूचना ।
परंतु कांहीं येक अनुमाना । आणिलें पाहिजे ।। ७ ।।
समर्थापासीं बहुत जन । राहिला पाहिजे साभिमान[10] ।
निश्चळ करूनियां मन । लोक असती ।। ८ ।।
म्लेंच्छ दुर्जन उदंड । बहुतां दिवसांचें माजलें बंड ।
याकारणें अखंड । सावधान असावें[9] ।। ९ ।।
सकळकर्ता तो ईश्वरु । तेणें केला अंगिकारु ।
तया पुरुषाचा विचारु । विरळा जाणे ।। १० ।।
न्यायनीतिविवेकविचार । नाना प्रसंग प्रकार ।
परीक्षणें परांतर । देणें ईश्वरीचें[11] ।। ११ ।।

---

१ चित्त. २ तोंडाळ. ३ हट्टी, हेकट. ४ अहंकाराच्या डौलानें सदा फुगलेला. ५ लबाड. ६ पीडादायक. ७ अशांना ओळखून दूर ठेवावें ८ व्यत्यय. ९ सावधपणानें. १० आपलेपणा. ११ शिवरायाच्या अंगच्या गुणांचें वर्णन अप्रत्यक्षपणें करून हे गुण हें ' देणें ईश्वराचें आहे, त्याविषयीं चित्ताला अभिमानाचा वारा लागूं देऊं नये ' असें ध्वनित केलें आहे.

महायत्न सावधपणें । समयीं धारिष्ट धरणें ।
अद्भुतचि कार्य करणें । देणें ईश्वराचें ॥ १२ ॥
यशकीर्तिप्रतापमहिमा । उत्तम गुणांसी नाहीं सीमा ।
नाहीं [१]दुसरी उपमा । देणें ईश्वराचें ॥ १३ ॥
देवब्राम्हण आचारविचार । कितेक जनांसी आधार ।
सदा घडे परोपकार । देणें ईश्वराचें ॥ १४ ॥
इहलोक परलोक पाहणें । अखंड सावधपणें राहणें ।
बहुतजनांचें साहणें । देणें ईश्वराचें ॥ १५ ॥
देवाचा [२]कैपक्ष घेणें । ब्राम्हणांची चिंता वाहणें ।
बहुत जनांसी पाळणें । देणें ईश्वराचें ॥ १६ ॥
धर्मस्थापनेचे नर । ते ईश्वराचे अवतार ।
जाले, आहेत, पुढें होणार । देणें ईश्वराचें ॥ १७ ॥
[३]उत्तम गुणांचा ग्राहक । तर्क तीक्ष्ण विवेक ।
धर्मवासना पुण्यश्लोक । देणें ईश्वराचें ॥ १८ ॥
सकळ गुणांमध्यें सार । तजविजा [४]विवेकविचार ।
जेणें पाविजे पैलपार । अत्रपरत्रींचा ॥ १९ ॥ (द. १८, स. ६)

## ( १५ ) कुळदेवी तुळजाभवानी.

### ( १ )

दुःखदारिद्रउद्वेगें । लोक सर्वत्र पीडिले ।
मुळीची कुळदेव्यो[५] हे । संकटीं रक्षिते बळें ॥ १ ॥

१ अद्वितीय आहांत हा भाव. २ कैवार, बाजू. ३ गुणग्राहकता, तीक्ष्ण तर्कबुद्धि, विवेक, धर्मवासना, सत्कीर्ति-हें 'देणें ईश्वराचें' आहे. ४ इहलोकींच्या व्यवहाराच्या तजविजा व परलोकींचा विचार. ५ मूळमाया ही आमची कुळदेवता आहे. रामरायावर हिचाच प्रसाद झाला म्हणून हिला ' रामवरदायिनी ' म्हटलें आहे.

उन्मत्त रावणें येणें । त्रैलोक्य पीडिलें बळें ।
देव ते घातले बंदीं । कैपक्षी राम पावला ॥ २ ॥
रावणें चोरिली सीता । मायकापटय साधिलें ।
धुंडितां धुंडितां सीता— । शुद्धि कोठें न सांपडे ॥ ३ ॥
रामसौमित्र हे बंधु । उदास धांकुटे वयें ।
श्रीमंत लक्षणें मोठीं । दिसती मुख्यदेवसे ॥ ४ ॥
फिरती थोर आरण्यें । कर्कशें गिरिकंदरें ।
कपाटें विवरें झाडीं । झोतवे दर्कुटे कडे ॥ ५ ॥
अरण्या हिंडतां तेथें । कुमारी देखिली वनीं
कुमारी बाळलीला ते । दिसे त्रैलोक्यजननी ॥ ६ ॥
रूप ते नेटकी बाळा । लावण्य बाणलें असे ।
दैदीप्य खेचरी मुद्रा । पार्वती लक्षुमी जसी ॥ ७ ॥
ते सूर्यवंशिचे राजे । विख्यात भुवनत्रयीं ।
नेमस्त न्यायनीतीचे । करिती धर्मस्थापना ॥ ८ ॥
येकांतीं देखिली त्यांनीं । देखिलें त्या कुमारिनें ।
‘ कैची तूं कोण तूं काई ? । नाम तें कोणतें तुझें ’ ॥ ९ ॥
म्हणे रे, ‘ मीच तुंकाई । जा तुम्हां वर दीधला !
मनाच्या कामना होती । सीताशुद्धी करा तुम्ही ’ ॥ १० ॥
‘ येथुनी दाविसी लंका । तरीच वरु हा खरा ! ’ ।
वृक्षारूढें सुमित्रानें । लंका तो देखिली पुढें ! ॥ ११ ॥
झांपडी पडिली नेत्रीं । ‘ उदोउदो ’ म्हणे फणी ।

१ मायेचें कपट करून. २ सीताशोधांत वनांत फिरतांना रामलक्ष्मणांनीं हिला पाहिलें. ३ ‘ मीच आहें, तूं काई ? तं कोण आहेस ? सर्व कर्तृत्व माझें, तूं निमित्तमात्र आहेस ’ हा अर्थ तुकाई ह्या देवीच्या नांवांत आहे. ४ पडदा. ५ अंबाबाईचा उदय उदय ( जयजयकार ) असो. शेषावतार लक्ष्मण.

रामराजा महाराजा । वरु हा दीधला तया ॥ १२ ॥
जननी रामवरदायिनी । तधींपासूनि बोलिजे ।
प्रता[१]पगिरिचे ठायीं । आदिशक्ती विराजते ॥ १३ ॥

(२)

तुळजापु[२]रीची माता । प्रतापेंचि प्रगटली ।
आदिशक्ती महामाया । कुळींची कुळस्वामिणी ॥ १४ ॥
कुळाचि पाळिले आम्हां । रक्षिले बहुतापरी ।
तीच ते वैष्णवी माया । तारिते मारिते जनीं ॥ १५ ॥
[३]शक्तीनें पावती सुखें । शक्ति नसता विटंबना ।
शक्तीनें नेटका प्राणी । वैभवें भोगितां दिसे ॥ १६ ॥
कोण पुसे अशक्ताला ? । रोगीसे बरा[४]डी दिसे ॥
शक्ती तों सर्वहि सुखें । शक्ती आनंद भोगवी ॥ १७ ॥
सार संसार शक्तीनें । शक्तीनें शक्ति भोगिजे ।
शक्त तो सर्वही भोगी । शक्तीविण दरिद्रता ॥ १८ ॥
[५]शक्तीनें मिळती राज्यें । युक्तीनें यत्न होतसे ।
शक्ति युक्ति जये ठाईं । तेथें श्रीमं[६]त धावती ॥ १९ ॥
अचुक चुकेना कोठें । त्यांचीं राज्यें समस्तही ।
युक्तीनें चालती सेना । युक्तीनें युक्ति वाढवी ॥ २० ॥
उदंड [७]खास्तिचीं कामें । मर्द मारूनि जातसे ।
नामर्द काय ते लंडी । सदा दुश्चीत ळालची ॥ २१ ॥

---

१. महाबळेश्वराच्या पाठीमागें हा प्रचंड गड आहे. २ तुळजापुरीही आदिशक्ति पहिल्यापासून आहे. तेथून ही प्रतापगडावर आली ३ शक्ति हें तिचें रूप. ४ आशाळभूत रोगी. ५ शक्ति म्ह. शरीरबळ व युक्ति म्ह. बुद्धिबळ दोन्ही एकवटल्या कीं तेथें परमात्मा आहे. क्षत्रिय व ब्राह्मण एकमतानें वागूं लागले. म्ह. शक्तियुक्ति एक झाल्या कीं तेथें देव आपल्या सकल ऐश्वर्यासकट प्रगट होतात. ६ परमेश्वर ‘यत्र योगेश्वरः कृष्णो ’ ७अडचणींतली पेचाचीं कामें.

फितव्यानें बुडती राज्यें । खबदारी असेचिना ।
युक्ति ना शक्ति ना बेगी । लोक राजी असेचिना ॥ २२ ॥
सेवकां आवरूं नेणे । तो राजा मूर्ख जाणिजे ।
मूर्खाचें राज्य राहेना । कोणाचें कोण ऐकतो ? ॥ २३ ॥
लोकांसी राखणें राजी । तें राज्य प्रबळे बळें ।
नेटकें कार्य साधावें । रोधावें कुटिळा जना ॥ २४ ॥
असो हें बोलणें जालें । युक्तीवीण कामा नये ।
युक्तीला पाहिजे शक्ती । तस्मात् शक्ती प्रमाण हे ॥ २५ ॥
मुक्त केल्या देवकोटी । सर्वही शक्तिच्या बळें ।
समर्थ भवानी माता । समर्था वरु दीधला ॥ २६ ॥
इच्छा पूर्ण करी माता । वाढवी बहुतांपरी ।
दयाळु मयाळु माता । स्वभावें जाणती कळा ॥ २७ ॥
जीवीचा पुरला हेतु । कामना मनकामना ।
धुंमंड जाहलें मोठें । धबौड साधलें बळें ॥ २८ ॥
रामवरदायिनी माता । दासें धुंडून काढिली ।
वोळखी पाडितां ठाईं । भिन्नभेद असेचिना ॥ २९ ॥
उदो उदो तुझा उदो । जाहला सचराचरीं ।
गोंधळु घातला देवीं । ब्रह्मविष्णुमहेश्वरीं ॥ ३० ॥
सख्य हें जाहलें मोठें । आवडी सांगतां नये ।
असो हे जीविचे जीवीं । सुखानंद चहूंकडे ॥ ३१ ॥
वोळतां भवानी माता । महींद्र दास्य इच्छिती ।

१ आणि शिवाय. २ लोकशाहीचें हें मुख्य सूत्र. ३ थांबवावें, त्यांचें चालूं देऊं नये. ४ कल्लोळ. ५ महल्लाभ. ६ या आदिशक्तीचें शुद्ध स्वरूप पुढें अध्यात्म प्रकरणांत विशद होईल. ७ पृथ्वीचे राजे.

बोलणें हें प्रचीतीचें । अन्यथा वाउगें नव्हे ॥ ३२ ॥
मुलांची लाज मातेला । सिकवी सरसें करी ।
उत्तीर्ण व्हावया नाहीं । तोचि ते सचराचरीं ॥ ३३ ॥
बोलणें चालणें तीचें । देखणें चाखणें सदा ।
अखंड खेळते अंगीं । प्राणिमात्राचिये पहा ॥ ३४ ॥

( ३ )

देखिली तुळजा माता । निवालों अंतरीं सुखें ।
तुटली सर्वही चिंता । थोर आधार वाटला ॥ ३५ ॥
आघात संकटें वारी । निवारी दुष्टदुर्जना ।
संकटीं भर्वसा मोठा । तात्काळ काम होतसे ॥ ३६ ॥
सर्वही बाळकें जीचीं । त्रैलोक्यजननी पहा ।
साक्षिणी[2] सर्वलोभाळू । मर्यादा कोण रे करी ॥ ३७ ॥
सर्वाचि मूळ हे माया । मूळमाया म्हणोनियां ।
सृष्टीची आदिशक्ति हे । आदिशक्ति म्हणोनियां ॥ ३८ ॥
रामउपासना[3] आहे । हे रामवरदायिनी ।
सख्य तें चालतें सर्वें । प्रवृत्तीनिवृत्तीकडे ॥ ३९ ॥

( ४ )

बाळका वाढवी माता । जेथें तेथें परोपरी ।
स्वभावें जीविचें जाणें । अंतरीं विवरे सदा ॥ ४० ॥

---

१ अनुभवाचें; शिवरायासारखे महींद्र समर्थाचे शिष्य झालेच कीं नाहीं. हा सारा भवानीमाता बोळल्याचा (प्रसन्न झाल्याचा) प्रताप आहे. शिवरायावर भवानी प्रसन्न झाल्यावर पातशहा राजे त्यांच्या अंकित झाले. उभयत्र भवानीप्रसाद आहे. समर्थ व शिवराय दोघांची कुळस्वामिणी भवानीच होती. २ सर्व पाहणारी व म्हणून सर्वांवर लोभ करणारी. ३ रामाला वर देणारी ही देवीच रामाची उपास्य आहे. हिची ओळख झाली की प्रवृत्ती निवृत्ति दोहींकडे प्राणीमात्रांसि सख्य होतें.

मातेचा कळवळा मोठा । लोभासी तुळना नसे ।
हेंकाड बावळें वेडें । मातेला प्रिय होतसे ॥ ४१ ॥
विश्वाची साक्षिणी माता । विश्वमाता म्हणोनियां ।
श्रीमंत करंट तीनें । रक्षिले पाळिले किती ॥ ४२ ॥
त्रिलोकीं पुरली आहे । त्रैलोक्यजननी पहा ।
तेचि हे तुळजा माता । भक्तांसी पाळिते सदा ॥ ४३ ॥

( ५ )

प्रपंचीं आमुचे कुळीं । तुळजा कुळदेवता ।
नेणतां[1] ऐकिलें होतें । जाणतां[2] स्मरलें मनीं ॥ ४४ ॥
श्रेष्ठांची कामना होती । पुरविली मनकामना ।
नौस जो नौसिला होता । तो त्यापासूनि चुकला[3] ॥ ४५ ॥
पुत्रचि[4] घेतला त्याचा । जोगी करुनि सोडिला ।
ख्यातीच[5] दाविली मोठी । न्यायनीति चुकेचिना ॥ ४६ ॥
वैराग्य घेतलें पोटीं । सर्व संसार सांडिला ।
तुझिया दर्शना आलों । कृपादृष्टी नवाजिलों[6] ॥ ४७ ॥
तुझा नवाजिला आहे । महंत म्हणती जनीं ।
तुझेंचि सर्वही देणें । सर्वही तुजपासुनि ॥ ४८ ॥
संसारीं मोकळे केले । आनंदीं ठाव दीधला ।
तोडिली सर्वही चिंता । तूं माता सत्य जाहलें ॥ ४९ ॥
पुर्विले[7] काय मी सांगो । इच्छापूर्ण परोपरी ।
मागील आठवेनासें । केलें आश्चर्य वाटलें ॥ ५० ॥

---

१ बाळपणीं. २ ज्ञानदशेंत तिचें स्मरण होऊन तिच्या स्वरूपाची ओळख पटली. ३ श्रेष्ठांचा नवस पुरा झाला. ४ आदिमायेनें पुत्र म्हणून याला (मला) जवळ केलें व त्यावर प्रसाद करून त्याचा जोगी म्ह० योगी केला, स्वतःच्या स्वरूपीं त्याला मिळवून घेतलें. ७ प्रसिद्धी केली. ६ नावाजलों. ७ पाठीमागचें, अथवा पुरविल्या (इच्छा)

सदानंदीं उदो जाला । सुखसंतोष फावला ।
पराधीनता गेली । सत्ता उदंड चालली ॥ ५१ ॥
उदंड ऐकिलें होतें । रामासी वर दीघला ।
मी दास रघुनाथाचा । मजही वरदायिनी ॥ ५२ ॥
तुळजापुर ठाकेना । चालली पश्चिमेकडे ।
पारघांटीं जगन्माता । सद्य येऊनि राहिली ॥ ५३ ॥[1]
थोड्यानें श्लाघ्यतां केली । सुखसंतोष फावलों ।
उत्तीर्ण[3] काय त्यां व्हावें । तुझे कृपेसि रोकडें ॥ ५४ ॥
तुझेंचि तुजला दिल्हें । त्यां हें कोठूनि आणिलें ।
संकटें वारिलीं नाना । रक्षिलें बहुतांपरी ॥ ५५ ॥
येकची मागणें आतां । द्यावें तें मजकारणें ।
तुझाचि[4] वाढवी राजा । शीघ्र आम्हांचि देखतां ॥ ५६ ॥
दुष्ट संहारिले मागें । ऐसें उदंड ऐकतों ।
परंतु रोकडें कांहीं । मूळ[5] सामर्थ्य दाखवी ॥ ५७ ॥
रामदास म्हणे माझें । सर्व आतुर[6] बोलणें ।
क्षमावें तुळजे माते । इच्छा पूर्णचि ते करी ॥ ५८ ॥

( ६ )

अघटित तें तें उदंड केलें । विवंचितां ते समजोन गेलें ।
दयाळ होसी करिसी कुडावा । समजोन गेला सामर्थ्ययावा १

१ तुळजापूर सोडून ती पारघाटवर प्रतापगडीं येऊन राहिली आहे. पारगांव व पारघाट प्रतापगडच्या पायथ्याशींच आहेत. २ लौकिक वाढविला. ३ उतराई ४ हा शिवाजी राजा आमच्या डोळ्यांदेखत वाढीव म्ह० त्याच्या राज्याचा विस्तार कर; त्याचें प्रताप, ऐश्वर्य, सौख्यादि सर्वांचा उत्कर्ष होऊं दे एवढें एकच मागणें तुजपाशीं मागत आहें. समर्थांचें शिवरायावर किती अत्युत्कट प्रेम होतें तें या मागण्यावरूनच स्पष्ट होत आहे. ५ तें सामर्थ्य पुन्हा एकदां दाखीव. ६ आतुरतेचें.

अज्ञान तें बाळक काय जाणे। जननी करी तें कांहींच नेणे।
सन्नीध माता परि ओळखेना। वदवीतसे तें कांहीं कळेना ॥२॥
अनाथनाथे ! जगदेकनाथे !। संसारकोडें उगवीं समर्थे !।
निवेदनें मानस उगवीलें। भूमंडळीं त्वां मज धन्य केलें ॥३॥
जगदंतरीं तूं मदंतरीं तूं। जगत्रयीं तूं, तूं तूंचि मी तूं।
इहलोक तूं तूं परलोक तूं तूं। अगणीत तूं तूं सायुज्यता तूं ॥४॥

## (१६) गयाळ राजा व खबरदार राजा

### (१) गयाळ राजा

लोकांचे गोष्टीनें वर्ते। प्रत्यय[1] पाहिल्याविणें।
आळसे चाळणा नाहीं। स्वता बुद्धी कळेचिना ॥ १ ॥
हित ते आपुली बुद्धी। शोधूनि पाहणें बरें।
पाहिल्यावीण जो कर्ता। त्याचें कार्य बरें नव्हे ॥ २ ॥
सांगती लोक ते कैसे। आपणु ऐकतो कसा।
स्वयें जो परीक्षा नेणे। लोकांचें ऐकिलें करी ॥ ३ ॥
हिशेबीं कोण पाहातो। धामधूम[2] चहूंकडे।
नीति ते राहिली पैतीं[3]। तेथें कैचा विवेचना ॥ ४ ॥
मोठें तें पाप लोकांचें। प्रभु तो जाणता[4] नव्हे।
वर्ततो सिकविल्या बोलें। तो काय म्हैसें[5] मंगळु ॥ ५ ॥
लांच चोरी बहु जाली। घालाघाली परस्परें।
धण्याला नेणवे कांहीं। वेदांदी[6] नगरी पहा ॥ ६ ॥

---

१ स्वत: अनुभव न घेतां कारभाऱ्यांनीं व खुपमस्कऱ्यांनीं सांगितलेल्या गोष्टींवर अंधविश्वास ठेवून चालतो, स्वत: पहात नाहीं, स्वबुद्धीनें परीक्षा करीत नाहीं. २ हिशेबांत सारा गोंधळ. ३ पलीकडे, दूर. ४ प्रभु स्वयंप्रज्ञ नसला कीं प्रजेचें दुर्दैव. ५ टोणप्या, म्हशा. ६ खऱ्या गोष्टी धन्याला कळत नाहींत, बेबंदशाही.

धणी तो राहिला मागें । कारबारीच नासती ।
पाप हें थोर लोकांचें । सांगावें कवणापुढें ॥ ७ ॥
प्रपंच नासतो ऐसा । भाग्य जातें निघोनियां ।
यालागीं सर्व सांभाळी । तोचि साहेब नेटका ॥ ८ ॥

## ( २ ) खबरदार राजा.

खबर्दार[१] बरा राजा । विवेकी सर्वसाक्षपी ।
आज्ञेनें सर्वही चाले । तेणें सौख्य बहू जनां ॥ १ ॥
पोरांला[२] माय जाणेना । तें पोरें वांचती कसीं ? ।
गुराखी राखतो गुरें । धणी दोहास पाळितो ॥ २ ॥
सेवक[३] राखणें राजी । सुखदु:ख जाणोनियां ।
सर्वांची[५] वाहवी चिंता । बुद्धिवंत[४] करावया ॥ ३ ॥
लोक ते शाहणे केले । जन्मापासूनि सोडिले ।
प्रचीती समस्तां लोकां । भक्तिमार्गे[६] प्रतिष्ठिला ॥ ४ ॥

---

१ दक्ष, हुषार, स्वत:च्या बुद्धीनें चालणारा. २ हा श्लोक फारच बहारीचा आहे. आई स्वत:च्या लेंकराला ओळखत नाहीं तर तिच्या पोरांनीं वाचावें कसें ? तसें राजा स्वत:च्या अक्कलहुषारीनें लोकांत मिळूनमिसळून वागणार नाहीं व त्यांचें मनोगत व गरजा समजून घेणार नाहीं तर प्रजेनें कोणाच्या आधारावर जगायचें ? गुराखी गुरांना संभाळतो पण धणी हा गुरें व गुराखी या दोघांवर लक्ष ठेवतो, त्याप्रमाणें राजानें प्रजा व अंमलदार या दोघांवर लक्ष ठेवलें पाहिजे. ३ प्रजाजन व अंमलदार या दोघांस राजानें संतुष्ट ठेवलें पाहिजे. ४ शाहणे करावयास, 'प्रजानां विनयाधानात्' (रघुवंश). ५ जन्ममरणापासून. ६ राजानें प्रजेला विनय ( विद्या, शिक्षण ) शिकवणें यांत भक्तिमार्गानें जाऊन प्रजेनें पारलौकिक हित साधावें या गोष्टीचाही समर्थ समावेश करितात. प्रजेच्या पारलौकिक कल्याणाची जबाबदारी राजावर आहे.

## ( १७ ) श्रीसमर्थांस श्रीशिवाजीमहाराजांचें पत्र ( गद्य )

॥ श्री ॥

श्रीरघुपती.

श्रीमारुती.

श्रीसद्गुरुवर्य श्रीसकलतीर्थरूप[1] श्रीकैवल्यधाम[2]
श्रीमहाराज श्रीस्वामी

स्वामींचे सेवेसी,

चरणरज शिवाजी राजे यांनीं चरणावरी मस्तक ठेऊन विज्ञापना जे मजवर कृपा करुनु सनाथ[3] केले आज्ञा केली कीं तुमचा मुख्य धर्म राज्यसाधन करुनु धर्मस्थापना देवब्राह्मणाचां सेवा प्रजेची पीडा दूर करून पाळण रक्षण करावे हे व्रत संपादून त्यांत परमार्थ करावा तुम्ही जें मनीं धराल तें श्री सिद्धीस पाववील त्याजवरून जो जो उद्योग केला व दुष्ट तुरुक लोकांचा नाश करावा विपुल द्रव्य करुनु राज्यपरंपरा अक्षई चालेल ऐशीं स्थळें दुर्घट[4] करावीं ऐसें जें जें मनीं धरिलें तें तें स्वामींनीं आशीर्वादप्रतापें मनोरथ पूर्ण केलें याउपरि राज्य सर्व संपादिलें तें चरणीं अर्पण करुनु सर्वकाळ सेवा घडावी ऐसा विचार मनीं आणिला तेव्हां आज्ञा जाहली कीं तुम्हांस पूर्वीं धर्म सांगितले तेच करावेस तीच सेवा होय ऐसें आज्ञापिलें यावरून निकटवास घडुनु वारंवार दर्शन घडावें श्रीची स्थापना कोठें तरी होउनु सांप्रदाय शिष्य व भक्ती दिगंत विस्तीर्ण घडावी ऐसी प्रार्थना केली तेही आसमंतात गिरिगव्हरीं[5] वास करुनु चाफळीं श्रीची[6] स्थापना करुनु सांप्रदाय शिष्य दिगंत विस्तीर्णता घडली त्यास चाफळीं श्रीची पूजा मोहोछाव[7] ब्राह्मणभोजन अतिथि इमारत सर्व यथासांग घडावें जेथें जेथें श्रीची मूर्तिस्थापना

---

१ सर्व तीर्थे ज्यांच्या चरणाजवळ आहेत असे. २ मोक्षाचें आगर. ३ अनुग्रह केला. ४ अजिंक्य. ५ सभोंवतालच्या गिरिगव्हरांत. ६ श्रीराममूर्तीची. ७ महोत्सव ( मुख्य उत्सव नऊ दिवसांचा, श्रीरामनवमीचा. )

जाहाली तेथें उछावें पूजा घडावी यास राज्य संपादिले यांतील ग्राम-भूमी कोठें काय नेमावी ते आज्ञा व्हावी तेंव्हां आज्ञा जाहली कीं विशेष उपाधीचें कारण काय तथापि तुमचे मनीं श्रीची सेवा घडावी हा निश्चय जाहला त्यास यथा अवकाश जेथें जें नेमावेसें वाटेल तें नेमावें व पुढें जसा सांप्रदायाचा व राज्याचा व वंशाचा विस्तार होईल तैसें करीत जावें याप्रकारें आज्ञा जाहली यावरुन देशांतरीं सांप्रदाय व श्रीच्या स्थापना जाहल्या त्यास ग्रामभूमीचीं पत्रें करून पाठविली श्रीसंनिध चाफळीं एकशेंएकवीस गांव सर्वमान्य व एकशें एकवीस गांवीं अकरा बिघेप्रमाणें भूमि व अकरा स्थळीं श्रीची स्थापना जाहाली तेथें नैवेद्यपूजेस भूमि अकरा बिघेप्रमाणें नेमिले आहेती ऐसा संकल्प केला आहे तो सिद्धीस नेण्याविषयीं विनंती केली तेंव्हां संकल्प केला तो परंपरेनें सेवटास न्याहावा ऐसी आज्ञा जाहली त्याजवरून सांप्रत गांऊ व भूमि नेमिले तपशील

[ येथें तेहतीस गांवें, ४१९ बिघे जमीन, एक कुरण व १२१ खंडी धान्य यांचा सविस्तर तपशील आहे. ]

येकूण दरोबस्त सर्वमान्य गांऊ तेहेतीस व जमीन बिघे गाऊगना चारशें येकोणीस व कुरण येक व गल्ला खंडी एकशेंएकवीस श्री चे पूजा उछाहाबद्दल संकल्पांतील सांप्रत नेमिले व उछाहाचे दिवसास व इमारतीस नक्त ऐवज व धान्य समयाचे समयास प्रविष्ट करीन येणें करोन अक्षई उछाहादि चालविण्याविषीं आज्ञा असावी राज्याभिषेक ५ कालयुक्ताक्षी नाम संत्वसरे आश्विन शुद्ध १० दशमी बहुत काय लिहिणें हे विज्ञापना.

---

१ उत्सव. २ म्ह. श्रीमारुतीची. ३. गांव. ४ शिवाजीमहाराजांना राज्याभिषेक शके १५९६ ज्येष्ठ शुद्ध १३ रोज शनिवारीं रायगडावर झाला व त्यानंतर पांच वर्षांनीं शके १६०० आश्विन शुद्ध १० रोज रविवार या दिवशीं वरील पत्र लिहिलें आहे. ह्या पत्रांची इंग्रजी तारीख १५ आक्टोबर इ. स. १६७८ ही होय (खरे यांची जंत्री पहा).

## ( १८ ) आनंदवनभुवन

जन्मदु:खें जरादु:खें । नित्य दु:खें पुन:पुन्हा ।
संसार त्यागणें जाणें । आनंदवनभुवना[1] ॥
वेधलें चित्त जाणावें । रामवेधीं निरंतरीं ।
रागें हो वीतरागें[2] हो । आनंदवनभुवना ॥ २ ॥
संसार वोढितां दु:खें । ज्याचें त्यासीच ठाउकें ।
परंतु येकदां जायें[3] । आनंदवनभुवना ॥ ३ ॥
कष्टलों कष्टलों देवा । पुरे संसार जाहला ।
देहत्यागासि[4] येणें हो । आनंदवनभुवना ॥ ४ ॥
जन्म ते सोसिले मोठे । अपाय बहुतापरी ।
उपाय घडिलें देवें । आनंदवनभुवना ॥ ५ ॥
स्वप्नीं जें देखिलें रात्रीं । तें तें तैसेंचि होतसे ।
हिंडता हिंडता गेलों । आनंदवनभुवना ॥ ६ ॥
ते साक्ष देखिली दृष्टी । किती कल्लोळ ऊठिले ।
विघ्नघ्नी[5] प्रार्थिलें, गेलों । आनंदवनभुवना ॥ ७ ॥
स्वधर्माआड[6] जें विघ्नें । ते ते सर्वत्र ऊठिलीं ।
लाटिलीं कुटिलीं देवें । दापिलीं कापिलीं बहु ॥ ८ ॥

---

१ जे लोक अजून महाराष्ट्रराज्यांत सामील झाले नव्हते त्यांना महाराष्ट्राच्या भाग्याची महती सांगून समर्थ सांगतात कीं 'संसारांतल्या अडचणी बाजूला ठेवून एकवार तरी महाराष्ट्रांत (आनंदभुवनांत, शिवराज्याच्या अंमलाखालीं आलेल्या स्वराज्यांत) जाऊन पहा तर खरें !' बाहेरच्या लोकांना स्वराज्याकडे ओढायला समर्थांनीं ही प्रोत्साहक वाणी खर्च केली आहे. २ प्रेमानें जा, उदासपणानें जा, पण जा. ३ मेल्यावर महाराष्ट्रांत जन्म घ्या. ४ पंचवटीचा पूर्ववयांतला हा प्रसंग असावा. ५ विघ्नहर्त्या देवास. ६. स्वधर्माविरुद्ध उठलेलीं विघ्नें देवानें निवारिलीं.

विघ्नांच्या उठिल्या फौजा । भीम[1] त्यावरि लोटला ।
घडिलीं चिर्डिलीं रागें । रडविलीं बडविलीं बळें ॥ ९ ॥

हाकिलीं टाकिलीं तेणें । आनंदवनभुवनीं
हांक बोंब बहु झाली । पुढें खत्तळें[2] मांडिलें ॥ १० ॥

खौळले[3] लोक देवाचे । मुख्य देवाचि ऊठिला ।
कळेना काय रे होतें । आनंदवनभुवनीं ॥ ११ ॥

स्वर्गींची लोटली गंगा । रामगंगा महानदी ।
तीर्थांसि तुळणा नाहीं । आनंदवनभुवनीं ॥ १२ ॥

त्रैलोक्य चालिल्या फौजा । सौख्य बंद-विमोचनें ।
मोहीम मांडिली मोठी । आनंदवनभुवनीं ॥ १३ ॥

देवदेव बहु देव । नानादेव परोपरी ॥
दाटणी जाहली मोठी । आनंदवनभुवनीं ॥ १४ ॥

रासभें[4] राखिलीं मागें । तेणें रागेंचि चालिला ।
सर्वत्र पाठिसी फौजा । आनंदवनभुवनीं ॥ १५ ॥

अनेक वाजती वाद्यें । ध्वनि कल्लोळ ऊठिला ।
छबिने चालती ढाला । आनंदवनभुवनीं ॥ १६ ॥

विजई[5] दीस जो आहे । ते दिसीं सर्व ऊठती ।
अनर्थ मांडिला मोठा । आनंदवनभुवनीं ॥ १७ ॥

कल्पांत मांडला मोठा । म्लेंच्छ दैत्य बुडावया ।
कैपक्ष[6] घेतला देवीं । आनंदवनभुवनीं ॥ १८ ॥

---

१ मारुतिराय. २ कत्तल, कापाकापी, युद्धप्रसंग. ३ देवाचे लोक, सत्पक्षाचे लोक. ४ गणेशाला रावणाच्या बंदिखान्यांत हें काम करावें लागलें होतें. ५ विजयादशमी, दसरा. शिवरायाच्या फौजा दसऱ्याच्या सुमुहूर्तावरच खऱ्या खऱ्या दिग्विजयासाठीं सीमोल्लंघन करीत असें यावरून ठरतें. ६ कैवार.

बुडाले सर्वही पापी । हिंदुस्तान बळावलें ।
अभक्तांचा क्षयो जाला । आनंदवनभुवनीं ॥ १९ ॥
भीमाचि धाडिला देवें । वैभवें धांव घेतली ।
लांगूळें चालिलें पुढें । आनंदवनभुवनीं ॥ २० ॥
येथून वाढिला धर्म । रमाधर्म समागमें ।
संतोष मांडला मोठा । आनंदवनभुवनीं ॥ २१ ॥
बुडाला औरंग्या पापी । म्लेंच्छसंहार जाहला ।
मोडिलीं मांडिलीं क्षेत्रें । आनंदवनभुवनीं ॥ २२ ॥
बुडाले भेदेवाही ते । नष्ट चांडाळ पातकी ।
ताडिले पाडिले देवें । आनंदवनभुवनीं ॥ २३ ॥
गळालें पळाले मेले । जाले देशधडी पुढें ।
निर्मळ जाहली पृथ्वी । आनंदवनभुवनीं ॥ २४ ॥
उदंड जाहलें पाणी । स्नानसंध्या करावया ।
जपतप अनुष्ठानें । आनंदवनभुवनीं ॥ २५ ॥
नानातपें पुरश्चरणें । नानाधर्म परोपरी ।
गाजली भक्ति हे मोठी । आनंदवनभुवनीं ॥ २६ ॥
लिहिला प्रत्ययो आला । मोठा आनंद जाहला ।
चढता वाढता प्रेमा । आनंदवनभुवनीं ॥ २७ ॥
बंडपाखंड उडालें । शुद्ध अध्यात्म वाढलें ।
चढतावाढता प्रेमा । आनंदवनभुवनीं ॥ २८ ॥

---

१ हिंदुस्तान बळावलें म्हणजे हिंदुधर्म, हिंदुराज्य, हिंदुविद्या इ. हिंदूंची सर्व संस्कृति विजयी होऊन 'हिंदुस्थान' हें नांव सार्थ झालें. २ मराठ्यांच्या राज्याचा विस्तार होत चालला. ३ धर्म आणि रमाधर्म म्ह० स्वधर्म आणि स्वराज्य. निःश्रेयस् व अभ्युदय, पंचीकरण आणि सुवर्ण, पारमार्थिक व ऐहिक वैभव. ४ मोडलेलीं क्षेत्रें पुन्हा मांडिलीं. ५ फितवेखोर, चंद्रराव मोऱ्यासारखे फितुर.

रामवरदायिनी माता । गर्द घेऊनि ऊठली ।
मर्दिले पूर्विंचे पापी । आनंदवनभुवनीं ॥ २९ ॥
प्रत्यक्ष चालिली राया[1] । मूळमाया समागमें ।
नष्ट चांडाळ ते खाया । आनंदवनभुवनीं ॥ ३० ॥
भक्तांसी रक्षिलें मागें । आतांहि रक्षिते पहा ।
भक्तांसी दिधलें सर्वै । आनंदवनभुवनीं ॥ ३१ ॥
आरोग्य जाहली काया । वैभवें सांडिली सीमा ।
सारसर्वस्व देवाचें । आनंदवनभुवनीं ॥ ३२ ॥
देवभक्त[2] येक जाले । मिळाले जीव सर्वही ।
संतोष पावले तेथें । आनंदवनभुवनीं ॥ ३३ ॥
वेदशास्त्रें धर्मचर्चा । पुराणें महात्में किती ।
कवित्वें नूतनें जीर्णें । आनंदवनभुवनीं ॥ ३४ ॥
गीतसंगीत-सामर्थ्यें । वाद्य-कल्लोळ ऊठिला ।
मिळाले सर्व अर्थार्थी[3] । आनंदवनभुवनीं ॥ ३५ ॥
सामर्थ्यें यशकीर्तीचीं । प्रतापें सांडिली सीमा ।
राम कर्ता रामभोक्ता । रामराज्य भूमंडळीं ॥ ३६ ॥
सर्व सद्या कळा विद्या । न भूतो न भविष्यति ।
वैराग्य जाहलें मोठें । आनंदवनभुवनीं ॥ ३७ ॥

## ( १९ ) संभाजीस उपदेश.

(शिवराज निजधामास गेल्यावर संभाजीनें जीं अनन्वित कृत्यें आरंभिलीं तीं ऐकून समर्थांनी पुढील पत्र संभाजीस पाठविलें. त्यांत संभाजीची निंदा न करितां शिवरायाचा उत्कृष्ट कित्ता गिरविण्यास व 'त्याहून विशेष कर-

१ मूळमाया म्ह. भवानीदेवी राया (शिवराया) समागमें प्रत्यक्ष वागूं लागली. २ देव, भक्त (संत) व जीव (संसारी लोक) सर्व एक झाले. ३ महाराष्ट्रांत नशीब काढण्यासाठीं किंवा द्रव्यार्जनासाठीं परप्रांतांतून लोक येऊं लागले.

ण्यास ' त्यांनीं संभाजीस सांगितलें आहे. पत्र अत्यंत मुत्सद्दीपणाचें पण सरळ असून संभाजीच्या मिषानें समर्थांनीं महाराष्ट्रीयांस निरंतर प्रोत्साहन मिळावें असाच सुंदर बोध त्यांत केला आहे. )

अखंड सावधान असावें । दुश्चित कदापि नसावें ।
तजविजा करीत बसावें । एकांत स्थळीं ॥ १ ॥
कांहीं उग्र स्थिति सांडावी । कांहीं सौम्यता धरावी ।
चिंता लागावी परावी[1] । अंतर्यामीं ॥ २ ॥
मागील अपराध क्षमावे । कारबारी हातीं धरावे ।
सुखी करून सोडावे । कामाकडे ॥ ३ ॥
पाणवठीं[2] तुंब निघेना । तरी मग पाणी चालेना ।
तैसें सज्जनांच्या मना । कळलें पाहिजे ॥ ४ ॥
जनांचा प्रवाह चालिला । म्हणजे कार्यभाग आटोपला[3] ।
जन ठायीं ठायीं तुंबला । म्हणजे खोटें ॥ ५ ॥
श्रेष्ठीं जें जें मेळविलें । त्यासाठीं भांडत बैसले ।
मग जाणावें फावलें । गलिमांसी ॥ ६ ॥
ऐसें सहसा करूं नये । दोघे[4] भांडतां तिसऱ्यास जय ।
धीर धरोन महत्कार्य । समजोन करावें ॥ ७ ॥
राजी राखतां जग । मग कार्यभागाची लगबग ।
ऐसें जाणोनिया सांग । समाधान राखावें ॥ ८ ॥
सकळ लोक एक करावे । गलीमे[5] निवटून काढावे ।
ऐसें करितां कीर्ति धावे । दिगंतरीं ॥ ९ ॥
आधीं गाजवावे तडाखे । मग भूमंडळ धाके ।

१ दुसऱ्याची. २ तुंबलेल्या पाण्याचा पाट फोडला नाहीं तर प्रवाह चालू रहात नाही. म्हणून सर्व लोकांना राजी राखून त्यांना आपापल्या कार्याचे मार्ग खुले करावेत. ३ कार्यभाग सफल झाला. ४ दोघांचें भांडण, तिसऱ्याचा लाभ. ५ स्वधर्मद्रोही.

ऐसें न होतां धके । राज्यास होती ।। १० ।।
समय प्रसंग वोळखावा । राग निपटून काढावा ।
आला तरी कळों नेदावा । जनांमध्यें ।। ११ ।।
राज्यामध्यें सकळ लोक । सलगी देऊनि करावे सेवक ।
लोकांचे मनामध्यें धाक । उपजोंच नये ।। १२ ।।
बहुत लोक मिळवावे । एकविचारें भरावे ।
कष्ट करोन घसरावें । म्लेंच्छांवरी ।। १३ ।।
आहे तितुकें जतन करावें । पुढें आणिक मिळवावें ।
महाराष्ट्रराज्य करावें । जिकडेतिकडे ।। १४ ।।
लोकीं हिंमत धरावी । शर्तीची तलवार करावी ।
चढती वाढती पदवी । पावाल येणें ।। १५ ।।
शिवराजास आठवावें । जीवित्व तृणवत् मानावें ।
इहपरलोकीं रहावें । कीर्तिरूपें ।। १६ ।।
शिवराजाचें आठवावें रूप । शिवराजाचा आठवावा प्रताप
शिवराजाचा आठवावा साक्षेप । भूमंडळीं ।। १७ ।।
शिवराजाचें कैसें बोलणें । शिवराजाचें कैसें चालणें ।
शिवराजाची सलगी देणें । कैसें असे ।। १८ ।।
सकळ सुखांचा त्याग । करूनि साधिजे तो योग ।
राज्यसाधनाची लगबग । कैसी असे ।। १९ ।।
त्याहून करावें विशेष । तरीच म्हणावें पुरुष ।
याउपरी आतां विशेष । काय लिहावें ? ।। २० ।।

# २ राजकारण–लोकसंग्रही कार्यकर्ते

## ( १ ) समर्थसंप्रदायाचीं लक्षणें व नियम.

( १ )

प्रथम लिहिणें, दुसरें वाचणें । तिसरें सांगणें अर्थांतर ॥ १ ॥
आशंकानिवृत्ति ऐसी चौथी स्थिति । पांचवी प्रचीती अनुभवें ॥ २ ।
साहवें तें गाणें, सातवें नाचणें । ताळी वाजवणें आठवें तें ॥ ३ ॥
नववा अर्थभेद, दहावा प्रबंध । अकरावा प्रबोध प्रचीतीसी ॥ ४ ॥
बारावें वैराग्य, तेरावा विवेक । चौदावा तो लोक राजी राखे ॥ ५ ॥
पंध्रावें लक्षण तें राजकारण । सोळावें तें जाण अव्यग्रता ॥ ६ ॥
प्रसंग जाणावा हा गुण सत्रावा । काळ समजावा सर्वांठाईं ॥ ७ ॥
अठरावें लक्षण वृत्ति उदासीन । लोलंगता जाण तेथें नाहीं ॥ ८ ॥
एकोणिसावें चिन्ह सर्वांसी समान । राखे समाधान ज्याचेंत्याचें ॥९॥
विसावें लक्षण रामउपासना । वेध लावी जना भक्तिरंगें ॥ १० ॥
जन्मासी येउनी अध्यात्म साधावें । नित्य विवरावें सारासारा ॥ ११ ॥
संसार आसार येणें साधे सार । पाविजेतो पार भवसिंधु ॥ १२ ॥
येकलेंचि यावें येकलेंचि जावें । मध्येंचि स्वभावें मायाजाळ ॥१३॥
मायाजाळ तुटे तरी देव भेटे । दास म्हणे खोटे भक्तीहीण ॥ १४ ॥

( स्फुट ओव्या, प्र. १४ )

---

१ ह्या सर्व लक्षणांचा विचार ‘ सारांशांत ’ सांगितला आहे. २ सृष्टि ही स्वभावेंचि झाली, सृष्टि मिथ्या अर्थात् तिचें कर्तृत्वही कोणाकडे नाहीं. ‘ कर्ता ठाईंचा अरूप । केलें तेंही मिथ्यारूप- ’ असा समर्थांचा सिद्धांत आहे. निर्गुणाकडे कर्तृत्व नाहीं, सगुण ( मूळमाया ) सृष्टींत आली, यास्तव ‘ लटिक्याचा कर्ता कोण ? ’ हें पुसणेंचि अप्रमाण । म्हणोनी हेंचि प्रमाण । जें स्वभावेंचि जालें ’ ( दास. १३-८-३१ )

( २ )

लिहितां जोडितां येना । व्यासंग करितां न ये ।
आचार राखणें आधीं । स्नानसंध्या पवित्रता ॥ १ ॥
अचूक शुद्ध ल्याहावें । वाचावें नीटनेटकें ।
साकल्य अर्थ सांगावा । यथातथ्य प्रचीतिनें ॥ २ ॥
बोलावें न्यायनीतीनें । मर्यादा राखणें जनीं ।
अभ्यास करावा आधीं । ताळबंद पाठांतरें ॥ ३ ॥
प्रसंगमान जाणावें । बाणावें बहुतांपरी ।
भक्तिभाव असों द्यावा । घालावा भार ईश्वरीं ॥ ४ ॥
प्रत्यहीं मागणें भिक्षा । मिळाली न मिळे तरी ।
नित्यनूतन हिंडावें । धुंडावें भक्त प्रेमळ ॥ ५ ॥
कथा ते करावी आधीं । [१]बाधी ते दुराशा नको ।
[२]उपाधी आतळावेना । जावें ना [३]वैभवाकडे ॥ ६ ॥
सर्वत्र लोक शोधावे । बोधावे भक्तिच्या गुणें ।
राहावे [४]दुर्बळाचेथें । देवाल्यीं कां नदीतिरीं ॥ ७ ॥
पर्वतीं उदकापासीं । सन्निधचि येकीकडे ।
फार येकांत सेवावा । अभ्यास नित्यनूतनु ॥ ८ ॥
सा[५]हावीं शीतउष्णादि । पाहावीं रम्यशीं स्थळें ।
करावे आपण कष्ट । बांधावे ते [६]हळुहळु ॥ ९ ॥
उद्धट बोलणें खोटें । बोलावीं मृदु उत्तरें ।
वादवेवाद तो खोटा । दा[७]टावा मदमत्सर ॥ १० ॥
वोळखी कराव्या दाटा[८] । येके ठायीं स्थिरों नये ।

---

१ बाधणारी दुराशा नसावी, निरिच्छपणानें कार्य करावें. २ उपाधीला शिवूंच नये. ३ श्रीमंताच्या घरीं उतरायला जाऊं नये. ४ गरीबाच्या घरीं किंवा देवालयांत अगर नदीतीरीं मुक्काम करावा. ५ नाजुकपणा नको. ६ रम्य स्थळें. ७ उठवूं नये, रोधावा. ८ दाट ओळख, स्नेह.

भक्तीस लोक लावावे । पावावे परपार ते ॥ ११ ॥
अत्यंत साक्षपी व्हावें । न व्हावें आळसी कदा ।
पुण्यमार्ग प्रतिष्ठावा। लावावी धर्मवासना ॥१२॥ (स्फु. प्र.३)

(३)

अनैन्य राहे समुदाव । इतैर जनांस उपजे भाव ।
ऐसा आहे अभिप्राव । उपायाचा ॥ १ ॥
मुख्य हरिकथानिरूपण । दुसरें तें राजकारण ।
तिसरें तें सावधपण । सर्व विषैयीं ॥ २ ॥
चौथा अत्यंत साक्षेप । फेडावे नाना आक्षेपें ।
अन्याय थोर अथवा अल्प । क्षमा करीत जावे ॥ ३ ॥
संकेतें लोक वेधावा । येकूनयेक बोधावा ।
प्रपंचही सावरावा । यथानुशक्त्या ॥ ४ ॥ (द.११, स.५)

(४)

प्रपंचीं जाणे राजकारण । परमार्थीं साकल्यविवरण ।
सर्वांमध्यें उत्तम गुण । त्याचा भोक्ता ॥ (द.१९, स.४ )

(५)

ज्ञान आणि उपासना । दोनी येकाचि पाहाना ।
उपासनेकरितां जनां । जगदुद्धार ॥ (द. १३, स. २ )

---

१ न फुटणारा, दृढ. २ आपले संप्रदायी चिकटून राहतील व बाहेरच्या लोकांत सद्भाव उपजेल म्ह. येऊन मिळण्याची त्यांना इच्छा होईल असें वागणें हा लोककल्याणाचा उपाय आहे. ३ परमार्थ, राजकारण व प्रपंच सर्वत्र सावध, दक्ष असावें. ४ उद्योग. ५ शंकासमाधान करावें. आक्षेप-शंका. ६ संकेतानें, अल्प चिन्हानें. ७ निगुणाच्या ज्ञानाचा अधिकार सर्वांस नसतो, उपासना किंवा सगुणभक्ति हा जनांच्या उद्धाराचा धोपट मार्ग आहे.

## ( २ ) महंती म्हणजे सुळावरील पोळी.

महंती सुखाची नाहीं । येथें दुःखें उदंडही ।
उदंड दुःख लोकांचें । ऐकतां ऊर फोटतो ॥ १ ॥
लोक हे विकारीं[2] नाना । फार अन्याय वर्तती ।
पहावें तें किती डोळां । ऐकावें श्रवणें किती ॥ २ ॥
वळितां[3] दुःख मानिती । अन्यायें घात नेणती ।
सांगतां हित वाटेना । ऐकतां त्रास मानिती ॥ ३ ॥
झंझणिती चंचणिती । फंफणिती हटें हेटें ।
हटें ते उद्धटे होती । आपशुद्धी[6] असेचिना ॥ ४ ॥
उद्धटें[7] वर्तती क्रिया । उद्धटें शब्द बोलती ।
उद्धटें नास्ति मर्यादा । उद्धटें प्रीति नासती ॥ ५ ॥
अखंड सर्व सोसावें । भलेपणाचि कारणें ।
परंतु सुख तों नाहीं । कांहीं कांहीं काचितही ॥ ६ ॥
सीणें[9] उदंड होताहे । नेणत्या संगतीगुणें ।
जाणता संग भेटेना । दुष्काळ पडिला गमे ॥ ७ ॥
सज्जनें काय करावें । लोक मोठा अनावरु ।
कीं त्यासी काय सांगावें । मनांतुनी कळेचिना ॥ ८ ॥
सज्जनीं फारसी निष्ठा । देव त्यासीच वोळतो ।
अन्याय वर्ततो तो तो । भ्रष्ट होतो अनावरु ॥ ९ ॥

---

१ महंताला स्वतःचीं नसलीं तरी लोकांचीं दुःखें ऐकावीं लागतात; प्रेमानें तीं ऐकलीं तर दुसऱ्यांचा तेवढाच दुःखभार हलका होतो. २ लोक विकारीच फार, विचारी कमी. विकारवश होऊन अन्यायानें वागतात व म्हणून दुःखें भोगतात. ३ विकारांपासून वळवावें तर. ४ अन्यायानें आपलाच घात होतो हें पाहात नाहींत. ५ हट्टाहट्टानें. ६ आपली ( स्वतःची ) शुद्धि. ७ उद्धटपणानें. ८ भल्याला सोसावें लागतें. ९ शीण, मनस्ताप.

## ( ३ ) भिक्षा कशी व कशासाठीं मागावी ?

### ( १ )

ब्राह्मणाची मुख्य दीक्षा । मागितली पाहिजे भिक्षा ।
'ॐ भवति' या पक्षीं । रक्षिलें पाहिजे ॥ १ ॥
भिक्षा मागोन जो जेविला । तो निराहारी बोलिला ।
प्रतिग्रहावेगळा जाला । भिक्षा मागतां ॥ २ ॥
दत्त गोरक्ष आदिकरूनी । सिद्ध[3] भिक्षा मागती जनीं ।
निस्पृहता भिक्षेपासुनी । प्रगट होय ॥ ३ ॥
वार लाऊन बैसला । तरी तो पराधीन जाला ।
तैसीच नित्यें[4]वळीला । स्वतंत्रता कैंचीं ? ॥ ४ ॥
नित्य नूतन हिंडावें । उदंड देशाटण करावें ।
तरीच भिक्षा मागतां बरवें । श्लाघ्यवाणें ॥ ५ ॥
अखंड भिक्षेचा अभ्यास । तयास वाटेना परदेश ।
जिकडे तिकडे स्वदेश । लोकत्रयीं ॥ ६ ॥
भिक्षेनें वोळखी होती । भिक्षेनें भ्रम चुकती ।
सामान्य भिक्षा मान्य करिती । सकळ प्राणी ॥ ७ ॥
कांहीं भिक्षा आहे म्हणावें । अल्पसंतोषी असावें ।
बहुत आणितां घ्यावें । मुष्टि येक ॥ ८ ॥
भिक्षा म्हणिजे निर्भय स्थिती । भिक्षेनें वाढे महंती ।
स्वतंत्रता ईश्वरप्राप्ती । भिक्षागुणें ॥ ९ ॥ (दास.द.१४,स.२)

### ( २ )

उत्तम गुण प्रगटवावे । मग भलत्यासीं बोलतां फावे ।

---

१ 'ॐ भवति भिक्षां देहि' हा मंत्र ब्राह्मणबालांस मुंजीच्या वेळीं पाठ होतो. २ दान घेण्यापासून सुटला, दानापेक्षां भिक्षा श्रेष्ठ. ३ सिद्ध म्ह० तयार केलेलें अन्न. ४ मठांत रोज जाऊन जेवणें.

भले पाहोन करावे । शोधून मित्रें ॥ १० ॥
ठाईंठाईं शोध घ्यावा । मग ग्रामीं प्रवेश करावा ।
प्राणिमात्र बोलवावा । आप्तपणें ॥ ११ ॥
उंचनीच म्हणों नये । सकळांचें निववावें हृदय ।
अस्तमानीं जाऊं नये । कोठें तरी ॥ १२ ॥
जगामध्यें जगमित्र । जिव्हेपासीं असे सूत्र ।
कोठें तरी सत्पात्र । शोधून काढावें ॥ १३ ॥
कथा होती तेथें जावें । दुरी दीनासारिखें बैसावें ।
तेथील सकळ हरद्र घ्यावें । अंतर्यामीं ॥ १४ ॥
तेथें भले आडळती । व्यापक तेही कळों येती ।
हळु हळु मंदगती । रीग करावा ॥ १५ ॥
हेत समजोन उत्तर देणें । दुसऱ्याचे जीवींचें समजणें ।
मुख्य चातुर्याचीं लक्षणें । तीं हीं ऐसीं ॥ १६ ॥
बहुत बोलणें ऐकावें । तेथें मौन्यचि धरावें ।
अल्पचिन्हें समजावें । जगदंतर ॥ १७ ॥
बाष्कळामध्यें बैसों नये । उद्धटासी तंडों नये ।
आपणाकरितां खंडो नये । समाधान जनाचें ॥ १८ ॥
मजालसींत बैसों नये । समाराधनेसी जाऊं नये ।
जातां येळीळवाणें होये । जिणें आपुलें ॥ १९ ॥

---

१ मित्र भले शोधून करावे. २ ठिकठिकाणीं बाहेर शोध घेऊन मग गांवांत प्रवेश करावा. ३ गुणी-अवगुणी, श्रीमंत-गरीब सर्वांस सुखवावें. ४ जगांत लोकप्रिय होण्याचें सूत्र जिव्हेपाशीं आहे. ५ हार्द, हृद्गत, सामान्य परिस्थिति. ६ कार्यकर्ता, पुढारी. ७ गांवजेवणास, मुक्तद्वारीं. ८ तुच्छ.

# ( ४ ) बोलघेवडे आणि कार्यकर्ते

## ( १ ) बालघेवडे

भाग्यासी काय उणें रे । यत्नावांचूनि राहिलें ।
यत्न तो करावा कैसा । हेंचि आधीं कळेचिना ॥ १ ॥
मुख्य यत्न विचारांचा । त्यावरी बोलणें बरें ।
चालणें सत्य नेमाचें । नीतिन्याय चुकों नये ॥ २ ॥
गलबला बुद्धि नासतो । नानानिश्चय सांगती ।
ऐकावें कोणकोणाचें । बोलताहे बहुच कीं ॥ ३ ॥
सांगोंचि जाणती सर्वे । कर्ता कोणी दिसेचिना ।
जाणते नेणते सांगों । स्वभाव लागला जनीं ॥ ४ ॥
शास्त्र हो लोक हो कोण्हीं । नीती हो न्याय हो न हो ।
दाटुनी सांगती वेडे । आदरें हो अनादरें ॥ ५ ॥
करंटे मिळाले सर्वे । जो तो बुद्धीच सांगतो ।
सांगावें तें आपणाला । आपणु करितां बरें ॥ ६ ॥

---

१ तुझा यत्न नाहीं म्हणून भाग्य तुझ्याकडे यायचें खोळंबून राहिलें आहे ! यत्न तेथेंच भाग्य. २ आधीं दीर्घकाल पूर्ण विचार करावा आणि मग बोलायला लागावें. आपलें बोलणें आधी आणि मग विचार असें होतें कीं काय हें ज्याचें त्यानें पहावें. ३ लोकांचा मतमतांतराचा गोंधळ. ५ जाणते नेणते, कार्यकर्ते आणि नाकर्ते, सर्वच दाटून उपदेश करूं लागले आहेत ! आपला अधिकार किती, आपण सांगतों काय, कोणाला, सांगण्यापूर्वी आपण कांहीं तरी कार्य केलें आहे कीं नाहीं इ. गोष्टींचा विचार न करितां सांगत सुटण्याचा लोकांचा स्वभावच बनला आहे ! ‘ अभ्यासें प्रगट व्हावें ’ हें वळण सुटलें आहे. धर्म, शास्त्र, नीति, राजकारण कोणत्याही विषयावर प्रत्येकजण आपला बोलायला तयार ! ४ स्वतःला उपदेश करावा, स्वतः वागावें.

प्रत्ययें बोलतां येना । बळेंचि बंड वाढवी ।
भांडते तंडते वक्ते । श्रोतेही मूळ तामसी ॥ ७ ॥
बोलतां बोलतां तेथें । थोर कळ्होचि ऊठिला ।
बळेंचि मारिती हाका । मारामारीस ऊठिले ॥ ८ ॥
नेणतां बोलणें खोटें । नेणतां कळहो उठे ।
नेणतां विस्कटे विद्या । नेणतां फस्कटे सभा ॥ ९ ॥
आग्रहो निग्रहो होतो । निग्रहें वाद वाढतो ।
वादखेद उठे लोकीं । लोकही खेदिती तया ॥ १० ॥
जग हें जगदीशाचें । जाणते बहुतांपरी ।
उगेंचि अनुमानेना । पाहिजे जाणती कळा ॥ ११ ॥

## ( २ ) कार्यकर्ते

यत्नाचा लोक भाग्याचा । यत्नेंवीण[२] दरिद्रता ॥
उमजला[३] लोक तो धाला । उमजेना तो हपापला ॥ १ ॥
हिंडतां शाहणें होतें । बोलतां बोल शीकते ।
वाचितां लिहितां येतें । तेणें तें मान्य[४] होतसे ॥ २ ॥
घरींच बैसतां खोटें । ब्राह्मणु हिंडतां बरा ।
आळसी घातघेणा[५] तो । कष्टला म्हणिजे बरा ॥ ३ ॥

१ अनुभवाचें सांगायला जवळ कांहीं नाही व लोककार्य किंवा खोल विचार कांहींहीं केलेला नाहीं, आणि उगाच परमार्थ,परोपकार,लोककल्याण देशकार्य इ. इ. गोष्टींचा डंभ माजवीत आहे ! असा प्रकार असल्यावर श्रोत्यावक्त्यांत भांडणें, पक्षभेद, मारामाऱ्या, फुकाच्या आरडाओरडी, विद्येचा व विचारांचा उपमर्द, सभा उधळणें, दुराग्रह, वादखेद वगैरे प्रकार कसे होतात हें प्रस्तुत प्रकरणांत उत्तम रीतीने सांगितलें आहे. ह्या सर्व उपदेशाचें प्रस्तुतकाळीं आधीं मनन झालें पाहिजे ! २ यत्न नाहीं तर सारा दरिद्रीपणाच असणार. ३ यत्नाचें महत्व ज्याला बरोबर कळलें, तो संतोष पावतो. ४ लिहिणें, वाचणें, परिभ्रमण इ. अभ्यास पुरा झाल्यावर प्रकट व्हावें, म्हणजे शब्दाला मान मिळतो. ५ आत्मघातकी.

प्रसंगें वर्ततां आलें । यथातथ्याचि सूचलें ।
मनुष्य राखिलें राजी । तो प्राणी शाहणा बरा ॥ ४ ॥
समयीं धीर सांडीना । [१]यत्नी यत्न बरा करी ।
हिंडतां [२]पारखी लोकां । कार्यकर्ता जिवीं धरी ॥ ५ ॥
मैत्रिकीही विटों नेदी । सर्वांसी सारिखा दिसे ।
विचार जाणतो मोठा । दक्ष तो जाणता जनीं ॥ ६ ॥
उदंड वोळखी होतां । उदंड भाग्य होतसे ।
उदंड कळहो होतां । उदंड लाथ खातसे ॥ ७ ॥
विचारें गोड बोलावें । बहुतां मान्यसें बरें ।
भांडतां पुरवेना कीं । मैत्रिकी करितां बरें ॥ ८ ॥
[४]करावें तेंचि पावावें । हें आलें आपणाकडे ।
आपलें आपणापाशीं । जनांसीं काय बोल हा ॥ ९ ॥
वेषानें कार्य साधेना । विवेकें कार्य साधतें ।
विवेकी मानिती ज्याला । धन्य तो ब्राह्मणु जनीं ॥ १० ॥
येके स्थळीं [५]स्थिरावेना । नित्यनूतन साजिरा ।
कीर्ति ते दिगंतीं धांवे । नेमस्त[६] राहतां जनीं ॥ ११ ॥

**अभंग**

(१)

कार्यकर्ता तो झांकेना । वेध लावी विश्वजना ॥ १ ॥
कार्यकर्ता कीर्तिवंत । त्यासी जाणती समस्त ॥ २ ॥
दास म्हणे कुटुंबाचा[७] । तोचि पुरुष देवाचा ॥ ३ ॥

(२)

निज सलगीचे जाणेना । पुढें कोणासी मानेना ॥ १ ॥
आळसी निकामी माणुस । पुढें होत कासावीस ॥ २ ॥

---

१ यत्नकर्ता. २ परीक्षा करितो. ३ कार्यकर्त्याला आपलासा करून घेतो. ४ करावें तसें भरावें. ५ सदा परिभ्रमण करितो. ६ विवेकानें. ७ विश्वकुटुंबी.

प्रसंगें वर्ततां आलें । यथातथ्याचि सूचलें ।
मनुष्य राखिलें राजी । तो प्राणी शाहणा बरा ॥ ४ ॥
समयीं धीर सांडीना । यत्नी[१] यत्न बरा करी ।
हिंडतां पारखी[२] लोकां । कार्यकर्ता जिवीं धरी[३] ॥ ५ ॥
मैत्रिकीही विटों नेदी । सर्वांसी सारिखा दिसे ।
विचार जाणतो मोठा । दक्ष तो जाणता जनीं ॥ ६ ॥
उदंड वोळखी होतां । उदंड भाग्य होतसे ।
उदंड कळहो होतां । उदंड लाथ खातसे ॥ ७ ॥
विचारें गोड बोलावे । बहुतां मान्यसें बरें ।
भांडतां पुरवेना कीं । मैत्रिकी करितां बरें ॥ ८ ॥
करावें[४] तेंचि पावावें । हें आलें आपणाकडे ।
आपलें आपणापाशीं । जनांसीं काय बोल हा ॥ ९ ॥
वेषानें कार्य साधेना । विवेकें कार्य साधतें ।
विवेकी मानिती ज्याला । धन्य तो ब्राह्मणु जनीं ॥ १० ॥
येके स्थळीं स्थिरावेना[५] । नित्यनूतन साजिरा ।
कीर्ति ते दिगंतीं धांवे । नेमस्तें[६] राहतां जनीं ॥ ११ ॥

## अभंग

### ( १ )

कार्यकर्ता तो झांकेना । वेध लावी विश्वजना ॥ १ ॥
कार्यकर्ता कीर्तिवंत । त्यासी जाणती समस्त ॥ २ ॥
दास म्हणे कुटुंबाचा[७] । तोचि पुरुष दैवाचा ॥ ३ ॥

### ( २ )

निज सलगीचे जाणेना । पुढें कोणासी मानेना ॥ १ ॥
आळसी निकामी माणुस । पुढें होत कासावीस ॥ २ ॥

---

१ यत्नकर्ता. २ परीक्षा करितो. ३ कार्यकर्त्याला आपलासा करून घेतो. ४ करावें तसें भरावें. ६ सदा परिभ्रमण करितो. ६ विवेकानें. ७ विश्वकुटुंबी.

उगेंच नाचतें मुरडतें । कोण पुसतें तयातें ॥ ३ ॥
आधीं कष्टावें रगडावें । कार्य बहुतांचें करावें ॥ ४ ॥
बहुतां मिळों जाणे । त्यासी मानिती शाहणे ॥ ५ ॥
आहे प्रगट उपाय[1] । दास म्हणे सांगों काय ? ॥ ६ ॥

( ३ )

कष्टें करितां मनीं विटे । तरि तो कळेल शेवटें ॥ १ ॥
शाहणे उदंड कष्टती[2] । वडिले[3] उपकारें दाटती ॥ २ ॥
ज्यास त्यास पाहिजे तो । जनीं वांटयांस न येतो ॥ ३ ॥
मनोगत जाणे सूत्रें । जेथें तेथें जगमित्रें ॥ ४ ॥
न सांगतां काम करी । ज्ञान उदंड वीवरी ॥ ५ ॥
कदा विश्वास तोडीना । कोणा माणूस मोडीना ॥ ६ ॥
जनीं बहुताचि साहती । कीर्तिरूपेंचि राहती ॥ ७ ॥
दास म्हणे नव्हे दुःखी । आपण सुखी लोक सुखी ॥ ८ ॥

## ( ५ ) उत्तम गुणांचा कार्यकर्ता पुरुष.

( १ )

आपण यथेष्ट जेवणें । उरलें तें अन्न वाटणें ।
परंतु वायां दडवणें । हा धर्म नव्हे ॥ १ ॥
तैसें ज्ञानें तृप्त व्हावें । तेंचि ज्ञान जनांस[4] सांगावें ।
तरतेन बुडों नेदावें । बुडतयासी ॥ २ ॥
स्नानसंध्या देवार्चन । एकाग्र करावें जपध्यान ।
हरिकथा-निरूपण । केलें पाहिजे ॥ ३ ॥
शरीर परोपकारीं लावावें । बहुतांच्या कार्यास[6] यावें ।

१ कर्तृत्वाचें शहाणपण शिकण्याचे मार्ग. २ श्रमसाहस, ३ थोर. ४ 'आपण जेऊन जेववी लोकां । संतर्पण करी तुका.' ५ तरणारा असेल त्यानें, पार जाणारानें. ६ उपयोगीं पडावें.

उणें पडों नेदावे । कोणीयेकाचें ॥ ४ ॥
आडलें जाकसलें जाणावें । यथानुशक्ति कामास यावें ।
मृदुवचनें बोलत जावें । कोणीयेकासी ॥ ५ ॥
दुसऱ्याच्या दुःखें दुखवावें । परसंतोषें सुखी व्हावें ।
प्राणिमात्रांस मेळऊनी घ्यावें । बऱ्या शब्दें ॥ ६ ॥
दुसऱ्याचें अंतर जाणावें । तदनुसारचि वर्तावें ।
लोकांस परीक्षीत जावें । नाना प्रकारें ॥ ७ ॥
नेमकाचि बोलावें । तात्काळचि प्रतिवचन द्यावें ।
कदापि रागा न यावें । क्षमारूपें ॥ ८ ॥
आलस्य अवघाच दवडावा । यत्न उदंडचि करावा ।
शब्दमत्सर न करावा । कोणीयेकाचा ॥ ९ ॥
नेमकपणें वर्तों लागला । तो बहुतांस कळों आला ।
सर्व आर्जवी तयाला । काय उणें ? ॥ १० ॥
ऐसा उत्तम गुणी विशेष । तयास म्हणावें पुरुष ।
जयाच्या भजनें जगदीश । तृप्त होय ॥ ११ ॥
उदंड धिक्कारून बोलती । तरी चळों नेदावी शांति ।
दुर्जनांसी मिळोनि जाती । धन्य ते साधु ॥ १२ ॥
उत्तम गुणीं शृंगारला । ज्ञानवैराग्यें शोभला ।
तोचि येक जाणावा भला । भूमंडळीं ॥ १३ ॥
स्वयें आपण कष्टावें । बहुतांचें सोसित जावें ।
झिजोन कीर्तीस उरवावें । नानाप्रकारें ॥ १४ ॥
कीर्ति पाहों जातां सुख नाहीं । सुख पाहतां कीर्ति नाहीं ।

---

१ आडलें गांजलें. ' जें कां रंजलें गांजलें । त्यासी म्हणे जो आपुलें । तोचि साधु ओळखावा । देव तेथेंचि जाणावा ॥ ' ( तुकाराम ). २ माणसासी, सर्वांसी. ३ वश करवें. ४ दुसऱ्याच्या मनोगतासारखें वागावें. ५ मुद्देसूद व थोडक्यांत बोलावें. ६ उत्तर.

विचारेंवीण कोठेंच नाहीं । समाधान ॥ १५ ॥
आपले अथवा पैरावे । कार्य अवघेंच करावें ।
प्रसंगीं कामास चुकवावें । हें विहित नव्हे ॥ १६ ॥
बरें बोलतां सुख वाटतें । हें तों प्रत्यक्ष कळतें ।
आत्मवैत् परावें तें । मानीत जावें ॥ १७ ॥
आपणास चिमोटा घेतला । तेणें कासावीस जाला ।
आपणावरून दुसऱ्याला । राखत जावें ॥ १८ ॥
जे दुसऱ्यास दुःख करी । ते अपवित्र वैखेरी ।
आपणास घात करी । कोणीयेके प्रसंगीं ॥ १९ ॥
पेरिलें तें उगवतें । बोलण्यासारिखें उत्तर येतें ।
तरी मग कर्कश बोलावें तें । काय निमित्त ॥ २० ॥
आपल्या पुरुषार्थवैभवें । बहुतांस सुखी करावें ।
परंतु कष्टी करावें । हे राक्षसी क्रिया ॥ २१ ॥
दंभ दर्प अभिमान । क्रोध आणि कठिण वचन ।
हें अज्ञानाचें लक्षण । भगवद्गीतेंत बोलिलें ॥ २२ ॥
जो उत्तम गुणें शोभला । तोचि पुरुष महाभला ।
कित्येक लोक तयाला । शोधीत फिरती ॥ २३ ॥
क्रियेवीण शब्दज्ञान । तेंचि श्वानाचें वमन ।
भले तेथें अवलोकन । कदापि न करिती ॥ २४ ॥
मनापासून भक्ति करणें । उत्तम गुण अगत्य धरणें ।
तया महापुरुषाकारणें । धुंडीत येती ॥ २५ ॥

---

१ आपलें असो दुसऱ्याचें असो, दिसेल तें काम करीत जावें. २ आपल्यासारखें दुसऱ्याला मानीत जावें. ३ चिमटा. ४ वाणी. ५ कर्तबगारीनें व द्रव्यानें. ६ 'दंभो दर्पोभिमानश्च क्रोधः पारुष्यमेव च । अज्ञानं चाभिजातस्य पार्थ संपदमासुरीम्' ( गीता. अ० १६-४). ७ कुत्र्याचा ओक, अपवित्र.

ऐसा जो महानुभाव । तेणें करावा समुदाव ।
भक्तियोगें देवाधिदेव । आपुला करावा ॥ २६ ॥
आपण अर्धचितें मरोन जावें । मग भजन कोणें करावें ।
याकारणें भजनास लावावे । बहुत लोक ॥ २७ ॥
याकारणें समुदाव । जाला पाहिजे महोत्साव ।
हातोपातीं देवाधिदेव । वोळेसा करावा ॥ २८ ॥
आतां समुदायाकारणें । पाहिजेत दोनीं लक्षणें ।
श्रोतीं येथें सावधपणें । मन घालावें ॥ २९ ॥
जेणें बहुतांस घडे भक्ती । ते हे रोकडी प्रबोधशक्ती ।
बहुतांचें मनोगत हातीं । घेतलें पाहिजे ॥ ३० ॥
बोलण्यासारिखें चालणें । स्वयें करून बोलणें ।
तयाचीं वचनें प्रमाणें । मानिती जनीं ॥ ३१ ॥
म्हणोन सांगाती असावे । मानत मानत शिकवावें ।
हळुहळु शेवटा न्यावें । विवेकानें ॥ ३२ ॥

(द.१२,स.१०)

(२)

परमार्थी आणि विवेकी । त्याचें करणें माने लोकीं ।
कां जे विवरविवरों चुकी । पडोंच नेदी ॥ ३३ ॥

---

१ अकस्मात्, एकाएकीं. २ हां हां म्हणतां देव प्रसन्न करावा. ३ ज्याला समुदाय करायचा आहे, संप्रदाय किंवा संघ उभे करायचे आहेत, त्याच्या अंगीं मुख्य दोन गुण पाहिजेत :--एक, बहुतांचें मन हातीं घेतां येईल व लोक भक्तिमार्गाला लागतील अशी वेधक व रोकडी म्ह० तात्काळ फळ देणारी प्रबोधशक्ति; व दुसरा, बोलण्यासारखें चालणें. तात्पर्य प्रबोधशक्ति व क्रियाशुद्धि हे दोन गुण पुढाऱ्यांत पाहिजेत. ४ सोबती. ५ मानवेल, पचेल असें. ६ परमार्थी व विवेकी पुरुष विचार करून आपल्या कार्यांत चूक पडूं देत नाहीं, अचूक यत्न करितो, म्हणून त्याचें करणें 'लोकीं माने' म्ह० 'लोकमान्य होतें'.

कोणास कांहींच न मागावें । भगवद्भजन वाढवावें ।
विवेकबळें जन लावावे । भजनाकडे ॥ ३४ ॥
ब्राह्मणमंडळ्या मेळवाव्या । भक्तमंडळ्या मानाव्या ।
संतमंडळ्या शोधाव्या । भूमंडळीं ॥ ३५ ॥
उत्कट भव्य तेंचि घ्यावें । मळमळित अवघेंचि टाकावें ।
निस्पृहपणें विख्यात व्हावें । भूमंडळीं ॥ ३६ ॥
अक्षर बरें, वाचणें बरें । अर्थांतर सांगणें बरें ।
गाणें नाचणें अवघेंचि बरें । पाठांतर ॥ ३७ ॥
दीक्षा बरी, मैत्री बरी । तीक्ष्णबुद्धि राजकारणी बरी ।
आपणास[2] राखो नानापरी । अलिप्तपणें ॥ ३८ ॥
दुर्जनासी रोखों[3] जाणे । सज्जनासी निववूं जाणे ।
सकळांचे मनींचें जाणे । ज्याचे त्यापरी ॥ ३९ ॥
संगतीनें मनुष्य पालटे । उत्तम गुण तत्काळ उठे[4] ।
अखंड अभ्यासीं लगटे[5] । समुदाव ॥ ४० ॥
जेथें तेथें नित्य नवा । जनांसी वाटे हा असावा ।
परंतु लालचीचा गोवा[6] । पडोंचि नेदी ॥ ४१ ॥
उत्कट भक्ति, उत्कट ज्ञान । उत्कट चातुर्य, उत्कट भजन ।
उत्कट योग अनुष्ठान । ठाईं ठाईं ॥ ४२ ॥
कांहींएक[7] उत्कटेंविण । कीर्ति कदापि नव्हे जाण ।
उगेंच वणवण हिंडोन । काय होतें ? ॥ ४३ ॥

---

१ त्याची भक्ति निष्काम असते. २ वरील गुणांचा लोककार्यांत उपयोग करून पुन्हा अध्यात्मबळानें आपलें असंगपण राखतो. ३ मिळवून घेतो. ४ उत्तम गुणांचा उठाव होतो, गुण विकास पावतात. ५ लोक साधनाभ्यासाला जडतात. ६ लोभाच्या गुंत्यांत सांपडत नाहीं. ७ सर्व किंवा एक तरी गुण उत्कट पाहिजे.

विवेकांमध्यें[१] सांपडेना । ऐसें तों कांहींच असेना ।
ऐकांतीं[२] विवेक अनुमाना । आणून सोडी ॥ ४४ ॥
अखंड तजविजा[३] चाळणा जेथें । पाहतां काय उणें तेथें ।
एकांतेंवीण प्राणियातें । बुद्धि कैंची ? ॥ ४५ ॥
एकांतीं विवेक करावा । आत्माराम वोळखावा ।
येथून तेथवरी गोवा । कांहींच नाहीं ॥४६॥ (दा.द.१९,स.६)

( ३ )

जेथें अखंड नाना चाळणा । जेथें अखंड नाना धारणा ।
जेथें अखंड राजकारणा । मनासी आणिती ॥ ४७ ॥
चर्चा आशंका[४] प्रत्युत्तरें । कोण खोटें कोण खरें ।
नाना वक्तृत्वें शास्त्राधारें । नाना चर्चा ॥ ४८ ॥
आवडी लागली बहुजना । तेथें कोणाचें कांहीं चालेना ।
दळवट[५] पाडिला अनुमाना । येईल कैसा ? ॥ ४९ ॥
जाणती[६] परी आडळेना । काय करितो तें कळेना ।
नाना देसींचे लोक नाना । येऊन जाती ॥ ५० ॥
तितुक्यांचीं अंतरें धरावीं । विवेकें विचारें भरावीं ।
कडोविकडीचीं विवरावीं । अंतःकरणें[७] ॥ ५१ ॥
फड[८] समजाविसी करणें । गद्यपद्य सांगणें ।
परांतरासी राखणें । सर्वकाळ ॥ ५२ ॥
जितुकें कांहीं आपणासी ठावें । तितुकें हळुहळु सिकवावें ।

---

१ विवेकानें होत नाहीं असें कोणतेंच कार्य नाहीं. २ एकांतीं विवेक केला म्हणजे अचूक अनुमान होतें. ३ उपाययोजना. ४ शंकासमाधान. ५ लोकसमुदाय ज्याच्या मागें लागला त्याचें अंतःस्वरूप यथार्थपणें कोणास कळणार ? ६ लोक त्याला ओळखतात पण त्याचे अंतर्गत विचार त्यांना कळत नाहींत. ७ धरसोडीच्या लोकांच्या आशंका दूर करून निश्चयानें त्यांचीं अंतःकरणें भरतो. ८ लोकसमुदाय किंवा लोकसभा यांची समजूत घालतो.

शाहाणे करून सोडावे । बहुत जन ॥ ५३ ॥
परोपरी सिकवणें । आडणुका सांगत जाणें ।
निवळ करुनी सोडणें । निस्पृहासी ॥ ५४ ॥
आपण करावें करवावें । आपण विवरावें विवरवावें ।
आपण धरावें धरवावें । भजनमार्गासी ॥ ५५ ॥
जुन्या लोकांचा कंटाळा आला । तरी नूतन प्रांत पाहिजे धरिला ।
जितुकें होईल तितुक्याला । आळस करूं नये ॥ ५६ ॥
धकाधकीचा मामला । कैसा घडे अशक्ताला ।
नानाबुद्धी शक्ताला । म्हणोनि सिकवाव्या ॥ ५७ ॥
आधींच तेकवा सोडिला । मध्येंच धिंवसा सांडिला ।
तरी संसार हा सेवटाला । कैसा पावे ?॥५८॥(द.१९,स.१०)

## ( ६ ) अंतरपरीक्षा आणि सोशिकता

ऐका संसारासी आले हो । स्त्रीपुरुष निस्पृह हो ।
सुचिंतपणें पाहो । अर्थांतर ॥ १ ॥
येक सुखी येक दुःखी । प्रत्यक्ष वर्ततें लोकीं ।
कष्टी होऊनिया सेखीं । प्रारब्धावरी घालती ॥ २ ॥
अचूक यत्न करवेना । म्हणोनी केलें तें सजेना ।
आपला अवगुण जाणवेना । कांहीं केल्या ॥ ३ ॥
जो आपला आपण नेणे । तो दुसऱ्याचें काय जाणे ।
न्याय सोडितां दैन्यवाणे । होती लोक ॥ ४ ॥

---

१ अडचणीच्या जागा. २ निःसंदेह. ३ नवीन प्रांत, तरुण पिढी. ४ दांडगाईचीं कामें दांडग्यालाच शिकवावीं. ५ उत्साह, हिंमत. ६ धैर्य. ७ सावधानपणें अर्थाचें मनन करून पहा. ८ बिनचूक, शिस्तवार यत्न करितां येत नाहीं; आणि मग दुःखी होऊन 'माझें कपाळ खोटें, दुर्दैव' म्हणून रडत बसतात ! आपल्या मूर्खपणाचा दोष प्रारब्धावर घालतात. ९ केलेलें काम यशस्वी होत नाहीं.

लोकांचें मनोगत कळेना । लोकांसारिखें वर्तवेना ।
मूर्खपणें लोकीं नाना । कळह उठती ॥ ५ ॥
मग ते कळहोही वाढती । परस्परें कष्टी होती ।
प्रेत्न राहेतां अंतीं । श्रमाचि होय ॥ ६ ॥
ऐसी नव्हे वर्तणूक । परीक्षावे नाना लोक ।
समजलें पाहिजे नेमेक[२] । ज्याचें त्यापरी ॥ ७ ॥
दुसऱ्यास शब्द ठेवणें । आपला कैपक्ष[३] घेणें ।
पाहों जातां लौकिक लक्षणें । बहुतेक ऐसीं ॥ ८ ॥
लोकीं बरें म्हणायाकारणें । भल्यास लागतें सोसणें ।
न सोसितां भंडवाणें । सहजचि होय ॥ ९ ॥
बोलतो खरें चालतो खरें । त्यास मानिती लहानथोरें ।
न्याय अन्याय परस्परें । सहजचि कळे[५] ॥ १० ॥
लोकांस कळेना तंवरी । विवेकें क्षमा न करी ।
तेणें करितां बराबरी । होत जाते ॥ ११ ॥
जंवरी चंदन झिजेना । तंवरी सुगंध कळेना ।
चंदन आणि वृक्ष नाना । सगट[६] होती ॥ १२ ॥
जगदंतर[७] निवळत गेलें । जगदंतरीं सख्य जालें ।
मग जाणावें वोळले । विश्वजन ॥ १३ ॥
जनीं जनार्दन वोळला । तरी काय उणें तयाला ?
राजी राखावें सकळांला । कठिण आहे ॥ १४ ॥
पेरिलें ते उगवतें । उसणें द्यावें घ्यावें लागतें ।
वर्म काढितां भंगतें । परांतर ॥ १५ ॥

१ थंडावतां. २ स्वभावविशेष. ३ आपल्यांचा कैवार घेणें, बाजू उचलणें. ४ फजीतवाडा. ५ खरें खोटें परभारें लोक जाणतात. ६ सारखे. ७ जगाचें, लोकांचें अंतःकरण. ८ संतुष्ट झाला, प्रसन्न झाला.

हें अवघें आपणापासीं । येथें बोल नाहीं जनांसी ।
सिकवावें आपल्या मनासी । क्षणक्षणां ॥ १६ ॥
खळ दुर्जन भेटला । क्षमेचा धीर बुडाला[1] ।
तरी मौनेंचि स्थळत्याग केला । पाहिजे साधकें ॥ १७ ॥
लोक नानापरीक्षा जाणती । परी अंतर[2]परीक्षा नेणती ।
तेणें प्राणी करंटे होती । संदेह नाहीं ॥ १८ ॥
आपणांस आहे मरण । म्हणोनि राखावें बरेंपण ।
कठिण आहे लक्षण । विवेकाचें ॥ १९ ॥
थोर लहान समान । आपले पारिखे सकळ जन ।
चढतें वाढतें सन्निधान[3] । करितां बरें ॥ २० ॥
हरिकथानिरूपण । बरेंपणें राजकारण ।
प्रसंग पाहिल्याविण । सकळ खोटें ॥ २१ ॥
विद्या उदंड सिकला । प्रसंगमान चुकताचि गेला ।
तरी मग तये विद्येला । कोण पुसे[4] ? ॥२२॥ (द.१२,स.२)

## ( ७ ) लोकसंग्रही.

दु:ख जाणे पराव्याचें । ऐसा तो विरळो[5] गुणी ।
ऐकतां ऐकतां ऐके । तेणेंचि आवडी दुणी ॥ १ ॥
दु:ख वाटून[6] तें घ्यावें । काढावें ऐसियापरी ।
देहदु:खें[7] रोगव्याधी । औषधें परतें करी ॥ २ ॥
सद्बुद्धि सांगणें लोकां । जेणें ते सुख पावती ।

१ सहनशीलता ढळली. २ परांतर, दुसऱ्याचें मनोगत जाणणें. ३ सन्निधान, सलगी, स्नेह. ४ समयप्रसंग जाणणें समजलें नाहीं तर ती विद्या फुकट होय. ५ 'परदु:खेनापि दु:खिता विरला:' परावा=दुसरा. ६ परदु:ख सहानुभूतिपूर्वक ऐकून घेणें म्हणजेच तें वाटून घेणें होय. तेणेंकरून दुप्पट (दुणी) प्रीति वाढते. ७ शरीरव्याधिही औषधें देऊन तो दूर करितो.

प्रसंग राखणें आधीं । सोसावें बहुतांपरी ॥ ३ ॥
न्याय अन्याय सोसावा । सोसितांही विटों नये ।
न्यून पैशुन्यें झांकावें । तेणे तें प्रस्तावा पडे ॥ ४ ॥
चुकतें मागुतें येतें । येतें जातें पुनःपुन्हा ।
क्षमून हितकर्ता जो । तोचि गंभीर जाणता ॥ ५ ॥
न्याय अन्याय तो जाणे । अन्याय न करी कदा ।
नीतिन्यायें मिळों जाणें । तोचि तो लोकसंग्रही ॥ ६ ॥
मनोंचि पारखी लोकां । परंतु नबोले कदा ।
जाणते मिळती तेथें । नेणते वास पाहती ॥ ७ ॥
जाणत्यानेणत्या लोकां । प्रसंगें वर्तवी जगीं ।
सामान्य तो नव्हे कांहीं । सर्वांसी पाहिजे सदा ॥ ८ ॥
प्रबोध जाणिजे ऐसा । आधीं प्रपंच शोधणें ।
अरत्न मानतां लोकां । परत्र सहजीं घडे ॥ ९ ॥
अंतरें निववूं जाणे । जाणे जया तयापरी ।
धरावें अंतरें लोकां । बाह्यात्कारें धरेचिना ॥ १० ॥
मनुष्यें राखतां राजी । दैवतें बहुमाणसें ।
सुखाचि पावती जेथें । तेथें ते धांवती सदा ॥ ११ ॥
तोचि तो अंश देवाचा । मिळाला जगदंतरीं ।
नैराश्य तापसी ज्ञानी । सर्वांसी पाहिजे सदा ॥ १२ ॥
कर्म उपासना राखे । राखे वैराग्य आदरें ।
ज्ञान तें प्रत्ययें राखे । नित्यानित्यविचारणा ॥ १३ ॥

---

१ उणेपणाचीं--द्वाडपणाचीं कर्मे. २ पश्चात्तापांत. ३ बोलत नाहीं. ४ नीटनेटका करणें. ५ चित्ताला वेध लावून लोक वश करावेत, लोक बाह्य उपचारांनीं ओढत नाहींत. ६ माणसें जेथें संतोष पावतात, तेथें दैवतेंही प्रसन्न होऊन धांवत येतात. ७ जो जगदंतरीं मिळाला तो देवांशच होय.

प्रबोध लागतां लोकीं । नेमस्त सुटका घडे ।
पावनु तोचि तो येकु । बद्ध लोकांसि सोडवी ॥ १४ ॥
धन्य हा देव देवांचा । राम त्रैलोक्यनायकु ।
रामदास म्हणे त्याचा । अनन्य शरणागतु ॥ १५ ॥

## (८) लोक राजी राखावे.

### (१)

लोक हे राखतां राजी । सर्व राजीच होतसे ।
अंतरें चुकतां तेथें । सर्व भाजीच होतसे ॥ १ ॥
जन हे वोळतु जेथें । अंतरात्माचि वोळला ।
जन हे खौळले जेथें । अंतरात्माचि खौळला ॥ २ ॥
अरे कारे अहो कांहो । बोलती सकळै जनीं ।
समजावें उमजावें । जाणावें मनिंचे मनीं ॥ ३ ॥
बऱ्यानें बरवें होतें । दुःखें दुःखचि वाढतें ।
सर्वही आपणापाशीं । लोकांसी म्हणतां नये ॥ ४ ॥
ऐसें हें वक्तयापाशीं । बोलावीं अमृतोत्तरें ।
प्रत्ययो नीतिन्यायाचा । मर्यादेचा परोपरी ॥ ५ ॥
स्तवावें बहुतां लोकां । मानावें बहुतांपरी ।
विध्युक्त विश्व वंदावें । निंदा हे आत्मघातकी ॥ ६ ॥
विवेकीनें चुकावेना । घडीघडी क्षणक्षणा ।
येकांत सेवितां आधीं । चाळणा करितां बरी ॥ ७ ॥
शिकले शब्द ते थोडे । जिव्हाळा पाहिजे बरा ।

---

१ वरील सर्व गुणांनीं लोकसंग्रह कसा करावा हें रामचरित्रापासून शिकावें. २ फजीतवाडा. ३ वळले, वश झाले. ४ खवळले, रागावले. ५शास्त्र पद्धतीनें, विश्वीं नारायण भरला आहे अशा भावानें. ६ विवेकी पुरुषानें. ७ कळकळ.

जिव्हाळ्याविण तें आहे । जिव्हाळा असतां तगे[1] ॥ ८ ॥
गल्बला होंचि नेदावा । गल्बला बुद्धि भ्रष्टवी ।
मुळींच नेणतें[2] व्हावें । जाणत्यानेणत्यांमधें ॥ ९ ॥
महत्व वेगळें आहे । महत्वें[3] जाणती कळा ।
नेणत्याला मिळों जाणे । पुढें सांगे हळू हळू ॥ १० ॥
फिरणें बहुतां ठायां । संसार हा बहुचेंकू[4] ।
बहुतांसी बोलणें लागे । गांवेगांवीं घरोघरीं ॥ ११ ॥
घरींचीं माणसें राजी । राखावीं तीं परोपरी ।
भंगलें चित्त जाणावें । रक्षावें[5] बहुतांपरी ॥ १२ ॥
अंतरीं प्रीति राखावी । शब्दाशब्दीं परोपरी ।
तुटली प्रीति ने खोटी । राखिली पाहिजे बरी ॥ १३ ॥
वर्तता येत नाहीं रे । वर्तणें न कळे जनीं ।
सकळां राखणें राजी । हे मुख्य भक्ति जाणिजे ॥ १४ ॥

( २ )

अभ्यासें होत आहे रे । अभ्यास करणें सदा ।
उदंड बोलणें लागे । यथातथ्य हळुहळु ॥ १५ ॥
जीवांत जीव घालावा । चालावा भक्तिमार्ग हा ।
दुसऱ्यांस कळेसें करणें । विवरणें जाणती मनीं ॥ १६ ॥
सर्वही पेरणें विद्या । लोकांमध्यें हळुहळु ।
नेणते जाणते करणें । कथानिरूपणें सदा ॥ १७ ॥
निश्चय बिंबवावे ते । प्रत्यय[6] सद्य रोकडे ।
उकलुनी सांगणें सोपें । क्षणक्षणा पुनःपुन्हा ॥ १८ ॥

---

१ तगते, टिकते. २ सुज्ञ, अज्ञ सर्व लोकांत आपल्याकडे नेणतेपण घ्यावें. ३ जाणती कळा हें मोठेपणाचें बीज आहे. जाणतेपणालाच मोल आहे. ४ बोहोचक, फाजील. ५ कोणाचें चित्त भंगलें असेल तर ते परोपरीच्या गोड वागणुकीनें सांधून घ्यावें. ६ रोकडे (तात्काळ) प्रत्यय आणून द्यावे.

जिव्हाळ्यावीण तें आहे । जिव्हाळा असतां तगे[1] ॥ ८ ॥
गल्बला होंचि नेदावा । गल्बला बुद्धि भ्रष्टवी ।
मुळींच नेणतें व्हावें[2] । जाणत्यानेणत्यांमधें ॥ ९ ॥
महत्व वेगळें आहे । महत्वें[3] जाणती कळा ।
नेणत्याला मिळों जाणे । पुढें सांगे हळू हळू ॥ १० ॥
फिरणें बहुतां ठायां । संसार हा बहुचकू[4] ।
बहुतांसी बोलणें लागे । गांवेंगांवीं घरोघरीं ॥ ११ ॥
घरींचीं माणसें राजी । राखावीं तीं परोपरी ।
भंगलें चित्त जाणावें । रक्षावें[5] बहुतांपरी ॥ १२ ॥
अंतरीं प्रीति राखावी । शब्दाशब्दीं परोपरी ।
तुटली प्रीति ते खोटी । राखिली पाहिजे बरी ॥ १३ ॥
वर्ततां येत नाहीं रे । वर्तणें न कळे जनीं ।
सकळां राखणें राजी । हे मुख्य भक्ति जाणिजे ॥ १४ ॥

( २ )

अभ्यासें होत आहे रे । अभ्यास करणें सदा ।
उदंड बोलणें लागे । यथातथ्य हळुहळु ॥ १५ ॥
जीवांत जीव घालावा । चालावा भक्तिमार्ग हा ।
दुसऱ्यांस कळेसें करणें । विवरणें जाणती मनीं ॥ १६ ॥
सर्वही पेरणें विद्या । लोकांमध्यें हळुहळु ।
नेणते जाणते करणें । कथानिरूपणें सदा ॥ १७ ॥
निश्चय बिंबवावे तें । प्रत्यय[6] सद्य रोकडे ।
उकलुनी सांगणें सोपें । क्षणक्षणा पुनःपुन्हा ॥ १८ ॥

---

१ तगते, टिकते. २ सुज्ञ, अज्ञ सर्व लोकांत आपल्याकडे नेणतेपण घ्यावें. ३ जाणती कळा हें मोठेपणाचें बीज आहे. जाणतेपणालाच मोल आहे. ४ बोहोचक, फाजील. ५ कोणाचें चित्त भंगलें असेल तर ते परोपरीच्या गोड वागणुकीनें सांधून घ्यावें. ६ रोकडे (तात्काळ) प्रत्यय आणून द्यावे.

कंटाळा दूरि टाकावा । मनामध्यें त्रासों नये ।
सांगता सांगतां हांसे । हांसे खेळे अहर्निशीं ॥ १९ ॥
झिंजी हे सर्व लोकांची । चुकतां झिडकूं नये ।
मनापासून वोढावें । ज्यासी त्यासी क्षणक्षणा ॥ २० ॥
लोक हे आभारें भारें । विचारें दाटले बहु ।
अखंड सर्वस्वें राजी । नवाजीतो मृदूत्तरें ॥ २१ ॥
मैत्रिकी सर्व लोकांसी । मनापासून जाहली ।
वेध हा लागला मोठा । लोक भाटचि जाहले ॥ २२ ॥
कंठेना येकमेकांला । अंतरें मिळालीं बरीं ।
साक्षपी नेटके जाले । मानले जगदंतरें ॥ २३ ॥
कथानिरूपणें चर्चा । थोरथोरांस मानली ।
कंठेना लोक येताती । कोठकोठून चालले ॥ २४ ॥
सर्वांसी राखणें राजी । सर्वकाळ मृदूत्तरें ।
येकाचि जीव सर्वांचा । कट्टबंध ढळेचिना ॥ २५ ॥
सर्वांसि सुख होताहे । ज्याचें त्याचेपरी सदा ।
सर्वत्र वोढती तेथें । विचित्र न कळे कळा ॥ २६ ॥
सोइऱ्या धाइऱ्या लोकां । सवेचि लागली सदा ।
राजेंकी भोंवते येती । तेही त्यासीच मीळती ॥ २७ ॥
भक्तांचा जिव्हाळा मोठा । खोटा मार्ग असेचिना ।
रामदास म्हणे माझा । राम त्रैलोक्यनायकु ॥ २८ ॥

---

१ हांसत खेळत आनंदानें सांगावें; सांगण्याचा त्रास व कंटाळा मानूं नये. २ गर्दी, दाटी. ३ लोक चुकले तर त्यांना झिडकारूं नये. ४ नांवाजतो, प्रशंसा करितो. ५ स्तुति करणारे. ६ जूट, मेळ. ७ सरकारचे लोक (गुप्त हेर, पोलीस वगैरे) आले तर तेही त्यासच मिळून जातात !

## ( ९ ) मना-मनासि मीळणी.

भला भला विचक्षणु[1] । प्रवीण योग्य तीक्षणु ।
खुणावितां खुणावला । मनें खुणेसि पावला ॥ १ ॥
मनें प्रसंग वीवरी । तनें प्रसंग जो करी[2] ।
तनें मनें चुकेचिना । तया उगीच येचि ना ॥ २ ॥
तनास[3] भेटलीं तनें । मनास चूकलीं मनें ।
चुकी चुकी बहू चुकी । परस्परें चुकाचुकी ॥ ३ ॥
मढ्यास भेटलें मढें । करील काय बापुडें ? ।
मनें मनाचिया खुणा । बुझेल लोभ त्या दूणा ॥ ४ ॥[4]
उगेंचि वेचलें वये । मनासि भेटतां नये[5] ।
मनें मनास राखणें । सुखें सुखास चाखणें ॥ ५ ॥
न सांगतांच जाणणें । खुणेसि खूण बाणणें ।
प्रसंग[6]मान पुरतें । कदापि तें नव्हे रितें ॥ ६ ॥
प्रसंग धारणा धरे । मनें मनांत वीवरे ।
कदा भरीं भरेचिना[7] । महत्त्व तें सरेचिना ॥ ७ ॥
प्रमाण तो भला भला । बहू जनांत शोभला ।
भलेचि मानिती तया । विमूढ जाय वीळया[8] ॥ ८ ॥
परांतरासि राखणें । अचूक सुख चाखणें ।
परंतु संग तो मिळे । तरी जनास नीवळे ॥ ९ ॥
प्रेत्न पुरता करी । सदा विचार वीवरी ।

---

१ चतुर, निष्णात, तीक्ष्ण बुद्धीचा. २ मनानें विवरून मग तनानें तसा वागतो. ३ तनाला तनें भेटलीं पण मनाला मनें भेटलीं नाहींत, तर दोघें एकमेकांना न सांपडतां दूर होतात. ४ मनानें मनाच्या खुणा जाणेल तर दुप्पट लोभ वाढेल. ५ मनाला भेटतां येत नाहीं, फुकट एवढे वाढलांत ! ६ प्रसंगमान बरोबर साधतो तो कधीं अपेशी (रितें) होणार नाहीं. ७ हट्टाला पेटत नाहीं. ८ मूढांचा फजीता किंवा नाश होतो.

चतुर तो परोपरी । तया सरी मनोहरी ॥ ८ ॥
मनें मनासि मिळणी । तयासि मानिती गुणी ।
परांतरासवें भरे । प्रसंग मान वीवरे ॥ ९ ॥

## ( १० ) जग तिकडे जगन्नायक

कोण कोण राजी राखिले । कोण कोण मनीं भंगिले[1] ।
क्षणक्षणा परीक्षिले । पाहिजे लोक ॥ १ ॥
थोडें बोलोन स[2]माधान करणें । रागेजोन तरी मन धरणें ।
मनुष्य वेधींच लावणें । कोणीयेक ॥ २ ॥
जिकडे तिकडे कीर्ति माजे । सगट लोकांस ह[3]व्यास उपजे ।
लोक राजी राखोन कीजे । सकळ कांहीं ॥ ३ ॥
जिकडे जग तिकडे जगन्नायक । कळला पाहिजे विवेक ।
रातंदिवस विवेकी लोक । सांभाळीत जाती ॥ ४ ॥
जो जो लोक दृष्टीस पडला । तो तो [4]नष्ट ऐसा कळला ।
अवघे नष्ट, येकला भला । कशावरुनी ? ॥ ५ ॥
वो[5]सें मुलखीं काय पाहावें ? । लोकांवेगळें कोठें राहावें ? ।
त[6]र्‍हे खोटी, सांडते घ्यावें । कांहीं येक ॥ ६ ॥
तस्मात् लोकिकीं वर्ततां न ये । तयास महंती कामा नये ।
परंतु साधनाचा उपाय । श्रवण करून असावें ! ॥ ७ ॥
अभ्यासेंचि प्रगट व्हावें । नाहीं तरी झांकोन असावें ।
प्रगट होऊन नासावें । हें बरें नव्हे ! ॥ ८ ॥

---

१ दुखवले. २ कोणी कांहीं शंका वगैरे विचारल्यास थोड्या शब्दांत त्याचें समाधान करावें. रागावणें झालेंच तर चटकन् त्याचें मन राखावें, सर्वांसच चटक लावावी. ३ आवड. ४ वाईट. ५ ओसाड प्रदेशांत काय पहायचें आहे ? लोकांना सोडून कोठें राहणार ? ६ तऱ्हेवाईकपणा वाईट, कांहीं तरी पड घेत जावी.

सेतें केलें परी वाहेना । जवार केलें परी फिरेना ।
जन मेळविले परी धरेना । अंतर्यामीं ॥ ९ ॥
चढती वाढती आवडी उठे । तरीच परमार्थ प्रगटे ।
घसघस करितां विटे । सकळ लोक ॥ १० ॥
संगीतें चालिला तरी तो व्याप । नाहीं तरी अवघाचि संताप ।
क्षणक्षणां विक्षेप कोप । किती म्हणोनि सांगावा ॥ ११ ॥
मूर्ख मूर्खपणें भरंगळती । ज्ञाते ज्ञातेपणें कळहो करिती ।
होते दोहींकडे फजीती । लोकांमध्यें ॥ १२ ॥
आतां हें आपणाचिपासीं । बरें विचारावें आपणासी ।
अनुकूल पडेल तैसी । वर्तणूक करावी ॥१३॥ (द.१९, स.७)

## (११) लोकवशीकरणाचा मंत्र.

जीव जीवांत घालावा । आत्मा आत्म्यांत मिसळावा ।
राहाहों शोध घ्यावा । परांतराचा ॥ १ ॥
दुसऱ्याचे जीवींचें कळेना । परांतर तें जाणवेना ।
वश्य होती लोक नाना । कोण्या प्रकारें ? ॥ २ ॥
जगदीश आहे जगदंतरीं । चेटकें करावीं कोणावरी ।
जो कोणी विवेकें विवरी । तोचि श्रेष्ठ ॥ ३ ॥
अकल सांडून परती । लोक वशीकरणें करिती ।

१ शेत पेरून मशागत करायाची नाहीं, जवाहिऱ्याचा धंदा पत्करून (घर कोंबडेपणानें) चौदेशीं फिरायचें नाहीं, त्याप्रमाणें माणसें जमवून त्यांना राजी राखायचें नाहीं, यास काय म्हणावें ? २ सुरळित चालला तर व्याप वाढविण्याचें सार्थक, नाहीं तर तो व्याप म्हणजे सारा संताप. ३ घसरतात. ४ शहाणपणाच्या गर्वानें. ५ राहून राहून, वारंवार. ६ वशीकरणप्रयोगांनीं व चेटकांनीं लोकांचीं मनें वश करणें अशक्य आहे, अकलेनें व विवेकानेंच लोक वश करावेत.

३३५७ वि: ११ क्रमांक १५७ नों: दि: १८५८

अपूर्णपणें हळू पडती । ठाईंठाईं ॥ ४ ॥
श्रेष्ठकार्ये करी श्रेष्ठ । कृत्रिम करी तो कनिष्ठ ।
कर्मानुसार प्राणी नष्ट । अथवा भले ॥ ५ ॥
जो जगदंतरीं मिळाला । तो जगदंतरचि जाला ।
अत्रीं परत्रीं तयाला । काय उणें ? ॥ ६
बुद्धि देणें भगवंताचे । बुद्धीवीण माणुस कैंचें ।
राज्य सांडून फुकाचें । भीक मागे ! ॥ ७ ॥
अवघेचि म्हणती आम्ही थोर । अवघेचि म्हणती आम्ही सुंदर ।
अवघेचि म्हणती आम्ही चतुर । भूमंडळीं ॥ ८ ॥
आपुल्याला साभिमानें । लोक चालिले अनुमानें ।
परंतु हे विवेकानें । पाहिलें पाहिजे ॥ ९ ॥
सत्याचा जो साभिमान । तो जाणावा निरभिमान ।
न्याय अन्याय समान । कदापि नव्हे ॥ १० ॥
न्याय म्हणिजे तो शाश्वत । अन्याय म्हणिजे तो अशाश्वत ।
बाष्कळ आणि नेमस्तें । येक कैंचा ? ॥ ११ ॥
येक उघड भाग्यश्री भोगिती । येक तस्कर पळोन जाती ।
येकाची प्रगटे महंती । येकाची कानकोंडी ॥ १२ ॥
आचारविचारेंवीण । जें जें करणें तो तो शीण ।
धूर्त आणि विचक्षण । तेचि शोधावे ॥ १३ ॥

---

१ कच्चेपणामुळें, मन व्यापक व विशाल नसल्यामुळें, जागोजाग हलके पडतात. २ श्रेष्ठकार्य करील तो श्रेष्ठ व कुचरपणानें (कृत्रिम) वागेल तो कनिष्ठ. ३ कच्चे, ढिलें. ४ नियमरहित, अनर्गळ, स्वेच्छ वागणारा. ५ नियमांनीं चालणारा. ६एकाची महती राजरोसपणें जाहीर चालते व एकाची चोरटी असते

उदंड बाजारी मिळाले । परी ते धूर्तेंचि आळिले ।
धूर्तापासीं कांहीं न चले । बाजाऱ्यांचें ॥ १४ ॥
या कारणें मुख्य मुख्य । तयांसी करावें सख्य ।
येणेंकरितां असंख्य । बाजारी मिळती ॥ १५ ॥
धूर्तासी धूर्तपण कळलें । तेणें मनास मन मिळालें ।
परी हे गुप्तरूपें केलें । पाहिजे सर्व ॥ १६ ॥
समर्थाचें राखतां मन । तेथें येती उदंड जन ।
जन आणि सज्जन । आर्जव करिती ॥ १७ ॥
बोळखीनें बोळखी साधावी । बुद्धीनें बुद्धि बोधावी ।
नीतिन्यायें वाट रोधावी । पाखांडाची ॥ १८ ॥
वेष धरावा बावळा । अंतरीं असाव्या नाना कळा ।
सगट लोकांचा जिव्हाळा । मोडूं नये ॥ १९ ॥
निस्पृह आणि नित्यनूतन । प्रत्ययाचें ब्रह्मज्ञान ।
प्रगट जाणता सज्जन । दुर्लभ जगीं ॥ २० ॥
नाना जिन्नस पाठांतरें । निघती सकळांचीं अंतरें ।
चंचळपणें तदनंतरें । सकळां ठाईं ॥ २१ ॥
येके ठाईं बैसोन राहिला । तरी मग व्यापचि बुडाला ।
सावधपणें ज्याला त्याला । भेटी द्यावी ॥ २२ ॥
भेटभेटों उरी राखणें । हे चातुर्याचीं लक्षणें ।
मनुष्यमात्र उत्तम गुणें । समाधान ॥ २३ ॥ ( द. १५, स. १ )

१ दूरदर्शी पुरुष साऱ्या बाजाऱ्यांना आपल्या कावूंत घेतो. २ धूर्ताधूर्तांचें मन मिळून चटकन सख्य होतें. ३ गुपचिप्, गाजावाजा न करितां. ४ म्होरक्या, पुढारी हातीं धरिला कीं त्याचे अनुयायी आयतेच मिळतात. ५ वेदशास्त्र-विरुद्ध सारीं मतें मोडून काढावीं. ६ अनंत युक्ति. ७ सर्वांचा प्रेमभाव तोडूं नये. ८ नित्यपरिभ्रमण करून लोक वश करणारा. ९ सर्वांचीं अंतःकरणें सहज वेधतील असें पाठपाठांतर अपार असून मग ठिकठिकाणीं परिभ्रमण करावें. १० वारंवार भेटून पुन्हा भेटावें अशी इतरांची इच्छा त्यानें कायम राखावी.

## ( १२ ) एकंकार नको, तारतम्य पाहिजे.

### ( १ )

रायापासून रंकवरी । अवघ्या मनुष्यांचिया हारी ।
सर्कट समान सरी । कैसी करावी ? ॥ १ ॥
देव दानव मानव । नीच योनि हनि जीव ।
पापी सुकृती अभिप्राव । उदंड आहे ॥ २ ॥
' एकांशें ' जगं चाले । परी सामर्थ्य वेगळालें ।
येकासंगें मुक्त केलें । येकासंगें रौरव ॥ ३ ॥
साकर माती पृथ्वी होय । परी ते माती खातां न ये ।
गरळ आप नव्हे काय ? । परी तें खोटें ॥ ४ ॥
पुण्यात्मा आणि पापात्मा । दोहींकडे अंतरात्मा ।
साधु-भोंदु सीमा । सांडूंच नये ॥ ५ ॥
मनुष्य आणि गधडे । राजहंस आणि कोंबडे ।
राजे आणि माकडें । येक कैसीं ? ॥ ६ ॥
अंतर एक तों खरे । परी सांगाते घेऊ न येती महारें ।
पंडित आणि चाट पोरें । एक कैसीं ? ॥ ७ ॥
शूरांहून मानिले लंडी[10] । तरी युद्धप्रसंगीं नेरकाडी ।
श्रीमंत सांडून बरोडी । सेवितां कैसें ? ॥ ८ ॥
भागीरथीचें जळ आप । मोरीसंवेदणी तेंहि आप ।
कुश्चिळ उदक अल्प । सेवयेना ॥ ९ ॥

---

१ सरसकट सारे सारखे कसे म्हणावे ? २ असे अनेक प्रकार सांगतां येतील. ३ 'एकांशेन स्थितो जगत्' (गीता १०-४२). ४नरक. ५ यांत भेद नाहीं म्हणतां येत नाहीं. ६ गाढवें. ७ दोन्ही उंचावर बसतात म्हणून काय राजे आणि माकडें सारखीं होतील ?८ ब्राह्मण व महार दोघांचें अंतर (चित्त, अंतरात्मा ) एक म्हणून काय दोघांची पंगत एक होईल ? ९ चावट पोरें. १० भ्याड. ११ फजीतवडा. १२ दरिद्र्याचा आश्रय हितकर कसा होईल ? १३ मोरीडबक्याचें पाणी.

तैसें निंद्य सोडून द्यावें । वंद्य तें हृदयीं धरावें ।
सत्कीर्तीनें भरावें । भूमंडळ ॥ १० ॥
या कारणें आचारशुद्ध । त्याउपरी विचारशुद्ध ।
वीतरागी आणि सुबुद्ध । ऐसा पाहिजे ॥ ११ ॥
उत्तमासी उत्तम माने । कनिष्ठासी तें न माने ।
म्हणोन करंटे देवानें । करून ठेविले ! ॥ १२ ॥
सांडा अवघें करंटपण । धरा उत्तम लक्षण ।
हरिकथा पुराणश्रवण । नीतिन्याय ॥ १३ ॥
वर्तायाचा विवेक । राजी राखणें सकळ लोक ।
हळूहळु पुण्यश्लोक । करीत जावें ॥ १४ ॥
मुलाचे चालीनें चालावें । मुलाच्या मनोगतें बोलावें ।
तैसे जनासी सिकवावें । हळुहळु ॥ १५ ॥
वेड्यास वेडें म्हणों नये । वर्म कदापी बोलों नये ।
तरी घडे दिग्विजय । निस्पृहासी ॥ १६ ॥
उदंडस्थळीं उदंड प्रसंग । जाणोनि करणें यथासांग ।
प्राणिमात्रांचा अंतरंग । होऊन जावें ॥ १७ ॥
याकारणें मनोगत । राखेल तो मोठा महंत ।
[१]मनोगत राखतां समस्त । वोढोन येती ॥ १८ ॥ (द. १३, स. १०)

## ( २ )

जें आपणांस नव्हे ठावें । तें जाणतयास पुसावें ।
[२]मनोवेगें तनें फिरावें । हें तों घडेना ॥ १९ ॥
जें चर्मदृष्टीस नव्हे ठावें । तें ज्ञानदृष्टीनें पाहावें ।
ब्रह्मांड विवरोन राहावें । समाधानें ॥ २० ॥

१ समस्तांचें मनोगत राखून वागेल तो महंत व त्यालाच सर्वांच्या चित्तवृत्ति आकर्षन घेतां येतील. २ मनाच्या वेगानें शरीराला कांहीं फिरतां येत नाहीं.

टोणपा नव्हे गुणग्राहक । मूर्खास कळेना विवेक ।
विवेक आणि अविवेक । येकाचि म्हणती ॥ २१ ॥
ईश्वरें नाना भेद केले । भेदें सकळ सृष्टी चाले ।
आंधळे परीक्षवंत मिळाले । तेथें परीक्षा कैची ? ॥ २२ ॥
उत्तम वस्तूची परीक्षा । कैसी घडे नतद्रक्षा ।
दीक्षाहीनापाशीं दीक्षा । येईल कैंची ॥ २३ ॥
आधीं राखावा आचार । मग पाहावा विचार ।
आचारविचारें पैलपार । पाविजेतो ॥ २४ ॥
जें नेमकास न कळे । तें बाष्कळास केंवि कळे ? ।
डोळस ठकती, आंधळे । कोण्या कामाचे ? ॥ २५ ॥
पापपुण्य स्वर्गनरक । अवघेंचि मानिलें येक ।
विवेक आणि अविवेक । काय ( येक ) मानावे ? ॥ २६ ॥
म्हणोनी संतसंगेंचि जावें । सच्छास्त्राचे श्रवण करावें ।
उत्तम गुणास अभ्यासावें । नाना प्रयत्नें॥२७॥(द.१७,स.१०)

( ३ )

उगाच करी गाथागोवी । तो लोकांस कैसें उगवी ?
नाना निश्चयें नाना गांवी । पडत जाते ॥ २८ ॥
पापपुण्य स्वर्गनरक । विवेक आणि अविवेक ।
सर्वब्रह्मीं काय येक । सांपडलें नाहीं ? ॥ २९ ॥
सार आणि असार । अवघा जाला एकंकार ।
तेथें बळावला अविचार । विचार कैंचा ? ॥ ३० ॥

---

१ नतद्रष्टाला,हीन दृष्टीच्या पामराला. २ संप्रदायपरंपरा. ३ अडखळतात. ४ जो स्वतःच गोंधळांत पडतो तो लोकांस निश्चयात्मक ज्ञान काय देणार ? तो अनेक निश्चय सांगत असला तरी सारा गोंधळच पडणार. ५'सर्व ब्रह्मवादी लोकांना पापपुण्य,स्वर्गनरक, निश्चयसंशय,पतनउद्धार,सारीं सारखीं ब्रह्मरूपच.

सर्वसंगपरित्याग । अव्हासव्वा विषयभोग ।
दोघे येकाचि मानितां मगे । काय उरलें ? ॥ ३१ ॥
भेद ईश्वर करून गेला । त्याचे बांचेन न वचे मोडिला ।
मुखामध्यें घास घातला । तो अपानीं घालावा ? ॥ ३२ ॥
ज्या इंद्रियास जो भोग । तो तो करी यथासांग ।
ईश्वराचें केलें जग । मोडितां उरेना ॥ ३३ ॥
वेडेंवांकडें जाणावें । आंधळें पाउलीं वोळखावें ।
बाष्कळ बोलणें सांडावें । वमन जैसें ॥३४॥ (द.१७,स.४)

( ४ )

विसर आणि आठवण । नेमस्त आणि बाष्कळपण ।
प्रचीत आणि अनुमान । येक कैंचें ॥ ३५ ॥
न्याय आणि अन्याय । होय आणि न होय ।
विवेकेंवीण काय । उमजों जाणे ? ॥ ३६ ॥
कार्यकर्ता आणि निकामी । शूर आणि कुकर्मी ।
धर्मी आणि अधर्मी । कळला पाहिजे ॥ ३७ ॥
धनाढ्य आणि दिवाळखोर । साव आणि तस्कर ।
खरे खोटे हा विचार । कळला पाहिजे ॥ ३८ ॥
वरिष्ठ आणि कनिष्ठ । भ्रष्ट आणि अंतरनिष्ठ ।
सारासार विचार स्पष्ट । कळला पाहिजे ॥३९॥ (द.१६,स.९)

( ५ )

सगट भजनें करूं येतें । तरी मूर्खपण अंगीं लागतें ।
गाढवासी पूजितां कळतें । काय त्याला ? ॥ ४० ॥

१ विषयत्याग आणि अचावचा विषयभोग दोन्ही एकच का मानणार ? असा एकंकारवाद्यांना प्रश्न आहे. २ ईश्वरकृत भेद याच्या बापाला मोडतां येणार नाहीं. ३ मुखांत घालायचा घास काय अपानांत घालतां येईल ? ४ पावलांवरून, चालण्याच्या ढबेवरून. ५ सरसगट सर्वांचीच पूजा करूं म्हटलें तर मूर्खत्व अंगीं येतें.

पूज्य पूजेसी[1] अधिकार । उगोंचि तोषवावे इतर ।
दुखऊं नये कोणाचें अंतर । म्हणिजे बरें ॥ ४१ ॥
उदंड प्रगटला विचार । धर्मस्थापना तदनंतर ।
तेथेंच पूजेस अधिकार । पुण्यशरीरीं[2] ॥४२॥ ( द.१८,स.४ )

( ६ )

सगट विचार तो अविचार । कित्येक म्हणती एकंकार ।
एकंकार भ्रष्टाकार । करूं नये ॥ ४३ ॥
कृत्रिम अवघें सांडावें । कांहीं येक शुद्ध घ्यावें ।
जाणनाणों निवडावें । सारासार ॥४४॥ ( द.२०, स. ७ )

## ( १३ ) राजकारणाची उपाधि कशी सांभाळावी ?

सृष्टीमध्यें बहु लोक । परिभ्रमणें[3] कळे कौतुक ।
नानाप्रकारींचे विवेक । आडळों लागती ॥ १ ॥
येखादा आडळे गोंजी । सकळ लोक अखंड राजी ।
सदासर्वदा आवडी ताजा । प्राणिमात्रांची ॥ २ ॥
चुकोन उदंड आडळतें । भारी मनुष्य दृष्टीस पडतें ।
महंताचें लक्षणसें वाटतें । अकस्मात ॥ ३ ॥
ढोळेंचि काम होतें सदा । जें जपल्यानें न्हे सर्वदा ।
पळिपैंचाची[6] आपदा । आडळोचिना ॥ ४ ॥
येकासी अभ्यासितां न ये । येकासी स्वभावेंचि[5] ये ।
ऐसा भगवंताचा महिमा काये । कैसा कळेना ॥ ५ ॥
मोठीं राजकारणें चुकती । राजकारणीं घेढा[7] लाविती ।

१ पूज्यांचीच पूजा करावी व इतरांस संतोष द्यावा. २ महापुरुषापासून सर्वांस सुविचार कळतो व मग धर्मस्थापनेचें कार्य होतें. म्हणून पूजेचा अधिकार अशा पुण्यपुरुषाचाच आहे. इतर जीवांस दुःख न देतां सुखवावें म्हणजे पुरे. ३ फिरल्यानें. ४ पराक्रमी. ५ त्याच्या प्रभावानेंच. ६ वांकड्यातिकड्या मार्गानें जाण्याची. ७ डाव अंगावर आणतात.

नाना चुकीची फजीती । चहुंकडे ॥ ६ ॥
या कारणें चुकों नये । म्हणिजे उदंड उपाय ।
उपायाचा अपाय । चुकतां होय ॥ ७ ॥
अवघे फडचि नासती । लोकांचीं मनें भंगतीं ।
कोठें चुकते युक्ती । कांहीं कळेना ॥ ८ ॥
येखादें मनुष्य तें सिळें[1] । त्याचें करणेंचि बावळें ।
नाना विकल्पांचें जाळें । करून टाकी ॥ ९ ॥
व्यापेंवीण[2] आटोप केला । तो अवघा घसरतचि गेला ।
अकलेचा बंद[3] नाहीं घातला । दूरदृष्टीनें ॥ १० ॥
धांवधांवो[4] उपाधि वेष्टी । आपण कष्टी लोकही कष्टी ।
हे कामा नये गोष्टी । कुसमुसेची[5] ॥ ११ ॥
ज्यासी उपाधि आवरेना । तेणें उपाधि वाढवावीना ।
सावचित करूनियां मना । समाधानें असावें ॥ १२ ॥
अंतरात्म्याकडे[6] सकळ लागे । निर्गुणीं हें कांहींच नलगे ।
नाना प्रकारीचे दगे । चंचळ मध्यें ॥ १३ ॥
आपणांस[7] उपाधि मुळींच नाहीं । ऋणानुबंधें मिळालीं सर्वही ।
आल्यागेल्याची क्षिती नाहीं । ऐसें जालें पाहिजे ॥ १४ ॥
कांहीं गलबला कांहीं निर्वळ । ऐसा कंठीत जावा काळ ।
जेणेंकरितां विश्रांतीवेळ । आपणासी फावे ॥ १५ ॥
उपाधि कांहीं राहात नाहीं । समाधानायेवढें थोर नाहीं ।
नरदेह प्राप्त होत नाहीं । क्षणक्षणा ॥१६॥ (द.१९,स.८)

१ शिळें, उत्साहशून्य. २ अंगी कर्तृत्वशक्ति नसून खटाटोप केला तर तो फसतच जातो. ३ नियमन. ४ हांवेहावेनें उपाधि वाढवितो. ५ चित्तक्षोभाची. ६ व्यवहारांतल्या चळवळीचा निर्गुणाशीं संबंध नाहीं, सारा संबंध चंचळ जीवात्म्याकडे लागतो. दगे फटके सारे चंचळांतले ! ७ आपण मूळचे निरुपाधिक आहोंत. ८ एकांत.

## ( १४ ) सभा कशी संभाळावी ?

कोणीयेक प्राणी जन्मास येतो । कांहीं तरी काळ [1]साहे होतो ।
दुःखाउपरी सुख देतो । देव कृपाळूपणें ।। १ ।।
अवघाचि काळ जरी [2]सजे । तरी अवघेच होती राजे ।
[3]कांहीं सजे कांहीं न सजे । ऐसें आहे ।। २ ।।
ऐकिल्यावीण कळलें । सिकल्यावीण शहाणपण आलें ।
देखिलें ना ऐकिलें । भूमंडळीं ।। ३ ।।
सकळ कांहीं ऐकतां कळे । कळतां कळतां वृत्ति निवळे ।
नेमस्त मनामध्यें आकळे । सारासार ।। ४ ।।
जें जें कांहीं श्रवणीं पडिलें । तितुकें समजोन विचरलें ।
तरीच कांहीं सार्थक जालें । निरूपणीं ।। ५ ।।
मन दिसतें मा धरावें । ज्याचें त्यानें आवरावें ।
आवरून विवेकें भरावें । अर्थांतरीं ।। ६ ।।
बहुत जाणते मिळाले । येकापुढें येक बोले ।
[4]लोकांचे आशय राहिले । कोण जाणे ।। ७ ।।
[5]माझें होय तुझें नव्हे । ऐसी अखंड जयास [6]सवे ।
न्यायनीति सांडून धांवे । अन्याया[7]कडे ।। ८ ।।
येकी[8]कडे अभिमान उठे । दुसरीकडे उदंड पेटे ।
ऐसे श्रोते (वक्ते) खरे खोटे । कोण जाणे ।। ९ ।।

१ साह्य, अनुकूळ. २ अनुकूळ झाला तर. ३ कांहीं काळ अनुकूळ, कांहीं काळ प्रतिकूळ, असेंच चालायचें ! ४ सभेंत पुष्कळ बोलके मिळाले कीं एकामागें एक आपापलीं मतें बोलत जातात, पण श्रोत्यांचें शंकासमाधान न होतां मनोगत तसेंच राहून जातें; पण याचा विचार करितो कोण ? ५ माझें मत खरें व तुझें खोटें. ६ संवय. ७ दुराग्रहानें कांहींबाही बडबडत सुटतो. ८ एक अहंकारमदानें बडबडतो, दुसरा क्रोधानें उन्मत्त होतो !

म्हणोन जाणते विचक्षण । ते आधींच धरिती नेणपण ।
मूर्ख टोणपा आपण । कांहींच नाहीं ! ॥ १० ॥
आपणाहून देव थोर । ऐसा जयास कळला विचार ।
सकळ कांहीं जगदंतरें । तेंही राखावें ॥ ११ ॥
सभेमध्यें कल्हो जाला । शब्द येतो जाणत्याला ।
अंतर राखों नाहीं सिकला । कैसा योगी ? ॥ १२ ॥
अखंड आपणा सांभाळिती । क्षुल्लकपण येऊं नेदिती ।
थोर लोकांस क्षमाशांती । अगत्य करणें ॥ १३ ॥
उपाय पर्याय दीर्घ प्रेत्न । विवेकबळें नाना यत्न ।
करील तयाचें महिमान । तोचि जाणे ॥ १४ ॥
न्याय पर्याय उपाय । मूर्खास हें कळे काय ? ।
मूर्खाकरितां चिवडा होय । मज्जालसीचा ॥ १५ ॥
मग ते शाहणे नीट करिती । स्वयें साहोन साहविती ।
स्वयें करून करविती । लोकांकरवीं ॥ १६ ॥
पृथ्वीमध्यें उदंड जन । जनांमध्यें असती सज्जन ।
जयांकरितां समाधान । प्राणिमात्रांसी ॥ १७ ॥
तो मनोगतांचीं अंगें जाणे । मान प्रसंगसमयो जाणे ।
संतप्तांलागीं निवऊं जाणे । नानाप्रकारें ॥ १८ ॥
बहुत जनांसी चालवी । नाना मंडळें हालवी ।

---

१ लोकांचें मनोगत. २ दोष. ३ सभेंत कलह झाले तर टपका येतो जाणत्यावर. ४ जाणता कसचा ? ५ नाना प्रकारचे उपाय विवेकानें व दीर्घ प्रयत्नांनीं करून सभा संभाळणें ज्याला साधतें तोच श्रेष्ठ पुरुष. ६ विविध पर्याय, उपाय वगैरे मूर्खाला काय कळणार ? ७ मूर्खामुळें सभा उधळते, सभेचा फजीतवाडा होतो. ८ सुधारून घेतात. ९ सज्जनांमुळें, सज्जन आहेत म्हणून. १० मनोगत राखण्याचे प्रकार. ११ काळवेळ सर्व जाणतो.

ऐसी हे 'समर्थ' पदवी । विवेकें होते ॥ १९ ॥
विवेक एकांतीं करावा । जगदीश धारणेनें धरावा ।
लोक आपुला आणि परावा । म्हणोंचि नये ॥ २० ॥
एकांतीं विवेक ठायीं पडे । एकांतीं यत्न सांपडे ।
एकांतीं तर्क वावडे । ब्रह्मांडगोळीं ॥ २१ ॥
जयास एकांत मानला । अवघ्यांआधीं कळे त्याला ।
त्यावेगळें वडिलपणाला । ठावाचि नाहीं ॥२२॥(द.१८स.१०)

## ( २ )

चातुर्येंवीण खटपट । ते विद्याचि फलकट ।
सभेमध्यें [२]आटघांट । समाधान कैचें ? ॥ २३ ॥
बहुत बोलणें ऐकावें । तेथें [३]मौन्यचि धरावें ।
[४]अल्पचिन्हें समजावें । जगदंतर ॥ २४ ॥
वाष्कळांमध्यें बैसों नये । [५]उद्धटांसीं तंडों नये ।
आपणाकारितां खंडों नये । समाधान जनाचें ॥ २५ ॥
प्रसंग जाणावा नेटका । बहुतांसी झोंजूं घेऊं नका ।
[६]खरें असतांचि नासका । फड होतो ॥ २६ ॥

---

१ नाना मंडळें म्ह. अनेक जनसंघ जो हलवितो, अर्थात त्यांच्यांत प्रज्ञा-श्रद्धाबळ भरून व त्यांना प्रोत्साहन देऊन लोककार्यास लावतो, त्यालाच लोक 'समर्थ' ही पदवी देतात. लाकडांच्या ठोकळ्यांत चैतन्यशक्ति उत्पन्न करणारा समर्थ खराच. २ सभेंत जर आटापीट, श्रम, फजीता उडाला तर तो विद्वान् वक्ताही उपहास्यच होणार. ३ फार बोलणें चाललें आहे किंवा बहुत वक्ते वादांत गर्क आहेत तेथें शाहण्यानें मौनच धरावें. ४ थोडक्यानें लोकांच्या मनाचा कल ओळखावा. ५ बहुतांचें मत एकप्रकारचें असतां तेथें विरुद्धपणें बोलून तंटे करूं नका. ६ आपलें म्हणणें खरें असलें तरी सभा मोडायला व लोकांचें समाधान बिघडायला सहसा आपण कारण होऊं नये.

नेणतेंपण सोडूं नये । जाणपणें फुगों नये ।
नाना जनांचें हृदय । मृदु शब्दें उकलावें ॥ २७ ॥
(दास. द. १९, स. ३)

## (१५) चतुराईचें राजकारण

कर्म केलेंचि करावें । ध्यान धरिलेंचि धरावें ।
विवरलेंचि विवरावें । पुन्हा निरूपणीं ॥ १ ॥
अनन्यें राहे समुदाव । इतर जनांस उपजे भाव ।
ऐसा आहे अभिप्राव । उपायाचा ॥ २ ॥
मुख्य हरिकथानिरूपण । दुसरें तें राजकारण ।
तिसरें तें सावधपण । सर्व विषयीं ॥ ३ ॥
चौथा अत्यंत साक्षेपें । फेडावे नाना आक्षेप ।
अन्याय थोर अथवा अल्प । क्षमा करीत जावें ॥ ४ ॥
जाणावें पराचें अंतर । उदासीनता निरंतर ।
नीतिन्यायासी अंतर । पडोंचि नेदावें ॥ ५ ॥
संकेतें लोक वेधावा । ऐकून येक बोधावा ।
प्रपंचही सावरावा । यथानुशक्त्या ॥ ६ ॥
प्रपंचेसमयो वोळखावा । धीर बहुत असावा ।
संबंध पडों नेदावा । अतिपरिचयाचा ॥ ७ ॥
उपाधीस विस्तारावें । उपाधींत न सांपडावें ।
नीचत्व पाहिलेंच घ्यावें । आणि मूर्खपण ॥ ८ ॥

---

१ स्वधर्मकर्म, ध्यान, श्रवणमनन नित्य केलें पाहिजे. २ आपले लोक (संप्रदायिक किंवा अनुयायी) एकनिष्ठ राहावेत व बाहेरच्या लोकांचा सद्भाव वाढत जावा असें वागणें हा जनहिताचा मुख्य उपाय आहे. ३ संशय. ४ संकेतानें लोकांचीं चित्तें आकर्षावींत. ५ प्रपंचांतील अनेक प्रसंगांना धैर्यानें तोंड द्यावें. ६ उपाधि (व्याप) खूप वाढवावी, पण अंतर्यामीं मोकळें असावें. ' करून अकर्ता ' हें वर्म साधलें पाहिजे.

दोष देखोनी झांकावे । अवगुण अखंड न बोलावे ।
दुर्जन सांपडोन सोडावे । परोपकार करूनी ॥ ९ ॥
तऱ्हे[1] भरोंच नये । सुचावे नाना उपाय ।
नेव्हे[2] तेंचि करावें कार्य । दीर्घ प्रेत्नें ॥ १० ॥
फड[3] नासोंचि नेदावा । पडिला प्रसंग सावरावा[4] ।
अतिवाद न करावा । कोणीयेकासी ॥ ११ ॥
दुसऱ्याचें अभीष्ट जाणावें । बहुतांचें बहुत सोसावें ।
न सोसे तरी जावें । दिगंतराप्रती ॥ १२ ॥
दुःख दुसऱ्याचें जाणावें । ऐकून[5] तरी वाटून घ्यावें ।
बरेंवाईट सोसावें । समुदायाचें ॥ १३ ॥
अपार असावें पाठांतर । सन्निधाचि असावा विचार[6] ।
सदासर्वदा तत्पर । परोपकारासी ॥ १४ ॥
शांती[7] करून करवावी । तऱ्हे सांडून सांडवावी ।
क्रिया[8] करून करवावी । बहुतांकरवीं ॥ १५ ॥
करणें असेल अपाय । तरी बोलोन दाखवूं नये ।
परस्परेंचि[9] प्रत्यय । प्रचीतीस आणावा ॥ १६ ॥
जो बहुतांचें सोसीना । त्यास बहुत लोक मिळेना ।
अवघेंचि[10] सोसितां उरेना । महत्व आपुलें ॥ १७ ॥
राजकारण बहुत करावें । परंतु तें कळोंच नेदावें ।
परपीडेवरी नसावें । अंतःकरण[11] ॥ १८ ॥

---

१ एककल्लीपणा करूं नये. २ लोकांस दुर्घट वाटणारें महत् कार्य करून दाखवावें. ३ सभा, समारंभ. ४ प्रसंगांतून पार निघून जावें. ५ सहानुभूतीनें दुसऱ्याचें दुःख ऐकून घेतलें कीं, त्याचा दुःखभार हलका होतो. ६ नित्यानित्य विवेक. ७ चित्ताची समता स्वतः राखावी व दुसऱ्याचे अंगीं भिनवावी. ८ ८ सत्कर्माचें आचरण. ९ काट्यानें कांटा काढावा. १० सर्वच सोसूं म्हटलें तर आपलें महत्त्व उरत नाहीं. ११. मात्र पराला दुःख देण्याची बुद्धि ठेवूं नये.

लोक पारखून[1] सांडावे । राजकारणें अभिमान झाडावे[2] ।
पुन्हा मेळऊन घ्यावें । दुरिल्या दोरे ॥ १९ ॥
हिरवटांसी[3] दुरी धरावें । कचरटांसी[4] न बोलावें ।
संबंध पडतां सोडून जावें । येकीकडे ॥ २० ॥
असो ऐसें राजकारण । सांगतां तें असाधारण[5] ।
सुचित असता अंत:करण । राजकारण जाणे ॥ २१ ॥
वृक्षीं रूढास उचलावें[6] । युद्धकर्त्यास ढकलावें ।
कारबाराचें सांगावें । अंग कैसें ? ॥ २२ ॥
पाहतां तरी सांपडेना । कीर्ति करूं तरी राहेना ।
आलें वैभव अभिलाषीना । कांहीं केल्या ॥ २३ ॥

(दा. द. ११, स. ५)

## (१६) निस्पृह महंताचा व्याप.

### (१)

जितुक्या मूर्ती तितक्या प्रकृती । सारिख्या नसती आदिअंतीं ।
नेमचि नाहीं पाहावें किती । काय म्हणोनी ? ॥ १ ॥
कित्येक म्लेंच्छ होऊन[7] गेले । कित्येक फिरंगणांत आटले[8] ।
देशभाषेनें रुधिले । कितीयेक[9] ॥ २ ॥
मऱ्हाष्ट्रदेश थोडा उरला[10] । राजकारणें लोक रुधिले[11] ।

१ परीक्षा करून ठेवावे. २ कोणाचा अभिमान उरूं देऊं नये, पण पुन्हा हरेक युक्तीनें मिळवून घ्यावें. कोणाला तोडूं नये. ३ चटकन वर्दळीवर येणारे, तामसी. ४ हलके, क्षुद्र. ५ तें कोठवर सांगावें ? ६ वर चढणाऱ्याला टेकू द्यावा व वर चढवावें आणि जे विरोध करतील त्याना खालीं पाडावें. ७ हिंदुसमाजाच्या बाहेर गेले. ८ कित्येक बाटून पोर्तुगीज मुलुखांत गेले. ९ भिन्नभिन्न देशभाषा असल्यामुळें निरनिराळ्या प्रांतांत कित्येक अडकून पडले. १० वरील कारणामुळें कार्यक्षेत्र संकुचित होऊन महाराष्ट्र देश तेवढा कार्यास मोकळा उरला आहे. ११ येथील लोक राजकारणांत इतके गुंतले आहेत कीं त्यांना जेवायला फुरसत नाहीं.

अवकाश नाहीं जेवायला । उदंड कामें ॥ ३ ॥
कित्येकें युद्धप्रसंगीं गुंतले । तेणें उन्मत्त जाले ।
रातंदिवस करूं लागले । युद्धचर्चा ॥ ४ ॥
उदम्यांस व्यासंग लागला । अवकाश नाहींसा जाला ।
अवघा पोटधंदाच लागला । निरंतर ॥ ५ ॥
षट्दर्शनें नाना मतें । पाषांडें वाढलीं बहुतें ।
पृथ्वीमध्यें जेथें तेथें । उपदेशिती ॥ ६ ॥
या कारणें ज्ञान दुर्लभ । पुण्यें घडे अलभ्य लाभ ।
विचारवंतां सुलभ । सकळ कांहीं ॥ ७ ॥
विचार[२] कळला सांगतां न ये । उदंड येती अंतराय ।
उपाय योजितां अपाय । आडवे येती ॥ ८ ॥
त्याहीमध्यें जो तीक्ष्ण । रिकामा जाऊं नेदी क्षण ।
धूर्त तार्[३]किक विचक्षण । सकळां माने ॥ ९ ॥
[४]प्रबोधशक्तीचीं अनंत द्वारें । जाणे सकळांचीं अंतरें ।
निरूपणें तदनंतरें । चटक लागे ॥ १० ॥
मतें मतांतरें सगट । प्रत्यय बोलोन करी सपाट ।
दंडक सांडून नीट । वेधी जनां ॥ ११ ॥
प्रत्यय बोलोन उठोन गेला । चटक लागली लोकांला ।
नाना मार्ग सांडून त्याला । शरण येती ॥ १२ ॥

---

१ येथेंही कित्येक अहोरात्र युद्धप्रसंगांत व युद्धचर्चेत, कित्येक व्यापाराच्या घालमेलींत, कित्येक आपापलीं मतें व पंथ वाढविण्यांत गुंग आहेत. २ अशा परिस्थितींत चित्तांत स्फुरलेला विचार सर्वांस सांगतां येत नाहीं, अनेक अडथळे येतात, उपाय तेच अपाय होतात. ३ तर्कशुद्ध चालणारा, धूर्त, चतुर व लोकमान्य. ४ प्रबोधशक्तीच्या अनंत द्वारांनीं ज्याचे त्यापरी याप्रमाणें सर्वांना सरळ मार्ग दाखवून सर्वांचीं मनें वेधतो,स्वानुभवाच्या गोष्टी सांगून मतमतांतरें जागच्या जागीं पार वसवितो.

उदंड करी गुप्तरूपें । भिकाऱ्यासारिखा स्वरूपें ।
तेथें यशकीर्तिप्रतापें । सीमा सांडिली ॥ १३ ॥
ठाईं ठाईं भजन लावी । आपण तेथून चुकावी ।
मत्सरमतांची गोवी । लागोंचि नेदी ॥ १४ ॥
खैनाळामध्यें जाऊन राहे । तेथें कोणीच न पाहे ।
सर्वत्रांची चिंता वाहे । सर्वकाळ ॥ १५ ॥
तेथें कोणाचें चालेना । अणुमात्र अनुमानेना ।
कट्टे घालून राजकारणा । लोक लावी ॥ १६ ॥
लोकीं लोक वाढविले । तेणें अमर्याद जाले ।
भूमंडळीं सत्ता चाले । गुप्तरूपें ॥ १७ ॥
ठाईं ठाईं उदंड तांबे । मनुष्यमात्र तितुकें झोंबे ।
चहूंकडे उदंड लांबे । परमार्थबुद्धि ॥ १८ ॥
उपासनेचा गजर । स्थळोस्थळीं थोर थोर ।
प्रत्ययानें प्राणिमात्र । सोडविले ॥ १९ ॥
ऐसे कैवाड उदंड जाण । तेणें लोक होती शाहणे ।
जेथें तेथें प्रत्यय बाणे । प्राणिमात्रासी ॥ २० ॥
ऐसी कीर्ति करून जावें । तरीच संसारास यावें ।
दास म्हणे हें स्वभावें । संकेतें बोलिलें ॥२१॥ (द.१५स.२)

## ( २ )

हरिकथानिरूपण । नेमस्तपणें राजकारण ।

१ अकिंचन असून यशकीर्तीप्रतापबळानें 'समर्थ' पदवीला पोंचतो. २ 'वेष पाहतां हीनदीनासारिखा दिसे !' ३ उपाधींत न पडतां लोक भक्तीला लावतो. ४ दुर्घट दऱ्याखोऱ्यांत, घळींत. ५ सर्वांचें ऐक्य करून लोकांस राजकारणाला लावतो. ६ शिष्यप्रशिष्य करून. ७ मंडळें, समुदाय. ८ परमार्थबुद्धि सर्वत्र पसरते. ९ स्वानुभवाच्या वळावर असंख्य जन मुक्त करितो. १० हें समर्थांनीं संक्षेपानें आत्मचरित्रच 'आधीं केलें मग सांगितलें' आहे!

वर्तायाचें लक्षण । तेंही असावें ।। १ ।।
पुसों जाणे सांगों जाणे । अर्थांतर करूं जाणे ।
सकाळिकांचें राखों जाणें । समाधान ।। २ ।।
दीर्घसूचना आधीं कळे । सावधपणें तर्क प्रबळे ।
जाणजाणोंचि निवळे । यथायोग्य ।। ३ ।।
जो एकांतास तत्पर । आधीं करी पाठांतर ।
अथवा शोधी अर्थांतर । ग्रंथगर्भींचें ।। ४ ।।
आधींच सिकोन जो सिकवी । तोचि पावे श्रेष्ठ पदवी ।
गुंतल्या लोकांस उगवी । विवेकबळें ।। ५ ।।
जयास यत्नचि आवडे । नाना प्रसंगीं पवाडे ।
धीटपणें प्रगटे, दडे । ऐसा नव्हे ।। ६ ।।
सांकडीमध्यें वर्तों जाणे । उपाधीमध्यें मिळों जाणे ।
अलिप्तपणें राखों जाणे । आपणासी ।। ७ ।।
त्यावेगळें कांहींच नसे । पाहों जातां तो न दिसे ।
न दिसोन वर्तवीतसे । प्राणिमात्रासी ।। ८ ।।
आपणाकरितां शाहणे होती । ते सहजाचि सोथे धरिती ।
जाणतेपणाची महंती । ऐसी असे ।। ९ ।।
ऐसा पुरुष धारणेचा । तोचि आधार बहुतांचा ।
दास म्हणे रघुनाथाचा । गुण घ्यावा ।।१०।।(द.११.स.६)

( ३ )

महंतें ऐसें असावें । सर्व सार शोधून घ्यावें ।
पाहों जातां न सांपडावें । येकायेकीं ।। १ ।।
कीर्तिरूपें उदंड ख्यात । जाणती लहानथोर समस्त ।
वेष पाहतां शाश्वत । येक नाहीं ।। २ ।।

१ शिरे, प्रवेशे. २ त्याला संकटांतून नीटपणें निभावून जातां येतें. ३ मार्ग

वेषभूषण तें दूषण । कीर्तिभूषण तें भूषण ।
चाळणेंवीण येक क्षण । जाऊंच नेदी ॥ ३ ॥
त्यागी वोळखीचे जन । सर्व काळ नित्यनूतन ।
लोक शोधून पाहती मन । परी इच्छा दिसेना ॥ ४ ॥
पुर्तें कोणाकडे पाहेना । पुर्तें कोणासी बोलेना ।
पुर्तें येके स्थळीं राहेना । उठोन जातो ! ॥ ५ ॥
जातें स्थळ तें सांगेना । सांगीतलें तरी तेथें जायेना ।
आपुली स्थिति अनुमाना । येवोंच नेदी ॥ ६ ॥
लोकीं केलें तें चुकवी । लोकीं भाविलें तें उलथवी ।
लोकीं तर्किलें तें दावी । निर्फळ करुनी ॥ ७ ॥
लोकांसी पाह्याचा आदर । तेथें याचा अनादर ।
लोक सर्वकाळ तत्पर । तेथें याची अनिच्छा ॥ ८ ॥
लोक संकल्पविकल्प करिती । ते अवघेचि निर्फळ होती ।
जनाची जना लाजवी वृत्ति । तेव्हां योगेश्वर ॥ ९ ॥
अखंड एकांत सेवावा । अभ्यासाचि करीत जावा ।
काळ सार्थकचि करावा । जनांसहित ॥ १० ॥
उत्तम गुण तितुके घ्यावे । घेऊन जनांसी सिकवावे ।
उदंड समुदाय करावे । परी गुप्तरूपें ॥ ११ ॥
अखंड कामाची लगबग । उपासनेस लावावें जग ।
लोक समजोन मग । आज्ञा इच्छिती ॥ १२ ॥
लोक बहुत शोधावे । त्यांचे अधिकार जाणावे ।
जाणजाणोनी धरावे । जवळी दुरी ॥ १३ ॥
अधिकार पाहोन कार्य सांगणें । सांक्षेप पाहोन विश्वास धरणें ।
आपला मगज राखणें । कांहीं तरी ॥ १४ ॥

१ लोक याला पाहण्यास आतुर, पण हा लोकांच्या मेळांत यायचाच नाहीं.
२ कर्तृत्वव्याप पाहून विश्वास धरावा. ३ महत्त्व.

हें प्रचीतीचें बोलिलें । आधीं केलें मग सांगितलें ।
मानेल तरी पाहिजे घेतलें । कोणीयेकें ॥ १५ ॥
महंतें महंत करावे । युक्तिबुद्धीनें भरावे ।
जाणते करून विखरावे । नाना देशीं ॥१७॥ (द.११,स.१०)

## ( १७ ) निस्पृहाची व विरक्ताची शिकवण

### ( १ )

ऐका निस्पृहाची शिकवण । युक्तिबुद्धि शहाणपण ।
जेणें राहे समाधान । निरंतर ॥ १ ॥
कांता दृष्टी राखों नये । गोडी मनास चाखऊं नये ।
धारिष्टें चळतां दाखऊं नये । मुख आपुलें ॥ २ ॥
येके स्थळीं राहों नये । कानकोंडें साहों नये ।
द्रव्यदारा पाहों नये । आळेकेपणें ॥ ३ ॥
विरक्ति गळों देऊं नये । धारिष्ट चळों देऊं नये ।
ज्ञान मालिण होऊं नये । विवेकबळें ॥ ४ ॥
करुणाकीर्तन सोडूं नये । अंतर्ध्यान मोडूं नये ।
प्रेमतंतु तोडूं नये । सगुणमूर्तीचा ॥ ५ ॥
अपमानितां सिणों नये । निखंदितां कष्टों नये ।
धिक्कारितां झुरों नये । कांहीं केल्या ॥ ६ ॥
शुद्ध मार्ग सोडूं नये । दुर्जनासी तंडों नये ।
येकदेशी होऊं नये । परिभ्रमण करावें ॥ ७ ॥

---

१ पसरावें. २ स्त्रीविषयीं लोलुपतेची दृष्टी, किंवा कांता दृष्टी (समोर) सदा वावरूं देऊं नये. ३ मनानें विषयाचें ध्यान करूं नये. ४ पाय घसरलाच तर जनांस तोंड दाखवूं नये. ५ अप्रशस्त (संकुचित) मन करून. ६ सस्पृहतेनें ७ धिक्कार किंवा निंदा करितां. ८ एकाच प्रांतीं राहणारा.

नित्यनेम सांडूं नये । अभ्यास बुडों देऊं नये ।
परतंत्र होऊं नये । कांहीं केल्या ॥ ८ ॥
वैभेव¹ दृष्टी पाहों नये । उपाधिसुखें² राहों नये ।
ऐकांत³ मोडूं नये । स्वरूपस्थितीचा ॥ ९ ॥
कर्ममार्ग सांडूं नये । वैराग्य मोडूं देऊं नये ।
साधन भजन खंडूं नये । कदाकाळीं ॥ १० ॥
अति वाद करूं नये । अनीति पोटीं धरूं नये ।
रागें भरीं भरों नये । भलतीकडे ॥ ११ ॥
कांहीं उपाधि करूं नये । केली तरी धरूं नये ।
धरिली तरी सांपडों नये । उपाधीमध्यें ॥ १२ ॥
थोरपणें असों नये । महत्व धरुन बैसों नये ।
कांहीं मान इच्छूं नये । कोठें तरी ॥ १३ ॥
अधिकारेंवीण सांगों नये । दाटून⁴ उपदेश देऊं नये ।
बहुसाल⁵ मागों नये । शिष्यवर्गासी ॥ १४ ॥
उद्धट शब्द बोलों नये । इंद्रियस्मरण⁶ करूं नये ।
शाक्तमार्गें भरीं नये । मुक्तपणें⁷ भरीं ॥ १५ ॥
प्रसंगेंवीण बोलों नये । अन्वयेंवीण⁸ गाऊं नये ।
विचारेंवीण जाऊं नये । अविचारपंथें ॥ १६ ॥
संशयात्मक बोलों नये । बहुत निश्चय करूं नये ।
निर्वाहेवीणें⁹ धरूं नये । ग्रंथ हातीं ॥ १७ ॥

१ उगाच लोभ वाढायचा ! २ उपाधि सुखदायक वाटली म्हणून तिला बिलगून राहूं नये. ३ स्वरूपानुभवाची एकाग्रता. ४ बळेंच, आपण होऊन. ५ फारसें, बहुधा. ६ विषयस्मरण होऊन चित्त बावरतें म्हणून. ७ आपण मुक्त आहोंत अशा अहंकारानें स्वैर होऊं नये. ८ मागचा पुढचा संबंध पाहिल्याशिवाय. ९ ग्रंथ उलगडून सांगण्याची शक्ति असल्यावांचून ग्रंथ सांगायाला लागूं नये.

स्वार्थबुद्धी जडों नये । कारबारीं पडों नये ।
कार्यकर्ते होऊं नये । राजेंद्वारीं ॥ १८ ॥
लग्नमुहूर्तीं जाऊं नये । पोटासाठीं गाऊं नये ।
मोलें कीर्तन करूं नये । कोठें तरी ॥ १९ ॥
निस्पृहें अवघेंचि करावें । परी आपण तेथें न संपडावें ।
परस्परें उभारावें । भक्तिमार्गासी ॥ २० ॥
बहु उपाधि करूं नये । उपाधीविण कामा न ये ।
सगुणभक्ति सोडूं नये । विभक्ति खोटी ॥ २१ ॥
बहु लौकिक कामा न ये । लोकाधीन होऊं नये ।
बहु साधनीं पडों न ये । साधनेविण खोटें ॥ २२ ॥
जगीं भेद कामा नये । वर्णसंकर करूं न ये ।
आपला धर्म उडऊं नये । अभिमान खोटा ॥ २३ ॥
निस्पृहें वक्तृत्व सांडों नये । आशंका घेतां भांडों नये ।
श्रोतयांचा मानों नये । वीट कदा ॥ २४ ॥
हे सिकवण धरितां चित्तीं । सकळ सुखें षोळंगती ।
अंगीं बाणे महंती । अकस्मात ॥ २५ ॥ (दास.द.१४स.१

( २ )

एकाग्र करूनियां मन । बळेंचि करावें साधन ।
यत्नीं आळसाचें दर्शन । होऊंचि नये ॥ २६ ॥
अवगुण अवघेचि सांडावे । उत्तम गुण अभ्यासावे ।
प्रबंध पाठ करीत जावे । जाड अर्थें ॥ २७ ॥
पदप्रबंध श्लोकप्रबंध । नाना धाटी मुद्रा छंद ।
प्रसंगज्ञानेंचि आनंद । होत आहे ॥ २८ ॥

---

१ राजदरबारचीं कामें अंगावर घेऊं नयेत. २ कोणत्याच कामांत अति-अभिमान म्ह० आग्रह, हट्ट करूं नये.

ज्याची जैसी उपासना । तेंचि गावें, चुकावेना ।
रागज्ञान ताळज्ञाना । अभ्यासावें ॥ २९ ॥
साहित्य संगीत प्रसंगें मानें । करावीं कथेचीं घमशानें ।
अर्थांतर श्रवणमननें । काढीत जावें ॥ ३० ॥
पाठ उदंडचि असावे । सर्व काळ उजळीत जावें ।
सांगितले गोष्टींचें असावें । स्मरण अंतरीं ॥ ३१ ॥
अखंड एकांत सेवावा । ग्रंथमात्र धांडोळावा ।
प्रचीत येईल तो घ्यावा । अर्थ मनीं ॥३२॥ (द.१८,स.३)

## ( ३ )

ऐका विरक्ताचीं लक्षणें । विरक्तें असावें कोण्या गुणें ।
जेणें अंगीं सामर्थ्य बाणे । योगियांचें ॥ ३३ ॥
जेणें परमार्थ फावे । जेणें आनंद हेलावे ।
जेणें विरक्ति दुणावे । विवेकेंसहित ॥ ३४ ॥
हीं लक्षणें श्रवण कीजे । आणि सदृढ जीवीं धरिजे ।
तरी मग विख्यात होइजे । भूमंडळीं ॥ ३५ ॥
विरक्तें विवेकें असावें । विरक्तें अध्यात्म वाढवावें ।
विरक्तें धारिष्ठ धरावें । दमनाविषयीं ॥ ३६ ॥
विरक्तें राखावें साधन । विरक्तें लावावें भजन ।
विरक्तें विशेष ब्रह्मज्ञान । प्रगटवावें ॥ ३७ ॥
विरक्तें धर्मस्थापना करावी । विरक्तें नीति अवलंबावी ।
विरक्तें क्षमा सांभाळावी । अत्यादरेंसीं ॥ ३८ ॥
विरक्तें परमार्थ उजळावा[१] । विरक्तें विचार शोधावा ।
विरक्तें सन्निध ठेवावा । सन्मार्ग सत्वगुण ॥ ३९ ॥
विरक्तें अभ्यास करावा । विरक्तें साक्षेप धरावा ।

१ स्वच्छ करावा, वाढवावा.

विरक्तें वक्तृत्वें उभारावा । मोडला परमार्थ ॥ ४० ॥
हरिकीर्तनें करावीं । निरूपणें माजवावीं ।
भक्तिमार्गें लाजवावीं । निंदक दुर्जनें ॥ ४१ ॥
बहुतांस करावा परोपकार । भलेपणाचा जीर्णोद्धार ।
पुण्यमार्गाचा विस्तार । बळेंचि करावा ॥ ४२ ॥
स्नानसंध्या जपध्यान । तीर्थयात्रा भगवद्भजन ।
नित्यनेम पवित्रपण । अंतरशुद्ध असावें ॥ ४३ ॥
दृढ निश्चयो धरावा । संसार सुखाचा करावा ।
विश्वजन उद्धरावा । संसर्गमात्रें ॥ ४४ ॥
विरक्तें असावें अंतरनिष्ठ । विरक्तें नसावें क्रियाभ्रष्ट ।
विरक्तें न व्हावें कनिष्ठ । पराधीनपणें ॥ १३ ॥
विरक्तें शास्त्रें धांडोळावीं । विरक्तें मतें विभांडावीं ।
विरक्तें मुमुक्षें लावावीं । शुद्धमार्गें ॥ १४ ॥
विरक्तें निंदक वंदावें । विरक्तें साधक बोधावे ।
विरक्तें बद्ध चेववावें । मुमुक्षुनिरूपणें ॥ १५ ॥

( दास. द. २, स. ९

---

आचारशून्य. २ परतंत्रता पत्करून कोणाचा ताबेदार होऊं नये.

## (१८) कार्यकर्त्यांच्या वतीनें रामाची प्रार्थना.

१ रामाचे जे दास असतील त्यांचें कल्याण व्हावें, त्यांना सौख्य व्हावें" त्यांचे उद्वेग दूर व्हावेत, त्यांचे शत्रु नष्ट व्हावेत व नंतर त्यांना सुखसोहळे प्राप्त व्हावेत, त्यांचें संकट (कोडें) निरसावें, त्यांच्यांत कलह नसावेत, त्यांची बुद्धि कपटकर्मांत रमूं नये, त्यांना मृत्युचिंता नसावी, त्यांना बहु-गोष्टींचें वक्तृत्व असावें, ते विजयी व्हावेत, त्यांना आपदा नसाव्यात, अशा श्रीमान् लोकहितकर्त्या कार्यकर्त्यांना रामानें तारावें अशी त्यांच्या वतीनें समर्थांनीं या श्लोकांत रामरायाची प्रार्थना केली आहे ! )

रघुनाथदासा कल्याण व्हावें
अतिसौख्य व्हावें आनंदवावें ।
उद्वेग नासो वर शत्रु नासो
नानाविलासें मग तो विलासो ॥ १ ॥
कोडें नसो रे कळहो नसो रे
कापट्य कर्मीं सहसा नसो रे ।
निर्वाणाचिंता निरसी अनंता
शरणागता दे बहु धातमाता ॥ २ ॥
अजयो न हो रे जयवंत हो रे
आपदा नको रे बहुभाग्य हो रे ।
श्रीमंतकारी जनहीतकारी
परऊपकारी हरिदास तारी ॥ ३ ॥

# ३ परमार्थ-उपासना ऊर्फ भक्तिभाव.

## (१) मंगलाचरण.

(१)

गणेश शारदा सद्गुरु । संत सज्जन कुलेश्वरु ।
सर्वही माझा रघुवीरु । सद्गुरुरूपें ॥ १ ॥
माझें आराध्यदैवत । परमगुह्य गुह्यातीत ।
गुह्यपणाचीही मात । न चले जेथें ॥ २ ॥ (पंचसमासी.)

(२)

ॐनमोजी गणनायका । सर्वसिद्धिफळदायका[1] ।
अज्ञानभ्रांतिच्छेदका । बोधरूपा[2] ॥ १ ॥
माझिये अंतरीं भरावें । सर्वकाळ वास्तव्य करावें ।
मज वाक्शून्यास वदवावें । कृपाकटाक्षेंकरूनी ॥ २ ॥
तुझिये कृपेचेनि बळें । वितुळतीं भ्रांतीचीं[3] पडळें ।
आणि विश्वभक्षकें काळें । दास्यत्व कीजे ॥ ३ ॥
वंदूनियां मंगळनिधि । कार्य करितां सर्वसिद्धि ।
आघात अडथळे उपाधि । बाधूं सकेना ॥ ४ ॥
ऐसा गणेश मंगळमूर्ति । तो म्यां स्तविला यथामति ।
वांछा धरूनि चित्तीं । परमार्थाची ॥ ५ ॥
ध्यान गणेशाचें वर्णितां । मतिप्रकाश होय भ्रांता ।
गुणानुवाद श्रवण करितां । वोळे सरस्वती ॥६॥ (द.१,स.२).

---

१ अष्ट महासिद्धि व दश उपसिद्धि. (एकनाथी भागवत, अ. १५ पहा.).
२ ज्ञानस्वरूपा. ३ देहबुद्धीचे ढग.

( ३ )

आतां वंदीन वेदमाता । श्रीशारदा ब्रह्मसुता ।
शब्दमूळ वाग्देवता । महामाया ॥ ७ ॥
जे उठवी शब्दांकुर । वदे वैखरी अपार ।
जे शब्दाचें अभ्यंतर । उकलून दावी ॥ ८ ॥
जे सर्व नाटक-अंतर्कळा । जाणीव स्फूर्ति निर्मळा ।
जयेचेनि स्वानंदसोहळा । ज्ञानशक्ती ॥ ९ ॥
ऐसी बहुवेषें नटली । माया शारदा येकली ।
सिद्धाचि अंतरीं संचली । चतुर्विधा प्रकारें ॥ १० ॥
तिहीं वाचा अंतरीं आलें । तें वैखरिया प्रगट केलें ।
म्हणोन कर्तृत्व जितुकें जालें । तें शारदागुणें ॥ ११ ॥
जे ब्रह्मादिकांची जननी । हरिहर जयेपासुनी ।
सृष्टिरचना लोक तिन्ही । विस्तार जयेचा ॥ १२ ॥
जें जें दृष्टीनें देखिलें । जें जें शब्दें बोळाखिलें ।
जें जें मनास भासलें । तितुकें रूप जयेचें ॥ १३ ॥
म्हणोनि थोराहून थोर । जे ईश्वराचा ईश्वर ।
तयेसी माझा नमस्कार । तदंशेंचि आतां ॥ १४ ॥ (द. १, स. ३)

---

१ ब्रह्माच्या ठिकाणीं 'एकोहं बहु स्याम्' अशी जी मूलस्फूर्ति झाली तिलाच मूळमाया, मुळपुरुष, परमेश्वर म्हणतात. ती द्विप्रकार आहे. वायु व जाणीव मिळून मूळमाया (दास. १०–९) जाणीवेचा अंश तो गणेश व वायु ती शारदा. गणेश तोच शिव, पुरुष व शारदा ती शक्ति, प्रकृति. २ व्यापारचेष्टांची प्रेरकशक्ति. ३ परा, पश्यन्ती, मध्यमा, वैखरी या चार वाणी. नाभिस्थानीं जी प्रथम स्फुरण पावते ती परा, तीच हृदयस्थानीं ध्वनिरूपता पावली कीं पश्यन्ती, कंठीं येऊन नादरूप झाली कीं मध्यमा व जिव्हेवर येऊन उद्गार पावली कीं तिलाच वैखरी म्हणतात. ब्रह्म परा-वाणीच्या पलीकडे आहे. (दास. द. १७, स. ८) ४ कर्तृत्व सारें शारदेचें म्ह. वायूचें, प्रकृतीचें. दृश्यभास तिचा. ५ वेगळेपणानें न राहतां, अभेदभावानें

## (४)

आतां सद्गुरु वर्णवेना । जेथें माया स्पर्शों सकेना ।
तें स्वरूप[1] मज अज्ञाना । काय कळे ? ॥ १५ ॥
न कळे न कळे नेति नेति । ऐसें बोलतसे श्रुति ।
तेथें मज मूर्खाची मति । पवांडेल[2] कोठें ॥ १६ ॥
होती स्तवनाची दुराशा । तुटला मायेचा भर्वसा ।
आतां असाल तैसे असा । सद्गुरु स्वामी ॥ १७ ॥
मायेच्या बळें करीन स्तवन । ऐसें वांछित होतें मन ।
ते माया जाली लज्यायमान[3] । काय करूं ? ॥ १८ ॥
जयजयाजी सद्गुरुराजा । विश्वंभरा विश्वबीजा ।
परमपुरुषा मोक्षध्वजा । दीनबंधु ॥ १९ ॥
स्वर्गलोक इंद्रसंपत्ती । हे काळांतरीं विटंबती ।
सद्गुरुकृपेची प्राप्ती । काळांतरीं चळेना ॥ २० ॥
हरिहरब्रह्मादिक । नाश पावती सकाळिक ।
सर्वदा अविनाश येक । सद्गुरुपद ॥ २१ ॥ (द. १, स. ४)

## (५)

आतां वंदीन संतसज्जन । जे परमार्थाचें अधिष्ठान[4] ।
जयाचेनि गुह्य ज्ञान । प्रगटे जनीं ॥ २२ ॥
जे वस्तु[5] परम दुल्लभ । जयेचा अलभ्य लाभ ।
तेचि होय सुलभ । संतसंगेंकरूनी ॥ २३ ॥
जेथें आक्षेप आटले । जेथें प्रेत्न प्रस्तावले[6] ।

---

१ शुद्ध परब्रह्म. २ शिरकेल, प्रवेश करील. ३ मायेचा आश्रय करून तुमची स्तुति करीन अशी वेडी आशा होती; पण तुमचें नांव घेतांच तिनें तोंड लपविलें ! आतां स्तुति कशी करू ? ४ मुख्य आधार. ५ परमात्मवस्तु. ६ पस्तावले, पश्चात्ताप पावले.

जेथें तर्क मंदावले । तर्किता निजवस्तूसी ॥ २४ ॥
वेळे विवेकाची वेंगडी । पडे शब्दाची बोबडी ।
जेथें मनाची तांतडी । कामा न ये सर्वथा ॥ २५ ॥
तेचि वस्तु संतसंगें । स्वानुभवें कळों लागे ।
त्यांचा महिमा वचनीं सांगे । ऐसा कवणु ? ॥ २६ ॥
संत आनंदाचें स्थळ । संत सुखाचि केवळ ।
नाना संतोषाचें मूळ । ते हे संत ॥ २७ ॥
संत धर्माचें धर्मक्षेत्र । संत स्वरूपाचें सत्पात्र ।
नातरी पुण्याची पवित्र । पुण्यभूमी ॥ २८ ॥
मोक्षश्रिया अळंकृत । ऐसे हे संत श्रीमंत ।
जीव दरिद्री असंख्यात । नृपति केले ॥ २९ ॥
जें त्रैलोकीं नाहीं दान । ते करिती संतसज्जन ।
तया संतांचें महिमान । काय म्हणोनि वर्णावें॥३०॥(द.१,स.५)

## (२) नरदेहाचें महत्व व सार्थक

### (१)

धन्य धन्य हा नरदेहो । येथील अपूर्वता पांहो ।
जो जो कीजे परमार्थलाहो । तो तो पावे सिद्धीतें ॥ १ ॥
या नरदेहाचेनि लागवेगें । येक लागले भक्तिसंगें ।
येकीं परमवीतरागें । गिरिकंदरें सेविलीं ॥ २ ॥
येक फिरती तीर्थाटणें । येक करिती पुरश्चरणें ।

---

१ विवेकाचें बळ चालत नाहीं, शब्द मौनावतात, मन पांगुळ होतें, अशी वस्तु सत्संगांतच आकळते. २ मोक्षलक्ष्मीचे अलंकार म्ह. मुक्ततेचे गुण त्यांच्या अंगावर असतात, ते जन्ममृत्यूचें दारिद्र्य भोगणाऱ्या अनेक जीवांना स्वानंदसाम्राज्यपदावर बसवितात. ३ आत्मदान. ४ पहा हो. ५ लाभ, लालसा. ६ संबंधानें. ७ अत्यंत वैराग्यसंपन्न होऊन.

येक अखंड नामस्मरणें । निष्ठावंत राहिले ॥ ३ ॥
नाना हटनिग्रेही कृतबुद्धि । नयांस बोळल्या नानासिद्धि ।
ऐसे सिद्ध लक्षावधि । होऊन गेले ॥ ४ ॥
येक मनोसिद्ध येक वाचासिद्ध । येक अल्पसिद्ध येक सर्वसिद्ध ।
ऐसे नानाप्रकारचे सिद्ध । विख्यात जाले ॥ ५ ॥
येक नवविधाभक्तिराजपंथें । गेले तरले परलोकींच्या निजस्वार्थें
येक योगी गुप्तपंथें । ब्रह्मभुवना पावले ॥ ६ ॥
ऐसे सिद्ध साधुसंत । स्वहिता प्रवर्तले अनंत ।
ऐसा हा नरदेह विख्यात । काय म्हणोनी वर्णावा ? ॥ ७ ॥
या नरदेहाचेनि आधारें । नाना साधनांचेनि द्वारें ।
मुख्य सारासारविचारें । बहुत सुटले ॥ ८ ॥
या नरदेहाचेनि संबंधें । बहुत पावले उत्तम पदें ।
अहंता सांडून स्वानंदें । सुखी जाले ॥ ९ ॥
संत महंत ऋषि मुनी । सिद्ध साधु समाधानी ।
भक्त मुक्त ब्रह्मज्ञानी । नरदेहींच जाले ॥ १० ॥
म्हणोनियां नरदेह श्रेष्ठ । नाना देहांमध्यें वरिष्ठ ।
जयाचेनि चुके अरिष्ट । यमयातनेचें ॥ ११ ॥
नरदेह हा स्वाधीन । सहसा नव्हे पराधीन ।
परंतु हा परोपकारीं झिजऊन । कीर्तिरूपें उरवावा ॥ १२ ॥

(२)

नरदेह पांगुळ असता । तरी तो कार्यास न येता ।
अथवा थोटा जरी असता । तरी परोपकारास नये ॥ १३ ॥
नरदेह अंध असिला । तरी तो निपटाचि वायां गेला ।

१ बळेंच इंद्रियनिग्रह करून राहणारे, हटयोगी (राजयोगी) विवेकानें बंधमुक्त होतात. २ पूर्णपणें.

अथवा बधिर जरी असला । तरी निरूपणें नाहीं ॥ १४ ॥
ऐसें हें नस्ता व्यंग । नरदेही आणि सकळ सांग ।
तेणें धरावा परमार्थमार्ग । लागवेगें ॥ १५ ॥
सांग नरदेह जोडलें । आणि परमार्थबुद्धि विसरले ।
ते मूर्ख कैसे भ्रमले । मायाजाळीं ॥ १६ ॥

( ३ )

मृत्तिका खणोनि घर केलें । तें माझें ऐसें दृढ कल्पिलें ।
परी तें बहुतांचें हें कळलें । नाहींच तया ॥ १७ ॥
मूषक म्हणती घर आमुचें । पाली म्हणती घर आमुचें ।
मक्षिका म्हणती घर आमुचें । निश्चयेंसी ॥ १८ ॥
मार्जारें म्हणती आमुचें घर । श्वानें म्हणती आमुचें घर ।
मुंगुसें म्हणती आमुचें घर । निश्चयेंसी ॥ १९ ॥
पशु म्हणती आमुचें घर । दासी म्हणती आमुचें घर ।
घरचीं म्हणती आमुचें घर । निश्चयेंसीं ॥ २० ॥
तस्कर म्हणती आमुचें घर । राजकी म्हणती आमुचें घर ।
अग्नि म्हणे आमुचें घर । भस्म करूं ॥ २१ ॥
समस्त म्हणती घर माझें । हें मूर्खही म्हणे घर माझें ।
सेवट जड झालें वोझें । टाकिला देश ॥ २२ ॥
ऐसें शरीर बहुतांचें । मूर्ख म्हणे आमुचें ।
परंतु खाजें जीवाचें । तापत्रयीं[2] बोलिलें ॥ २३ ॥
देह परमार्थी लाविलें । तरींच याचें सार्थक जालें ।
नाहीं तरी व्यर्थचि गेलें । नाना आघातें मृत्युपंथें ॥ २४ ॥

(दास. द. १, स. १०)

१ श्रवण. २ तापत्रयविवरणप्रसंगीं (दास. द. ३, स. ६।७।८).

( ४ )

इहलोक आणि परलोकें । देहाकारितां सकळ सार्थक ।
देहेंवीण निरर्थक । सकळ कांहीं ॥ २५ ॥
नाना सन्मार्ग साधनें । देहाकारितां तुटती बंधनें ।
देहाकरितां निवेदनें । मोक्ष लाभे ॥ २६ ॥
देह सकळांमध्यें उत्तेमु । देहीं राहिला आत्मारामु ।
सकळांघटीं पुरुषोत्तमु । विवेकी जाणती ॥२७॥ (द.१८,स.४)

( ५ )

नाना सुकृताचें फळ । तो हा नरदेह केवळ ।
त्याहीमध्यें भाग्य सफळ । तरीच सन्मार्ग लागे ॥ २८ ॥
नरदेहीं विशेष ब्राह्मण । त्याहीवरी संध्यास्नान ।
सद्वासना भगवद्भजन । घडे पूर्वपुण्यें ॥ २९ ॥
भगवद्भक्ति हे उत्तम । त्याहीवरी सत्समागम ।
काळ सार्थक हाचि परम । लाभ जाणावा ॥ ३० ॥
प्रेमप्रीतीचा सद्भाव । आणि भक्तांचा समुदाव ।
हरिकथा महोत्साव । तेणें प्रेमा दुणांवे ॥ ३१ ॥
नरदेहीं आलिया येक । कांहीं करावें सार्थक ।
जेणें पाविजे परलोक । परम दुल्लभ जो ॥ ३२ ॥
विधियुक्त ब्रह्मकर्म । अथवा दया दानधर्म ।
अथवा करणें सुगम । भजन भगवंताचें ॥ ३३ ॥
नाना शास्त्रें धांडोळावीं । अथवा तीर्थें तरी करावीं ।
अथवा पुरश्चरणें बरवीं । पापक्षयाकारणें ॥ ३४ ॥
अथवा कीजे परोपकार । अथवा ज्ञानाचा विचार ।
निरूपणीं सारासार । विवेक करणें ॥ ३५ ॥

---

१ प्रपंच आणि परमार्थ नरदेहाच्या आधारानेंच साधतात. २ पुरुषोत्तम.
३ दुप्पट होतो.

काया वाचा आणि मनें । पत्रें पुष्पें फळें जीवनें ।
कांहीं तरी येका भजनें । सार्थक करावें ॥ ३६ ॥
नरदेहाचें उचित । कांहीं करावें आत्महित ।
यथानुशक्त्या चित्तवित्त । सर्वोत्तमीं लावावें ॥३७॥(द.२स.४)

( ६ )

संसार म्हणिजे महापूर[1] । माजी जळचरें अपार ।
डंखूं धांवती विखार[2] । काळसर्प ॥ ३८ ॥
बहुतेक आवर्तीं[3] पाडिले । प्राणी वाहतचि गेले ।
जेहीं भगवंतासी बोंभाइले[4] । भावार्थबळें ॥ ३९ ॥
देव आपण घालूनि उडी । तयांसी नेलें पैलथडी[5] ।
येर ते अभाविकें बापुडीं । वाहाताचि गेलीं ॥ ४० ॥
भगवंत भावाचा भुकेला । भावार्थ देखोन भुलला ।
संकटीं पावे भाविकाला । राक्षितसे ॥ ४१ ॥
जयास भगवंत आवडे । तयाचें देवासीं सांकडें[6] ।
संसारदुःख सकळ उडे । निजदासाचें ॥ ४२ ॥
जे अंकित ईश्वराचे । तयांस सोहळे निजसुखाचे ।
धन्य तेचि देवाचे । भाविक जन ॥ ४३ ॥
जैसा भाव जयापासीं । तैसा देव तयासी ।
जाणे भाव अंतरसाक्षी । प्राणिमात्रांचा ॥ ४४ ॥
जरी भाव असिला मायिक[7] । तरी देव होय महाठक ।
नवल तयाचें कौतुक । जैशास तैसा ॥ ४५ ॥

---

१ 'दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया' (गीता, अ. ७) २ विषारी. ३ मायानदीच्या भोंवऱ्यांत. ४ धांवा करून बोलावलें, हांका मारल्या. ५ भवनदीच्या परतीरास. 'हाकेसरसी उडी। घालोनीया स्तंभ फोडी।। ऐसी कृपावंत कोण। माझे विठाईवांचून।।' (तुकाराम) ६ संकट. ७ वरपंग, खोटा.

दर्पणीं प्रतिबिंब दिसे । जैशास तैसें भासे ।
तयाचें सूत्र असे । आपणाचपासीं ॥ ४६ ॥
भावें परमार्थाचिया वाटा । वाहती भक्तीचिया पेठा[1] ।
भरला मोक्षाचा चोहटा । सज्जनसंग ॥ ४७ ॥
धन्य तयांची जननी । जे लागले हरिभजनीं ।
तेहींच येक जन्म जनीं । सार्थक केला ॥ ४८ ॥
आपण स्वयें तरले । जनांसही उपेगा आले ।
कीर्तिश्रवणें जाले । अभक्त भावार्थी ॥ ४९ ॥
आयुष्य हेचि रत्नपेटी । माजी भजनरत्नें गोमटीं ।
ईश्वरीं अर्पुनिया लुटी । आनंदाचा करावी ॥ ५० ॥
हरिभक्त वैभवें कनिष्ठ । परी तो ब्रह्मादिकां वरिष्ठ ।
सदा सर्वदा संतुष्ट । नैराश्य[2]बोधें ॥ ५१ ॥
धरूनि ईश्वराची कास । केली संसाराची निरास ।
तया भाविका जगदीश । सबाह्य सांभाळी ॥ ५२ ॥
जयांचा ईश्वरीं जिव्हाळा[3] । ते भोगिती स्वानंद-सोहळा ।
जयांचा जनावेगळा । ठेवा अक्षयी[4] ॥ ५३ ॥
अवचटें[5] निधान जोडलें । तें कवडीच्याबदल नेलें ।
तैसें आयुष्य निघोन गेलें । अभाविकांचें ॥ ५४ ॥

---

१ भावानें परमार्थमार्गाला आपण लागलों कीं, सारे मार्ग भक्तीच्या थोरल्या पेठेंतच नेऊन सोडतात हें कळतें व आपण सत्संगतीनें नेमके मोक्षाच्या चौकांत जाऊन पोंचतों. भाव म्ह. आस्तिक्यबुद्धि, देव आहे हा विश्वास; व भक्ति म्ह. देवाशीं मिळून जाणें. २ आशा ही दुःखमूल आहे व नैराश्य म्ह. त्रैलोक्यांतल्या कोणत्याच पदार्थाची वासना नसणें, आत्मतृप्त असणें. नैराश्य वैराग्य-ज्ञान-मोक्ष असा, हा मोक्षसोपान आहे. ३ अंतरंग प्रेमभक्ति. ४ अक्षय्य ठेवा, परमात्मसुख हें सर्वांच्या प्रारब्धांत कोठून असणार? ५ अकस्मात्.

या नरदेहाचेनि लागवेगें । सार्थक करावें संतसंगें ।
नीच योनि दुःख मागें । बहुत भोगिलें ॥ ५५ ॥
कैंचें घर कैंचा संसार । कासया करिसी जोजार ।
जन्मवरी वाहोन भार । सेखीं सांडून जासी ॥ ५६ ॥
तुवां भोगिल्या पुनरावृत्ती । ऐसीं मायबापें किती ।
स्त्रीकन्यापुत्र होती । लक्षानुलक्ष ॥ ५७ ॥
कर्मयोगें सकळ मिळालीं । येके स्थळीं जन्मास आलीं ।
ते तुवां आपलीं मानिलीं । कैसी रे पढतमूर्खा ॥ ५८ ॥
येका [1]दुंभराकारणें । नाना नीचांची सेवा करणें ।
नाना स्तुति आणि स्तवनें । मर्यादा धरावी ॥ ५९ ॥
जो अन्न देतो उदरासी । शरीर विकावें लागे त्यासी ।
मा जेणें घातलें जन्मासी । त्यासी कैसें विसरावें ? ॥ ६० ॥
अहर्निशीं ज्या भगवंता । सकळ जीवांची लागली चिंता ।
मेघ वर्षे जयाची सत्ता । सिंधु मर्यादा धरी ॥ ६१ ॥
भूमि धरिली धराधरें । प्रगट होइजे दिनकरें ।
ऐसी सृष्टि सत्तामात्रें । चालवी जो का ॥ ६२ ॥
ऐसा कृपाळु देवाधिदेव । नेणवे जयाचें लाघव ।
जो सांभाळी सकळ जीव । कृपाळूपणें ॥ ६३ ॥
सांडून राम आनंदघन । ज्याचे मनीं विषयचिंतन ।
त्यासी कैचें समाधान । [2]लोलंगतासी ॥ ६४ ॥
विषयजनित जें जें सुख । तेथेंचि होतें परम दुःख ।
पूर्वीं गोड अंतीं शोक । नेमस्त आहे ॥ ६५ ॥
ऐकोनि बोले भाविक । कैसेनि घडे जी सार्थक ।
सांगा स्वामी यमलोक । चुके जेणें ॥ ६६ ॥

१ पोट, कधीं न भरणारें, मिळेल तें थोडेंच असें वाटणारें. २ विषयलंपटास.

कैसें करावें भगवद्भजन । कोठें ठेवावें हें मन ।
भगवद्भजनाचें लक्षण । मज निरूपावें ॥६७॥ (द.३, स.१०)

## (३) नवविधा भक्ति.

श्रोतेन पुसिलें बरवें । भगवद्भजन कैसें करावें ।
म्हणोनी बोलिलें स्वभावें । ग्रंथांतरीं ॥ १ ॥
श्रवणं कीर्तनं विष्णोः स्मरणं पादसेवनं ।
अर्चनं वंदनं दास्यं सख्यमात्मनिवेदनम् ॥ ( भा.स्कं.७,अ.५ )
श्रवण कीर्तन विष्णोःस्मरण । पादसेवन अर्चन वंदन ।
दास्य सख्य आत्मनिवेदन । ऐसें हें नवविधा ॥ २ ॥
नवविधा भजन बोलिलें । तेंचि पुढें प्रांजळ केलें ।
श्रोतीं अवधान दिधलें । पाहिजे आतां ॥ ३ ॥

### १ श्रवणभक्ति

प्रथम भजन ऐसें जाण । हरिकथा पुराणश्रवण ।
नाना अध्यात्मनिरूपण । ऐकत जावें ॥ ४ ॥
कर्ममार्ग उपासनामार्ग । ज्ञानमार्ग सिद्धांतमार्ग ।
योगमार्ग वैराग्यमार्ग । ऐकत जावे ॥ ५ ॥
नाना व्रतांचे महिमे । नाना तीर्थांचे महिमे ।
नाना दानांचे महिमे । ऐकत जावे ॥ ६ ॥
जपी तपी तापस योगी । नाना निग्रही हठयोगी ।
शाक्त आगम अघोरयोगी । कैसे ते ऐकावे ॥ ७ ॥
नाना मुद्रा नाना आसनें । नाना देखणीं लक्ष्यस्थानें ।
पिंडज्ञानें तत्वज्ञानें । कैसीं ते ऐकावीं ॥ ८ ॥
नाना पिंडांची रचना । नाना भूगोळरचना ।
नाना सृष्टीची रचना । ऐकत जावी ॥ ९ ॥

१ हें पुढें नवविधाभक्तिरूपानें सांगितलें आहे.

चंद्रसूर्य तारामंडळें । ग्रहमंडळें मेघमंडळें ।
येकवीस स्वर्ग सप्त पातळें । कैसीं तें ऐकावीं ॥ १० ॥
चौदा विद्या चौसष्टी कळा । सामुद्रिक लक्षणें सकळ कळा ।
बत्तीस लक्षणें नाना कळा । कैशा त्या ऐकाव्या ॥ ११ ॥
मंत्र मोहरे तोटके सिद्धी । नाना वल्ली नाना औषधी ।
धातुरसायन बुद्धी । नाडिज्ञानें ऐकावीं ॥ १२ ॥
पिंडब्रह्मांडाची रचना । नाना तत्वाविवंचना ।
सारासारविचारणा । कैसी ते ऐकावी ॥ १३ ॥
कैशी नवविधा भक्ति । कैशा चतुर्विधा मुक्ति ।
कैसी पाविजे उत्तम गति । कैसें तें ऐकावें ॥ १४ ॥
वेद शास्त्रें आणि पुराणें । महावाक्यांचीं[1] विवरणें ।
तनुचतुष्टयनिरसनें[2] । कैसीं तें ऐकावीं ॥ १५ ॥
जयंत्या उपोषणें पूजाविधानें । मंत्रयंत्रजपध्यानें ।
कीर्ति स्तुति स्तवनें भजनें । नानाविधें ऐकावीं ॥ १६ ॥
ऐसें हें अवघेंचि ऐकावें । परंतु सार शोधूनि घ्यावें ।
असार तें जाणोनि त्यागावें । या नांव श्रवणभक्ती ॥१६॥
सगुणाचीं चरित्रें ऐकावीं । का तें निर्गुणअध्यात्में शोधावीं ।
श्रवणभक्तीचीं जाणावीं । लक्षणें ऐसीं ॥ १८ ॥
ऐसें श्रवण सगुणाचें । अध्यात्मनिरूपण निर्गुणाचें ।
विभक्ति सांडूनि भक्तीचें । मूळ शोधावें ॥१९॥ (द. ४ स.१).

## २ कीर्तनभक्ति

श्रोतीं भगवद्भजन पुसिलें । तें नवविधा प्रकारें बोलिलें ।

---

१ वेदांचीं सारभूत वाक्यें. हीं चार वेदांचीं चार आहेत. 'प्रज्ञानं ब्रह्म' (ऋग्वेद) 'अहं ब्रह्मास्मि' (यजुर्वेद), 'तत्वमसि' (सामवेद) व 'अयमात्मा ब्रह्म' (अथर्ववेद). २ स्थूल, सूक्ष्म, कारण व महाकारण हे चार देह. हे देह मी नसून मी चौदेहांवेगळा आत्माराम आहे असें जाणणें हें त्यांचें निरसन

त्यांत प्रथम श्रवण निरोपिलें । दुसरें कीर्तन ऐका ॥ २० ॥
बहुत करावें पाठांतर । कंठीं धरावें ग्रंथांतर ।
भगवत्कथा निरंतर । करीत जावी ॥ २१ ॥
आपुलिया सुखस्वार्थां[1] । केलीच करावी हरिकथा ।
हरिकथेवीण सर्वथा । राहोंचि नये ॥ २२ ॥
नित्य नवा हव्यास[2] धरावा । साक्षेप अत्यंताचि करावा ।
हरिकीर्तनें भरावा । ब्रह्मगोळ[3] अवघा ॥ २३ ॥
मनापासून आवडी । जीवापासून अत्यंत गोडी ।
सदासर्वदा तांतडी । हरिकीर्तनाची ॥ २४ ॥
भगवंतास कीर्तन प्रिय । कीर्तनें समाधान होय ।
बहुत जनांसी उपाय । हरिकीर्तनें कलियुगीं ॥ २५ ॥
विविधें[4] विचित्रें ध्यानें । वर्णावीं अलंकार-भूषणें ।
ध्यानमूर्ति अंतःकरणें । लक्षून कथा करावी ॥ २६ ॥
यशकीर्तिप्रतापमहिमा । आवडीं वर्णावा परमात्मा ।
जेणें भगवद्भक्तांचा आत्मा । संतुष्ट होय ॥ २७ ॥
करुणाकीर्तनाच्या लोटें । कथा करावी घडघडाटें ।
श्रोतयांचीं श्रवणपुटें । आनंदें भरावीं ॥ २८ ॥
कंप रोमांच स्फुरणें । प्रेमाश्रुसहित गाणें ।
देवद्वारीं लोटांगणें । नमस्कार घालावे ॥ २९ ॥
भक्तिज्ञानवैराग्यलक्षण । नीतिन्यायस्वधर्मरक्षण ।
साधनमार्ग अध्यात्मनिरूपण । प्रांजळ बोलावें ॥ ३० ॥
प्रसंगें हरिकथा करावी । सगुणीं सगुणकीर्ति धरावी ।
निर्गुणप्रसंगें वाढवावी । अध्यात्मविद्या ॥ ३१ ॥

---

१ स्वानंदासाठींच कीर्तन करावें. २ उत्साह. ३ ब्रह्मांड. ४ नानाप्रकारचीं.

पूर्वपक्ष[1] त्यागून सिद्धांत । निरूपण करावें नेमस्त ।
बहुधा बोलणें अव्यवस्थ । बोलोंचि नये ॥ ३२ ॥
ब्राह्मण्य रक्षावें आदरें । उपासनेचीं भजनद्वारें ।
गुरुपरंपरा निर्धारें । चळोंच नेदावी ॥ ३३ ॥
कीर्तन ऐकतां संदेह पडे । सत्य समाधान तें उडे ।
नीतिन्यायसाधन मोडे । ऐसें न बोलावें ॥ ३४ ॥
सगुणहरिकथा या नांव कीर्तन । अद्वैत म्हणिजे निरूपण ।
सगुण रक्षून निर्गुण । बोलत जावें ॥ ३५ ॥
असो वक्तृत्वाचा अधिकार । अल्पास न घडे प्रत्योत्तर ।
वक्ता पाहिजे साचार । अनुभवाचा ॥ ३६ ॥
सकळ रक्षून ज्ञान सांगे । जेणें वेदाज्ञा न भंगे ।
उत्तम सन्मार्ग लागे । प्राणिमात्रांसी ॥ ३७ ॥
असो हें सकळ सांडून । करावें गुणानुवादकीर्तन ।
या नांव भगवद्भजन । दुसरी भक्ती ॥ ३८ ॥
कीर्तनें अव्यग्रता घडे । कीर्तनें निश्चय सांपडे ।
कीर्तनें संदेह उडे । श्रोतयावक्तयांचा ॥ ३९ ॥
म्हणोनी कीर्तनाचा अगाध महिमा । कीर्तनें संतोषे परमात्मा ।
सकळ तीर्थें आणि जगदात्मा । कीर्तनीं वसे ॥ ४० ॥ (द. ४ स. २)

### ३ नामस्मरणभक्ति.

मागां निरोपिलें कीर्तन । जें सकळांसी करी पावन ।
आतां ऐका विष्णोःस्मरण । तिसरी भक्ती ॥ ४१ ॥
स्मरण देवाचें करावें । अखंड नाम जपत जावें ।
नामस्मरणें पावावें । समाधान ॥ ४२ ॥
नित्यनेम प्रातःकाळीं । माध्यान्हकाळीं सायंकाळीं ।

[1] कीर्तनांत सदा मायेचा पूर्वपक्ष खंडावा व ब्रह्माचा सिद्धांत मांडावा.

नामस्मरण सर्वकाळीं । करीत जावें ।। ४३ ।।
चालतां बोलतां धंदा करितां । खातां जेवितां सुखी होतां ।
नाना उपभोग भोगितां । नाम विसरों नये ।। ४४ ।।
हर्षकाळीं विषमकाळीं । पर्वकाळीं प्रस्तावकाळीं ।
विश्रांतिकाळीं निद्राकाळीं । नामस्मरण करावें ।। ४५ ।।
संपत्ति अथवा विपत्ति । जैसी पडेल काळगति ।
नामस्मरणाची स्थिति । सांडूंच नये ।। ४६ ।।
बाळपणीं तारुण्यकाळीं । कठिणकाळीं वृद्धापकाळीं ।
सर्वकाळीं अंतकाळीं । नामस्मरण करावें ।। ४७ ।।
नामें संकटें नासतीं । नामें विघ्नें निवारतीं ।
नामस्मरणें पाविजेती । उत्तम पदें ।। ४८ ।।
सहस्रनामांमध्यें कोणी येक । म्हणतां होतसे सार्थक ।
नाम स्मरतां पुण्यश्लोक । होइजे स्वयें ।। ४९ ।।
चहूं वर्णां नामाधिकार । नामीं नाहीं लहानथोर ।
जडमूढ पैलपार । पावती नामें ।। ५० ।।
म्हणोनी नाम अखंड स्मरावें । रूप मनीं आठवावें ।
तिसरी भक्ति स्वभावें । निरोपिली ।। ५१ ।। ( द.४,स.३ )

### ४ पादसेवनभक्ति[१]

मागां जालें निरूपण । नामस्मरणाचें लक्षण ।
आतां ऐका पादसेवन । चौथी भक्ती ।। ५२ ।।
पादसेवन तेंचि जाणावें । कायावाचामनोभावें ।
सद्गुरूचे पाय सेवावे । सद्गतीकारणें ।। ५३ ।।
सद्वस्तु दाखवी सद्गुरु । सकळ सारासारविचारु ।
परब्रह्माचा निर्धारु । अंतरीं बाणे ।। ५४ ।।

१ मोक्षासाठीं सद्गुरुचरण सेवावे हीच पादसेवन भक्ति.

संगत्याग आणि निवेदन । विदेहस्थिति अलिप्तपण ।
सहजस्थिति उन्मनी विज्ञान । हे सप्तही एकरूप ॥ ५५ ॥
याहीवेगळीं नामाभिधानें । समाधानाचीं संकेतवचनें ।
सकळ काहीं पादसेवनें । उमजों लागे ॥ ५६ ॥
बहुधा अनुभवाचीं अंगें । सकळ कळतीं संतसंगें ।
चौथे भक्तीचे प्रसंगें । गौप्य तें प्रगटे ॥ ५७ ॥
सद्गुरूवीण कांहीं । भवतरणोपाय नाहीं ।
या कारणें लवलाहीं । सद्गुरुपाय सेवावे ॥५८॥(द.४,स.४)

## ५ अर्चनभक्ति

पांचवी भक्ती तें अर्चन । अर्चन म्हणिजे देवतार्चन ।
शास्त्रोक्त पूजाविधान । केलें पाहिजे ॥ ५९ ॥
नाना आसनें उपकरणें । वस्त्रें अलंकार-भूषणें ।
मानसपूजा मूर्तिध्यानें । या नांव पांचवी भक्ति ॥ ६० ॥
देवब्राह्मणअग्निपूजन । साधुसंतअतीतपूजन ।
यतिमहानुभावगायत्रीपूजन । या नांव पांचवी भक्ती ॥६१॥
धातुपाषाणमृत्तिकापूजन । चित्रलेपसत्पात्रेंपूजन ।
आपुले गृहींचें देवतार्चन । या नांव पांचवी भक्ती ॥ ६२ ॥
गणेशशारदा विठ्ठलमूर्ति । रंगनाथ जगन्नाथ तांडवमूर्ति ।
श्रीरंग हनुमंत गरुडमूर्ति । देवतार्चनीं पूजाव्या ॥ ६३ ॥
ऐशा परमेश्वराच्या मूर्ति । पाहों जातां उदंड असती ।
त्याचें अर्चन करावें भक्ति । पांचवी ऐसी ॥ ६४ ॥
नाना तीर्थक्षेत्रांस जावें । तेथें त्या देवाचें पूजन करावें ।

---

१ संगत्याग इ. समाधानाच्या खुणा गुरुचरणसेवनानें कळूं लागतात. २ परब्रह्म उघडें होतें. ३ त्वरेनें. ४ पूजा शास्त्रोक्त मंत्रांनीं यथाविधि करावी. ५ सर्व देवांस पूजावें. ६ कुळदेवता. ७ पुष्कळ.

नाना उपचारीं अर्चावें । परमेश्वरासी ॥ ६५ ॥
याहीवेगळे कुळधर्म । सोडूं नये अनुक्रम ।
उत्तम अथवा मध्यम । करीत जावें ॥ ६६ ॥
नाना खाद्य नैवेद्य सुंदर । नाना फळें तांबूलप्रकार ।
दक्षिणा नाना अळंकार । दिव्यांबरें वनमाळा ।
काया वाचा आणि मनें । चित्तें वित्तें जीवें प्राणें ।
सद्भावें भगवंत अर्चणें । या नांव अर्चनभक्ति ॥ ६८ ॥
ऐसी पूजा न घडे बरवी । तरी मानसपूजा करावी ।
मानसपूजा अगत्य व्हावी । परमेश्वरासी ॥ ६९ ॥
जें जें आपणास पाहिजे । तें तें कल्पून वाहिजे ।
येणें प्रकारें कीजे । मानसपूजा ॥ ७० ॥ (द.४,स.५).

### ६ वंदनभक्ति.

साहवी भक्ती ते वंदन । करावें देवासी नमन ।
संत साधु आणि सज्जन । नमस्कारीत जावे ॥ ७१ ॥
पशुपति श्रीपति आणि गभस्ति । यांच्या दर्शनें दोष जाती ।
तैसाचि नमावा मारुती । नित्यनेमें विशेष ॥ ७२ ॥
भक्त ज्ञानी आणि वीतरागी । महानुभाव तापसी योगी ।
सत्पात्रें देखोनि वेगीं । नमस्कार करावे ॥ ७३ ॥
वेदज्ञ शास्त्रज्ञ आणि सर्वज्ञ । पंडित पुराणिक आणि विद्वज्जन ।
याज्ञिक वैदिक पवित्र जन । नमस्कारीत जावे ॥ ७४ ॥
जेथें दिसती विशेष गुण । तें सद्गुरूचें अधिष्ठान ।
या कारणें तयासी नमन । अत्यादरें करावें ॥ ७५ ॥
सीसापरता नाहीं दंड । ऐसें बोलती उदंड ।

१ कुळदेव, कुळधर्म, कुळपरंपरा सोडूं नये, यथाक्रम सर्व सांभाळावेत. २ अतिप्रिय आहे. ३ शिव, विष्णु व सूर्य. ४ शीर्ष म्ह. मस्तक लववण्यापेक्षां.

या कारणें अखंड । वेदभक्त वंदावे ॥ ७६ ॥
नमस्कारें कृपा उचंबळे । नमस्कारें प्रसन्नता प्रबळे ।
नमस्कारें गुरुदेव वोळे[1] । साधकांवरी ॥ ७७ ॥
साधक भावें नमस्कार घाली । त्याची चिंता साधूस लागली ।
सुगमपंथें नेऊन घाली । जेथीलें[2] तेथें ॥ ७८ ॥
नमस्काराऐसें नाहीं सोपें । नमस्कार करावा अनैन्यरूपें[3] ।
नानासाधनीं साक्षेपें । कासया शिणावें ? ॥७९॥(द.४स.६)

## ७ दास्यभक्ति.

सातवें भजन तें दास्य जाणावें । पडिलें कार्य तितुकें करावें ।
सदा सन्निधाचि असावें । देवद्वारीं ॥ ८० ॥
देवाचें वैभव सांभाळावें । न्यूनपूर्ण पडोंचि नेदावें ।
चढतें वाढतें वाढवावें । भजन देवाचें ॥ ८१ ॥
भंगलीं देवालयें करावीं । मोडलीं सरोवरें बांधावीं ।
सोफे धर्मशाळा चालवावीं । नूतनचि कार्यें ॥ ८२ ॥
नानारचना जीर्ण जर्जर । त्यांचें करावे जीर्णोद्धार ।
पडिलें कार्य तें सत्वर । चालवीत जावें ॥ ८३ ॥
जयंत्या पर्वें महोत्साव । असंभाव्य चालवी वैभव ।
जें देखतां स्वर्गींचे देव । तटस्थ होती ॥ ८४ ॥
ऐसें वैभव चालवावें । आणि नीचं[4] दास्यत्वही करावें ।
पडिले प्रसंगीं सावध असावें । सर्वकाळ ॥ ८५ ॥
जें जें कांहीं पाहिजे । तें तें तत्काळचि दीजे ।
अत्यंत आवडीनें कीजे । सकळ सेवा ॥ ८६ ॥
सकळांचें करावें पारपत्य[5] । आल्याचें करावें आतिथ्य ।

---

१ प्रसन्न होतो. २ जेथल्या तेथें, उगमापाशीं, ब्रह्मस्वरूपीं. ३ एकत्व–भावानें, निष्कपटपणें. ४ अगदीं हलकेंही. ५ पाहुणचार, समाचार.

ऐसी हे जाणावी सत्य । सातवी भक्ती ॥ ८७ ॥
वचनें बोलावीं करुणेचीं । नाना प्रकारें स्तुतीचीं ।
अंतरें निवतीं सकळांचीं । ऐसें वदावें ॥ ८८ ॥
ऐसें दास्य करावें देवाचें । येणेंचि प्रकारें सद्गुरूचें ।
प्रत्यक्ष न घडे तरी मानसपूजेचें । करीत जावें ॥८९॥
(दास. द.४, स. ७)

८ सख्यभक्ति

देवासी परम सख्य करावें । प्रेमप्रीतीनें बांधावें ।
आठवे भक्तीचें जाणावें । लक्षण ऐसें ॥ ९० ॥
देवास जयाची प्रीती[1] । आपण वर्तावें तेणें रीती ।
येणेंकरितां भगवंतीं । सख्य घडे नेमस्त ॥ ९१ ॥
भक्तिभाव आणि भजन । निरूपण आणि कथाकीर्तन ।
प्रेमळ भक्तांचें गायन । आवडे देवा ॥ ९२ ॥
आपण तैसेंचि वर्तावें । आपणासि तेंचि आवडावें ।
मनासारिखें होतां स्वभावें । सख्य घडे नेमस्त ॥ ९३ ॥
सांडून आपली संसारव्यथा । करीत जावी देवाची चिंता
निरूपण कीर्तन कथावार्ता । देवाच्याचि सांगाव्या ॥ ९४ ॥
देवाच्या सख्यत्वाकारणें । आपलें सौख्य सोडून देणें ।
अनन्यभावें जीवप्राणें । शरीर तेंहीं वेचावें ॥ ९५ ॥
देवाच्या सख्यत्वासाठीं । पडाव्या जिवलगांसी तुटी ।
सर्व अर्पावें सेवटीं । प्राण तोही वेंचावा ॥ ९६ ॥
जैसें जयाचें भजन । तैसाचि देवही आपण ।
म्हणोनी हें अवघें जाण । आपणापासीं ॥ ९७ ॥
मेघ चातकावरी वोळेना । तरी चातक पालटेना ।

१ देवाला कशाची प्रीति आहे तें पुढील ओवींत सांगितलें आहे. तें करावें म्हणजे देवाचें सख्य होतें.

चंद्र वेळेसी उगवेना । तरी चकोर अनन्य ।।९८ ।।
भगवंतावरील ममत्व । विवेकें धरावें सत्व ।
ऐसें असावें सख्यत्व । सांडूंचि नये ।। ९९ ।।
सखा मानावा भगवंत । मातापिता गणगोत ।
विद्या लक्ष्मी धन वित्त । सकळही परमात्मा ।। १०० ।।
देवावेगळें कोणी नाहीं । ऐसें बोलती सर्वही ।
परंतु त्यांची निष्ठा कांहीं । तैसीच नसे ।। १०१ ।।
म्हणोनी ऐसें न करावें । सख्य तरी खरेंचि करावें ।
अंतरीं सदृढ धरावें । परमेश्वरासी ।। १०२ ।।
आपुलिया मनोगताकारणें । देवावरी क्रोधास येणें ।
ऐसीं नव्हेत कीं लक्षणें । सख्यभक्तीचीं ।। १०३ ।।
देवाचें जें मनोगत । तेंचि आपुलें उचित ।
इच्छेसाठीं भगवंत । अंतरूं नये कीं ।। १०४ ।।
देवाचे इच्छेनें वर्तावें । देव करील तें मानावें ।
मग सहजचि (वोळे) स्वभावें । कृपाळु देव ।। १०५ ।।
पाहतां देवाचे कृपेसी । मातेची कृपा कायसी ।
माता वधी बाळकासी । विपत्तिकाळीं । ।। १०६ ।।
देवें भक्त कोण वधिला । कधीं देखिला ना ऐकिला ।
शरणागतांस देव जाला । वज्रपंजरु[1] ।। १०७ ।।
देव भक्तांचा कैवारी । देव पतितांसी तारी ।
देव होय साहकारी । अनाथांचा ।। १०८ ।।
म्हणोनि सख्य देवासी करावें । हितगुज तयासीच सांगावें ।
आठवें भक्तीचें जाणावें । लक्षण ऐसें ।। १०९ ।।

---

१ वज्राचा पिंजरा, रक्षक.

## ९ आत्मनिवेदनभक्ति.

नवमी निवेदन जाणावें । आत्मनिवेदन करावें ।
तेंही सांगिजेल स्वभावें । प्रांजळ करुनी ॥ ११० ॥
ऐका निवेदनाचें लक्षण । देवासि वाहावें 'आपण' ।
करावें तत्वविवरण । म्हणिजे कळे ॥ १११ ॥
मी भक्त ऐसें म्हणावें । आणि विभक्तपणेंचि भजावें ।
हें आवघेंचि जाणावें । विलक्षण ॥ ११२ ॥
भक्त म्हाणिजे विभक्त नव्हे । आणि विभक्त म्हाणिजे भक्त नव्हे ।
विचारेंविण कांहींच नव्हे । समाधान ॥ ११३ ॥
तस्मात् विचार करावा । देव कोण तो वोळखावा ।
आपला आपण शोध घ्यावा । अंतर्यामीं ॥ ११४ ॥
मी कोण ऐसा निवाडा । पाहों जातां तत्वझाडा ।
विचार करितां उवडा । आपण नाहीं ॥ ११५ ॥
तत्वें तत्व जव्हां सरे । तेव्हां आपण कैंचा उरे ।
आत्मनिवेदन येणें प्रकारें । सहजचि जालें ॥ ११६ ॥
तत्वरूप सकळ[२] भासे । विवेक पाहतां निरसे ।
प्रकृतिनिरासें आत्मा असे । आपण कैंचा ? ॥ ११७ ॥
येक मुख्य परमेश्वरु । दुसरी प्रकृति[३] जगदाकारु ।
तिसरा आपण कैंचा चोरु । आणिला मध्यें ? ॥ ११८ ॥
पाहतां तत्वविवेचना । पिंडब्रह्मांडरचना ।
विश्वाकारें व्यक्ति नाना । तत्वें विस्तारलीं[४] ॥ ११९ ॥
तत्वें साक्षित्वें[५] वोसरतीं । साक्षित्व नुरे आत्मप्रचीती ।

---

१ वेगळेपणानें. २ सारी सृष्टि तत्वांचीच बनली आहे. आपण तत्वांहून निराळे आहोंत. ३ अष्टधा प्रकृति. ४ नाना व्यक्ति तत्वांच्याच झाल्या आहेत. ५ मी साक्षी म्ह. द्रष्टा आहे या विचारानें तत्वांचा निरास होतो व साक्षित्वही प्रचीतिकाळीं सरतें.

आत्मा असे आदिअंतीं । आपण कैचा ? ॥ १२० ॥
आत्मा येक स्वानंदघन । आणि ' अहमात्मा ' हें वचन ।
तरी मग आपण कैंचा भिन्न । उरला तेथें ? ॥ १२१ ॥
त्वंपद तत्पद असिपद । निरसुनि सकळ भेदाभेद ।
वस्तु ठाईंची अभेद । आपण कैचा ? ॥ १२२ ॥
आपण मिथ्या, साच देव । देवभक्त अनन्यभाव ।
या वचनाचा अभिप्राय । अनुभवी जाणती ॥ १२३ ॥
नवमी भक्ति आत्मनिवेदन । न होतां न चुके जन्ममरण ।
हें वचन सत्य प्रमाण । अन्यथा नव्हे ॥ १२४ ॥
ऐसी हे नवविधा भक्ति । केल्या पाविजे सायुज्यमुक्ति ।
सायुज्यमुक्तीस कल्पांतीं । चळण नाहीं ॥१२५॥ (द.४,स.९).

## ( ४ ) ज्ञानोत्तर भक्ति.

### ( १ )

संग तितुका नाशिवंत । सोडूनि रहावें निवांत ।
एकपणाचा अंत । जालिया समाधान ॥ १ ॥
जें सकळ साधनांचें सार । जेणें पाविजे पैलपार ।
जेणें साधनें अपार । साधक सिद्ध जाले ॥ २ ॥
तें हें जाण तूं श्रवण । करावें अध्यात्मनिरूपण ।
मनन करितां समाधान । निजध्यासें पाविजे ॥ ३ ॥
नित्य नवें श्रवणमनन । त्याऐसें नाहीं साधन ।
म्हणोनि हें नित्यनूतन । केलें पाहिजे ॥ ४ ॥

१ ' तत् त्वम् असि ' हीं महावाक्याचीं तीन पदें. यांचें ऐक्य केल्यावर ' आपण ' उरतच नाहीं; ब्रह्म, स्वयमेव आहे तेंच उरतें. २ ऐक्य. ३ रहस्य. ४ सायुज्यता ही चौथी मुक्ति मात्र अचळ आहे. बाकीच्या तीन म्ह. सलोकता, समीपता व सरूपता ह्या चळ आहेत.

अभिन्न ज्ञाता तोचि मान्य । साधक साध्य होतां धन्य ।
वेगळेपणें वृत्ति शून्यें[२] । पावती प्राणी ॥ ५ ॥
संगातीत म्हणिजे मोक्ष । तेथें कैचें देखणें लक्ष्य ।
लक्ष्य आणि अलक्ष्य । दोहींस ठाव नाहीं ॥ ६ ॥
आत्मा म्हणोनि देखण्यास मिठी । घालूं जातां मोक्ष तुटी ।
म्हणोनियां उठाउठी । आत्मनिवेदन करावें ॥ ७ ॥
प्राप्त जालें अद्वैतज्ञान । अभिन्नपणें जें विज्ञान ।
तेंचि जाण आत्मनिवेदन । जेथें मी तूं नाहीं ॥ ८ ॥
ऐसी स्थिति जया पुरुषाची । तया पुनरावृत्ति कैंची ।
जाणोनि भक्ति केली दास्याची । देवासी अत्यंत ॥ ९ ॥
पूर्वीं दास्य होतें केलें । त्याचें स्वामित्व प्राप्त जालें ।
आणि तयाचें महत्व राखिलें । तरी थोर उपकार[३] ॥ १० ॥
बहुतां जन्मांच्या सेवटीं । जाली स्वरूपाची भेटी ।
एका भावार्थासाठीं । परब्रह्म जोडिलें ॥ ११ ॥
तें ब्रह्मादिकांचें माहेर । अनंत सुखाचें भांडार ।
तेणें हा दुर्गम संसार । सुखरूप होय ॥१२॥ (आत्माराम)

( २ )

एवं ज्ञाता समाधानी । प्रारब्धयोगें वर्ते जनीं ।
परी अनुसंधान मनीं । वेगळेंचि असे ॥ १३ ॥
वृत्ति मूळाकडे पाहे । तंव रामाचि दिसताहे ।
स्तब्ध होऊनिया राहे । तरी रामाचि अवघा ॥ १४ ॥
मन मुरडे आलिया वाटे । तंव मार्गीं रामाचि भेटे ।

१ देवाशीं समरस झालेला. २ वेगळेपणानें शून्यांत पडतो. ३ ज्या रामाची सगुणभक्ति केली त्याच्याच कृपेनें ब्रह्मबोध झाला म्हणून ज्ञानोत्तर-कालींही भक्ति करणें हें कृतज्ञतेचें लक्षण आहे.

मागें पुढें प्रगटे । रामचि अवघा ॥ १५ ॥
दाही दिशा अवलोकितां । रामचि भासे तत्वतां ।
वदन चुकवूं जातां । सन्मुख राम ॥ १६ ॥
राम जालियां सन्मुख । कल्पांतीं नव्हे विन्मुख ।
नेत्र झांकितां अधिक । रामचि दिसे ॥ १७ ॥
मग विसरोनि पाहिलें । तंव तें रामचि जालें ।
जीवनसर्वस्व वेधिलें । संपूर्ण रामें ॥ १८ ॥
रामेंवीण सर्वथा कांहीं । अणुमात्र रितें नाहीं ।
दृश्य द्रष्टा दर्शन तेंही । रामचि जालें ॥ १९ ॥
ऐसा राम प्रगटला । दृश्य पदार्थ लोपला ।
असतांच नाहींसा जाला । सद्गुरुप्रतापें ॥ २० ॥
ऐसी खूण सकळांस । सांगोनि गेला रामदास ।
सत्संगें जगदीश । नेमस्त भेटे ॥ २१ ॥ ( पंचसमासी )

## ( ५ ) श्रीरामसमर्थांचें अवतारकार्य.

### ( १ )

(वृत्त प्रमाणिका)

श्रीराम राम राम हा । समर्थ पूर्णकाम हा ।
[2]प्रताप-कीर्ण फांकले । प्रचंड तेज झांकलें ॥ १ ॥
प्रीती करूनि आदरें । भजूनिया दशशिरें[3] ।
पुजून देव शंकरु । उदंड साधिला वरु ॥ २ ॥
तया वरेंचि मातला । अधर्मकर्मी रातला[4] ।

१ मग मागें मुरडून मूळमायेकडे किंवा तिच्या पलीकडे पाहिलें अथवा पुढें दृश्याकडे पाहिलें तरी सर्वत्र रामरूपच कोंदले आहे. 'अंतर्बहिश्च तत्सर्वं व्याप्य नारायणः स्थितः ( नारायणोपनिषत् ) अथवा 'आंत हरि बाहेर हरि । हरीनें घरीं कोंडिलें ॥' ( तुकोबा ). २ प्रतापसूर्याचे किरण. ३ दश शिरें धारण करणाऱ्या रावणानें. ४ रतला, रमला.

भूमंडळीं नव्हे बरा । बहुत लोक पीडिला ॥ ३ ॥
समस्त देव ते भले । परंतु बंदि पावले ।
बहु ग्रहांसि निग्रहो । ग्रहांसि भेटला ग्रहो ! ॥ ४ ॥
उदासली वसुंधरा । बहु भिती निशाचरां ।
अनीति फारसी वसे । कदापि न्याय तो नसे ॥ ५ ॥
नरेंद्र हो फणेंद्र हो । विधी सुरेंद्र चंद्र तो ।
वरुण वात पावकु । कुबेर यम धार्मिकु ॥ ६ ॥
प्रचंड दंड दंडिका । सटी गणेश चंडिका ।
समस्तही विरोधली । बहुबळें निरोधिली ॥ ७ ॥
समीर लोटिती खडे । वरुण घालितो सडे ।
मयंक साउली धरी । मळीण पावकु हरी ॥ ८ ॥
विधी विधीस घोकतो । सुरेंद्र बाग राखतो ।
करावयास निग्रहो । भूमंडळासि विग्रहो ॥ ९ ॥
अखंड चाकरी करी । सदा वरूचि भादरी ।
सटी अरंदळी दळी । गणेश गोढवें वळी ॥ १० ॥
परोपरी विटंबना । वदेल कोण रावणा ? ।
उदंड देव पीडिले । मदें पदासि खांडिलें ॥ ११ ॥
बहु कठीण काळ हो । समस्त पावले मोहो ।
हिनादीनाचिया परी । सदा गळीत अंतरीं ॥ १२ ॥
निशाचरें बहूवसें । कठीण वर्तमानसे ।
म्हणोनि राम पावला । बहूबळें उठावला ॥ १३ ॥

---

१ बंध, कैदखाना. २ नवग्रहांना निग्रह करणारा, त्यांवर अंमल चालविणारा हा रावणरूपी नवीन ग्रहच त्यांना भेटला ! ३ धराधीश, पातालाधीश, व स्वर्गाधीश, ब्रम्हदेव (विधी) इ. सर्व देवांशीं त्यानें विरोध मांडून त्यांना जिंकले ४ चंद्र. ५ बुद्धिसागर गणेश गाढवांना म्ह. मदांना वळवूं लागला हें योग्यच आहे !

निमित्तमात्र ते सिता । विबुधपक्ष पूरता ।
समर्थ तो भला भला । कुढावयासि पातला ॥ १४ ॥
हरूनियां कुलांगना । बहुत गर्व रावणा ।
विचार नायके भला । प्रचंड राम कोपला ॥ १५ ॥
अचाट तीं कपीदळें । असंख्य चालिलीं बळें ।
करूनि सख्य[2] पाहिलें । परंतु सर्व राहिलें ॥ १६ ॥
प्रभु म्हणे हरेश्वरा । त्रिकूट[3] पालथा करा ।
उठावलीं कपीदळें । पुरीस वेढिलें बळें ॥ १७ ॥
कपी विशाळ ते गिरी । गिरीच घेतले करीं ।
उठावले भुजाबळें । बळें बळेंचि तुंबळें ॥ १८ ॥
निशाचरांसि घातलें । बळेंचि दुर्ग[4] घेतले ।
असंख्य जुत्पती किती । हुडाहुडां[5]चि गर्जती ॥ १९ ॥
त्रिकूट तो तडाडिला । तडक बाजला भला ।
कडाडिले खडाडिले । बहु हुडे घडाडिले ॥ २० ॥
बहू उकावले बळा । गळ्यासि लाविती गळा ।
घडं घडासिं ठेलिती[6] विरांसि वीर रेलिती[7] ॥ २१ ॥
पडोनियां उफाळती । बळें बळीं घुमाळिती ।
बुकालिताति नीर्किरें । मडूप लात कोपरें ॥ २२ ॥
कितेक दैत्य झोडिले । कितेक हस्त मोडिले ।
पदीं धरूनि वोडिती । बळें भूमीस पाडिती ॥ २३ ॥
कपी चपेट सूटले । कितेक दैत्य आटले ।
झपोटिती लपेटिती । पिटून कूटकूटिती ॥ २४ ॥

१ सीता सोडावयाचें निमित्त, वस्तुतः रावणाला मारून देवांचा पुरा पक्ष घेणें याचसाठीं रामावतार ! २ अंगदशिष्टाईच्या द्वारें साम करून पाहिलें. ३ लंका ज्यावर बसविली होती तो पर्वत. ४ बुरुजांवर. ५ बळानें फुरफुरले. ६ झुंज घेतात. ७ ढकलतात. ८ त्वेषानें गुद्दे चढवितात.

त्रिकूटिचे भले भले । प्रचंड वीर क्षोभले ।
मना कळेचि ना गती । तुफानसे उफाळती ॥ २५ ।
कितेक हस्त मस्तसे । बहूत खस्त व्यस्तसे ।
प्रचंड दंत हाणिती । महीतळास खाणिती ॥ २६ ॥
हयें हयांसि ताडिती । गजें गजा पछाडिती ।
रथें रथासि मोडिती । निशाचरांसि झोडिती ॥ २७ ।
कपी कलोळ चालिला । विधी भुगोळ हालिला ।
चपेट मारिती बळें । लपेटिताति लांगुळें ॥ २८ ॥
वितंड मेघवर्ण तो । बलाढ्य कुंभकर्ण तो ।
दळोंचि गीळितो सळें । परंतु मारिला बळें ॥ २९ ॥
प्रधानही भले भले । रणीं बहुत भांडले ।
परंतु यश नाढळे । देहाभिमान तो गळे ॥ ३० ॥
मनीं धरूनियां पणु । समोर राम रावणु ।
सणाण विंधिती शिरें । परस्परोंचि नोखुरें ॥ ३१ ॥
वितंड कोपला ईशु । अचाट घोष कर्कशु ।
कडक ऊठिला रणीं । भयें थरारिला फणी ॥ ३२ ।
रणीं वधूनि रावणा । विभीच्छता रणांगणा ।
बळें धडाडिला नभीं । विशाळ देव दुंदुभी ॥ ३३ ॥
समस्त देव हर्षले । कुसुमभार वर्षले ।
जयो जयो सितापती । मुखें बहूत गर्जती ॥ ३४ ॥
बिभीषणास त्रीकुटी । बळोंचि स्थापिला पटीं ।
सुखावला बिभीषणु । अखंड रामचिंतनु ॥ ३५ ॥
विराजमान जानकी । धगधगीत पावकीं ।
रघोत्तमासि भेटली । वियोगवेळ तूटली ॥ ३६ ॥
अनेक बंद तोडिले । समस्त देव सोडिले ।
प्रचीतिनें पहा पहा । प्रभु समर्थ राम हा ॥ ३७ ॥

अनेक वीरकद्द तो । प्रभूसि राजपट्ट तो ।
सुखें उभारिली गुढी । बहू जनासि आवडी ॥ ३८ ॥
समर्थ हे उपासना । जनांत आणिती मना ।
रघूत्तमा उपासिती । सखेचि तेचि वाटती ॥ ३९ ॥
शरीर वीकिलें गुणीं । अनन्यभाव निर्गुणीं ।
जना उपासनागुणें । कळोनि मोक्ष पावणें ॥ ४० ॥

( २ )

जेणें फेडिला पांग ब्रह्मादिकांचा
बळें तोडिला बंद त्या त्रीदशांचा ।
म्हणोनी कथा थोर या राघवाची
जनीं ऐकतां शांति होते भवाची ॥ ४१ ॥

( ३ )

दुष्टांचा संहार धर्माची स्थापना । जानकीजीवना राघवासी ॥
विबुधांचा राव आला सोडवणें । आम्हां तेणें गुणें जोडी जाली ॥
वैकुंठासी राम गेले विश्रांतीये । जनांसी उपाये हनूमंत ॥
हनुमंतीं राम आहे निश्चयेंसी । रामीं रामदासीं ऐक्यभाव ॥४२॥

( ४ )

येकवचनी देव येक । जेणें सोडविले देव अनेक ।
सेवाहीन मी सेवक । त्याचा म्हणवी ॥ ४३ ॥
समर्थें अंगीकार केला । नाना संकटीं रक्षिला ।
त्याचिया अन्नें पिंड वाढविला । जन्मवरी ॥ ४४ ॥
जें जें मनें अभिलाषिलें । तें तें समर्थें पुरविलें ।
मज दीनास वाढविलें । मर्यादेवेगळें ॥ ४५ ॥
स२मर्थानें समर्थ करावें । तरीच समर्थ म्हणवावें ।

१ पराधीनता. २ समर्थ राम. समर्थानें शरणागतास आपल्यासारखे समर्थ करावें, तरच समर्थ म्हणवून घेणें शोभतें !

त्रैलोक्यास पडिलें ठावें । सामर्थ्य ज्याचें ॥ ४६ ॥
अजिंक्य रजनीचर माजले । देव कारागृहीं घातले ।
म्हणोनी वैकुंठाहून पातले । देव सोडवावया ॥ ४७ ॥
देवमात्र [1]जाजावला । म्हणोनी [2]कैपक्षी पावला ।
भुवनकंटक निर्दाळिला । दशमुख शत्रु ॥ ४८ ॥
जिहीं त्रैलोक्य जिंकिलें । त्यांस मर्कटांहातीं मारविलें ।
भुवनत्रय आनंदविलें । दाशरथीनें ॥ ४९ ॥
देवांचे बंद सोडविले । देव स्वस्थानीं स्थापिले ।
प्राणिमात्र आनंदविले । रामराजें ॥ ५० ॥
बिभीषणास दिधली लंका । सुरवरांची फिटली शंका ।
समर्थें रामदासरंका । [3]नवाजिलें ॥ ५१ ॥

## ( ६ ) श्रीकृष्णाची वेधशक्ति.

### (वृत्त प्रमाणिका)

श्रीकृष्ण जन्मला गुणी । करी जनांसि मोहनी ।
हरिचरित्र साजिरें । सगुणरूप गोजिरें ॥ १ ॥
हरिचरित्र हें भलें । बहू जनांत शोभलें ।
हरील दुष्टदंडणा । करील जन्मखंडणा ॥ २ ॥
कितेक [4]बंधमोचनें । तयासि काय बंधनें ? ।
करूनि पंथ मोकळा । श्रीकृष्ण जाय गोकुळा ॥ ३ ॥
विषें भरुनियां स्तना । कु[5]टिल घात पूतना ।
हरीस होय माउसी । बळेंचि सोखिली कसी ! ॥ ४ ॥
तृणासुरासि मारिलें । कगाबगांसि चीरिलें ।

१ त्रासून गेला. २ कैवारी. ३ नांवालोकिकास चढविलें. ४ ज्यानें अनेकांचे बंध तोडले त्याला कंसाचा कैदखाना काय करूं शकणार ? ५ पूतना मावशी स्तनांतील विष शोषून मारिली.

पदीं धरूनि धेनुका । गड्यांस वाटितो सखा ।। ५ ।।
धरूनि देव गीळिला । मुखीं भूगोळ दाविला ।
रसाळ बाळ लाघवी । लिळा कळेचिना कवी ।। ६ ।।
अनेक लोक रंजिला । वरिष्ठगर्व भांजिला ।
श्रीकृष्णनाथ गोकुळीं । गिरी[1] धरी करांगुळीं ।। ७ ।।
समागमेंचि गोकुळीं । बळेंचि वोणवा गिळी ।
कितेक मल्ल मारिले । बहू रिपू विदारिले ।। ८ ।।
नदीतिरें मनोहरें । जळें सुनीळ सुंदरें ।
डोहो कितेक मातले । अनंत जीव रं[2]तले ।। ९ ।।
नदी खळाळिती बळें । जळें बहुत चंचळें ।
फुगे चळण वांकणें । निरें विराजती गुणें ।। १० ।।
अनेक मत्स्यकच्छपें । कितेक सुंदरें रूपें ।
बहू जळीं चळाळिती । क्रिडाभरें उफा[3]ळिती ।। ११ ।।
कदंब लंब लंबले । नदीतटाकिं बिंबले ।
लता लता बहू लता । तरुसमूह पूरता ।। १२ ।।
अनेक वृक्ष दाटले । निबीड दाटे[4] थाटले ।
बनें बनें बहू बनें । अचाट दाटलीं घनें ।। १३ ।।
फळें फुलें परोपरी । कितेक वोघे[5] भीतरीं ।
विशाळ तें सरोवरें । विशेष तुंबलीं भरें ।। १४ ।।
तुषारसा पळेंपळु । सुगंधवात शीतळु ।
कितेक वृक्ष डोलती । अनेक जीव बोलती ।। १५ ।।
कितेक शुकसारिका । मयूर बुलबुलादिका ।
चकोर चक्रवाक ते । बदक थीर कीर ते ।। १६ ।।

---

१ गोवर्धन पर्वत. हा सात मैल लांबीचा पट्टा, मथुरेपासून तेरा मैलांवर आहे २ रमले. ३ उंच उड्या घेतात. ४ गर्द रांगा. ५ ओघ, पाट.

रसाळ उत्तमा किळा । ध्वनी कल्लोळ कोकिळा ।
थिरावली मनोगती । मधुर उंच कूजती ॥ १७ ॥
ध्वनीं वनीं विराजल्या । बहु प्रकार माजल्या ।
जनाघरें मनोहरें । सुखें सुखावलीं भरें ॥ १८ ॥
तयामधें श्रीरंग हा । त्रिभंग ठाणसें पहा ।
अनेक रंग माजवी । सुरंग वेणु वाजवी ॥ १९ ॥
ध्वनीं विगुतलीं[1] मनें । बहु प्रकार गोधनें[2] ।
श्रीकृष्णवेध लागला । मनें मनु सुखावला ॥ २० ॥
विशेष गौळियांकुळीं । सुढौळ[3] बाळ गोकुळीं ।
सुरंगरंग अंगना । विलासती व्रजांगना ॥ २१ ॥
गुणें गुणीं गुणागळ्या । समर्थ योग्य मंडळ्या ।
वयें वयें परोपरी । क्रिडाभरें नदीतिरीं ॥ २२ ॥
आळापिती परोपरी । विणे मधुर किन्नरी ।
शरीर दिव्य दामिनी[4] । सयोग धूर्त कामिनी ॥ २३ ॥
अखंडरूप लोचनीं । चटक लागली मनीं ।
अनेक भाव भाविती । तमाळनीळ[5] दाविती ॥ २४ ॥
श्रीरंगरूप सांवळें । कटीं दुकूल[6] पींवळें ।
सुरंग रंगली तनु । विगुतलें तनुमनु ॥ २५ ॥
व्रजांगनांमधें हरी । परोपरी क्रीडा करी ।
मधुर वेणु वाजवी । तरंगरंग माजवी ॥ २६ ॥
वसंतकाळ पातला । सुरंगरंग मातला ।
नुरेचि देहभावना । हिरोनि घेतलें मना ॥ २७ ॥
श्रीकृष्ण कृष्ण हें वदा । तुटोनि जाति आपदा ।
नको कदा देहेंमदा । तरीच पावसी पदा ॥२८॥ (भागवत.)

---

१ गुंगून गेलीं, तल्लीन झालीं. २ गाई व वत्स. ३ सदृढ. ४ स्त्रिया. ५ मेघश्याम. ६ रेशमी वस्त्र, पीतांबर.

## ( ७ ) देवभक्तांचें सख्य.

भक्तांचा देव लोभाळू । भक्तांचें मानिंचें करी ।
हारद्र जीविंचें जाणे । राजा त्रैलोक्यनाथ कीं ॥ १ ॥
सांपडे भक्त जो जैसा । तैसा तो होतसे तया ।
सर्वही आपणापाशीं । मनासीं पुसणें बरें ॥ २ ॥
देव तो दयाळू मोठा । अन्याय क्षमणें बहु ।
भक्तांचा साभिनाभी तो । बुद्धिदाता परोपरी ॥ ३ ॥
कोण रे चालवी ऐसें । न्यून तें पुरतें करी ।
उभाचि पाठिसीं देवो । जेव्हां तेव्हां क्षणक्षणा ॥ ४ ॥
साहेब जाहला मोठा । कोण वेळेसि पावतो ? ॥
धणी ते लालची मोठे । चोरटे सेवक जनीं ॥ ५ ॥
विश्वास येकमेकांचा । कदापि न घडे जनीं ।
जपती येकमेकांला । परस्परेंचि घातकी ॥ ६ ॥
मारिती विष देताती । स्वामी सेवक ते पहा ।
आडोन चालते सृष्टि । विपट पाडिले सदा ॥ ७ ॥
देवासी तुळणा कैंची । पाहों जातां भूमडळीं ।
भक्त होईल देवाचा । संसार सर्व सांडूनी ॥ ८ ॥
त्यास वोढेले हे सृष्टी । यदर्थीं संशयो नसे ।
प्रत्ययवाक्य नेमाचें । कित्येक जाणती जनीं ॥ ९ ॥
भक्ताला काय उणें रे । देव त्रैलोक्य वर्तवी ।
तो देव आपुला जाला । वैभवा कोण पुसतें ? ॥ १० ॥
टाकितां लावितो मागें । देव दाताचि जाहला ।

---

१ पुढील तीन श्लोकांत लौकिकांत स्वामीसेवक परस्परांशीं कसे वागतात तें सांगितलें आहे. राम धणी करावा, तो फार दयाळु आहे. २ सारें जग अनुकूल होईल. ३ हा आमचा अनुभव आहे, अनेक लोक हें जाणतच आहेत.

देवाची प्रार्थना व प्रसाद ........ .... वि: ...१९५५...
क्रमांक ........ नों. दि. ........

घ्यावें तें कोणतें कातां । त्रैलोक्य भरलें असे ॥ ११ ॥
आपण सर्व देवाचा । देवाचें आपणाकडे ।
किती घ्यावें किती न्यावें । भोगावें कोण तें किती ? ॥१२॥
दाता अनंत भुजांचा । भडसा[1] पुरवीतसे ।
' पुरें पुरें पुरें आतां ' । देव देतां विटेचिना ॥ १३ ॥
भक्त तो घेइना[2] कांहीं । देवें त्रैलोक्य दीधलें ।
सर्वही सांडिलें–दोघां । येकयेकासि लाविती ! ॥ १४ ॥
भक्तानें अंतरीं देवो । जाणोनि धरिला बळें ।
देवही विसंभेना[3] कीं । सोडीना भक्तवत्सळु ॥ १५ ॥
अभाग्यें[4] भर्वसा नाहीं । मूढाला निश्चयो नसे ।
दया हे थोर देवाची । भक्ताला वज्रपंजरु ॥ १६ ॥
रामदास म्हणे माझा । राम स्वामी दयानिधी ।
सोडिले बद देवाचे । तो हा त्रैलोक्यनायकु ॥ १७ ॥

## ( ८ ) देवाची प्रार्थना व प्रसाद.

" नेणतां जन्मलों आम्ही । चुकतां दुःख पावलों ।
फावलों[5] बहुता लोकां । कावलों[6] मनिंच्या मनीं ॥ १ ॥
स्वतंत्र ईश्वरु जाणा । पराधीनचि मानवी ।
विषयवासनेसाठीं । पराधीनचि जाहले ॥ २ ॥
सांगती सर्वही कामें । आपापलीं परोपरी ।
उसंत[7] घ्यावया नाहीं । चुकतां गांजिती सदा ॥ ३ ॥
धाकाचि वाहतां गेलें । व्यर्थ आयुष्य वेंचलें ।
कष्टलों भागलों माझें । दुःख कोणीच नेणतां ॥ ४ ॥

---

१ इच्छा, मनोरथ. २ अनंत हस्तांनीं देव अमित ऐश्वर्य देऊं पाहतो, पण भक्त पूर्ण निरिच्छ, तो कांहींच घेत नाहीं. ३ विसंबत, विसरत नाहीं. ४ देव भक्ताला विसंबत नाहीं यावर लोकांचा विश्वास बसत नाहीं. ! अश्रद्दधानाः पुरुषाः ' ५ सांपडलों. ६ संतप्त झालों. ७ विसावा.

विद्या नाहीं बुद्धि नाहीं । भाग्य नाहींच देखिलें ।
वैभव संपदा कैंची । अन्नवस्त्र मिळेचिना ॥ ५ ॥
आधार पाहतां नाहीं । कैंपक्षी तों असेचिना ।
देहत्याग बरा वाटे । दुःख ब्रह्मांड जाहलें ॥ ६ ॥
सांगावें हें तरी कोणा । सख्य नाहीं भूमंडळीं ।
जन्मदुःख पुरें आतां । मायबापा रघूत्तमा ! ॥ ७ ॥
अनाथ रंक मी तुझें । जन्मापासूनि सोडवी ।
पतीतपावना देवा । सांभाळी गा दयानिधी ॥ ८ ॥
तूं भक्तवत्सला देवा । भक्तिही करितां न ये ।
कोंवसा सकळै लोका । धांव पाव कुढावैया ॥ ९ ॥
प्रल्हाद रक्षिला देवें । नाना विघ्नें निवारिलीं ॥
गजेंद्र सोडिला नेटें । येकायेकींच धांवणी ॥ १० ॥
अजामेळ महापापी । स्मरणें तारिलें तया ॥
रक्षिलें उदंडा भक्तां । दयाळु भक्तवत्सळु ॥ ११ ॥
ब्रीदें हीं चालती तुझीं । पवाडे ऐकिले बहु ॥
समर्थें पाहावी चिंता । मी तुझा शरणागतु " ॥ १२ ॥
वोळला मेघ सुखाचा । आनंद सचराचरीं ॥
बुद्धीनें शोधिला देवो । भावें तत्काळ पावला ॥ १३ ॥
देवाचा योग तो योगी । वियोगी योगिया नव्हे ॥
विभक्तीनें नव्हे भक्ती । जाणती भक्त जाणते ॥ १४ ॥

१ कैवारी. २ आधार. ३ रक्षावयास. ४ लगबगीनें एकदम धांवत येऊन. ५ 'न मे भक्तः प्रणश्यति' 'भक्त्याऽहमेकया ग्राह्यः' इ. देवाचीं वचनें हींच त्याचीं ब्रीदें किंवा बिरुदें होत. ६ कीर्तिघोष. पवाडा शब्द फार प्राचीन आहे. 'पवाडा तुवां केला । गंधर्वासी' (ज्ञाने. १) ७ द्रवला, वळला, प्रसन्न झाला. ८ देवाचा योग तो योगी किंवा भक्त, वियोगी किंवा विभक्त. म्ह. देवापासून वेगळा, भिन्न.

ब्रीद तें प्रत्यया आलें । सख्य जालें प्रचीतिनें ॥
धन्य गा पावना देवा । भावना उरली नसे ॥ १५ ॥
बुद्धि देतो सेवकाला । बुद्धीनें पार पाववी ॥
अनंत गुण देवाचे । पाहतां पार नाडळे ॥ १६ ॥
येकला आवरी सर्वें । कोण्या यत्नें कळेचिना ।
अद्भुत तोचि तो जाणे । त्यावीण दुसरा नसे ॥ १७ ॥

## ( ९ ) निग्रहनेमावांचून सगुणसाक्षात्कार नाहीं.

एका भावार्थासीठीं[1] । देव लागे भक्तापाठीं ॥
भाव नसतां जगजेठी[2] । प्राप्त नाहीं ॥ १ ॥
भावें ध्यावें हरीचें नाम । हृदयीं धरावें प्रेम ॥
मानसपूजा नित्यनेम । केली पाहिजेती ॥ २ ॥
सगुण मूर्तीचीं चरित्रें । श्रवण करावीं पवित्रें ॥
ध्यानें विविधें विचित्रें । अंतरीं धरावीं ॥ ३ ॥
निग्रह नेमाचें बळ । असतां प्राप्ति तात्काळ ॥
दुराशा[3] करी तळमळ । निग्रहभ्रष्टो[4] ॥ ४ ॥
जेथें निग्रहेंसी धार्ष्ट्य वसे । तेथें देव सान्निधाचि असे ॥
सोडी संशयाचें पिसें[5] । एतद्विषयीं ॥ ५ ॥
तरी निग्रह धारिष्ट जडे । हें वैराग्येंवीण न घडे ॥
दृढ वैराग्य होतां उडे । पांग[6] देहाचा ॥ ६ ॥
देह पडे कां देव जोडे । ऐशी हांव[7] आंगीं जडे ॥
तेणें गुणें वैराग्य घडे । महाप्रबळ ॥ ७ ॥
देहपांग[8] निःशेष भंगे । तेव्हां प्राप्तीसी वेळ नलगे ॥

---

१ एक भाव असला कीं. २ जगांत ज्येष्ठ-श्रेष्ठ. ३ दुराशेमुळें तळमळ होते. ४ निग्रहाचा ढिला. ५ वेड. ६ पराधीनता. ७ उत्साह, निश्चय. ८ देहाधीनता.

देव भक्तापाठीं लागे । 'नोभी नाभी' म्हणोनी ॥ ८ ॥
सर्वस्वाची आस तुटे । तरीच सगुणमूर्ति प्रगटे ॥
शोक मोह निःशेष आटे । दुःख संसारींचें ॥९॥ (जु. दा. स. ७)

## ( १० ) साक्षात्कार सांगूं नये.

श्रीराम जयराम जयजय राम । ऐसा कांहींएक करोनियां नेम ।
जप कीजे तेणें आत्माराम । जोडेल निर्येमें ॥ १ ॥
परी कोणासी कळों नेदावा । जप अंतरींच करावा ।
जैसा कृपणासी धनठेवा । सांपडला एकांतीं ॥ २ ॥
जयास उपासना जैसी । तेणें स्मरावें आपुल्या देवासी ।
निदिध्यास जालिया नेमेंसी । साक्षात्कार होय ॥ ३ ॥
जयासी रामचि व्हावा । तेणें लौकिक सोडावा ।
राम कैवारी करावा । जो संकटीं नुपेक्षी ॥ ४ ॥
कांहीं साक्षात्कार जाला । तो सांगों नये दुसऱ्याला ।
जरी आळैकेपणें सांगितला । तरी पुन्हा होणार नाहीं ॥५॥
पुन्हा साक्षात्कार कैंचा ? । जाला तरी धैरपंगाचा ।
हा मी आपुले जीवींचा । अनुभव सांगतों ॥६॥ (जु. दा. स. १५)

## ( ११ ) वैराग्य व एकांतवास.

मना ! चाल ऊठीं वना दुर्गमातें ।
न गुंते भवागारदारादिकांतें ॥
विवेकें विचारें विवंचूनि पाहीं ।
जनीं पाहतां सर्वथा ठौरि नाहीं ॥ १ ॥
अती दुष्करें क्लेश कीजेत देहीं ।

---

१ भिऊं नकोस, भिऊं नकोस. २ निश्चयानें. ३ लोभिष्टपणानें. ४ बरबर, ढोंगाचा. ५ संसार, घर, स्त्री इ. ६ उरी, ठाव, विश्रांति.

तथापि तरी वीषयो प्राप्त नाहीं ॥
कदापी जरी लाहिजे प्राप्ति याची ।
तरी इंद्रियांलागिं संतृप्ति कैंची ? ॥ २ ।
दुराशा करी किंकरी कोण आतां ।
निराशा धरी अंतरीं मुक्तिकांता ॥
त्यजी अत्यंजी[1] वृत्ति हे दुःखकामी ।
भजे निर्वृती[2] सौख्यदाती श्रीरामीं ॥ ३ ॥
बहू वीट आला भवाचा न सोवे[3] ।
अटव्यांत[4] देऊनियां हाक जावें ॥
मन तें दमावें श्रीरामीं रमावें ।
दिगंतीं फिरावें जना न स्मरावें ॥ ४ ।
जरी प्रत्यगावृत्तितें चित्त आलें ।
तरी वृक्षपक्षादिकीं सौख्य केलें ॥
उदारस्तपस्वी उदासीन मोठे ।
तयांचे गती संगतीं वेळ कंठे ॥ ५ ॥
सुषुप्ती अवस्थेसि भूमी निजावें ॥
उसें रामपाद स्मरोनी धरावें ॥
दिशांचा महापाट[6] तो पांघरावा ।
सितावारणें[7] साह्य वन्ही करावा ॥ ६ ॥

---

१ आशेची हीन वृत्ति. २ निवृत्तीचें सौख्य. ३ साहवे, सहन होत नाहीं. ४ रानावनांत ' रामा रामा ! ' असा घोष करीत फिरावें. ५ संसारसुखाकडे वळलें. ६ पांघरूण. ७ थंडीच्या निवारणासाठीं.

## ( १२ ) श्रीरामोपासकांस समर्थांचें पत्र.

(श्रीसमर्थ शके १५६६ मध्यें कृष्णातीरीं आल्यानंतर चार दोन वर्षांतच त्यांनीं पंचवटीच्या रामोपासकांना हें पत्र लिहिलें आहे. समर्थ पंचवटी-नाशिकाजवळील टाकळी येथें बारा वर्षे (१५४२ ते १५५४) पुरश्चरणास होते, तेव्हां साहजिकच तेथील रामोपासकांचें व त्यांचें सख्य जमलें होतें. कृष्णातीरीं गेल्यावर पंचवटीच्या श्रीरामाचें सप्रेम स्मरण होऊन त्यांनीं आपल्या वतीनें श्रीरामाची प्रार्थना करण्यास तेथील प्रेमी जनांस या पत्रांत विनविलें आहे. या पत्रांत समर्थांची अत्यंत मधुर भक्ति कोमल वाणीनें प्रकट झाली आहे. 'जेथें पडली कृपादृष्टी। रघूत्तमरायाची' यावरून श्रीरामाच्या साक्षात्काराचें तें पुण्यस्थल समर्थांना परमप्रिय वाटावें हें साहजिक आहे. या पत्रांत समर्थांच्या मनाची कोमलता पराकाष्ठेची प्रगट झाली आहे. त्यांची निस्सीम रामभक्ति, त्यांची निरहंकार शालीनता, रामोपासक बंधुवर्गावरील त्यांचा प्रेमविश्वास व 'बाळवृद्ध–नरनारींचें' त्यांचें अनन्य प्रेम, त्यांनीं पुढें उभारलेल्या संप्रदायाची शुद्ध उपासना, विमळज्ञान वैराग्य, ब्राह्मण्यरक्षण व गुरुपरंपरापरिपालन ही बीजरूप पंचसूत्री, हें सर्व या बारा ओव्यांत सुव्यक्त झालें आहे. )

जनस्थान गोदातटीं । परमपावन पंचवटी ।
जेथें पडली कृपादृष्टी । रघूत्तमरायाची ॥ १ ॥
तेथील रामउपासक । त्यांच्या सेवकांचा सेवक ।
तुम्हांमध्यें मी येक रंक । सेरतें करावें ॥ २ ॥
तुम्ही निकट देवापासीं । आणि मी पडलों दुरि देसीं ।
कृपाळूपणें रघुनाथासी । माझी करुणा भाकावी ॥ ३ ॥
म्हणावें 'ते अनाथ । समर्था' तूं दीनानाथ' ।
म्हणावें 'ते पतित । तूं पतितपावनु' ॥ ४ ॥
म्हणावें 'तें परम किंकर । देवा' तूं करुणाकर' ।
म्हणावें 'ते निराधार । आधारें इच्छी' ॥ ५ ॥

---

१ मान्य. २ कृष्णातीरीं. ३ माझ्यातर्फे रामाची अशी प्रार्थना करावी. ४ तुझा आधार इच्छितात.

सत्य मिथ्या तुझा म्हणवी । त्याची चिंता असों द्यावी '
ऐसी करुणा भाकावी । नानाप्रकारीं ॥ ६ ॥
तुम्हां दासांमध्यें मी हीण । माझे कोट्यावधी अवगुण ।
परंतु आहे अनन्य । सेवक रघुनाथाचा ॥ ७ ॥
पुढें म्यां ऐसेंचि असावें । माझें मन न पालटावें ।
इतुकें देवासी मागावें । तुम्हीं बंधुवर्गी ॥ ८ ॥
प्रत्यहीं माझा नमस्कार । देवासी करावा निरंतर ।
मजकारणें शरीर । इतुकें कष्टवावें ॥ ९ ॥
बाळवृद्ध नरनारी । सकळ भक्त कुमार कुमारी ।
समस्तांसी नमस्कारी । ' कृष्णातीरवासी ' ॥ १० ॥
शुद्ध उपासना विमळ ज्ञान । वीतराग आणि ब्राह्मण्यरक्षण ।
गुरुपरंपरेचें लक्षण । शुद्धमार्ग ॥ ११ ॥
ऐसें पंचधा बोलिलें । इतुकें पाहिजे यत्नें केलें ।
म्हणिजे सकळही पावलें । म्हणे दासानुदास ॥ १२ ॥

## ( १३ ) चाफळीं श्रीरामाचें शुभागमन.

लवे नेत्रपातें स्फुरे आजि बाहे ।
दिनानाथ हा राम येणार आहे ॥
जयाचेनि योगें सुखानंद लोटे ।
तया देखतां अंतरीं बाष्प दाटे ॥ १ ॥
लळे पाळितो राम आम्हां दिनांचे ।
कृपासागरू भाव जाणे मनाचे ॥
नुपेक्षी कदा, संकटीं धांव घाली ।
तया देखतां मानसें तीं निवालीं ॥ २ ॥

१ एकनिष्ठ, एकांतभक्त. २ मला हीं शुभचिन्हें होतात यावरून श्रीरामराय आज येणार खास.

लघुलाघवी राम कोदंडधारी ।
मनीं चिंतितां शोकसंताप हारी ॥
महासंकटें नाम घेतां निवारी ।
भवसागरीं मूढ पाषाण तारी ॥ ३ ॥

## ( १४ ) करुणाष्टकांतील रामप्रार्थना

( १ )

अनुदिन अनुतापें तापलों रामराया ।
परमदिनदयाळा ! नीरसी मोहमाया ॥
अचपळ[१] मन माझें नावरे आवरीतां ।
तुजविण शिण होतो धांव रे धाव आतां ॥ १ ॥
तनुमनधन माझें राघवा, रूप तूझें ।
तुजविण मज वाटे सर्व संसार वोझें ॥
प्रचलित न करावी सर्वथा बुद्धि माझी ।
अचळ भजनलीळा लागली आस तूझी ॥ २ ॥
चपळपण मनाचें मोडितां मोडवेना ।
सकळस्वजनमाया तोडितां तोडवेना ॥
घडिघडि विघडे हा निश्चयो अंतरींचा ।
म्हणउनि करुणा हे बोलतों दीनवाचा ॥ ३ ॥
जळत हृदय माझें जन्म कोट्यानुकोटी ।
मजवरि करुणेचा राघवा, पूर लोटी ॥
तळमळ निववी रे राम कारुण्यसिंधू ।
षडरिपुकुळ माझें तोडि याचा समंधू ॥ ४ ॥

---

१ चंचल, अस्थिर. ‘अनुत्तम’ ह्या शब्दाप्रमाणें अचपळ या शब्दाची योजना समर्थांनीं केली आहे. ‘नास्ति चपलो यस्मात् स अचपलः’ अतिचपल.

उपरति मज रामीं जाहली पूर्णकामीं ।
सकळजनविरामीं रामविश्रामधामीं ।
घडि घडि मन आतां रामरूपीं भरावें ।
रविकुळटिळका रे, आपुलेंसें करावें ॥ ५ ॥

( २ )

समाधान साधूजनांचेनि योगें । परी मागुतें दुःख होतें वियोगें ।
घडीनें घडी शीण अत्यंत वाटे । उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥६॥
बळें लावितां चित्त कोठें जडेना । समाधान तें कांहि केल्या घडेना ।
नव्हे धीर नैनीं[1] सदा नीर लोटे । उदासीन हा काळ कोठें न कंठे॥७॥
अवस्था मनीं लागली काय सांगों । गुणीं गुंतला हेत कोणासि मागों ।
बहूसाल[2] भेटावया प्राण फूटे । उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥८॥
कृपाळूपणें भेटि दे रामराया । वियोगें तुझ्या सर्व व्याकूळ काया ।
जनामाजि लौकिक हाही न सूटे । उदासीन हा काळ कोठें न कंठे ॥९॥
अहारे विधी[3] ! त्वां असें काय केलें । पराधीनता पाप माझें उदेलें ।
बहुतांमध्यें चूकतां तूर्क[4] तूटे । उदासीन हा काळ कोठें न कठे ॥१०॥
समर्था ! मनीं सांडि[5] माझी नसावी । सदा सर्वदा भक्तचिंता असावी ।
घडेना तुझा योग हा प्राप्त[6] खोटें । उदासीन हा काळ कोठें न कंठे॥११॥

( ३ )

तुझिया वियोगें जीवित्व आलें । शरीरयोगें[7] बहु दुःख जालें ।
अज्ञान दारिद्र्य माझें सरेना । तुजवीण रामा मज कंठवेना ॥ १२ ॥
जडली उपाधी अभिमान साधी । विवेक नाहीं बहुसाल बाधी ।
स्वामीवियोगें पळही गमेना । तुजवीण रामा मज कंठवेना ॥ १३ ॥
संसारसंगें बहु पीडलों रे । कारुण्यसिंधो ! मज सोडवी रे ।

१ नयनीं. २ अत्यंत, वारंवार. ३ हे ब्रह्मदेवा. ४ तोल, वजन नाहीसें होतें. ५ त्याग. ६ संचित. ७ देहाच्या पराधीनतेमुळें.

कृपाकटाक्षें सांभाळि दीना । तुजवीण रामा मज कंठवेना ॥ १४ ॥

( ४ )

दुःखानळें मी संतप्त देहीं । तुजवीण रामा विश्रांति नाहीं ।
आधार तूझा मज मी विदेसी । सर्वोत्तमा, कैं मज भेटि देसी ॥१५॥
संसारचिंता मज बाटते रे । रामा प्रपचीं मन जातसे रे ।
संसर्ग आहे इतरां जनांसी । सर्वोत्तमा, कैं मज भेटि देसी ? ॥१६॥

( ५ )

नसे भक्ति ना ज्ञान ना ध्यान कांहीं । नसे प्रेम हें, रामविश्राम नाहीं ।
असा दीन अज्ञान मी दास तूझा । समर्था जनीं घेतला भार माझा ॥१७॥
रघूनायका ! जन्मजन्मांतरींचा । अहंभाव छेदूनि टाकी दिनाचा ।
जनीं बोलती दास या राघवाचा । परी अंतरीं लेश नाहीं तयाचा ॥१८॥
मज कोंवसा[1] राम कैवल्यदाता[2] । तयाचेनि हे फीटली सर्वचिंता ।
समर्थां तया काय उत्तीर्ण व्हावें । सदा सर्वदा नाम वाचे वदावें ॥१९॥
दिनाचें उणें दीसतां लाज कोणा । जनीं दास तूझा दिसे दैन्यवाणा ॥
शिरीं स्वामि तूं राम पूर्णप्रतापी । तुझा दास पाहे सदा शीघ्रकोपी ॥२०॥

( ६ )

उदासीन हे वृत्ति जीवीं धरावी । अती आदरें सर्व सेवा करावी ।
सदा प्रीति लागो तुझे गूण गातां । रघूनायका मागणें हेंचि आतां ॥२१॥
तुझें रूपडें लोचनीं म्यां पहावें । तुझे गूण गातां मनासी रहावें ।
उठो आवडी भक्तिपंथेंचि जातां । रघूनायका मागणें हेंचि आतां॥२२॥
मनीं वासना भक्ति तूझी करावी । कृपाळूपणें राघवें पूरवावी ।
वसावें मज अंतरीं नाम घेतां । रघूनायका मागणें हेंचि आतां ॥२३॥
सदा सर्वदा योग तूझा घडावा । तुझे कारणीं देह माझा पडावा ।
नुपेक्षीं मज गुणवंता अनंता । रघूनायका मागणें हेंचि आतां ॥२४॥

---

१ आधार. २ मोक्ष–ज्ञान देणारा

ब्रिदाकारणें दीन हातीं धरावें । म्हणे दास भक्तांसि रे उद्धरावें ।
सुटे ब्रीद आम्हांस सांडूनि जातां ।। रघूनायका मागण हेंचि आतां ।।२५।।

( ७ )

कमळनयन रामें वेधिले पूर्णकामें
सकळभयविरामें राम विश्रामधामें ।
घननिळ तनुश्यामें चित्ततोषें आरामें
भुवन भजननेमें तारिले दास रामें ।। २६ ।।
बहुविध भजनाचीं दैवतें पाहिलीं हो
सकळ त्यजुनि रामीं वृत्ति हे राहिली हो ।
विमळगुणशिळाची लागली प्रीति मोठी
विमळ हृदय होतां उद्धरे कूळ कोटी ।। २७ ।।

( ८ )

विषयविष वमावें, कल्पनेला दमावें
निजपद निजभावें दृढ चित्तीं धरावें ।
भवभय निरसावें साधुसंगीं वसावें
सगुणभजन द्यावें स्वामिदेवाधिदेवें ।। २८ ।।
विगळित मन माझें तूं करी देवराया
हरिभजन कराया पाहिजे दृढ काया ।
निरुपण विवराया तर्कपंथाचि जाया
रघुपति गुणछाया चित्त माझें निवाया ।। २९ ।।

( ९ )

रघुविरभजनाची मानसीं प्रीति लागो
रघुविरस्मरणाची अंतरीं वृत्ति जागो ।
रघुविरचरणाची वासना वास मागो
रघुविरगुण गातां वाणि हे नित्य रंगो ।। ३० ।।

चतुरपण जनीं हें पाहतां आढळेना
निकट रघुविराचें रूप कैसें कळेना ।
चपळ मन वळेना गर्वताठा गळेना
तुजविण जगदीशा, कर्मरेखा टळेना ॥ ३१ ॥

( १० )

करकर न करावी प्रीति रामीं धरावी
गरगर फिरवी ते वासना वीसरावी ।
हरिहर म्हणतां तो देव तत्काळ पावे
अतिविमळ पवाडे मानसीं आठवावे ॥ ३२ ॥
हुरहुरहुर वाटे, अंतरीं बाष्प दाटे
तुजविण रघुनाथा, लोचनीं नीर लोटे ।
तनधनमन वीटे, दुःख देहीं न कंठे
बहुविध उपचारें क्षोभलें चित्त ऊठे ॥ ३५ ॥
स्वजन जन त्यजावे, देश लंघूनि जावें
कठिण मन करावें झाडखंडीं भरावें ।
अनुदिन विवरावें दूरदेशीं भरावें
निरुपण विवरावें तर्कपंथेंचि जावें ॥ ३४ ॥

( ११ )

परमसुखनदीचे मानसीं पूर लोटे
घननिळतनु जेव्हां अंतरीं राम भेटे ।
सुख परमसुखाचें सर्वलावण्य साचें
स्वरुप जगदिशाचें ध्यान त्या ईश्वराचें ॥ ३५ ॥
मधुकर मन माझें रामपादांबुजीं हो
सगुणगुण निजांगें नित्य रंगोनि राहो ।

सकळ जन तरावे वंशही उद्धरावे
स्वजन जन करावे रामरूपीं भरावे ॥ ३६ ॥
सकळ भुवन तारी राम लीळावतारी
भवभय अपहारी राम कोदंडधारी ।
मनन करि मना रे धीर हे वासना रे
रघुविरभजनाची हे धरी कामना रे ॥ ३७ ॥

( १२ )

चकोरीस चंद्रोदयीं सूख जैसें
रघूनायका देखतां सूख तैसें ।
सगूणासि लांचावलें स्थीर राहे
रघूनंदनेंवीण कांहीं न पाहे ॥ ३८ ॥
चमत्कारलें चित्त हें रामगूणीं
उठे कीर्ति वाखाणितां प्रीति दूणी ।
रघूनायकासारिखा देव नाहीं
क्रिया पाहतां चोखडी सर्व कांहीं ॥ ३९ ॥

( १३ )

जनीं भक्ति नाहीं, मनीं भाव नाहीं
मला युक्ति ना बुद्धि कांहींच नाहीं ।
कृपाळूपणें राज्य रंकासि द्यावें
समर्था ! तुझें काय उत्तीर्ण व्हावें ॥ ४० ॥
समर्थे दिल्हें सौख्य नानापरीचें
सदा सर्वदा जाणसी अंतरींचें ।
लळे पाळिलें तूं कृपाळू स्वभावें
समर्था, तुझें काय उत्तीर्ण व्हावें ? ॥ ४१ ॥

दिनानाथ हें ब्रीद त्वां साच केलें
म्हणे दास भक्तासि रे उद्धरीलें
सुखें सांडणें या देहाचें करावें
समर्था ! तुझें काय उत्तीर्ण व्हावें ? ॥ ४२ ॥

## ( १५ ) बुद्धि दे रघुनायका

युक्ति नाहीं, बुद्धि नाहीं, विद्या नाहीं विवंचिता[1] ।
नेणता भक्त मी तूझा, बुद्धि दे रघुनायका ॥ १ ॥
मन हें आवरेना कीं, वासना वावडे[2] सदा ।
कल्पना धांवते सैरा[3], बुद्धि दे रघुनायका ॥ २ ॥
अन्न नाहीं, वस्त्र नाहीं, सौख्य नाहीं जनांमध्यें ।
आश्रयो पाहता नाहीं, बुद्धि दे रघुनायका ॥ ३ ॥
बोलतां चालतां येना, कार्यभाग कळेचिना ।
बहु मी पीडिलों लोकीं, बुद्धि दे रघुनायका ॥ ४ ॥
तुझा मी टोणपा[4] झालों, कष्टलों बहुतापरी ।
सौख्य तों पाहतां नाहीं, बुद्धि दे रघुनायका ॥५॥
नेटकें[5] लिहितां येना, वाचितां चुकतों सदा ।
अर्थ तो सांगतां येना, बुद्धि दे रघुनायका ॥ ६ ॥
प्रसंग वेळ तर्केना, सुचेना दीर्घसूचना[6] ।
मैत्रिकी राखितां येना, बुद्धि दे रघुनायका ॥ ७ ॥
कळेना स्फूर्ति होईना, आपदा लागली बहु ।
प्रत्यहीं पोट सोडीना, बुद्धि दे रघुनायका ॥ ८ ॥
संसार नेटका नाहीं, उद्वेगू वाटतो जिवीं ।
परमार्थू कळेना कीं, बुद्धि दे रघुनायका ॥ ९ ॥

---

१ सारासार विचार. २ कुमार्गी शिरते. ३ हवी तिकडे. ४ मतिमंद. ५ चांगलें. ६ पुढील होणारें आधींच जाणणें.

देइना पुर्विनें कोणी, उगेचि जन हांसती ।
विसरू पडतो पोटीं, बुद्धि दे रघुनायका ॥ १० ॥
पिशुनें वाटती सर्वें, कोणीही मजला नसे ।
समर्था ! तूं दयासिंधू, बुद्धि दे रघुनायका ॥ ११ ॥
उदास वाटतें जीवीं, आतां जावें कुणीकडे ।
तूं भक्तवत्सला रामा, बुद्धि दे रघुनायका ॥ १२ ॥
कायावाचामनोभावें तुझा मी म्हणवितसें ।
हे लाज तूजला माझी, बुद्धि दे रघुनायका ॥ १३ ॥
सोडवील्या देवकोटी, भूभार फेडिला बळें ।
भक्तांसि आश्रयो मोठा, बुद्धि दे रघुनायका ॥ १४ ॥
उदंड भक्त तुम्हांला, आम्हांला कोण पुसतें ।
ब्रीद हें राखणें आधीं, बुद्धि दे रघुनायका ॥ १५ ॥
उदंड ऐकिली कीर्ती, पतितपावना प्रभो ।
मी एक रंक दुर्बुद्धि, बुद्धि दे रघुनायका ॥ १६ ॥
आशा हे लागली मोठी, दयाळू बा दया करी ।
आणीक नलगे कांहीं, बुद्धि दे रघुनायका ॥ १७ ॥
**रामदास** म्हणे माझा, संसार तुज लागला ।
संशयो वाटतो पोटीं, बुद्धि दे रघुनायका ॥ १८ ॥

## ( १६ ) दोन भीमरूपी स्तोत्रें.

### ( १ )

भीमरूपी महारुद्रा वज्रहनुमान मारुती ।
वनारी अंजनीसूता रामदूता प्रभंजना ॥ १ ॥
महाबळी प्राणदाता सकळां उठवी बळें ।

१ पुरवीत नाहीं. २ स्वार्थामुळें कठोर. ३ वज्राप्रमाणें बळकट हनुवटी असलेला. ४ रावणाचें वन उध्वस्त करणारा.

साख्यकारी शोकहर्ता धूर्त वैष्णव गायका ।। २ ।।
दिनानाथा हरीरूपा सुंदरा जगदंतरीं ।
पातौळदेवताहंता भव्य शेंदूरलेपना ।। ३ ।।
लोकनाथा जगन्नाथा प्राणनाथा पुरातना ।
पुण्यवंता पुण्यशीला पावना परतोषका ।। ४ ।।
ध्वैजांगें उचली बाहो, आवेशें लोटला पुढें ।
काळाग्नी काळरुद्राग्नी देखतां कांपती भयें ।। ५ ।।
ब्रह्मांडें माइलीं नेणों आवळे दंतपंगती ।
नेत्राग्नी चालिल्या ज्वाळा, भ्रुकुटी ताठिल्या बळें ।। ६ ।।
पुच्छ तें मुर्डिलें माथां, किरीटी कुडलें वरी ।
सुवर्णकटिकासोटी घंटा किंकिणि नागरीं ।। ७ ।।
ठकौरे पर्वता ऐसा नेटका सडपातळू ।
चपलांग पाहतां मोठें महाविद्युल्लतेपरी ।। ८ ।।
कोटिच्या कोटि उड्डाणें झेंपावे उत्तरेकडे ।
मंदैाद्रिसारिखा द्रोण क्रोधें उत्पाटिला बळें ।। ९ ।।
आणिला मागुती नेला, आला गेला मनोगैती ।
मनासी टाकिलें मागें गतीसी तुळणा नसे ।। १० ।।
अणूपासूनि ब्रह्मांडा-एवढा होत जातसे ।
ब्रह्मांडाभोंवतें वेढे स्वपुच्छें घालवूं शके ।। ११ ।।
तयासी तुळणा कोठें ? मेरुमंदार धाकुटें ।
तयासी तुळणा कैंची ? ब्रह्मांडीं पाहतां नसे ।। १२ ।।
आरक्त देखिलें डोळां, गिळिलें सूर्यमंडळा ।

१ भूतमात्रांच्या हृदयीं राहणारा. २ लंकेचा प्राण घेणारा. ३ 'ध्वजाग्रें' पाठभेद. ४ सुंदर. ५ ठाण घेऊन उभा रहातो. ६ मंदाद्रीच्या बरोबरीचा द्रोण-पर्वत ७ मनाइतकी चंचलगति ज्याची असा. ८ अत्यंत सूक्ष्म व अत्यंत स्थूल.

वाढतां वाढतां वाढे, भेदिलें शून्यमंडळा[1] ॥ १३ ॥
भूतप्रेतसमंधादी रोगव्याधी समस्तही ।
नासती तुटती चिंता आनंदें भीमदर्शनें ॥ १४ ॥
हे धरा पंधराश्लोकी लाभली शोभली भली ।
दृढ देहो निसंदेहो संख्या चंद्रकळागुणें[2] ॥ १५ ॥
रामदासीं अग्रगणू[3] कपिकुळासि मंडणू ।
रामरूपी अंतरात्मा दर्शनें दोष नासती ॥ १६ ॥

## (२)

कपिवर उठला तो, वेग अद्‌भूत केला
त्रिभुवनजनलोकीं[4] कीर्तिचा घोष झाला ।
रघुपति उपकारें दाटले थोर भारें[5] !
' परम धिर उदारें रक्षिलें सौख्यकारें ' ॥ १ ॥
सबळ दळें[6] मिळालें, युद्ध उदंड झालें
कपिकटक निमालें[7], पाहतां येश गेलें ।
परदळशरघातें कोटिच्या कोटि प्रेतें
अभिनव रणपातें दुःख बिभीषणातें ॥ २ ॥
कपिरिसघनदाटीं जाहली थोर आटी
म्हणवुनि जगजेठी[8] धांवणें चार कोटी ।
मृतिविरहित[9] ठेले मोकळे सिद्ध झाले

१ आकाशमंडळाला भेदून जाणारा. २ सोळा कळा. ३ रामभक्तांत श्रेष्ठ. ४ स्वर्ग, मृत्यु व पाताळ ह्या तीन लोकांत. ५ रामरायही मारुतीच्या उपकार-भाराखालीं लवले ! ६ दोन्हीकडचे शिपाई. ७ मेले. ८ रामपक्षीय वानर व रीस हे संग्रामांत कामास आले, म्हणून जगजेठी म्ह. जगांत श्रेष्ठ अशा मारुतीरायाला चार कोटि योजनें दूर उड्डाण करावें लागलें. ९ त्यांना मरणापासून सोडविलें व तेही वीर पुन्हा युद्धाला ' सिद्ध झाले '

सकळ जन निर्वाले[1], धन्य सामर्थ्य चाले ॥ ३ ॥
बहुप्रिय रघुनाथा, मुख्य तूं प्राणनाथा
उठविं मज अनाथा, दूर सांडोनि वेथा।
झडकरि भिमराया, तूं करी दृढ[2] काया
रघुविरभजना या लागवेगेंचि जाया ॥ ४ ॥
तुजविण मज पाहे, पाहतां कोण आहे?
म्हणउनि मन माझें, रे तुझी वाट पाहे।
निजें[3] तुज निरवीलें, पाहिलें आठवीलें,
सकळिक निजदासा-लागिं सांभाळवीलें[4] ॥ ५ ॥
उचित हित करावें, उद्धरावें धरावें,
अनहित न करावें, त्वां जनीं येश[5] घ्यावें।
अघटित घडवावें, सेवकां सोडवावें,
हरिभजन घडावें, दुःख तें वीघडावें ॥ ६ ॥
प्रभुवर विररार्या[6], जाहली दृढ काया
परदळ निवटाया, दैत्यकूळें कुटाया[7]।
गिरिवर उपटाया, रम्य वेषें नटाया[8]
तुजचि अलग ठार्यां[9] ठेविलें मुख्य ठाया ॥ ७ ॥

१ आनंदित झाले. २ रोगमुक्त व सुदृढ कर. समर्थ दुखण्यानें आजारी पडले होते त्या वेळीं या स्तोत्रानें त्यांनीं मारुतिरायांची प्रार्थना केली. ३ रामानें आपले भक्त तुझ्या स्वाधीन केले आहेत. ४ श्रीसमर्थांचा उपदेश साक्षात् रामरायांनीं दिला होता; पण मारुतिरायांच्या हातीं ते देऊन गेले होते. 'उपदेश देवोनि दिधला मारुति। स्वयें रघुपति निरवीता,' असें समर्थांनीच एका अभंगांत म्हटलें आहे; व 'राम हनुमंत आत्मरूपी' ह्याप्रमाणें दोघांचें ऐक्य झाल्याचें पुढें वर्णिलें आहे. 'आपल्या सर्व भक्तांचा सांभाळ रामराय तुजकडून करवितात.' ५ यश. ६. अद्‌भुत पराक्रम. ७ वीरसावें. ८ वीरश्रेष्ठा. ९ वेगळ्या स्वतंत्र ठिकाणीं.

बहुत सबळ सांठा, मागतों अल्प वांटा,
न करित हित कांठा थोर होईल ताठा ।
कृपणपण नसावें, भव्य लोकीं दिसावें,
अनुदिन करुणेचें चिन्ह पोटीं वसावें ॥ ८ ॥
जळधर करुणेचा अंतरामाजि राहे,
तरि तुज करुणा हे कां न ये सांग पा हे ।
कठिण हृदय झालें ? काय कारुण्य गेलें ?
न पवसि मज कां रे ? म्यां तुझें काय केलें ॥ ९ ॥[1]
वडिलपण धरावें, सेवकां सांवरावें,
अनहित न करावें, तूर्त हातीं धरावें ।
निपटचि हटवादें प्रार्थिला शब्दभेदें
कपि घन करुणेचा बोळला रामवेधें ॥ १० ॥
बहुताचि करुणा या लोटली देवराया
सहजचि कपिकेतें जाहली दृढ काया ।
परमसुख विलासें सर्व दासानुदासें
पवनतनुज तोषें वंदिलें सावकाशें ॥ ११ ॥

## (१७) अंजनीगीत.

लंकेहूनी अयोध्ये येतां । राम लक्ष्मण सीता ।
हनुमंतें अंजनीमाता । दाखविली रामा ॥ १ ॥
चवघें केला नमस्कार । काय बोले रघुवीर ।
" तुझ्या कुमरें आम्हां थोर । उपकार केला ! ॥ २ ॥
सीताशुद्धी येणें केली । लक्ष्मणाची शक्ती हरिली ।
लंका जाळुनि निर्दाळिली । राक्षससेना ॥ ३ ॥
अहिरावण महिरावण जाणा । घात करिती अमुच्या प्राणा ।

१ तुझ्या ठायीं रामभक्ति व शक्तियुक्ति बहुत आहे, त्यांतला अंश मला दे.

देवीरूपें दोघाजणां । राक्षियलें माते ! ॥ ४ ॥
अठरा पद्में वानरभार । श्रमें युद्ध केलें फार ।
शिळासेतू हा सागर । समाप्त केला ॥ ५ ॥
माते, तुझ्या उदरीं जाण । हनूमान जन्मला रत्न ।
एवढें माझें रामायण । याचेनि योगें " ॥ ६ ॥
ऐकुनि पुत्राची ही स्तुति । माता तुच्छ मानी चित्तीं ।
" व्यर्थ कां बा रघुपती ! । वाहसी भार ॥ ७ ॥
हा कां माझ्या उदरीं आला । गर्भींहूनी नाहीं गळला ! ।
आपण असतां कष्टवीला । श्रीराम माझा ॥ ८ ॥
माझ्या दुग्धाची हे प्रौढी । कळिकाळाची नरडी मुरडी ।
रावणादिक हीं बापुडीं । घुंघुरटीं तेथें ! ॥ ९ ॥
असत्य रामा, वाटेल बोली । " दुग्धधारा सोडियेली ।
शैला–उदरीं खोंचविली । त्रिखंड तेव्हां ॥ १० ॥
वेणीदंड परताळिला । लंकेलागीं वेढा दिधला ।
आणुनि रामासी दाखविला । अंजनीमातें ॥ ११ ॥
सीता बोले अंजनीसी । " कां कोपशी बाळकाशीं ।
रामें आज्ञा हनुमंतासी । दिधली नव्हती " ॥ १२ ॥
आश्चर्य वाटलेंसे रामा । म्हणे " माते, धन्य महिमा "
पादपद्में अवघां जणां । वंदिलें भावें ॥ १३ ॥
अत्यंत जिवलग सखा । हनुमंत भक्त निका ।
रामदासपाठीराखा । महारुद्र तो ॥ १४ ॥

## ( १८ ) अभंग.

### ( १ )

छत्रासिंहासनीं अयोध्येचा राजा । नांदतसे माझा मायबाप ॥१॥

१ उपकाराचें ओझें. २ चिलटें, अतितुच्छ.

माझा मायबाप त्रिलोकीं समर्थ । सर्व मनोरथ पूर्ण करी ॥ २ ॥
पूर्ण प्रतापाचा कैवारी देवांचा । नाथ अनाथांचा स्वामी माझा ॥३॥
स्वामी माझा राम योगिया विश्राम । सांपडलें वर्म थोर भाग्यें ॥४॥
थोर भाग्य ज्याचें राम त्याचे कुळीं । संकटीं सांभाळी भावबळें ॥५॥
भावबळें जेहीं धरिला अंतरीं । तया क्षणभरीं विसंभेना ॥ ६ ॥
विसंभेना कदा आपुल्या दासासी । रामीरामदासीं कुळस्वामी ॥ ७ ॥

( २ )

राघवाची कथा पतीतपावन । गाती भक्तजन आवडीनें ॥ १ ॥
राघवाच्या गुणा न दिसे तुळणा । कैलासींचा राणा लांचावला ॥२॥
देवांचें मंडण भक्तांचें भूषण । धर्मसंरक्षण राम येक ॥ ३ ॥
रामदास म्हणे धन्य त्यांचें जिणें । कथानिरूपणें जन्म गेला ॥ ४ ॥

( ३ )

ठकाराचें ठाण करी चापबाण । माझें ब्रह्मज्ञान ऐसें आहे ॥ १ ॥
रामरूप देहो जाला निःसंदेहो । माझे मनीं राहो निरंतर ॥ २ ॥
मुखीं रामनाम चित्तीं घनश्याम । होतसे विश्राम आठवितां ॥ ३ ॥
रामदास म्हणे रामरूपावरी । भावें मुक्ति चारी वोवाळीन ॥ ४ ॥

( ४ )

पुण्याचें माहेर सार्थकाचें घर । बहुतांचें छत्र स्वामी माझा ॥ १ ॥
स्वामी माझा राम योगाचें मंडण । संसारखंडण महाभय ॥ २ ॥
महाभय कैचें अभेदभक्तासी । रामीरामदासीं धन्य वेळा ॥ ३ ॥

( ५ )

माझें सर्व जावो तुझें नाम राहो । हाचि माझा भावो अंतरींचा ॥१॥
पतीतपावन नाम हें जाईल । मग कोण राहील तुजपासीं ? ॥ २ ॥
पतीतपावन नाम कैसें राहे । कासावीस होये जीव माझा ॥ ३ ॥
याल्लागीं राघवें भक्तां उद्धरावें । आपुलें राखावें ब्रीद देवा ॥ ४ ॥

रामदास म्हणे देवा तुझी आण । श्रीदासाठीं प्राण देइजेतो ॥ ५ ॥

( ६ )

जठरीं लागो क्षुधा, होत नाना आपदा ।
भक्तिप्रेम कदा न संडी सत्य ॥ १ ॥
शब्द न फुटे तरी चिंतीन अंतरीं ।
भक्तिप्रेम कदा न संडी सत्य ॥ २ ॥
नानापरी आघात चिरकाळ होत ।
भक्तिप्रेमामृत न संडी सत्य ॥ ३ ॥
दाहू वडवानळ अथवा दंशू काळ ।
भक्तिप्रेमबळ न संडी सत्य ॥ ४ ॥
आतांच हा देह राहो अथवा जावो ।
भक्ति-प्रेमभावो न संडी सत्य ॥ ५ ॥
म्हणे रामीरामदास वरी पडो आकाश ।
राघवाची कास न सोडी सत्य ॥ ६ ॥

( ७ )

दासाची संपत्ती राम सीतापती । जीवाचा सांगाती राम एक ॥ १ ॥
राम एक माता राम एक पिता । राम एक भ्राता सहोदर ॥ २ ॥
सहोदर विद्या वैभव कांचन । सर्व हा स्वजन राम एक ॥ ३ ॥
राम एक स्वामी राम हा कैवारी । लाभ या संसारीं राम एक ॥४॥
राम एक ज्ञान राम एक ध्यान । राम समाधान रामदासीं ॥ ५ ॥

( ८ )

कां वो राममाये, दुरी धरियलें । कठिण कैसें जालें चित्त तुझें ॥१॥
देउनी आलिंगन प्रीतिपडिभरें । कैं मुख पीतांबरें पुसशील ? ॥ २ ॥
घेउनी कडिये धरुनी हनुवटी । कैं गुजगोष्टी सांगशील ॥ ३ ॥
रामदास म्हणे केव्हां संबोखिसी । प्रेमपान्हा देशी जननीये ॥ ४ ॥

( ९ )

अपराधी अपराधी । आम्हा नाहीं दृढबुद्धी ।। १ ।।
माझे अन्याय अगणित । कोण करील गणित ।। ध्रु. ।।
मज सर्वस्वें पाळावें । प्रतीतीनें सांभाळावें ।। २ ।।
माझी वाईट करणी । रामदास लोटांगणीं ।। ३ ।।

( १० )

शिरीं आहे रामराज । औषधाचें कोण काज ।। १ ।।
जो जो प्रयत्न रामाविण । तो तो दुःखासी कारण ।। ध्रु. ।।
शंकराचें हळाहळ । जेणें केलें सुशीतळ ।। २ ।।
आम्हां तोचि तो रक्षिता । रामदासीं नाहीं चिंता ।। ३ ।।

( ११ )

बाळक जाणेना मातेसी । तिचें मन तयापाशीं ।। १ ।।
तैसा देव हा दयाळ । करी भक्ताचा सांभाळ ।। ध्रु. ।।
धेनु वत्साचेनि लागें । धांवे त्याच्या मागेंमागें ।। २ ।।
पक्षी घेतसे गगन । पिल्यापाशीं त्याचें मन ।। ३ ।।
मत्स्य[1] आठवितां पाळी । कूर्म दृष्टीनें सांभाळी ।। ४ ।।
रामीं रामदास म्हणे । मायाजाळाचीं लक्षणें ।। ५ ।।

( १२ )

देव जवळीं अंतरीं । भेटी नाहीं जन्मवरी ।। १ ।।
मूर्ति त्रैलोक्यीं संचली । दृष्टि विश्वाची चुकली ।। २ ।।
भाग्यें आले संतजन । झालें देवाचें दर्शन ।। ३ ।।
रामदासीं योग झाला । देहीं देव प्रगटला ।। ४ ।।

( १३ )

पतीतपावना जानकीजीवना । वेगीं माझ्या मना पालटावें ।।ध्रु.।।
मिथ्या शब्दज्ञानें तुज अंतरलों । संदेहीं पडलों मीपणाचे ।।१।।

---

१ मत्स्यी स्मरणानें व कांसवी दृष्टीनें आपल्या पोरांना पोसते.

सदा खळखळ निर्गुणाची घडे । सगुण नावडे ज्ञानगर्वें ॥२॥
रामदास म्हणे ऐसा हा पतित । मीपणें अनंत पाहों जातां ॥३॥

(१४)

कर्ता येक देव तेणें केलें सर्व । तयापासीं गर्व कामा न ये ॥ १ ॥
देह हें देवाचें वित्त कुबेराचें । तेथें या जीवाचें काय आहे ? ॥ २ ॥
देता देवविता नेता नेवविता । कर्ता करविता जीव नव्हे ॥ ३ ॥
निमित्ताचा धणी केला असे प्राणी । पाहतां निर्वाणीं जीव कैंचा ॥४॥
दास म्हणे मना सावध असावें । दुश्चित नसावें सर्व काळ ॥ ५ ॥

(१५)

रात्रंदिस मन राघवीं असावें । चिंतन नसावें कांचनाचें ॥ १ ॥
कांचनाचें ध्यान परस्त्रीचिंतन । जन्मासी कारण हेचि दोनी ॥ २ ॥
दोनी नको धरूं निंदा नको करूं । तेणें हा संसारु तरशील ॥ ३ ॥
नामरूपातीत जाणावा अनंत । दास म्हणे संत-संग धरा ॥ ४ ॥

(१६)

मातापिता जन स्वजन कांचन । प्रियापुत्रीं मन गोवूं नको ॥ १ ॥
गोवूं नको मन राघवावांचुनी । लोकलाज जनीं लागलीसे ॥ २ ॥
लागलीसे परी तुवां न धरावी । स्वहितें करावी रामभक्ती ॥ ३ ॥
जाणे लागे अंतीं बाळा सुलक्षणा । ध्याईं रामराणा दास म्हणे ॥ ४ ॥

(१७)

सगुणाकारितां निर्गुण पाविजे । भक्तीवीण दुजें सार नाहीं ॥ १ ॥
साराचें हें सार ज्ञानाचा निर्धार । पाविजे साचार भक्तियोगें ॥ २ ॥
वेदशास्त्रीं अर्थ शोधोनि पाहिला । त्यांहीं निर्धारिला भक्तिभाव ॥३॥
रामीं रामदासीं भक्तीच मानिली । मनें वस्ती केली रामपायीं ॥ ४ ॥

(१८)

ध्यान लागलें रामाचें । दुःख हरपलें जन्माचें ॥ १ ॥

रामपदांबुजावरी । वृत्ति तोचि मधुकरी ॥ २ ॥
तनु मेघश्याममेळें । चित्त चातक निघालें ॥ ३ ॥
रामवदन-मयंकीं । चक्षुचकोर जालं सुखी ॥ ३ ॥
कीर्तिसुगंध तनूवरी । कूजे कोकीळवैखरी ॥ ४ ॥
रामीरामदास स्वामी । चिंतिताहे अंतर्यामीं ॥ ६ ॥

## ८ (१९) पदें

### (१)

आम्ही काय कुणाचें खातों रे । तो राम आम्हांला देतो रे ॥ ध्रु.॥
बांधिले घुमट किल्ल्याचे तट । तयाला फुटती पिंपळवट ।
तेथें कोण लावितो मोट । बुडाला पाणी घालीतो ? ॥ १ ॥
खडक फोडितां सजिव रोडकी । पाहिली सर्वांनीं बेडकी ।
सिंधु नसतां तियेचे मुखीं । पाणी कोण घालितो ? ॥ २ ॥
पहा रे पहा मातेचिये स्तनीं । चिंतितां रक्तमांस मलखाणी ।
तिथें विमल दुग्ध घालोनी । कोण पोशितो ? ॥ ३ ॥
नसतां पाण्याचे बुडबुडे । सदासर्वदा गगन कोरडें ।
दास म्हणे जीवन चहुंकडे । पाडुनी सडे, पीक उगवतो ? ॥ ४ ॥

### (२)

श्रीगुरुचे चरणकंज[२] हृदयीं स्मरावें ॥ ध्रु ॥
निगम निखिलें[३] साधारण सुलभाहुनि सुलभ बहु ।
इतर योगयागविषमपंथिं[४] कां शिरावें ? ॥ श्री० ॥१॥

---

१ हें सुंदर पद 'मी समर्थांच्या मठांतले त्यांचे शिष्य पोसतों' म्हणून शिवरायाला अहंकार झाला होता तो घालविण्याकरितां समर्थांनीं त्यास रानांत नेऊन 'खडक फोडून सजीव बेडकी' दाखविली तेव्हां रचिलें आहे. चारही दृष्टांत सृष्टींतले समर्पक असल्यामुळें या पदाला अपूर्व गोडी आली आहे. २ चरणकमल. ३ सर्व वेदांनीं कमतानें सांगितलेलें. ४ योगयागादि बिकटमार्गांत.

नरतनु दृढ नावेसी बुडवुनि अति मूढपणें ।
दुष्ट नष्ट कुकरसुकर तनु कां फिरावें ? ॥ श्री० ॥ २ ॥
रामदास विनवी तुज, अजुनि तरी समज उमज ।
विषयवीष पेउनियां फुकट कां मरावें ॥ श्री० ॥ ३ ॥

( ३ )

देव पावला रे । देव पावला रे ॥ ध्रु. ॥
धांवा केला भक्तजनीं । आली देवाची धांवणी ॥ देव० ॥ १ ॥
देव घातले बांदोडीं । तेथें राम घाली उडी ॥ देव० ॥ २ ॥
रामीं रामदासीं भेटीं । जाली संसारांची तुटी ॥ देव० ॥ ३ ॥

( ४ )

माझे मनींचे मनोरथ पुरले वो साजणी ।
घननीळ तनु चापपाणी देखोनी ॥ ध्रु. ॥
स्वप्नीं देखिलें तें साचचि जालें । तेणें गुणें मन हें निवालें ॥ १ ॥
कल्पिलें तेंचि जालें चिंतिलें फळा आलें । अंतरीं बिंबलें ध्यान राघवाचें॥ २
सगुणें निर्गुण केलें निजरूप लाधलें । रामदास म्हणे भलें नरदेहें॥ ३ ॥

( ५ )

राघव पुण्यपरायण रे । राघव० ॥ ध्रु० ॥
दुष्ट संहारुनि धर्म स्थापिला । आनंद केला उदंड ॥ १ ॥
धर्मपरायण धार्मिक राजा । सकळहि नीतिन्याय ॥ २ ॥
रामराज्य सुखरूप भूमंडळ । दुःखशोक दुरि जाय ॥ ३ ॥

( ६ )

आळस खोटा रे । बापा ! आळस खोटा रे ॥ ध्रु. ॥
धष्टपुष्ट धाटामोठा । व्यर्थचि ताठा रे । बापा आळस० ॥ १ ॥
आळस मोठा तोचि करंटा । जाइल कोणा घाटा रे । बापा ॥ २ ॥
दास म्हणे रे यत्न ऊचटा । वैभव सर्व लूटा रे । बापा० ॥ ३ ॥

# २० उपसंहार–आरत्या, वरयाचना वगैरे.

( समर्थांच्या आरत्या महाराष्ट्रांत घरोघर झाल्या आहेत. ‘सुखकर्ता दुखहर्ता’ ही गणपतीची, ‘लवथवती विक्राळा’ ही शंकराची, ‘पंचानन हयवाहन’ ही खंडोबाची, ‘अघहरणी पुष्करणी’ ही व्यंकटेशाची, इ. आरत्या लोकप्रसिद्ध आहेत. पुढें त्यांच्या उपास्याच्या तेवढ्या तीन आरत्या दिल्या आहेत.)

## ( १ ) आरत्या

### ( १ )

साफल्या निजवल्या कौसल्या माता ।
भूकन्या अनन्या मुनिमान्य सीता ।
खेचर वनचर फणिवर निजभ्राता ।
दशरथ नृपनायक धन्य तो पिता ॥ १ ॥
जय देव जय देव जय रविकुळटिळका ।
आरती ओंवाळूं त्रिभुवननायका ॥ जय देव० ॥ध्रु.॥
आचार्यां गुरुवर्यां कार्याचें फळ ।
ऋषिकुळमंडण खंडण संसारमूळ ।
सुरवर मुनिवर किन्नर पाहती सकळ ।
धन्य ते निजदास भक्त प्रेमळ ॥ २ ॥

### ( २ )

नाना देहीं देव एक विराजे । नाना नाटकलीला सुंदररुप साजे ।
नानातीर्थीक्षेत्रीं अभिनव गति गाजे । अगाध महिमा तूझा ब्रह्मांडीं माजे
जयदेव जयदेव जयआत्मारामा। निगमागम शोधितां न कळे गुणसीमा॥ध्रु.
बहुरूपी बहुगुणी बहुता काळाचा । हरिहरब्रह्मादिक देव सकळांचा ।
युगानुयुगीं आत्माराम आमुचा । दास म्हणे महिमा न बोलवे वाचा ॥२॥

### ( ३ )

सत्राणें उड्डाणें हुंकार वदनीं । करि डळमळ भूमण्डळ सिंधुजळ गगनीं ॥ कडाडिलें ब्रह्मांड धोका त्रिभुवनीं । सुरवरनर नीशाचर त्या

झाल्या पळणी ॥१॥ जयदेव जयदेव जयजय हनुमंता । तुमचेनि प्रतापें न भियें कृतांता ॥ जयदेव जयदेव. ॥ ध्रु.॥ दुमदुमलें पाताळ उठला पड--शब्द । धगधगिला धरणीधर मानीला खेद ॥ कडाडिले पर्वत उडुगण उच्छेद । रामीं रामदासा शक्तीचा शोध ॥ २ ॥

## ( २ ) वरयाचना

### ( १ )

पावन भिक्षा दे रामा । दीनदयाळा दे रामा ॥ध्रु.॥
अभेदभक्ती दे रामा । अर्थारोहण दे रामा ॥ १ ॥
तद्रूपता मज दे रामा । आत्मनिवेदन दे रामा ॥ २ ॥
सज्जनसंगति दे रामा । अलिप्तपण मज दे रामा ॥ ३ ॥
ब्रह्मअनुभव दे रामा । अनन्यसेवा दे रामा ॥ ४ ॥
मजविण तुज मज दे रामा । दास म्हणे मज दे रामा ॥५॥

### ( २ )

कोमळ वाचा दे रामा । विमळ करणी दे रामा ॥ ध्रु. ॥
प्रसंगवोळखी दे रामा । धूर्तकळा मज दे रामा ॥ १ ॥
अंतरपारख दे रामा । बहुजनमैत्री दे रामा ॥ २ ॥
हितकारक तें दे रामा । जनसुखकारी दे रामा ॥ ३ ॥
विद्यावैभव दे रामा । उदासीनता दे रामा ॥ ४ ॥
मागों नेणे दे रामा । मज न कळे तें दे रामा ॥ ५ ॥
तुझी आवडी दे रामा । दासीं गुणगुण दे रामा ॥ ६ ॥

### ( ३ )

संगीत गाणें दे रामा । आलाप गोडी दे रामा ॥ ध्रु. ॥
धातामाता दे रामा । शब्द मनोहर दे रामा ॥ १ ॥
सावधपण मज दे रामा । बहु पाठांतर दे रामा ॥ २ ॥
दास म्हणे रे गुणधामा । उत्तमगुण मज दे रामा ॥ ३ ॥

### ( ३ ) रामदास्य

काया वाचा मनें यथार्थ रामीं रमणें ।
तरीच श्लाघ्यवाणें रामदास्य ॥ १ ॥
काम क्रोध दवडणें मदमत्सर दंडणें । तरीच० ॥ २ ॥
परस्त्रीनपुंसक होणें परद्रव्यीं पेळणें । तरीच० ॥ ३ ॥
जैसें मुखें बोलणें तैसी क्रिया करणें । तरीच० ॥ ४ ॥
मायानिर्वचज्ञानें ज्ञेयाचि होणें । तरीच० ॥ ५ ॥
रामदास म्हणे निर्गुणसुख लाधणें । तरीच० ॥ ६ ॥

### (४) संप्रदायपरंपरा

#### ( १ )

**आदिनारायण** सद्गुरु आमुचा । शिष्य जाला त्याचा महाविष्णु॥१॥
तयाचा जो शिष्य तो जाणावा **हंस** । तेणें **ब्रह्मयास** उपदेशिलें ॥२॥
उपदेश केला त्याघरी **वसिष्ठा** । तेथें धरा निष्ठा शुद्धभावो ॥ ३ ॥
**वशिष्ठें** उपदेशिलें श्रीरामरायासी । रामें रामदासीं उपदेशिलें ॥ ४ ॥

#### ( २ )

उपदेश देवोनी दिधला मारुती । स्वयें रघुपती निरविता ॥ १ ॥
निरवितां तेणें जालों रामदास । संसारीं उदास म्हणउनी ॥ २ ॥
म्हणोनी आमुचे कुळीं कुळदैवत । राम हनुमंत आत्मरूपी ॥ ३ ॥
आत्मरूपी जाला रामीरामदास । केला उपदेश दीनोद्धारा ॥ ४ ॥

#### ( ३ )

हनुमंत आमुची कुळवेली । राममंडपीं वेला गेली ।
श्रीरामभजनें फळली । रामदास बोले ॥ १ ॥
आमुचे कुळीं हनुमंत । हनुमंत आमुचें देवत ।
तयावीण आमुचा परमार्थ । सिध्दीतें न पावे कीं ॥ २ ॥

साह्य आम्हांसी हनुमंत । आराध्यदैवत श्रीरघुनाथ ।
गुरु श्रीराम समर्थ । उणें काय दासासी ? ॥ ३ ॥
दाता येक रघुनंदन । वरकड लंडी देइल कोण ।
हे त्यागोन आम्ही जन । कवणाप्रती मागावें ? ॥ ४ ॥
म्हणोन आम्ही रामदास । रामचरणीं आमुचा विश्वास ।
कोसळोन पडो हें आकाश । परी आणिकाची वास न पाहों॥५॥
स्वरूप-संप्रदाय अयोध्या-मठ । जानकी देवी, श्रीरघुनाथ दैवत ।
मारुतिउपासना नेमस्त । वाढविला परमार्थ रामदासीं ॥ ६ ॥

(५) उपसंहार

नेणों भक्ती नेणों भाव । आम्ही नेणों दुजा देव ॥ १ ॥
राघवाचे शरणागत । आहों रामनामांकित ॥ २ ॥
मुखीं रामनामावळी । काळ घालूं पायातळीं ॥ ३ ॥
रामदासीं रामनाम । बाधूं नेणे क्रोधकाम ॥ ४ ॥

(२)

रामा रामा रामा रामा रघुनंदना ।
रामा रामा रामा रामा कुळभूषणा ॥ १ ॥
रामा रामा रामा रामा जानकीपती ।
रामा रामा रामा रामा विमळमती ॥ २ ॥
रामा रामा रामा रामा दीनवत्सला ।
रामदास म्हणे तुझी अगम्य लीला ॥ ३ ॥

(३)

रामा रामा रामा रामा रामा रामा ।
तारीं तारीं तारीं तारीं तारीं आम्हां ॥ १ ॥
तोडीं तोडीं तोडीं तोडीं भवपाश ।
अन्यन्यशरण रामीं रामदास ॥ २ ॥

( ४ )

रामा हो जय रामा हो । पतीतापावन पूर्णकामा हो ॥ १ ॥
नाथा हो दीनानाथा हो । तुमचे चरणीं राहो माथा हो ॥२॥
बंधु हो दीनबंधु हो । रामदास म्हणे दयासिंधु हो ॥ ३ ॥

## ( २१ ) धन्यतेचे उद्गार.

(ज्यासाठीं व ज्यांच्या बळावर परमार्थराजकारणाचा किंवा प्रपंचपरमार्थाचा एवढा अट्टाहास केला तें सर्व मी भरून पावलों असे धन्यतेचे उद्‌गार समर्थांच्या तोंडून अनेकवार निघाले आहेत. ‘कुलदेवी तुळजाभवानी’ स्तोत्र ५ व ‘आनंदवनभुवन’ या दोन प्रकरणांत असे जे उद्‌गार निघाले आहेत ते त्या प्रकरणांतून पहावे. येथें त्याशिवाय आणखी चार प्रकरणें देतों. )

( १ )

आम्हां नाहीं चाड ते कोणीयेकाची । दृढ राघवाची कास धरूं ॥१॥
कास धरूं जेणें पावनचि केलें । तेथें माझें जालें समाधान ॥२॥
समाधान जालें प्रत्ययासी आलें । धन्य तीं पाउलें राघवाचीं ॥३॥
राघवाचीं पदें मानसीं धरीन । विश्व उद्धरीन हेळामात्रें ॥ ४ ॥
हेळामात्रें मुक्त करीन या जना । तरीच पावना राघवाचा ॥ ५ ॥
राघवाचा दास मी जालों पावन । पतीत तो कोण उरों शके ? ॥६॥
उरों शके ऐसें कल्पांतीं घडेना । जो कोणी पुसेना त्यासी उणें ॥७॥
आम्हां नाहीं उणें राघवाच्या गुणें । ब्रीदचि राखणें पावनाचें ॥ ८ ॥
कितीयेक जन ज्ञानें उद्धरिले । कृतकृत्य जाले तत्काळचि ॥ ९ ॥
येणें काळें मोक्ष जरी मी देईना । दास म्हणवी ना राघवाचा ॥१०॥
राघवाचा वर पावलों सत्वर । जनांचा उद्धार करावया ॥ ११ ॥

( २ )

कास या रघुनाथाची । धरितां सुख पावलों ।
इतर कष्टती प्राणी । थोर संसारसांकडीं ॥ १ ॥

साह्य आम्हांसी हनुमंत । आराध्यदैवत श्रीरघुनाथ ।
गुरु श्रीराम समर्थ । उणें काय दासासी ? ॥ ३ ॥
दाता येक रघुनंदन । वरकड लंडी देइल कोण ।
हे त्यागोन आम्ही जन । कवणाप्रती मागावें ? ॥ ४ ॥
म्हणोन आम्ही रामदास । रामचरणीं आमुचा विश्वास ।
कोसळोन पडो हें आकाश । परी आणिकाची वास न पाहों॥५॥
स्वरूप-संप्रदाय अयोध्या-मठ । जानकी देवी, श्रीरघुनाथ दैवत ।
मारुतिउपासना नेमस्त । वाढविला परमार्थ रामदासीं ॥ ६ ॥

## (५) उपसंहार

नेणों भक्ती नेणों भाव । आम्ही नेणों दुजा देव ॥ १ ॥
राघवाचे शरणागत । आहों रामनामांकित ॥ २ ॥
मुखीं रामनामावळी । काळ घालूं पायातळीं ॥ ३ ॥
रामदासीं रामनाम । बाधूं नेणे क्रोधकाम ॥ ४ ॥

(२)

रामा रामा रामा रामा रघुनंदना ।
रामा रामा रामा रामा कुळभूषणा ॥ १ ॥
रामा रामा रामा रामा जानकीपती ।
रामा रामा रामा रामा विमळमती ॥ २ ॥
रामा रामा रामा रामा दीनवत्सला ।
रामदास म्हणे तुझी अगम्य लीला ॥ ३ ॥

(३)

रामा रामा रामा रामा रामा रामा ।
तारी तारी तारी तारी तारी आम्हां ॥ १ ॥
तोडी तोडी तोडी तोडी भवपाश ।
अन्यन्यशरण रामीं रामदास ॥ २ ॥

( ४ )

रामा हो जय रामा हो । पतीतापावन पूर्णकामा हो ।। १ ।।
नाथा हो दीनानाथा हो । तुमचे चरणीं राहो माथा हो ।।२।।
बंधु हो दीनबंधु हो । रामदास म्हणे दयासिंधु हो ।। ३ ।।

## ( २१ ) धन्यतेचे उद्गार.

(ज्यासाठीं व ज्यांच्या बळावर परमार्थराजकारणाचा किंवा प्रपंचपरमार्थाचा एवढा अट्टाहास केला तें सर्व मी भरून पावलों असे धन्यतेचे उद्‌गार समर्थांच्या तोंडून अनेकवार निघाले आहेत. 'कुलदेवी तुळजाभवानी' स्तोत्र ५ व 'आनंदवनभुवन' या दोन प्रकरणांत असे जे उद्‌गार निघाले आहेत ते त्या प्रकरणांतून पहावे. येथें त्याशिवाय आणखी चार प्रकरणें देतों. )

( १ )

आम्हां नाहीं चाड ते कोणीयेकाची । दृढ राघवाची कास धरूं ।।१।।
कास धरूं जेणें पावनचि केलें । तेथें माझें जालें समाधान ।।२।।
समाधान जालें प्रत्ययासी आलें । धन्य तीं पाउलें राघवाचीं ।।३।।
राघवाचीं पदें मानसीं धरीन । विश्व उद्धरीन हेळामात्रें ।। ४ ।।
हेळामात्रें मुक्त करीन या जना । तरीच पावना राघवाचा ।। ५ ।।
राघवाचा दास मी जालों पावन । पतीत तो कोण उरों शके ? ।।६।।
उरों शके ऐसें कल्पांतीं घडेना । जो कोणी पुसेना त्यासी उणें ।।७।।
आम्हां नाहीं उणें राघवाच्या गुणें । ब्रीदचि राखणें पावनाचें ।। ८ ।।
कितीयेक जन ज्ञानें उद्धरिले । कृतकृत्य जाले तत्काळचि ।। ९ ।।
येणें काळें मोक्ष जरी मी देईना । दास म्हणवी ना राघवाचा ।।१०।।
राघवाचा वर पावलों सत्वर । जनांचा उद्धार करावया ।। ११ ।।

( २ )

कास या रघुनाथाची । धरितां सुख पावलों ।
इतर कष्टती प्राणी । थोर संसारसांकडीं ।। १ ।।

साकडीं तोडिलीं माझीं । राघवें करुणालयें ।
पूर्वींच तुटली माया । दुःखशोक विसंचला ॥ २ ॥
सेवकु मानवीयांचे । कष्टती बहुतांपरी ।
सेविला देव देवांचा । तेणें मी धन्य जाहलों ॥ ३ ॥
नीच हे मानवी प्राणी । नीचाश्रय कामा न ये ।
महत्कीर्ति श्रीरामाची । फावला महदाश्रयो ॥ ४ ॥
त्रिबुधा आश्रयो ज्याचा । पावले बंदमोचनें ।
सेवकु मारुती ऐसा । त्याचा मी म्हणती जनीं ॥ ५ ॥
निवाला शिव ज्या नामें । ज्या नामें वाल्मीक ऋषी ।
जें नाम सकळां तारी । तें नाम मज अंतरीं ॥ ६ ॥
कुळ या जगदीशाचें । धन्य वंश भूमंडळीं ।
आपुली वाटती सर्वें । धन्य तूं गा रघूत्तमा ! ॥ ७ ॥
देव हा सर्वांतरात्मा । वात हा त्याजपासुनी ।
वातसुत हनुमंत । रामसेवक हा जनीं ॥ ८ ॥
वन्हि हा जानकीपिता । सूर्य हा वंशभूषणु ।
भूमी हे सीतेची माता । आजा आपोनारायणु ॥ ९ ॥
येकचि अंश विष्णूचे । देवमात्र भुमंडळीं ।
येकांशें चालती सर्वे । यालागीं सव येकची ॥ १० ॥
ऐकती येक येकांचें । येकयेकांसि पाहती ।
जन्मले जीव ते सर्वें । येक देवाचि वर्तवी ॥ ११ ॥
रामउपासना ऐसी । ब्रह्मांडव्यापिनी पहा ।
राम कर्ता राम भोक्ता । रामरूप उपासना ॥ १२ ॥

( ३ )

ऐसा सर्वात्मा राजाधीश । सकळ पाहती सावकाश ।
तेथें पिसाट रामदास । उभा असे दीनरूप ॥ १ ॥

रामचंद्रा ! तुझा वियोग । ऐसा नको रे प्रसंग ।
तुजकारणें सर्वसंग-। त्याग केला ॥ २ ॥
रामा, तुझिये स्वामीपणें । मी ब्रह्मांड मानी ठेंगणें ।
स्वामी ! तुजवीण कोण जाणे । अंतर आमुचें ? ॥ ३ ॥
तुजविण मज माया । कांहीं नाहीं रे रामराया ।
आम्हां अनाथां कासया । उपेक्षिसी ॥ ४ ॥
सगुण रघुनाथ मुदल । माझें इतकेंचि भांडवल ।
कासें धरून ठाकीन पैल । पार भवाचा ॥ ५ ॥ ( जु.दा.२ )

( ४ )

रामासी इतुकें मागावें । जे आपणचि राम व्हावें ।
कां रामासी दास करावें । आपणा ऐसें ॥ १ ॥
तूं ऐसा कां मीच असोन । त्याहून नलगे आम्हांसी आन ।
तुझ्या ठायीं दासपण । आणीन तरी मी होय ! ॥ २ ॥
तुवां पाषाण तारिले । तरी आम्हींही जडजीव उद्धरिले ।
तुवां देव मुक्त केले । बंधनापासूनी ॥ ३ ॥
तरी आम्हींही भाविकांसी । सोडवूनियां मोक्षपदासी-।
पावविलें तयांसी । मागुता जन्म नाहीं ॥ ४ ॥
तुवां जरामरण केलें दुरी । तें मुळींच नाहीं आमुचे घरीं ।
तूं राजा अक्रा सहस्रवरी । तरी आम्हांसी संख्या नाहीं ॥५॥
तुवां पुरी नेली वैकुंठा । आम्हीं वैकुंठींच्या बारा वाटा ।
करूनि मांडिला चोहटा । तया वैकुंठाचा ॥ ६ ॥
ऐसे बोलती रामदास । निधडे सर्वस्व उदास ।
वैभव वाटे जयास । कसपट जैसें ॥ ॥ ७ ॥
ऐसें बोलणें ऐकिलें । रामें मंद हास्य केलें ।
धांवोनियां हृदयीं धरिलें । आपुलिया निजदासा ॥ ८ ॥

ऐसा भक्ताचा वेळाईत । दासाभोंवता भोंवत ।
क्षणयेक न विसंबत । भावार्थ देखोन भुलला ।। ९ ।।
रामें आपणासारिखें केलें । दास दासपणा मुकले ।
रामासि मिळोनि एकाचि जाले । एकपणावेगळे ! ।। १० ।।
ऐसें देवाभक्तांचें साजणें । जीव घेणें जीव देणें ।
पुन्हां मागुतें येणें जाणें । न घडे कदा ।। ११ ।।
नवविधा भक्ति याचि कारणें । जे आपण स्वयें रामाचि होणें ।
स्वयेंचि रामपणें ठाकणें । स्वानुभवेंकरूनी ।।१२।। (जु. दा. १६)

# ३ परमार्थ-ज्ञानविज्ञान.

## ( १ ) परमार्थ म्ह० अध्यात्मयोग.

आतां स्तऊं हा परमार्थ । जो साधकांचा निजस्वार्थ ।
नातरी समर्थांमध्यें समर्थ । योग हा ॥ १ ॥
आहे तरी परम सुगम । परी जनांसी जाला दुर्गम ।
कां जयाचें चुकलें वर्म । सत्समागमाकडे ॥ २ ॥
नाना साधनांचें उधार । हा रोकडा ब्रह्मसाक्षात्कार ।
वेदशास्त्रीं जें सार । तें अनुभवास ये ॥ ३ ॥
आकाशमार्गीं गुप्त पंथ । जाणती योगिये समर्थ ।
इतरांस हा गुह्यार्थ । सहसा न कळे ॥ ४ ॥
साराचेंही निजसार । अखंड अक्षय अपार ।
नेऊं न सकती तस्कर । कांहीं केल्या ॥ ५ ॥
तयास नाहीं राजभय । अथवा नाहीं अग्निभय ।
अथवा श्वापद-भय । बोलोंचि नये ॥ ६ ॥
परब्रह्म तें हालवेना । अथवा ठांवही चुकेना ।
काळांतरींही चळेना । जेथेंचि तेथें ॥ ७ ॥
ऐसें तें निज ठेवणें । कदापी पालटों नेणें ।
अथवा नव्हे अधिकउणें । बहुतां काळें ॥ ८ ॥

---

१ परमार्थ सुलभ आहे, पण सत्संगाचें वर्म चुकल्यामुळें लोकांस बिकट वाटतो. सत्संग घडेल तर सुलभ आहे. २ इतर साधनें उधारीचीं आहेत, पण हा परमार्थ ( अध्यात्म, मोक्ष, ब्रह्मज्ञान ) तात्काळ आत्मलाभ करून देतो. ३ गुप्त पंथांचें स्पष्टीकरण 'सारांशांत' केलें आहे. ४ स्वस्थान सोडीत नाहीं.

अपूर्वता या परमार्थाची । वार्ता नाहीं जन्ममृत्यूची ।
अथवा पदवी सायुज्यतेची । सान्निधचि लाभे ॥ ९ ॥
ब्रह्म[1] भासलें उदंड । ब्रह्मीं बुडालें ब्रह्मांड ।
पंचभूतांचें थोतांड । तुच्छ वाटे ॥ १० ॥
या परमार्थाकरितां । ब्रह्मादिकांसी विश्रामता[2] ।
योगी पावती तन्मयता । परब्रह्मीं ॥ ११ ॥
परमार्थी तो राज्यधारी । परमार्थ नाहीं तो भिकारी ।
या परमार्थाची सरी[3] । कोणास द्यावी ॥ १२ ॥
अनंत जन्मींचें पुण्य जोडे । तरीच परमार्थ घडे ।
मुख्य परमात्मा आतुडे[4] । अनुभवासी ॥ १३ ॥
भल्यानें परमार्थी भरावें । शरीर सार्थक करावें ।
पूर्वजास उद्धरावें । हरिभक्ती करूनी ॥ १४ ॥
असो भगवत्प्राप्तीवीण । करी संसाराचा शीण ।
त्या मूर्खाचें मुखावलोकन । करूंच नये ॥१५॥ (द.१स.९)

## ( २ ) सद्गुरु, सच्छिष्य व सच्छास्त्र

### १ सद्गुरूवीण मोक्ष नाहीं.

सद्गुरूवीण ज्ञान कांहीं । सर्वथा होणार नाहीं ।
अज्ञान प्राणी प्रवाहीं[5] । वाहतचि गेले ॥ १ ॥
जयास वाटे देव पहावा । तेणें सत्संग धरावा ।
सत्संगेंवीण देवाधिदेवा । पाविजेत नाहीं ॥ २ ॥
नाना साधनें बापुडीं । सद्गुरूवीण करिती वेडीं ।
गुरुकृपेवीण कुडकुडी । व्यर्थचि होती ॥ ३ ॥
करुनि नाना सायास । केला चौदा विद्यांचा अभ्यास ।

---

१ ब्रह्म म्ह. बृहत्, सर्वांत मोठें, आकाशापेक्षांही व्यापक. २ विश्रांति. ३ बरोबरी. ४ सांपडे. ५ मायानदीच्या ओघाबरोबर.

रिद्धिसिद्धी सावकास । बोळल्या जरी ॥ ४ ॥
तरी सद्‌गुरुकृपेंविरहित । सर्वथा न घडे स्वहित ।
यमपुरीचा अनर्थ । चुकेना येणें ॥ ५ ॥
जैसें नेत्रीं घालितां अंजन । पडे दृष्टीस निधान ।
तैसें सद्‌गुरुवचनें ज्ञान-। प्रकाश होय ॥ ६ ॥
सद्‌गुरूवीण जन्म निर्फळ । सद्‌गुरूवीण दुःख सकळ ।
सद्‌गुरूवीण तळमळ । जाणार नाहीं ॥ ७ ॥
मागें जाले थोरथोर । संत महंत मुनीश्वर ।
तयांसही ज्ञानविचार । सद्‌गुरूचेनि ॥ ८ ॥
श्रीरामकृष्ण आदिकरूनी । अतितत्पर गुरुभजनीं ।
सिद्ध साधु आणि संतजनीं । गुरुदास्य केलें ॥ ९ ॥
असो जयासी मोक्ष व्हावा । तेणें सद्‌गुरु करावा ।
सद्‌गुरूवीण मोक्ष पावावा । हें कल्पांतीं न घडे॥१०॥(५-१)

**२ सामान्य गुरूंहून सद्‌गुरु वेगळा.**

जे करामती दाखविती । तेही गुरु म्हणिजती ।
परंतु सद्‌गुरु नव्हेती । मोक्षदाते ॥ ११ ॥
जे यातीचा जो व्यापार । शिकविती भरावया उदर ।
तेही गुरु, परी साचार । सद्‌गुरु नव्हेती ॥ १२ ॥
आपली माता आणि पिता । तेही गुरुचि तत्वतां ।
तरी पैलपार पाववितां । तो सद्‌गुरु वेगळा ॥ १३ ॥
गायत्रीमंत्राचा उच्चारु । सांगे तो साचार कुळगुरु ।
परी ज्ञानेंवीण पैलपारु । पाविजेत नाहीं ॥ १४ ॥
येक गुरु येक मंत्रगुरु । येक यंत्रगुरु येक तंत्रगुरु ।
येक वस्तादगुरु येक राजगुरु । म्हणती जनीं ॥ १५ ॥

१ पुरलेलें धन, गुप्त ठेवा. २ कलाकुसरी. ३ जातीचा. ४ वास्तविक
५ भवसागराच्या पार नेणारा.

येक कुळगुरु येक मानिला गुरु। येक विद्यागुरु येक कुविद्यागुरु ।
येक असद्गुरु येक यातिगुरु । दंडकर्ते ॥ १६ ॥
येक मातागुरु येक पितागुरु । येक राजागुरु येक देवगुरु ।
येक बोलिजे जगद्गुरु । सकळकळा ॥ १७ ॥
ऐसे हे सप्त गुरु । याहीवेगळे आणीक गुरु ।
येक म्हणती स्वयें गुरु । आपला आपण ॥ १८ ॥
असो ऐसे उदंड गुरु । नानामतांचा विचारु ।
परी जो मोक्षदाता सद्गुरु । तो वेगळाचि असे ॥ १९ ॥

### ३ सद्गुरुलक्षण.

जो ब्रह्मज्ञान उपदेशी । अज्ञान-अंधार निरसी ।
जीवात्मया शिवात्मयासी । ऐक्यता करी ॥ २० ॥
जीव येकदेशी वापुडें । तयास ब्रह्मीचि करी रोकडें ।
फेडी संसारसांकडें । वचनमात्रें ॥ २१ ॥
फोडूनि शब्दाचें अंतर । वस्तु दाखवी निजसार ।
तोचि गुरु, माहेर । अनाथांचें ॥ २२ ॥
जें वेदांचे अभ्यंतरीं । तें काढून अपत्यापरी ।
शिष्यश्रवणीं कवैळ भरी । वचनमात्रें ॥ २३ ॥
संदेह निःशेष जाळी । स्वधर्म आदरें प्रतिपाळी ।
वेदविरहित टवाळी । करूंच नेणे ॥ २४ ॥
मुख्य सद्गुरूचें लक्षण । आधीं पाहिजे विमळ ज्ञान ।
निश्चयाचें समाधान । स्वरूपस्थिति ॥ २५ ॥

१ बृहत् मोठें, व्यापक. जीव देहबुद्धीच्या संकोचामुळें लहान होतो, त्याला सद्गुरु आपणासारखें व्यापक म्ह. ब्रह्म करितात. २ 'तत्वमसि' या वचनानें. ३ घास. ४ 'तत्वमसि' ह्या एकाच वाक्यानें. ५ वेदविरहित म्ह. वेदाला अमान्य करून केलेलें सर्वच कर्म टवाळी होय.

याहीवरी वैराग्य प्रबळ । वृत्ति उदास केवळ ।
विशेष आचारें निर्मळ । स्वधर्मविषयीं ॥ २६ ।
याहीवरी अध्यात्मश्रवण । हरिकथानिरूपण ।
जेथें परमार्थविवरण । निरंतर ॥ २७ ॥
अंतरीं शुद्ध ब्रह्मज्ञान । बाह्य निष्ठेचें भजनें ।
तेथें बहु भक्तजन । विश्रांति पावती ॥ २८ ॥
नाहीं उपासनेचा आधार । तो परमार्थ निरा̊धार ।
कर्मेंवीण अनाचार । भ्रष्ट होती ॥ २९ ॥
जो कोणी ज्ञान बोधी । समूळ अविद्या छेदी ।
इंद्रियदमन प्रतिपादी । तो सद्‌गुरु जाणावा ॥ ३० ॥
जेथें सारासारविचार । तेथें होय जगदुद्धार ।
नवविधा भक्तीचा आधार । बहुत जनांसी ॥ ३१ ॥
म्हणोनि ज्ञानवैराग्य आणि भजन । स्वधर्मकर्म आणि साधन।
कथानिरूपण श्रवणमनन । नीतिन्याय-मर्यादा ॥ ३१ ॥
यामध्यें येक उणें असे । तेणें तें विलक्षण दिसे ।
म्हणोनी सर्वहीं विलसे । सद्‌गुरुपासीं ॥ ३३ ॥

### ४ हे गुरुच नव्हत.

जें जें मन अंगिकारी । तें तें स्वयें मुक्त करी ।
तो गुरु नव्हे, भिकारी । झडे आला ॥ ३४ ॥
शिष्यास न लाविती साधन । न कराविती इंद्रियदमन ।
ऐसे गुरु अडक्याचे तीन । मिळाले तरी टाकावे ॥ ३५ ॥
जें जे रुचे शिष्यामनीं । तैसीच करी मनधरणी ।
ऐसी कामना पापिणी । पडली गळां ॥ ३६ ॥

१ शुद्ध ब्रह्मज्ञान व निष्ठेची उपासना म्ह. ज्ञान व भक्ति हीं दोन्हीं पाहिजेत. २ उपासनेवांचून परमार्थ पोरका होय, सगुणोपासना आधीं पाहिजे.

जो गुरु भीडेसारू[1] । तो अधमाहून अधम थोरु ।
चोरटा मैंद पामरु । द्रव्यभोंदु ॥ ३७ ॥
नि:शेष दुराशा तुटे । तरीच भगवंत भेटे ।
दुराशा धरिती ते वोखटे । शब्दज्ञाते कामिक ॥ ३८ ॥
सिद्धी आणि सामर्थ्य जालें । तेण देहास महत्त्व आलें ।
पुढें बेचौंड[2] बळकावलें । देहबुद्धीचें ॥ ३९ ॥
आचार[3] उपासना सोडिती । ते भ्रष्ट अभक्त दिसती ।
जळो तयांची महंती । कोण पुसे ?॥ ४० ॥ (द.५,स.२)

## ५ सद्गुरु सच्छिष्य, सच्छास्त्र व साधन–चौकडी पाहिजे.

मागां सद्गुरूचें लक्षण । विशद[4] केलें निरूपण ।
आतां सच्छिष्याची वोळखण । सावध ऐका ॥ ४१ ॥
उत्तम भूमि शोधिली शुद्ध । तेथें बीज पेरिलें किडखाद ।
कां तें उत्तम बीज परी संबंध । खडकेसी पाडिला ॥ ४२ ॥
तैसा सच्छिष्य तें सत्पात्र । आणि गुरु सांगे मंत्रतंत्र ।
तेथें अरत्र ना परत्र । कांहींच नाहीं ॥ ४३ ॥
अथवा गुरु पूर्ण कृपा करी । परी शिष्य अनाधिकारी ।
भाग्यपुरुषाचा भिकारी । पुत्र जैसा[5] ॥ ४४ ॥
म्हणोनि सद्गुरु आणि सच्छिष्य । तेथें न लगती सायास ।
त्या उभयतांचा हव्यास । पुरे येकसरा ॥ ४५ ॥
सुभूमि आणि उत्तम कण । उगवेना पर्जन्येंवीण ।
तैसें अध्यात्मनिरूपण । नसतां होय ॥ ४६ ॥

१ भीडखाऊ; शिष्याच्या भिडेनें सत्य सांगायला भिऊन त्याला प्रिय तेंच सांगणारा. २ जाळें. ३ आचार व उपासना सोडून मुक्तपणाच्या गोष्टी सांगणारा महंत महंतच नव्हे. ४ स्पष्ट. ५ बाप श्रीमंत पण मुलगा करंटा.

शेत पेरिलें आणि उगवलें । परंतु निगेवीणें गेलें ।
साधनेंवीण तैसें जालें । साधकांसी ॥ ४७ ॥
आत्मज्ञान जालें । परी साधन पाहिजे केलें ।
येक वेळ उदंड जेविलें । तरी सामग्री पाहिजे ॥ ४८ ॥
म्हणोनी साधन-अभ्यास आणि सद्गुरु । सच्छिष्य आणि सच्छास्त्रविचारु
सत्कर्म आणि सद्वासना पारु । पाववी भवाचा ॥ ४९ ॥
ऐसें हें अवघेंचि मिळे । तरीच विमळ ज्ञान निवळे ।
नाहीं तरी पाखांड संचरे बळें । समुदायीं[2] ॥ ५० ॥
येथें शब्द नाहीं शिष्यासी । हें अवघें सद्गुरूपासी ।
सद्गुरु पालटी अवगुणांसी । नाना यत्नेंकरुनी ॥ ५१ ॥
येथ सद्गुरूचि कारण । येर सर्व निःकारण ।
तथापि सांगों वोळखण । सच्छिष्याची ॥५२॥ (द.५,स.३ )

## ६ सच्छिष्यलक्षण

मुख्य सच्छिष्याचें लक्षण । सद्गुरुवचनीं विश्वास पूर्ण[3] ।
अनन्यभावें शरण । त्या नांव सच्छिष्य ॥ ५३ ॥
शिष्य पाहिजे निर्मळ । शिष्य पाहिजे आचारशीळ ।
शिष्य पाहिजे केवळ । विरक्त अनुतापी ॥ ५४ ॥
शिष्य पाहिजे साक्षेपी विशेष । शिष्य पाहिजे परमदक्ष ।
शिष्य पाहिजे अलक्ष्यें[4] । लक्षी ऐसा ॥ ५५ ॥
शिष्य पाहिजे प्रज्ञावंत[5] । शिष्य पाहिजे प्रेमळ भक्त ।
शिष्य पाहिजे नीतिवंत । मर्यादेचा[6] ॥ ५६ ॥
शिष्य असावा विश्वासी । शिष्य असावा कायाक्लेशी[7] ।

१ निगा, मशागत. २ वरील चारी गोष्टी न मिळाल्यामुळें लोकांत पाखंड मतें पसरतात. ३ सद्गुरुवचनीं पूर्ण विश्वास. ४ ब्रह्माच्या ठिकाणीं लय लावण्यायोग्य. ५ प्रज्ञा व श्रद्धा दोन्ही असतील तो सच्छिष्य. ६ विनयशील, नम्र. ७ शरीरकष्ट घेणारा.

शिष्य असावा परमार्थासी । वाढवूं जाणें ॥ ५७ ॥
जो संसारदुःखें दुखवला । जो त्रिविध तापें पोळला ।
तोचि अधिकारी जाला । परमार्थासी ॥ ५८ ॥
बहु दुःख भोगिलें जेणें । तयासीच परमार्थ बाणे ।
संसारदुःखाचेनि गुणें । वैराग्य उपजे ॥ ५९ ॥
या कारणें दृढविश्वास । तोचि जाणावा सच्छिष्य ।
मोक्षाधिकारी विशेष । अग्रगण्यु ॥ ६० ॥
जो सद्गुरुवचनें निवाला । तो सायुज्यतेचा आंखिला ।
संसारपांगें पांगिला । न वचे कदा ॥ ६१ ॥
सद्गुरूहून देव मोठा । जयास वाटे तो करंटा ।
सुटला वैभवाचा फांटा । सामर्थ्यविसें ॥ ६२ ॥
सद्गुरुस्वरूप तें संत । आणि देवास मांडेल कल्पांत ।
तेथें कैचें उरेल सामर्थ्य । हरिहरांचें ॥ ६३ ॥
असो सद्गुरुपदापुढें । दुजें कांहींच न चढे ।
देवसामर्थ्य तें केवढें । मायाजनित ॥ ६४ ॥
सद्गुरुकृपेचेनि बळें । अपरोक्षज्ञानाचेनि उसाळें ।
मायेसहित ब्रह्मांड सगळें । दृष्टीस न ये ॥ ६५ ॥
ऐसें सच्छिष्याचें वैभव । सद्गुरुवचनीं दृढभाव ।
तेणें गुणें देवराव । स्वयेंचि होती ॥ ६६ ॥
ऐसा सद्भाव अंतरीं । तेचि मुक्तीचे वाटेकरी ।
येर मायिक वेषधारी । असच्छिष्य ॥ ६७ ॥ (द. ५, स. ३)

---

१ श्रेष्ठ. २ अंक घालून आपला म्हटलेला. ३ पराधीन होत नाहीं. ४ देवाच्या सामर्थ्याचें वेड लागून व तें सामर्थ्य मिळविण्याच्या मागें लागून गुरुसेवेला मुकलेला. ५ देव मायेंतले, अर्थात् त्यांचें सामर्थ्यही विनाशी. ६ स्वानुभवाच्या उल्हासानें.

### ७ विषयी तो शिष्य नव्हे.

घाटे विषयांचें सुख । परमार्थ संपादणें लौकिक ।
देखोवेखीं पढतमूर्ख । शरण गेले ॥ ६८ ॥
मानिला प्रपंचीं आनंद । केला परमार्थीं विनोद ।
भ्रांत मूढ मतिमंद । लोधली कामीं ॥ ६९ ॥
तया श्वानमुखीं परमान्न । कीं मर्कटास सिंहासन ।
तैसें विषयासक्तां ज्ञान । जिरेल कैचें ? ॥ ७० ॥
भाव आणिला जायांचा । मंत्र घेतला गुरूचा ।
शिष्य जाला दो दिसांचा । मंत्राकारणें ! ॥ ७१ ॥
असो ऐसे गुणावेगळे । ते सच्छिष्य आगळे ।
दृढ भावार्थें सोहळे । भोगिती स्वानंदाचे ॥ ७२ ॥
मागां जालें निरूपण । गुरुशिष्यांची वोळखण ।
आतां उपदेशाचें लक्षण । सांगिजेल ॥७३॥ ( द. ५, स. ३ )

### ८ हें ज्ञान नव्हे

पाहों जातां पृथ्वीवरी । देवांची गणना कोण करी ?
तितुके मंत्र, वैखरी । किती म्हणोनि वदवावी ॥ ७४ ॥
असंख्यांत मंत्रमाळा । येकाहून येक आगळा ।
विचित्र मायेची कळा । कोण जाणे ? ॥ ७५ ॥
याकारणें ज्ञानासमान । पवित्र न दिसे उत्तम आनें ।
म्हणोनी आधीं आत्मज्ञान । साधिलें पाहिजे ॥ ७६॥ ( स. ४)
जंव तें ज्ञान नाहीं प्रांजळ । तव सर्व कांहीं निर्फळ ।
ज्ञानरहित तळमळ । जाणार नाहीं ॥ ७७ ॥

१. लिगटला. २ जाणारा, ओसरणारा, क्षणिक. ३ अन्य. 'न हि ज्ञानेन सदृशं पवित्रमिदमुत्तमम्' (गीता). ४ स्वच्छ, विशद.

बहुत केलें विद्यापठण । संगीतशास्त्र रागज्ञान ।
वैदिक शास्त्र वेदाध्ययन । हें ज्ञान नव्हे ॥ ७८ ॥
नाना व्यवसायाचें ज्ञान । नाना दीक्षेचें ज्ञान ।
नाना परीक्षेचें ज्ञान । हें ज्ञान नव्हे ॥ ७९ ॥
आदिकरूनि चौसष्टी कळा । याहीविगळ्या नाना कळा ।
चौदा विद्या सिद्धि सकळा । हें ज्ञान नव्हे ॥ ८० ॥
बहुत प्रकारींचीं ज्ञानें । सांगों जातां असाधारणें ।
सायुज्यप्राप्ति होय जेणें । तें ज्ञान वेगळें॥८१॥ (द.५;स.५)

९ शुद्धज्ञानाचें लक्षण

ऐक ज्ञानाचें लक्षण । ज्ञान म्हाणिजे आत्मज्ञान ।
पाहावें आपणासि आपणें[२] । या नांव ज्ञान ॥ ८२ ॥
मुख्य[३] देवास जाणावें । सत्यस्वरूप वोळखावें ।
नित्यानित्य विचारावें । या नांव ज्ञान ॥ ८३ ॥
जेथें दृश्य प्रकृति[४] सरे । पंचभूतिक वोसरे ।
समूळ द्वैत निवारे । या नांव ज्ञान ॥ ८४ ॥
जेथें नाहीं दृश्यभान । जेथें जाणीव हें अज्ञान ।
विमळ शुद्ध स्वरूपज्ञान । यासि बोलिजे ॥ ८५ ॥
सर्वसाक्षिणी अवस्था तुर्या । ज्ञान ऐसें म्हणती तया ।
परी तें जाणिजे वायां । पदार्थज्ञानें[६] ॥ ८६ ॥
ज्ञान म्हाणिजे अद्वैत । तुर्या प्रत्यक्ष द्वैत ।
म्हणोनि शुद्धज्ञान तें संतत[७] । वेगळेंचि असे ॥ ८७ ॥
ऐक शुद्धज्ञानाचें लक्षण । शुद्ध स्वरूपचि आपण ।

१ हें लौकिक विद्यांचें ज्ञान, बहुधाज्ञान; आत्मज्ञान याहून वेगळें. २ ज्ञान म्हणजे आत्मज्ञान म्ह० मी कोण हें पाहाणें. ३ थोरला देव,विमल ब्रह्म. ४ सारें द्रश्य, नामरूपात्मक अष्टधा प्रकृति. ५ मी ब्रह्म आहें या ज्ञानाचा फुंजही. ६ तुर्या ही वृत्ति आहे, हें ज्ञान नव्हे. द्रष्टेपणापलीकडे शुद्ध ज्ञान आहे.

या नांव शुद्ध स्वरूपज्ञान । जाणिजे श्रोतीं ॥ ८८ ॥
महावाक्य उपदेशसार । परी घेतला पाहिजे विचार[1] ।
त्याच्या जपें अंधकार । न फिटे भ्रांतीचा ॥ ८९ ॥
आपला आपणासि लाभ । हें ज्ञान परम दुर्लभ ।
जें आदिअंतीं स्वयंभ । स्वरूपचि स्वयें ॥ ९० ॥
जेथून हें सर्वही प्रगटे । आणि सकळही जेथ आटे ।
तें ज्ञान जालियां फिटे । भ्रांति बंधनाची ॥ ९१ ॥
जें या चराचराचें मूळ[2] । शुद्ध स्वरूप निर्मळ ।
या नांव ज्ञान केवळ । वेदांतमतें ॥ ९२ ॥
शोधितां आपुलें मूळस्थान[3] । सहजचि उडे अज्ञान ।
या नांव म्हणिजे ब्रह्मज्ञान । मोक्षदायक ॥ ९३ ॥
मी कोण ऐसा हेत । धरून पाहतां देहातीत[4] ।
अवलोकितां नेमस्त । स्वरूपचि होय ॥ ९४ ॥
असो पूर्वीं थोरथोर । येणें ज्ञानें पैलपार ।
पावले, तें साचार । ऐक आतां ॥ ९५ ॥
व्यास वसिष्ठ महामुनी । शुक नारद समाधानी ।
जनकादिक महाज्ञानी । येणेंचि ज्ञानें ॥ ९६ ॥
सिद्ध मुनि महानुभाव । सकळांचा जो अंतर्भाव[5] ।
जेणें सुखें महादेव । डुल्लत सदा ॥ ९७ ॥
ज्ञानवन्हि[6] प्रगटे । तेणें दृश्यकर आटे ।
तदाकारें[7] मूळ तुटे । भिन्नत्वाचें ॥ ९८ ॥

---

१ महावाक्याचा जप उपयोगाचा नाहीं, त्याचा विचारच केला पाहिजे. २ मूळमाया हें सृष्टीचें मूळ. ती ब्रह्मीं 'अहं' रूपानें स्फुरते. ३ उगम. ४ आपण देहातीत आहों हें पाहणें. ५ ध्यानविषय, ध्येय. ६ ज्ञानाग्नि (मी ब्रह्म हा बोध) प्रगटला कीं दृश्य सारें उडून जातें, ७ त्या ब्रह्माशीं आपली ऐक्यता अनुभवितां सारा भेदभाव लय पावतो.

मिथ्यत्वें[1] वृति फिरे । तों दृश्य असतांचि वोसरे ।
सहजचि येणें प्रकारें । जालें आत्मनिवेदन ॥ ९९ ॥

१० साधन पाहिजे.

आतां होंचि दृढीकरण । व्हावया करीं सद्गुरुभजन ।
सद्गुरुभजनें समाधान । नेमस्त आहे ॥ १०० ॥
या नांव आत्मज्ञान । येणें पाविजे समाधान ।
भवभयाचें बंधन । समूळ मिथ्या ॥ १०१ ॥
शिष्या एकांतीं बैसावें । स्वरूपीं विश्रांतीसें[2] जावें ।
तेणें गुणें दृढावे । परमार्थ हा ॥ १०२ ॥
अखंड घडे श्रवणमनन । तरीच पाविजे समाधान ।
पूर्ण जालिया ब्रह्मज्ञान । वैराग्य भरे अंगीं ॥ १०३ ॥
शिष्या ! मुक्तपणें अनर्गळ[3] । करिसी इंद्रियें बाष्कळें[4] ।
तेणें तुझी तळमळ । जाणार नाहीं ॥ १०४ ॥
अविद्याझोप येते भरें । भरें सर्वांगीं काविरें[5] ।
पूर्ण जागृती श्रवणद्वारें । मननें करावी ॥१०५॥ (द.५, स.६)
वृत्तिरहित जें ज्ञान । तेंचि पूर्ण समाधान ।
जेथें तुटे अनुसंधान । मायाब्रह्मीचें ॥१०६॥ (द.७, स.५)

## ( ३ ) बद्ध, मुमुक्षु, साधक व सिद्ध.

सृष्टीं जे कां चराचर । जीव दाटले अपार ।
परी ते अवघे चत्वार । बोलिजेती ॥ १ ॥

१ दृश्य हें मिथ्या आहे असें यथार्थ बाणलें म्हणजे दृश्य असूनही बाधत नाहीं, तें ओसरतें, म्हणजे नाहींसें होतें. २ एकांतीं बसून स्वस्वरूपानुसंधान ठेवावें, आत्मानुभव पहावा. ३ अर्गळा म्ह. अडसर, बंधन. अनर्गळ म्ह. स्वैर, निर्बंधन. ४ विषयलोलुप. ५ अविद्येची झांपड डोळ्यावर आहे तोंवर ( द्वैतभावामुळें ) जीव भयानें कंप पावतो, दचकत असतो.

ऐक तयांचें लक्षण । चत्वार ते कोण कोण ।
बद्ध, मुमुक्षु, साधक जाण । चौथा सिद्ध ॥ २ ॥
या चौघांविरहित कांहीं । सचराचरीं पांचवा नाहीं ।
आतां असो हे सर्वही । विशद करूं ॥ ३ ॥

## १ बद्ध.

आतां बद्ध तो जाणिजे ऐसा । अंधारींचा अंध जैसा ।
चक्षूवीण दाही दिशा । शून्याकार ॥ ४ ॥
न दिसे नेणे कर्माकर्म । न दिसे नेणे धर्माधर्म ।
न दिसे नेणे सुगम । परमार्थपंथ ॥ ५ ॥
न कळे परमार्थाची खूण । न कळे अध्यात्मनिरूपण ।
न कळे आपणासी आपण । या नांव बद्ध ॥ ६ ॥
जयासि नाहीं आत्मज्ञान । हें मुख्य बद्धाचें लक्षण ।
तीर्थ व्रत दान पुण्य । कांहींच नाहीं ॥ ७ ॥
दया नाहीं करुणा नाहीं । आर्जव नाहीं मैत्री नाहीं ।
शांति नाहीं क्षमा नाहीं । या नांव बद्ध ॥ ८ ॥
परमार्थाचा अनादर । प्रपंचाचा अत्यादर ।
संसारभार जोजार । या नांव बद्ध ॥ ९ ॥
हातीं द्रव्याची माळ । कांताध्यान सर्वकाळ ।
सत्संगाचा दुष्काळ । या नांव बद्ध ॥ १० ॥
नेत्रीं द्रव्यदारा पाहावी । श्रवणीं द्रव्यदारा ऐकावी ।
चिंतनीं द्रव्यदारा चिंतावी । या नांव बद्ध ॥ ११ ॥
सत्संगाची नाहीं गोडी । संतनिंदेची आवडी ।
देहबुद्धीची घातली बेडी । या नांव बद्ध ॥ १२ ॥
ऐसें बद्धाचें लक्षण । मुमुक्षुपणीं पालटे जाण ।
ऐक तेंही लक्षण । पुढियेले समासीं ॥१३॥ (द.५, स.७)

### २ मुमुक्षु.

संसारमदाचेनि गुणें । नाना हीनें कुलक्षणें ।
जयाचेनि मुखावलोकनें । दोषचि लागे ॥ १४ ॥
ऐसा प्राणी जो का बद्ध । संसारीं वर्ततां अबद्ध[१] ।
तयास प्राप्त जाला खेद[२] । काळांतरीं ॥ १५ ॥
संसारदु:खें दुखवला । त्रिविधतापें पोळला ।
निरूपणें प्रस्तावला । अंतर्यामीं ॥ १६ ॥
जाला प्रपंचीं उदास । मनें घेतला विषयत्रास[३] ।
म्हणे आतां पुरे सोस[४] । संसारींचा ॥ १७ ॥
पूर्वीं नाना दोष[५] केले । ते अवघेचि आठवले ।
पुढें येऊनि उभे ठेले । अंतर्यामीं ॥ १८ ॥
कोण उपाय करावा । कैसा परलोक पावावा ।
कोण्या गुणें देवाधिदेवा । पाविजेल ॥ १९ ॥
ऐसा पोटीं प्रस्तावला । निरूपणें पालटला ।
तोचि मुमुक्ष बोलिला । ग्रंथांतरीं ॥ २० ॥
आपुले अवगुण देखे । विरक्तिबळें वोळखे ।
आपणासि निंदी दु:खें । या नांव मुमक्षु ॥ २१ ॥
देहाभिमान कुळाभिमान । द्रव्याभिमान नानाभिमान ।
सांडूनि संतचरणीं अनन्य । या नांव मुमुक्षु ॥ २२ ॥
अहंता सांडूनि दुरी । आपणास निंदी नानापरी ।
मोक्षाची अपेक्षा करी । या नांव मुमुक्षु ॥२३॥ (द.५,स.८).

### ३ साधक.

अवगुणांचा करूनि त्याग । जेणें धरिला संतसंग ।
तयासी बोलिजे मग । साधक ऐसा ॥ २४ ॥

---

१ अनियमितपणानें, अनर्गळपणानें. २ दु:ख, पश्चात्ताप. ३ विषयांचा कंटाळा, तिरस्कार. ४ हांव. ५ नियमभंग, पातकें.

जो संतांसी शरण गेला । संतजनीं आश्वासिला ।
मग तो साधक बोलिला । ग्रंथांतरीं ॥ २५ ॥
उपदेशिलें आत्मज्ञान । तुटलें संसारबंधन ।
दृढतेकारणें करी साधन । या नांव साधक[1] ॥ २६ ॥
धरी श्रवणाची आवडी । अद्वैतनिरूपणाची गोडी ।
मननें अर्थांतर काढी । या नांव साधक ॥ २७ ॥
देहबुद्धि विवेकें वारी । आत्मबुद्धि सदृढ धरी ।
श्रवणमनन केलेंचि करी । या नांव साधक ॥ २८ ॥
अवगुण त्यागी दिवसेंदिवस । करी उत्तमगुणांचा अभ्यास ।
स्वरूपीं लावी निजध्यास । या नांव साधक ॥ २९ ॥
परती सारून उपाधि । असाध्य वस्तु साधनें साधी ।
स्वरूपीं करी दृढबुद्धि । या नांव साधक ॥ ३० ॥
देवाभक्तांचें मूळ । शोधून पाहे सकळ ।
साध्याचि होय तत्काळ । या नांव साधक ॥ ३१ ॥
मीपण मागें सोडिलें । स्वयें आपणास धुंडिलें ।
तुर्येसही[2] वोलांडिलें । या नांव साधक ॥ ३२ ॥
पुढें उन्मनीचे सेवटीं । आपली आपणा अखंड भेटी ।
अखंड अनुभवीं ज्याची दृष्टी । या नांव साधक ॥ ३३ ॥
विवेकबळें गुप्त[3] जाला । आपेंआप मावळला ।
दिसतो[4] परी देखिला । नाहींच कोणी ॥ ३४ ॥

---

१ अवगुणांचा पश्चात्तापपूर्वक त्याग, संतसंग, संतशरणागति, संतांचें आश्वासन (अंगीकार), आत्मज्ञानोपदेश,– या मार्गानें जाऊन 'दृढतेसाठीं' साधन करणारा तो साधक. २ जागृति, स्वप्न, सुषुप्ति व तुर्या ह्या स्थळ, सूक्ष्म, कारण व महाकारण ह्या चार देहांच्या चार अवस्था आहेत. यापलीकडे उन्मनी म्ह. मन जेथें मावळतें तेथेंच ब्रह्मप्राप्ति आहे. ३ दृश्याच्या पार गेला, स्वस्वरूपीं लपला. ४ त्याचा देह दिसतो पण त्याचें अंतःस्वरूप कळत नाहीं.

साबध दक्ष तो साधक । पाहे नित्यानित्यविवेक ।
संग त्यागूनि येक । सत्संग धरी ॥ ३५ ॥
आतां असो हें बोलणें । अवगुण सांडी निरूपणें ।
तो साधक ऐसा येणें-। प्रमाणें बुझावा ॥३६॥ (द.५,स.९)

४ सिद्ध.

साधु वस्तु होऊनि ठेला । संशय ब्रह्मांडाबाहेरी गेला ।
निश्चय चळेना ऐसा जाला । या नांव सिद्ध ॥ ३७ ॥
बद्धपणाचे अवगुण । मुमुक्षुपणीं नसती जाण ।
मुमुक्षुपणाचें लक्षण । साधकपणीं नाहीं ॥ ३८ ॥
साधकासी संदेहवृत्ति । पुढें होतसे निवृत्ति ।
याकारणें निःसंदेह श्रोतीं । साधु वोळखावा ॥ ३९ ॥
म्हणोनी संदेहरहित ज्ञान । निश्चयाचें समाधान ।
तेंचि सिद्धांचें लक्षण । निश्चयेसीं ॥ ४० ॥
आत्मबुद्धि निश्चयाची । तेचि दशा मोक्षश्रीची ।
'अहमात्मा' हें कधींचि । विसरों नये ॥ ४१ ॥
आतां असो हें बोलणें । ऐका सिद्धांचीं लक्षणें ।
मुख्य निःसंदेहपणें । सिद्ध बोलिजे ॥ ४२ ॥
लक्षणें म्हणिजे केवळ गुण । वस्तु ठायीची निर्गुण ।
तेंचि सिद्धाचें लक्षण । वस्तुरूप ॥ ४३ ॥
सिद्धस्वरूपीं नाहीं देहो । तेथें कैंचा हो संदेहो ।
या कारणें सिद्ध पहा हो । निःसंदेही ॥४४॥ (द.५,स.१०)

## (४) ज्ञानोत्तरही साधन सोडतां नये !

(३)

अनंत जन्मा काट[१] जडला । अभ्यासाचि पडोन गेला ।

१ गंज, मळ, पापसंस्कार.

तो तितुकाही झाडिला । पाहिजे कीं ॥ १ ॥
उपाय होतां दिसेना । प्रपंचीं गुंतली वासना ।
तेणें गुणें समाधाना । अंतर पडे ॥ २ ॥
मळिण वस्त्र धुतां धुतां । तेणेंचि पावे शुद्धता ।
तैसा साधक तो भगवंता । साधनें पावे ॥ ३ ॥
साधनेंवीण ब्रह्मज्ञान । तेणें बुडे समाधान ।
अंगीं जडे देहाभिमान । वाचाळपणें ॥ ४ ॥
शब्दज्ञान हातासि आलें । मी देह ऐसें कल्पिलें ।
बळेंचि धारिष्टें[2] धरिलें । सिद्धपणाचें ॥ ५ ॥
तें धारिष्ट अंतीं उडे । प्राणी महासंशयीं पडे ।
सेखीं[3] जन्ममृत्यु घडे । भोगणें संशयें ॥ ६ ॥
म्हणोनि जाणते पुरुषीं । सोडूं नये साधनांसी ।
नाडूं नये आपणासी । सिद्धपणें सर्वथा ॥ ७ ॥
जो सिद्धांचाही सिद्ध । ज्ञानवैराग्यप्रसिद्ध ।
सामर्थ्यसिंधु अगाध । कैलासराणा ॥ ८ ॥
तो सिद्धींचि करी साधन । सर्व काळ रामचिंतन ।
ध्यान धारणा अनुष्ठान । चुकों नेदी ॥ ९ ॥
ऐसे अपार महामती । जाले तेही साधन करिती ।
तरी तेथें मानव किती । बापुडे किंकर ? ॥ १० ॥
मी सिद्ध ऐसें कल्पुनी । नित्यनेम न धरीं मनीं ।
तत्पर अशनशयनीं[5] । आत्महत्यारा[6] ॥ ११ ॥
भक्तीवीण जें ज्ञान । तेंचि सोलिव[7] अज्ञान ।
तेणें कांहीं समाधान । होणार नाहीं ॥ १२ ॥

१ साधनें केलीं असतां. २ 'मी सिद्ध' हें धाडस. ३ शेखीं, शेवटीं ४ सिद्ध असूनही. ५ खाणें, निजणें इ. ६ आत्मघातकी. ७ खरेंखुरें, शुद्ध.

समाधानी तो आगळा[1] । तेथें भक्तीचा जिव्हाळा ।
जैसी ते गृहाची कळा । आंगण सांगे ॥ १३ ॥
भक्तीविण देव जोडे । ऐसें कल्पांतीं न घडे ।
भक्तिसाधन करितां जडे । मन भगवंतीं ॥ १४ ॥
मोक्षभुवन अतिसुंदर । आनंदरूप मनोहर ।
तेथें जावयाचा विचार । ऐक बापा ॥ १५ ॥
सज्जन आणि कृपाळ । जयांचें ज्ञान प्रांजळ ।
तया संगतीनें मळ । तुटे अज्ञानाचा ॥ १६ ॥ (पंचसमासी)

(२)

सिद्ध होवोनि बैसला । दृष्टीं नाणी साधनाला ।
सादर अशनशयनाला । अत्यादरें ॥ १७ ॥
ऐसा असे विषयासक्त । अत्यंत विषयीं आसक्त ।
सिद्धपणें आपला घात । केला तेणें ॥ १८ ॥
म्हणोनि साधनेंसीं[2] सिद्ध । तोचि ज्ञाता परमशुद्ध ।
येर[3] ते जाणावे अबद्ध । अप्रमाण ॥ १९ ॥
साधनेंवीण बाष्कळता । तेचि जाणावी बद्धता ।
तेणें घडे अनर्गळता । आसक्तिरूपें ॥ २० ॥
मन सुखावलें जिकडे । अंग टाकलें तिकडे ।
साधन–उपाय नावडे । अंतरापासुनी ॥ २१ ॥
दृढ देहाची आसक्ति । तेथें कैची पाविजे विरक्ति ? ।
विरक्तीवीण भक्ति । केवि घडे ? ॥ २२ ॥
ऐक शिष्यटिळका । नेम[4] नाहीं ज्या साधका ।
तयालागीं धोका[5] । नेमस्त आहे ॥ २३ ॥

---

१ निराळा, श्रेष्ठ. २ साधनासकट, साधनें करीत असून. ३ इतर; साधन सोडून वागणारे. ४ नित्यनेमाचें साधन. ५ भय, पतनाचा संभव.

प्राप्त जालें ब्रह्मज्ञान । अंगीं बाणलें पाहिजे पूर्ण ।
म्हणोनि हें निरूपण । सावध ऐका ॥ २४ ॥
सर्वात्मा मी ऐसें बोलेतां[1] । खूण बाणेना सर्वथा ।
साधनेंवीण ज्ञानवार्ता । बोलोंचि नये ॥ २५ ॥
दसऱ्याचें सोनें[2] वाटलें । तेणें काय हातासि आलें ।
रायविनोदें[3] आलें । समाधान ? ॥ २६ ॥
तैसें शब्दीं ब्रह्मज्ञान । बोलतां न ये समाधान ।
म्हणोनि आधीं साधन । केलें पाहिजे ॥ २७ ॥
कर्मे त्यजूनि बाधक । शुद्ध वर्ते तो साधक ।
क्रियापालटें विवेक । निष्कलंक तेव्हां ॥ २८ ॥
तये क्रियेचें लक्षण । आधीं स्वधर्मरक्षण ।
मग अद्वैतश्रवण । केलें पाहिजे ॥ २९ ॥
नित्यनेम दृढ चित्तीं । तेणें शुद्ध चित्तवृत्ती ।
होऊनियां भगवंतीं । मर्ग फुटे नेमस्त ॥ ३० ॥
नित्यनेमें भ्रांति फिटे । नित्यनेमें संदेह तुटे ।
नित्यनेमें लिगटे[4] । समाधान अंगीं ॥ ३१ ॥
नित्यनेमें सत्व चढे । नित्यनेमें शांति वाढे ।
नित्यनेमें थारा मोडे । देहबुद्धीचा ॥ ३२ ॥
नित्यनेमें दृढ भाव । नित्यनेमें जोडे देव ।
नित्यनेमें पुसे ठाव । अविद्येचा ॥ ३३ ॥
मानसपूजा जपध्यान । येकाग्र करूनियां मन ।
त्रिकाळ ध्यावें दर्शन । मारुतीसूर्याचें ॥ ३४ ॥
हरिकथानिरूपण । प्रत्यहीं करावें श्रवण ।
निरूपणीं ऊणखूण । केली पाहिजे ॥ ३५ ॥

१ नुसतें बोलल्यानें. २ आपट्याचीं पानें ३ बहुरूपाच्या खेळानें. ४ चिकटतें

एकाग्र करूनियां मन । अंतरीं करावें ध्यान ।
सर्व सांग पूजाविधान । प्रत्यहीं कीजे ॥ ३६ ॥ (अंतर्भाव).

( ३ )

नाहीं उपासनेचा आधार । तो परमार्थ निराधार ।
कर्मेंवीण अनाचार । भ्रष्ट होती ॥ ३७ ॥
साधनेंवीण परमार्थ प्रतिष्ठे । तो मागुता सर्वेचि भ्रष्टे ।
या कारणें दूरद्रष्टें । महानुभाव ॥ ३८ ॥
आचार[1] उपासना सांडिती । ते भ्रष्ट अभक्त दिसती ।
जळो तयांची महंती । कोण पुसे ॥३९॥ (दा.द.५, स.२)
आत्मज्ञान जालें । परी साधन पाहिजे केलें ।
येक वेळ उदड जेविलें । तरी सामग्री पाहिजे॥४०॥(द.५स.३)
शिष्या ! मुक्तपणें अनर्गळ । इंद्रिय करिसी बाष्कळ ।
तेणें तुझी तळमळ । जाणार नाहीं ॥ ४१ ॥
साधन न मने जयाला । तो मुक्तपणें बद्ध जाला ।
त्याहूनि मुमुक्षु भला । ज्ञानाधिकारी ॥४२॥ (दा.द.५,स.६)
आधीं राखावा आचार । मग पाहावा विचार ।
आचारविचारें पैलपार । पाविजेतो ॥ ४३ ॥
जें नेमकास न कळे । तें बा[2]ष्कळास केविं कळे ? ।
डोळस ठकती, आंधळे । कोण्या कामाचे ? ॥ ४४ ॥
म्हणोनी सत्संगेंचि जावें । सच्छास्त्रचि श्रवण करावें ।
उत्तम गुणांस अभ्यासावें । नाना प्रयत्नें ॥४५॥
(द.१५,स.१०)

---

१ 'आचार: प्रथमो धर्म:' हें भीष्माचार्यांचें वचन प्रसिद्धच आहे. २ नेमक म्ह. नित्यनेमानें–शिस्तीनें चालणारे व बाष्कळ म्ह. नेम सोडून स्वेच्छाचार करणारे.

## (५) अध्यात्मज्ञानाची थोरवी.

### (१)

जो निर्गुण गुणातीत । जो अदृश्य अव्यक्त ।
जो अचिंत्य चिंतनातीत । परम पुरुष ॥ १ ॥
ऐसें ब्रह्म निरंजन । कदा नव्हे दृश्यमान ।
लावावें तें अनुसधान । कोणेपरी ? ॥ २ ॥
त्यास न भेटतां होय भेटी । भेटो जातां पडे तुटी ।
ऐसी हे नवल गोष्टी । मुकेपणाची ॥ ३ ॥
अद्वैतज्ञानाचा उपदेश । गुरुगीता तो महेश ।
सांगता होय पार्वतीश । पार्वतीप्रैती ॥ ४ ॥
ब्रह्मा नारदा उपदेशीत । चतुःश्लोकी भागवत ।
पुढें व्यासमुखें बहुत । विस्तारलें ॥ ५ ॥
वसिष्ठसार वसिष्ठऋषी । सांगता जाला रघुनाथासी ।
कृष्ण सांगे अर्जुनासी । सप्तश्लोकी गीता ॥ ६ ॥
ऐसें सांगावें तें किती । बहुत बोलिले बहुतीं ।
अद्वैतज्ञान आदिअंतीं । सत्यचि असे ॥ ७ ॥
मनास कल्पायाची सवे । मनें कल्पिलें तें नव्हे ।
तेणें गुणें संदेह धावे । मीपणाचेनि पंथें ॥ ८ ॥
तरी तो पंथेचि मोडावा । मग परमात्मा जोडावा ।
समूळ संदेह तोडावा । साधूचेनि संगतीं ॥ ९ ॥
मीपण जाणोनि त्यागावें । ब्रह्म होऊन अनुभवावें ।

---

१ त्याची अखंड सहज भेट आहेच. २ अनिर्वचनीयता आहे. ३ गुरुगीतेंत शंकरांनीं पार्वतीस अद्वैतबोध केला आहे. ४ हें मूळ भागवतांत द्वितीय स्कंधांत असून त्यांतील अद्वैतसिद्धांतच पुढें थोरल्या भागवतांत विस्तारला आहे. ५ कल्पनेनें चालायचें हा पंथ मोडावा; कां कीं ब्रह्म कल्पनेनें आकळत नाहीं.

समाधान तें पावावें । निःसंगपणें ॥ १० ॥
पदींहून[1] चळों नये । करावे साधन-उपाय ।
तरीच सांपडे सोय । अलिप्तपणाची ॥ ११ ॥ (द.७, स. ७)

( २ )

नाना व्रतें नाना दानें । नाना योग तीर्थाटणें ।
सर्वांहून कोटिगुणें । महिमा आत्मज्ञानाचा ॥ १२ ॥
आत्मज्ञान पाहे सदा । त्याच्या पुण्यासीं नाहीं मर्यादा ।
दुष्ट पातकाची बाधा । निरसोन गेली ॥ १३ ॥
वेष वरिवरि केला । परी अंतरीं दोष भरला ।
त्या दोषाच्या दहनाला । आत्मज्ञान[2] पाहिजे ॥ १४ ॥
सत्यायेवढें सुकृत नाहीं । असत्यायेवढें पाप नाहीं ।
प्रचीतीवीण कोठेंच नाहीं । समाधान ॥ १५ ॥
सत्य[3] म्हणिजे स्वरूप जाण । असत्य माया हें प्रमाण ।
येथें निरूपिलें पापपुण्य । रूपेंसहित ॥ १६ ॥
दृश्य[4] पाप वोसरलें । पुण्य परब्रह्म उरलें ।
अनन्य होतांचि जालें । नामातीत ॥ १७ ॥
आपण वस्तु स्वतःसिद्ध । तेथें नाहीं देहसंबंध ।
पापराशि होती दग्ध । येणें प्रकारें ॥ १८ ॥
येरवीं ब्रह्मज्ञानेंवीण । जें जें साधन तें तें सीण ।
नाना दोषांचें क्षाळण । होईल कैसें ? ॥ १९ ॥ ( द.१०, स.१० )
श्रवण[5]मननाचा विचार । निजध्यासें साक्षात्कार ।
रोकडा, मोक्षाचा उधार । बोलोंचि नये ॥ २० ॥

१ स्वरूपीं बैठक मांडून साधनें करावीत. २ अंतरींचे दोष, मलिन वासना-संस्कार, आत्मज्ञानानेंच धुवून जातात. ३ ब्रह्म हें सत्य म्ह. पुण्य व माया असत्य म्ह. पाप. ४ पुण्यरूप ब्रह्मस्वरूप त्याशीं-पापरूप दृश्याचा निरास करून-अनन्य म्ह. समरस व्हावें. ५ श्रवण, मनन, निदिध्यास व साक्षात्कार हा ब्रह्मपद पावायचा सोपान आहे. मोक्षफळ येथल्या येथें तात्काळ मिळतें.

( ३ )

श्रवणामध्यें सार श्रवण[१] । तें हें अध्यात्मनिरूपण ।
सुचित करून अंतःकरण । ग्रंथामध्यें विवरावें ॥ १ ॥
नाना रत्नें परीक्षतां । अथवा वजनें करितां ।
उत्तम सोनें पुटीं[२] घालितां । सावधान असावें ॥ २ ॥
येकांतीं नाजुक कारबार[३] । तेथें असावें अतितत्पर ।
त्याच्या कोटिगुणें विचार । अध्यात्मग्रंथीं ॥ ३ ॥
काहण्या कथा गोष्टी पवाड । नाना अवतारचरित्रें वाडें[४] ।
त्या समस्तांमध्यें जाडें । अध्यात्मविद्या ॥ ४ ॥
ऐसें वरिष्ठ[५] आत्मज्ञान । दुसरें नाहीं यासमान ।
सृष्टीमध्यें विवेकी सज्जन । तेचि हें जाणती ॥ ५ ॥
विचारें ऊर्ध्व[६] चढती । तयासीच ऊर्ध्वगती ।
येरां सकळां अधोगती । पदार्थज्ञानें[७] ॥ ६ ॥
या कारणें पदार्थज्ञान । नाना जिनसींचा अनुमान ।
सर्व सांडून निरंजन । धुंडीत जावें ॥ ७ ॥
अष्टांगयोग पिंडज्ञान । त्याहून थोर तत्वज्ञान ।
त्याहून थोर आत्मज्ञान । तें पाहिलें पाहिजे ॥ ८ ॥
पृथ्वी आप आणि तेज । याचा पृथ्वीमध्यें समज ।
अंतरात्मा तत्वबीज[८] । तें वेगळेंचि राहिलें ॥ ९ ॥

---

१ मुख्य श्रवण अध्यात्माचें, अद्वैताचें करावें. २ मुशींत. ३ राजकारणाच्या गोष्टीही सावधपणेंच होतात. ४ मोठालीं सविस्तर. ५ श्रेष्ठ. ६ ' उर्ध्वमूलमध :शाखं '—विचार करीत स्थूलांतून सूक्ष्माकडे जात जात मूळ उगमापर्यंत जे जातात. ७ पदार्थज्ञान सारें अनुमानिक. ८ आकाशांतून सारीं तत्त्वें निघालीं, म्हणून आकाश हें बीज म्हटलें आहे.

वायूपासून पैलीकडे । जो कोणी विवेकें पवाडे ।
जवळीच आत्मा सांपडे । तया पुरुषासी ॥ १० ॥

( ४ )

मायादेवीच्या[2]धांदेली । सूक्ष्मीं कोण मन घाली ।
समजला त्याची तुटली । संदेहवृत्ति ॥ १ ॥
मूळमायेचे[3] सेवटीं । हरिसंकल्प मुळीं उठी ।
उपासनायोगें मिठी । तेथें घातली पाहिजे ॥ २ ॥
मग त्यापैलीकडे जाण । निखळ ब्रह्म निर्गुण ।
निर्मळ निश्चळ त्याची खूण । गगनासारिखी ॥(द.१७,स.३)
माया उल्लंघायाकारणें । देवासी नाना उपाय करणें ।
अध्यात्मश्रवणपंथेंचि जाणें । प्रत्ययानें ॥ ४ ॥
अध्यात्मश्रवण करीत जावें । म्हणिजे सकळ कांहीं फावे ।[१]
नाना प्रकारींचे गोवे । तुटोनि जाती ॥ ५ ॥
सूत गुंतलें तें उकलावें । तैसें मन उगवावें ।
मानत मानत घालावें । मूळाकडे ॥ ६ ॥ (द. २०, स.९)

## ( ६ ) सत्संगीं अध्यात्मग्रंथश्रवण.

सकळ जीवांस मिळोन । सार येकचि साधन ।
तें हें जाण श्रवण । प्राणिमात्रांसी ॥ १ ॥
सत्संगावेंरी श्रवण । तेणें कळे निरूपण ।
श्रवणें होइजे आपण । तदाकार ॥ २ ॥
श्रवणें मोह नासे । श्रवणें स्फूर्ति प्रकाशे ।

१ मननानें शिरतो. २ मायेच्या वावटळींत सांपडलेले जीव ! सूक्ष्माचा शोध घेणारा जीव विरळच. ३ मूळमायेचाही निरास झाल्यावर विमळ ब्रह्म (हरि, राम) उरतें. तेथें जो आदिसंकल्प उठला, त्यालाच मूळमाया म्हण- तात, तेथें उपासनाबुद्धीनें सर्वस्वार्पण (निवेदन) केलें पाहिजे. उपासना मूळ मायेपर्यंतच. ४ श्रवण सत्संगांत घडलें पाहिजे म्हणजे निःसंदेह आत्मज्ञान होतें.

श्रवणें सद्वस्तु भासे । निश्चयात्मक ॥ ३ ॥
सेविलेंचि सेवावें अन्न । घेतलेंचि घ्यावें जीवन ।
तैसें श्रवणमनन । केलेंचि करावें ॥ ४ ॥ (द. ७, स. ८)
जेथें संशये तुटती । होय आशंकानिवृत्ति ।
अद्वैतग्रंथ परमार्थी । श्रवण करावे ॥ ५ ॥
इतर जे प्रापंचिकें । हास्यविनोद नवरासिक ।
हित नव्हे ते पुस्तक । परमार्थासी ॥ ६ ॥
बहुत प्रकारें पाहितां । ग्रंथ नाहीं अद्वैतापरता ।
परमार्थास तत्वता । तारूंच कीं ॥ ७ ॥
जेणे होय उपरती । अवगुण पालटती ।
जेणें चुके अधोगती । त्या नांव ग्रंथ ॥ ८ ॥
जेणें धारिष्ट चढे । जेणें परोपकार घडे ।
जेणें विषयवासना मोडे । त्या नांव ग्रंथ ॥ ९ ॥
जेणें परमार्थसाधन । जेणें ग्रंथें होय ज्ञान ।
जेणें होइजे पावन । त्या त्या नांव ग्रंथ ॥ १० ॥
म्हणोनि नित्यानित्यविचार । जेथें बोलिला सारासार ।
तोचि ग्रंथ पैलपार । पाववी विवेकें ॥११॥ (द.७, स. ९)
ऐका संतांचें महिमान । संतसंगें होतें ज्ञान ।
सत्संगापरतें साधन । आणीक नाहीं ॥ १२ ॥
स्वरूपानुसंधानबळें । सगळी मायाच नाडळे ।
तयाचा पार न कळे । ब्रह्मादिकांसी ॥ १३ ॥
तो जीतचि असतां मेला । मरणास मारून ज्याला ।

१ 'एका ग्रंथें निश्चय केला । तो दुजयानें उडविला' असे संशय वाढविणारे ग्रंथ किंवा वक्ते कामाचे नाहींत. २ प्रपंचाची आवड वाढविणारे, हास्य-विनोदपर, असे नवरसाचे ग्रंथ हे परमार्थाच्या उपयोगाचे नाहींत.

जन्ममृत्यु न स्मरे त्याला । विवेकबळें ॥ १४ ॥
तो जनीं दिसतो परी वेगळा । वर्ततां भासे निराळा ।
दृश्य पदार्थ त्या निर्मळा । स्पर्शलाचि नाहीं ॥ १५ ॥
हेंचि साधकासी निरवणें । अद्वैत प्रांजळ निरूपणें ।
तुमचेंही समाधान बाणे । साधूच ऐसे ॥ १६ ॥
जो संतास शरण गेला । तो संतचि होऊन ठेला ।
इतर जनास उपेगा आला । कृपाळूपणें ॥ १७ ॥
गुरुभजनाचेनि आधारें । निरूपणाचेनि विचारें ।
क्रियाशुद्ध निर्धारें । पाविजे पद ॥ १८ ॥ ( द.७,स.१० )

## ( ७ ) मुख्य देवाचा शोध व निश्चय.

( १ )

जयास जेथें राहणें । तेणें त्या प्रभूची भेटी घेणें ।
म्हणिजे होय श्लाघ्यवाणें । सर्व कांहीं ॥ १ ॥
त्यास न भेटतां त्याचे नगरीं । राहतां धरितील वेगारी ।
तेथें न करितां चोरी । अंगीं लागे ॥ २ ॥
या कारणें जो शाहणा । तेणें प्रभूसी भेटावें जाणा ।
ऐसें न करितां दैन्यवाणा । संसार त्याचा ॥ ३ ॥
ग्रामीं थोर ग्रामाधिपति । त्याहूनि थोर देशाधिपति ।
देशाधिपतीहूनि नृपति । थोर जाणावा ॥ ४ ॥

१ 'प्रारब्धीं टाकिला देहो । बोधें फिटला संदेहो' असा संत असतो; म्हणून त्याची राहणी सामान्य जनांसारखी असून वेगळीच असते. २ श्रीगुरुभजनाधारें, श्रवणमननविचारें व शुद्धाचारें जाणाराच स्वस्वरूप पावतो. ३ व्यवस्थेशीर, सन्मानदायक, सौख्यकारक. ४ वेठीला धरितील. ५ पाटील, देशमुख, नृपति उर्फ राजा, महाराजा, चक्रवर्ती, ब्रह्मदेव–या क्रमानें सर्वांत श्रेष्ठ परमेश्वर, त्याची अवश्य ओळख करून घ्यावी.

राष्ट्राचा प्रभु तो राजा । बहुराष्ट्र तो महाराजा ।
महाराजाचाही राजा । तो चक्रवर्ती ॥ ५ ॥
असो ऐसियां समस्तां । येक ब्रह्मा निर्माणकर्ता ।
त्या ब्रह्मयासही निर्मिता कोण आहे ? ॥ ६ ॥
ब्रह्मा विष्णु आणि हर । त्यांसी निर्मिता तोचि थोर ।
तो वोळखावा परमेश्वर । नाना यत्नें ॥ ७ ॥
जेणें संसारीं घातलें । अवघें ब्रह्मांड निर्माण केलें ।
त्यासी नाहीं वोळखिलें । तोचि पतित[1] ॥ ८ ॥
म्हणोनि देव वोळखावा । जन्म सार्थकाचि करावा ।
न कळे तरी सत्संग धरावा । म्हणिजे कळे ॥ ९ ॥
जो जाणेल भगवंत । तया नांव बोलिले संतें[2] ।
जो शाश्वत आणि अशाश्वत । निवाडा करी ॥ १० ॥
चळेना ढळेना देव । ऐसा ज्याचा अंतर्भाव[3] ।
तोचि जाणिजे महानुभाव । संत साधु ॥ ११ ॥
जो जनांमध्यें वागे । परी जनावेगळी[4] गोष्टी सांगे ।
ज्याचे अंतरीं ज्ञान जागे । तोचि साधु ॥ १२ ॥
जाणिजे परमात्मा निर्गुण । त्यासीच म्हणावें ज्ञान ।
त्यावेगळें तें अज्ञान । सर्व कांहीं ॥ १३ ॥
पोट भरायाची विद्या । तयेसी म्हणों नये सद्विद्या[5] ।
सर्वव्यापक वस्तु सद्या । पाविजे तें ज्ञान ॥ १४ ॥
देहापाशीं गेला देही । तो कैसेनि होईल विदेही ।

---

१ ही पतिताची व्याख्या ध्यानांत धरावी. २ ह्या ओवींत संतांचें लक्षण केलें आहे. ३ अंतर्यामीची निष्ठा. ४ अज्ञानांच्या आक्टोक्यापलीकडच्या, त्यांना माहीत नाहीं अशा, देवाच्या गोष्टी सांगतो. ५ सद्विधा म्ह. ब्रह्मविद्या. सर्वव्यापी परमात्म्याला तत्काळ भेटविणारी ती सद्विद्या, तें ज्ञान.

म्हणोनी ज्ञात्यावांचून नाहीं । ज्ञानमार्ग ॥ १५ ॥
या कारणें ज्ञाता पहावा । त्याचा अनुग्रह घ्यावा ।
सारासारविचारें जीवा । मोक्ष प्राप्त ॥१६॥ ( द. ६, स. १)

( २ )

एक निश्चय तो ऐसा । मुख्य देव आहे कैसा ।
नाना देवांचा वळेसा । करूंचि नये ॥ १७ ॥
जेणें निर्मिलें सचराचर । त्याचा करावा विचार ।
शुद्ध विवेकें परमेश्वर । वोळखावा ॥ १८ ॥
तोडावा बंधनाचा संशयो । करावा मोक्षाचा निश्चयो ।
पाहावा भूताचा अन्वयो । व्यतिरेकेसी ॥ १९ ॥
पूर्वपक्षेसी सिद्धांत । पाहावा प्रकृतीचा अंत ।
मग पावावा निवांत । निश्चयो देवाचा ॥२०॥ (द.५, स.१०)
लौकिक बरा संपादिला । परी अंतरीं सावध नाहीं जाला ।
मुख्य देवास चुकला । तो आत्मघातकी ॥ २१ ॥
देवांस भजतां देवलोक । पितरांस भजतां पितृलोक ।
भूतांस भजतां भूतलोक । पाविजेतो ॥ २२ ॥
जेणें जयास भजावें । तेणें त्या लोकास जावें ।
निर्गुणीं भजतां व्हावें । निर्गुणचि स्वयें ॥ २३ ॥
सकळ केलियाचें सार्थक । देव वोळखावा येक ।
आपण कोण हा विवेक । पाहिला पाहिजे ॥ २४ ॥
देव पाहतां निराकार । आपला तों माईक विचार ।
सोहमात्मा हा निर्धार । बाणोन गेला ॥ ( द.९, स. १ )

---

१ अनेक देवांच्या व साधनांच्या गोंधळांत न पडतां मुख्य देवास ओळखावें. २ अन्वयव्यतिरेकानें भूतें नाशवंत कशीं आहेत, व ब्रह्म शाश्वत कसें आहे तें पहावें. ३ अष्टधा प्रकृति (पूर्वपक्ष) निरास करून ब्रह्म शोधावें.

## (८) देव कोण, मी कोण.

आधीं मुख्य देव तो कोण। मग आपण भक्त तो कोण।
पंचीकरण महावाक्यविवरण। केलेंचि करावें॥ १॥
पंचभूतिक हे माया। माईक जाय विलया।
पिंडब्रह्मांड अष्टकाया। नाशिवंत॥ २॥
दिसेल तितुकें नासेल। उपजेल तितुकें मरेल।
रचेल तितुकें खचेल। रूप मायेचें॥ ३॥
देहधारक तितुके नासती। हे तों रोकडी प्रचीती।
मनुष्येंवीण उत्पत्ति। रेत कैचें॥ ४॥
अन्न नसतां रेत कैचें। औषधी नसतां अन्न कैचें।
औषधीस जिणें कैचें। पृथ्वी नसतां॥ ५॥
आप नस्तां पृथ्वी नाहीं। तेज नस्तां आप नाहीं।
वायो नस्तां तेज नाहीं। ऐसें जाणावें॥ ६॥
अंतरात्मा नस्तां वायो कैचा। विकार नस्तां अंतरात्मा कैचा।
निर्विकारीं विकार कैंचा। बरें पहा॥ ७॥
निर्विकार जें निर्गुण। तेचि शाश्वताची खूण।
अष्टधा प्रकृति संपूर्ण। नाशिवंत॥ ८॥
शाश्वत देव तो निर्गुण। ऐसी अंतरीं बाणली खूण।
देव कळला, मी कोण। कळलें पाहिजे॥ ९॥
देहाचा शोध घेतां। मी पण दिसेना पाहतां।
मीतूंपण हें तत्वतां। तत्वीं मावळलें॥ १०॥

---

१ आकाशांत विकार आहे म्हणूनच आकाशाला ब्रह्म म्हणतां येत नाहीं. २ मुख्य देव तो हाच. त्या शाश्वत, सत्य, निरंजन देवाला ओळखावें. ३ देह हें तत्वांचें गांठोडें आहे. तत्वांचा तत्वांत विवेकानें निरास केल्यावर त्यांत 'मी' म्हणायला कोणी सांपडत नाहीं.

पंचीकरण तत्वविवरण । महावाक्यें वस्तु आपण[1] ।
निःसंगपणें निवेदन । केलें पाहिजे ॥ ११ ॥
देवाभक्तांचें मूळ । शोधून पाहतां सकळ ।
उपाधीवेगळा केवळ । निरुपाधि आत्मा ॥१२॥(द.१२–३).

## (९) नाना पंथ, नाना देव–चतुर्विध उपासना.

(१)

सगट माया विस्तारली । अष्टधा[2] प्रकृति फांपावली ।
चित्रविचित्र विकारली । नानारूपें ॥ १ ॥
नाना शरीरें निर्माण जालीं । नाना नामाभिधानें ठेविलीं ।
भाषापरत्वें कळों आलीं । कांहीं कांहीं ॥ २ ॥
मग नाना रीति नाना दंडक । आचार येकाहून येक ।
वर्तों लागले सकळ लोक । लोकाचारें ॥ ३ ॥
नाना मतें निर्माण जालीं । नाना पाषांडें वाढलीं ।
नाना प्रकारींचीं उठिलीं । नाना[3] बंडें ॥ ४ ॥
जैसा प्रवाह[4] पडिला । तैसाचि लोक चालिला ।
कोण वारील[5] कोणाला । येक नाहीं ॥ ५ ॥

१ पंचीकरणानें तत्वाचा झाडा होतो व तत्वातीत केवळ ब्रह्मस्वरूप उरतें. महावाक्यबोधानें त्याशीं आपण अनन्य झालें पाहिजे. " महावाक्य तत्वादिकें पंचिकर्णे । खुणे पाविजे संतसगें विवर्णें " ( मनाचे श्लोक, १५४ पहा. ) चंद्रशाखान्यायानें पंचीकरण, तत्वविवरण व महावाक्य यांचें संतसद्गुरुमुखानें श्रवण करून मनन करावें व ' वस्तु आपण ' या पूर्णबोधानें खुणेला पावावें. २ पंचभूतें व त्रिगुण मिळून अष्टधा प्रकृति. भूमि, आप, अनल, वायु, आकाश, मन ( रज ), बुद्धि ( सत्व ) व अहंकार ( तम ) ही अष्टधा प्रकृति. ३ अनेक मतमतांतरें, पंथ, संप्रदाय उभे राहिले. ४ लोक प्रवाहपतित आहेत. ओघाबरोबर वाहात जाणारेच सारे ! ५ निवारील.

पृथ्वीचा जाला गळाठा[1] । येकाहून येक मोठा ।
कोण खरा कोण खोटा । कोण जाणे ॥ ६ ॥
देव जाले उदंड । देवांचें माजलें भंड ।
भूतांदेवतांचे थोतांड । येकेंचि[2] जालें ॥ ७ ॥
मुख्य देव तो कळेना । कशास कांहींच मिळेना ।
येकास येक वळेना । अनावर ॥ ८ ॥
शास्त्रांचा बाजार भरला । देवांचा गल्बला जाला ।
लोक कामनेच्या[3] व्रताला । झोंबोन पडती ॥ ९ ॥
ऐसें अवघें नासलें । सत्यासत्य हारपलें ।
अवघें अनाविक[4] जालें । चहूंकडे ॥ १० ॥
मतामतांचा गल्बला । कोणी पुसेना कोणाला ।
जो जे मतीं सांपडला । तयास तेंचि थोर ॥ ११ ॥
असत्याचा अभिमान । तेणें पाविजे पतन ।
म्हणोनियां ज्ञाते जन । सत्य शोधिती ॥ १२ ॥
लोक कोण्या पंथें जाती । आणि कोण्या देवास भजती ।
ऐसी हे रोकडी प्रचीती । सावध ऐका ॥ १३ ॥
मृत्तिका धातु पाषाणादिक । ऐसिया प्रतिमा अनेक
बहुतेकें[5] लोकांचा दंडक । प्रतिमादेवीं ॥ १४ ॥
नाना देवांचे अवतारें[6] । चरित्रें ऐकती येक नर ।
जपध्यान निरंतर । करिती पूजा ॥ १५ ॥

---

१ नाना मतांची खिचडी. २ निर्माण भूतें व देवता यांच्यांतही भेद कळेनासा झाला. ३ वासनाबद्ध जीव सकाम व्रत आचरूं लागले. ४ 'अनायक' किंवा 'अनाविक'—ज्याला कोणी नायक किंवा कर्णधार नाहीं असा समाज झाला. बेबंदशाही माजली. ५ बहुजनसमाजाचा कल मूर्तिपूजा करण्याकडे आहे. लोकांना अव्यक्तोपासना कठिण म्हणून मानवत नाहीं. त्यांना समोर कांहीं प्रतीक (देव) लागत असतें. ६ रामकृष्णादि अवतार.

येक सकळांचा अंतरात्मा । विश्वीं वर्ते जो विश्वात्मा ।
द्रष्टा[1] साक्षी ज्ञानात्मा । मानिती येक ।। १६ ।।
येक ते निर्मळ निश्चळ । कदापि नव्हेती चंचळ ।
अनन्यभावें केवळ । वस्तूच ते ।। १७ ।।
येक नाना प्रतिमा । दुसरा अवतारमहिमा ।
तिसरा तो अंतरात्मा । चौथा निर्विकारी ।। १८ ।।
ऐसे हे चत्वार[2] देव । सृष्टीमधील स्वभाव ।
यावेगळा अंतर्भाव । कोठेंचि नाहीं ।। १९ ।।
प्रकृतीमधीलें[3] देव । तो प्रकृतीचा स्वभाव ।
भावातीत महानुभाव । विवेकें जाणावा ।। २० ।।
अरे, जो चंचळास[4] ध्याईल । तो सहज चळेल ।
जो निश्चळास भजेल । तो निश्चळचि ।। २१ ।।
प्रकृतीसारिखें[5] चालावें । परी अंतरीं शाश्वत वोळखावें ।
सत्य होऊन वर्तावें । लोकांऐसें ।। २२ ।। ( द. ११, स. २ )

---

१ सर्वांतर्यामी ज्ञानधन द्रष्टा देव कोणी मानतात. २ प्रतिमापूजा, अवतारोपासना किंवा विभूतिपूजा, अंतरात्मभजन व निर्गुणोपासना अशा चार प्रकारांनीं लोक देवाला भजतात. याशिवाय पांचवा प्रकार नाहीं. ३ प्रकृतींतले देव म्ह० तो प्रकृतीचा स्वभाव; प्रकृतीपलीकडचा, सृष्टपदार्थांहून वेगळा ( भावातीत ) असा देव विवेकानें जाणावा. ४ वरील चारांपैकीं तीन प्रकार चंचळांतले आहेत. चंचळाच्या ध्यानानें निश्चळ पद मिळणें दुर्घट म्हणून निश्चळास भजावें. ५ बाकी लोकव्यवहारांत जाणत्यानेंही लोकांसारखेंच वागावें. मात्र अंतरीं निश्चळ ओळखून असावें. सत्य (शाश्वत) ब्रह्माच्या चिंतनानें सत्य (शाश्वत) होऊन लोकांसारखेंच लोकांत वागावें. ब्रह्मनिष्ठ पुरुषही मूर्तिपूजा कां करितात, समर्थासारख्यांनींहीं सगुणमूर्तीची उपासना कां वाढविली व राममारुतिमंदिरें कां स्थापिलीं याचें उत्तर यांत आहे.

(२)

पापावेया[1] भगवंतातें । नाना पंथ नाना मतें ।
तया देवाचें स्वरूप तें । कैसें आहे ॥ २३ ॥
बहुत देव सृष्टीवरी । त्यांची गणना कोण करी ।
येक देव कोणेपरी । ठाईं पडेना ॥ २४ ॥
बहु देव बहु भक्त । इच्छया जाले आसक्त ।
बहु ऋषि बहु मत । वेगळालें ॥ २५ ॥
बहुत शास्त्रीं बहुत भेद । मतामतांस विरोध ।
ऐसा करितां विवाद । बहुत गेले ॥ २६ ॥
देव कोणासी म्हणावें । कैसें तयासी जाणावें ? ।
तेंचि बोलणें स्वभावें । बोलिजेल ॥ २७ ॥
जेणें केलें चराचर । केले सृष्टयादि व्यापार ।
'सर्वकर्ता' निरंतर । नाम ज्याचें ॥ २८ ॥
तेणें केल्या मेघमाळा । चंद्रबिंबीं[2] अमृतकळा ।
तेज दिधलें रविमंडळा[3] । जया देवें ॥ २९ ॥
चौंरी[3] खाणी चारी वाणी । चौर्‍यांशीं[4] लक्ष जीवयोनी ।
जेणें निर्मिले लोक तिनी । तया नांव देव ॥ ३० ॥
ब्रह्मा विष्णु आणि हर । हे जयाचे अवतार ।
तोचि देव हा निर्धार । निश्चयेंसी ॥ ३१ ॥

---

१ नाना पंथ नाना मतें देवाचा शोध करीतच आहेत, पण तो देव कसा आहे ? २ चंद्रबिंबीं अमृतकळा ठेवल्या, चंद्रावरील अमृतधारांनीं वृक्ष व वनस्पतींचें पोषण होतें. 'पुष्णामि चौषधीः सर्वाः सोमो भूत्वा रसात्मकः' (गीता). ३ जारज, अंडज, स्वेदज व उद्भिज्ज या चार खाणी. सर्व प्राणी यांत येतात. ४ चार लक्ष मनुष्य, वीस लक्ष पशु, अकरा लक्ष कृमिकीटक, दहा लक्ष खेचर, नऊ लक्ष जलचर व तीस लक्ष स्थावर मिळून ८४ लक्ष (दास. द. २०, स. ६).

सर्वकर्ता तोचि देव । पाहों जातां निरवयव ।
ज्याची कळा लीळालाघव । नेणती ब्रह्मादिक ॥ ३२ ॥
देवें निर्मिली हे क्षिती । तिचे पोटीं पाषाण होती ।
तयासचि देव म्हणती । विवेकहीन ॥ ३३ ॥
जो सृष्टिनिर्माणकर्ता । तो ये सृष्टिपूर्वीं होता ।
मग हे तयाची सत्ता । निर्माण जाली ॥ ३४ ॥
कुलाल पात्रापूर्वीं आहे । पात्रें कांहीं कुलाल नव्हे ।
तैसा देव पूर्वींच आहे । पाषाण नव्हे सर्वथा ॥ ३५ ॥
तैसा सृष्टिकर्ता देव । परी तो नव्हे सृष्टिभाव ।
जेणें केले नाना जीव । तो जीव कैसनी ? ॥ ३६ ॥
पदार्थवस्तु नाशिवंत । हें तों अनुभवास येत ।
याकारणें भगवंत । पदार्थावेगळा ॥ ३७ ॥
अंतःकरण पंचप्राण । बहुतत्वीं पिंडज्ञान ।
या सर्वांस आहे चळण । म्हणोनी देव नव्हेती ॥ ३८ ॥
एवं जगदीश तो वेगळा । जग निर्माण त्याची कळा ।
तो सर्वांमध्यें, परी निराळा । असोन सर्वीं ॥३९॥(द.८,स.१)

## ( १० ) पंचभूतातीत देव.

### ( १ )

पृथ्वी आप तेज वायु आकाश । या सबाह्यांतरीं जगदीश ।
पंचभूतांसी आहे नाश । आत्मा अविनाशरूपी ॥ १ ॥
पंचभूतें आणि त्रिगुण । ऐसी अष्टधा प्रकृति जाण ।
अष्टधा प्रकृतीस नामाभिधान । दृश्य ऐसें ॥२॥
तें हें दृश्य नाशिवंत । ऐसें वेदश्रुति बोलत ।

१ कुंभार जीं मडकीं घडतो त्यापूर्वीं तो असतो, तसा सृष्टिकर्ता देव सृष्टीच्या पूर्वीचा आहे. २ हीं सर्व चंचल आहेत व देव निश्चल आहे.

निर्गुण ब्रह्म शाश्वत । जाणती ज्ञानी ॥ ३ ॥
जें शस्त्रें तोडिता तुटेना । जें पावकें जाळितां जळेना ।
कालवितां कालवेना । आपेंकरूनी ॥ ४ ॥
ज्यासी वर्णचि नसे । जें सर्वांहूनि अनारिसें ।
परंतु असतचि असे । सर्व काळ ॥ ५ ॥
प्रगट तें जाणावें असार । आणि गुप्त तें जाणावें सार ।
गुरुमुखें हा विचार । उमजों लागे ॥ ६ ॥
गुप्त तेंचि प्रगटवावें । असाध्य तेंचि साधावें ।
कानडेंचि अभ्यासावें । सावकाश ॥ ७ ॥
वेद विरंची आणि शेष । जेथें सिणले निःशेष ।
तेंचि साधावें विशेष । परब्रह्म तें ॥ ८ ॥
पृथ्वी नव्हे आप नव्हे । तेज नव्हे वायु नव्हे ।
वर्णव्यक्त ऐसें नव्हे । अव्यक्त तें ॥ ९ ॥
तयास म्हणावें देव । वरकड लोकांचा स्वभाव ।
जितुके गांव तितुके देव । जनांकारणें ॥ १० ॥
ऐसा देवाचा निश्चयो जाला । देव निर्गुण प्रत्यया आला ।
आतां आपणाचि आपला । शोध घ्यावा ॥ ११ ॥
पाहतां देहाचा विचार । अवघा तत्वांचा विस्तार ।
तत्वें तत्व झाडितां सार । आत्माचि उरे ॥ १२ ॥
तत्वांचें गांठोडें शरीर । याचा पाहतां विचार ।
येक आत्मा निरंतर । आपण नाहीं ॥ १३ ॥

१ 'नैनं छिदन्ति शस्त्राणि' इ. (गीता). २ वेगळें. ३ प्रगट आहे दृश्य व गुप्त आहे परब्रह्म. ४ बिकट, दुर्गम. ५ ब्रह्मदेव. ६ त्याला वर्ण नाहीं व तें व्यक्तही नाहीं. 'नसे पीत ना श्वेत ना श्याम कांहीं । नसे व्यक्त अव्यक्त ना नीळ कांहीं' (मनाचे श्लोक १५०).

देह-बुद्धीनें बांधला । तो विवेकें मोकळा केला ।
देहातीत होतां पावला । मोक्षपद ॥ १४ ॥
जागे होतां स्वप्न सरे । विवेक पाहतां दृश्य वोसरे ।
स्वस्वरूपानुसंधानें तरे । प्राणिमात्र ॥१५ ॥

(द. ६, स. २)

(२)

वेदशास्त्र श्रुति स्मृती । तेथें वाक्यभेद[1] पडती ।
ते सर्वही निवडेती[2] । सद्गुरूचेनि वचनें ॥ १६ ॥
म्हणोनि वादविवाद । सांडून कीजे संवाद ।
तेणें होय ब्रह्मानंद । स्वानुभवें ॥ १७ ॥
धातु पाषाण मृत्तिका । चित्रलेप काष्ठ देखा ।
तेथें देव कैंचा मूर्खा । भ्रांति पडली ! ॥ १८ ॥
सृष्टीपूर्वी, सृष्टि चालतां । सृष्टि अवघी संहारतां ।
शाश्वत देव तत्वता । आदिअंतीं ॥ १९ ॥
साधुसंत महानुभाव । त्यांचा ऐसाचि अनुभव ।
पंचभूतातीत देव । सृष्टि मिथ्या ॥ २० ॥
म्हणोनि सृष्टि नाशिवंत । जाणती संतमहंत ।
सगुणीं भजावें निश्चित । निश्चयालागीं ॥ २१ ॥
सगुणाचेनि आधारें[3] । निर्गुण पाविजे निर्धारें ।
सारासारविचारें । संतसंगें ॥ २२ ॥
एवं सृष्टि मिथ्या जाण । जाणोनि रक्षावें सगुण ।
ऐसी हे अनुभवाची खूण । अनुभवी जाणती ॥२३॥

(द. ६, स. ६ )

१ वचनांत फरक. २ उलगडतात, भेद मिटतो. ३ उपासनाबळानें ज्ञान मिळतें.

## (१०) सृष्टीची कहाणी.

### (१)

ब्रह्म निर्मळ निश्चळ । शाश्वत सार अमळ विमळ ।
अवकाश घन पोकळ । गगनाऐसें ॥ १ ॥
तें रचेना ना खचेना । तें होयेना ना जायेना ।
मायातीत निरंजना । पाराचि नाहीं ॥ २ ॥
तेथें संकल्प[1] उठला । षड्गुणेश्वर बोलिजे त्याला ।
अर्धनारी-नटेश्वराला । बोलिजेते ॥ ३ ॥
सर्वेश्वर सर्वज्ञ । द्रष्टा साक्षी ज्ञानघन ।
परेश परमात्मा जगज्जीवन । मूळपुरुष ॥ ४ ॥
ते मूळमाया बहुगुणी । अधोमुखें गुणे[2]क्षोभिणी ।
गुणत्रय तिजपासुनी । निर्माण झाले ॥ ५ ॥
पुढें विष्णु[3] जाला निर्माण । जाणती कळा सत्वगुण ।
जो करिताहे पाळण । त्रैलोक्याचें ॥ ६ ॥
पुढें जाणीव-नेणीव-मिश्रित । ब्रह्मा[4] जाणावा नेमस्त ।
त्याच्या गुणें उत्पत्ति होत । भुवनत्रयीं ॥ ७ ॥
पुढें रुद्र तमोगुण । सकळ संहाराचें कारण ।
सकळ कांहीं कर्तेपण । तेथेंचि आलें ॥ ८ ॥
तेथून[5] पुढें पंचभूतें । पावलीं स्पष्ट दशेतें ।
अष्टधा प्रकृतीचें स्वरूप तें । मुळींच आहे ॥९॥ (द.१२स.६)

---

१ मी एक आहे तें बहु व्हावें—'एकोऽहं बहु स्याम्' असा संकल्प उठला, त्यालाच षड्गुणेश्वर, अर्धनारीनटेश्वर, सर्वेश्वर, द्रष्टा, परमात्मा, मूळपुरुष, मूळमाया, इ. नांवें आहेत. २. गुणमाया. ३ सत्व, जाणीव, विष्णु ४ रज जाणिवनेणिवमिश्रित ब्रह्मा. ५ तम, नेणीव, रुद्र, ६ तमोगुणापासून पंचभूतें ७ अष्टधा प्रकृति सूक्ष्मत्वें मूळमायेंतच आहे.

( २ )

ब्रह्मीं मूळ माया जाली । तिच्या पोटीं माया आली ।
मग ते गुणा प्रसवली । म्हणोनि गुणक्षोभिणी ॥ १० ॥
पुढें तिजपासाव कोणें । सत्वरजतमोगुण ।
तमोगुणापासोन निर्माण । जालीं पंचभूतें ॥ ११ ॥
पंचभूतिक ब्रह्मगोळ । जेणें कळे हा प्राजळ ।
दृश्य सांडून केवळ । वस्तुच पाविजे ॥ १२ ॥
महाद्वार वोलांडावें । मग देवदर्शन घ्यावें ।
तैसें दृश्य हें सांडावें । जाणोनिया ॥ १३ ॥ ( द.८,स.४ )

( ३ )

ब्रह्मांडरचना जेथून जाली । तेथें विवेकें दृष्टि घाली ।
विवरतां विवरतां लाधली । पूर्वापर स्थिति ॥ १४ ॥
जगदीशापरता लाभ नाहीं । कार्याकारण सर्व कांहीं ।
संसार करीत असतांही । समाधान ॥१५॥ (द. १२,स.८)

( ४ )

येकें स्त्रीपुरुषें होती । उभयतांमध्यें बहु प्रीती ।
येकरूपेंचि वर्तती । भिन्न नाहीं ॥ १६ ॥

---

१ कोण म्ह. उत्पन्न झाले. कोण हें भूतकालचें क्रियापद आहे. 'कोण निघाली' म्ह. बाळंत जाली. हा शब्दप्रयोग मोगलाईंत रूढ आहे. २ मूळमाया हें महाद्वार, तें ओलांडून जावें म्ह. पलीकडे मुख्य देव (विमल ब्रह्म) आहे. त्याचें त्रिपुटीरहित दर्शन होतें. ३ ब्रह्मांडरचना व प्रळय याचें विवरण द.१३ स.३-४ मध्यें पहा. ४ 'दृश्य हलकल्लोळें। जडचंचळ वितुळलें। याउपरी शाश्वत उरलें। परब्रह्म तें' (द. १३–४–२४) ५ शिवशक्ति, गणेशशारदा, प्रकृतिपुरुष. ६ ज्ञानेश्वरांच्या अमृतानुभवाचें शिवशक्तिविलासनामक पहिलें बहारीचें प्रकरण अवश्य वाचावें.

ऐसा कांहींयेक काळ लोटला । तयांस येक पुत्र जाला ।
कार्यकर्ता आणि भला । सर्व विषयीं ॥ १७ ॥
पुढें त्यासही जाला कुमर । तो पित्याहून आतुर ।
कांहीं तदर्धचतुर । व्यापकपणें ॥ १८ ॥
तेणें व्याप उदंड केला । बहुत कन्यापुत्र व्याला ।
उदंड लोक संचिला । नाना प्रकारें ॥ १९ ॥
त्याचा पुत्र ज्येष्ठ । तो अज्ञान आणि रागिट ।
अथवा चुकतां नीट । संहार करी ॥ २० ॥
पिता उगाच बैसला । लेकें बहुत व्याप केला ।
सर्वज्ञ जाणता भला । ज्येष्ठ पुत्र ॥ २१ ॥
नातु त्याच अर्ध जाणे । पणतू तो कांहींच नेणें ।
चुकतां संहारणें । महाक्रोधी ॥ २२ ॥
लेक सकळांचें पाळण करी । नातू मेळवी वरच्यावरी ।
पणतू चुकल्या संहार करी । अकस्मात ॥ २३ ॥
नेमस्तपणें वंश वाढला । विस्तार उदंडचि जाला ।
ऐसा बहुत काळ गेला । आनंदरूप ॥ २४ ॥
विस्तार वाढला गणवेना । वडिलांना कोणीच मानीना ।
परस्परें कित मना । बहुत पाडिला ॥ २५ ॥
नेणपणें भरीं भरले । मग ते अवघेच संहारले ।
जैसे यादव निघाले । उन्मत्तपणें ॥ २६ ॥

---

१ कार्यकर्ता व जाणिवेचा हा पुत्र म्ह. सत्वगुणी विष्णु, त्याचा आतुर (अुत्साही, अुलाढालौ) पण अर्धचतुर म्ह. जाणीवनेणीवमिश्रित पुत्र हा रजोगुणी ब्रह्मा. त्यानें अनंत ब्रह्मांडें व जीव उत्पन्न केले. त्याचा पुत्र तमोगुणी रुद्र. २ पिता म्ह. शिवशक्तिरूप मूळपुरुष, त्याचा सर्वज्ञ भला लेक विष्णु, नातू ब्रह्मा व पणतू रुद्र. नातूनें मिळवावें व पणतूनें संहारावें असा क्रम चालला, ३ मूळ पुरुषाच्या साम्राज्यांत अंतःकलह उत्पन्न झाले, एकोप्या मोडून वडिलांचा मान बुडाला.

बाप लेक नातु पणतु । सकळांचा जाला निःपातु ।
कन्या पुत्र हेतु-मातु । अणुमात्र नाहीं ॥ २७ ॥
ऐसी कहाणी जो विवरला । तो जन्मापासून सुटला ।
श्रोता वक्ता धन्य जाला । प्रचीतीनें ॥ २८ ॥
आमची कहाणी सरो । तुमचे अंतरीं भरो ।
ऐसें बोलणें विवरो । कोणी तरी ॥ २९ ॥
ऐसी कहाणी निरंतर । विवेकें ऐकती जे नर ।
दास म्हणे जगदुद्धार । तेचि करिती ॥३०॥ (द.१३स.५)

## (११) जुनाट पुरुषाच्या कन्येचा खेळ !

(ब्रह्मीं मूळमाया झाली. अनंत ब्रह्मांडांची उभारणी व संहारणी करणें हा तिचा नित्य खेळ आहे. माया झालीच नसून एकजिनसी परब्रह्मच आहे हा आहे शास्त्रसिद्धांत, तेव्हां सृष्टयुत्पत्तीची कहाणी सांगतांना तिला कल्पनेनें उभी करून तिच्या खेळाचें कौतिक कौतुकानें वर्णिलेलें असतें. ब्रह्मापासून ती झाली म्हणून तिला कोठें ' कन्या ' म्हटलें आहे, व ब्रह्माच्या सत्तेनें ती खेळ खेळून राहिली आहे म्हणून कोठें तिला ' भार्या ' म्हटलें आहे ! ती मुळींच माया म्ह. मिथ्या असल्यामुळें कल्पना करावी तशी ती आहे ! परब्रह्म आणि माया यांनाच सांख्यशास्त्रांत पुरुष व प्रकृति म्हटलें आहे. प्रकृतीलाच वेदांतांत माया व अव्यक्तवादांत अव्यक्त म्हटलें आहे. महद्ब्रह्म हीच. अमृतानुभवांच्या पहिल्या प्रकरणांत शिवशक्तिरूपानें याच जोडीचें वर्णन केलें आहे. तेथें व ज्ञानेश्वरीच्या १३ आणि १४ या अध्यायांत माया ही ब्रह्माची भार्या अशी कल्पना केली आहे. याच जोडीचें गणेशशारदारूपानें समर्थांनीं जागोजाग वर्णन केलें आहे. त्यांनीं तिला कोठें ' भार्या ' केलें आहे ( उदा. ' जे महापुरुषाची भार्या । अतिसंलग्न अवस्था तुर्या ' (दास. १-३-४) व कोठें 'कन्या' (उदा. 'तयापासून प्रमदा । इच्छाकुमारी शारदा ' (दास. ७-१-७) बनविलें आहे. गीतेनें ब्रह्माला ' पुराण पुरुष ' व नाथांनीं ' जुनाट जोगडा काळाचा काकडा ' म्हटलें आहे. त्याप्रमाणेंच समर्थांनीं ' जुनाट पुरुष ' म्हणून त्याचें व त्याची लडिवाळ कन्या माया इचें मौजेचें वर्णन केलें आहे त्याचा उतारा पुढें दिला आहे. )

---

१ सृष्टीची उभारणीसंहारणीरूप कहाणी.

असो हें बोलणें आतां । अवधान द्यावें श्रोतां ।
जुनाट पुरुषाची कथा । सांगिजेल ॥ १ ॥
सकळांचा महापुरुष । जो ब्रह्मादिकांचा ईश ।
शिवादिक त्याचे अंश । हा तों अनामी ! ॥ २ ॥
सकळ सृष्टीचा व्यापक । जो मूळमायेचा जनक ।
तो हा पुरुष कोणीयेक । बहुतां दिवसांचा ॥ ३ ॥
जयाचे आज्ञेप्रमाणें । ब्रह्मादिकांस वर्तणें ।
चंद्रसूर्य तारांगणें । जयाची सत्ता[1] ॥ ४ ॥
मही अचळ मेधमाळा । नाना सरिता सिंधुजळा ।
मर्यादा चाले अवलीळा । जयाचेनि ॥ ५ ॥
ऐशा ब्रह्मांडमाळा अनंत । इच्छामात्रें होत जात ।
तरी जयाचा ऐकांत[2] । मोडलाच नाहीं ॥ ६ ॥
आपण एकला सर्व काळ । कन्या खेळे नाना खेळ ।
एकटी असे लडिवाळ[3] । नानाछंदी ॥ ७ ॥
अनंत ब्रह्मांडें उतरंडी । खेळ मांडिला परवंडी[4] ।
काळ करी फोडाफोडी । पुत्र तयाचा ॥ ८ ॥
परम सुलक्षण । राहीना पित्याधीण ।
पिता तियेचा निर्गुण । माता[5] असेना ॥ ९ ॥

१ 'भीषास्माद्वातः पवते । भीषोदेति सूर्यः । भीषास्मादग्निश्चेंद्रश्च । भीषास्मात्पंचम इति' (तैत्तिरीयोपनिषत्) २ एकपण. ३ एकुलती एक मुलगी, तेव्हां ती लाडकी व छांदिष्ट असायचीच ! ४ या लाडक्या मुलीनें अनंत ब्रह्मांडांच्या उतरंडी रचायचा खेळ मांडावा व तिच्या द्वाड भावानें (काळानें) त्या मोडीत असावें ! ५ आई नाहीं तेव्हां ती बापाला क्षणभरही सोडायची नाहीं हें उघडच आलें.

जे क्षणीं उठोनि[1] पाहे । तों खेळ मोडिला आहे ।
पुनरपि लवलाहें । खेळ मांडी ॥ १० ॥
ऐसी निरंजनीं एकट । करी खेळाची खटपट ।
खेळ खेळतां वीटे[2] । मानू नेणे ॥ ११ ॥
न कळे तियेचें लाघव[3] । बहुत पाडिले मानव ।
पालीं सांठविले जीव । कोट्यानुकोटी ॥ १२ ॥
बहुत लोभाची आवडी । घातली इच्छेची बेडी ।
ऐशा बहुत उतरंडी । संपूर्ण केल्या ॥ १३ ॥
प्राणी जाऊं नेदी बाहेरी । जीववूनि[4] मागुतें मारी ।
चुकों नेदी वेरझारी । वासनासूत्रें ॥ १४ ॥
संतान[5] वाढलें लक्षांवरी । तरी ते ठायींची कुमारी ! ।
नांव ठेविता उदरीं[6] । पिता आला ! ॥ १५ ॥
पिता[7] उदरास आला । तरी तो नाहीं जन्मला ।
भर्ता स्वयें आपुला । होवोनि ठेली ॥ १६ ॥
भ्रताराश प्रसवली । मग ते मायराणी जाली ।
सासू माता आपुली । आपणाचि ! ॥ १७ ॥
वायु फुंकोन केला वन्ही । पोटीं लाविलें पाणी ।
आपापासोन धरणी । कळों आली ॥ १८ ॥
ऐसी खेळास गुंतली । ते समयीं पिता विसरली ।
ते पाउलीं मुरडली[8] । मागुती मागें ॥ १९ ॥

---

१ ती जागी होते तोंच खेळ मांडते व निजली कीं खेळ मोडतो. २ मुलींना खेळायचा कंटाळा नसतोच. ३ चातुर्य, भाव. ४ जिवंत करायचें, मारायचें, वासानासूत्रानें पुन्हा जिवंत करायचें. याप्रमाणें जीवांना हातचें न सोडण्याविषयीं तिची खबरदारी फार. ५ चौऱ्याशीं लक्ष योनींतले असंख्य जीव हीं तिचीं लेंकरें, पण तिचें कौमार्य कायमच ! ६ अंतरात्मरूपानें. ७ जुनाट पुरुषाला. ८ मागें मुरडून पाहूं लागली तों बाप दिसेना.

पिता न दिसे डोळां । म्हणोनी शोक करी बाळा ।
भोंवती पाहे वेळोवेळां । अष्ट दिशेतें ॥ २० ॥

वेधे पित्याचा लागला । मग खेळ मोडोनी गेला ।
उतरंडी फोडून पळाला । काळपुत्र ॥ २१ ॥

पिता पाहतां खेळ मोडे । खेळ पाहतां पिता दडे ।
पाहती जाली दोहींकडे । उभी राहोन ॥ २२ ॥

मग ते लोभें झळंबली । पित्याकडे चालली ।
खेळ विसरोन गेली । जन्मस्थाना ॥ २३ ॥

आपणा विसरोन पाहे । तंव पिता पुढें आहे ।
ऐसें देखोन लवलाहे । भेटती जाली ॥ २४ ॥

पिता तामसी जैसा वन्ही । तया निःसंगाची मिळणी ।
कन्या निमाली तत्क्षणीं । पित्या देखतां ॥ २५ ॥

तंव पिता झळंबला । कंठ सद्गदित जाला ।
म्हणे आज संग सोडला । कुमरीनें ॥ २६ ॥

ऐसा नावेकेंवरी । पिता विलाप करी ।
पाहे तंव अभ्यंतरीं । कन्या उभी ॥ २७ ॥

मग तयेसी भेटला । उभयतां आनंद जाला ।
मागुता खेळ मांडला । तिये कुमरीनें ॥ २८ ॥

---

१ ब्रह्माकडे पाहूं लागली तों खेळ मोडला. २ ब्रह्माकडे पाहतां सृष्टि नाहीं, सृष्टीकडे पाहतां ब्रह्माचें विस्मरण. 'प्रगटे तंव तंव न दिसे। लपे तंव तव आभासे' असा उभयतांचा लपंडावीचा खेळ चालला आहे; ब्रह्म लपून जगदाभास दाखवतें व प्रगटून जगाचा ग्रास करितें (चांगदेवपासष्टी.) ३ तुर्यावस्थेनें. ४ क्षणभर.

## ( १२ ) सृष्टि मिथ्या, मग सगुणभक्ति कशाला ?

( १ )

प्रश्न :–ज्ञानें दृश्य मिथ्या जालें । तरी कां पाहिजे भजन केलें ।
तेणें काय प्राप्त जालें । हें मज निरोपावें ॥ १ ॥
ज्ञानाहूनि श्रेष्ठ असेना । तरी कां पाहिजे उपासना ? ।
उपासनेनें जना । काय प्राप्त ? ॥ २ ॥
सगुण नाशिवंत ऐसें सांगतां । पुन्हा भजन करावें म्हणतां ।
तरी कशासाठीं आतां । भजन करूं ? ॥ ३ ॥

× × ×

उत्तर :–गुरूचें वचन प्रतिपाळण । हें मुख्य परमार्थाचें लक्षण ।
वचनभंग करितां विलक्षण । सहजचि जालें ॥
म्हणोनी आज्ञेसी वंदावें । सगुण भजन मानावें ॥ ४ ॥

× × ×

करणें लागे भोजन । करणें लागे उदकप्राशन ।
मळमूत्रत्याग-लक्षण । तेंहि सुटेना ॥ ५ ॥
जनाचें समाधान राखावें । आपुलें पारिखें वोळखावें ।
आणि भजनचि मोडावें । हें कोण ज्ञान ॥ ६ ॥
ज्ञानें[2] विवेकें मिथ्या जालें । परंतु अवघें नाहीं टाकिलें ।
तरी मग भजनोंचि काय केलें । सांग बापा ! ॥ ७ ॥
साहेबास लोटांगणीं जावें । नीचासारिखें व्हावें ।
आणि देवास न मानावें । हें कोण ज्ञान ? ॥ ८ ॥

---

१ निर्गुणब्रह्म तेवढें सत्य व बाकी सारी सृष्टि मिथ्या, तर मग ' सगुण ' ही सृष्टींतलें–अतएव मिथ्याच झालें. मग त्याची ( सगुणाची ) उपासना कशाला करायला पाहिजे ? २ निर्गुणाच्या बाजूनें सृष्टि मिथ्या, पण सृष्टींतले इतर व्यवहार सोडले आहेत काय ?

हरिहरब्रह्मादिक । हे जयाचे आज्ञाधारक ।
तूं ऐक मानवी रंक । भजसी ना तरी काय गेलें ? ।। ९ ।।

× × ×

आमुचे कुळीं रघुनाथ । रघुनाथें आमुचा परमार्थ ।
जो समर्थाचाही समर्थ । देवां सोडविता ।। १० ।।
त्याचे आम्हीं सेवकजन । सेवेकारितां जालें ज्ञान ।
तेथें अभाव धरितां पतन । पाविजेल कीं ।। ११ ।।
मी थोर वाटे मनीं । तो नव्हे ब्रह्मज्ञानी ।
विचार पाहतां देहाभिमानी । प्रत्यक्ष दिसे ।। १२ ।।
ना तें ज्ञान ना तें भजन । उगाचि आला देहाभिमान ।
येथें नाहीं कीं अनुमान । प्रत्यक्ष तुझा ।। १३ ।।
तरी आतां ऐसें न करावें । रघुनाथभजनीं लागावें ।
तेणेंचि ज्ञान बोलावें । चळेना ऐसें ।। १४ ।।
करी दुर्जनांचा संहार । भक्तजनांसी आधार ।
ऐसा हा तों चमत्कार । रोकडा चाले ।। १५ ।।
कर्ता राम मी नव्हे आपण । ऐसें सगुणनिवेदन ।
निर्गुणीं तें अनन्य । निर्गुणाचि होइजे ।। १६ ।।
ज्ञानबळें उपासना । आम्ही भक्त जरी मानूंना ।
तरी या दोघांच्या पतना । पावों अभक्तपणें ।। १७ ।।
देहास लागली उपासना । आपण विवेकें उरेना ।
ऐसी स्थिति सज्जना- । अंतरींची ।। १८ ।। ( दा.द.६,स.७ )

( २ )

निर्गुणीं ज्ञान जालें । म्हणोनि सगुण अलक्ष केलें ।

---

१ सगुणोपासा करितां करितां आम्हांस ब्रह्मज्ञान झालें आहे. २ प्रत्यक्ष. ३ हेळसांड केली, दृष्टीपलीकडे सारलें.

तरी ते ज्ञाते नागवले । दोहींकडे ॥ १९ ॥
नाहीं भक्ती नाहीं ज्ञान । मध्येंच पैसावलों अभिमान ।
म्हणोनियां जपध्यान । सांडूंच नये ॥ २० ॥
सांडील सगुणभजनासी । तो ज्ञाता परी अपेशी ।
म्हणोनियां सगुणभजनासी । सांडूंच नये ॥ २१ ॥
येक गुरु येक देव । कोठें तरी असावा भावें ।
भावार्थ नस्तां वाव । सर्व कांहीं ॥ २२ ॥
निःकामबुद्धीचिया भजना । त्रैलोक्यीं नाहीं तुळणा ।
समर्थेंवीणें घडेना । निष्काम भजन ॥ २३ ॥
कामनेनें फळ घडे । निष्कामभजनें भगवंत जोडे ।
फळ-भगवंता कोणीकडे । महदंतर ॥ २४ ॥
म्हणोनी निःकाम भजन । वरी विशेश ब्रह्मज्ञान ।
तयास तुळितां त्रिभुवन । उणें वाटे ॥ २५ ॥
निरूपणाचा विचार । आणि हरिकथेचा गजर ।
तेथें होती तत्पर । प्राणिमात्र ॥ २६ ॥
म्हणोन सगुणभजन । वरी विशेष ब्रह्मज्ञान ।
प्रत्ययाचें समाधान । दुल्लभ जगीं ॥ २७ ॥ (द.१०,स.७)

## (१३) नाना देवांची उपासना एका अंतरात्म्यासच पावते.

(१)

श्रोता—पृथ्वीमध्यें लोक नाना । त्यांस नाना उपासना ।
भावार्थें प्रवर्तले भजना । ठाईं ठाईं ॥ १ ॥
अपुल्या देवांस भजती । नाना स्तुतिस्तवनें करिती ।

---

१ ना भक्ति ना ज्ञान, याप्रमाणें बुडाले. २ पसरला, वाढला. ३ निष्ठा. ४ निष्कामभक्तीला तर तोडच नाहीं. ५ पुण्यवंतावांचून. ६ इष्ट देवास.

जे ते निर्गुण म्हणती । उपासनेसी ॥ २ ॥
याचा कैसा आहे भाव । मज सांगिजे अभिप्राव ।
वक्ता—अरे हा स्तुतीचा स्वभाव । ऐसा आहे ॥ ३ ॥
निर्गुण म्हणिजे बहुगुण । बहुगुणी अंतरात्मा जाण ।
सकळ त्याचे अंश हें प्रमाण । प्रचीत पहा ॥ ४ ॥
सकळ जनांस मानावें तें । येका अंतरात्म्यास पावतें ।
अधिकारपरत्वें तें । मान्य कीजे ॥ ५ ॥
श्रोता म्हणे —हा अनुमान ! । मुळीं घालावें जीवन ।
तें पावे पानोपान । हे सद्यःप्रचीती ॥ ६ ॥
वक्ता म्हणे —तुळसीवरी । उदक घालावें पात्रवरी ।
वरी न थिरे निमिषवरी । भमीस भेदें ॥ ७ ॥
श्रोता—थोरा वृक्षास कैसें करावें । सेंड्या पात्र कैसें न्यावें ।
याचा अभिप्राय देवें । मज निरोपावा ॥ ८ ॥
वक्ता—पर्जन्याचें उदक पडतें । तें तों मूळाकडेच येतें ।
श्रोता—हाताचि पावेना तेथें । काय करिती ? ॥ ९ ॥
सकळांस मूळ सांपडे । ऐसें पुण्य कैचें घडे ।
साधुजनांचे पवाडे । विवेकीं मन ॥ १० ॥
वक्ता—तथापि वृक्षाचेनि पाडिपाडें । जीवन घालितां कोठें पडे ।
ये गोष्टीचें साकडें । कांहींच नाहीं ॥ ११ ॥ (द. १६; स. ९)

( २ )

उदंड उपासनेचे भेद । किती करावे विशद ।
आपलाले आवडीचा वेध । लागला जनीं ॥ १२ ॥

१ आणि पुन्हा आपली उपासना निर्गुणाची आहे असें म्हणतात. २ मेळ कसा घालावा ? ३ सारे देव त्या अंतरात्म्याचेच अंश आहेत. येऽप्यन्यदेवता-भक्ताः० ' (गीता). ४ स्थिर रहात नाहीं. ५ मुरतें. ६ संकट, अडचण.

परी त्या सकळांचेंही कारण । मुळीं पहावें स्मरण ।
तया स्मरणाचे अंश जाण । नाना देवतें ॥ १३ ॥
देवदेवता भूतें देवतें । मुळीचें सामर्थ्य आहे तेथें ।
अधिकारें नानादेवतें । भजत जावीं ॥ १४ ॥
नानादेवीं भजन केलें । तें मूळपुरुषासी पावलें ।
या कारणें सन्मानिलें । पाहिजे सकळ कांहीं ॥ १५ ॥
प्राणी संसार टाकिती । देवास धुंडीत फिरती ।
नाना अनुमानीं पडती । जेथें तेथें ॥ १६ ॥
लोकांची पाहतां रीती । लोक देवार्चनें करिती ।
अथवा क्षेत्रदेव पाहती । ठाईं ठाईं ॥ १७ ॥
अथवा नाना अवतार । ऐकोन धरिती निर्धार ।
परी ते अवघे सविस्तर । होऊन गेले ॥ १८ ॥
येक ब्रह्मा विष्णु महेश । ऐकोन म्हणती हे विशेष ।
परी गुणातीत तो जगदीश । पाहिला पाहिजे ॥ १९ ॥
भूमंडळीं देव नाना । त्यांची भीड उलंघेना ।
मुख्य देव तो कळेना । कांहीं केल्या ॥ २०
[3]कर्तृत्व वेगळें करावें । मग त्या देवासी पहावें ।
तरीच कांहींयेक पडे ठावें । गौप्यगुह्य ॥ २१ ॥
ते दिसेना ना भासेना । कल्पांतीही नासेना ।
सुकृतावेगळें विश्वासेना । तेथें मन ॥ २२ ॥
उदंड कल्पिते कल्पना । उदंड इच्छिते वासना ।

---

१ मूळमायेच्या ठिकाणीं सर्व दैवतें पहावींत. २ आदिस्फूर्ति, स्मरण, मूळमाया–तिचेच अंश सारीं दैवतें होत. ३ कर्तृत्व (हें अर्थात् मूळमायेचें आहे, त्याचा ब्रह्माशीं संबंध नाहीं) परतें सारून त्या निर्गुण देवाला पहावें, तरच अध्यात्म उलगडेल.

अभ्यंतरीं तरंग नाना । उदयातें पावती ॥ २३ ॥
म्हणोनी कल्पनारहित[1] । तेंचि वस्तु शाश्वत ।
अंत नाहीं म्हणोन अनंत । बोलिजे तया ॥ २४ ॥
हें ज्ञानदृष्टीनें पाहावें । पाहोन तेथेंचि राहावें ।
निजध्यासें तद्रूप व्हावें । संगत्यागें ॥ २५ ॥(द. १९,स.५)

( ३ )

गुप्त आहे उदंड धन[2] । काय जाणती सेवक जन ।
तयास आहे तें ज्ञान । बाह्याकाराचें[3] ॥ २६ ॥
तैसे ज्ञाते ते समर्थ[4] । तेंही वोळखिला परमार्थ ।
इतर ते करिती स्वार्थ । दृश्य पदार्थाचा ॥ २७ ॥
येकें दिव्यान्नें भक्षिती । येकें विष्टा सावडिती[5] ।
आपण वर्तल्याचा घेती । साभिमान ॥ २८ ॥
सार सेविजे श्रेष्ठीं । असार घेइजे वृथापुष्टीं[6] ।
सार असाराची गोष्टी । सज्ञान जाणती ॥ २९ ॥
दिसेना जें गुप्त धन । तयासी करणें लागे अंजन ।
गुप्त परमात्मा सज्जन-। संगतीं शोधावा ॥ ३० ॥
रायाचे सान्निध होतां । सहजचि लाभे श्रीमंतता ।
तैसा हा सत्संग धरितां । सद्वस्तु लाभे ॥ ३१ ॥
म्हणोनी हें दृश्यजात । अवघेंचि आहे अशाश्वत ।
परमात्मा अच्युत अनंत । तो या दृश्यावेगळा ॥ ३२ ॥
दृश्यावेगळा, दृश्याअंतरीं । सर्वात्मा तो सचराचरीं ।
विचार पाहतां अंतरीं । निश्चयो बाणे ॥ ३३ ॥
संसारत्याग न करितां । प्रपंचउपाधि न सांडितां ।

१ कल्पना खुंटते तेथेंच निर्गुण आहे. २ श्रीमंतांच्या तळघरांत पुष्कळ गुप्त द्रव्य असतें; पण तें नोकरांना कुठें माहीत पडतें? ३ वरवर दिसतें त्याचें. ४ श्रीमंत. ५ भंगी विष्टेच्या पाट्या वाहतात. ६ धटिंगण.

जनांमध्यें सार्थकता । विचारेंचि होय ॥ ३४ ॥
याचि जन्मीं येणेंचि काळें । संसारीं होइजे निराळें ।
मोक्ष पाविजे निश्चळें । स्वरूपाकारें ॥३५॥ ( द.६,स.९ )

## ( १ ) अंतरात्मा ( देव ) कसा ओळखावा ?

( १ )

रामकृष्णादिक अवतार । त्यांचा महिमा अपार ।
उपासनेस बहुत नर । तत्पर जाले ॥ १ ॥
सकळ देवांचें मूळ । तो हा अंतरात्माचि केवळ ।
भूमंडळीं भोग सकळ । त्यासीच घडे ॥ २ ॥
नाना देव होऊन बैसला । नाना शक्तिरूपें जाला ।
भोक्ता सकळ वैभवाला । तोचि येक ॥ ३ ॥
कीर्ति आणि अपकीर्ति । उदंड निंदा उदंड स्तुति ।
सर्वत्रांची भोगप्राप्ति । अंतरात्म्यासीच घडे ॥ ४ ॥
कोणे देहीं काय करितो । कोणे देहीं काय भोगितो ।
भोगी त्यागी वीतरागी तो । येकाचि आत्मा ॥ ५ ॥
प्राणी स्वाभिमानें भुलले । देहाकडे पाहत गेले ।
मुख्य अंतरात्म्यास चुकले । अंतरीं असोनी ॥ ६ ॥
अरे, या आत्म्याची चळवळ पाहे । ऐसा भूमंडळीं कोण आहे[१]
अगाध पुण्यें अनुसंधान राहे । कांहीं येक ॥ ७ ॥
अंतर्निष्ठ तितुके तरले । अंतर्भ्रष्ट तितुके बुडले ।
बाह्याकारें भरंगळले । लोकाचारें ॥ ८ ॥ ( द.१८, स. १ )

( २ )

रेणूहून सूक्ष्म किडे । त्यांचें आयुष्य निपटाचि थोडें ।

---

१ सर्वभूतांतरात्मा. २ विरक्त. ३ लक्ष्य, चिंतन. केवळ बाह्यरूढीप्रमाणें कवाइतीप्रमाणें धर्माचार पाळणारे पण अंतर्मुख न झालेले लोक फसले.

युक्ति बुद्धि तेणेंचि पाडें । तयामध्यें ॥ ९ ॥
त्यापुरतें त्याचें ज्ञान । विषय इंद्रियें समान ।
सूक्ष्म शरीरें विवरोन । पाहतो कोण ? ॥ १० ॥
मुंगीसमान शरीरें । उदंड असतीं लहान थोरें ।
समस्तांमध्यें जीवेश्वरें । वस्ती कीजे ॥ ११ ॥
नाना क्षेत्रीं नाना किडे । त्यांस भासती पर्वताएवढें ।
आयुष्याहि तेणेंचि पाडें । उदंड वांटे ॥ १२ ॥
पक्ष्याएवढें लहान नाहीं । पक्ष्याएवढें थोर नाहीं ।
सर्प आणि मत्स्य पाहीं । येणेंचि न्यायें ॥ १३ ॥
मुंगीपासून थोरथोरें । चढती वाढती शरीरें ।
त्यांचीं निर्धारितां अंतरें । कळों येती ॥ १४ ॥
नाना वर्ण नाना रंग । नाना जीवनांचे तरंग ।
येक सुरंग येक विरंग[६] । किती म्हणोन सांगावें ॥ १५ ॥
येक सुकुमारें येक कठोरें । निर्माण केलीं जगदीश्वरें ।
सुवर्णासारिखीं शरीरें । देदीप्यमानें ॥ १६ ॥
येक तासकें येक मारकें । पाहों जातां नाना कौतुकें ।
कितीयेक अमोलिकें । सृष्टीमध्यें ॥ १७ ॥
पृथ्वीगर्भी नाना नीरें । त्या नीरांमध्यें शरीरें ।
नाना जिनस लहानथोरें । कोण जाणे ॥ १८ ॥
येक प्राणी अंतरिक्षीं[१०] असती । तेहीं नाहीं देखिली क्षिती ।

१ त्याच प्रमाणांत सूक्ष्म. २ त्याच मानांत त्यांचें ज्ञान, विषय, इंद्रियें वगैरे अतिसूक्ष्म असतात. ३ मुंगीस मुताचा पूर अशी म्हण आहे ! ४ कांहीं अति लहान व कांहीं अति मोठे. ५ हत्तीपर्यंत मोठे. ६ कांहीं सुंदर व कांहीं बेढब. ७ भीतिदायक. ८ पृथ्वीच्या पोटांतलीं विविध उदकें. ९ त्यांत अनंत जीव आहेत. १० आकाशांत.

वरिच्यावरी उडोन जाती । पक्ष फुटल्यानंतरें ।। १९ ।।
नाना खेचरें[1] नाना भूचरें । नाना वनचरें आणि जळचरें ।
चौऱ्याशी योनिप्रकारें[2] । कोण जाणे ? ।। २० ।।
येक नाना सामर्थ्यें केलें । येक इच्छेपासून जाले ।
एक शब्दासरिसे पावले । श्रापदेह ।। २१ ।।
ऐसें भगवंताचें करणें । किती म्हणोनी सांगणें ।
विचित्र मायेच्या गुणें । होत जातें ।। २२ ।।
शरीरभेदें आहारभेदें । वाचाभेदें गुणभेदें ।
अंतरीं वसिजे अभेदें । येकरूपें ।। २३ ।।
थोडे बहुत समजले । पोटापुरती विद्या सिकले ।
प्राणी उगेंच गर्वें मेले । मी ज्ञाता म्हणोनी ।। २४ ।।
ज्ञानी येक अंतरात्मा[3] । सर्वांमध्यें सर्वात्मा ।
त्याचा कळावया महिमा । बुद्धि कैची ? ।। २५ ।।
सप्तकंचुक[4] ब्रह्मांड । त्यांत सप्तकंचुक पिंड ।
त्या पिंडामध्यें उदंड । प्राणी असती ।। २६ ।।
आपल्या देहांतील न कळे । मा तें अवघें कैचें कळे ? ।
लोक होती उतावळे । अल्पज्ञानें[5] ।। २७ ।।
अणुरेणांऐसे जिन्नस । त्यांचे आम्ही विराटपुरुष[6] ।
आमुचें उदंडचि आयुष्य । त्यांच्या हिसेबें ।। २८ ।।
त्यांच्या रीती त्यांचे दंडक । वर्तायाचे असती अनेक ।

---

१ आकाशांत उडणारे. २ चौऱ्यांयशीं लक्ष योनींतले अनंत प्रकार. ३ अनंत जीवांच्या अंतर्यामीं नांदणारा अंतरात्मा तेवढा एक खरा ज्ञानी आहे. ४ पृथिव्यादि पंचमहाभूतें, अहंकार व महत्तत्त्व या सात आवरणांनीं वेष्टिलेलें. ५ लोक अल्पज्ञानानें उच्छृंखळ, गर्विष्ठ होतात. ६ अणुरेणूइतके सूक्ष्म जीव कीं ज्यांच्या मानानें आमचीं शरीरें अतिप्रचंड व आमचें आयुष्य अतिदीर्घ !

जाणे सर्वहि कौतुक । ऐसा कैंचा[1] ॥ २९ ॥
धन्य परमेश्वराची करणी । अनुमानेना अंतःकरणीं ।
उगाच अहंता-पापिणी । घेढा लावी ॥ ३० ॥
उगेंच कासया तंडावें । मोडा अहंतेचे पुंडावे ।
विवेकें देवास धुंडावें । हें उत्तमोत्तम ॥३१॥ (द.१५,स.८)

( ३ )

तत्वांचें शरीर जालें । अंतरात्मासगट वळ्लें ।
त्यांचें मूळ जों शोधिलें । तों उदकरूप ॥ ३२ ॥
अन्नरस देहरस । रक्तरेतें बांधे मूस[2] ।
रसद्रव्यें सावकास । वाढों लागे ॥ ३३ ॥
कुडी वाढे कुबुद्धि वाढे । मूळापासून अवघेंच घडे ।
अवघेंचि मोडे आणि वाढे । देखतदेखतां ॥ ३४ ॥
फळामध्यें बीज आलें । तेणें न्यायें तेथें जालें ।
ऐकतां देखतां उमजलें । सकळ कांहीं ॥ ३५ ॥
बीजें उदकें अंकुरती । उदक नस्तां उडोन जाती ।
येके ठायीं उदक-माती । होतां बरें ॥ ३६ ॥
दोहींमध्यें असतां बीज । भिजोन अंकुर सहज ।
वाढतां वाढतां पुढें रीझ[3] । उदंड आहे ॥ ३७ ॥
इकडे[4] मुळ्या धांवा घेती । तिकडे अग्रें हेलावती ।
मुळें अग्रें द्विधा होती । बीजापासूनी ॥ ३८ ॥
मुळ्या चालल्या पाताळीं । अग्रें धांवती अंतराळीं ।

१ अत्यंत विरळ हा भाव. २ अन्नरसाचा देहरस व देहरसाचा स्त्रीपुरुषांच्या रक्तरेतसंयोगानें पुन्हा देह, असा क्रम चालला आहे. ३ वाढ. ४ खालीं जमीनींत खोलवर मुळ्या जातात, अग्रें अंतराळीं हेलावतात, याप्रमाणें बीजापासूनच खालीं मुळें व वर अग्रें वाढत असतात.

नाना पत्रीं पुष्पीं फळीं । लिगडलीं झाडें ॥ ३९ ॥
फळांवडील सुमनें । सुमनांवडील पानें ।
पानांवडील अनुसंधानें । काष्ठें अवघीं ॥ ४० ॥
काष्ठांवडील मुळ्या बारिक । मुळ्यांवडील तें उदक ।
उदकें आळोन कौतुक । भूमंडळाचें ॥ ४१ ॥
याची ऐसी आहे प्रचीती । तेव्हां सकळांवडील जगती ।
जगतीवडील मूर्ती । आपोनारायणाची ॥ ४२ ॥
तयावडील अग्निदेव । अग्नीवडील वायुदेव ।
वायोदेवावडील स्वभाव । अंतरात्म्याचा ॥ ४३ ॥
सर्केळांवडील अंतरात्मा । त्यासी नेणे तो दुरात्मा ।
दुरात्मा म्हणजे दुरी आत्मा । अंतरला तया ॥ ४४ ॥
जवळी असोन चुकलें । प्रत्ययास नाहीं सोकलें ।
उगेंच आलें आणि गेलें । देवाचकारितां ॥ ४५ ॥
म्हणोनी सकळांवडील देव । त्यासी होतां अनन्यभाव ।
मग हे प्रकृतीचा स्वभाव । पालटों लागे ॥ ४६ ॥
जो वडील जेथें चेतला । तोचि भाग्यपुरुष जाला ।
अल्प चेतना तयाला । अल्प भाग्य ॥ ४७ ॥
तया नारायणाला मनीं । अखंड आठवावें ध्यानीं ।
मग ते लक्ष्मी तयापासुनी । जाईल कोठें ॥ ४८ ॥

---

१ समृद्ध होतात. २ फळापासून मागें पाहतां फळाआधीं फूल इ० ३ पाणी आळून गोठून घट्ट झालें कीं पृथ्वी, अर्थात् पृथ्वीच्या आधीं आप. ४ सर्वांचा वडील, सर्वांच्या पूर्वीचा अंतरात्मा. ५ अंतरात्म्यापासून दूर, खालीं स्थूळांतच घुटमळणारा तो दुरात्मा. ६ त्याला प्रत्यय घेऊन पाहिलें नाहीं. ७ अंतरात्मा जेथें प्रकाशला, प्रगटला, तोच भाग्यवंत. 'म्हणों भाग्यवंत तया । अवघी देवावरी माया ' ( तुकाराम ). ८ चेतना अल्प तर भाग्यहि अल्पच.

नारायण असे विश्वीं । त्याची पूजा करीत जावी ।
या कारणें तोषवावी । कोणी तरी काया ॥ ४९ ॥
उपासना शोधून पाहिली । तों ते विश्वपाळिती जाली ।
न कळे लीळा परीक्षिली । न वचे कोणा ॥ ५० ॥
उपासना सकळां ठाईं । आत्माराम कोठें नाहीं ।
या कारणें ठाईं ठाईं । रामें आटोपिलें ॥ ५१ ॥
ऐसी माझी उपासना । आणितां न ये अनुमाना ।
नेऊन घाली निरंजना-। पैलीकडे ॥ ५२ ॥
आवाहन विसर्जन । ऐसेंचि बोलिलें विधान ।
पूर्वपक्ष जाला येथून । सिद्धांत पुढें ॥५३॥ ( द. १६,स.९ )

( ४ )

वडिलास शोधून पाहिले । तों चंचळाचें निश्चळ जालें ।
देवभक्तपण गेलें । तये ठाईं ॥ ५४ ॥
जेथें ज्ञानाचें होतें विज्ञान । आणि मनाचें होतें उन्मन ।
तत्वनिरसनीं अनन्य । विवेकें होतें ॥ ५५ ॥
विवरतां विवरतां सेवटीं । निवृत्तिपदीं अखंड भेटी ।
जालियानें तुटी । होणार नाहीं ॥ ५६ ॥
लक्षीं बैसलें अलक्ष । उडोन गेला पूर्वपक्ष ।

१ विश्वांतर्गत नारायणाची, भूतात्म्याची, जनार्दनाची पूजा हीच खरी उपासना.ही आत्मारामासारखीच विश्वव्यापिनी व विश्वपाळिती आहे. २ राम सर्वत्र आहे. 'रामआकाशीं पाताळीं । राम नांदे भूमंडळीं' ३ मूळमायेपलीकडचा निरंजन–मायारहित ( अंजन=माया ) जें केवल ब्रह्म तेथें ही नेऊन घालते. ४ मूळमायेपासून सर्व ब्रह्मांडाची उभारणी व उलट क्रमानें तेथेंच संहारणी होते हें विवेकानें पाहणें यालाच अनुक्रमें आवाहन व विसर्जन म्हणतात. ५ पण हें सर्व बोलणें पूर्वपक्षांतलें आहे. 'एकमेवाद्वितीयं' हा सिद्धांत यापुढेंच. तेथें एकपणावांचून एकच आहे. ६ अंतरात्मा चंचळ, तेथेंच देवभक्तपण ( उपासना ) संपलें.

हेतुरूपें अंतरसाक्ष । तोही मावळला ॥ ५७ ॥
शाश्वतासी शोधीत गेला । तेणें ज्ञानी साच जाला ।
विकार सांडून मिळाला । निर्विकारीं ॥५८॥(द.१५,स.१०)

## ( १६ ) निर्गुण निर्विकल्प ब्रह्म.

### ( १ )

ब्रह्म निराकार निश्चळ । आत्मा[2] सविकार चंचळ[1] ।
तयास म्हणती सकळ । देव ऐसें ॥ १ ॥
देवाचा ठावचि लागेना । येक देव नेमेस्त[3] कळेना ।
बहुत देवीं अनुमानेना[4] । येक देव ॥ २ ॥
देव क्षेत्रीं[5] पाहिला । त्यासारिखा धातूचा केला ।
पृथ्वीमध्यें दंडक[6] चालिला । येणें रीती ॥ ३ ॥
क्षेत्रदेव पाषाणाचा । विचार पाहतां तयाचा ।
तंतु लागला मुळाचा । अवताराकडे ॥ ४ ॥
अवतारी देव संपले । देह धरून वर्तों लागले ।
त्याहून थोर अनुमानले । ब्रह्माविष्णुमहेश ॥ ५ ॥
त्या तिहीं देवांस ज्याची सत्ता । तो अंतरात्माचि पाहतां ।
कर्ता भोक्ता तत्वता । प्रत्यक्ष आहे ॥ ६ ॥
युगानुयुगें तिन्ही लोक । येकचि चालवी अनेक ।
हा निश्चयाचा विवेक । वेदशास्त्रीं पहावा ॥ ७ ॥
तो अंतर्देव चुकती । धांवा घेऊन तीर्था जाती ।
प्राणी बापुडे कष्टती । देवास नेणतां ॥ ८ ॥
मग विचारिती अंतःकरणीं । जेथें तेथें धोंडा-पाणी ।

---

१ चंचळचक्रीं फिरणें संपून हा निवांत होतो. २ जीवात्मा, अंतरात्मा. ३ निश्चित. ४ बहुदेवांत एक देव आकळत नाहीं. ५ क्षेत्रांत. ६ प्रकार.

उगोंचि वणवण हिंडोनी । काय होतें ॥ ९ ॥
पाहत पाहत सेवटा गेला । तोचि विवेकीं भला ।
तत्वें सांडूनि पावला । निरंजनीं ॥ १० ॥
अरे जें आकारासी येतें । तें अवघेंचि नासोन जातें ।
मग गल्बल्यावेगळें तें । परब्रह्म जाणावें ॥ ११ ॥
चंचळ देव निश्चळ ब्रह्म । नाहीं परब्रह्मीं नाहीं भ्रम ।
प्रत्ययज्ञानें निर्भ्रम । होइजेतें ॥ १२ ॥
प्रचीतीविण जें केलें । तें तें अवघें व्यर्थ गेलें ।
प्राणी कष्टकष्टोंचि मेले । कर्मकेंचाटें[2] ॥ १३ ॥
कर्मावेगळें[3] न व्हावें । तरी देवास कासया भजावें ।
विवेकी जाणती स्वभावें । मूर्ख नेणे ॥ १४ ॥
सगुण पाहतां मुळास गेला । सहजचि निर्गुण पावला ।
संगत्यागें मोकळा जाला । वस्तुरूप ॥ १५ ॥
परमेश्वरीं अनुसंधान । लावितां होइजे पावन ।
मुख्य ज्ञानेंच विज्ञान । पाविजेतें ॥ १६ ॥ (द.१८,स.८)

( २ )

येक परब्रह्म संचलें । कदापि नाहीं विकारलें ।
त्यावेगळें जें भासलें । तें भ्रमरूप ॥ १७ ॥
जयास बोलिला कल्पांत । त्रिगुण आणि पंचभूत ।
हें अवघेंचि समस्त । भ्रमरूप ॥ १८ ॥
मी तूं हा भ्रम । उपासना हाही भ्रम ।
ईश्वरभाव हाही भ्रम । निश्चयेसीं ॥ १९ ॥

१ मूळमायेच्या म्ह० अंतरात्मदेवाच्या पलीकडे. २ कर्मांच्या लचांडांत. ३ कर्मबंधापासून मुक्त झाला नाहीं तर उपासनेचा उपयोग काय ?

भ्रमरूप विश्व स्वभावें। तेथें काय म्हणोन सांगावें।
निर्गुण ब्रम्हावेगळें आघवें। भ्रमरूप ॥२०॥ (द.१०,स.७)

( ३ )

ब्रह्म अखंड भेटलें। सर्वांगास लिगटलें।
अतिनिकट परी चोरलें। सकळांसि जें ॥ २१ ॥
तयामध्येंचि असिजे। परी तयास नेणिजे।
उमजे भास, नुमजे। परब्रह्म तें ॥ २२ ॥
आपुलेन अनुभवें। ज्ञानें जागृतीसि यावें।
मग माईक स्वभावें। कळों लागे ॥ २३ ॥
असो माया माईक। शाश्वत तें ब्रह्म येक।
पाहों जातां अनेक। व्यापून आहे ॥ २४ ॥
जें जें रूप आणि नाम। तो तो नाथिलाच भ्रम।
नामरूपापीत वर्म। अनुभवी जाणे ॥ २५ ॥
असो इंद्रियसमुदाव। तयांमध्यें वर्तें सर्व।
जाणों जातां मोडे हांव। इंद्रियांसी ॥ २६ ॥
तें अनुभवेंचि जाणावें। सृष्टीचेनि अभावें।
आपलेन स्वानुभवें। पाविजे ब्रह्म ॥ २७ ॥
जेथें अज्ञान सरे। ज्ञान तेंहि नुरे।
विज्ञानवृत्ति मुरे। परब्रह्मीं ॥ २८ ॥ ( द.७, स.४ )

( ४ )

ब्रम्ह निर्गुण निराकार। ब्रम्ह निःसंग निर्विकार।

---

१ दृश्य, नामरूपात्मक जग उमजतें, पण दृश्यातीत ब्रह्म उमजत नाहीं. २ स्वरूपानुभव घ्यावा. ३ आथि म्ह. आहे आथिला म्ह० असलेला; नाथिला म्ह. नसलेला, मिथ्या. ४ अज्ञान मोडूनं ज्ञानही मुरून जातें व शेवटीं विज्ञान ( स्वानुभव ) तेंही परब्रह्मीं लीन होतें.

ब्रह्मास नाहीं पारावार । बोलती साधु ॥ २९ ॥
ब्रह्म अच्युत अनंत । ब्रम्ह सदोदित संत ।
ब्रम्ह कल्पनेरहित । निर्विकल्प ॥ ३० ॥
ब्रम्ह या दृश्यावेगळें । ब्रम्ह शून्यत्वास निराळें ।
ब्रम्ह इंद्रियांच्या मेळें । चोजवेना ॥ ३१ ॥
ब्रम्ह शब्दीं ऐसें तैसें । बोलिजे त्याहूनि अनारिसें ।
परी तें श्रावणअभ्यासें । पाविजे ब्रम्ह ॥ ३२ ॥
जेथें वाचा निवर्तती । मनास नाहीं ब्रम्हप्राप्ति ।
ऐसी बोलिली श्रुति । सिद्धांतवचन ॥ ३३ ॥
त्याची मनेंवीण प्राप्ति । कीं वासनेवीण तृप्ति ।
तेथें न चले व्युत्पत्ति । कल्पनेची ॥ ३४ ॥
तें परेहूनि पर । मनबुद्धि-अगोचर ।
संग सोडितां सत्वर । पाविजेतें ॥ ३५ ॥
संग सोडावा आपुला । मग पहावें तयाला ।
अनुभवी तो या बोला । सुखावेल गा ॥ ३६ ॥
आपण म्हणिजे मीपण । मीपण म्हणिजे जीवपण ।
जीवपण म्हणिजे अज्ञान । संग जडला ॥ ३७ ॥
सोडितां तया संगासी । ऐक्य होय निःसंगासी ।
कल्पनेवीण प्राप्तीसी । अधिकार ऐसा ॥ ३८ ॥
देहबुद्धीचें थोरपण । परब्रम्हीं न चले जाण ।
तेथें होतसे निर्वाण । अहंभावासी ॥ ३९ ॥
उंच नीच नाहीं पैरी । राया रंका येकाचि सरी ।
जाला पुरुष अथवा नारी । येकचि पद ॥ ४० ॥

१ अलीकडचें पलीकडचें, सीमा, मर्यादा. २ सर्वेंद्रियांनाही आकळत नाहीं. ३ वेगळें. ४ मीपणाचा. ५ शून्य. ६ प्रकार.

स्वर्ग मृत्यु आणि पाताळ । तिहीं लोकींचे ज्ञाते सकळ ।
सकळांसि मिळोन येकचि स्थळ । विश्रांतीचें ॥ ४१ ॥
देहबुद्धीच्या अंतीं । सकळांसी येकचि प्राप्ति ।
येक ब्रह्म द्वितीयं नास्ति । हें श्रुतिवचन ॥ ४२ ॥
म्हणोनी देहबुद्धि हे झडे । तरीच परमार्थ घडे ।
देहबुद्धीनें बिघडे । ऐक्यता ब्रम्हींची ॥ ४३ ॥
विचक्षणें या कारणें । देहबुद्धि त्यजावी श्रवणें ।
सत्यब्रम्हीं साचारपणें । मिळोन जावें ॥४४॥ (द.७, स.२)

( ५ )

आनंदाचा अनुभव । हाही वृत्तीचाचि भाव ।
तदाकारीं ठाव । वृत्तीस नाहीं ॥ ४५ ॥
अनिर्वाच्य ते निवृत्ति । तेचि उन्मनीची स्थिति ।
निरुपाधि विश्रांति । योगियांची ॥ ४६
वस्तु जे कां निरुपाधि । तेचि सहजसमाधि ।
जेणें तुटे आधिव्याधि । भवदुःखाची ॥ ४७ ॥
आपलेन अनुभवें । कल्पनेसी मोडावें ।
मग सुकाळीं पडावें । अनुभवाचे ॥ ४८ ॥
निर्विकल्पास कल्पावें । कल्पना मोडे स्वभावें ।
मग नसोनि असावें । कल्पकोटी ॥ ४९ ॥
कल्पनेचें येक बरें । जे मोहरितांच मोहरे ।
स्वरूपीं घालितां भरे । निर्विकल्पीं ॥ ५० ॥
निर्विकल्पासी कल्पितां । कल्पनेची नुरे वार्ता ।
निःसंगास भेटों जातां । निःसंग होइजे ॥५१॥ (द.७,स.३)

१ ब्रह्मतादात्म्य झालें कीं तेथें आनंदाचीही उर्मि उठत नाहीं; कां कीं आनंद हीही एक वृत्ति आहे. २ देहबुद्धीनें न उरून आत्मरूपानें उरावें. ३ जिकडे वळवावी तिकडे जाते.

( ६ )

कल्पना जन्माचें मूळ । कल्पना भक्तीचें फळ ।
कल्पना तेचि केवळ । मोक्षदाती ॥ ५२ ॥
असो ऐसी हे कल्पना । साधनें दे समाधाना ।
येरवीं हे पतना[1] । मूळचि कीं ॥ ५३ ॥
सदा स्वरूपानुसंधान । करी द्वैताचें निरसन ।
अद्वय निश्चयाचें ज्ञान । तेचि शुद्धकल्पना ॥ ५४ ॥
अद्वैत कल्पी ते शुद्ध । द्वैत कल्पी ते अशुद्ध ।
अशुद्ध तेचि प्रसिद्ध । सबळे[2] जाणावी ॥ ५५ ॥
कल्पनेनें कल्पना सरे । ऐसी जाणावी चतुरें ।
सबळ गेलियानंतरें । शुद्ध उरली ॥५६॥ ( द.७, स.५ )

( ७ )

आधीं देवास वोळखावें । मग अनन्यभावें भजावें ।
अखंड[3] ध्यानचि धरावें । सर्वोत्तमाचें ॥ ५७ ॥
सर्वांमध्यें जो उत्तम । तया नांव सर्वोत्तम ।
आत्मानात्मविवेकधर्म । ठाईं पाडावें ॥ ५८ ॥
तो सकळ देहांमध्यें वर्ततो । इंद्रियग्राम चेष्टवितो ।
प्रचीतीनें प्रत्यय येतो । प्राणिमात्रीं ॥ ५९ ॥
मुळीं पाहणार तो येकला । सकळां ठाईं विभागला ।
देहप्रकृतीनें जाला । भिन्नभिन्न ॥ ६० ॥
नयनेंचि पाहावा नयन । मनें शोधावें मन ।

---

१ मी देह अशी कल्पना केली कीं पतन, मी ब्रह्म अशी कल्पना केली कीं मोक्ष, एवंच कल्पनाच बंधांत पाडते व कल्पनाच मोक्ष देते. २ मिश्र. ३ सर्वांत उत्तम जो पुरुषोत्तम, सर्वांघटीं भरलेला भगवान्, त्याला सर्वोत्तम होऊनच सर्वांघटीं निजभावानें ओळखून एकात्मतेनें (अभेदानें) भजणें म्ह. तत्स्वरूप होणें, याचें नांव अखंडध्यान.

तैसाचि हा भगवान । सकळां घटीं ॥ ६१ ॥
जगदंतरें बोळला धणी । किती येकवटील प्राणी ।
परी ते बोळायाची करणी । आपणापासीं ॥ ६२ ॥
अखंड ध्यानाचें लक्षण । अखंड देवाचें स्मरण ।
याचें कळतां विवरण । सहजचि घडे ॥ ६३ ॥
ध्यान धरितें तें कोण । ध्यानीं आठवतें तें कोण ।
दोनीमध्यें अनन्य लक्षण । असिलें पाहिजे ॥ ६४ ॥
अनन्य सहजाचि आहे । साधक शोधून न पाहे ।
ज्ञानी तो विवरोन राहे । समाधानें ॥६५॥ (द.१४,स.८).

## ( १७ ) किती दिवसां होतो मोक्ष ?

मुक्ति लाभे तत्क्षणीं । विश्वासतां निरूपणीं ।
दुश्चितपणें हानी । होत असे ॥ १ ॥
मनाच्या तोडून वोढी । श्रवणीं बैसावें आवडी ।
सावधपणें घडीनें घडी । काळ सार्थक करावा ॥ २ ॥
अर्थप्रमेय ग्रंथांतरीं । शोधून घ्यावें अभ्यंतरीं[1] ।
दुश्चितपण अलें तरी । पुन्हा श्रवण करावें ॥ ३ ॥
सावध असोन उमजेना[2] । श्रवण असोन ऐकेना[3] ।
ज्ञान असोन कळेना । सारासारविचार ॥ ४ ॥
ऐसा जो दुश्चित आळसी । परलोक कैचा त्यासी ।
जयाचे जीवीं अहर्निशीं । आळस वसे ॥ ५ ॥
सावध[4] साक्षेपी आणि दक्ष । तयास तत्काळाचि मोक्ष ।
इतरांस तें अलक्ष्य । लक्षिलें[5] न वचे ॥ ६ ॥

१ चित्तीं; अर्थरहस्य चित्तीं धरावें. २ बुद्धिमंद म्हणून उमजत नाहीं. ३ दुश्चित म्हणून विषय कानांनीं ऐकला तरी मनांत भरत नाहीं. ४ आत्महिताविषयीं दक्ष, निरलस व शमदमाविषयीं जागृत. ५ अलक्ष्य वस्तूकडे लक्ष लावतां येत नाहीं.

लोहो परिसेसी लागला । थेंबुटा सागरीं बुडाला ।
गंगासरिते संगम जाला । तत्क्षेणीं ॥ ७ ॥
प्रज्ञावंत आणि अनन्य । तयास नलगे येक क्षण ।
अनन्यभावार्थेवीण । प्रज्ञा खोटी ॥ ८ ॥
प्रज्ञेवीण अर्थ न कळे । विश्वासेंवीण वस्तु ना कळे ।
प्रज्ञाविश्वासें गळे । देहाभिमान ॥ ९ ॥
देहाभिमानाचे अंतीं । सहजाचि वस्तुप्राप्ति ।
सत्संगें सद्गति । विलंबाचि नाहीं ॥ १० ॥
सावध साक्षेपी विशेष । प्रज्ञावंत आणि विश्वास ।
तयास साधनीं सायास । करणेंचि न लगे ॥११॥ (द.८स.६)

## (१८) मोक्षाचें स्वरूप.

### (१)

अवघिया चत्वार मुक्ती । वेदशास्त्रें बोलती ।
तयांमध्यें तीन नासती । चौथी ते अविनाश ॥ १ ॥
पहिली मुक्ति ते सलोकता । दुसरी ते समीपता ।
तिसरी ते सरूपता । चौथी सायुज्यमुक्ति ॥२॥ (द.४, स.९)
जेथें ज्या देवाचें भजन करावें । तेथें ते देवलोकीं रहावें ।
सलोकता-मुक्तीचें जाणावें । लक्षण ऐसें ॥ ३ ॥
लोकीं राहावें ते सलोकता । समीप असावें ते समीपता ।
सरूपचि व्हावें ते सरूपता । तिसरी मुक्ती ॥ ४ ॥

---

१ लोहाला परिसाचा संगम होतांच त्याचें सुवर्ण होतें, पाण्याचा थेंब सागरांत किंवा ओहोळ गंगेस मिळतांच तन्मय होतो, त्याप्रमाणें सावध, साक्षेपी व दक्ष अशा पुरुषास किंवा प्रज्ञा व श्रद्धा (बुद्धि व अंतःकरण) दोन्ही ब्रह्माकडे लावणारास मोक्ष तत्काळ मिळतो.

देवैस्वरूप जाला देही । श्रीवत्स कौस्तुभ लक्ष्मी नाहीं ।
स्वरूपतेचें लक्षण पाहीं । ऐसें असे ।। ५ ।।
निर्गुण परमात्मा निश्चळ । निर्गुणभक्ति तेही अचळ ।
सायुज्यमुक्ति ते केवळ । जाणिजे ऐसी ।।६।।(द. ४, स.१०)

( २ )

प्राणी संकल्पें बांधला । जीवपणें बद्ध जाला ।
तो विवेकें मुक्त केला । साधुजनीं ।। ७ ।।
मी जीव ऐसा संकल्प । दृढ धरितां गेले कल्प ।
तेणें प्राणी जाला अल्प । देहबुद्धीचा ।। ८ ।।
पांचाभूतांचें शरीर । निर्माण जालें सचराचर ।
प्रकृतिस्वभावें जगदाकार । वर्तों लागे ।। ९ ।।
पिंडब्रह्मांडरचना । विस्तारें वाढली कल्पना ।
निर्धारितां तत्वज्ञांना । मतें भांबावलीं ।। १० ।।
नाना मतीं नाना भेद । भेदें वाढती विवाद ।
परी तो ऐक्यतेचा संवाद । साधु जाणती ।। ११ ।।
जीवशिव पिंडब्रह्मांड । मायाअविद्येचें बंड ।
हें सांगतां असे उदंड । परी आत्मा तो वेगळा ।। १२ ।।
घटाकाश मठाकाश । महदाकाश चिदाकाश ।
अवघें मिळोन आकाश । येकाचि असे ।। १३ ।।
तैसा जीवात्मा आणि शिवात्मा । परमात्मा आणि निर्मळात्मा
अवघा मिळोन आत्मा । येकाचि असे ।। १४ ।।

---

१ पहिल्या तीनही मुक्ति द्वैतांतल्या आहेत, विष्णुभक्त विष्णुरूप झाला तरी लक्ष्मी, कौस्तुभ व वत्स हीं विष्णूचीं चिन्हें कोणासच मिळायचीं नाहींत.
२ किती तत्वांचीं ब्रह्मांड व पिंड यांची रचना झाली याविषयीं मतभेद आहेत परी 'ऐक्यतेचा संवाद साधु जाणती' म्ह. साधु त्यांतून ऐक्य काढतात, तत्वें किती असेनात, देह पांचभौतिक आहे व आत्माराम एक आहे हें ऐक्य.

उपाधियोगें वाटे भिन्न । परी तें आकाश अभिन्न ।
तैसा आत्मा स्वानंदघन । येकाचि असे ॥ १५ ॥

जीवपणें येकदेसी । अहंकारें जन्म सोसी ।
विवेक पाहतां प्राणियासी । जन्म कैंचा ॥ १६ ॥

जन्ममृत्यूपासून सुटला । या नांव जाणिजे मोक्ष जाला ।
तत्वें शोधितां पावला । तत्वता वस्तु ॥ १७ ॥

तेचि वस्तु ते आपण । हें महावाक्याचें लक्षण ।
साधु करिती निरूपण । आपुलेन मुखें ॥ १८ ॥

स्वप्नामध्यें जो बांधला । तो जागृतीनें मोकळा केला ।
ज्ञानविवेकें प्राणियाला । मोक्षप्राप्ती ॥१९॥ (द.८, स.७)

( ३ )

नवविधा भक्तीमध्यें सार । आत्मनिवेदन थोर ।
तयेचा करावा विचार । स्वानुभवें स्वयें ॥ २० ॥

देवाभक्तांचें पाहतां मूळ । होय भेदाचें निर्मूळ ।
येक परमात्मा सकळ । दृश्यावेगळा ॥ २१ ॥

आत्मनिवेदनाचे अंतीं । जे कां घडली अभेदभक्ति ।
तये नांव सायुज्यमुक्ति । सत्य जाणावी ॥ २२ ॥

सोहमात्मा स्वानंदघन । अजन्मा तो तूंचि जाण ।
हेंचि साधूचें वचन । सदृढ धरावें ॥ २३ ॥

महावाक्याचें अंतर । तूंचि ब्रह्म निरंतर ।
ऐसिया वचनाचा विसर । पडोंचि नये ॥ २४ ॥

देहास होईल अंत । मग मी पावेन अनंत ।
ऐसें बोलणें निभ्रांत । मानूंचि नये ॥ २५ ॥

सैन्य अवघेंचि मरावें । मग राज्यपद प्राप्त व्हावें ।

सैन्य असतांचि राज्य करावें । हें कळेना ! ॥ २६ ॥
माया असोनीच नाहीं । देह असतांच विदेही ।
ऐसें समाधान कांहीं । वोळखावें ॥ २७ ॥
निजध्यासें प्राणी । ध्येयाचि जाला निर्वाणीं ।
सायुज्यमुक्तीचा धणी । होऊन बैसला ॥ २८ ॥
भवमृगजळ आटलें । लटिकें बंधन सुटलें ।
अजन्म्यास मुक्त केलें । जन्मदुःखापासुनी ! ॥२९॥(द८, स.८)

## ( १९ ) मुक्तांचीं लक्षणें.

### ( १ )

साधु वस्तु होऊन ठेला । संशय ब्रह्मांडाबाहेरि गेला ।
निश्चय चळेना ऐसा जाला । या नांव सिद्ध ॥ १ ॥
संदेहरहित ज्ञान । निश्चयाचें समाधान ।
तेंचि सिद्धाचें लक्षण । निश्चयेंसी ॥ २ ॥
सिद्ध असतां आत्मज्ञान । संदेह वाढवी देहाभिमान ।
या कारणें समाधान । आत्मनिश्चयें राखावें ॥ ३ ॥
आत्मबुद्धी निश्चयाची । तेचि दशा मोक्षश्रीची ।
'अहमात्मा' हें कधींचि । विसरों नये ॥ ४ ॥
लक्षणें म्हणजे केवळ गुण । वस्तु ठाईंची निर्गुण ।
तेंचि सिद्धाचें लक्षण । वस्तुरूप[२] ॥ ५ ॥ ( द.५, स.१० )

---

१ सैन्य असतांच त्यावर सत्ता चालविणें हेंच राजाचें लक्षण, तसें देह असतांना मुक्तपणाचा सुखसोहळा भोगावा हेंच मुक्ताचें लक्षण; देह असून व देहांत असून विदेहीपण भोगावें. सैन्य गेल्यावर राजेपण कोणाचें ? देहान्त झाल्यावर मी मुक्त होईन हें म्हणणें भ्रांतीचें आहे. २ लक्षण म्ह. गुण. ब्रह्म लक्षणातीत निर्गुण आहे, मुक्त पुरुषही वस्तुरूप असल्यामुळें लक्षणातीत निर्गुण आहे.

( २ )

सदा स्वरूपानुसंधान । हें मुख्य साधूचें लक्षण ।
जनीं असोन आपण । जनावेगळी [1] ॥ ६ ॥
बाह्य साधकाचे परी । आणि स्वरूपाकार अंतरीं ।
सिद्धलक्षण तें चतुरीं । जाणिजे ऐसें ॥ ७ ॥
स्वरूपीं भरतां कल्पना । तेथें कैंची उरेल कामना ।
म्हणोनियां साधुजना । कामचि नाहीं ॥ ८ ॥
कल्पिला विषयो हातींचा जावा । तेणें गुणें क्रोध यावा ।
साधुजनाचा अक्षय्य ठेवा । जाणार नाहीं ॥ ९ ॥
जेथें नाहीं दुसरी परी । क्रोध यावा कोणावरी ।
क्रोधरहित सचराचरीं । साधुजन वर्तती ॥ १० ॥
आपुला आपण स्वानंद । कोणावरी करावा मद ? ।
या कारणें वादविवाद । तुटोन गेला ॥ ११ ॥
अवघें ब्रह्मांड त्याचें घर [2] । पंचभूतिक हा जोजार ।
मिथ्या जाणोन सत्वर । त्याग केला ॥ १२ ॥
या कारणें लोभ नसे । साधु सदा निर्लोभ असे ।
जयाची वासना समरसे । शुद्धस्वरूपीं ॥ १३ ॥
दृश्य सांडून नाशवंत । स्वरूप सेविलें शाश्वत ।
या कारणें शोकरहित । साधु जाणावा ॥ १४ ॥
मोहें झळंबावें मन । तरी तें जाहलें उन्मन ।
या कारणें साधुजन । मोहातीत ॥ १५ ॥
साधु वस्तु अद्वय । तेथें कैंचें वाटेल भय ? ।
परब्रह्म तें निर्भय । तोचि साधु [3] ॥ १६ ॥

---

१ जनांत जनांसारखा वागत असून अंतर्यामीं मुक्त म्ह. रामरूपीं लपलेला असतो. २ 'हें विश्वचि माझें घर' ( ज्ञाने. अ. १२). ३ ब्रह्माप्रमाणें साधुही अद्वय व म्हणून निर्भय असतात. अभय हें ज्ञात्याचें पहिलें लक्षण आहे.

साधु आपणचि येकें । तेथें कैंचा दुःखशोक ।
दुजेविणें अविवेक । येणार नाहीं ॥ १७ ॥
आशा धरितां परमार्थाची । दुराशा तुटली स्वार्थाची ।
म्हणोन नैराश्यता साधूची । वोळखण ॥ १८ ॥
सकळ धर्मांमध्यें धर्म । स्वरूपीं राहणें हा स्वधर्म ।
हेंचि जाणिजे मुख्य धर्म । साधुलक्षणाचें॥१९॥ (द.८, स.९)

( ३ )

योगी वोळखावा योगेश्वरें । ज्ञानी वोळखावा ज्ञानेश्वरें ।
महाचतुर तो चतुरें । वोळखावा ॥ २० ॥
जो जो ज्ञानें गुप्त जाला । जो विवेकें विराला ।
जो अनन्यपणें उरला । नाहींच कांहीं ॥ २१ ॥
देह भावितां देहचि दिसे । परी अंतर अनारिसें असे ।
तयास शोधितां नसे । जन्ममरण ॥ २२ ॥
कळाया शोधावें अंतर । तंव तो नित्यनिरंतर ।
जयास धुंडितां विकार । निर्विकार होती ॥ २३ ॥
बीज भाजलें उगवेना । वस्त्र जळालें उकलेना ।
ओघ निवडितां निवडेना । गंगेमध्यें ॥ २४ ॥
तैसा साधु आत्मज्ञानी । बोधें पूर्ण समाधानी ।
विवेकें आत्मनिवेदनीं । आत्मरूपी ॥२५॥ (द.९, स.३)

( ४ )

पृथ्वीमध्यें बहुत जन । त्यांमध्यें असती सज्जन ।
परी साधूस वोळखतो कोण । साधुवेगळा ? ॥ २६ ॥
उदंड हुडकावे संत । सांपडे प्रचीतीचा महंत ।

१ एकमेवाद्वितीय. २ द्वैत असेल तरच अहंकारामुळें अविवेक संचरतो. ३ साधूचें स्वस्वरूपानुसंधान सुटत नाहीं. ४ स्वरूपीं समरस जाला.

प्रचीतीवीण स्वहित । होणार नाहीं ॥ २७ ॥
प्रपंच अथवा परमार्थ । प्रचीतीवीण अवघें व्यर्थ ।
प्रत्ययज्ञानी तो समर्थ । सकळांमध्यें ॥२८॥ (दा.द.२०,स.३)

(५)

विवेकें अंतरीं सुटला । वैराग्यें प्रपंच तुटला ।
अंतर्बाह्य मोकळा जाला । निःसंग योगी ॥ २९ ॥
जैसें मुखें ज्ञान बोले । तैसीच सवें क्रिया चाले ।
दीक्षा देखोनि चकित जाले । शुचिष्मंत ॥ ३० ॥
आस्था नाहीं त्रैलोक्याची । स्थिति बाणली वैराग्याची ।
यत्नविवेकधारणेची । सीमा नाहीं ॥ ३१ ॥
प्रखर वैराग्य उदासीन । प्रत्ययाचें ब्रह्मज्ञान ।
स्नानसंध्या भगवद्भजन । पुण्यमार्ग ॥ ३२ ॥
म्हणोनि विवेक आणि वैराग्य । तेंचि जाणिजे महद्भाग्य ।
रामदास म्हणे योग्य । साधु जाणती ॥३३॥(द.१२,स.४)

## (२०) सुलभ आत्मज्ञान.

आलिया रे सांग तूं कोण आहेसी । वेगीं आपणासी ठाईं पाडी ॥ १ ॥
ठाईं पाडी तुज तूंचि चुकलासी । देहाचा धरिसी अभिमान ॥ २ ॥
अभिमान देहीं कोण्या अवेवाचा । पांचा पंचकांचा स्थूळ देह ॥ ३ ॥
स्थूळ देह दृश्य याचा तूं जाणता । देह मी म्हणतां जीवदशा ॥ ४ ॥
जीवदशा गेली साक्षित्वें वर्ततां । ईश्वरू तत्वता याचें नांव ॥ ५ ॥
नांवरूप देहीं साक्षी तो विदेही । या विवेकें नाहीं देहबुद्धि ॥ ६ ॥
देहबुद्धि गेली या स्थूळ देहाची । उरी संदेहाची लिंगदेह ॥ ७ ॥
लिंगदेहीं मन वासनेची वृत्ति । होतसे निवृत्ति साक्षरूपें ॥ ८ ॥

पंचवीस तत्वें या लिंगदेहाचीं । साक्षी वेगळाचि अनुभवें ॥ ९ ॥
अनुभवें साक्षी स्थूळसूक्ष्माचा । जागृतिस्वप्नाचा जाणता तूं ॥ १० ॥
जाणता तूं कोण सांग वोळखण । 'नेणें मी आपण आपणासी' ॥११॥
तुझें तूंचि बा रे नेणे म्हणतोसी । तेंचि निश्चयेंसी रूप तुझें ॥१२॥
तुझें रूप तुज दृश्य होत आहे । नेणपण पाहे साक्षिरूप ॥ १३ ॥
साक्षिरूप मज कळेना म्हणसी । तो तूं निश्चयेंसी वेगळाचि ॥ १४ ॥
वेगळाचि तिहीं देहांविलक्षण । वर्ततो आपण साक्षिरूपें ॥ १५ ॥
साक्षिरूप सर्व पदार्थ जाणता । तो कांहीं तत्वता आत्मा नव्हे ॥ १६ ॥
आत्मा नव्हे जाण जाणे अंतःकरण । नाहीं जाणपण आत्मरूपीं ॥१७॥
आत्मरूप मनबुद्धि-अगोचर । आठवविसर जेथें नाहीं ॥ १८ ॥
जेथें नाहीं वृत्ति सर्वही निवृत्ति । जाणती नेणती वृत्ति बापा ॥ १९ ॥
अनिर्वाच्य तेथें नाहीं जाणपण । आपले आपण पुरातन ॥ २० ॥
नव्हे जाणिजेसें ऐसेंचि जाणावें । मग होय ठावें समाधान ॥ २१ ॥
निवृत्ति उन्मनी निःशब्द विज्ञान । ऐसें समाधान अनिर्वाच्य ॥२२॥
पाहे ' अहं ब्रह्म ' ऐसेंचि वचन । ब्रह्म सनातन तूंचि बापा ॥ २३ ॥
स्वरूपीं आसक्ति याचें नांव भक्ति । पाहतां विभक्ति जेथें नाहीं ॥२४॥
जेथें नाहीं देहबुद्धीचें अज्ञान । तया नाव ज्ञान बोलिजेतें ॥ २५ ॥
ज्ञान आणि भक्ति येकाचि असती । वैराग्याची स्थिति बोलिजेल॥२६॥
जाणोनी माईक सर्वही त्यागिलें । मन सुखावलें संगत्यागें ॥ २७ ॥
संगत्याग केला निःसंग राहिला । सर्वही येकला येकरूप ॥ २८ ॥
येकरूप जालें भक्ति आणि ज्ञान । वैराग्यहि जाण येकरूप ॥ २९ ॥

( ओव्या, शतक चौथें )

# (२१) पांगूळ.

('धर्म जागो निवृत्तीचा' असें एक ज्ञानेश्वरांचें सुप्रसिद्ध पद आहे. त्याच नमुन्यावर 'राघवाचा धर्म जागो' हा समर्थांचा पांगुळ आहे. पांगुळ म्ह. पंगु, पाय मोडलेला, पांगळा. हा पांगुळ मोठा मजेदार पण खोल अर्थाचा आहे. शरयूतीरीं अयोध्यानामक एक धर्मनगरी आहे, तेथें रामराव राज्य करितो. त्याचा धर्म उत्तम होय. तो धर्म सर्वत्र जागो, त्याचा जयजयकार होवो. त्याचा धर्म कोणता? अज्ञान निरसून विज्ञानीं लक्ष लागणें हा त्याचा धर्म होय. आतां अज्ञान कोणतें व विज्ञान कोणतें? ज्ञान, अज्ञान, विपरीत ज्ञान व विज्ञान या चारही पदांचा अर्थ दासबोधांत (द. २०, स. १) पहावा. 'ज्ञान म्हणजे जाणणें, अज्ञान म्हणिजे नेणणें। विपरीत ज्ञान म्हणिजे देखणें। येकाचें एक ॥ २३ ॥ ज्ञान आणि अज्ञान। वृत्तिरूपें हें समान। निवृत्तिरूपें विज्ञान। जालें पाहिजे ॥ २८ ॥' पंचभूतात्मक सृष्टीचें दिसणें हें विपरीत ज्ञान. अज्ञान व ज्ञान या दोन्ही वृत्ति आहेत व वृत्तिरूपानें समान आहेत; पण या वृत्ति मावळून म्ह. मी देह आहें हें अज्ञान व मी ब्रह्म आहें हें ज्ञान हे दोनही विकार जाऊन निर्विकार निवृत्तिरूप ब्रह्मस्वरूपाशीं समरस होऊन गेलें पाहिजे. यालाच विज्ञान म्हणतात. 'जेथें मुरे जाणपण। विज्ञान तें' (द. ७।४।५०). 'मीतूंपण बुडालें। विवेकें वेगळेपण गेलें' याप्रमाणें ज्ञान विज्ञानरूपीं मुरणें हाच मोक्ष होय. ज्ञान ही तुर्या, तर विज्ञान ही उन्मनी. असो. विज्ञानीं लक्ष लागणें हा राघवाचा धर्म होय व या धर्मीं प्राणिमात्र जागोत–असा या पांगुळाच्या ध्रुवपदाचा अर्थ आहे. यापुढील कडवीं सोपीं आहेत. समर्थ म्हणतात कीं, मीपणाचे पाय मोडले म्हणून मी पांगळा झालों आहें, भक्तिरूप भिंतीवर बसून प्रेमाचें फडकें पसरून दान मागत आहे; पण तें दान दृश्यांतलें नको आहे, तर 'पूर्णमदः पूर्णमिदं' अशा पूर्णतेचें निष्कामतेचें दान पाहिजे आहे! असें दान देणारा माझ्या रामरायावांचून कोण आहे? देणें ना घेणें, दाता ना याचक, असें दान रामानें घातलें असून 'सहजीं सहज संपूर्णता' झाली आहे!!)

भरत गा खंडामाजीं। शरयूतीर बा, गांव।
धर्माचें नगर तेथें। राज्य करी रामराव।
पांगुळा पाय देतो। देव जानकीचा नाथ।

जाईन मी तया ठाया । देवा उत्तम तो ठाव ॥ १ ॥
राघवाचा धर्म जागो । सर्व अधर्म भागो ।
अज्ञान निरसोनीयां । विज्ञानीं लक्ष लागो ॥ ध्रु. ॥
मीपणाचे मोडले पाय । म्हणउनि पांगुळ जालों ।
तूंपणाची कीर्ति देई । ऐकोनियां शरण आलों ॥
मीतूंपण निरसी माझें । भजनभिंतीवरी बैसलों ।
प्रेमफडकें पसरोनियां । कृपादान मागों आलों ॥ राघ० ॥२॥
जनीं एक तूंचि दाता । म्हणुनी आलों मागावया ।
मागणें निरसे जेणें । ऐसें दे गा रामराया ॥
नवविधा [१]हुभतें देई । भाव हलेगा बैसावया ।
ज्ञानकाठी देई करी । वैराग्य[२]वोलें पांघराया ॥ राघ० ॥ ३ ॥
[३]दासीहातीं देववीसी । तें मी नेघे सर्वथा ।
द्वैतदान नेघे जाण । दोन वेळे आणीतां ॥
अपूर्णता देऊं नको । पूर्ण करी निःकामता ।
आपणा[४]ऐसें दान देई । तूं तरी इच्छेचा दाता ॥ राघ. ॥ ४ ॥
तुझे कृपेचा कांबळा देई । मज पांगुळाकारणें ।
मायामोहो हीवेवातें । तें हें निवारे जेणें ॥
निःकामनाभाकर देई । कामक्षुधा हारे जेणें ।
बोधाचें नाक पाजीं । शब्द [५]खुंटे घालेपणें ॥ राघ० ॥ ५ ॥
रामदास पांगुळासी । रामें दिधलीयां दान ।
घेणेंचि निरसलें । कैंची मागण्याची खूण ॥
देणें घेणें निरसोनीयां । पूर्ण केलें परिपूर्ण ।
दाता ना याचक तेथें । सहजीं सहज संपूर्ण ॥ राघ० ॥ ६ ॥

---

१ हलका, झोपाळा. २ वोल, ओल, फाटकें रगटें. ३ दासी म्ह. माया. मायेंतलें कांहींएक नको. ४ तुझ्या विमलस्वरूपाचें दान दे. ५ थंडीवारा

# ४ विविधविषयक प्रकरणें.

## ( १ ) कवि आणि कवित्व

### १ कवित्वाचे तीन प्रकार

देवाचेन प्रसन्नपणें । जें जें घडे बोलणें ।
तें तें अत्यंत श्लाघ्यवाणें । या नांव प्रासादिक ॥ १ ॥
धीट पाठ प्रासादिक । ऐसें बोलती अनेक ।
तरी हा त्रिविध विवेक । बोलिजेल ॥ २ ॥
धीट म्हणिजे धीटपणें केलें । जें जें आपुल्या मनासि आलें ।
बैळेंचि कवित्व रचिलें । या नांव धीट बोलिजे ॥ ३ ॥
पाठ म्हणिजे पाठांतर । बहुत पाहिलें ग्रंथांतर ।
तयासारिखा उत्तार । आपणाहि केला ॥ ४ ॥
सीघ्राचि कवित्व जोडिलें । दृष्टी पडिलें तेंचि वर्णिलें ।
भक्तीवांचून जें केलें । या नाव धीटपाठ ॥ ५ ॥
कामिक रसिक शृंगारिक । वीर हास्य प्रास्ताविक ।
कौतुक विनोद अनेक । या नांव धीटपाठ ॥ ६ ॥
कवित्व नसावें धीटपाठ । कवित्व नसावें खटपट ।
कवित्व नसावें उद्धट । पाषांडमत ॥ ७ ॥
वैभव कांता कांचन । जयास वाटे हें वमन ।
अंतरीं लागलें ध्यान । सर्वोत्तमाचें ॥ ८ ॥
जो भगवद्भजनेंविण । जाऊं नेदी येक क्षण ।

१ प्रसादाची वाणी ती प्रासादिक कविता. २ हटातटानें शब्दांची जुळणी करून लिहिलेली. ३ शब्दरचना.

सर्वकाळ अंतःकरण । भक्तिरंगें रंगलें ॥ ९ ॥
असो ऐसा भगवद्भक्त । जो ये संसारीं विरक्त ।
त्याचे भक्तीचें कौतुक । या नांव प्रासादिक॥१०॥(द.१४-३)

## २ कवित्वलक्षण.

कवित्व शब्दसुमनमाळा । अर्थपरिमळ आगळा[2] ।
तेणें संत-षट्पदकुळा[3] । आनंद होय ॥ ११ ॥
ऐसी माळा अंतःकरणीं । गुंफून पूजा रामचरणीं ।
ओंकारतंतु अखंडपणीं । खंडूंचि नये ॥ १२ ॥
कवित्व असावें निर्मळ । कवित्व असावें सरळ ।
कवित्व असावें प्रांजळ । अन्वर्थाचें[4] ॥ १३ ॥
मृदु मंजुळ कोमळ । भव्य अद्भुत विशाळ ।
गौल्य[5] माधुर्य रसाळ । भक्तिरसें ॥ १४ ॥
जेणें अनुताप उपजे । जेणें लौकिक[6] लाजे ।
जेणें ज्ञान उमजे । या नांव कवित्व ॥ १५ ॥
जेणें देहबुद्धि तुटे । जेणें भवसिंधु आटे ।
जेणें भगवंत प्रगटे । या नांव कवित्व ॥ १६ ॥
जेणें सद्बुद्धि लागे । जेणें पाखंड भंगे ।
जेणें विवेक जागे । या नांव कवित्व ॥ १७ ॥
जेणें सद्वस्तु[7] भासे । जेणें भास हा निरसे ।
जेणें भिन्नत्व[8] नासे । या नांव कवित्व ॥ १८ ॥

१ भगवत्प्रसादावांचून केलेली कविता प्रासादिक नव्हे. २ दिव्य अर्थ-सुगंधानें भरलेल्या शब्दसुमनांच्या माळा. ३ संत हेच भ्रमर त्यांच्या समुदायास. ४ अर्थ सहज कळणारें असावें, दूरान्वित नसावें. ५ गोड. ६ बाह्य संबंधाची प्रीति, लोकलाज. ७ परमात्मवस्तूचा साक्षात्कार होतो व दृश्य नजरेसमोर येत नाहीं. ८ द्वैत, भेदभाव.

जेणें होय समाधानें । जेणें तुटे संसारबंधन ।
जया मानिती सज्जन। या नांव कावित्व ॥१९॥(द.१४स.३)

### ३ कवींस सूचना

अनेक भास भासतो । परंतु सर्व नासतो ।
प्रचीत आपुल्या मना । चळेल देहभावना ॥ २० ॥
उपाय तो अपाय रे । भुतें भजोन काय रे ।
भजा अनंत व्यापका । चतुर हो चळों नका ॥ २१ ॥
भुतें समस्त वावरे । प्रकृतिचा स्वभाव रे ।
अनंत संत वोळखा । मुळाकडे चुकों नका ॥ २२ ॥

### ४ कवीश्वरांस वंदन

आतां वंदूं कवीश्वर । जे शब्दसृष्टीचे ईश्वर ।
ना तरी हे परमेश्वर । वेदावतारी ॥ २३ ॥
कीं हे सरस्वतीचें निजस्थान । कीं हे नाना कळांचें जीवन ।
नाना शब्दांचें भुवन । यथार्थ होय ॥ २४ ॥
कवि मुमुक्षूंचें अंजन । कवि साधकांचें साधन ।
कवि सिद्धांचें समाधान । निश्चयात्मक ॥ २५ ॥
नाना साधनाचें मूळ । नाना प्रयनाचें फळ ।
नाना कार्यसिद्धि केवळ । कवींचेनि प्रसादें ॥ २६ ॥
आधीं कवीचा वाग्विलास । तरी मग श्रवणीं तुंबळे रस ।
कवीचेनि मतिप्रकाश । कवित्वास होय ॥ २७ ॥

---

१ शांतिसुख. वृत्तीची खळमळ मोडून वृत्ति स्वरूपीं लीन होणें याचें नांव समाधान. २ दृश्याभास नाशवंत आहे, भूतें नाशवंत आहेत, तीं प्रकृतिस्वभाव आहेत हें जाणून अनंत शाश्वतरूपाला ओळखा, मुळाकडे चला व तेथून काव्य करा. ३ कवीचे वाग्विलास पाहून किंवा ऐकून कविभक्तांसही कवित्वाची स्फूर्ति होते.

नसता कवींचा व्यापार । तरी कैचा असता जगदुद्धार ।
म्हणोनि कवि हे आधार । सकळ सृष्टीसी ॥ २८ ॥
मागां वाल्मीकव्यासादिक । जाले कवीश्वर अनेक ।
तयांपासूक विवेक । सकळ जनांसी ॥ २९ ॥
ऐसे पूर्वीं थोरथोर । जाले कवीश्वर अपार ।
आतां आहेत पुढें होणार । नमन त्यांसी ॥ ३० ॥
कीं हे अमृताचे मेघ वोळले । कीं हे नवरसांचे वोघे लोटले ।
नानां[3] सुखांचें उचंबळलें । सरोवर हें ॥ ३१ ॥
कीं हे विवेकनिधीचीं भांडारें । प्रगट जालीं मनुष्याकारें ।
नाना वस्तूचेनि विचारें । कोंदाटले हे ॥ ३२ ॥
कीं हे सुखाचीं तारवें लोटलीं । अक्षय आनंदें उतरलीं ।
विश्वजनास उपेगा आलीं । नाना प्रयोगांकारणें ॥ ३३ ॥
आतां असो हा विचार । जगास आधार कवीश्वर ।
तयांसी माझा नमस्कार । साष्टांगभावें ॥३४॥ (द.१,स.७)

## (२) मराठी ग्रंथ.

येक म्हणती ' मऱ्हाटें[3] काय । हें तो भल्यांसी ऐकों नये ' ।
तीं मूर्खें नेणती सोय । अर्थान्वयाची ॥ १ ॥
लोहाची मांदूस[4] केली । नाना रत्नें सांठविलीं ।
तीं अभाग्यानें त्यागिलीं । लोखंड म्हणोनी ॥ २ ॥
तैसी भाषा प्राकृत । अर्थ वेदांत आणि सिद्धांत ।
नेणोनि त्यागी भ्रांत । मंदबुद्धीस्तव ॥ ३ ॥
आहाच[5] सांपडतां धन । त्याग करणें मूर्खपण ।

१. ओघ. २ अथवा. ३ मराठींत अर्थ काय ? मराठींतली गद्यपद्यरचना शहाण्यांनी ऐकूं नये असे म्हणून मराठी भाषेला दोष देतात, ते मूर्ख आहेत. त्यांना अर्थसंबंध कळत नाहीं. ४ लोखंडाची पेटी. ५ सहज, अप्रयास.

द्रव्य घ्यावें, सांठवण[1] । पाहोंचि नये ॥ ४ ॥
तैसें प्राकृतीं अद्वैत । सुगम आणि सप्रचीत ।
अध्यात्म लाभे अकस्मात । तरी अवश्य घ्यावें ॥ ५ ॥
न करितां व्युत्पत्तीचा श्रम । सकळ शास्त्रार्थ होय सुगम ।
सत्समागमाचें वर्म । तें हें ऐसें असे ॥ ६ ॥
जें व्युत्पत्तीनें न कळे । तें सत्समागमें कळे ।
सकळ शास्त्रार्थ आकळे । स्वानुभवासी ॥ ७ ॥
भाषापालटें[2] कांहीं । अर्थ वायां जात नाहीं ।
कार्यसिद्धि ते सर्वही । अर्थाचपासीं ॥ ८ ॥
तथापि प्राकृताकरितां । संस्कृताची सार्थकता ।
येऱ्हवीं त्या गुप्तार्था । कोण जाणे ? ॥ ९ ॥
अर्थ सार भाषा पोंचट । अभिमानें करावी खटपट ।
नाना अहंतनें वाट । रोधिली मोक्षाची ॥ १० ॥
जेथें निरूपणाचे बोल । आणी अनुभवाची वोले[3] ।
तें संस्कृतापरीस खोल । अध्यात्मश्रवण ॥ ११ ॥ (द.७,स.१

## (३) 'आणि' या उभयान्वयी अव्ययाची मौज !

('आणि' याचा अर्थ 'असून'. आणि या उभयान्वयी अव्ययानें सांधलेल्या दोन वस्तु किंवा दोन गुण प्राय: एकत्र आढळत नाहींत, किंबहुना लौकिक व्यवहारांत त्यांचा प्राय: विरोध दिसतो; तो न दिसल्यास दुधांत साखर याप्रमाणें दोन सुंदर गुणांचें साहचर्य होतें. या भावानें समर्थांनीं 'आणि' या पदाचा मार्मिक उपयोग केला आहे आळशी आणि खादाड, पापी आणि निंदक, हीन आणि कृत्रिमी अशा जोडया दिसतात. त्या फोडतां आल्या तर दोष कमी होतो. आळशी असून खादाड नसेल, तर त्याचा इतरांस तितका त्रास कमी; पण दोन्ही दोष एकत्र असले तर मात्र कठीण ! ज्ञाता आणि भक्त, पंडित आणि विरक्त, वक्तृत्व आणि नैराश्य, या जोडया

१ द्रव्यादि ठेवण्याचा पदार्थ कशाचा आहे हें पाहूं नये. २ भाषाभेदानें अर्थ पालटत नाहीं. ३ ओल.

सांघतां आल्या तर गुण फार वाढतो. ज्ञानी प्रायः कोरडे, भाविकभक्त प्रायः ज्ञानविरोधी दिसतात. म्हणून ज्ञानभक्तीचें एकीकरण होईल तर फारच बहार होईल ! या न्यायानें दोषवर्धक व गुणवर्धक पुढील जोडया कशा फोडाव्या किंवा सांधाव्या याचा सूक्ष्म विचार ज्याचा त्यानेंच मनाशीं करावा. उभयान्वयी अव्ययें उत्तम सांधतात अगर फोडतात. )

परम सुंदर आणि चतुर । परम सबळ[१] आणि धीर ।
परम संपन्न आणि उदार । अतिशयेंसीं ॥ १ ॥
परम ज्ञाता आणि भक्त । महापंडित आणि विरक्त ।
महातपस्वी आणि शांत । अतिशयेंसी ॥ २ ॥
वक्ता आणि नैराश्यता[२] । सर्वज्ञ आणि सादरता ।
श्रेष्ठ आणि नम्रता । सर्वत्रांसी ॥ ३ ॥
राजा आणि धार्मिक । शूर आणि विवेक ।
तारुण्य आणि नेमक[३] । अतिशयेंसी ॥ ४ ॥
कार्यकर्ता निरभिमानी । गायक आणि वैष्णव जनीं ।
वैभव आणि भगवद्भजनीं । अत्यादर ॥ ५ ॥
तत्वज्ञ आणि उदासीन । बहुश्रुत आणि सज्जन ।
मंत्री आणि सगुण । नीतिवंत ॥ ६ ॥ ( द.२, स.८ )
कुरूप आणि कुलक्षण[४] । अशक्त आणि दुर्जन ।
दरिद्री आणि कृपण । अतिशयेंसी ॥ ७ ॥
आळसी आणि खादाड । दुर्बळ आणि लाताडें[५] ।
तुटक आणि लबाड । अतिशयेंसी ॥ ८ ॥
मूर्ख आणि तपीळ[६] । वेड आणि वाचाळ ।
लँटिके[७] आणि तोंडाळ । अतिशयेंसी ॥ ९ ॥

---

१ बळवंत, बळाचा. २ निरिच्छता. ३ नित्यनेमानें, शिस्तीनें चालणारा. ४ दुर्गुणी. ५ लाथा झाडणारा. ६ रागीट, तामसी. ७ खोटा.

नेणे आणि नायके । न ये आणि न शिके ।
न करी आणि न देखे । अभ्यासदृष्टीं ॥ १० ॥
अज्ञान आणि अविश्वासी । छळवादी आणि दोषी ।
अभक्त आणि भक्तांसी । देखों सकेना ॥ ११ ॥
पापी आणि निंदक । कष्टी आणि घातक ।
दुःखी आणि हिंसक । अतिशयेंसीं ॥ १२ ॥
लंडी[1] आणि उन्मत्त । निकामी[2] आणि डुल्लत ।
भ्याड आणि बोलत । पराक्रमु ॥ १३ ॥
समय नेणे प्रसंग नेणे । प्रेत्न नेणे अभ्यास नेणे ।
आर्जव नेणे मैत्री नेणे । कांहींच नेणे अभागी ॥ १४॥ (द.२–३)

## ( ४ ) भला कोण ?

भला तोचि जो मुख्य आचार राखे । गुरु-देव-लौकिक-वेदांसि धाके[3] ।
करूं ये बरें कर्म जें तें करीतो । महावाक्यतत्वादिकें वीवरीतो ॥१॥

## ( ५ ) मुलांची आवड.

घयें थोर ते चोर! भावार्थ नाहीं । विकल्पें बुडाले अहंभावडोहीं ।
अहंता नसे हा तया लेकुरांसी । म्हणोनी बहू आवडी रामदासीं ॥१॥

## ( ६ ) श्रीसमर्थांचें पत्र ( गद्य ).

( शके १५९६ आनंदसंवत्सर ह्या वर्षी श्रीसमर्थ चतुर्मास म्हणजे आषाढ शुद्ध ११ पासून कार्तिक शुद्ध ११ पर्यंत हेळवाकच्या घळींत होते. हें निवांतस्थान सातारा जिल्ह्यांत पाटणच्या पलीकडे कुंभारली घाटाच्या तोंडाशीं हेळवाक म्हणून गांव कोयना नदीच्याकांठीं आहे, तेथून कांहीं अंतरावर उंच डोंगरावर चढून गेल्यावर अर्धकोस अरण्यांतून गेल्यावर एका डोंगराच्या दरींत आहे. त्याच सालीं ज्येष्ठ शुद्ध १३ ला श्रीशिवाजीमहाराजांचा

१ भ्याड. २ काम न करणारा, रिकामटेकडा. ३ गुरु, देव, लौकिक व वेद यांना भिऊन त्यांच्या मर्यादा पाळून राहतो.

राज्याभिषेक समारंभ रायगडावर झाला होता. त्यानंतर सुमारें एक महिन्यांतच समर्थ त्या घळींत जाऊन राहिले. स्थान रम्य व अत्यंत थंड. समर्थांचें वय या वेळीं ६६ वर्षांचें. अशा उतारवयांत अशा निर्जनवनांत व थंड प्रदेशांत समर्थ म्हणूनच राहूं शकले. तेथें चतुर्मास राहिल्यामुळें शेवटीं 'शीतलाई वहुत आली' म्हणून तेथून निघतांना जीं 'कित्येक कार्यें सिद्ध होणें राहिलीं होतीं' तीं सर्व आपले उपाध्ये पुराणिक व दिवाकरभटांचे व्याही जे रघुनाथभट नवहस्त पंडितराय यांजवर सोंपवून समर्थ घोड्यावर स्वार होऊन उष्ण देशाशीं चाफळास आले. 'चाफळास नवसाची समाराधना श्रीचे द्वारीं' केली, व 'शूद्रांचें भोजन सिंगणवाडीस करून दुसरे दिवशीं पंडितरायास स्वहस्ताक्षरें' पत्र लिहिलें, तें पुढें दिलें आहे. यांतील 'मज रघुनाथजीवेगले कोण्ही जिवलग नाहीं, आपण जाला समाचार रघुनाथजीस विदित केला' हे शब्द कोणाही प्रेमळास समर्थांच्या कोमळ रामभक्तीचें स्मरण करवून क्षणभर तन्मय करितील यांत संशय नाहीं. 'तुमचें जें कांहीं आहे तें सकल माझेंचि आहे, तुम्ही आमचेचि आहा, तुम्ही आम्ही सकल देवाचे आहों, शरीरभेदावरी न जाणें, अंतरस्थिति पाहिल्या उपरी कलों येईल' ह्या वाक्यांत समर्थांच्या आत्मनिवेदनी भक्तीचें म्हणजे अभेदभक्तीचें रहस्य प्रकट झालें आहे. या लोकसंग्रहकारी महात्म्याचें हृदय त्यांत स्पष्ट दिसत आहे. विरामचिन्हें मात्र आम्ही घातलीं आहेत.)

### श्रीराम समर्थ

उत्तमगुणाळंकृत रघुनाथभक्तिपरायेण परोपकार राजमान्य राजेश्री रघुनाथभट गोसावी यांसी स्नेहपूर्वक सूचना. तुमचा निरोप घेउनु हेल-वाकीहून स्वार जालों ते सुखरूप चाफलास पावलों. संकल्पाचा समाराधे-

---

१ अश्वारूढ झालों. २ रघुनाथभट घळीपासून १॥ कोसावर असलेल्या हेळवाकीपर्यंत समर्थांस पोंचवावयास आले होते असें दिसतें. हेळवाकपासून पाटण ६॥ कोस व तेथून चाफळ ३॥ कोस म्हणजे घळीपासून चाफळ ११।१२ कोस समर्थ १२ कोस घोड्यावर बसून आले. ३ कोणत्या संकल्पाची समाराधना? ज्येष्ठांत शिवराज्याभिषेकसमारंभ झाला या आनंद-प्रसंगाबद्दल समर्थांनीं चाफळास अन्नसंतर्पण केलें असेल काय? समर्थांचा संकल्प कांहीं तरी महत्कार्याविषयींच असायचा.

नाहीं जालीं. पुढें शरीराचा उपाचारहि हलूहलू होतो. तुमचें मन मजवरि वहुत आहे तें तुमचे आवडीच्या गुणें कल्याण होईल ऐसें नेमस्त चिन्ह दिसतें. आपण ते कर्कश सीतलाईमध्यें वहुताचि श्रम पावलों, तो माझा सकळ श्रम घेउनु मज निरोप दिधला तो उपकार देव जाणे. येविसीं चीत चमत्कारलें ते पत्रीं किती म्हणौनु लेहावे? माझें अरिष्ट तुम्ही घेउन मज उष्ण देशासी पाठविलें हा उपकार श्रीरघुनाथजीस जाला. मजे रघुनाथजीवेगलें कोण्ही जिवलग नाहीं; आपण जाला समाचार रघुनाथजीस विदित केला. याउपरी माझे ठाईं तुम्ही आहा. रघुनाथकृपेचा प्रत्यये तुम्हास आलियावरी प्रचीतीसीं कळों येइल. बहुत काये लेहावें? वेदमूर्ती दिवाकरभट गोसावी तेथें आलियावरी तुम्हीं माझा समाचार घेयासी ये प्रांतीस आले पाहिजे. स्नेह बहुत असों दीजे हा पत्रार्थ. हें इतुकें म्या आवडीच्या कलवळ्यानें लिहिलें आहे. मनें मन साक्ष असेल, परंतु तुम्हास उपचारसा वाटोन रजीस होलें तरी न होणें. जैसा दिवाकरभट तैसे तुम्हीं हा इत्यर्थ आहे. वरें कळलें पाहिजे. तुमचा आमचा येकांत प्रसंग जालियावरी मग ऐसें लिहितां न ये, म्हणौनि ये संधीमध्यें प्रसंग फावला—पुढें फावेना म्हणौनि लांबे करूनि लिहिलें. घरकड इतर

१ होत आहे, चालू आहे. २ निश्चित ३ अत्यंत थंड हवेंत राहिल्यानें. ४ समर्थांचा रामपायीं जिव्हाळा केवढा होता तें या भावनेवरून स्पष्ट आहे जें जें होईल तें रामास निवेदन हें सख्यभक्तीचें लक्षण होय. 'सख्य देवासीं करावें। हितगुज तयासीच सांगावें' (दास. ४–८–३१) ५ हे समर्थांचे शिष्य महाबळेश्वरीं राहत. राजद्वारीं जाण्यायेण्याचें काम त्यांजकडे असे. ६ असा कळवळा होता म्हणूनच सहस्रावधि लोक वेधले गेले. ७ रजीस व्हाल = कष्टी व्हाल. ८ रघुनाथ भट अद्याप समर्थांचे शिष्य झाले नव्हते, पण त्यांच्या मनीं समर्थांविषयीं भक्ति उत्पन्न झाली होती, अशा मधल्या काळांत. 'एकांत प्रसंग' अद्याप झाला नव्हता, समर्थांची 'अंतर स्थिति' अजून कळली नव्हती. ९ लांब करून–विस्तारपूर्वक.

भाव मनामधें असेल तरी रघुनाथ साक्ष असे. तुम्ही रंजीस न होणें. आणि जें आहे तें लिहिलें यामधें मिथ्या स्तुति नाहीं. तुम्ही सर्वज्ञ आहा, तुमचे जे कांहीं आहे ते सकल माझेंचि आहे. म्या मज माझ्या मनास येईल तैसे लिहिलें येथें तुमचे काये गेले! कांहीं चिंता न कीजे. तुम्ही आमचेचि आहा, तुम्ही आम्ही सकल देवाचे आहों, शरीरभेदावरी न जाणे, अंतरस्थिति पाहिल्याउपरी कळों येईल!

## ( ७ ) श्रीराम राम हें म्हणा!

( श्रीशंकर रामनामाचा महिमा स्वानुभवावरून पार्वतीच्या निमित्तानें जनांस सांगत आहेत. )

**वृत्त—प्रमाणका,**

सुरेंद्र चंद्रशेखरु । अखंड ध्यातसे हरु ।
जनांसि सांगतो खुणा । श्रीराम राम हें म्हणा ॥ १ ॥
महेश पार्वतीप्रती । विशेष गूज सांगती ।
सलाभ होतसे दुणा । श्रीराम राम हें म्हणा ॥ २ ॥
विषें बहुत जाळिलें । विशेष अंग पोळिलें ।
प्रचीत माझिया मना । श्रीराम राम हें म्हणा ॥ ३ ॥
विशाळ व्याळ वेस्त कीं । नदीखळाळ मस्तकीं ।
ऋषीभाविष्यकारणा । श्रीराम राम हें म्हणा ॥ ४ ॥
बहुत प्रेत्न पाहिले । परंतु सर्व राहिले ।
विबुधपक्षरक्षणा । श्रीराम राम हें म्हणा ॥ ५ ॥

---

१ मिथ्या स्तुति केली असें वाटून कष्टी होऊं नका, ओशाळगत होऊं नका. २ जीव जीवांत घालावा, आत्मा आत्म्यांत मिसळावा, मनामनासि मिळणी करावी इ. प्रकारचा जो उपदेश समर्थांनीं सर्वत्र केला आहे त्याप्रमाणें त्यांची स्वतःची वागणी कशी होती हें या शेवटच्या वाक्यावरून व एकंदर पत्रावरून कळून येतें.

अपाय होत चूकला । उपाय हा भला भला ।
नसे जयासि तूळणा । श्रीराम राम हें म्हणा ॥ ६ ॥
विरांमधें विरोत्तमु । विशेष हा रघूत्तमु ।
सकाम काळअंकणा । श्रीराम राम हें म्हणा ॥ ७ ॥
बहुत पाहिलें खरें । परंतु दोनि अक्षरें ।
चुकेल येमयातना । श्रीराम राम हें म्हणा ॥ ८ ॥
मनीं धरूनि साक्षपें । अखंड नाम हें जपे
मनांतरीं क्षणक्षणा । श्रीराम राम हें म्हणा ॥ ९ ॥
देहें धरूनि वानरी । अखंड दास्य मी करी ।
विमुक्त राज्य रावणा । श्रीराम राम हे म्हणा ॥१०॥

## ( ८ ) हरे राम हा मंत्र सोपा जपा रे !

नको शास्त्र अभ्यास व्युत्पत्ति मोठी ।
जडे गर्व ताठा अभीमान पोटीं ॥
कसा कोणता नेणवे आजपा रे ।
हरे राम हा मंत्र सोपा जपा रे ॥ १ ॥
तुला ही तनू मानवी प्राप्त जाली ।
बहूजन्मपुण्यें फळाला।गि आलीं ॥
तिला तूं कसा गोंविसी वीषयीं रे । हरे० ॥ २ ॥
दुराशा नको रे परस्त्रीधनाची ।
नको तूं करूं नीच सेवा जनाची ॥
पराधीन कैसा भला दीससी रे । हरे० ॥ ३ ॥
बहू इच्छिसी कीर्ति सन्मान कांहीं ।
सुखाचा तरी अंतरीं लेश नाहीं ॥
फुकाचें मुखीं नाम तें कां न ये रे । हरे० ॥ ४ ॥

तपस्वी मनस्वी भले पार गेले ।
दुजीसृष्टिकर्ते असे थोर मेले ॥
चिरंजीव कल्पायु गेले किती रे । हरे० ॥ ५ ॥
म्हणे देश माझे भुमी गांव वाडे ।
शिबीकासनीं बैससी उंच लोडे ॥
कसा उंच तूं मंचकीं लोळसी रे । हरे० ॥ ६ ॥
नको वाउगी चाउटी या मनासी ।
हरीचिंतनीं ध्यास लावी मनासी ॥
अमोलीक हा काळ जातो वृथा रे । हरे० ॥ ७ ॥

## ( ९ ) प्रयत्न थोर का प्रारब्ध थोर ?

( प्रारब्ध थोर का प्रयत्न थोर हा वाद फार पुरातन आहे. समर्थांनीं या विषयावरच्या प्रस्तुत प्रकरणांत नागमोडी पद्धतीनें दोन्ही पक्षांचें म्हणणें व्यवस्थेशीर मांडून शेवटीं निवाडा दिला आहे. तो अर्थात् प्रयत्नाच्या बाजूचा आहे. ' आधीं जे निर्माण तेचि थोर ' ह्या कायद्याचा आश्रय घेऊन त्यांनीं निवाडा दिला आहे. दोन्ही पक्ष आपापल्यापरी सबळच आहेत; फक्त त्यांत थोर कोण एवढ्यापुरता हा निर्णय आहे. समर्थांनी प्रयत्नवादाचाच पुरस्कार सर्वत्र केला आहे. )

(प्र०) प्रेत्न आहे थोर पाहावा विचार। येणें पैलपार पाविजतो ॥१॥
(प्रा०) पावजितो पार प्रारब्धेंकरूनी। येत्न केल्या जनीं होत नाहीं २
(प्र०) होत नाहीं प्रेत्नें ऐसें काय आहे? । विचारूनि पाहे आलेयारे[1] ।
(प्रा०) आलयारे ! प्रेत्न करितां फळेना। होणार टळेना कांहीं केल्या ॥
(प्र०) कांहीं तरी केलें पाहिजे संसारीं । कांहींच न करी ऐसा कोण ।
(प्रा०) ऐसा कोण आहे प्रारब्ध वेगळा । होणाराची कळा वेगळी ते ।
(प्र०) भिन्न आहे कळा धूर्त मनुष्याची। तूर्त प्रेत्नाची फळश्रुति॥७॥
(प्रा०) फळश्रुति कैंची पूर्वदत्तावीण[2] ? वाउगाचि[3] शीण होत असे ॥८॥

---

१ जन्मास आलेल्या जीवा ! २ पूर्वपुण्याईवांचून. ३ व्यर्थ.

(प्र.) व्यर्थ शीण होतो शोधिल्यावांचुनी । कांहीं केल्या जनीं होत नाहीं
(प्रा.) होत नाहीं परी अदृष्ट पाहिजे । तरीच [1]लाहिजे सर्व कांहीं ॥
(प्र.) सर्व कांहीं प्रेत्न केलियानें होतो । आळशी पडतो साव[3]काश ॥
(प्रा.) सावकाश जरी आळशी पडिला । होणार तें त्याला होत आहे ।
(प्र.) होत आहे परी प्रेत्नेंवीण नसे । केल्यावीण कैसे भोग होती ॥
(प्रा.) भोग हे होताती पाठीं लागताती । येत्नेंवीण होती अकस्मात ॥
(प्र.) अकस्मात तरी प्रेत्नीच भोगील । आळशी पडेल सावकाश ॥
(प्रा.) सावकाश पडे तेथेंचि होईल । होणारें येईल पूर्वदत्तें ॥ १६ ॥
(प्र.) पूर्वदत्त केलें प्रेत्न करोनीयां । घाउगेंचि वायां बोलतोसी॥१७॥

*　　*　　*

(प्र.) निश्चयेसीं आतां होणार म्हणसी । कांहींच येत्नासी करूं नको ॥
(प्रा.) करूं नको ऐसें वेर्थचि उत्तर । पूर्वींच होणार होउनि गेलें ॥

*　　*　　*

(प्र.) उभयता पहा प्रारब्धप्रयत्न । आधीं जें निर्माण तेंचि थोर ॥२०॥
थोर मूळमाया निराकारीं झाली । प्रारब्धाची वों[4]ळी तेथें नाहीं॥२१
परब्रह्मीं जाली मुळी मूळमाया । पुढें गुणमाया गुणकरी ॥२२॥
गुण सत्व रज तम हे जाणावे । तेथूनी स्वभावें पंचभूत ॥२३॥
जीवसृ[5]ष्टि झाली उत्पत्तिसंहार । प्रारब्धविचार ऐली[6]कडे ॥ २४ ॥
ऐलीकडे कर्म मूळींचा तो प्रेत्न । श्रोतीं सावधान विवरावें ॥२५॥
आहे निराकार निर्मळ निश्चळ । तेथूनि चंचळ प्रेत्न जाला ॥२६॥
प्रेत्न जाला आधीं म्हणोनियां थोर । प्रारब्धविचार ऐलीकडे॥२७॥
ऐलीकडे कर्म पाहतां भूतळीं । प्रेत्न अंतराळीं[7] मूळारंभ ॥ २८ ॥
( ओव्या, शतक बारावें. )

१ दैवाची अनुकूलता. २ मिळते. ३ स्वस्थ, निरुद्योगी. ४ ओळ, रेषा. ५ चार खाणी चार वाणीचे असंख्य जीव. ६ अलीकडचा. ७ आकाशांत.

## (१०) उत्तम, मध्यम व अधम.

### (१)

सामान्य देव केले[1] ते । अंतरात्मा विशेष तो ।
परंतु सेवटीं जोतो[2] । धन्य देव निरंजनु ॥ १ ॥
क्षर तें सर्वही भूतें । साक्षी कूटस्थ अक्षरु ।
उत्तमू ईश तो अन्यै[3] । परमात्मा बोलिजे तया ॥ २ ॥
निर्गुणीं गांठि घालावी । त्रिगुणीं बरवें नसे ।
गुणातीत परब्रह्म । संतसंगेंच पाविजे ॥ ३ ॥
उत्तमू प्रत्ययेंज्ञानी[4] । मध्यमू शास्त्रनिश्चयी ।
अधमू लोकधाटीचो[5] । पाखांडी अधमाधमू ॥ ४ ॥
उत्तमू कल्पनातीतु । मध्यमू शब्दबोलका ।
अधमू नेणता गर्वी । पापी तो अधमाधमु ॥ ५ ॥
उत्तमू मुख्य ज्ञानी तो । मध्यमू तो उपासकु ।
अधमू संशयी कर्मी । कर्मभ्रष्ट अधमाधमु ॥ ६ ॥
धन्य तो सर्वही जाणे । सार शोधून घेतसे ।
प्रत्ययेंवीण मानीना । तो ज्ञाता दुर्लभू जनीं ॥ ७ ॥

* * *

प्रपंच नेणता वेडा । जाणता देव बोलिजे ।
चतुर इतरां वाटे । ज्ञानी तो सर्वदुर्लभु ॥ ८ ॥
उत्तमू जाणता ज्ञानी । मध्यमू जाणता भला ।
अधमू जाणता वेडा । मूर्ख सर्वत्र नेणती ॥ ९ ॥

---

१ निर्माण झालेले, घडलेले. २ अंतरात्मा (मूळपुरुष) देवाचाही लय आहे. निर्गुण देव श्रेष्ठतम. ३ 'उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्युदाहृतः' (गीता १५-१७). ४ स्वानुभवी. ५ लोकरूढीप्रमाणें चालणारा.

( २ )

पद.

पहिला देव तो बद्धाचा । दुसरा देव मुमुक्षूचा ।
तिसरा देव साधकाचा । चौथा देव तो वेगळा ॥
अगम्य त्याची लीळा ॥ १ ॥
पहिला गुण महेशाचा । दुसरा गुण तो ब्रह्मयाचा ।
तिसरा गुण तो विष्णूचा । चौथा गुण तो वेगळा ॥ अगम्य०
पहिला भक्त तो कायेचा । दुसरा भक्त तो वाचेचा ।
तिसरा भक्त तो मनाचा । चौथा तो वेगळा ॥ अगम्य० ॥३॥

## ( ११ ) संगतीनें सभाग्य किंवा करंटा.

( १ )

येक ते शिकती विद्या । येक ते मूर्ख वाढती ।
तेणें ते करंटे होती । युक्तिबुद्धि कळेचिना ॥ १ ॥
संगतीसारिखे होती । नाना लोक भूमंडळीं ।
सुबुद्धी संगतीयोगें । कुबुद्धी संगतीगुणें ॥ २ ॥
कर्मानुसार या लोकां । संगती सांपडे बरी ।
इहलोक-परलोकीं । सत्संग पाहिजे बरा ॥ ३ ॥
कितेक लोक भाग्याचे । करंटे होतसे पुढें ।
बुद्धीचा भ्रंश होताहे । यालागीं भाग्य जातसे ॥ ४ ॥
बुद्धीचें गुंथाडें मोठें । दक्ष धूर्तचि जाणती ।
भाग्य हें चुकतां जातें । आळसें काम नासतें ॥ ५ ॥
साहेबॅ जोडतां मोठा । भाग्य तत्काळ पाहिजे ।

१ क्षेत्रदेव किंवा प्रतिमा, अवतारी देव, अंतरात्मा व चौथा देव विमल ब्रह्म. २ तमोगुण शंकराचा, रजोगुण ब्रम्हयांचा, सत्वगुण विष्णूचा व चौथा गुणातीत. ३ आधीं जाते बुद्धि आणि मग जातें भांडवल, अशी म्हण प्रसिद्धच आहे. ४ स्वामी, धणी.

धणी तो करंटा आहे । सेवक रडतो सदा ।। ६ ।।
सेवितां लोक भाग्याचा । सेवनें भाग्य भोगिती ।
यालागीं संग भाग्याचा । प्रत्यक्ष भाग्य भोगिती ।। ७ ।।
बहुतां मान्य मानावें । बहुतां वंद्य वंदिजे ।
निंद्य तें वंदितां खोटें । हांसती सकळै जनीं ।। ८ ।।

( २ )

आपला आपण करी कुडावा¹ । तो आपला मित्र जाणावा ।
आपला नाश करी तो समजावा । वैरी ऐसा² ।। ९ ।।
जो आपला आपण घातकी । तो आत्महत्यारा पातकी ।
या कारणें विवेकी । धन्य साधु ।। १० ।।
पुण्यवंतां सत्संगति । पापिष्टां असत्संगति ।
गति आणि अवगति³ । संगतियोगें ।। ११ ।।
उत्तमसंगति धरावी । आपली आपण चिंता करावी ।
अंतरीं बरी विचरावी । बुद्धि जाणत्याची ।। १२ ।।
साक्षपी जाणत्याची संगती । तेणें साक्षपी शाहणे होती ।
आळसी मूर्खाची संगती । आळसी मूर्ख ।। १३ ।।
उत्तमसंगतीचें फळ सुख । अधमसंगतीचें फळ दुःख ।
आनंद सांडूनियां शोक । कैसा घ्यावा ? ।। १४ ।।
नाना दुर्जनांचा संग । क्षणक्षणा मनोभंग ।
या कारणें कांहीं रंगें⁴ । राखोन जावें ।। १५ ।।
येक भाग्यपुरुष मोडती⁵ । येक नवे भाग्यवंत होती ।
तैसीच विद्याव्युत्पत्ति । होत जाते ।। १६ ।।
येक भरे येक रितें । रितें मागुतें भरतें ।

१ रक्षण. २ 'आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः' (गीता) ३ अधोगति. ४ आत्मानंद संभाळून राहावें. ५ खालावतात.

भरतेंही रितें होतें । काळांतरीं ॥ १७ ॥
देहें जैसें केलें तैसें होतें । यत्न केल्या कार्य साधतें ।
तरी मग कष्टावें तें । काय निमित्त ? ॥१८॥ (द.१७ स.७)

## ( १२ ) मैत्रीचें रहस्य.

माझें माझें तुझें माझें । ऐसी हे मैत्रिकी जनीं ।
माझें तुझें तुझें तूझें । ऐसें हें न घडे कदा ॥ १ ॥
आशेची[1] मैत्रिकी खोटी । दुराशा विटंबी पुढें ।
परोपकारणी मैत्री । ते मैत्री न विटे कदा ॥ २ ॥
अविश्वासें वस्ती केली । विश्वास हृदयीं नसे ।
विकल्पें[3] चालते मैत्री । ते मैत्री आत्मघातकी ॥ ३ ॥
मित्र हो गोत्रज बंधु । आपुलें पारिखें जनीं ।
विकल्पेंवीण जें सख्य । तें सख्य सुख दाखवी ॥ ४ ॥
मित्र तो पाहिजे ज्ञानी । विवेकी जाणता भला ।
श्लाघ्यता पाहिजे तेथें । इहलोक परत्रही ॥ ५ ॥
उगाचि वेळ घालाया । नासके मित्र पाहिले ।
कुबुद्धि कुकर्मी दोषी । त्याचें फळ भोगावया ॥ ६ ॥
संगदोषें महादुःखें । संगदोषें दरिद्रता ।
संगतीनें महाद्भाग्य । प्राणी प्रत्यक्ष पावती ॥ ७ ॥
संग तो श्रेष्ठ शोधावा । नीच संगत कामा न ये ।
न्यायवंत गुणग्राही । यैत्नाचा[4] संग तो बरा ॥ ८ ॥
जाणत्या जाणता भेटे । नीतीचा गुणग्राहकु ।
अहंता नाडळे जेथें । तेथें आनंद होतसे ॥ ९ ॥

---

१ जगांत बहुधा स्वार्थबुद्धिपोटांत ठेवणारे मित्र फार आढळतात, निरपेक्ष मित्र विरळ. २ काकापुरता मामा, ताकापुरती आजीबाई. ३ मनांत कपट, संशय. ४ यत्न करणारांचा, उद्योगी पुरुषांचा.

## ( १३ ) सत्संग व त्यापासून सद्गति.

आलया संसारीं स्वहित विचारीं । येकभावें धरीं संतसंग ॥ १ ॥
संतसंग धरी धन्य तो संसारीं । बोलिले श्रीहरि भागवतीं ॥ २ ॥
भागवतगीतासारनिरूपण । त्याचें विवरण संतसंगें ॥ ३ ॥
प्रयासें साधितां कदा न ये हाता । तें लाभे तत्वता संतसंगें ॥ ४ ॥
आहे एक देव परी तो कळेना । जयासी मिळेना संतसंग ॥ ५ ॥
संतसंगें ब्रह्मपद वोळखावें । विवेकें पावावें निरंजना ॥ ६ ॥
येकायेकी देव निर्मळ निश्चळ । आंतुडें प्रांजळ दुजेंवीण ॥ ७ ॥
दुजेंवीण देव येकला येकट । उभा घनदाट मागेंपुढें ॥ ८ ॥
मागेंपुढें सर्व देवांचा नायक । सांपडे विवेक जालियानें ॥ ९ ॥
जालियानें कृपा संतसज्जनांची । मग विवेकाची वाट फुटे ॥ १० ॥
विवेकाचा मार्ग विवेकें चालावा । मनाचा त्यागावा सर्वसंग ॥ ११ ॥
संगत्याग करीं पावसी श्रीहरी । परी येक धरीं संतसंग ॥ १२ ॥
संतसंगेंवीण त्याग हा घडेना । श्रीहरी पडेना कदा ठाईं ॥ १३ ॥
नाना कर्मीं देव चुकोनी राहिला । सज्जनीं पाहिला अनुभवें ॥१४॥
आलया रे साधु जाणावा कवणें । तयाचीं लक्षणें असंख्यातें ॥१५॥
असंख्यातें परी वोळखीकारणें । साधु पूर्णपणें सारिखाचि ॥ १६ ॥
सारिखाचि दिसे जनाचियेपरी । परी तो अंतरीं वेगळाचि ॥ १७ ॥
वेगळाचि ज्ञानें पूर्ण समाधानें । स्वस्वरूपीं मनें वस्ती केली ॥१८॥
वस्ती केली मनें निर्गुणीं सर्वदा । मीपणें आपदा तया नाहीं ॥१९॥
तया नाहीं काम तया नाहीं क्रोध । तया नाहीं खेद स्वार्थबुद्धि ॥२०॥
बुद्धि निश्चयाची स्वरूपीं जयाची । कल्पना ठाईंची निर्विकल्प ॥२१॥
दंभ हा लोकिकीं विवेकें सारिला । दुरी घोसंडिला अहंकार ॥ २२ ॥
अहंकार नाहीं दुराशा अंतरीं । ममता हे दुरी मोकलिली ॥ २३ ॥
लोलंगता नसे ज्ञानें धालेपणें । ऐसीं हें लक्षणें सज्जनाचीं ॥ २४ ॥

समाधान शांति क्षमा आणि दया । रंक आणि राया सारिखाचि॥२६
सारिखाचि बोध तेथें नाहीं खेद । सर्वांसी अभेद सर्व काळ ॥२७॥
सर्व काळ गेला श्रवणमनानें । सत्क्रिया भजनें हरिभक्ती ॥ २८ ॥
हरिभक्ति करी जन ताराचया । स्वधर्म विलया जाऊं नेदी ॥ २९ ॥
भक्तिभावें देवप्रतिष्ठ पूजन । कथानिरूपण महोत्साव ॥ ३० ॥
लोकाचार करी तो जनां उद्धरीं । ज्ञाता अनाचारी कामा न ये॥३१॥
क्रियाभ्रष्ट तेणें लोकिका सोडावें । आणि वसवावें ब्रह्मारण्य ॥ ३२ ॥
ब्रह्मारण्य सेवी तो साधु एकला । जनां नाहीं आला उपेगासी ॥३३॥
उपेगासी येणें जनां पूर्णपणें । तयाचीं लक्षणें निरोपिलीं ॥ ३४ ॥
नको निंदूं शास्त्र नको निंदूं वेद । तरीच स्वानंद पावसील ॥ ३५॥
पावसील राम जीवांचा विश्राम । अहंतेचा श्रम सांडितांचि ॥ ३६ ॥
पावसील गति शुद्ध निरूपणें । रामदास म्हणे क्षमा करी ॥ ३७ ॥

—स्फुट ओव्या, शतक तिसरें.

## ( १४ ) ग्रंथिचा अर्थ काढा !

बरा प्रत्ययें ग्रंथिचा अर्थ काढा । प्रसंगीं तुम्ही ग्रंथिचा अर्थ काढा ।
करी मोकळा ग्रंथिंचा अर्थ काढा । पदें तीन ये ग्रंथिंचा अर्थ काढा ॥१

## ( १५ ) मुलांस शिकवण.

बरें सत्य बोला, यथातथ्य चाला । बहू मानिती लोक तेणें तुम्हांला ।
धरा बुद्धि पोटीं विवेकी मुलें हो । बरा गूण तो अंतरामाजि राहो ॥१॥
बरें दांत घासोनिया तोंड धोवें । कळाहीन कीं शूद्रमूखी नसावें ।

१ आपल्या प्रत्ययानें स्वानुभवानें ग्रंथांतला अर्थ समजून घ्या हा पहिला अर्थ; प्रसंग लहानथोर प्राप्त होईल त्या मानानें गांठीचे पैसे खर्च करा हा दुसरा अर्थ; व संसारबंधांतून मोकळें करील अशा प्रकारें हृदयग्रंथि उकला असा तिसऱ्या चरणाचा अर्थ. २ शिस्तीनें, न्यायानें. ३ चांगले गुण चित्तांत सांठवून घ्या. ४ धुवावें. ५ किंवा.

सदासर्वदा प्रेत्न सांडूं नको रे । बहूसालें हा खेळ कामा न ये रे ।।२।।
दिसामाजि कांहीं तरी तें ल्याहावें । प्रसंगें अखंडीत वाचीत जावें ।
वयें श्रेष्ठ रे दास्य त्याचें करावें । बरें बोलणें सत्य जीवीं धरावें ।।३।।
बहू खेळ खोटा सदालैस्य खोटा । समस्तांसि भांडेल जो तोचि खोटा ।
हिसेबीं सदा न्याय सांडूं नका रे । कदाचीत अन्याय होतां धका रे ।।४
प्रचीतीविणें बोलणें व्यर्थ वायां । विवेकेंविणें सर्वही दंभ जाया ।
बहू सज्जला नेटका साजै केला । विचारेंविणें सर्वही व्यर्थ गेला ।।५।।
भला रे भला बोलती तें करावें । बहुतां जनांच्या मुखें येश घ्यावें ।
पुढें सेवटीं सर्व सांडून जावें । मरावें परी कीर्तिरूपें उरावें ।। ६ ।।

## ( १६ ) वक्ता आणि श्रोता.

### १ वक्ता

जें वक्तयाचीं लक्षणें । अत्युत्तम सुलक्षणें ।
क्रिया पालैटे निरूपणें । श्रोतयांची ।। १ ।।
जैसें बोलणें तैसीच क्रिया । ऐसा वक्ता जोडलिया ।
तत्काळ बाणें श्रोतया । अंगीं निरूपण ।। २ ।।
वक्ता पाहिजे उदास । जयाचें बोलणें नैराश्य ।
जया हृदयीं वसे आस । तो वक्ता नको ।। ३ ।।
जो आशंका फेडूं जाणे । जाणपणें हुंबरूं नेणे ।
श्रोतयांचे शब्दगुणें । साहे विवेक ।। ४ ।।
सर्व काळ क्रोधें संतप्त । आशंका घेतां करी घात ।
वक्तृत्वाचा अर्थ जात । भलतीकडे ।। ५ ।।
एक विश्वासें बोलताचि राहे । नेत्र भोवंडोन क्रोधें पाहे ।
दुसऱ्याचें वक्तृत्व न साहे । आपणापुढें ।। ६ ।।

---

१ सर्व काळ, पुष्कळ. २ सर्वदा आळस. ३ शृंगार. ४ ज्याचें व्याख्यान एकून श्रोत्यांची क्रिया पालटते तो उत्तम वक्ता होय.

कोल्हाळ उठिला एकसरा । केला पुस्तकांचा घुस्मारा[१] ।
थोर तवकें[२] राजद्वारां । महापुरुष निघाले ॥ ७ ॥
ऐसे क्रोधी अनावर । देहबुद्धीचे पामर ।
ऐसियांचें वक्तृत्व चतुरें । वमनप्राय त्यजावें ॥ ८ ॥
वक्ता पाहिजे अनुभवाचा । ज्ञाता नसावा पुस्तकींचा ।
पुस्तकज्ञानें श्रोतयांचा । भ्रम तुटेना सर्वथा ॥ ९ ॥
भिडे सांडूनि वर्म चुकावी । हितार्थ[३] पोटस्थ चुकवी ।
कुशल वक्ता तोचि उगवी[४] । श्रोतयांसी ॥ १० ॥
वक्ता निरभिमानी भेटे । तरी श्रोतयांचा अभिमान तुटे ।
उभय-अभिमान विटे । प्रांजळ निरूपणीं ॥ ११ ॥
जो समाधानी वक्ता । तयासि निरूपणीं समता ।
आपुली पारखी विभक्तता । नाहींच जयासी[५] ॥ १२ ॥
असो वक्ता आशारहित । तयाचेंचि वक्तृत्व विहित ।
दुराशा धरी जयाचें चित्त । तो वक्ता नको ॥ १३ ॥
आतां असो सद्गुरुवीण । पोटस्थ शिकवील कोण ? ।
समदृष्टि जयाची पूर्ण । ऐसा तो विरळा ॥ १४ ॥

## २ श्रोता.

आतां श्रोतयाचा विचार । श्रोता पाहिजे सादर ।
मननशील सारासार । विवेक निवडी ॥ १५ ॥
श्रोता आदरें श्रवण करी । तेणें उचंबळे आनंदलहरी ।
श्रोते वक्ते अर्थांतरीं । मिळोनि जाती ॥ १६ ॥
मुखाकडे लक्षी आदरें । बाहेर निघतांच उत्तरें ।

१ गोंधळ. २ आवेशानें. ३ स्वतःचा स्वार्थ साधण्यासाठीं खरें रहस्य चोरून ठेवतो. ४ सोडवितो. ५ आपले व परावे असा भेद नाहीं.

प्राशन करी कर्णद्वारें । विवेंरी स्वयें ॥ १७ ॥
भिक्षुक देशावरी सादर । कां व्यापारी मिळतां व्यापार ।
कां भुसारी मिळतां भुसार । मापासमयीं ॥ १८ ॥
कां जिवलगाची ऐकतां वार्ता । अत्यंत श्रवणीं सादरता ।
कां न्यून बोलत असतां । सादरें ऐके ॥ १९ ॥
कां शूद्र शेतीं सांचैळ पाहे । कान देऊन उभा राहे ।
श्वासोच्छ्वास दीर्घ वाहे । म्हणोनि कोंडी बळें ॥ २० ॥
असो संसारीं सादरता । तैसीच करी श्रवण होतां ।
तोचि येक धन्य श्रोता । होय निरूपणीं ॥ २१ ॥
संसारविषयीं तत्पर । आणि श्रवण होतां अनादर ।
तो श्रोता नव्हे खर । मनुष्यवेषें ॥ २२ ॥
अविद्या आणि फुगारा । धरितां जाणिवेचा गारों ।
बाष्कळ बोलोनि मातेरें । करी निरूपणाचा ॥ २३ ॥
वक्ता बहुभाष वाचाळ । तैसाचि श्रोताही तोंडाळ ।
दोहीं मिळोनि खळखळ । उदंड करिती ॥ २४ ॥
एकापुढें एक बोले । अवघेचि वक्ते जाले ।
जैसे ते जंबुँक मिळाले । कोल्हाळ करिती ॥ २५ ॥
जें जें निरूपण ऐकती । तें तें पुढिलांसी सांगती ।
बहुतेक सांगणें ! चित्तीं । विरळा धरी ॥ २६ ॥
जागृतीस नाहीं ठाव । जैसे डुलती महानुभाव ।
मनीं मांडिला उत्सव । सुखानिद्रेचा ॥ २७ ॥
निद्रा अज्ञानाची साउली । निद्रा भ्रांतीची माउली ।
निद्रा निरूपणीं केली । विवशी ईश्वरें ॥ २८ ॥

---

१ स्वत: मनन करितो. २ दुसऱ्याचे दोष. ३ सांचल म्ह. चाहूल. ४ गर्व. ५ विघ्न. ६ नाश. ७ कोल्हे.

निद्रा प्रकाशासी झांपडी । निद्रा विवेकासी विघडी ।
निद्रा नागवण उघडी । साधकासि होय ॥ २९ ॥
जो सादर अर्थांतरीं । तयासी निद्रा काय करी ।
जनीं निःसंग दरिद्री । तयासी बाधी ॥ ३० ॥
जो संसारें तापला । जो स्वहितासी प्रवर्तला ।
तोचि श्रोता लाधला । परम गुह्य ॥३१॥ (जुना दा.स.३)

## ( १७ ) आपणच दोषी म्हणून निंदा होते !

( १ )

जन आणि जनार्दन । यांसी नाहीं भिन्नाभिन्न ।
म्हणोनियां जनांपासून । अनृत न घडे ॥ १ ॥
जन सत्यचि बोलती । जैशास तैसाचि म्हणती ।
गुण असतां ऐकोनि चित्तीं । कां पा दुश्चित व्हावें ? ॥ २ ॥
जरी जनें बाष्कळ म्हणावीं । नसतीच करिती उठाठेवी ।
तरी मिथ्या जाणोनि जीवीं । आपण क्रासया धरावी ॥ ३ ॥[1]
तुझे ठायीं नाहीं विश्वास । आणि जनांस ठेविसी गुणदोष ।
वादविवाद करूनि साधकास । देहबुद्धि धरिसी ॥ ४ ॥
जन बोलती याचि भावें । जे तुवां देहबुद्धि म्हणावें ।[2]
निंदा जाणोनियां जावें । आपुलिया निजभावा ॥५॥ जु.दा.स.१७

## (१८) परमार्थबुद्धीला निंदा उपकारक आहे.

( १ )

माझ्या देहासी मान व्हावा । मज अवघींच नमस्कार करावा ।

---

१ लोक बाष्कळ, उगाच दुसऱ्याची उठाठेव, निंदा करितात, असें म्हणावें तर त्यांची निंदा वृथा आहे असें जाणून आपण ती मनावरच घेऊं नये.
२ आपली देहबुद्धि गेली नाहीं असें तूं ओळखावेंस व स्वहित साधावेंस याच हेतूनें लोक बोलतात !

नमस्कार न करितां यावा । क्रोधाचा आवरेना ॥ १ ॥
विदेहाचा आधार ध्यावा । आणि देह आपुला मानावा ।
स्तुति बरी वाटे जीवा । देहाची होतां ॥ २ ॥
जरी देह हा निंदिला । तरी काय परमार्थ बुडाला ? ।
जवळून विवेकाला । देशधडीं केलें ? ॥ ३ ॥
बोलणें कठिण ऐकिलें । कीं तें वाईट लागलें ।
मुखश्रीचें चिन्ह पालटलें । ते देहबुद्धि नव्हे ? ॥ ४ ॥
कासया सांगतां परमार्थगोष्टी । व्यर्थ करितां कपाळकुटी ।
वृंदावनफळासारखें पोटीं । काळकूट भरलें असे ! ॥ ५ ॥
स्तुति होतां आनंदला । तो निंदा होतां रडला ।
या दोहींमध्यें न सांपडला । तोचि धन्य ॥६॥ (जु.दा. स.११)

( २ )

स्थूळाचें पांगिलें नसावें । होईल तैसें कौतुक पहावें ।
आपण निंदेसी न प्रवर्तावें । आदरेंकरूनी ॥ ७ ॥
जेणें हा देह निंदावा । तो आपुला आप्त जाणावा ।
तो निंदक वानावा । विवेकबळें करूनियां ॥८॥(जु.दा. स.१२)

## ( १९ ) निंदा आणि निंदक

नरें मत्सरें पामरें पापरूपें । अती कर्कशें जल्पती वागजल्पें ।
तया वाजटा मर्कटा कोण पूसे । सदा सर्वदा भुंकती श्वान जैसे ॥१॥
म्हणे ' वंद्य मी, निंद्य सर्वै पराचे ' । तया कश्मलालागिं रे काय ठावें ।
भल्यानें जनीं आपनिंदा करावी । नको रे नको व्यर्थ निंदा परावी ॥२॥
स्वयें निंद्य तूं निंदसी कोणकोणा । जनीं सर्व संसार हा दैन्यवाणा ।

---

१ आवेश, वेग. २ मी देहातीत ब्रह्म असें तोंडानें म्हणावें आणि देहबुद्धि त्यागूं नये म्ह. आत्मस्तुति आवडावी, या विसंगतपणास काय म्हणावें ? ३ देहबुद्धीचें विष. ४ हितकर्ता, मित्र.

देह मात्र हा निंद्य तूला कळेना। सदासर्वदा ताठ तूझा गळेना॥ ३॥
देहे निंद्य हा वंद्य होईल कैसा ? म्हणोनी नको मान्यतेची दुराशा।
देहे वंदितां निंदितां निंद्य आहे। म्हणोनी देहातीत होउनि राहे॥४॥
जनीं निंदितां सूटला कोण आहे। जना सर्वदा सर्व निंदून राहे।
जया वर्णितां शीणली वेदवाणी। जनें निंदिला राम कोदंडपाणी॥५
देहेबुद्धि तों ज्ञान कांहीं पहावें। देहे नीरसावें नसावें नसावें।
देहातीत आनंत शोधीत जावा। वृथा गर्व हा सर्व मागें त्यजावा॥६

## ( २० ) नाहीं आणि आहे!

विलगट[1] हट नाहीं चाट मोकाट[2] नाहीं।
खटपट झट नाहीं सर्वथा गर्व नाहीं॥
निपट कपट नाहीं कोप आरोप नाहीं।
चटपट चट नाहीं व्यर्थ ग्रामण्य[4] नाहीं॥ १॥
भजनपुजन आहे ज्ञानवैराग्य आहे।
बहुत श्रवण आहे धारणा सिद्ध आहे॥
सदय हृदय आहे पुण्य कारुण्य आहे!
विवर विवरताहे गूणसंपन्न आहे॥ २॥

## ( २१ ) अपूर्व भाऊबंदकी!

( समर्थ व समर्थांचे वडिल बंधु श्रेष्ठ हे उभयतां एका निष्काम पिंडाचे म्ह० निस्सीम रामभक्त होते. त्यांच्या घराण्यांत नऊ पिढ्या रामभक्ति चालली असून वडिलांनीं रामोपासना उत्कृष्ट केली होती. उपासनारूप वडिलार्जित संपत्तींत आम्हीं उभय बंधूंनीं वारसा हक्क चालविला, दादांना सर्व संपत्तीचा लोभ सुटला होता. पण मी पोरपणींच इतर नश्वर संपत्ति सोडून सर्व सुखमय रामाच्या भजनीं लागून उधळलों, म्ह०घराबाहेर पडलों, असें समर्थांनीं पुढील अभंगांत विनोदानें म्हटलें आहे! समर्थ सांगतात कीं आमच्या घराण्याची ही पूर्वापार रीतच आहे!! )

१ लोकसमुदायापासून तोडणारा हटवादीपणा. २ चावट व स्वच्छंदाचारी. ३ कार्यांचा गोंधळ. ४ गांवगुंडपणा.

### अभंग

आमचे वंशीं आत्माराम । एका पिंडीचे निष्काम ॥ १ ॥
रामदास्य आलें आतां । अवघा वंश धन्य आतां ॥ ध्रु. ॥
बापें केली उपासना । आम्ही लाधलों त्या धना ॥ २ ॥
बंधु अभिलाषा टकला । वाटां घेउनि भिन्न झाला ॥ ३ ॥
पोर सकळां संकोचलें । एका सुखा उधळलें ॥ ४ ॥
रामीरामदासी स्थिति । पाहिली वडिलांची रीती ॥ ५ ॥

## ( २२ ) मोहनिद्रेची झांपड

### १ ओव्या

संसार हाचि दीर्घ स्वप्न । लोभें [1]वोसणेती जन ।
माझी कांता माझें धन । कन्या पुत्र माझें ॥ १ ॥
ज्ञानसूर्य मावळला । तेणें प्रकाश लोपला ।
अंधकारें पूर्ण जाला । ब्रह्मगोळ अवघा ॥ २ ॥
देहबुद्धि-अहंकारें । निजेले घोरती घोरें ।
दुःखें आक्रंदती थोरें । विषयसुखाकारणें ॥ ३ ॥
निजेले असतांच मेले । पुन्हा उपजतांच निजेले ।
ऐसे आले आणि गेले । बहुत लोक ॥ ४ ॥
निद[2]सुरपणेंचि सैरा । बहुतीं केल्या येरझारा ।
नेणोनियां परमेश्वरा । भोगिले कष्ट ॥ ५ ॥
तया कष्टाचें निरसन । व्हावया पाहिजे आत्मज्ञान ।
म्हणोनि हें नि[3]रूपण । अध्यात्मग्रंथ ॥ ६ ॥

### २ पद

प्रपंच पडदा पडली झांपड । राम दिसेना डोळां रे ॥ ध्रु. ॥
दिवसां निजुं निजु रात्रीं निजुं निजु । निजानिज व्यर्थची गेलें रे ॥ १ ॥
दिवसां झोपीं रात्रीं झोपीं । झोपेन दिधला टोला रे ॥ २ ॥

१ बरळतात. २ झोपाळूपणांत. ३ हा अध्यात्मग्रंथ ( दासबोध ).

रामदास म्हणे व्यर्थचि गेलें । सार्थक नाहीं केलें रे ।। ३ ।।

## ( २३ ) त्रिगुणांचे धर्म.

मुळीं देह त्रिगुणाचा । सत्वरजतमाचा ।
त्यामध्यें सत्वाचा । उत्तम गुण ।। १ ।।
सत्वगुणें भगवद्भक्ती । रजोगुणें पुनरावृत्ति ।
तमोगुणें अधोगति । पावती प्राणी ।। २ ।।

### १ रजोगुण.

माझें घर माझा संसार । देव कैचा आणिला थोर ।
ऐसा करी जो निर्धार । तो रजोगुण ।। ३ ।।
बरें खावें बरें जेवावें । बरें ल्यावें बरें नेसावें ।
दुसऱ्याचें अभिलाषावें । तो रजोगुण ।। ४ ।।
माता पिता आणि कांता । पुत्र सुना आणि दुहिता ।
इतुकियांची वाहे चिंता । तो रजोगुण ।। ५ ।।
माझा देश माझा गांव । माझा वाडा माझा ठाव ।
ऐसी मनीं धरी हांव । तो रजोगुण ।। ६ ।।
नेणोनियां परमात्मा । सकळ पदार्थीं प्रेमा ।
बळात्कारें घाली जन्मा । तो रजोगुण ।। ७ ।। (द.२, स.५)

### २ तमोगुण.

संसारीं दुःखसंबंध । प्राप्त होतां उठे खेद ।
का अद्भुत आला क्रोध । तो तमोगुण ।। ८ ।।
अखंड भ्रांती पडे । केला निश्चय बिघडे ।
अत्यंत निद्रा आवडे । तो तमोगुण ।। ९ ।।
युद्ध देखावें ऐकावें । स्वयें युद्धाचि करावें ।

१ त्रिगुणाचें सविस्तर वर्णन गीतेच्या १४ व्या अध्यायांत व त्यावरील ज्ञानेश्वरीभाष्यांत पहावें. २ पुनर्जन्म, जन्ममृत्यूच्या येरझारा. ३ मोडतो.

मारावें कीं मरावें । तो तमोगुण ॥ १० ॥
ब्रह्मवृत्तीचा[1] उच्छेद । जीवमात्रांस देणें खेद ।
करूं आवडे प्रमाद । तो तमोगुण ॥ ११ ॥
उगेंचि खावें उगेंचि असावें । स्तब्ध होऊन बैसावें ।
कांहींच स्मरेना स्वभावें । तो तमोगुण ॥ १२ ॥
देवाची जो निंदा करी । तो आशाबद्ध अघोरी ।
जो संतसंग न धरी । तो तमोगुण ॥१३॥ (द.२, स.६)
व्हावया जन्माचें खंडण । पाहिजे तो सत्वगुण ।
तेंचि असे निरूपण । पुढिले संमासीं ॥ १४ ॥

३ सत्त्वगुण.

संसारदुःख विसरवी । भजनक्रिया उपजवी ।
भक्तिमार्ग विमळ दावी । तो सत्वगुण ॥ १५ ॥
ईश्वरीं प्रेमा अधिक । प्रपंच संपादणें लौकिक ।
सदा सान्निध विवेक । तो सत्वगुण ॥ १६ ॥
स्नानसंध्या पुण्यशीळ । अभ्यंतरींचा निर्मळ ।
शरीर वस्त्रें सोज्वळ । तो सत्वगुण ॥ १७ ॥
तिथि पर्व महोत्सव । तेथें ज्याचा अंतर्भाव[2] ।
काय वाचा मनें सर्व । अर्पी तो सत्वगुण ॥ १८ ॥
देहाभिमान गळे । विषयीं वैराग्य प्रबळे ।
मिथ्या माया ऐसें कळे । तो सत्वगुण ॥ १९ ॥
सर्व काळ उदासीन । नाना भोगीं विटे मन ।
आठवे भगवद्भजन । तो सत्वगुण ॥ २० ॥
अंतरीं स्फूर्ति स्फुरे । स्वस्वरूपीं तर्क भरे ।
नष्ट संदेह निवारे । या नांव सत्वगुण ॥ २१ ॥

१ ब्राह्मणांच्या जहागिरी, वतनें वगैरे जप्त करणें. २ प्रेम, आवड.

शांति क्षमा दया । निश्चय उपजे जया ।
सत्वगुण जाणावा तया । अंतरीं आला ॥ २२ ॥
आश्रमीं अन्नाची आपदा । परी विमुख[१] नव्हे कदा ।
शक्त्यनुसार दे सर्वदा । तो सत्वगुण ॥ २३ ॥
होणार तैसें होत जात । प्रपंचीं जाला आघात ।
डळमळीना ज्याचें चित्त । तो सत्वगुण ॥ २४ ॥
आपकार्याहून[३] जीवीं । परकार्यसिद्धि करावी ।
मरोन कीर्ति उरवावी । तो सत्वगुण ॥ २५ ॥
नीच उत्तर साहणें । प्रत्युत्तर न देणें ।
आला क्रोध सावरणें । तो सत्वगुण ॥ २६ ॥
अन्यायेंविण गांजिती । नानापरी पिडा करिती ।
तितुकेंही सांठवी चित्तीं । तो सत्वगुण ॥ २७ ॥
संत देखोनि धांवे । परम सुखें हेलावे ।
नमस्कारी सर्व भावें । तो सत्वगुण ॥ २८ ॥
आवडे पुण्यसंस्कार । प्रदक्षिणा नमस्कार ।
जया राहे पाठांतर । तो सत्वगुण ॥ २९ ॥
आतां असो हें बहुत । देवधर्मीं ज्याचें चित्त ।
भजे कामनारहित[४] । तो सत्वगुण ॥३०॥ (द.२, स.७)

## (२४) देह-देवालयांतला देव–अंतरात्मा.

देहदेवालयांमध्यें । पाहणें देव तो बरा ।
देव सांडूनि देवाल्यें[५] । वर्णिती सर्वही कवी ॥ १ ॥
अनंतकोटि देवाल्यें । त्यांमध्यें येकला प्रभु ।

१ ददात. २ याचकास ना म्हणत नाहीं. ३ स्वतःच्या कार्याहून. ४निष्काम.
५ देवालयें. अंतरात्म्याला सोडून भौतिक देहांचेंच कौतुक शाहणेही गातात.

दीपानें दिसेना नाहीं । त्यानें त्यासाचि पाहेणें ॥ २ ॥
दिसेना लोचनाला रे । घाला रे मन त्यामध्यें ।
कदा हातासि लागेना । सर्वथा पूजितां न ये ॥ ३ ॥
पूजितां सर्व देवाल्यें । तेणें तो तृप्त होतसे ।
देव वर्णील तो ज्ञाता । ज्ञानें मोक्षाचि पावतो ॥ ४ ॥
देव तो येक, देवाल्यें । अनेक दिसती पहा ।
भेद देवालयांमध्यें । अभेदें देव पाहतां ॥ ५ ॥
थोर देवाल्य मुळींचें । ईश्वरु जगदीश्वरु ।
देवदेव्यी बहूरूपा । अर्धनारीनटेश्वरु ॥ ६ ॥
त्यांपुढें तीन देवाल्यें । ब्रह्मा विष्णु महेश्वरु ।
तया अभ्यंतरीं देवो । तो देव सत्य जाणिजे ॥ ७ ॥
जड तें सर्व देवाल्यें । देव तो चंचळु असे ।
निश्चळू निर्विकारी तो । मुख्य देव निरंजनु ॥ ८ ॥

## ( २५ ) जाणता

जाणतां दरिद्रें जाती । जाणतां रोग भंगती ।
जाणते जिंकिती युद्धें । नेणते मोडती सदा ॥ १ ॥
खऱ्या नाण्यापुढें खोटें । कोठेंचि न चले जनीं ।
मूर्ख ते ठकवी घेती । जाणते तें सिवेचिना ॥ २ ॥

## ( २६ ) अर्थ समजून गावें.

अर्थ सर्वत्र शोधावा । रोधावा आपुला मनु ।
लोक सर्वत्र बोधावा । यथातथ्य प्रचीतिनें ॥ १ ॥

---

१ तो होऊनच त्याला पहावें. २ प्राणिमात्र सुखवाल तर तो देव संतोष पावेल. ३ एकच. ४ मूळमायेचें. ५ शिवशक्ति. ६ मूळमायेनंतर त्रिगुणांचे देव. ७ देह सारे जड, देव म्ह. अंतरात्मा तो चंचळ व मुख्य देव निर्गुण निरंजन. पहिले दोन नाशवंत, तिसरा शाश्वत. ८ अपेश पावतात, बुडतात. ९ मन आवरावें.

मापटें मोजितें दाणे । तैसें सीकोन गातसे [१] ।
अंत्यज वाहती द्रव्यें । अर्थसंबंध नाढळे ॥ २ ॥
इरसाल [२] वाहती आंबे । भोक्तव्य न घडे कदा ।
समजल्यावीण तें वोझें । पोटासाठींच वाहती ॥ ३ ॥
उमजणें समजणें आधीं । प्रवृत्तिनिवृत्तीकडे ।
भाग्यश्री मोक्षश्री होते । विवरतां विवरतां पुढें ॥ ४ ॥

## ( २७ ) मूर्ख आणि पढतमूर्ख.

### १ मूर्ख

जन्मला जयाचे उदरीं । तयांसी जो विरोध करी ।
सखी मानिली अंतुरी [३] । तो येक मूर्ख ॥ १ ॥
सांडून सर्वही गोत । स्त्रीआधीन जीवित ।
सांगे अंतरींची मात । तो येक मूर्ख ॥ २ ॥
परस्त्रीसी प्रेमा धरी । श्वशुरगृहीं वास करी ।
कुळेंवीण [४] कन्या वरी । तो येक मूर्ख ॥ ३ ॥
आपली आपण करी स्तुति । स्वदेशीं भोगी विपत्ति ।
सांगे वडिलांची कीर्ति । तो येक मूर्ख ॥ ४ ॥
मान अथवा अपमान । स्वयें करी परिच्छिन्न [५] ।
सप्तव्यसनीं [६] जयाचें मन । तो येक मूर्ख ॥ ५ ॥
धरून परावी आस । प्रेत्न सांडी सावकास ।
निसुगाईचा [७] संतोष । मानी तो येक मूर्ख ॥ ६ ॥
घरीं विवेक उमजे । आणि सभेमध्यें लाजे ।
शब्द बोलतां निर्बुजे [८] । तो येक मूर्ख ॥ ७ ॥
औषध नेघे असोन व्यथा । पथ्य न करी सर्वथा ।

१ खजिना, पोतीं. २ उत्तम. ३ स्त्री. बाइलबुद्धि तो मूर्ख. ४ कुलशील पाहिल्याशिवाय. ५ उघड. ६ जारणमारणादि. ७ आळसाचा. ८ गोंधळतो.

न मिळे आलिंथा पदार्था । तो येक मूर्ख ॥ ८ ॥
आपणास जेथें मान । तेथें अखंड करी गमन ।
रक्षूं नेणे मानाभिमान । तो येक मूर्ख ॥ ९ ॥
देवलंड पितृलंड । शक्तीवीण करी तोंड ।
ज्याचे मुखीं भंडउभंड । तो येक मूर्ख ॥ १० ॥
स्वयें नेणे परोपकार । उपकाराचा अनुपकार ।
करी थोडें, बोले फार । तो येक मूर्ख ॥ ११ ॥
विद्या वैभव ना धन । पुरुषार्थ सामर्थ्य ना मान ।
कोरडाच वाहे अभिमान । तो येक मूर्ख ॥ १२ ॥
उंचीं जाऊन वस्त्र नेसे । चौबारा बाहेरी बैसे ।
सर्व काळ नग्न दिसे । तो येक मूर्ख ॥ १३ ॥
जिवलगास परम खेदी । सुखाचा शब्द तोही नेदी ।
नीच जनांस वंदी । तो येक मूर्ख ॥ १४ ॥
पुत्र कळत्र आणि दारा । इतुकाचि मानुनियां थारा ।
विसरोन गेला ईश्वरा । तो येक मूर्ख ॥ १५ ॥
परपीडेचें मानी सुख । परसंतोषाचें मानी दुःख ।
गेले वस्तूचा करी शोक । तो येक मूर्ख ॥ १६ ॥
वस्त्र शस्त्र दोनी नसे । उंच स्थळीं जाऊन बैसे ।
जो गोत्रजांसी विश्वासे । तो येक मूर्ख ॥ १७ ॥
अल्प अन्याय क्षमा न करी । सर्व काळ धारकीं धरी ।
जो विश्वासघात करी । तो येक मूर्ख ॥ १८ ॥

---

१ पानांत आलेले पदार्थ आवडून घेत नाहीं. २ लंड म्ह. न मानणारा भावशून्य. ३ अवाच्य शिवीगाळ. ४ अपकारानें फेड. ५ चव्हाटयावर देहधर्म करितो. ६ आश्रय. ७ वस्त्र—पांडित्याचें निदर्शक – व शस्त्र (रणवीराचें चिन्ह). ८ आप्तइष्टांवर विश्वास ठेवितो. ९ धारेवर धरितो, कडक वागवितो

लक्ष्मी आलियावरी । मागील बोळखी न धरी ।
देवीं ब्राह्मणीं सत्ता करी । तो येक मूर्ख ॥ १९ ॥ (द.२-१)

## २ पढतमूर्ख.

मागां सांगितलीं लक्षणें । मूर्खाअंगीं चातुर्य बाणे ।
आतां ऐका शाहाणे । असोनि मूर्ख ॥ २० ॥
तयां नांव पढतमूर्ख । श्रोतीं न मनावें दुःख ।
अवगुण त्यागितां सुख । प्राप्त होये ॥ २१ ॥
बहुश्रुत आणि व्युत्पन्न । प्रांजळ बोले ब्रह्मज्ञान ।
दुराशा आणि अभिमान । धरी तो पढतमूर्ख ॥ २२ ॥
मुक्तक्रिया प्रतिपादी । सगुणभक्ति उच्छेदी ।
स्वधर्म आणि साधन निंदी । तो येक पढतमूर्ख ॥ २३ ॥
जाणपणें भरीं भरे । आला क्रोध नावरे ।
क्रिया शब्दांस अंतरे । तो येक पढतमूर्ख ॥ २४ ॥
वक्ता अधिकारेंवीण । वक्तृत्वाचा करी शीण ।
जयाचें वचन कठिण । तो येक पढतमूर्ख ॥ २५ ॥
श्रोता बहुश्रुतपणें । वक्तयास आणी उणें ।
वाचाळपणाचेनि गुणें । तो येक पढतमूर्ख ॥ २६ ॥
दोष ठेवी पुढिलांसीं । तेंचि स्वयें आपणापासीं ।
ऐसें कळेना जयासी । तो येक पढतमूर्ख ॥ २७ ॥
नाहीं भक्तीचें साधन । नाहीं वैराग्य ना भजन ।
क्रियेवीण बोले ब्रह्मज्ञान । तो येक पढतमूर्ख ॥ २८ ॥

---

१ देव ब्राह्मण हें लवण्याचें–नम्र होण्याचें स्थान आहे. २ पढिकमूर्ख, शाहणे (विद्वान) असून मूर्ख. ३ शास्त्रमर्यादा सोडून स्वेच्छ वागणेंच योग्य म्हणतो. ४ शब्दाच्या उलट क्रिया करितो. ५ अधिकार म्ह. योग्यता नसतां. ६ कमीपणा. ७ इतरांस.

न मैनी तीर्थ, न मनी क्षेत्र । न मनी वेद, न मनी शास्त्र ।
पवित्र कुळीं जो अपवित्र । तो येक पढतमूर्ख ॥ २९ ॥
ज्ञान बोलोन करी स्वार्थ । कृपणाऐसा सांची अर्थ ।
अर्थेसाठीं लावी परमार्थ । तो येक पढतमूर्ख ॥ ३० ॥
परममूर्खांमाजी मूर्ख । संसारीं मानी सुख ।
या संसारदुःखा ऐसें दुःख । आणिक नाहीं ॥ ३१ ॥ (द. २-१०)

## ( २८ ) नटव्यांस उद्देशून !

शरीरवेष पालटे । परोपरी नटे नटे ।
परंतु काय साधलें ? । अगम्य कोण शोधिलें ? ॥ १ ॥
उदंड हो ! नका नका । समस्तही पडे चुका ।
गृहेंचि पाहतां वरी । परंतु कोण अंतरीं ? ॥ २ ॥
शरीरमात्र तें भलें । तयांत कोण शोभलें ? ।
न जाणतां नव्हे भलें । शिणोनि काय ऊगलें ? ॥ ३ ॥
समस्तदेहधारकु । समस्तसौख्यकारकु ।
बहू तनूंत येकला । परोपरी विभागला ॥ ४ ॥
कितेक ते भलेभले । तयामधेंच गुंतले ।
विचारसार जागवा । तुम्ही तुम्हांस उगवा ॥ ५ ॥

## ( २९ ) घरोघर कवि !

कविता गवताऐसी । उदंड वाढली असे ।
असेना दिसेना अर्थु । व्यर्थ व्यर्थचि स्वार्थ तो ॥ १ ॥

---

१ मानीत नाहीं. २ पैशासाठीं. ३ परोपरीचे वस्त्रालंकार अंगावर चढवून नटतो मुरडतो. ४ शरीररूप गृहाला बाहेरून भूषवितां, पण त्यांत नांदणारा व त्याला आंतून शोभा देणारा अंतरात्मा कसा आहे तें कां पहात नाहीं ? ५ त्यांत कांहींच अर्थ असत नाहीं; मग दिसणार कोठून ? ६ व्यर्थ खटाटोप.

## ( ३० ) भाविक आणि विवेकी.

भाविकें सात्विकें भोळीं । त्यां नामस्मरणें रती ।
विवेकी जाणते घेती । सारासारविचारणा ॥ १ ॥
तीर्थें व्रतें तपें दानें । भाविकां सुख होतसे ।
विवेकी जाणते घेती । सारासारविचारणा ॥ २ ॥
भाविकां प्रतिमापूजा । पुराणें माहात्म्यें शुभें ।
विवेकी जाणते घेती । सारासारविचारणा ॥ ३ ॥
मंत्रयंत्र जपध्यानें । भाविकें तोषती मनीं ।
विवेकी जाणते घेती । सारासारविचारणा ॥ ४ ॥
नाना नेम क्रिया निष्ठा । भाविकां बहु साधनें ।
विवेकी जाणते घेती । सारासारविचारणा ॥ ५ ॥
शोधितां अष्टही काया । पिंडब्रह्मांडुनायकु ।
पंचीकरणमहावाक्यें । सारासारविचारणा ॥ ६ ॥

## ( ३१ ) व्यवहारनीतिबोध.

वाट पुसिल्यावीण जाऊं नये । फळ वोळखिल्याविण खाऊं नये ।
पडिली वस्तु घेऊं नये । येकायेकीं ॥ १ ॥
अतिवाद करूं नये । पोटीं कपट धरूं नये ।
शोधिल्यावीण करूं नये । कुळहीन[2] कांता ॥ २ ॥
जनीं आर्जव[3] सोडूं नये । पापद्रव्य जोडूं नये ।
पुण्यमार्ग सोडूं नये । कदाकाळीं ॥ ३ ॥
वक्तयास खंडूं नये । ऐक्यतेसी फोडूं नये ।
विद्याअभ्यास सोडूं नये । कांहीं केल्या ॥ ४ ॥

---

१ विवेकी पुरुष सार कोणतें व असार कोणतें याचा विचार करून सार तेवढ घेतात व भाविक बाह्य साधनांत रमतात. २ हलक्या कुळांतील. ३ सरळपण

आळसें सुख मानूं नये । चाहडी[१] मनास आणूं नये ।
शोधिल्याविण करूं नये । कार्य कांहीं ॥ ५ ॥
सुखा अंग देऊं नये । प्रेत्न पुरुषें सांडूं नये ।
कष्ट करितां त्रासों नये । निरंतर ॥ ६ ॥
व्यापकपण सांडूं नये । पराधीन होऊं नये ।
आपलें ओझें घालूं नये । कोणीयेकासी ॥ ७ ॥
पत्रेंवीण[२] पर्वत[३] करूं नये । हीनांचें रिण घेऊं नये ।
गोहीविण[४] जाऊं नये । राजद्वारा ॥ ८ ॥
धूम्रपान[५] घेऊं नये । उन्मत्त[६] द्रव्य सेवूं नये ।
बहुचकासी[७] करूं नये । मैत्री कदा ॥ ९ ॥
चाहाडीचोरी करूं नये । परद्वार[८] करूं नये ।
मागें[९] उणें बोलों नये । कोणीयेकाचें ॥ १० ॥
स्नानसंध्या सांडूं नये । कुळाचार खंडूं नये ।
अनाचार मांडूं नये । चुकुरपणें[१०] ॥ ११ ॥
हरिकथा सांडूं नये । निरूपण तोडूं नये ।
परमार्थास मोडूं नये । प्रपंचबळें ॥ १२ ॥
सभा देखोन गळों नये । समयीं उत्तर टळों नये ।
धिक्कारितां चळों नये । धारिष्ट आपुलें ॥ १३ ॥
सत्यमार्ग सांडूं नये । असत्यपंथें जाऊं नये ।
कदा अभिमान घेऊं नये । असत्याचा ॥ १४ ॥ (द.२, स.२)

---

१ चुगली. २ कागद, लेख, डॉक्युमेंट. ३ देण्याघेण्याचा व्यवहार. ४ साक्षीशिवाय. ५ तंबाखू ओढणें. ६. मद्य, गांजा, अफू, भांग इ. माज आणणारे पदार्थ. ७ वोचक. ८ परस्त्रीसंग. ९ पाठीमागें. तोंडावर बोलावें. १० कुचरपणें.

## ( ३२ ) स्त्रियाही पराधीन व पुरुषही पराधीन !

### अभंग

स्त्रियांचें जिणें पराधीन जालें । पुरुषें विकिलें[1] आपणासी ॥ १ ॥
आपणा विकिलें या पोटाकारणें । पराधीनपणें सहजचि ॥ २ ॥
सहजचि जाले सर्व पराधीन । सत्याचि वचन दास म्हणे ॥ ३ ॥

## ( ३३ ) मीतूंपण सोडावें

### अभंग

तुजला तूं थोर मजला मी थोर । मी थोर तूं थोर कामा न ये ॥ १ ॥
कामा न ये कोणा अंगीं मीतूंपण । पहा थोरपण ईश्वराचें ॥ २ ॥
ईश्वराचें रूप पाहतां निवावें । मीतूंपण द्यावें सोडूनीयां ॥ ३ ॥
सोडूनीयां द्यावें तें काय आपणा । शाश्वताच्या खुणा पाहे बापा ॥४॥
पाहे बापा, देव कोण निरावेव । दास म्हणे भाव तेथें ठेवी ॥ ५ ॥

## ( ३४ ) अद्वैतचर्चा.

अद्वैतचर्चा कैसी करावी ? । चर्चेचि[2] ऐसी क्रीया धरावी ।
शब्दीं कळालाघव बोलिजेते । राहणी मयूरीपरि[3] नृत्य होतें ॥१॥
सगुणभक्ती विषयीं विरक्ती । स्वधर्म रक्षी येथानुशक्ती ।
सर्वांपरी दुल्लभ तोचि ज्ञाता । वाचाळता मायिक तत्वचिंता ॥२॥
अद्वैतचर्चा अतिश्लाघ्यवाणी । सांडूं नका रे वदलीं पुराणीं ।
अद्वैतशास्त्री ठेवा प्रभूचा । अलभ्य हा रे सकळांसि कैचा ? ॥३॥
अद्वैतचर्चा कंटाळवाणी । सांडूनि वर्णा कोदंडपाणी[4] ।
कैलासवासी[5] ठेवा प्रभूंचा । अलभ्य हा रे सकळांसि कैचा ॥४॥

---

१ नोकरीच्या निमित्तानें धन्यास विकिलें, म्ह. त्याचा अंकित जाला. २ बोलण्यासारखी. ३ मोराच्या नृत्याप्रमाणें, दांभिकपणाची. ४ धनुर्धर रामाला. ५ कैलासीं राहणाऱ्या शंकराचा.

अद्वैतचर्चा गुरुगम्य आहे । कळे म्हणे तो सहसा न लाहे ।
चोरूनि जागे हृदयीं अहंता । कळे म्हणे त्या न कळेचि भ्रांता[१].

## ( ३५ ) षड्रिपुवर्णन.

भल्यांसी वैर करताती । ते साही ओळखा बरे ।
षड्रिपु कामक्रोधादि । मदमत्सर डंभ[२] तो ॥ १ ॥
प्रपंच साहव्या वैरी । हे वैरी जिंकितां बरें ।
भल्यांसी लाविती वेढा[३] । परत्नमार्ग रुंधिलों[४] ॥ २ ॥

### १ काम.

काम उत्पन्न होताहे । ते वेळे नावरे जना ।
कामवेड जडे ज्याला । तो प्राणी आत्मघातकी ॥ ३ ॥
आपणा राखणें नाहीं । शुद्धि नाहीं म्हणोनियां ।
सभाग्य करंटे होती । वेश्येशीं द्रव्य नाशिती ॥ ४ ॥
व्याधीनें नासती अंगें । नासिकें झडती जनीं ।
औषधें दंतही जाती । रूपहाणी[५]च होतसे ॥ ५ ॥
रूपहाणी शक्तिहाणी । द्रव्यहाणी परोपरी ।
यातिहाणी कुळहाणी । सर्व हाणीच होतसे ॥ ६ ॥
विधीनें[६] विषया घ्यावें । अविधी नसतां बरें ।
आश्रमीं न्यायनीतीनें । प्रपंच करणें सुखें ॥ ७ ॥

### २ क्रोध.

कोप तो तामसी प्राणी । तमोगुणें अधोगती[७] ।
क्रोधानें करंटे केले । क्रोध चांडाळ जाणिजे ॥ ८ ॥

---

१ मला कळलें असें म्हणतो त्या भ्रांतास मुळींच कळलेलें नसतें. २ दंभ. ३ वेढा लावणें, ओढणें, खेचणें, जिंकणें. ४ बंद केला. ५ रूपाची हानि. ६ विधिपूर्वक विषयाचें सेवन. ७. 'अधो गच्छन्ति तामसाः' (गीता १४–१८)

कोपेंआरोपणा[1] खोटी । कोपें कोपाचि वाढतो ।
मोडतो मार्ग न्यायाचा । अन्याय प्रबळे बळें ॥ ९ ॥
क्रोध हा खेद संपादी । जेथें तेथें चहुंकडे ।
विवेक पाहतां कैचा । शुद्धि[2] तेथें असेचिना ॥ १० ॥
भल्यानें कोप सांडावा । शांतीनें असतां बरें ।
क्षुल्लकें कोप पाळावा । भल्याचें काम तों नव्हे ॥ ११ ॥

३ मद.

देहाचा मद शक्तीचा । द्रव्याचा मद अंतरीं ।
विद्येचा मद भाग्याचा । मदरूप बहुविधा ॥ १२ ॥
कळेना सृष्टि देवाची । बहुरत्ना वसुंधरा ।
मदाला नावडे कांहीं । सर्वही तुच्छ होतसे ॥ १३ ॥
वेद हो शास्त्र हो चर्चा । नीती हो न्याय हो न हो ।
आपणा पाहणें नाहीं । विरंचि[3] बोलिला तरी ॥ १४ ॥
चालणें थोर तें माझें । माझा मीच बहु भला ।
आपणापरतें नाहीं । सर्व कांहीं भूमंडळीं ॥ १५ ॥
देह गेलें बळ गेलें । द्रव्य गेलें येकीकडे ।
बंड गेलें थोर्बें[4] गेलें । येकला जातसे खळु ॥ १६ ॥

४ मत्सर.

मत्सरें सत्य मानेना । सत्याचें[5] लटिकें करी ।
बऱ्याचें वोखटें[6] सांगे । मज नाहीं म्हणोनियां ॥ १७ ॥
आपणु करंटा आहे । समर्था निंदितो सदा ।
आपणु टोणपा आहे । सर्वज्ञा न मनी[7] कदा ॥ १८ ॥

१ कोपावर आरूढ होणें, क्रोधवशता. २ स्वतःची शुद्धि, जागेपणा. ३ ब्रह्मदेवानें सांगितलें तरी स्वतःचा शोध घेत नाहीं. ४ स्तोम, भोंवतालच्या लोकांचा जमाव. ५ खऱ्याचें खोटें करितो. ६ भल्याचें वाईट सांगतो. ७ जाणत्याला मानीत नाहीं.

आपणु भ्रष्टला आहे । भल्याला भ्रष्ट भावितो ।
आपणु ठाइंचा लंडी । रणशूरांसि हांसतो ॥ १९ ॥
धीट तोंडाळ तो प्राणी । कांहीं केल्या विटेचिना ।
भक्ति ना ज्ञान ना कांहीं । अत्र परत्र नसे ॥ २० ॥
पाहतां सौख्य तों नाहीं । लोंद लाताड उद्धटु ।
मत्सरें लाविलें वेढा । ज्याचें त्याला कळेचिना ॥ २१ ॥

## ५ दंभ

मांसाचा मोधेळा याचा । दंभ तो कोण तो किती ? ।
साधका दंभ बाधीना । दुश्चिताला पछाडितो ॥ २२ ॥
वैराग्य पाहिजे अंगीं । उदास फिरती ळिळा ।
दंभ तो उडाला तेथें । लोलंगताचि खुटली ॥ २३ ॥
धन्य तो विवेकी राजा । वैराग्यबळ आगळें ।
भक्तीचा घोळला सिंधु । दंभ तेथें दिसेचिना ॥ २४ ॥

## ६ प्रपंच

प्रपंच साहवा वैरी । परत्र अंतरी दुरी[३] ।
अवघा तोचि तो जाला । तेणें देव दुरावला ॥ २५ ॥
पदार्थी बैसली बुद्धी । शुद्धि नाहीं परत्रिंची ।
प्रपंच सेवटीं गेला । गेला देहेच हातिंचा ॥ २६ ॥
कष्टला सेवटीं मेला । गेला प्रपंच हातिंचा ।
घातला मागुता जन्मा । ऐसा वैरी प्रपंच हा ॥ २७ ॥
घर गांव स्थान माझें । वाडे सेत मळे गुरें ।
कन्या पुत्र वधू माझी । सर्व सांडूनि चालिला ॥ २८ ॥
आधींच सर्व जाणावें । काय येतें समागमें ।

लबाड, लाथा मारणारा व उन्मत्त. २ गोळा. ३ परलोक दूर करतो.

निर्वाणीं अंतिचा देवो । कोण्हीयेकें चुकों नये ॥ २९ ॥
षड्रिपु जिंकिले जेणें । तोचि ज्ञानी महाभला ।
दीक्षेनें उद्धरी लोकां । वैरागी तो उदासीनु ॥ ३० ॥

## ( ३६ ) हरिकीर्तन

हरिदास आणि विरक्त । ज्ञाता आणि प्रेमळ भक्त ।
व्युत्पन्न आणि वादरहित । तरी ते अपूर्वता ॥ १ ॥
जयंत्यादिकें नानापर्वें । तीर्थें क्षेत्रें जे अपूर्वें ।
जेथें वसिजे देवाधिदेवें । सामर्थ्यरूपें ॥ २ ॥
पुढें असतां सगुणमूर्ती । निर्गुणकथा जे करिती ।
प्रतिपादून उच्छेदिती । तेचि पढतमूर्ख ॥ ३ ॥
निर्गुण नेलें संदेहानें । सगुण नेलें ब्रह्मज्ञानें ।
दोहींकडे अभिमानें । वोसें केलें ॥ ४ ॥
सगुणमूर्तीपुढें भावें । करुणाकीर्तन करावें ।
नानाध्यानें वर्णावें । प्रतापकीर्तीतें ॥ ५ ॥
ऐसें गातां स्वभावें । रसाळकथा वोढवे ।
सर्वांतरीं हेलावे । प्रेमसुख ॥ ६ ॥
लाज सांडून जनाची । आस्था सांडून धनाची ।
नीचै नवी कीर्तनाची । आवडी धरावी ॥ ७ ॥
मूर्ती नस्तां सगुण । श्रवणीं बैसले साधुजन ।
तरी अद्वैतनिरूपण । अवश्य करावें ॥ ८ ॥
नाहीं मूर्ती, नाहीं सज्जन । श्रवणीं बैसले भाविकजन ।
तरी करावें कीर्तन । प्रास्ताविक वैराग्य ॥ ९ ॥

---

१ हे दोन्ही गुण एकत्र सांपडणें दुर्घट, म्हणून अपूर्वता. २ ओस. निर्गुणीं निश्चय नाहीं व सगुणीं श्रद्धा नाहीं. दोहींकडे कोरडाच. ३ नित्य नवी.

शृंगारिक नवरसिक । यामध्यें सांडावें येक ।
स्त्रियादिकांचें कौतुक । वर्णूं नये कीं ॥ १० ॥
ध्यानीं गुंतलें मन । कैचें आठवेल जन !
निःशंक निर्लज्ज कीर्तन । करितां रंग माजे ॥ ११ ॥
छपन्न भाषा नाना कळा । कंठमधुर्य कोकिळा ।
परी तो भक्तिमार्ग वेगळा । भक्त जाणती ॥ १२ ॥
सांडून देव सर्वज्ञ । नादामध्यें व्हावें मग्न ।
तें प्रत्यक्ष विघ्न । आडवें आलें ! ॥ १३ ॥ (द.१४, स.५)

## ( ३७ ) अज्ञानापेक्षां पाखंड वाईट !

म्हणोनी अज्ञान तें बरें । परी नायकावीं पाखांड उत्तरें ।
मदलंड पाखांडी खरें । तेंचि खोटें करिती ॥ (जुना दा.स.१७)

## ( ३८ ) सांगणें नको, वागणें हवें !

आपण करून दाखवावें । तरीच दुसऱ्यास सांगावें ।
ठाकेना[२] तरी भलेसें रहावें । आपुले ठायीं ॥ १ ॥
झांकावें[३] आपणासी । आणि सिकवावें पुढिल्यांसी ।
ऐसा हा सकळ सृष्टीसी । दंडकचि[४] आहे ॥ २ ॥
म्हणोनी आपण क्रिया करावी । मग पुढिलांसी नलगे सांगावी ।
तुझी क्रिया देखोनि जीवीं । तेही तैसी करितील ॥ ३ ॥
जें दुसऱ्यांस सांगावें । तें तुवां स्वयेंचि करावें ।
ऐसें केलिया स्वभावें । समाधान सकळिकां ॥ ४ ॥
अरे ! पुढिल्यांचें तुज काय । तूं तों समाधानी होय ।
तुझें समाधान जालियां उपाय । जनांसी करणेंचि न लगे ॥५॥
(जुना दा. स. १७)

---

१ प्रस्तावा, अनुताप, यांनीं युक्त. २ हातून घडेना. ३ शोधूं नये.
४ पद्धतच पडून गेली आहे.

## ( ३९ ) गुरुगम्य.

विचारें बरा पाहतां तत्वझाडा । विवंचूनियां मीपणाचा निवाडा ।
मला शोधितां शोधितां मीच नाहीं । स्वभावेंचि आकारलें सर्व कांहीं ॥१
वरी शोधिली पिंडब्रह्मांडमाया । भजायासि म्यां पाहिलें देवराया ।
तया पाहतां मीच तद्रूप जालों । बहुसंग सोडून सूखें निवालों ॥२॥
नव्हे साध्य ना साधकु ज्ञेय-ज्ञाता । नव्हे बोध्य ना बोधकु ध्येय-ध्याता ।
नसे नांवरूपासि संकेत कांहीं । नसे जन्म ना मृत्यु कांहींच नाहीं ॥३॥
गुरुगम्य तें गौप्य तेथें पुसावें । म्हणे दास भावें नुरावें नुरावें ।
असावें परी सर्व कांहीं नसावें । कळेना तरी सज्जनाला पुसावें ॥४॥

## ( ४० ) इतिश्री

इतिश्री पुढें पंचभूतांसि होते । इतिश्री त्रिगुणांसि होऊनि जाते ।
इतिश्री समस्तांसि होणार आहे । इतिश्री नव्हे तोचि शोधूनि पाहे ॥१॥

## ( ४१ ) स्फुट श्लोक

सत्संगती ज्या नरांसि नाहीं । ते पापरूपी पडती प्रवाहीं ।
संदेह चित्तीं सहसा टळेना । सिद्धांत साधूविण आकळेना ॥ १ ॥
अनेक शास्त्रीं पाहतां पडेना । आयुष्य थोडें पाहणें घडेना ।
विश्वास येकें वचनीं धरावा । संसार हा दुस्तर नीरसावा ॥ २॥
सर्वत्र हें वैभव ईश्वराचें । अणुमात्र तेंही नाहीं जिवाचें ।
जन्मासि येतां उघडेंचि यावें । सेखीं जिवें सांडुनि सर्व जावें ॥३॥
उपासनेला दृढ चालवावें । भूदेवसंतांसि सदा लवावें ।
सत्कर्मयोगें वय घालवावें । सर्वांमुखीं मंगल बोलवावें ॥ ४ ॥

१ नाश, समाप्ति. २ तत्त्वमसि ह्या महावाक्यावर.

ब्रह्मादिकां मानस आवरेना । नाना उपायीं मरतां मरेना ।
तें निर्गुणीं पांगुळतां मरावें । निरूपणें मानस आवरावें ॥ ५ ॥
संसारमाया ममता नसावी । नैराश्यता दुर्लभ ते असावी ।
आनंदरूपीं भजनीं भरावें । निरूपणें मानस आवरावें ॥ ६ ॥
कळेना पुढें काय होणार आहे । कळेना देहे कोठपर्यंत राहे ।
कळेना मरावें स्वदेशीं विदेशीं । कळेना पुढें वेळ येईल कैसी ?॥७॥
बहू पाप होतांचि दारिद्र्य येतें । बहु पुण्य होतांचि तें भाग्य येतें ।
बरें कोण मानेल तैसें करावें । मनीं थोर प'होन हातीं धरावें ॥८॥
सदा मागता दास देवा न साहे । न मागे तयाची रमा दासि होये ।
असे आस तो दास जाला जगाचा । नसे आस तो ईश ब्रह्मादिकांचा॥९
अरे तूजपासीं तुझें तूं नसावें । मनांतील 'मी' सर्व कांहीं पुसावें ।
निराकार तूं मानि रे सत्यभावें । जनीं सर्वही होत जातें स्वभावें ॥१०

## ( ४१ ) बरें सर्व माझें ! !

बहू थोर मी, शूर मी, शाहणा मी । बहू दक्ष मी, धूर्त मी, जाणता मी
बहू नाटकु नेटकु चाळकू मी । बहूतांमधें मान्यसौजन्य तो मी ॥१॥
बहू बोलणें नीट नेमस्त माझें । बहू चालणें सत्य नेमस्त माझें ।
बहूसाल संगीत कर्तृत्व माझें । बहूतामधें गोड हें सर्व माझें ॥ २ ॥
बहू चांगली वांगली नेटकी मी । बहू जाणती जाण चातुर्य ते मी ।
बहू बोलकी चालकी सुग्रिणी मी । बहू भाग्य सौभाग्य लावण्य ते मी ॥
बहूतांमधें उंच तें कुळ माझें । बहूसाल हें गोजिरें मूल माझें ।
बहू सासुरें थोर माहेर माझें । बहू गोत माझें बरें सर्व माझें ॥ ४ ॥
मी माझें मी माझेंचि हें सौख्य वाटे । विटे गर्व काळांतरीं सौख्य आटे ।
म्हणे दास विश्वास हा कासयाचा । जनीं सार तें काय ऐसें विचंचा ॥५

## ( ४२ ) सुखसागर.

विसरलों मज मी ममतागुणें । बहुत काळवरी दुख भोगणें ।

अवचितां सुखसागर भेटला । भवजळें सरितापति आटला ॥१॥
दशदिशा भरलें दुरिच्या दुरी । दुरि म्हणो तरि तें मज अंतरीं ।
निरखितां नयनीं भरलें असे । प्रगटतां लपतां सरिसें वसे ॥२॥
प्रीति सदा जडली मज निर्गुणीं । प्रगटला सगुणीं परता गुणी ।
न कळतें कळलें मनि भाविलें । न दिसतें नयनेंविण दाविलें ॥३॥
अचपळीं चपळू निजदास हा । विनटला नटला विचरे पहा ।
अनुदिनीं वदनीं गुण गातसे । जनवनीं विजनीं निज ध्यातसे ॥४॥

## ( ४४ ) सीताशोध व लंकादहन

महीमंडळीचे कपी रीस राजे । तयां मध्यभागीं महावीर साजे ।
महारुद्र आज्ञेप्रमाणें निघाला । सिताशुद्धि आणावया सिद्ध जाला ॥१॥
सर्वें मंडळ्या चालिल्या वानरांच्या । नभोमंडळामाजि फौजा विरांच्या ।
गिरीकंदरें देश नानापरीचे । तडागे नद्या वोघ जाती गिरीचे ॥ २ ॥
पुरें पट्टणें अट्टणें धुंडिताती । कपीवीर दाही दिशा हिंडताती ।
सिता शोधितां शुद्धि कोठें न लागे । बळें धुंडितां तो विरेंवीर भागे ३
वनें भूवनें रम्य नानापरीचीं । बरीं शोधिलीं तीं गिरीकंदरींचीं ।
दरें शृंग पाठार मैदान दारीं । कपाटें गव्या वीवरें तीं भुयेरीं ॥ ४ ॥
कपी शोधितां शोधितां सुस्त जाले । नव्हे कार्य ते दैन्यवाणे मिळाले ।
म्हणे मारुती 'वीर हो ! स्थीर बैसा । तिन्ही लोक पाहोनि येतों तमासा'
भयासूर तो भीम सिंधू उडाला । त्रिकूटाचळाहूनि पैलाँड गेला ।
अकल्पीत लंकापुरी कांचनाची । पुढें देखिली सौख्यदाती मनाची ॥६॥
गुढ्या गोपुरें देउळें तें अपारें । हुडें कोट जाळांधरें थोरथोरें ।
सुवर्णाचळामाजि तें तेज फांके । तया पाहतां कीरणें दृष्टि झांके ॥७॥
गुहागोपुरांचा बहू दाट खेटा । सदा सर्वदा वाहती सर्व वाटा ।

---

१ वीरांचा वीर, मारुतिराय. २ थंड. ३ चमत्कार ४ पलीकडे. ५ यापुढें लंकेचें वर्णन आहे.

बिदी हाट बाजार कुंचे दुकानें । महामस्त ते हस्तजाती गुमानें ॥८॥
सिलेभार संजूद ते राउतांचे । बरे फेर संगीत होती विरांचे ।
दिसेना तयांलागि झुंजार कोणी । बळें जिंकिले पीडिले लोक तीनी ॥९॥
त्रिकूटाचळीं मारुती सर्व पाहे । लघूरूप होऊनि तो हिंडताहे ।
गृहें गोपुरें पाहिल्या धर्मशाळा । अकस्मात त्या देखिल्या बंदिशाळा॥१०॥
हिणासारिखे देव ते दीन जाले । नसे शक्ति ना युक्ति, पोटीं गळाले ।
भयातीत ते कांपती दैन्यवाणे । बहु गांजिले, दुःख तें कोण जाणे ॥११
सुरांकारणें कोप भीमासि आला । मनामाजि आवेश तो थर्थरीला ।
रुपें भर्भरीला तमें गर्गरीला । प्रसंगीं तये मारुती गुप्त जाला ॥ १२ ॥
मनामाजि आवांकिलें सर्व कांहीं । सिमा सांडिली तूळणा त्यासि नाहीं ।
बहू मातले, गर्व मोठ्या बळाचा । तयां झोडितों दास मी राघवाचा १३
कपीवीर तेथूनि वेगीं निघाला । अशोकावनामाजि वृक्षीं दडाला ।
अधोमुख तो जानकीलागिं पाहे । कपी राममुद्रा पुढें टाकिताहे ॥१४
सितेनें पुढें मुद्रिका वोळखीली । बहूतांपरी शब्द कारुण्यबोली ।
पुढें मारुती भेटला जानकीला । समाचार सांगोनि आनंद केला ॥१५॥
अशोकीं बहू लागले वृक्ष नाना । पहातां असंख्यात संख्या असेना ।
नव्हाटें जुनाटें वनें दाट थाटें । वनें मोडितां जाहला कडकडाटें ॥१६॥
फळें भक्षिलीं सर्व नानापरीचीं । बहुस्वाद वर्णी कळाकुसरीचीं ।
कपीवीर तो तृप्त जाला निवाला । पुढें वृक्ष मोडावया सिद्ध जाला १७
तरू मोडिले पाडिले उपडीले । किती झोडिले झाडिले चूर केले ।
गिरीसारिखे ढीग झाडून टाकी । तयाला असंभाव्य राक्षस हाकी ॥१८॥
बहूतां बळांचे बहू लोंद आले । कितीयेक ते धिंग मोठे मिळाले ।
वनें वेढिलीं धांविले काळ जैसे । भुतां खेचरां थोर कल्पांत भासे ॥१९॥

१ देवांना रावणाच्या बंदिखान्यांतून सोडवायचें असल्यामुळें तो लंकेचें स्वरूप फार वेळ पहात बसला नाहीं.

रिपू झोडिले पाडिले वृक्षघातें । भूमीं लोळती दैत्य होऊनि प्रेतें ।
पुढें देखतां जंबुमाळी कुटीला । बळें आखया आपटीला पिटीला ॥२०॥
'अरे मर्कटा ! थोर अन्याय केला ।' म्हणे रावणू 'मारितों शीघ्र तूला ।'
म्हणे मारुती 'काळ मारूं शकेना । कृपाळूपणें तोषला रामराणा'॥२१॥
पुढें पुच्छ वेढूनि गुंडाळिताती । सिमा सांडिली वीर वेंटाळिताती ।
पहा रावणू थोर कोपें कडाडी । बळें फुंकितां ज्वाळ नेटें भडाडी ॥२२॥
बळें चेतला वन्हि नेटें भडाडी । कडाडीत ज्वाळा दडाडी धडाडी ।
कपी वीर तो वाड जाला उडाला । पुढें जाळितां जाहला त्रीकुटाला ॥२३
गृहांगोपुरांमाजि तो पुच्छ घाली । त्रिकूटाचळीं आग नेटें निघाली ।
त्रिदी हाट बाजार चौबार कुंचे । पळे बोंबला नागिवा लोक नाचे॥२४॥
बहुतां परीचीं बहू रम्य यानें । बहूसाल छत्रें विचित्रें निशाणें ।
बहुतांपरीच्या बहूसाल शाळा । जळाल्या विवीधा विचित्रा विशाळा२५
पळे लोक तेथं बळें पुच्छ घाली । बहूतां विरांची बहू शांति जाली ।
महापुच्छ तें ज्वाळभंबाळ जाला । त्रिकूटाचळा थोर कल्पांत आला॥२६
महावज्र लांगूळ कल्लोळ जाला । परी पाहतां रोम नाहीं जळाला ।
गदादीत काया समुद्रांत घाली । निवाला कपी पुच्छज्वाळा विझाली २७
समुद्रीं शुचिष्मंत होऊनि आला । नमस्कार घाली तये जानकीला ।
म्हणे जानकी 'येकला बा विदेशी । कपी रे ! बहूतांपरी कष्टलाशी'॥२८॥
म्हणे मारुती 'धन्य हे दीस आले । तुम्हां देखतां सर्वही कष्ट गेले ।
म्हणे 'जननी ! लोभ आता असावा । सुरांचा बळें राम घेतो कुढावा!'२९
विवेकें जिवामाजी तो धीर केला । पुढें मारुती शीघ्र सिंधू उडाला ।
कपींलागि साांगे 'सिताशुद्धि जाली'। सुखें ऐकतां मंडळी ते निवाली ॥३०
ऋषी पर्वतीं रामसौमित्रि होते । अकस्मात आला हनूमंत तेथें ।
म्हणे 'जानकी देखिली रामचंद्रा । क्षमारूप लंकेसि आहे नरेंद्रा'॥३१॥

( रामायण, सुंदरकांड. )

## ( ४५ ) एक घोर अरण्य.

महाथोर तो लंघिला मार्ग तेहीं । पुढें पाहतां पाहतां वाट नाहीं ।
तरूंचीं बनें लागलीं तीं वितंडें । प्रचंडें उदंडें बहू झाडखंडें ॥ १ ॥
भुमी दाटले वृक्ष वृक्षीं मिळाले । तया अंतरीं वंश मिश्रीत जाले ।
वरी पाहतां वाड आकाशपंथें । पुढें रीग नाहीं तया वारयातें ॥ २ ॥
समें वीषमें झाडखंडें अचाटें । मिळालीं बळें वाजती कर्कराटें ।
कडे तूटले थोर त्या पर्वताचे । झरे वाहती झांडखंडीं विषाचे ! ॥३॥
तयाअंतरीं सिंहशार्दूळ कैसे । मदें मातले गर्जती काळ जैसे ।
गजांचीं बहू दाट थाटें विशेषें । पळों लागती थोर किंकाटघोषें ॥४॥
वहाती विषाचे महावोघ तेथें । धुधूकारतां व्याळ आकाशपंथें ।
गिरींसीं बळें आदळे तोयरासी । बहूसाळ त्या तोडिले पर्वतासी ॥५॥
गिरीशृंग पाठार दारी कपाटें । शिळाशीखरें वृक्षपाषाण थाटे ।
दरे दर्कुटे थोर भ्यासूरवाणे । बहुतापरीचे तरू ते पुराणे ॥ ६ ॥
कडे कापले तोय नेटें भडाडी । गिरीकंदरीं घोष तेणें धडाडी ।
धबाबा नद्या लोटल्या व्योमपंथें । भुमी तूटल्या थोरघातें निघातें ॥७॥
महारण्य तें घोर नीकुंभिलेचें । पुढें जावयालागिं सामर्थ्य कैचें ।
समुद्रातिरी दाटलें वसि गावें । पुढें जावया वाट नाहीं स्वभावें ॥८॥

( रामायण, युद्धकांड. )

## ( ४६ ) मनोबोधाचे निवडक श्लोक.

### ( १ ) विवेकवैराग्याचा बोध

गणाधीश जो ईश सर्वां गुणांचा । मुळारंभ आरंभ तो निर्गुणाचा ।
नमूं शारदा मूळ चत्वार वाचा । गमू पंथ आनंत या राघवाचा ॥१॥
मना सज्जना भक्तिपंथेंचि जावें । तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें ।
जनीं निंद्य तें सर्व सोडूनि द्यावें । जनीं वंद्य तें सर्वभावें करावें ॥२॥

प्रभाते मनीं राम चिंतीत जावा । पुढें वैखरी राम आधीं वदावा ।
सदाचार हा थोर सांडूं नये तो । जनीं तोचि तो मानव धन्य होतो ॥३
मना श्रेष्ठ धारिष्ट जीवीं धरावें । मना बोलणें नीच सोशीत जावें ।
स्वयें सर्वदा नम्र वाचे वदावें । मना सर्व लोकांसि रे नीववावें ॥४॥
देह त्यागितां कीर्ति मागें उरावी । मना सज्जना हेचि क्रीया धरावी !
मना चंदनाचे परी त्वां झिजावें । परी अंतरीं सज्जना नीववावें ॥५॥
जनीं सर्वसूखी असा कोण आहे । विचारीं मना तूंचि शोधूनि पाहें ।
मना त्वांचि रे पूर्वसंचीत केलें । तयासारिखें भोगणें प्राप्त झालें ॥६॥
मना मानसीं दुःख आणूं नको रे । मना सर्वथा शोकचिंता नको रे ।
विवेकें देहबुद्धि सोडूनि द्यावी । विदेहीपणें मुक्ति भोगीत जावी ॥७॥

## ( २ ) देव अनन्य भक्तास उपेक्षित नाहीं

भवाच्या भयें काय भीतोसि लंडी । धरीं रे मना धीर, धाकासि सांडी ।
रघूनायकासारिखा स्वामि शीरीं । नुपेक्षी कदा कोपल्या दंडधारी ॥८॥
समर्थाचिया सेवका वक्र पाहे । असा सर्व भूमंडळीं कोण आहे ? ।
जयाची लिळा वर्णिती लोक तीन्ही । नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥
असे हो जया अंतरीं भाव जैसा । वसे हो तया अंतरीं देव तैसा ।
अनन्यास रक्षीतसे चापपाणी । नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥१०
सदा सर्वदा देव सन्नीध आहे । कृपाळूपणें अल्प धारिष्ट पाहे ।
सुखानंद आनंद कैवल्यदानी । नुपेक्षी कदा राम दासाभिमानी ॥११॥
जगीं धन्य तो रामसूखें निवाला । कथा ऐकतां सर्व तल्लीन झाला ।
देहेभावना रामबोधें उडाली । मनोवासना रामरूपीं बुडाली ॥१२॥

## ( ३ ) सर्वोत्तमाचा दास.

मनीं लोचनीं श्रीहरी तोचि पाहे । जगीं जाणता भक्त होऊनि राहे ।
गुणीं प्रीति राखे क्रमू साधनाचा।जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा॥१३॥

सदा देवकाजीं झिजे देह ज्याचा । सदा रामनामें वदे नित्य वाचा ।
स्वधर्मोचि चाले सदा उत्तमाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा॥१४॥
सदा बोलण्यासारिखें चालताहे । अनेकीं सदा एक देवासि पाहे ।
सगूणीं भजे लेश नाहीं भ्रमाचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥१५॥
दिनाचा दयाळू मनाचा मवाळू । स्नेहाळू कृपाळू जनीं दासपाळू ।
तया अंतरीं क्रोधसंताप कैंचा । जगीं धन्य तो दास सर्वोत्तमाचा ॥१६॥

## ( ४ ) वादविवाद.

सदा सर्वदा सज्जनाचेनि योगें । क्रिया पालटे भक्तिभावार्थ लागे ।
क्रियेवीण वाचाळता ते निवारीं । तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥१७॥
निजध्यास तो सर्व तूटोनि गेला । बळें अंतरीं शोकसंताप ठेला ।
सुखानंद आनंद भेदें बुडाला । मनीं निश्चयो सर्व खेदें उडाला ॥१८॥
जनीं सांगतां ऐकतां जन्म गेला । परी वादवीवाद तैसाचि ठेला ।
उठे संशयो वाद हा दंभधारी । तुटे वाद संवाद तो हीतकारी ॥१९॥
तुटे वाद संवाद तेथें करावा । विवेकें अहंभाव हा पालटावा ।
जनीं बोलण्यासारिखें आचरावें । क्रियापालटें भक्तिपंथेंचि जावें ॥२०॥

## ( ५ ) नामस्मरण.

घनश्याम हा राम लावण्यरूपी । महा धीर गंभीर पूर्णप्रतापी ।
करी संकटीं सेवकाचा कुढावा । प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥२१॥
न वेचे कदा ग्रंथिंचें अर्थ कांहीं । मुखें नाम उच्चारितां कष्ट नाहीं ।
महाघोर संसारशत्रू जिणावा । प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥२२॥
बहूतां परी संकटें साधनाचीं । व्रतें दान उद्यापनें तीं धनाचीं ।
दिनाचा दयाळू मनीं आठवावा । प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥२३॥
नव्हे कर्म ना धर्म ना योग कांहीं । नव्हे भोग ना त्याग ना सांग पाहीं ।
म्हणे दास विश्वास नामीं धरावा । प्रभाते मनीं राम चिंतीत जावा ॥२४॥

बहू चांगलें नाम या राघवाचें । अतीसाजिरें स्वल्प सोपें फुकाचें ।
करी मूळ निर्मूळ घेतां भवाचें । जिवा मानवा हेंचि कैवल्य साचें ॥२५॥
जनीं भोजनीं नाम वाचें वदावें । अतीआदरें गद्य घोषें म्हणावें ।
हरीचिंतनें अन्न जेवीत जावें । तरी श्रीहरी पाविजेतो स्वभावें ॥२६॥
भजाया मनीं पाहतां राम एकू । करीं बाण एकू मुखीं शब्द एकू ।
क्रिया पाहतां उद्धरे सर्व लोकू । धरा जानकीनायकाचा विवेकू ॥२७॥

## (६) ज्ञानबोधास निरहंकारता हवी.

जिवां श्रेष्ठ ते स्पष्ट सांगोनि गेले । परी जीव अज्ञान तैसेच ठेले ।
देहेबुद्धिचें कर्म खोटें टळेना । जुनें ठेवणें मीपणें आकळेना ॥ २८ ॥
म्हणे दास सायास त्याचे करावे । जनीं जाणता पाय त्याचे धरावे ।
गुरुअंजनेंवीण तें आकळेना । जुनें ठेवणें मीपणें आकळेना ॥२९॥
सदा वीषयो चिंतितां जीव झाला । अहंभाव अज्ञान जन्मास आला ।
विवेकें सदा स्वस्वरूपीं भरावें । जिवा ऊगमीं जन्म नाहीं स्वभावें॥३०॥
निराकार आधार ब्रह्मादिकांचा । जया सांगतां शीणली वेदवाचा ।
विवेकें तदाकार होऊनि राहें । मना संत आनंत शोधूनि पाहे ॥३१॥
नसे पीत ना श्वेत ना श्याम कांहीं । नसे व्यक्त अव्यक्त ना नीळ नाहीं
म्हणे दास विश्वासतां मुक्ति लाहे । मना संत आनंत शोधूनि पाहे ३२
महावाक्य तत्त्वादिकें पंचकर्णें । खुणें पाविजे संतसंगें विवर्णें ।
द्वितीयेसि संकेत जो दाविजेतो । तया सांडुनी चंद्रमा भाविजेतो ॥३३॥
जेणें मक्षिका भक्षिली जाणिवेची । तया भोजनाची रुची प्राप्त कैंची ।
अहंभाव ज्या मानसींचा विरेना । तया ज्ञान हें अन्न पोटीं जिरेना॥३४
अहंकार विस्तारला या देहाचा । स्त्रियापुत्रमित्रादिकें मोह त्यांचा ।
बळें भ्रांति हे जन्मचिंता हरावी । सदा संगती सज्जनाची धरावी ॥३५॥
नसे अंत आनंत संता पुसावा । अहंकारविस्तार हा नीरसावा ।
गुणेंवीण निर्गूण तो आठवावा । देहेबुद्धिचा आठऊ नाठवावा ॥३६॥

तिन्ही लोक जेथूनि निर्माण झाले । तया देवरायासि कोणी न बोले ।
जगीं थोरला देव तो चोरलासे । गुरूवीण तो सर्वथाही न दीसे ॥३७॥

नव्हे कार्यकर्ता नव्हे सृष्टिभर्ता । परेहून पर्ता न लिंपे विवर्ता ।
तया निर्विकल्पासि कल्पीत जावें । परी संग सोडोनि सूखें रहावें ॥३८॥

देहेबुद्धिचा निश्चयो ज्या ढळेना । तया ज्ञान कल्पांतकाळीं कळेना ।
परब्रह्म तें मीपणें आकळेना । मनीं शून्य अज्ञान हें मावळेना ॥३९॥

मना गूज रे तूज हें प्राप्त झालें । परी अंतरीं पाहिजे यत्न केले ।
सदा श्रवणें पाविजे निश्चयासी । धरीं सज्जनीं संगती धन्य होसी ॥४०॥

मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणें. स्थळप्रत.
अनुक्रम ... वि: ...
क्रमांक ... नों दि: ...

समाप्त

REFBK-0008340
REFBK-0008340